ज्ञानदीप लावू जगी

# पुणे नगर वाचन मंदिर

स्थापना : ७ फेब्रुवारी १८४८

email : pnvm1848@gmail.com
www.punenagarvachan.org

| | | |
|---|---|---|
| पुस्तकाचे नाव | : | विठ्ठलभाई पटेल (चरित्र व आठवणी) |
| लेखक | : | जनार्दन गंगाधर करंदीकर |
| प्रकाशक | : | नॅशनल इन्फर्मेशन ॲण्ड पब्लिकेशन्स लिमिटेड, मुंबई |
| प्रकाशन वर्ष | : | १९४८ |
| मूळ ग्रंथ प्रत | : | शिक्षण प्रसारक मंडळी, पुणे |

पुणे नगर वाचन मंदिर

अंकेक्षण (डिजीटायझेशन) प्रकल्प
अंकेक्षण रूपांतर - २०२१

# विठ्ठलभाई पटेल

[ चरित्र व आठवणी ]

लेखक

जनार्दन गंगाधर करंदीकर, बी. ए., बी. टी.

D.V.POTDAR LIBRARY
S P COLLEGE
D00952

923.2
Pat- Kar
8122

मूल्य ४॥ रुपये

चरित्रनायक



विट्ठलभाई पटेल

# विठ्ठलभाई पटेल

[ चरित्र व आठवणी ]

लेखक

**जनार्दन गंगाधर करंदीकर,** बी. ए., बी. टी.,

प्रस्तावनाकार

**नामदार ग. वा. मावळंकर,**

*अध्यक्ष, भारतीय मध्यवर्ती विधिमंडळ*

नॅशनल इन्फर्मेशन ॲण्ड पब्लिकेशन्स लिमिटेड, मुंबई

प्रथमावृत्ति १९४८

सर्वाधिकार सुरक्षित

मूल्य ४॥ रुपये

: प्रकाशक :
कुसुम नैय्यर
नॅशनल इन्फर्मेशन ॲण्ड
पब्लिकेशन्स लिमिटेड,
नॅशनल हाऊस, ६ तुलख रोड
अपोलो बंदर, मुंबई.

: मुद्रक :
मा. ह. पटवर्धन
संगम प्रेस लि.,
४०-४१ वेलस्ले रोड,
पुणें १.

# अनुक्रमणिका


समर्पण

कृतज्ञता

प्रस्तावना

पटेल घराण्याची वंशावळ

| प्रकरण क्रमांक | प्रकरणाचें नांव | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १ | घराणें व बालपण | १ |
| २ | वकील आणि बॅरिस्टर | ८ |
| ३ | कौन्सिलर पटेल [ सन १९१३ ते १९१९ ] | २२ |
| ४ | मैदानांत उडी | ३६ |
| ५ | विलायतेंतील हालचाली | ४८ |
| ६ | पटेल व गांधीयुगाचा उदय | ७६ |
| ७ | पटेल व कायदेभंगाची चळवळ | ८८ |
| ८ | आगामी लढ्याचा पूर्वरंग [ कार्पोरेशन-मधील कामगिरी ] | १०९ |
| ९ | पटेल व स्वराज्यपक्ष | १३७ |
| १० | वैभवाच्या शिखरावर [ पहिला टप्पा ] | १५३ |
| ११ | वैभवाच्या शिखरावर [ दुसरा टप्पा ] | १७४ |
| १२ | वैभवाच्या शिखरावर [ तिसरा टप्पा ] 'पटेल–राज्य' | १९३ |
| १३ | चावडींतला 'पाटील' बाहेर निघाला ! | २१९ |
| १४ | अध्यक्षपदाच्या काळांतील गमती व आठवणी | २२७ |
| १५ | सत्याग्रह–संग्राम व परदेशवास | २३८ |
| १६ | देहावसान | २५३ |
| परिशिष्ट १ | पटेलांचें मृत्युपत्र | २६० |
| ,, २ | विठ्ठलभाईंची वीरवाणी | २६३ |
| ,, ३ | विठ्ठलभाईंना विश्ववंदन | २६५ |
| ,, ४ | पत्रव्यवहारांतील कांहीं निवडक उतारे | २३९ |

## चरित्रास आधारभूत झालेले महत्त्वाचे ग्रंथ


( १ ) **गेलीं पांच वर्षें** श्री. न. चिं. केळकर

( २ ) **विलायतचीं बातमीपत्रें** श्री. न. चिं. केळकर

( ३ ) **काँग्रेसचा इतिहास** डॉ. पट्टाभि सीतारामय्या

( ४ ) **महात्मा गांधी चरित्र** सी. के. दामले

( 5 ) From Ploughboy to President—
R. Chowdhury

( 6 ) Report of the Civil Disobedience Inquiry Committee—1922

( 7 ) Proceedings of the Bombay Legislative Assembly and the Bombay Corporation.

# समर्पण

माझ्या परमपूज्य, विद्याव्यासंगी आणि ईश्वरभक्त मातुःश्री

**श्री. यशोदाबाई करंदीकर,**

यांना ही लेखनकृति मी नम्रतापूर्वक सादर समर्पण करितों.

जनार्दन गंगाधर करंदीकर

# कृतज्ञता



विठ्ठलभाई पटेल यांचें हें चरित्र व आठवणी वाचकांना सादर करण्यांत मला समाधान वाटत आहे. कोणत्याहि कार्याची सफलता होण्याला वेळ किंवा योग यावा लागतो अशी एक सर्वसामान्य समजूत आहे. या चरित्राचें असेंच झालें. कारण वास्तविक हें चरित्र मी सहा सात वर्षांपूर्वी म्हणजे महायुद्ध सुरू झालें तेव्हांच लिहून ठेवलें होतें. परंतु अनेक अडचणींमुळें या चरित्राचें प्रकाशन आजवर होऊं शकलें नाहीं ! आतां त्याच्या प्रकाशनाचा योग येत आहे.

हें चरित्र लिहिण्याच्या कामीं विशेष प्रोत्साहन मला प्रथमतः महाराष्ट्राचे वंदनीय पुढारी तपोनिधि कै. तात्यासाहेब केळकर यांच्याकडून मिळालें. चरित्रलेखनाकरितां लागणारीं साधनें कुठें कशीं मिळूं शकतील हें त्यांनींच प्रथम सांगितलें. पटेल हे तात्यासाहेबांचे परममित्र व राजकारणांत कित्येक वर्षें निकटचे सहकारी होते, हें प्रसिद्ध आहे. तात्यासाहेबांनीं केलेल्या या मार्गदर्शनाची उपकृति कोणत्या शब्दांत मानावी हें समजत नाहीं. असो. त्यानंतर मी या चरित्रलेखनाकरितां साधनें जुळविण्यास लागलों. त्याकरितां पटेलांना जाणणाऱ्या व त्यांचा ज्यांना सहवास झाला अशा त्यांच्या अनेक स्नेह्यांच्या भेटी घेतल्या. त्यांत पटेलांचे लहानपणचे सहाध्यायी, तसेंच त्यांच्या पुढील सार्वजनिक जीवनांतले सहकारी या सर्वांचा समावेश होतो. कांहींनीं हृदयस्पर्शी भाषेंत पटेलांच्या आठवणी सांगितल्या. कांहींनीं त्या लिहून पाठविल्या. त्यांच्या कांहीं मित्रांनीं, परिचितांनीं व नातलगांनीं अस्सल साधनें पुरविलीं. कांहींनीं अशा साधनांचा मला उपयोग करूं

कै. म. म. द. वा. पोतदार ग्रंथ संग्रह

दिला. खासगी पत्रव्यवहाराचाही मी चरित्रांत योग्य त्या ठिकाणीं उपयोग केला आहे. अशा या अस्सल दर्जाच्या साधन सामुग्रीमुळें पटेलांचें हें चरित्र वस्तुस्थिति निदर्शक झालें आहे, अशी माझी नम्र समजूत आहे. अर्थात् या समजुतीची परीक्षा वाचक करतीलच. साधन सामुग्रीचें साहाय्य करणाऱ्या सर्व सज्जनांचा उल्लेख प्रत्यक्ष चरित्र वाचतांना वाचकांना सांपडेल त्या सर्वांचा मी आभारी आहें.

या ठिकाणीं एवढें नमूद करून ठेवावेसें वाटतें कीं, पटेलांचें हें चारित्र लिहिण्यास मी उद्युक्त झालों त्याला एकादें नेमकें कारण मला सांगता येणार नाहीं. पण एवढें मात्र निश्चितपणें सांगूं शकतों कीं, विठ्ठलभाई पटेल हे हिंदुस्थानच्या मध्यवर्ती विधिमंडळाचे पहिले हिंदी अध्यक्ष झाले ही गोष्ट हिंदुस्थानच्या आधुनिक इतिहासांत सुवर्णाक्षरांनीं लिहून ठेवण्यासारखी झाली. व या महत्त्वाच्या घटनेमुळें पटेलांचें चारित्र लिहावें असा साहजिक विचार माझ्या मनांत आला. अर्थात् अध्यक्ष होण्यापूर्वी ते अखिल भारताचे पुढारी म्हणून सुविख्यात झालेलेच होते. परंतु अध्यक्षस्थान मंडित केल्यानंतर पटेलांनीं जें कार्य केलें त्यामुळें त्यांचा यशोदुंदुभि पंचखंडात निनादूं लागला! युरोप-अमेरिकेंत प्रकृति बरी नसूनहि त्यांनीं अविश्रांत दौरे काढून हिंदुस्थानाची कीर्ति उज्ज्वल करून सांडली! हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याच्या मागणीला लोकमान्यांच्या पश्चात् पटेलांनीं जागतिक महत्त्व प्राप्त करून दिलें असें म्हटलें तर त्यांत अतिशयोक्ति होणार नाहीं! हा अभागी देश ताबडतोब स्वतंत्र झाला पाहिजे, अशी प्रभावी घोषणा करून पटेलांनीं इतर राष्ट्रांची हिंदुस्थानबद्दल सहानुभूति अल्पावधींत संपादन केली. व हें कार्य पुढें नेटानें सतत चालू राहावें अशी दूरदर्शी योजनाहि करून ठेविली. परदेशांतील कामगिरीचा श्रीगणेशा पटेलांनीं लोकमान्यांच्या हयातींत त्यांच्या निकटवर्ती राहून केला. केवळ या त्यांच्या परदेशांतील चळवळीपुरता विचार केला तरीसुद्धां पटेलांचें तें काम संस्मरणीय झालें आहे. विलायतेंत सन १९१८ साली होमरूल लीग व कॉंग्रेस यांचें संयुक्त शिष्टमंडळ टिळक व पटेलांच्या नेतृत्वाखालीं स्वराज्याच्या मागणीचा पुरस्कार करण्याकरितां गेलें होतें. त्यावेळीं पटेलांना मिळालेला अनुभव

बहुमोल होता. लोकमान्यांच्या निधनानंतर त्यांच्या धोरणाशीं व कार्य पद्धतीशीं कॉंग्रेसमध्यें राहून समरस होणारे जे कार्यकर्ते होते त्यांत पटेलांची प्रामुख्यानें गणना होते. महात्मा गांधींच्या राजकारणाशीं कांहीं मूलभूत बाबतींत त्यांचें पटत नसे तरी सुद्धां पटेलांचा विशेष हा, कीं त्यांना स्वतःला जें व्यवहार्य वाटे तें प्रगट करण्यास व त्याप्रमाणें प्रसंगानुरूप आचरण करण्यांत त्यांनीं निर्भयता दाखविली. परंतु त्याबरोबरच स्वतःचा मनापासून विरोध असतांनाहि एकदां जें सर्वानुमतें करावयाचें ठरलें तें साध्य करण्यांत त्यांनीं हा विरोध आडवा येऊं दिला नाहीं. उलट तो त्या त्या प्रसंगीं बाजूला ठेवून राष्ट्रकार्याकरितां सर्वांशीं सहकार्याचीच वागणूक ठेवली. राजकारणांतली ही तारेवरील कसरत होती आणि ती करण्यांत त्यांनीं अप्रतिम यश मिळविलें! पटेलांची उज्ज्वल कार्यनिष्ठा, निःस्वार्थी वृत्ति व देशहिताची तळमळ, कुडींत प्राण असेपर्यंत हिंदुस्थानच्या स्वराज्य-संपादनार्थ केलेले अविरत परिश्रम या महान् गुणसमुच्चयामुळें पटेलांनीं आपल्या कोट्यवधि देशबांधवांच्या हृदयांत अढळ स्थान मिळविलें. वृद्धापकाळ झाला असतांना, त्यांत हद्दपारीचे हाल भोगावे लागले असतांना व शरीर व्याधिजर्जर झालें असतांनाहि या ध्येयवादी महापुरुषानें जी कार्यैकनिष्ठा आचरून दाखविली तिचा विचार केला म्हणजे आपण आश्चर्यानें थक्क होऊन जातों! पटेलांच्या ठिकाणीं कांहीं दोषहि असतील, नाहीं असें नाहीं. पण ‘ एको हि दोषो गुणसन्निपाते निमज्जतीन्दोः किरणेष्विवाङ्कः । ’ ही सदुक्ति त्यांच्या बाबतींत यथार्थ लागू पडते. म्हणूनच राष्ट्राला त्यांच्यातल्या किरकोळ दोषांची आठवण न राहतां त्यांच्या ठिकाणीं वसत असलेल्या भव्य गुणनिधींचेंच राष्ट्र चिरंतन स्मरण ठेवील ! हिमालयाचें दर्शन घ्यावयास जातांना तेथें कांहीं ठिकाणीं शेवाळ सांचलें असलें तरी तिकडे कोणाचें लक्ष जात नाहीं, तर त्या पर्वतराजाची उत्तुंग हिमधवल शिखरेंच मन आकर्षित करतात. विठ्ठलभाईंच्याबद्दल प्रत्येक हिंदी मनुष्याला हिमाचलाप्रमाणें नितांत आदर कां वाटतो त्याची कारणमीमांसा वरील विवेचनावरून आपल्या सहज ध्यानांत येते. पटेलांचें चरित्र लिहिण्याची प्रवृत्ति हें त्याच आदरपूर्ण भावनेचें फल आहे.


आणि म्हणूनच विठ्ठलभाईंना राष्ट्र विसरूं शकत नाहीं. पटेलांना इहलोक सोडून एका तपाहून अधिक काल होऊन गेला परंतु अशीं कितीहि तपें निघून गेलीं तरी त्यांचा कीर्तिपरिमल तसाच अखंड दरवळत राहून तो सर्वांना उत्तेजन आणील यांत मुळींच संदेह नाहीं. भूलोकांतून दिवंगत झालेला हा देदीप्यमान तारा भारताच्या नभःप्रांगणांतून आपल्या मातृभूमीतील कोटी बांधवांना सदैव मार्गदर्शक होत राहील. पटेलांच्या जीवनाचें सार सांगावयाचें तर आमरण देशसेवेचें असिधाराव्रत घेतलेले ते एक महान् त्यागी वीर होते. किंवा महात्मा गांधींच्या शब्दांत सांगावयाचें तर ते देशाकरितां 'फकीर' झाले होते! पटेलांनीं आमरण राष्ट्राचाच संसार केला. घरचा प्रपंच तर त्यांना नव्हताच! पत्नी ऐन तारुण्यांत निवर्तलेली. ना पोर ना बाळ. द्रव्याचा लोभ नाहीं मग स्वतःकरितां संग्रह कुठला! चैनीला फाटा दिलेला. जनहिताची अंतःकरणांत कळकळ व तळमळ! आणि तें साधण्याकरितां भगीरथ प्रयत्न. ह्या सर्वांच्या जोडीला जात्याच कुशाग्रबुद्धि, वादपटुता, व्यवहारकौशल्य, त्यागवृत्ति, सामाजिक जीवनाशीं समरसता, लढाऊ व निश्चयी बाणा या सर्व गोष्टींनीं पटेलांची इहलोक यात्रा अतिशय महत्त्वपूर्ण झाली आहे. त्यांच्या चरित्राचें जितकें अधिकाधिक अवलोकन व परिशीलन आपण करावें तितकी त्यांची अधिकाधिक योग्यता आपणांला पटूं लागते. खरें पाहिलें तर पटेलांना एकंदरीनें अकालींच मृत्यु आला व त्यामुळें हिंदुस्थान एका महान् कार्यकर्त्याला मुकला! त्यांच्या निधनानें झालेली हानि देशाला तीव्रतेनें जाणवली. पटेल हे वयानें वृद्ध होत चालले होते तरी या कालांतच ते अधिक उत्साही व जहाल झाले होते हें त्यांच्या मृत्यूपूर्वीच्या एका पत्रावरून सिद्ध होतें. मृत्युसमयीं त्यांची अहोरात्र शुश्रूषा करणारे सुभाषचंद्र बोस हे होते. हा एक अकल्पित दैवयोग होता कीं काय कोण जाणे? कारण पटेल साठ वर्षांचे वृद्ध झाले होते, तरी त्या महान् क्रांतिकारक युवकाच्या निकट सान्निध्यानें त्या रुग्णशय्येवरील वृद्धवीराचा मानसिक उत्साह द्विगुणित झाला होता. माझी प्रकृति बरी झाली तर "मला देशापुढें अगदीं नवा आणि पाणीदार कार्यक्रम ठेवावयाचा आहे" अशा अर्थाचें पटेलांचें

अंतकालापूर्वीचें एक पत्र त्यांनीं आपल्या मित्राला लिहिलेलें आहे. देशाच्या दुर्दैवानें तो कार्यक्रम देशापुढें येऊं शकला नाहीं. परंतु त्यावेळचा एकंदर पत्र–व्यवहार व त्यांची विचारसरणी पाहतां त्यांचा कार्यक्रम समाजवादी क्रांतिकारकांच्या कार्यक्रमाशीं बराच जुळता असावा असें अनुमान करण्याला कांहीं हरकत नाहीं. असो.

शक्य तों अस्सल साधनें जमवून केलेली ही चरित्र लेखनाची अल्पस्वल्प सेवा वाचक गोड करून घेतील असा मला भरंवसा वाटतो. शिवाय दुसरी उल्लेखनीय गोष्ट म्हणजे या चरित्राला मिळालेली प्रस्तावना! असेंब्लीचे भूतपूर्व अध्यक्ष विठ्ठलभाई पटेल यांच्या चरित्राला विद्यमान अध्यक्ष देशभक्त दादासाहेब मावळंकर यांची प्रस्तावना हा खरोखर अपूर्व असा रत्न–कांचन संयोग आहे! हा संयोग प्रथम माझ्या कल्पनेंत थोडा वेळ होता. परंतु शेवटीं तो कृतींत घडवून आणण्याचा प्रयत्न करूं या असा मनाशीं निश्चय केला व एक दिवस श्री. दादासाहेबांना मी माझा मनोदय पत्रद्वारें कळविला. श्री. दादासाहेब अतिशय कार्यमग्न असूनहि त्यांनीं मला आस्थापूर्वक सविस्तर पत्र लिहून पुण्यास बोलावलें व नंतर चरित्राचें हस्तलिखित अतिशय काळजीपूर्वक वाचून प्रस्तावना लिहून दिली शिवाय कित्येक उपयुक्त सूचनाहि केल्या. पटेल घराण्याची वंशावळहि त्यांनीं लिहून दिली. श्री. दादासाहेब हे श्री. विठ्ठलभाईंचे निकटवर्ती स्नेही व सहकारी होते. अर्थातच त्यांनीं ही प्रस्तावना अत्यंत आत्मीयतेनें व सहृदयतेनें लिहिली. श्री. दादासाहेबांसारख्या थोर व अधिकारी पुरुषांच्या लेखणींतून उतरलेली ही प्रस्तावना किती उद्बोधक व सुंदर झाली आहे हें वेगळें सांगण्याचें कारण नाहीं. त्यांची ही उपकृति किती व कशी मानावी हें मला समजत नाहीं एवढेंच त्यासंबंधीं सांगतों.

या पुस्तकांत जे फोटो आहेत ते छापण्याची परवानगी कलकत्ता येथील मॉडर्न बुक एजन्सीच्या व्यवस्थापकांनीं दिल्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

बार्शी
ता. १७–११–१९४७ } जनार्दन गंगाधर करंदीकर.



नामदार ग. वा. मावळंकर

शि. प्र. मंडळी, पुणें
कै. प. म. डॉ. द. वा. पोत
8122
दाखल अंक
923.2/Pat-K
किंमत 4=50 तारीख 21/10

# प्र स्ता व ना

आधारभूत माहिती असलेलें स्व. विठ्ठलभाईचें सविस्तर चरित्र महाराष्ट्रीय जनतेपुढें मांडण्याचें काम राष्ट्रीय दृष्टया व आधुनिक इतिहासाचीं साधनें संग्रहीत करून कायम ठेवण्याचे दृष्टीनें फार महत्त्वाचें आहे व तें श्री. करंदीकरांनीं परिश्रमपूर्वक केलें आहे याबद्दल ते अभिनंदनास पात्र आहेत.

स्व. विठ्ठलभाईच्या कामगिरीचें योग्य आकलन व मूल्यांकन करण्यास ते ज्या काळांत व परिस्थितींत होते ती लक्षांत घेतली पाहिजे. त्या वेळच्या स्वाभाविक मर्यादा व अडचणी डोळयांसमोर ठेवून, त्यांच्या जीवनकार्याकडे पाहिलें पाहिजे. कोणत्याहि थोर पुरुषाच्या चरित्राविषयीं विचार करतांना याप्रमाणेंच दृष्टि ठेवली तरच त्यांच्या कामगिरीचें महत्त्व व तिची आपणांस किती मदत झाली हें आपण समजूं शकूं.

विठ्ठलभाईचा काळ म्हणजे १८७१ ते १९३३ पावेतोंचा (जन्म १८-२-१८७१ व मृत्यु २२-१०-१९३३). हिंदुस्थानच्या राष्ट्रीय जीवनाचे दृष्टीनें या ६२ वर्षांचे स्थूलपणें तीन कालखंड पडतात :

(१) १९०५-६ पावेतोंचा एक कालखंड. १८८४-८५ सालीं राष्ट्रीय महासभेची (काँग्रेस) स्थापना झाली तेव्हांपासून बंगालच्या फाळणी-विरुद्ध प्रचंड जागृति व चळवळ होऊन १९०६ च्या कलकत्त्याचे राष्ट्रीय सभेचे बैठकींत "स्वराज्य" हें ध्येय ठरून तें प्राप्त करण्यासाठीं स्वदेशी, बहिष्कार व राष्ट्रीय शिक्षण या साधनांचा अवलंब करण्याचा ठराव होई पावेतोंचा काल.

( २ ) १९०६ ते राष्ट्रीय सभेच्या सप्टेंबर १९२० मध्यें कलकत्त्यास भरलेल्या खास जादा अधिवेशनांत असहकाराचा ठराव पास होऊन १९२० चे डिसेंबरांत तो नागपूर अधिवेशनांत पास होई पावेतोंचा काळ.

( ३ ) १९२१ पासून १९३७ मध्यें प्रांतिक कायदेमंडळांत प्रवेश करून अधिकारसूत्रें हातीं घेण्याचा राष्ट्रीय सभेनें निश्चय केला तेथपावेतोंचा काळ.

१९३७ नंतरच्या कालाचेहि खंड पडतात पण त्यांच्याशीं आपल्या चरित्रनायकाचा संबंध येत नसल्यानें त्यांचा उल्लेख या प्रस्तावनेंत अप्रस्तुत आहे.

आमच्या राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक वगैरे प्रश्नांकडे व परिस्थितीकडे पाहाण्याची आमची दृष्टि व विचारांची भूमिका प्रत्येक कालखंडांत बदललेली होती. हा बदल अमुक दिवशीं झाला व अमुक दिवसापावेतो कायम होता असें नाहीं. पण तीन कालखंडांतील तीन प्रवाह स्पष्ट व अलग दिसतात एवढेंच मला सांगायचें आहे.

पहिल्या कालखंडांत राजकीय अशी भूमिका म्हणजे इंग्रजाच्या न्यायबुद्धीवर विश्वास. त्यांचें येथें राज्य झालें, अंदाधुंदी जाऊन सुव्यवस्था झाली, " काठीला सोनें बांधून रामेश्वरापासून काशी पावेतों जाणें " शक्य झालें, यांत ईश्वरी संकेत आहे, इंग्रजांच्या हातूनच आमचें हित होणार, ही श्रद्धा. म्हणून राजकारण म्हणजे इंग्रजांस दुःखें सांगणें, आमच्या स्थितीविषयीं त्यांना सज्ञान करण्याचा प्रयत्न करणें असें वाटत होतें, व आपल्या समाजांतील दोष काढून सुधारणा करणें आवश्यक समजण्यांत येत होतें. विचारवंत सामाजिक सुधारणेकडे लागले, याचा अर्थ जर आज आम्ही असा करूं लागलों, कीं त्यांस राजकीय दृष्टि नव्हती अगर राजकीय धकाधकींत भाग घेण्याची हिंमत किंवा कुवत नव्हती, त्यागास ते तयार नव्हते, त्यांची देशभक्ति आपल्याइतकी प्रखर नव्हती, तर आपली समजूत चुकीची आहे इतकेंच नव्हे, तर त्यांस आपल्या हातून घोर अन्याय केल्याचें पाप आपल्या माथीं येईल.

दुसऱ्या कालखंडांत पहिला विश्वास व श्रद्धा डळमळली होती. राजकीय सत्ता हातीं आल्यास आपणांस समाजसुधारणा हव्या तशा करून घेतां येतील व राजकीय सत्ता हस्तगत होण्यास केवळ इंग्रजांवर विश्वास व श्रद्धा ठेवून कांहींहि साध्य होणार नाहीं; तर आपण आपली शक्ति–प्रजाशक्ति–वाढविली पाहिजे, तरच राजकीय सत्ता हातीं येईल, या प्रकारची वैचारिक भूमिका दुसऱ्या कालखंडांत प्रभावी झाली. व म्हणून "स्वराज्य" हें ध्येय, स्वदेशी, बहिष्कार व राष्ट्रीय शिक्षण हीं शक्तिवर्धनाचीं साधनें व जमेल तेथें सरकारची मदत व आवश्यक तेथें विरोध म्हणजेच प्रतियोगी सहकारिता ( Responsive co-operation ) हें राजकीय लढ्याचें धोरण ठरलें. सामाजिक सुधारणा चालू राहिली तरी तिच्यावरील भर कमी झाला. या कालखंडास ढोबळपणें महाराष्ट्रांतील " टिळक–युग " म्हणतां येईल.

तिसरा खंड निर्भेळ असहकाराचा–प्रजाशक्ति विकासाचा – इंग्रजांवरील संपूर्ण अविश्वासाचा – इंग्रज आपणांस स्वराज्य देतील व तें मिळेल असा विचारहि खुळचटपणाचा वाटूं लागला होता. इंग्रजांशीं दोन हात केलेच पाहिजेत--आपल्यामध्यें जेवढी शक्ति असेल तेवढेंच आपण मिळवूं शकूं– अशी विचाराची भूमिका झाली. प्रजाशक्तीचा विकास म्हणजे समाजाच्या सर्वांगांचें बळ वाढविणें; म्हणून सामाजिक, आर्थिक वगैरे प्रत्येक क्षेत्रास राजकारणाची पार्श्वभूमि मिळाली. या कालखंडास हिंदुस्थानांतील " गांधी-युग " या नांवानें ओळखतां येईल.

स्व. विठ्ठलभाईंचा जन्म, लहानपण, शिक्षण व वकिलीस सुरवात पहिल्या कालखंडांत; त्यांच्या सार्वजनिक कार्यास प्रारंभ, व त्या कार्याचा पाया दुसऱ्या कालखंडांत, व विस्तार तिसऱ्या कालखंडांत होता. हें लक्षांत घेतलें म्हणजे कै. विठ्ठलभाईंचें लोकमान्यांशीं तादात्म्य कां व कितीं होतें व महात्माजींच्या वैचारिक भूमिकेशीं त्यांचा मतभेद कां होता हें स्पष्ट होण्यास मदत होईल.

काळाच्या प्रगतीबरोबर परिस्थितीचें पुन्हा पुन्हा निरीक्षण करून थोर पुरुष आपापल्या विचारांत व धोरणांत बदल करीत असतात. तरीपण भूत-

कालांतून वर्तमानकाळांत होत असलेल्या प्रवासांत पहिले संस्कार, व मनाची ठेवण कोणींहि बदलूं शकत नाहीं. नव्याजुन्याचा म्हणजे मागची पिढी व तरुण पिढीचा मतभेद स्वाभाविक व म्हणून चिरकाल चालणारा आहे. तरीहि जुन्याच्या पायावरच नवें आधारलेलें आहे, जुन्याचे अनुभवांचा, प्रयोगांचा, चुक्यांचा परिचय नव्यांस झाल्यानेंच ते प्रगति-मार्गावर आहेत, हें नव्यांनीं विसरतां कामा नये; एवढी सूचना अगर विनंती सद्गत थोर पुरुषांचें चरित्र वाचतांना किंवा अभ्यासतांना तरुण देशभक्तांस करणें आवश्यक आहे. असहकारयुगांत श्री. विठ्ठलभाई पटेल व राष्ट्रीय सभेचे त्यांचे समकालीन पुढारी यांचे गांधीजींच्या अनुयायांशीं जे मतभेद झाले त्यांस कांहीं विशेष अगर वैयक्तिक कारणें होतीं अशा शंकेचें कारण नाहीं. नव्याजुन्यांच्या संगमांत कांहीं काळ दोन प्रवाह निराळे दिसणें अपरिहार्य आहे.

कै. श्री. विठ्ठलभाई व त्यांचे बंधु सरदार दोघांनींहि आपल्या सर्व शक्तींचा देशाच्या कामीं उत्तम उपयोग करतां येईल अशीं परिस्थिति स्वतः-साठीं निर्माण केली हा त्यांच्या जीवनाचा फार मोठा विशेष आहे. गुजरातेंत पाटीदार ज्ञाति–यांचे दोन वर्ग आहेत ( १ ) लेवा व ( २ ) कडवा-बुद्धिमान्, मेहनतू, धडाडीची अशी तिची ख्याति आहे. शेतींत त्यांचा हातखंडा आहे. जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रांत ते धडाडीनें चमकत आहेत. मोठमोठे कारखानदार, समाजसुधारक, सार्वजनिक कार्यकर्ते, बडे आय्. सी. एस्. अमलदार वगैरे बरीच मंडळी या ज्ञातींत आहेत. परदेशगमन करून, तेथें व्यापारउदीम करून, त्यांनीं आपापलीं गांवें संपन्न केलीं आहेत. गुजरातेंत सर्व ठिकाणीं पाटीदार वस्ती आहे व खेडेगांवांचें संपूर्ण स्वराज्य ब्रिटिश अमदानीपूर्वी होतें, त्यांत पाटीदार ज्ञातिच प्रामुख्यानें मांचा कारभार करीत असल्यानें खेडेगांवांतून कोणाहि पाटीदारास आजहि इतर लोक ' बापा ' म्हणून संबोधितात. पाटीदारांचा जास्त प्रख्यात असा गट खेडा जिल्ह्यांत व त्यांच्या आजूबाजूचे प्रदेशांत–ज्याला " चरोतर " ( चारुतर ) म्हणतात–आहे. हा प्रदेश खेडा जिल्ह्यांत व गायकवाडी राज्यांत आहे. ' चरोतर ' च्या पाटीदारांतहि जे विशेष कुलीन व आदरास

पात्र समजले जातात त्यांत " करमसद " गांवचे पाटीदार मोडतात. पटेल बंधु ' करमसदचे. ' त्यांच्या अंगीं, बुद्धि, धडाडी, मेहनत, उदारता, त्याग वगैरे सद्गुण उपजतच होते; व त्यांचा उपयोग त्यांनीं खेडेगांवांतील लहानशा क्षेत्रांत न करतां किंवा संकुचित होऊं न देतां विशाल क्षेत्रांत व विशाल दृष्टीनें केला ही पटेल-बंधूंची असाधारण महत्ता होय. आजहि खेडोपाडीं व ठिकठिकाणीं असे अमोल गुण असणारीं माणसें सांपडायचीं नाहींत असें नाहीं. पण इंग्रजी अंमलांत खरें राजकारण परकीयांच्या हातांत केंद्रित होऊन गेल्यामुळें अशा गुणांच्या मंडळींची दृष्टि सामान्यतः कूपमंडूक तऱ्हेची झाली व गांवच्या भाडणतंट्यांत, खटपटींत, व उखाळ्यापाखाळ्यांच्या राजकारणांतच त्यांच्या कर्तृत्वास वाव मिळाला. पटेलबंधूंनीं लहानपणापासूनच विशाल दृष्टि व उच्च आदर्श ठेवून कष्ट सोसून इंग्रजी शिक्षण घेतलें व स्वसामर्थ्यावर विलायतेस जाऊन येऊन धंद्यांत व सार्वजनिक आयुष्यांत मानाचें स्थान मिळविलें, देशाची उत्तम सेवा केली. ते लहानाचे मोठे कसे झाले, देशांतील राजकारणांत त्यांचें महत्त्व कसकसें वाढत गेलें, याची उद्बोधक हकीगत श्री. करंदीकरांनीं या चरित्रांत दिली आहे ती वाचनीय आहे.

सरदार वल्लभभाईंशीं माझी ओळख ते अहमदाबादेस बॅरिस्टरीचा धंदा करण्यास १९१३ सालीं आले त्यानंतर लौकरच सुमारें वर्षभरांत झाली, व त्यानंतर थोड्याच काळानें त्यांच्याबरोबर सार्वजनिक कार्य करण्याचें सुदैव लाभलें. त्यांच्यामुळें स्व. विठ्ठलभाईंचा निकट परिचय सुमारें १९१६ पासून झाला. १९१७-१८ सालीं खेडा जिल्ह्यांत पिकांच्या आकारणीवरून हिंदुस्थानांतील सामुदायिक सत्याग्रहाची पहिली चळवळ महात्माजींच्या नेतृत्वाखालीं झाली. त्या वेळीं पिकाबाबत सरकारकडे पहिलें गाऱ्हाणें करणाऱ्या गुजरात सभेचा मी चिटणीस होतों. वल्लभभाई पटेल कार्यकारी समितीचे सभासद होते व सरकारांत विधिमंडळद्वारा गाऱ्हाणें मांडणारे स्व. विठ्ठलभाई होते. तेव्हांपासून पुढच्या सर्व आयुष्यांतील सार्वजनिक सहकार्यांचे अनेक प्रसंग डोळ्यांपुढें येतात. पण ते प्रस्तावनेच्या मर्यादेंत बसत नाहींत म्हणून लिहिण्याचा मोह आवरणें हें उत्तम.

स्व. विठ्ठलभाईंचा स्वभाव फार प्रेमळ व विनोदी होता. दोघेहि बंधु तसेच. कोण कमी कोण अधिक हें सांगणें कठीण. दोघांचेहि चेहरे गंभीर, मानी व दिसण्यांत कठोर, पण हृदयाची मृदुता नवनीतासारखी-ती दिसण्यास व अनुभवण्यास निकट व दैनंदिन असा परिचय पाहिजे – विरोधी पक्षास कठोर भाषेंत सडेतोड प्रत्युत्तरें देण्यांत दोघेहि पटाईत.

स्व. विठ्ठलभाई केवळ बोलकें राजकारण करणारे नव्हते. बोलाच्या मागें प्रजासंघटनेची शक्ति पाहिजे, तर त्या बोलांत जोम असतो. तपश्चर्या मागें असल्याशिवाय निव्वळ भाषेस जोर येत नाहीं. अशा भाषेस कोणी विचारीतहि नाहीं. स्व. विठ्ठलभाईंनीं बोलण्यापेक्षां कृति अधिक केली. सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रांतील व स्थानिक स्वराज्यसंस्थेतील (म्युनिसिपालिटी) त्यांचें रचनात्मक कार्य या म्हणण्याची साक्ष देतात.

कोणताहि प्रश्न येवो. त्याचा संपूर्ण अभ्यास करून मत बनवायचें व मग तें बोलायचें. त्याप्रमाणें चालण्यास सरकारास भाग पाडण्यासाठीं चिकाटीनें, धैर्यानें मेहेनत करायची. कोणाचा रोष, अप्रीति आपल्यावर होईल, दुःखें सहन करावीं लागतील, वगैरेकडे मुळींच पाहायचें नाहीं. यामुळेंच ते म्युनिसिपालिटींत व विधिमंडळाच्या कामांत सभासद व अध्यक्ष म्हणून यशस्वी होऊं शकले. प्रत्येक क्षेत्रांत त्यांनीं नवीन दिशा व पद्धति घालून दिली. लोकप्रियतेसाठीं आपलीं प्रामाणिक मतें झुगारलीं नाहींत. पण त्यांस चिकटून राहून आपला प्रभाव पाडला, व देशसेवा आमरण केली. देशासाठीं संन्यासवृत्ति घेतली.

सरदार वल्लभभाई नाशिक जेलमध्यें असल्यानें व मी रत्नागिरीस स्थानबद्ध असल्यानें दोघेहि स्व. विठ्ठलभाईंच्या अंत्यदर्शनास मुकलों ! त्या वेळीं फार दुःख वाटलें. पण उपाय काय ? ते परदेशीं गेले त्या वेळीं त्यांचें दर्शन व भेट पुन्हा होणार नाहीं अशी स्वप्नींहि कल्पना नव्हती. या प्रस्तावनेच्या निमित्तानें कांहीं काळ तरी त्यांच्या सान्निध्यांत गेला असें समाधान आतांहि वाटतें.

१९४६ च्या जानेवारी महिन्यांत मध्यवर्ती विधिमंडळाचा मी अध्यक्ष निवडला गेलों. हें यश केवळ राष्ट्रीय महासभेचें. तरी पण कै. विठ्ठलभाई पटेल त्या जागीं होते म्हणूनच तिची जबाबदारी व ममत्वहि मला विशेष वाटलें. मध्यवर्ती विधिमंडळाच्या पूर्वीच्या एका अध्यक्षाच्या चरित्रास विद्यमान अध्यक्षानें प्रस्तावना लिहावी ही चरित्रलेखक श्री. करंदीकरांची भावना म्हणून ते माझ्याकडे आलें. पण या त्यांच्या विचारसरणीस कबूल होऊन मी त्यांना रुकार दिला नसून कै. विठ्ठलभाईशीं जिव्हाळ्याचा संबंध, त्यांच्याविषयीं आदर, त्यांचें मजवरील अपत्यवत् प्रेम यांमुळें त्यांस माझी स्मरणांजलि वाहण्याचा हा एक प्रसंग मिळतो आहे तो साधावा याच दृष्टीनें मी कबूल झालों. यामुळें कै. विठ्ठलभाईचें 'सान्निध्य' मला कांहीं काळ मिळालें. जुनीं स्मरणें ताजीं करण्याची संधि मिळाली.


चरित्रग्रंथ उद्बोधक व माहितीपूर्ण आहे हें सांगण्यास नकोच.

सेवाकुटीर
१६ महाराष्ट्र सोसायटी,
अहमदाबाद

**गणेश वासुदेव मावळंकर**

ता. १५-१०-१९४७

# पटेल घराण्याची वंशावळ




विठ्ठलभाईंचे वडील जव्हेरभाई वयाच्या ९२ व्या वर्षी अपघातानें निवर्तले. विठ्ठलभाईंच्या मातुःश्री लाडबाई १९३४ साली वयाच्या ८६ व्या वर्षी निवर्तल्या.

# घराणें व बालपण

मराठी भाषेंत गेल्या दहा वीस वर्षांत जीं कांहीं थोडीं पण सांगोपांग अशीं चरित्रें लिहिलीं गेलीं तीं बहुतेक महाराष्ट्रीयांचींच आहेत. अर्थात् यांपैकीं लोकमान्य टिळक, न्यायमूर्ति रानडे व नामदार गोखले यांच्या चरित्रांचा या ठिकाणीं उल्लेख केला पाहिजे. या थोर विभूतींना अखिल हिंदुस्थानांत मोठें मानाचें स्थान प्राप्त झालें आहे; व त्या दृष्टीनें त्यांचीं चरित्रें जशीं मराठींत विस्तारानें लिहिलेलीं आहेत तशीं तीं हिंदुस्थानांतील इतर मोठमोठ्या भाषांतहि लिहिलीं जाणें अवश्य आहे, हें कोणीहि मान्य करील. इतर प्रांतीय थोर विभूतींची चरित्रेंहि मराठींत लिहिलेलीं आहेत. परंतु तीं फारच त्रोटक आहेत. कांहीं प्रसंगामुळें एकादा पुढारी विशेष प्रसिद्धीस येतो व त्याचें थोडया अवधींत चरित्रहि लिहिलें जातें. कारण अशा पुढाऱ्याबद्दल जनतेमध्यें एक प्रकारचें कुतूहल उत्पन्न होतें व त्याचें पूर्वचरित्र समजण्याची इच्छा होते. तेव्हां चरित्र त्रोटक जरी लिहिलेलें असलें तरी चरित्रनायकाचा थोरपणा पटविण्याकरितां अशाहि चरित्राचा उपयोग होतो. परंतु गुर्जरवीर विठ्ठलभाई पटेल यांचें मात्र सांगोपांग किंवा त्रोटकहि चरित्र मराठींत अद्याप झालेलें नाहीं. म्हणून जेवढीं अस्सल व इतर साधनें उपलब्ध झालीं तेवढयांचा उपयोग करून कै. विठ्ठलभाई पटेल यांचें चरित्र त्यांच्या आठवणींसह लिहिण्याचा आम्हीं हा प्रयत्न केला आहे. तो कितपत यशस्वी झाला आहे हें सुज्ञ वाचक ठरवितील असा आम्हांला भरंवसा आहे.

अगदीं सामान्य स्थितींत जन्माला येऊन पटेल यांनीं अखिल भारतवर्षांत तर मोठी मान्यता मिळविलीच; पण युरोपांत व अमेरिकेंतहि पटेलांची कीर्ति पसरली. म्हणून लोकमान्य टिळक, महात्मा गांधी, स्वामी विवेकानंद यांसारख्या श्रेष्ठ भारतीय विभूतींच्या रांगेत त्यांचा अंतर्भाव करतां येईल. "तैसा काया वाचा मनें प्राणें । साधु वाढला उपकाराकारणें"

या संतकवि एकनाथ महाराजांच्या उक्तीप्रमाणें पटेलांचा आयुष्यक्रम होता. तसें म्हटलें तर पटेल कोणी मोठे रवींद्रबाबूंसारखे कवि नव्हते, किंवा खंदे लेखक नव्हते; सुरेंद्रबाबूंसारखे वक्ते नव्हते किंवा जगदीशचंद्र बोसांप्रमाणें संशोधक नव्हते; राधाकृष्णन्‌प्रमाणें गाढी विद्वत्ताहि पटेलांच्या ठिकाणीं नव्हती. तरीहि पटेलांची जगांतील थोर पुरुषांत गणना झाली आहे, याचें कारण त्यांच्या ठिकाणीं असणारी कुशाग्र बुद्धि, उत्कट स्वदेशप्रीति, उद्योगाची आवड आणि व्यवहारचातुर्य हे गुण होत. शिवाय संकुचित अभिमानाचा अभाव हा एक महत्त्वाचा गुण त्यांच्या ठिकाणीं होता. ते सर्व बाबींकडे उदार आणि निर्मळ अशा राष्ट्रीय दृष्टीनेंच पाहात. उदरंभरण झाल्या-नंतर फावल्या वेळांत कोणतेंहि लोककार्य करावें अशी त्यांची मनोवृत्तिच नव्हती. देशहित करायचें असेल तर त्याला वाहून घेतलें पाहिजे असा त्यांचा बाणा होता. म्हणून बॅरिस्टर होऊनहि त्यांनीं तो धंदा फारच अल्पकाळपर्यंत केला. त्यांचें बहुतेक सर्व आयुष्य कांहींना कांहींतरी देश-कार्य करण्यांतच गेलें. मग ते तालुका बोर्डाचे सभासद असोत; किंवा मुंबई कार्पोरेशनचे अध्यक्ष होवोत; किंवा विधिमंडळाचे सभासद असोत; किंवा असेंब्लीचे प्रेसिडेंट होवोत; कॉंग्रेसचे जनरल सेक्रेटरी असोत, किंवा निरनिराळ्या सभांचे अध्यक्ष होवोत किंवा चौकशी कमिटीवर असोत; त्यांच्यापुढें सतत राष्ट्राच्या हिताचीच दृष्टि होती. अशा प्रकारची लोकहिततत्परता मनांत वागवीत असतांना ते कोणाचीहि भीड-भाड ठेवीत नसत. निर्भयता आणि चढाईचें धोरण हीं विठ्ठलभाई पटेलांच्या स्वभावांतील महत्त्वाचीं गमकें आहेत. मात्र कोणतेंहि जबाबदारीचें काम करीत असतांना ते सावधगिरीनें वागत असत आणि धारिष्ट धरून तें काम पार पाडीत. त्यामुळें देशबंधु दास, लाला लजपतराय, पितापुत्र नेहरू, पंडित मदनमोहन मालवीय, महात्मा गांधी, लोकमान्य टिळक यांच्याप्रमाणें पटेलांविषयींहि राष्ट्रांत मोठा आदर आहे. पटेल हे राष्ट्रीय सभेचे अभिमानी होते. पण मौज ही, कीं राष्ट्रांत जे इतर अनेक पक्ष आणि उपपक्ष आहेत त्या सर्वांना पटेलांविषयीं नितांत आदरच वाटतो. प्रारंभाला नेमस्त वृत्तीचे असूनहि पुढें ते अस्सल राष्ट्रीय

वृत्तीचे जहाल बनले यावरून त्यांना परिस्थितीची जाणीव किती बरोबर झाली होती हें समजून येतें.

## पटेलांच्या मोठेपणाची खूण

पटेल असेंब्लीचे पहिले हिंदी अध्यक्ष होते आणि ही त्यांच्या मोठेपणाची खूण आहे. ही गोष्ट जरी खरी असली तरी केवळ त्या अध्यक्षपदामुळें ते मोठ्या योग्यतेला चढले हें मात्र खरें नाहीं. यासंबंधीं पंडित जवाहरलाल नेहरू यांनीं आत्मचरित्रांत फार मार्मिक वर्णन केलें आहे.

ते लिहितातः—" पुष्कळांनीं विठ्ठलभाईंची स्तुति केली आहे. आणि विठ्ठलभाईंनीं कौन्सिलर या नात्यानें आणि विशेषतः असेंब्लीचे अध्यक्ष म्हणून जी यशस्वी कामगिरी केली तिजवरच या स्तुतींत फार भर दिला जातो. त्यांत गैर असें कांहींच नाहीं. तरीसुद्धा वारंवार तसलीच स्तुति ऐकून मला राग येतो. कारण त्याच कामगिरीमुळें विठ्ठलभाई हे मोठे झाले नाहींत हें खास. हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याकरितां अविश्रांत लढणारे ते एक खंदे वीर होते; आणि या वीरत्वांतच त्यांचें थोरपण सांठविलेलें आहे." एकंदरीनें पटेलांनीं आपली उज्ज्वल देशभक्ति, निर्भयता, लढाऊ वृत्ति, स्वतंत्र विचारशक्ति, राजकारणाचा सूक्ष्म अभ्यास, स्वार्थत्याग या सर्व गुणांमुळें हिंदुस्थानांतील जनतेला आपलेसें करून घेतलें यांत आश्चर्य नाहीं.

## पटेलांचा जन्म आणि कुलवृत्तांत

खेडा जिल्ह्यांतील आनंद तालुक्यांत करमसद या नांवाचें एक खेडें आहे; त्या खेड्यांत एका शेतकरी कुटुंबांत विठ्ठलभाईंचा जन्म तारीख १८ फेब्रुवारी सन १८७१ या वर्षीं झाला. विठ्ठलभाईंच्या पित्याचें नांव जव्हेरभाई आणि आईचें नांव लाडबाई असें होतें. ते ज्या ज्ञातींत जन्मले तें 'लेवा पाटीदार' या नांवानें संबोधलें जातें. या लेवा पाटीदारांची बहुतेक वस्ती गुजराथेंतील 'चरोतर' या नांवाच्या प्रदेशांत आहे. 'चरोतर' हा शब्द 'चारु' म्हणजे 'सुंदर' या शब्दापासून निघाला आहे. आणि नांवाप्रमाणेंच हा प्रदेश फार रमणीय आहे. खेडा जिल्ह्याच्या

मध्यभागीं हा प्रदेश आहे. येथील जमीन सुपीक व लागवड उत्कृष्ट समजली जाते. मोंगलांच्या राजवटींत हा प्रदेश उत्तर व दक्षिण हिंदुस्थान यांजमधील व्यापाराचें केंद्र बनला होता. त्यामुळें पूर्वीपासून या भागाला ऐतिहासिक महत्त्व प्राप्त झालें आहे. गुजराथेंतील पुष्कळ विद्याविभूषित लोक, साहित्यिक आणि वीररत्नें याच प्रदेशांत निर्माण झालीं. या सर्व गोष्टींमुळें 'चरोतर' या नांवाला हा प्रदेश खराखुरा पात्र ठरला आहे. या चरोतर प्रदेशांत पाटीदारांचीं बारा गांवें आहेत. पाटीदार म्हणजे गांवचे पाटील. यावरून 'पटेल' हा शब्द रूढ झाला. त्या बारा गांवांपैकीं करमसद या गांवीं विठ्ठलभाईंचे पूर्वज वसत आले आहेत. या प्रदेशांत पाटीदारांचा हा समाज शिष्टसमाज म्हणून समजला जातो. वर सांगितल्याप्रमाणें या पाटीदारांना 'लेवा पाटीदार' असें म्हणतात. या नांवावरून हे पाटीदार सूर्यवंशांतील राजा रामचंद्र यांच्या लव आणि कुश या दोन मुलांपैकीं लवाचे वंशज आहेत असें समजलें जातें. हिंदी भाषेंत भीम या कवीनें 'लेवा पुराण' या नांवाचा एक ग्रंथ लिहिला आहे. त्यांत त्यानें म्हटलें आहे, कीं फार प्राचीन काळीं लवाचे वंशज मथुरेच्या बाजूला वस्ती करून होते. नंतर म्हणजे सुमारें नऊशें वर्षांपूर्वी लवाचे हे वंशज गुजराथ प्रांतांतील चरोतर भागांत वस्ती करून राहिले. ते बरेचसे तेथेंच स्थायिक झाले. असो

## विठ्ठलभाईंचें बालपण : कांदालसुणांचा तिखटपणा !

विठ्ठलभाईंच्या घरच्या मंडळींत त्यांचे आईबाप, पांच भाऊ, एक बहीण व भावांचा परिवार इतक्यांचा समावेश होता. पांच भावांपैकीं विठ्ठलभाई हे क्रमानें तिसरे होत. त्यांचे वडील जव्हेरभाई हे अगदीं साधारण स्थितींतील शेतकरी होते. हें सर्व कुटुंब अविभक्त होतें. या कुटुंबांत श्री स्वामीनारायण चा संप्रदाय चालत आलेला होता. त्या संप्रदायास अनुसरून त्यांच्या घरीं कोणी कांदालसूण खात नसत. तरीपण कांदालसुणांचा तिखटपणा जव्हेरभाईंच्या मुलांत उतरला होता आणि विशेषतः विठ्ठलभाईंच्या ठिकाणी तर तो अधिक होता. लहानपणीं विठ्ठलभाई अतिशय हूडपणा

करीत आणि त्यांचा हा स्वभाव ते चांगले वयांत येईपर्यंत राहिला, पण त्याबरोबर त्यांची हुशारीहि दिसे. कधीं कधीं तर त्यांची चौकस बुद्धि इतक्या थराला जाई कीं, वडीलधाऱ्या माणसांना ते सतावून सोडीत बालपणाचा हा चौकसपणा त्यांनीं मोठ्या वयांत सत्कारणींच लावला. विठ्ठलभाईंना पांचव्या वर्षापासून करमसदच्या गांवठी शाळेंत प्राथमिक शिक्षणाकरितां घातलें.

प्राथमिक शिक्षण पुरें झाल्यावर त्यांच्या वडिलांनीं विठ्ठलभाईंना नडियादला पुढील शिक्षणासाठीं ठेवलें. नडियादला विठ्ठलभाईंचे मामा श्री. डुंगरभाई जीजीभाई पटेल हे असत. त्यांच्या घरीं विठ्ठलभाई राहिले व नडियादच्या हायस्कूलमध्यें त्यांनीं इंग्रजी शिक्षण घेण्यास सुरवात केली. त्या काळाला खेडयांतल्या एखाद्या शेतकऱ्याच्या मुलानें शिक्षण घेणें, त्यांतल्या त्यांत इंग्रजी शाळेंत जाणें ही गोष्ट विशेषच समजली जाई. शेतकऱ्याच्या मुलानें जरा मोठे झाल्यावर नांगर धरावा, व उपजीविका करावी असाच त्याचा आयुष्यक्रम पुष्कळ ठिकाणीं आढळत असे, आणि त्यांत अद्यापहि फारसा फरक दिसत नाहीं. 'शिकून काय करायचें, विद्या शिकल्यानें नांगर धरण्याची मुलाला लाज वाटते' अशा चुकीच्या समजुतीनें हिंदुस्थानांतील लाखों शेतकरी अद्याप अशिक्षितच आहेत. इतर पुढारलेल्या देशांत शेतकरी वर्ग सुशिक्षित व आपल्या धंद्यांत प्रवीण असतो. किंबहुना तो सुशिक्षित असतो म्हणूनच त्या त्या धंद्यांत तो पुढारतो असें म्हणण्यास हरकत नाहीं.

नडियादला शिक्षण घेत असतां विठ्ठलभाईंचा व्रुडपणा पूर्वीप्रमाणेंच कायम होता. गुजराथेंत घरांतल्या माणसांचा पुढील ओटीवर बसून दांत घासण्याचा प्रघात आहे. अशा वेळीं प्रत्येकाच्या जवळ पाण्याचा तांब्या असे. विठ्ठलभाई सकाळीं शाळेला जाऊं लागले म्हणजे पळतां पळतां हे तांब्ये हातांनीं नाहींतर पायांनीं उडवून देण्याचा त्यांचा सपाटा चालायचा. शरीराला चाळा फार! पटेल बुद्धीनें तेजस्वी पण व्रात्यपणा करण्यांत पटाईत असत! शाळेंत गेले म्हणजे वर्गांत खोडया करण्यांत यांचा पहिला नंबर असायचा! वर्गांतील विद्यार्थ्यांचें नेतृत्व बहुतेक यांच्याकडे यायचें!

बरें, शिक्षकांनीं खोडी कोणीं केली म्हणून तपास केला तर हे आपले नामानिराळे ! जणूं काय खोडया करण्यांत यांचें अंगच नाहीं एवढेंच नव्हे तर स्वतः खोडी केली असून ती दुसऱ्यानें केली हें सिद्ध करायला हे तयार असायचे व स्वतः अगदीं निर्दोष म्हणून सुटायचे ! एकदा शाळेंत वर्गशिक्षकांनीं विठ्ठलभाईवर, त्यांनीं कांहीं खोडी केली म्हणून ठपका आणला. विठ्ठलभाईंना हें सहन झालें नाहीं. त्यांनीं शिक्षकाच्या अंगावर लांबून एक स्लेटपाटी फेकली व शाळेंतून पळ काढला. घरीं त्यांचे मामा होतेच. त्यांनीं मामांकडे तक्रार केली, कीं "मास्तरांनीं मला विनाकारण मारलें आणि शाळेंतून हुसकावून लावलें." मामांनीं शिक्षकांचें म्हणणें ऐकून पुढें काय तें नक्की करण्याचें ठरविलें. तितक्यांत शिक्षकच त्यांच्या घरीं आले, व त्यांनीं विठ्ठलभाईचें गैरवर्तन मामांच्या कानीं घातलें. मामांनीं लागलीच विठ्ठलभाईंना बोलावलें व झालेल्या गैरवर्तनाबद्दल ते त्याला रागें भरले. पण विठ्ठलभाई म्हणाले, "मामा, गुन्हा केला मास्तरनीं आणि ठपका आणतात माझ्यावर, हा हो कुठला न्याय ? मुलानें पाटी घेऊन मास्तरना मारणें ही गोष्ट तुम्हांला शक्य तरी वाटते का ?" यावर ऐकणाऱ्यांचे चेहरे कसे झाले असतील हें सांगण्याचें कारण नाहीं. तात्पर्य एवढेंच कीं हूडपणा हा त्यांच्या हाडींमासीं खिळलेला होता.

## विलक्षण स्मरणशक्ति

मात्र या हूडपणांत त्यांच्या हुशारीची चमक असे. त्यांची स्मरणशक्ति फार तीव्र होती. एकदां शाळेंतल्या एका परीक्षेंत विठ्ठलभाईचे शिक्षक श्री. चतुरभाई वल्लभभाई यांनीं एका इंग्लंडमधील मुत्सद्द्याच्या चरित्रावर प्रश्न विचारला होता. विठ्ठलभाईंनीं पुस्तकांत जी माहिती होती ती अक्षरशः उत्तरांत लिहिली. पुढें इतर मुलांच्या पेपरांबरोबर विठ्ठलभाईचा पेपरहि मुख्याध्यापकांकडे तपासणीकरितां गेला, त्यांनीं विठ्ठलभाईचा पेपर पाहतांच त्यांतील एका प्रश्नाचें उत्तर 'कॉपी' करून लिहिलेलें आहे असें त्यांना साहजिकच वाटलें. तरी पण अशा 'कॉपी' केलेल्या उत्तराला शिक्षकांनीं सगळे गुण दिलेले पाहून मुख्याध्यापकांना आश्चर्य वाटलें व रागहि आला. त्यांनीं शिक्षकांना ताबडतोब बोलावून घेतलें व खुलासा विचारला.

शिक्षक श्री. चतुरभाई म्हणाले, " मुलानें ' कॉपी ' केली नाहीं. त्यानें सगळी हकीगत पुस्तकाप्रमाणें पाठ करून लिहिली आहे." या बोलण्यावर मुख्याध्यापकांचा विश्वास बसेना. त्यांनीं शिक्षकांना विचारलें, "मुलाची स्मरणशक्ति इतकी दांडगी आहे असं तुम्हांला वाटतं काय ?" शिक्षकांनीं उत्तर दिलें, "आपली खात्री होण्याकरितां अनुभव घेऊन पाहावा." त्यावर लगेच मुख्याध्यापकांनीं विठ्ठलभाईंना ऑफिसांत बोलावलें आणि त्यांना इतिहासाच्या पुस्तकांतील एक सबंध निराळें पान वाचायला सांगितलें. तें पान वाचून झाल्यावर मुख्याध्यापक त्यांना म्हणाले, " आतां पुस्तक मीट आणि आतांच जें वाचलंस तें जसंच्या तसं लिहून दाखव." तात्काळ पुस्तक मिटून विठ्ठलभाईंनीं वाचलेला मजकूर हुबेहूब लिहून दाखविला. तेव्हां मुख्याध्यापकांची खात्री झाली !

आपल्या आईबापांवर विठ्ठलभाईंची मोठी भक्ति होती. नडियादला हायस्कुलांत विद्यार्थी असतांना महिन्यांतून एकदा आईला भेटण्यासाठीं ते करमसदला येत असत. त्याशिवाय त्यांना चैनच पडत नसे. आईला भेटून आले कीं अभ्यास करण्यास त्यांना उत्साह येई. याप्रमाणें अभ्यास चालू असतां वयाच्या सोळाव्या वर्षी सोजित्रा येथें विठ्ठलभाईंचा विवाह झाला. त्यांच्या पत्नीचें नांव दिवाळीबाई असें होतें. नडियादला त्यांचा मॅट्रिक्युलेशनचा अभ्यास पुरा झाला. मॅट्रिक्युलेशन आणि स्कूलफायनल या दोन्ही परीक्षांची त्यांनीं तयारी केली. परंतु शाळेच्या पूर्वपरीक्षेंतच त्यांना ' फॉर्म ' मिळाला नाहीं ! याला कारण त्यांनीं अभ्यासांत कसूर केली हें नसून त्यांची स्वतंत्र बुद्धि हेंच होय ! पूर्वपरीक्षेच्या एका प्रश्नपत्रिकेंत " इंग्रज सरकारकडून आपले कोणते फायदे झाले यावर निबंध लिहा." असा एक प्रश्न होता. विठ्ठलभाईंनीं फायद्यांच्या ऐवजीं तोटेच कोणते झाले याचें विस्तारानें वर्णन केलें. या निबंधामुळें परीक्षकांचा पटेलांवर रोष झाला व त्यांनीं त्यांना पूर्वपरीक्षेंत नापास केलें. पुढील वर्षी ते अहमदाबादला परीक्षेचें केंद्र असल्यानें तेथें परीक्षेला बसले. या वेळीं ते परीक्षेंत उत्तीर्ण झाले. पटेलांच्या ठिकाणीं निर्भयता आणि स्वातंत्र्यप्रियता हे गुण लहान वयांतसुद्धा कसे होते हें या गोष्टीवरून समजतें.

# वकील आणि बॅरिस्टर

मॅट्रिक्युलेशनची परीक्षा पास झाल्यानंतर विठ्ठलभाई कॉलेजचें शिक्षण घेण्याकरितां बडोदा येथें गेले. परंतु त्यांनीं कॉलेजचा अभ्यास लवकरच सोडला व वकिलीचा अभ्यास करण्याकरितां ते मुंबईस आले. तेथें सन १८९२ मध्यें त्यांनीं ' गोखले लॉ क्लास ' मध्यें प्रवेश केला. वकिलीचा अभ्यास ते फार आस्थापूर्वक करीत. वर्ग चालू असतांना ते इतर विद्यार्थ्यांप्रमाणें मुकाट्यानें न बसतां शिक्षकाला नेहमीं प्रश्न विचारीत आणि त्यामुळें त्यांच्या पुस्तकी ज्ञानाबरोबर त्यांच्या व्यावहारिक ज्ञानाचीहि जाणीव शिक्षकांना व इतर विद्यार्थ्यांना चांगली होत असे. एक वर्षभर मुंबईस राहून त्यांनीं अभ्यास केला. नंतर ते अहमदाबादला गेले व सन १८९५ मध्यें ते डिस्ट्रिक्ट प्लीडरच्या परीक्षेस बसले. या परीक्षेंत ते उत्तम रीतीनें पास झाले आणि त्यांनीं बराच वरचा नंबर मिळविला. नडियादला हायस्कुलांत असतांना जसे ते आईची भेट घेण्याकरितां येत त्याप्रमाणें मुंबई व अहमदाबादेस वकिलीचा अभ्यास करीत असतांनाहि ते प्रतिमासीं आईची भेट घेतल्याशिवाय राहात नसत. त्याशिवाय त्यांना चैनच पडत नसे. नेहमीं अभ्यासाकडे प्रवृत्ति असल्यानें त्यांनीं आपल्या घरची शेतीवाडी वगैरेची व्यवस्था करण्यांत किंवा त्यासंबधीं चौकशी करण्यांत कधीं लक्ष घातलें नाहीं. अभ्यासाबद्दल ते जितकी काळजी घेत तितकाच निष्काळजीपणा त्यांना घरच्या सामानसुमानाबद्दल असे. इतका कीं पुष्कळदा आपल्या बरोबरचें सामान ते आगगाडींतच विसरून जात असत आणि मग घरीं आल्यावर त्यांना त्याचें स्मरण होई.

वकिलीची परीक्षा पास झाल्यावर त्यांनीं अहमदाबाद सोडलें व गोध्रा येथें सनद घेऊन ते वकिली करूं लागले. लहानपणीं विठ्ठलभाईचा स्वभाव जसा हूड तसाच तो एकप्रकारें वकील झाल्यावरहि राहिला. थट्टामस्करी करणें हें त्यांच्या संवयीचें झालें होतें. त्यांच्या ज्ञानांत व

अनुभवात भर पडत चालली तरी ही त्यांची संवय कमी न होतां वाढतच गेली. टिंगल करण्यांत गोध्र्याच्या वकील वर्गांत तर ते प्रसिद्धच होते. परंतु गोध्र्याचे मॅजिस्ट्रेट व मुनसफ अशा सरकारी अधिकाऱ्यांनाहि त्यांचा हा स्वभाव कळून आला होता.

फौजदारी खटले चालविण्यांत विठ्ठलभाईंचा विशेष हातखंडा होता. कायद्याच्या शब्दांचा व अर्थाचा कीस काढून ते मॅजिस्ट्रेटलाहि चकवीत. परंतु त्यांचा युक्तिवाद इतका बिनतोड असायचा कीं तो मॅजिस्ट्रेटलाहि अखेर पटत असे. कोणतीही फौजदारी 'केस' म्हटली कीं विठ्ठलभाईच चालवूं शकतात अशी गोध्रा येथील लोकांची समजूत असे; व ती समजूत खरी होती.

या वेळीं विठ्ठलभाईंचे धाकटे बंधु वल्लभभाई पटेल हे बडोद्याला शिक्षणाकरितां राहिले होते. विठ्ठलभाई वेळोवेळीं बडोद्यास जात व त्यांच्या अभ्यासाची स्वतः पूसतपास करीत. तसेंच खुद्द गोध्र्यासहि आपल्या भावाची प्रगति अभ्यासांत कितपत झाली याचा रिपोर्ट ते वारंवार बडोद्याहून मागवीत. वल्लभभाई व आणखी एक धाकटा भाऊ यांच्या शिक्षणाची जबाबदारी विठ्ठलभाईंनीं पत्करली होती. पुढें वल्लभभाई हेही वकील होऊन गोध्र्यास आले. उभयतां बंधू आपापल्या कामांत निर्भय व मेहनती असल्यामुळें त्यांची वाखाणणी होऊं लागली. कधींकधीं एकाच खटल्यांत पटेल बंधू वादी प्रतीवादीतर्फे वकील म्हणून एकमेकांविरुद्ध कोर्टांत खटला चालवीत तेव्हां कोर्टांत एक प्रकारचें चमत्कृतिपूर्ण वातावरण निर्माण होई.

गोध्र्यास दोन वर्षें वकिली केल्यानंतर उभयतां बंधू बोरसद येथें सन १८९८ सालापासून वकिली करूं लागले. बोरसदास गोध्र्याहून अधिक चांगली वकिली चालूं लागली. सन १९०६ सालापर्यंत बोरसदास वकिलीचा धंदा बऱ्यापैकीं करून तेवढ्या काळांत त्यांनीं तेथें एक घर खरेदी केलें.

परंतु वकिली करीत असतांना इतरहि उपयुक्त सामाजिक कार्यांकडे त्यांचें लक्ष असे. एक उदाहरण येथें देण्यासारखें आहे. विठ्ठलभाई हे

पाटीदार ज्ञातींतले होते हें मागें सांगितलेंच आहे. या ज्ञातींत एकाद्या कुटुंबांत जर मृत्यु झाला तर त्या मृताकरितां अतिशय खर्च करण्याची रीत असे. कर्ज करूनसुद्धा कुटुंबांतील माणसें खर्च करीत. विठ्ठलभाईंचे वडील या सुमारास वारले, त्या वेळीं हा खर्च करण्याचा प्रसंग उद्भवला. परंतु विठ्ठलभाई या गोष्टीला संमति देईनात. त्यांनीं, वडीलधारीं माणसें होतीं त्यांचीं मनें वळवून पाहिलीं, परंतु आतांपर्यंत चालत आलेल्या रीती-प्रमाणें खर्च केला पाहिजे असा त्या माणसांचा आग्रह होता. अखेर आपलें म्हणणें कोणी ऐकत नाहीं असें पाहून विठ्ठलभाई घराबाहेर पडले. हेतु हा कीं अशा गोष्टींत आपण भाग घेऊं नये. जातां जातां त्यांनीं मंडळींना सुचविलें कीं खर्च करण्याची तुमची इच्छाच असेल तर वडिलांच्या स्मरणार्थ एकाद्या शिक्षणसंस्थेला तुम्हीं देणगी द्यावी, असें म्हणून त्यांनीं स्वतः खर्च होणारी रक्कम देणगीरूपानें एका संस्थेस दिली व नंतर ते घरीं परतले. अर्थात् त्याचा इष्ट तो परिणाम झाला आणि त्यांना कोणी विरोध केला नाहीं. एवढेंच नव्हे तर विठ्ठलभाईंचें उदाहरण पाहून इतरांनींहि हा बेसुमार खर्च करण्याची रीत हळूहळू बंद पाडली. अहमदाबाद येथें पहिली समस्त पाटीदार परिषद भरली होती तिचे अध्यक्ष विठ्ठलभाई होते. त्यावेळीं त्यांनीं आपल्या अध्यक्षीय भाषणांत अशा अनावश्यक चालीरीतींचा जोरानें निषेध केला. या सर्व गोष्टींवरून सामाजिक सुधारणेकडे विठ्ठलभाईंचें लक्ष किती पूर्वींपासून होतें हें दिसून येतें. त्यांच्या दृष्टीनें असणाऱ्या सामाजिक सुधारणेचा पाठपुरावा त्यांनीं यानंतर बऱ्याच वर्षांनीं कायदे-कौन्सिलांतहि कसा केला हें आपल्याला पुढें समजेलच. अर्थात् विठ्ठलभाईंचा बहुतेक सारा जन्म राजकीय सुधारणां-करितां व हिंदुस्थानच्या राजकीय उन्नतीकरितां भांडण्यांत गेला हें निर्विवाद आहे. परंतु देशाला इतर सुधारणांची व उन्नतीच्या इतर अंगांचीहि गरज आहे हें त्यांना पटलें होतें व अशा गोष्टींकडेहि त्यांनीं डोळेझाक केलेली नव्हती एवढें जातां जातां सांगावेंसें वाटतें.

विठ्ठलभाई हे जरी नांवाजलेल्या वकिलांत मोडले जात होते तरी तींत मिळविलेला पैसा त्यांनीं कधीं काटकसर करून वापरला नाहीं. मिळविलेला

पैसा ते जवळजवळ उधळीत असत असें म्हटल्यास वावगें होणार नाहीं. देणग्या देणें, मित्रांना जेवणें करणें अशा गोष्टींत त्यांचा पैसा चटदिशीं खर्च होई. या त्यांच्या संवयीला जर कोणीं थोडा पायबंद घातला असेल तर तो त्यांचे धाकटे बंधु वल्लभभाई यांनीं. कारण वल्लभभाई हेहि त्यांचे-बरोबर चांगल्यापैकीं वकील म्हणून मानले जात. त्यांची त्या वेळची आठवण म्हणून एकानें सांगितली, कीं एकदा विठ्ठलभाईजवळ कांहीं पैसे नव्हते. परंतु त्यांना त्या वेळीं पैशाची तर निकड होती. तेव्हां त्यांनीं वल्लभभाईंचा कोट जेथें टांगून ठेवला होता तेथें कांहीं एक न बोलतां नुसत्या इकडून तिकडे येरझारा घालण्यास सुरवात केली. नंतर कांहीं वेळ वल्लभभाईनीं जेव्हां हें पाहिलें तेव्हां त्यांना त्या येरझारांचा अर्थ समजला. व आपल्या कोटांतून लागतील ते पैसे घेण्यास त्यांनीं विठ्ठलभाईंना सांगितलें. एकंदरीनें तरुण वयापासून आपण खूप पैसा मिळवावा आणि गडगंज संपत्ति साठवावी असें त्यांना कधींहि वाटलें नाहीं. कारण केवळ धनलाभापेक्षां अधिक महत्त्वाचीं कृत्यें त्यांना साधायचीं होतीं. या गोष्टीचें प्रत्यंतर पुढें येईलच, म्हणून आतांच त्यासंबंधीं विशेष लिहीत नाहीं.

## बॅरिस्टर पटेल

वल्लभभाईंची फार दिवसांची इच्छा आपण विलायतेला जाऊन बॅरिस्टर व्हावें अशी असे. परंतु वडिलांजवळ त्या खर्चाकरितां पैसे नव्हते. म्हणून वकिली करून जेवढे पैसे साठवितां आले तेवढे साठवून त्यांनीं विलायतेला जाण्याकरितां पासपोर्ट मिळविण्याबद्दल पत्रव्यवहार सुरू केला. एके दिवशीं अचानक हा पत्रव्यवहार विठ्ठलभाईंच्या हातीं आला. ते लगेच वल्लभ-भाईंना म्हणाले, " वल्लभभाई हा पासपोर्ट घेऊन मला विलायतेला बॅरिस्टर होण्याकरितां तुझ्या आधीं जाऊं दे. मी आल्यानंतर तूं जा." आतां पास-पोर्ट होता वास्तविक वल्लभभाईंच्या नांवाचा. परंतु दोघां बंधूंचीं आद्या-क्षरांसहित नांवें ' व्ही. जे. पटेल ' अशीं असल्यानें वल्लभभाईंचा पास-पोर्ट विठ्ठलभाईंना चालण्यासारखा होता. वर लिहिल्याप्रमाणें विठ्ठलभाईंचें जें म्हणणें होतें त्याला वल्लभभाईनीं अनुमति दिली. हें झालें खरें पण विलायतेला जाण्यांला त्यांना आईची परवानगी मिळणें कठीण होतें. विला-

तेचें नांव ऐकतांच तिला कसेसेंच झालें असतें. आणि आईनें अनुज्ञा दिली असती तरी पत्नीची संमति मिळविणें अवघडच होतें. वल्लभभाईंनीं पासपोर्ट मिळण्यासाठीं जो पत्रव्यवहार केला होता तो घरांतील कोणत्याच माणसाला न विचारतां केला होता. तेव्हां विठ्ठलभाईंना पासपोर्ट मिळाल्या-नंतर एकदम विलायतेला जाण्याची गोष्ट घरच्या मंडळींजवळ काढणें जरा मुष्किलीचेंच होतें. पण विलायतेला जाण्याचा तर विठ्ठलभाईंचा निश्चय झालेला होता. म्हणून यांतून कांहींतरी मार्ग शोधून काढणें अवश्य होतें. एके दिवशीं बोलतां बोलतां आपल्या पत्नीला चिडविण्याचा आव आणून विठ्ठलभाई तिला म्हणाले, " हें बघ, माझं हें ऐकलं नाहींस तर मी विलायतेला जाईन ! " बिचारी दिवाळीबाई ! तिला वाटलें आपले पतिराज आपली थट्टा करीत आहेत ! विठ्ठलभाईंना खरोखरीच विलायतेला जायचें आहे हें तिला मुळींच माहिती नसल्यानें तिनें उत्तर केलें, " जावं ना मग ! कोणीं आपल्याला अडथळा केला आहे ? " याप्रमाणें नेहमीं मनोरंजक वादविवाद होत. पण त्याबरोबर विठ्ठलभाईंची विलायतेला जाण्याची तयारी एकीकडे चाललीच होती. विठ्ठलभाईंच्या मातुःश्रींना किंवा पत्नीला त्यांच्या तयारीचा मागमूसहि लागला नव्हता. एके दिवशीं विठ्ठलभाईंनीं " मी मुंबईला जातों " असें म्हणून आईची मुंबईला जाण्याची परवानगी मिळ-विली. नंतर ते आपल्या पत्नीकडे गेले आणि तिच्या हातावर कांहीं रुपये ठेवून म्हणाले, " ही वकिलीच्या फीची रक्कम बाहेरगांवाहून आली आहे ती तुजजवळ राहूं दे. मी आज एका महत्त्वाच्या खटल्याच्या कामा-करितां बाहेर जातों. थोडया दिवसांनीं परत येईन." याप्रमाणें सर्वांची परवानगी घेऊन विठ्ठलभाई मुंबईला गेले. या वेळीं वल्लभभाई मुंबईलाच होते. दोन दिवसांनीं विठ्ठलभाईंकडून घरीं एक तार आली कीं " मी विलायतेला निघालों आहें." ही तार कळतांच आईला दुःख झालें. पण आपला मुलगा चांगल्या कामाकरितां विलायतेला गेला आहे हें तिला सम-जलें तेव्हां तिनें स्वतःचें सांत्वन केलें. त्याबरोबरच त्यांच्या पत्नीलाहि समजलें कीं आपले पतिराज विनोदानें बोलले असें जें आपल्याला वाटलें तो विनोद नसून खराखुराच प्रकार होता !

विठ्ठलभाई सन १९०५ सालीं इंग्लंडमध्यें गेले व तेथील 'लिंकन्स इन' मध्यें त्यांनीं बॅरिस्टरीकरितां आपलें नांव दाखल केलें. लंडनच्या केन्सिंग्टन भागांत पटेलांचें राहाण्याचें ठिकाण होतें. लंडनचें वैभव उपभोगण्याला किंवा ऐषआराम करण्याला त्यांना वेळ नव्हता आणि त्या गोष्टींकरितां लागणारें द्रव्यहि त्यांच्याजवळ नव्हतें. स्वतःचा वकिलीचा धंदा करून निढळाच्या घामानें जो कांहीं पैसा त्यांनीं मिळविला होता त्यांतून त्यांना बॅरिस्टर व्हायचें होतें. आणि साधारणपणें स्वतःच्या श्रमानें मिळविलेला पैसा मनुष्य काटकसरीनेंच खर्च करतो असें आपण पाहतों. त्या वेळीं बॅरिस्टर होणें म्हणजे मोठीशी गोष्ट नव्हती. कारण त्याकरितां फारसा अभ्यास करावा लागत नसे. केवळ थोडें वाचन करणें आणि भोजनसमारंभांना हजर राहाणें या दोन गोष्टींचीं आवश्यकता होती. परंतु विठ्ठलभाईंना अशा रीतीनें बॅरिस्टर होणें पसंत नव्हतें. त्यांनीं योग्य त्या ग्रंथांचा उत्तम अभ्यास केला. तरी पण अभ्यास करणें म्हणजे बराच वेळ पुस्तकांतच डोकें खुपसून बसणें हें त्यांना कधींच आवडत नसे. नियमित वेळीं व्यवस्थित अभ्यास करण्याचा त्यांचा परिपाठ असे. आणि विशेष हा कीं बॅरिस्टर होण्याला जी तीन वर्षांची मुदत असते त्या मुदतीच्या पूर्वी सहा महिने ते परीक्षेला बसले आणि पहिल्या वर्गांत पहिला नंबर मिळवून उत्तम प्रकारें पास झाले. याप्रमाणें सहा महिन्यांची सूट मिळवून शिवाय त्यांत त्यांना उत्कृष्ट यश संपादन केल्याबद्दल पन्नास पौंडांचें बक्षिस मिळालें. त्या वेळची त्यांची अभ्यासाची रीत, विलक्षण बुद्धिमत्ता आणि मुदतीपूर्वी परीक्षेला बसून मिळविलेलें यश या सर्व गोष्टी पाहून सहाध्यायींना फार आश्चर्य वाटत असे. मुंबईचे चीफ प्रेसिडेन्सी मॅजिस्ट्रेट झालेले श्री. खंडाळावाला, मुंबईचे स्मॉल कॉज कोर्ट जज्ज श्री. कुरवा आणि मुंबईचे श्री. डी. के. ठाकोर हे श्री. विठ्ठलभाई पटेलांचे इंग्लंडांतील साहाध्यायींपैकीं प्रमुख हिंदी सहाध्यायी होते. त्या काळीं हिंदुस्थानांतून बहुतेक श्रीमंतांचीं मुलें बॅरिस्टरीकरितां इंग्लंडांत जात. इंग्लंडांत जाऊन काटकसरीनें वागून अभ्यास करणारे हिंदी विद्यार्थी अगदींच थोडे असत. विठ्ठलभाई अशा काटकसरीनें वागणाऱ्या विद्यार्थ्यांपैकीं होते. इतर बऱ्याच विद्यार्थ्यांप्रमाणें

चैनीची लालसा त्यांना नव्हती. साधी राहणी, साधे कपडे आणि नियमित खाणेंपिणें या गोष्टींनीं त्यांचें समाधान होत असे. क्वचित् ते नाटक वगैरे पाहायला जात. परंतु आपलें निकडीचें मुख्य जें उद्दिष्ट म्हणजे बॅरिस्टरीच्या परीक्षेचा उत्तम रीतीनें अभ्यास करणें, त्यांत अडथळा येईल असें वर्तन त्यांनीं कधींच केलें नाहीं. लिंकन्स इनमधील अधिकाऱ्यांनीं विठ्ठलभाईंना जीं प्रशस्तिपत्रकें दिलीं आहेत त्यांवरूनहि वरील गोष्ट सिद्ध होते. अशीं प्रशस्तीपत्रकें पुष्कळदा औपचारिक असतात. परंतु त्यांतले जे उतारे भाषांतरित करून नमूद केले आहेत त्यावरून विठ्ठलभाईंना मिळालेलीं प्रशास्तिपत्रकें केवळ औपचारिक नसून प्रत्यक्ष वस्तुस्थितीचींच निदर्शक आहेत हें स्पष्ट समजतें.

मि. ऊगर्स, डायरेक्टर ऑफ लीगल स्टडीज् यांनीं खालील आशयाचें शिफारसपत्र विठ्ठलभाईंना दिलें :—

" मला नमूद करण्यास फार आनंद वाटतो, कीं मि. विठ्ठलभाई जव्हेरभाई पटेल हे लिंकन्स इनमधील व्याख्यानांना अडीच वर्षेपर्यंत नियमित हजर राहात असत. तारीख १ जुलै (१९०८) रोजीं ते बॅरिस्टरीची परीक्षा पास झाले. त्यांना १९०७ च्या परीक्षेंत इक्विटी या विषयांत बक्षीस मिळालें होतें आणि आतां त्यांना शेवटच्या परीक्षेंत पहिला वर्ग मिळाला आहे. ते येथें असतांना त्यांची वर्तणूक नेहमीं उत्तम होती. मुंबईच्या हायकोर्टांत बॅरिस्टरी चालविण्यास ते सर्वथैव पात्र आहेत असा मला विश्वास आहे. माझ्या मतें ते कायद्याचे अध्यापक किंवा प्राध्यापक होण्यासहि लायक आहेत. "

मि. स्ट्रॅहॅम या प्रख्यात न्यायपंडितानें विठ्ठलभाईबद्दल खालील आशयाचें पत्र मुंबई हायकोर्टाचे मुख्य न्यायाधीश आणि इतर न्यायाधीश यांना लिहिलें :—

" महाशय, मि. व्ही. जे. पटेल यांना मी पुष्कळ दिवसांपासून ओळखतों. त्यावरून त्यांच्या हुशारीबद्दल आणि स्वभावाबद्दल माझें फार चांगलें मत झालें आहे. त्यांचा १९०७ सालच्या इक्विटी या विषयाच्या

परीक्षेंत पहिला नंबर आला होता. शेवटच्या परीक्षेंत मीं त्यांचे पेपर्स तपासले आणि त्यांचा पहिला नंबर आला, एवढेंच नव्हे तर इक्विटीच्या विषयाचे जे दोन किंवा तीन अत्यंत उत्कृष्ट असे पेपर्स होते त्यांत विठ्ठल-भाईंचा एक होता.

त्यांना कायद्याचे प्राध्यापक किंवा परीक्षक नेमल्यास ते आपलीं कामें तत्परतेनें, हुषारीनें आणि चोख बजावतील यांत मला मुळींच संदेह वाटत नाहीं. ”

इतरांचींहि प्रशस्तिपत्रकें विठ्ठलभाईंना मिळालीं, त्यांचें सार वरील प्रशस्तिपत्रकांप्रमाणेंच आहे.

विठ्ठलभाई हे बॅरिस्टर होऊन हिंदुस्थानांत आले तेव्हां त्यांच्या पूर्वपरि-चयाचे खेडा जिल्ह्याचे कलेक्टर मि. शेपर्ड हे त्यावेळीं विलायतेंत होते. त्यांनीं तेथून विठ्ठलभाईंना एक पत्र लिहिलें त्यांतला एक उतारा प्रस्तुत प्रकरणीं उद्बोधक आहे, म्हणून तो खालीं देतों :—

“ मत्प्रिय विठ्ठलभाई,

आपण या वेळीं आपल्या मातृभूमीला येऊन पोंचलांच असाल. आपलें तेथें मोठें स्वागत होईल. मीही त्या स्वागतांत या पत्रानें सामील होत आहें. आपलें अनेकवार अभिनंदन होणें युक्तच आहे. कारण आपण इकडे कायद्याचा अभ्यास करीत असतांना त्यांत प्रावीण्य तर मिळविलेंच परंतु तुम्हीं इतर हिंदी विद्यार्थ्यांनाहि उत्तम उदाहरण घालून दिलें आहे. कारण तुमची वागणूक या ठिकाणीं चांगली असून तुम्ही इकडे मितव्यय करून वागत होतां. तुमचा भविष्यकाळ उज्ज्वल झालेला ऐकून मला आनंद होईल. तसेंच तुम्हीं आपल्या समाजाची सुधारणा करण्याचा प्रयत्न केल्यास मला अतिशय बरें वाटेल......तुमचा मित्र—शेपर्ड.”

याप्रमाणें कायद्याचा उत्तम अभ्यास करून पटेलांनीं परीक्षेंत उत्तम यश मिळविलें. परंतु नेहमीं कायद्याचींच पुस्तकें वाचण्यांत त्यांनीं तेथें वेळ घालविला नाहीं. जगांतील प्रमुख देशांच्या राज्यव्यवस्थेवरीलहि

पुष्कळ पुस्तकें त्यांनीं तेथें वाचलीं आणि ब्रिटिश राज्यघटनेवरील पुस्तकांचा त्यांनीं चांगला अभ्यास केला. या ज्ञानसंचयाचा त्यांना आपल्या भावी आयुष्यांत चांगला उपयोग होणार होता. हीं पुस्तकें वाचून त्यांचा तात्काळ असा समज झाला, कीं इंग्लंडची राज्यपद्धति ही कुठल्याहि इतर देशांच्या राज्यपद्धतीपेक्षां वरच्या प्रतीची आहे. एवढेंच नव्हे तर त्यांना असेंहि वाटूं लागलें, कीं ब्रिटिश राज्यघटनेचा गाभा म्हणजे जी पार्लमेंट तिचीं जर आपण वेळोवेळीं आर्जवें केलीं तर ती हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याचें दार खुलें करणारी किल्ली आनंदानें आपल्या हवालीं करील. पटेलांनाच हें वाटत होतें असें नाहीं तर इंग्लंडांत जेवढ्या हिंदी लोकांनीं कांहीं काळ वास्तव्य केलें आणि तेथील परिस्थिति थोडे दिवस पाहिली त्या बहुतेकांना (कांहीं अपवाद वगळले तर) असेंच वाटे. अर्थात् हा विश्वास १९०८ सालीं म्हणजे पटेल जेव्हां बॅरिस्टर झाले तेव्हां त्यांना होता. पुढल्याच वर्षीं हा विश्वास उडाला. कारण १९०९ सालीं मोर्लेमिंटो सुधारणा हिंदुस्थानांत सुरू झाल्या आणि त्या अत्यंत निराशाजनक आहेत हें त्यांना समजून आलें.

या प्रकारें अभ्यासूवृत्तीनें आणि कर्तव्यबुद्धीनें व त्याबरोबरच पुढील काळासंबंधीं आशावादयुक्त अंतःकरणानें पटेलांनीं अडीच वर्षें विलायतेंत काढलीं; व ते १९०८ या वर्षीं मातृभूमीला परतले.

विलायतेहून बॅरिस्टर होऊन हिंदुस्थानांत परत आल्यानंतर आपलें पूर्वीचें धंद्याचें ठिकाण जें बोरसद तेथें न राहतां ते आतां मुंबईस धंद्याकरितां येऊन राहिले; व तेथील हायकोर्टांत त्यांनीं बॅरिस्टरी सुरू केली. त्यांनीं बोरसद सोडलें तरी तें सोडतांना त्यांना फार वाईट वाटलें. त्या गांवावर त्यांचें फार प्रेम होतें. व त्या प्रेमाची खूण म्हणून त्यांनीं बोरसद येथील हायस्कूलला एक हजार रुपयांची देणगी आपल्या मिळकतींतून दिली. मुंबईस आल्यानंतर ते मलेरियानें आजारी पडले. दोन महिने झाले तरी बरें वाटेना म्हणून ते बोरसदला आले. नंतर आनंद येथील साल्व्हेशन आर्मीचे डॉक्टर म्युनिफोर्ड यांनीं त्यांना उपचार केले तेव्हां लवकरच त्यांना बरें वाटूं लागलें. या आजारांतून सुटतात तों दुसरी एक कौटुंबिक आपत्ति त्यांच्यावर आली. त्यांची पत्नी आतां आजारी पडली तिच्यावर

शस्त्रक्रिया करावी लागली. तरीहि कांहीं उपयोग न होतां ती अखेर मृत्यु पावली. विठ्ठलभाईना एक मुलगी होती पण ती लहानपणींच वारली. पत्नीच्या मृत्यूनंतर विठ्ठलभाईनीं पुन्हा लग्न केलें नाहीं.

विठ्ठलभाई आजारांतून उठल्यानंतर व त्याच सुमारास त्यांची पत्नी वारल्यानंतर ते नडियादला कांहीं दिवस राहिले; आणि नंतर आनंद येथें राहाण्यास गेले. या कालांत त्यांनीं आपल्या सार्वजनिक कार्याची मुहूर्तमेढ रोविली. त्यांचा खेडयांतील शेतकरी वर्गाशीं संबंध आला. त्यांचीं सुखदुःखें त्यांनीं समजावून घेतलीं. तीं पाहून आपण कांहीं तरी लोकसेवा करावी, गरीबगुरिबांचीं दुःखें यथाशक्ति निवारण्याचा प्रयत्न करावा असे विचार त्यांच्या मनांत प्रबल होऊं लागले. आणि याच वेळीं आपल्या जीवनाचें हेंच ध्येय असलें पाहिजे असें त्यांनीं ठरवून टाकलें. दोन वर्षें याप्रमाणें खेडुतांच्या सहवासांत काढल्यानंतर सन १९११ सालीं उत्तम निरोगी स्थितींत ते पुन्हा मुंबईला येऊन राहिले.

पटेल आपल्या धंद्यांत अतिशय निर्भय असत. आणि त्यांचें शिस्तपालन कडक असे. याचें एक उदाहरण नमूद करण्यासारखें आहे. १९११ सालची गोष्ट. श्री. नरसिंहभाई पटेल या नांवाच्या गृहस्थांनीं 'वनस्पतींचीं औषधें' यावर एक पुस्तक प्रसिद्ध केलें होतें. त्यांतील कांहीं भाग आक्षेपार्ह वाटल्यावरून त्यांच्यावर बडोद्याच्या कोर्टांत खटला सुरू झाला. विठ्ठलभाई त्यांचे वकील म्हणून कोर्टांत हजर होते. मुंबईचे पोलिस इन्स्पेक्टर जबानी देण्याकरितां आले होते. पण ते नियमाप्रमाणें साक्षीदाराच्या पिंजऱ्यांत उभे राहिले नाहींत. वकील जेथें कोर्टासमोर बसतात तेथीलच एक खुर्ची घेऊन सर्वांच्या पुढें खुर्चीजवळ उभे राहिले आणि आपलें नांव लिहूं लागले. पोलिस इन्स्पेक्टरचें हें वर्तन कोणाच्या लक्षांत आल्याशिवाय कसें राहील ? पण त्याची खोड काढतो कोण ? तो पडला सरकारी अधिकारी. कोणीं कांहीं हरकत घेतली नाहीं. पण विठ्ठलभाईना मात्र तें सहन झालें नाहीं. ते आपल्या जागेवरून उठले आणि अगदीं गंभीर चेहरा करून आणि दाढीवरून हात फिरवीत न्यायाधीशाला म्हणाले,

" महाराज, हे माझे विद्वान् मित्र व समव्यवसायी वकील असे मध्येंच उभे राहून नांव लिहीत आहेत तें काय म्हणून ? " विठ्ठलभाईंनीं काढलेलें व्यंग सर्वांच्या लक्षांत आलें. पोलिस इन्स्पेक्टर ओशाळला व मुकाट्यानें पिंजऱ्यांत जाऊन उभा राहिला, आणि तेथून त्यानें जबानी दिली. या लहानशा प्रसंगावरूनहि पटेलांना अन्याय कसा सहन होत नसे तें दिसून येतें. तसें म्हटलें तर त्यांनीं बॅरिस्टरी करून पैसा फारसा कमावलाच नाहीं. परंतु पैसा हें ध्येय न ठेवतां सचोटीची वृत्ति प्रत्येक बाबतींत त्यांनीं ठेवली.

## लोकसेवेचा श्रीगणेशा

लोकसेवा यथाशक्ति करायची तर लोकांनीं निवडून दिलेल्या राज्यकारभारांतील ज्या जागा असतील त्यांचा ताबा घेतला पाहिजे असें त्यांचें पहिल्यापासूनच मत होतें. प्रथम ते सप्टेंबर १९११ सालीं बोरसद तालुका बोर्डांत सभासद म्हणून निवडून आले, व जनसेवेचा श्रीगणेशा त्यांनीं आरंभला. लवकरच म्हणजे नोव्हेंबर १९११ सालीं त्यांची खेडा जिल्हा बोर्डांत बिनविरोध निवड झाली. त्याच वर्षीं उत्तर भागांतील जिल्ह्यांच्या लोकलबोर्डांतर्फे ते मुंबई कौन्सिलच्या निवडणुकीला उभे राहिले. परंतु याच वेळीं कोणीं एकानें निनांवी अर्ज खेडा जिल्ह्याच्या कलेक्टरकडे केला, कीं "पटेल हे मुळीं लोकलबोर्डाचेच सभासद होण्याला पात्र नाहींत, कारण ते बोरसदचे रहिवासी नाहींत. म्हणून त्यांना कौन्सिलच्या निवडणुकीला उभे राहतां येत नाहीं. " त्यावर कलेक्टरांनीं चौकशी सुरू केली. पण या चौकशीचा पटेलांना कांहींच सुगावा लागला नाहीं. मग त्यांना जबाब देण्यास बोलावणें, उलटतपासणीची संधि देणें या गोष्टी दूरच राहिल्या हें उघड होतें ! पण प्रत्यक्ष निवडणुकीच्या खटपटीस जेव्हां ते लागले तेव्हां आपल्या पश्चात् आपल्या विरुद्ध चौकशी चालली आहे हें त्यांना लोकांकडून समजलें. तेव्हां त्यांनीं कलेक्टरला लिहिलें, कीं " नियमाप्रमाणें माझ्या तालुकाबोर्डाच्या सभासदत्वास हरकत घेतां येत नाहीं. म्हणून माझ्या विरुद्ध चौकशी करण्याचें कारण उरत नाहीं. अशीच जर चौकशी चालू राहिली तर ती माझ्या कौन्सिलच्या निवडणुकीला बाधक होणार आहे. कारण

माझ्या निवडणुकीसाठीं जे लोक खटपट करीत आहेत त्यांना जर हा प्रकार कळला तर त्यांच्या प्रयत्नांना शैथिल्य येईल. शिवाय मतदारांचाहि माझ्या-विरुद्ध प्रतिकूल ग्रह होईल." यावर कलेक्टरांनीं पटेलांना कमिशनरकडे लिहिण्यास सांगितलें. म्हणून त्यांनीं कमिशनरला एक विस्तृत पत्र लिहिलें; त्याचा सारांश असा, कीं "मी खेडा जिल्ह्याचा रहिवासी आहें व त्या जिल्ह्यांत माझी वडिलार्जित मिळकत आहे. शिवाय नुकतेंच म्हणजे सप्टेंबर १९१० सालीं मी त्या जिल्ह्यांतील बोरसद या गांवीं एक शेत व तीन घरें विकत घेतलीं आहेत. इतर दोन शेतेंहि माझ्याकडे गहाण आहेत. अर्थात् या तालुक्यांत माझी याप्रमाणें स्थावर मिळकत आहे. व मिळकतीवर गहाणाचे हक्कहि आहेत. मी जरी मुंबईस धंद्यानिमित्त जात असलों तरी माझें कायमचें राहाण्याचें ठिकाण बोरसदलाच आहे. मी एक वर्ष तेथील बोर्डाचें व जिल्हा बोर्डाचेंहि काम केलें आहे. या सर्व गोष्टी लक्षांत घेतल्या तर मी या जिल्ह्याचा रहिवासी नाहीं हें कसें ठरतें? व म्हणून बोर्डाचा सभासद होण्यास पात्र नाहीं हेंहि कसें ठरेल? मी या जिल्ह्याचा कायदेशीर रहिवासी असल्यानें मला कौन्सिलच्या निवडणुकीस उभें राहाण्याला कोणतीहि हरकत नसावी. म्हणून माझी विनती आहे, कीं ज्या-अर्थीं निवडणुका जवळ येऊन ठेपल्या आहेत व इतर उमेदवारांच्या खटपटी चालू आहेत त्या अर्थीं माझ्या अर्जाचा तावडतोब निकाल करावा. याप्रमाणें पटेलांनीं ९-१२-१९१२ ला अर्ज केला. या अर्जाचा योग्य तो परिणाम होऊन १३-९-१९१२ ला कमिशनरनें त्यांना लिहिलें कीं "तुमचें लोकलबोर्डाचें सभासदत्व कायदेशीर आहे." अर्थात् मुंबई कौन्सिलच्या निवडणुकीला उभें राहाण्याला पटेलांना मार्ग मोकळा झाला.

निवडणुकीचा निकाल लागला. एकंदर ४० मतांपैकीं २८ मतें पटेलांना मिळालीं व ते मुंबई कौन्सिलांत निवडून आले. तावून सुलाखून निघालेल्या सुवर्णाप्रमाणें पटेलांचें हें यश अधिकच तेजस्वी होतें. कारण त्यांची जी निवडणूक झाली ती वर वर्णिलेल्या अडीअडचणींतून जेव्हां ते पार पडले तेव्हां झाली यावरून त्यांनीं लोकप्रियता कशी संपादन केली होती हेंहि दिसून येतें. कौन्सिलांत प्रवेश झाल्यावर उत्तरोत्तर जनसेवा करण्याचे

त्यांचे विचार दृढ झाले. त्यांची बॅरिस्टरी केवळ नांवापुरती राहिली. कारण लोकसेवा व उदरंभरण या दोन्ही गोष्टी एकदम करूं लागल्यास कोणतीहि एक गोष्ट समाधानकारक होणार नाहीं अशी त्यांची खात्री झाली होती; व म्हणून आपले धाकटे बंधु श्री. वल्लभभाई पटेल— जे या वेळीं बॅरिस्टर होऊन आले होते– त्यांच्यावर प्रपंचाची जबाबदारी टाकून पटेलांनीं राष्ट्राच्या संसाराची जबाबदारी घेतली. त्या वेळची हकीगत सांगतांना वल्लभभाई म्हणतात, "आम्हां दोघांनाहि वाटत होतें, कीं स्वातंत्र्य पाहिजे असेल तर देशांत संन्यासी झाले पाहिजेत, स्वार्थत्याग-पूर्वक देशाची सेवा करणारे लोक झाले पाहिजेत. आतां आम्हां दोघांपैकीं एकानें देशसेवा व दुसऱ्यानें कुटुंबसेवा करावी असें आम्हीं ठरविलें. त्या-प्रमाणें माझ्या बंधूंनीं (म्हणजे विठ्ठलभाई) आपला चालू असलेला बॅरिस्टरीचा धंदा सोडला व देशसेवेच्या कार्याला स्वतःस वाहून घेतलें. प्रपंच चालविण्याची जबाबदारी माझ्या शिरावर आली. म्हणजे पुण्यकर्म विठ्ठलभाईंच्या नशिबीं आलें आणि पापकर्म माझ्या नशिबीं आलें. पण त्याच्या पुण्याच्या हिश्शांत माझाहि वांटा आहे ही मला समाधान देणारी गोष्ट होती. कारण त्यांना तरी पुण्यकर्म करण्यास माझ्यावर प्रापंचिक जबाबदारी पडल्यानें मदतच झाली."

यापुढें विठ्ठलभाई नाममात्र हायकोर्टाच्या बाररूममध्यें येत. दुपारीं बारा वाजतां बाररूममध्यें आले, कीं तेथल्या खुंटीवर आपली टोपी काढून ठेवीत; मग लगेच रिपोर्ट वगैरे पाहाण्याकरितां सरकारी सेक्रेटरिएटच्या लायब्ररींत जात व तेथें कौन्सिलांत करायच्या कामाची भरपूर तयारी करीत. दुपारीं बारा वाजतां लायब्ररींत गेले, कीं सायंकाळीं साडेसहा वाजेपर्यंत निरनिराळ्या पुस्तकांचें व रिपोर्टांचें वाचन व टिपण करणें या गोष्टी ते तेथें करीत. सेक्रेटरियटमधील कारकून मंडळी त्यांच्या या दररोजच्या कार्य-क्रमाकडे पाहून थक्क होऊन जात असत. कौन्सिलचे प्रोसीडिंग्ज् मात्र ते लॉ लायब्ररींतच मागवीत. तसेंच त्यांची कौन्सिलच्या कामाची तयारी पाहून त्या वेळचे त्यांचे सहकारी रँग्लर परांजपे, बाबासाहेब कामत, गोकुळ-दास पारेख या मंडळींनाहि अतिशय आश्चर्य वाटे. कोणताहि विषय

कौन्सिलांत मांडायचा असला तर त्याची तपशीलवार माहिती पटेलांना जितकी असे तितकी दुसऱ्या कोणाहि सभासदास नसे. त्यामुळें त्याच्या माहितीचा इतरांनाहि उपयोग होई. कौन्सिलच्या कामकाजाची संपूर्ण माहिती व्हावी याकरितां त्यांनीं १८९२ सालापासूनचीं कौन्सिलांतल्या कामाच्या माहितीचीं सर्व पुस्तकें काळजीपूर्वक वाचून पाहिलीं व त्या सर्वांचा त्यांनीं बारकाईनें अभ्यास केला. इतकी दांडगी तयारी करणारा पटेलां-शिवाय दुसरा कोणीहि कौन्सिलर त्या वेळीं नव्हता. जोंपर्यंत पटेल मुंबई कौन्सिलांत होते, तोंपर्यंत साऱ्या मुंबई इलाख्यांत अशी एकहि सार्वजनिक अडचण नव्हती, कीं जी त्यांनीं सरकारच्या कानावर घातली नाहीं. लोकांचीं एकूण एक गाऱ्हाणीं त्यांनीं मुंबई कौन्सिलांत टांगून ठेवलीं व त्यांची दाद लावण्याकरितां पटेलांनीं जो अविश्रांत उद्योग केला त्याला तोड नव्हती. त्यांनीं जितके ठराव कौन्सिलांत आणले तितके दुसऱ्या कोणाहि कौन्सिलरानें आणले नाहींत. असा कौन्सिलचा एकहि दिवस गेला नाहीं कीं ज्या दिवशीं पटेलांची सरकारी सभासदाशीं खडाजंगी उडाली नाहीं. त्यामुळें सरकारला पटेलांचा भयंकर दरारा वाटत असे. कोणत्या वेळीं आपल्या अब्रूचें दिवाळें निघेल याचा नेम नाहीं अशी भीति सरकारला पटेलांच्या कामगिरीमुळें उत्पन्न झाली. आणि म्हणून पटेलांनीं मध्यवर्ती असेंब्लींत अध्यक्ष या नात्यानें जें कार्य केलें त्याच्याच तोलाचें कार्य त्यांनीं मुंबई कौन्सिलांत साधे सभासद राहून केलें असें पटेलांच्या एका मित्रानें म्हटलें आहे त्यांत कांहींच अति-शयोक्ति नाहीं. या कार्याचा पुढील प्रकरणांत आढावा घेऊं.

---

# कौन्सिलर पटेल

[सन १९१३ ते सन १९१९]

सन १९०९ सालीं मार्लेमिंटो सुधारणा हिंदुस्थानांत आल्या. या सुधारणा निराशाजनक होत्या असें इतर समंजस पुढाऱ्यांप्रमाणें पटेलांचें मत होतें. तरीहि कौन्सिलांत शिरून त्यांचा शक्य तो उपयोग करून घ्यावा व त्या अखेर कशा अपुऱ्या आहेत हें सरकारास स्पष्ट सांगावें असें त्यांचें म्हणणें असे; व त्याकरितां त्यांनीं कौन्सिलांत प्रवेश केला. सोमवार ता. ६ जानेवारी १९१३ या दिवशीं मध्यान्नकालीं औपचारिक पद्धतीप्रमाणें पटेलांनीं कौन्सिल हॉलमध्यें राजनिष्ठेची शपथ घेतली. पटेल कौन्सिलांत जाण्यापूर्वी त्या ठिकाणीं सर दिनशा वाच्छा, सर इब्राहिम रहिमतुल्ला, गोकुळदास पारेख यांसारखे प्रजापक्षाचे झुंझार वीर सरकारशीं वाद करण्यास पुढें सरसावलेले होते. सर दिनशांची गर्जना सुरू झाली, कीं सभेंतील श्रोते स्तिमित झाल्यासारखे बसत! सर इब्राहिमांची शिक्षणविषयक प्रश्नांची सरबत्ती सुरू झाली, कीं सरकारी अधिकाऱ्यांचीं उत्तरें देतांना तारांबळ उडे! श्री. गोकुळदास कहानदास पारेख यांच्या जमीनमहसूल विषयाच्या ज्ञानानें अधिकारी वर्ग थक्क होई. पण या सर्वांहून पटेलांची रीत निराळीच होती. त्यांचीं भाषणें पुष्कळदा कठोर होत असत. विषयाचें भरीव ज्ञान, बारीक सारीक तपशिलाची संपूर्ण माहिती, तर्कशुद्ध विचारसरणी आणि विलक्षण हजरजबाबीपणा. पण त्याबरोबरच व्यक्त होणारी प्रजाहिताची खरी कळकळ या सर्व गोष्टींमुळें सरकारनियुक्त सभासदांना त्यांचीं भाषणें नकोशीं होत असत! त्या वेळीं मुंबईचे गव्हर्नर लॉर्ड विलिंग्डन हेच कौन्सिलचे अध्यक्ष होते. बिनसरकारी विषयांकरितां दिलेल्या वेळांपैकीं बहुतेक वेळ एकट्या पटेलांच्याच कामानें निघून जात व इतर बिनसरकारी विषयांना थोडा वेळ उरावा हें

त्यांना सहन होत नसे. व म्हणून वारंवार ते पटेलांच्या भाषणांना अटकाव करीत. एकदा असा प्रसंग घडला, कीं खेडा जिल्ह्याच्या जमीनमहसुलासंबंधीं लोकनियुक्त सभासदांकडून विचारलेल्या प्रश्नांना अधिकारी वर्ग तावडतोब उत्तरें देऊं शकला नाहीं. अर्थात् ही स्थिति पाहाणें विलिंग्डनना अपमानास्पद वाटलें. म्हणून ज्या वेळीं पटेल हे बोलायला उठले व कडक भाषेंत सरकारी धोरणावर टीका करूं लागले त्या वेळीं त्यांचें भाषण थांबविण्याकरितां लॉर्ड विलिंग्डन दोनतीनदा आपल्या खुर्चीवरून उठले. पण प्रत्येक वेळीं लेडी विलिंग्डननीं त्यांच्या कोटाचें टोक धरून त्यांना खालीं बसविलें. मात्र लॉर्ड विलिंग्डन वेळप्रसंगीं पटेलांच्या कर्तृत्वाबद्दल आदर दाखवीत. उन्हाळ्यात कौन्सिलची बैठक महाबळेश्वरास भरत असे, त्या वेळेचा एक प्रसंग आहे. भावनगरचे माजी दिवाण सर प्रभाशंकर पट्टणी हे महाबळेश्वरीं आले होते. त्यांनीं एकदा गव्हर्नरसाहेब लॉर्ड विलिंग्डन व लेडी विलिंग्डन यांना 'ॲटहोम' दिला. 'ॲटहोम' ला जमाखिंडीचे अधिपति उपस्थित होते. पटेलांनाहि निमंत्रण होतें. बाकीची सर्व निमंत्रित मंडळी जमल्यानंतर प्रथम लेडी विलिंग्डनची स्वारी तेथें आली. त्या वेळीं आपसांत गप्पागोष्टी-विनोद चालू असतांना पटेल लेडी विलिंग्डनला म्हणाले, "Well, how is it that your husband always interrupts me in the Council?" (तुमचे यजमान कौन्सिलांत माझ्या भाषाणाला नेहमीं अडथळा करतात हें कसें?) पटेलांचें हें बोलणें लेडी विलिंग्डनला अपमानकारक वाटलें, कारण His Excellency (हिज़ एक्सेलेन्सी) असें न म्हणतां 'युवर हजबंड' अशा शब्दांनीं त्यांनीं गव्हर्नरचा उल्लेख केला, एवढेंच! त्या तडक उठल्या व झालेला प्रकार पतिराजांना सांगून त्यांना घेऊन आल्या. पण या वेळीं लॉर्ड विलिंग्डन व पटेल यांनीं मनमोकळेपणानें गप्पागोष्टी सुरू केल्या होत्या. जणूं काय पूर्वीचा प्रकार झालाच नाहीं! लेंडी विलिंग्डनला हें सर्व निमूटपणें सहन करावें लागलें!

सरकारी अधिकाऱ्यांची जीहुजुरी करणें त्यांना आवडत नव्हतें. कौन्सिलची बैठक महाबळेश्वरास असली म्हणजे तेथें पटेल एक बंगला घेऊन

राहात. एकदा सकाळच्या वेळीं बंगल्याच्या व्हरांड्यांत ते सहज खुर्चीवर बसले होते. अंगांत कपडे कांहीं नव्हते. फक्त कमरेला एक लहानसें धोतर ते नेसले होते. त्या वेळीं मुंबई सरकारचा मिलिटरी सेक्रेटरी घोड्यावर बसून त्यांच्या बंगल्यालगतच्या रस्त्यावरून जाऊं लागला. पण त्याला पाहून पटेल जागचे उठले नाहींत, कीं त्याच्यापुढें जाऊन आदबीनें बोलले नाहींत. दुसऱ्या दिवशीं पटेलांच्या वर्तनाची कुणकुण त्या सेक्रेटरीनें केली. तेव्हां पटेल त्याला म्हणाले, "हा पाहिलास का माझ्या डोळ्यांतला वडस? या वडसामुळें पलीकडून कोण चाललं आहे तें मला स्पष्ट दिसत नाहीं!" वडस मात्र पटेलांच्या एका डोळ्यांत खरोखरच होता.

असो, आतां आपण पटेलांनीं कौन्सिलांत प्रत्यक्ष कोणती कामगिरी केली तें पाहूं. त्यांच्या कौन्सिलांतील कामाची कल्पना देतांना भारतमंत्री मि. मॅंटेग्यू आपल्या सुप्रसिद्ध डायरींत एके ठिकाणीं पटेलांबद्दल लिहितात, "माझी पटेलांशीं बराच वेळ मुलाखत झाली. ते विलिंग्डनच्या विधिमंडळाचे एक सभासद आहेत. कौन्सिलांतील वादविवादांवर घातलेले निर्बंध कसे जाचक आहेत व त्यामुळें जहाल वृत्ति लोकांत कशी वाढत आहे, यांची त्यांनीं अत्यंत विस्मयजनक उदाहरणें सांगितलीं. आपण लोकहिताचीं कितीतरी बिलें व ठराव कौन्सिलांत आणले पण सरकारपक्षानें कांहींना कांहीं तरी कारणें सांगून ते कसे धुडकावून लावले याचें त्यांनीं मजजवळ विस्तरशः वर्णन केलें. खरोखर पटेल हे कौन्सिलांतील सर्वांत अधिक बोलके सभासद आहेत."

## पाहिजे शिक्षण पण सरकार कृपण

पटेलांनीं अनेक ठराव कौन्सिलांत आणले. पण त्यांना थोडेसें यश कुठें लाभलें असेल तर तें प्राथमिक शिक्षणाच्या बाबतींत. थोडेसें यश म्हणण्याचें कारण, सरकारपक्षानें याहि बाबतींत त्यांच्या मनाप्रमाणें गोष्टी होऊं दिल्या नाहींत. प्रथम १९१६ च्या डिसेंबरमध्यें त्यांनीं एक ठराव कौन्सिलपुढें मांडला, कीं मुंबई इलाख्यांत प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचें करण्याचें धोरण सरकारनें आंखावें; त्या धोरणानुसार म्युनिसि-

पालिट्यांच्या हद्दींत तें लवकर सुरू करावें; आणि यासंबंधीं सरकारला ठराविक सूचना करण्याकरितां सरकारी व बिनसरकारी सभासदांची एक कमिटी नेमावी. परंतु त्यावर सरकारी सभासद सर महादेव चौबळ व खुद्द गव्हर्नर यांनीं सांगितलें, कीं सध्याच अशा प्रकारचें धोरण सरकारनें सुरू करावें अशी परिस्थिति नाहीं. शिवाय त्यांनीं सांगितलें, कीं नामदार गोखले यांनीं असेंच एक बिल १९१० मध्यें वरिष्ठ विधिमंडळांत आणलें होतें पण तें तेथें पास झालें नाहीं. त्या वेळीं हिंदुस्थान सरकारनें जें धोरण ठरविलें तें पाळण्यास आम्ही बांधलेले आहोंत; मग इतकें असतांना पटेल पुढें सांगतात ती कमिटी नेमण्याचा प्रश्नच उत्पन्न होत नाहीं. सरकारच्या या दुराग्रहामुळें व कौन्सिलांत जोहुकुमांचाच जोर असल्यानें पटेलांचा हा महत्त्वाचा ठराव २० अनुकूल व २५ प्रतिकूल मतें पडून नापास झाला. परंतु त्यांतल्या त्यांत समाधानाची एक गोष्ट झाली. पुढल्या वर्षी त्यांचें एक बिल पास झालें. त्या बिलाप्रमाणें ज्या म्युनिसिपालिट्यांना आपल्या हद्दींत मुलांमुलींचें प्राथमिक शिक्षण सक्तीचें व मोफत करावें असें वाटत असेल त्यांनीं जर त्यांना तें करणें शक्य असेल तर सरकारची आगाऊ परवानगी घ्यावी असें ठरलें. एकंदरीनें सक्तीच्या व मोफत प्राथमिक शिक्षणाच्या प्रत्यक्ष जबाबदारीबाबत सरकार उपरणें झाडून मोकळें झालें व तें काम त्यांनीं म्युनिसिपालिट्यांच्या इच्छेवर सोंपविलें. खरी सत्ता व पैसा मात्र सरकारनें आपल्या ताब्यांत ठेवला !

शिक्षणाच्या कामीं सरकारची ही कृपणपणाची वृत्ति पाहून पटेलांनीं एक ठराव आणला, कीं "तुम्हीं पोलिस खात्याची वाढ करण्यासाठीं प्रमाणाबाहेर खर्च करतां. इतकें असून पोलिस खात्यांत असावी तशी शिस्त नाहीं. इतका हा जादा खर्च अनाठायीं आहे. तो तुम्हीं शिक्षण व आरोग्य या खात्यांकडे करावा." हा पटेलांचा ठराव फक्त मुंबई शहराला लागू करण्यापुरताच होता. अखेर तो ठराव पास झाला नाहीं. परंतु आलेल्या अपयशानें पटेल कधींच खचून गेले नाहींत. अपयश ही यशाची पायरी आहे या म्हणीची सत्यता विठ्ठलभाईंच्या कामगिरीला

पुष्कळ लागू पडते. प्राथमिक शिक्षण सक्तीचें व मोफत झालें पाहिजे व त्याकरितां अधिक खर्च केला पाहिजे याची जाणीव सध्याच्या लोकनियुक्त प्रधानमंडळांना कशी होत आहे हें आपल्याला दिसत आहे.

## देशी वैद्यक

पटेलांची आणखी एक त्या वेळची उल्लेखनीय कामगिरी म्हणजे मेडिकल कायद्यांत सुधारणा करण्यासंबंधीं त्यांनीं कौन्सिलांत आणलेलें बिल होय. पटेलांच्या या प्रयत्नांचा परिपाक आतां वीस वर्षांनंतर आपल्याला दिसत आहे. पटेलांचा हा प्रयत्न म्हणजे मेडिकल कायद्यांत आयुर्वेद, युनानी वगैरे देशी वैद्यकांचा विशिष्ट नामनिर्देश असावा व त्यांना सरकारी मान्यता मिळावी यासंबंधाचा होय. हें बिल कौन्सिलांत आणण्यास जें कारण झालें तें असें. मुंबईस आयुर्वेदाचें एक कॉलेज आहे. तें " प्रभुराम आयुर्वेदिक कॉलेज " या नांवानें प्रसिद्ध आहे. याचे प्रिन्सिपल डॉ. पोपट प्रभुराम वैद्य, एल्. एम्. अँड एस्. हे गृहस्थ नुकतेच कालवश झाले. त्यांच्या वडिलांनीं या कॉलेजची स्थापना सन १८९६ मध्यें केली. व त्यांत आयुर्वेद पद्धतीनें वैद्यकीय शिक्षण देण्यांत येऊं लागलें. आतां डॉ. पोपट हे विलायती वैद्यक शिकलेले गृहस्थ या आयुर्वेदिक कॉलेजाचे मुख्य आहेत हें जेव्हां मुंबई सरकारला कळलें तेव्हां आयुर्वेदाचें वावडें असलेल्या त्या सरकारनें मेडिकल कौन्सिलमार्फत डॉ. पोपट यांजवर नोटीस बजावली, कीं तुम्ही रजिस्टर्ड मेडिकल ग्रॅज्युएट आहांत, त्या अर्थी मेडिकल कायद्याप्रमाणें तुम्हांला आयुर्वेदिक पद्धत शिकविणाऱ्या संस्थेशीं संबंध ठेवतां येत नाहीं. कायद्याच्या भाषेंत हें तुमचें 'गैरवर्तन' ( Infamous conduct) होत आहे. तरी याबद्दल तुम्हीं खुलासा करावा. आणि सदर संस्थेशीं असलेला आपला संबंध तोडून टाकावा. नाहींतर तुमचें नांव रजिस्टरमधून काढून टाकलें जाईल." यावर अडीच वर्षें डॉ. पोपट व मेडिकल कौन्सिल यांच्यांत पत्रव्यवहार चालू होता. डॉ. पोपट यांनीं आपली बाजू मांडतांना सरकारला सडेतोड लिहिलें कीं " कायद्यानें फक्त विलायती वैद्यकालाच मान्यता दिली आहे आणि आयुर्वेदासारख्या देशी

वैद्यकाला नाहीं असें जर तुमच्या कमिटीचें म्हणणें असेल तर तें चुकीचें आहे. अमुक एका ठराविक पद्धतीचेंच शिक्षण दिलें पाहिजे असा कांहीं कायद्यांत उल्लेख नाहीं. अर्थात् माझा आयुर्वेदिक कॉलेजाशीं असलेला संबंध कायद्याप्रमाणें 'गैरवर्तनाचा' ठरत नाहीं" परंतु कौन्सिलनें डॉ. पोपट यांच्यावर लादलेला आरोप मागें घेतला नाहीं. त्यावर डॉ. पोपट यांनीं पटेलांचा सल्ला घेतला व मेडिकल कायद्यांत सुधारणा करण्याचें बिल कौन्सिलांत आणण्याची त्यांना विनंती केली. पटेलांनीं त्यांचें म्हणणें मान्य केलें. त्या बिलाचा आशय असा, कीं एकाद्या रजिस्टर्ड डॉक्टरानें आयुर्वेद, युनानी व इतर देशी वैद्यकाशीं जरी संबंध ठेवला तरी त्याचें तें कृत्य गैरवर्तन या सदरांत येऊं नये; व त्याचें नांव रजिस्टरमधून काढून टाकलें जाऊं नये. म्हणजे सरकारनें या बिलानें एक प्रकारें देशी वैद्यकाला मान्यता द्यावी असें पटेलांच्या या प्रयत्नाचें उद्दिष्ट होतें. हें बिल कौन्सिलांत मांडतांना पटेलांनीं जें भाषण केलें तें इतकें परिणामकारक झालें कीं आतां हें बिल पास होणार व त्यांत सरकारपक्षाच्या मानहानीचा प्रसंग येणार असें लॉर्ड विलिंग्डन यांना दिसून आलें. दोन्ही बाजूंस जवळजवळ सारखीं मतें पडतील असें गव्हर्नरांना वाटलें. या अडचणींतून पार पडण्याकरितां लॉर्ड विलिंग्डननीं आयुर्वेद पद्धतीला ज्यांचा विरोध होता अशा दोन डॉक्टरांची नेमणूक कौन्सिलचे जादा सभासद म्हणून केली. या डॉक्टरांपैकीं एक डॉ. तेमुलजी नरिमन व दुसरे डॉ. आर. राव असे होते. मध्यंतरीं डॉ. पोपट यांच्यावर वजन पाडून त्यांच्याकरवीं पटेलांनीं आपलें बिल माघारीं घ्यावें अशी कारवाई सरकारपक्षानें करून पाहिली. परंतु पटेलांनीं बिल माघारीं घेतलें नाहीं. सरकारनें आपल्या बाजूचे दोन जादा सभासद नेमल्यानें बिल अखेर पास झालें नाहीं. पण यामुळें सरकारची इभ्रत वाढली असें मुळींच झालें नाहीं. कारण फारच थोडया मताधिक्यानें सरकारनें हें बिल कसेंबसें हाणून पाडलें. या बिलाचें काम संपल्यानंतर पुढचें काम हातीं घेण्यांत आलें, त्या वेळीं एक गमतीचा प्रसंग घडला. वास्तविक नरिमन व राव या दोन डॉक्टरांची सभासद म्हणून नेमणूक या विशिष्ट बिलाकरितांच केलेली होती. अर्थात् तें

काम संपतांच त्यांचें सभासदत्व आपोआप रद्द झाल्यामुळें त्यांनीं कौन्सिलांतून आपल्या जागेवरून उठून जाणें अवश्य होतें. परंतु तसें कांहीं न करतां दोघेहि तसेच बसून राहिले व कौन्सिलच्या पुढच्या कामास सुरवात झाली. त्या वेळीं पटेल अध्यक्षांना म्हणाले, "या दोन सभासदांचें आतां येथें कांहीं काम नाहीं. त्यांची आतां या सभेला जरुरी नाहीं. त्यांना येथून निघून जाण्याची आपण आज्ञा करावी." अध्यक्ष लॉर्ड विलिंग्डन यांनीं पटेलांचें म्हणणें मान्य केलें व त्या डॉक्टरांना आपल्या जागा सोडून बाहेर जाण्यास फर्माविलें. लगेच दोघेहि उठून जाऊं लागले. त्या वेळीं पटेल दोघांकडे पाहून हसून व कपाळाकडे हात हलवीत म्हणाले, "अच्छा अच्छा, जाव्!" हें पटेलाचें बोलणें ऐकतांच सभागृहांत हशा पिकला. पण डॉक्टरद्वयांना किती ओशाळल्यासारखें झालें असेल याची फक्त कल्पना करावी!

## खेडा सत्याग्रहाचा लढा

यापुढील पटेलांची कौन्सिलविषयक कामगिरी सांगतांना या लढ्याचा उल्लेख ओघानेंच येतो. कारण एक तर हा लढा कौन्सिलबाहेर जरी चालू होता तरी त्याचे निनाद कौन्सिलमध्यें जोरानें उमटल्याशिवाय राहिले नाहींत. दुसरें असें कीं या लढ्याचे सूत्रधार जे महात्मा गांधी त्यांच्याबरोबर पटेलांनींहि कौन्सिलबाहेर महत्त्वाचें काम केलें होतें. अंतिम सत्याग्रहाच्या पायरीला गोष्टी जाण्यापूर्वीं ही चळवळ गुजराथ सभेनें चालविली होती. या सभेचे अध्यक्ष महात्मा गांधी होते. श्री दादासाहेब मावळंकर हे कार्यवाह होते; व विठ्ठलभाई हे कार्यवाहीचे सभासद होते. प्रथम या सभेनें सरकारास अर्ज वगैरे करून चळवळ चालविली. त्या कामीं श्री. विठ्ठलभाईंची व कै. गोकुळदास कहानदास पारेख यांची पूर्णपणें मदत होती. मुंबई सरकारला भेटणें, आग्रह धरणें, कौन्सिलांत चर्चा करणें वगैरे कामें ते करीत. पुढें सत्याग्रह करण्याचें ठरतांच नवीन सत्याग्रही मंडळ स्थापण्यांत आलें; त्याचें पुढारीपण महात्माजींकडे होतें; आणि जिल्ह्यांत ठाण मांडून बसणारे व सर्व कार्यभाग शिरावर

घेणारे वल्लभभाई होते. विठ्ठलभाई जिल्ह्यांत बरेचदा फिरून प्रचार करीत आणि चळवळीला नैतिक पाठिंबा देत. कौन्सिलांत तर या लढ्यासंबंधीं प्रजेची बाजू सरकारपुढें मांडतांना पटेलांनीं सोडलेले वाग्बाण आणि प्रश्नांच्या फैरी यांना त्या वेळीं तोड नव्हती. त्यांच्या सडेतोड भाषणांनीं सरकारपक्ष जेरीस येऊन उडवाउडवीचीं उत्तरें देई व म्हणून शेवटीं कित्येक प्रश्नच त्यानें पटेलांना विचारूं दिले नाहींत. १९१७ च्या नोव्हेंबर महिन्यांत खेडा जिल्ह्यांत दुष्काळ पडला. अतिवृष्टि होऊन पिकांवर रोग पडले व उंदरांनीं उपद्रव मांडला. पिकें बुडालीं. शेतकरी दुष्काळानें ग्रासून गेले. ही परिस्थिति पाहून सरकारनें ६०० खेड्यांपैकीं १०४ खेड्यांना अर्धी सारातहकुबी दिली. त्या सुमारास कौन्सिलचे सभासद श्री. पटेल व श्री. पारेख, सर्व्हंट्स ऑफ इंडिया सोसायटीचे श्री. देवधर, श्री. ठक्कर व श्री. जोशी आणि नंतर महात्मा गांधी यांनीं प्रत्यक्ष खेडोपाडीं हिंडून दुष्काळी स्थिति पाहिली. तेव्हां त्या सर्वांना आढळून आलें, कीं रुपयांत चार किंवा सहा आण्यांपेक्षां जास्त पीक कुठेंच आलें नव्हतें. म्हणजे बहुतेक खेड्यांना सबंध सारा तहकुबी द्यायला पाहिजे होती. परंतु तसें न करतां सरकारनें ६०० पैकीं फक्त १०४ खेड्यांना अर्धी सारातहकुबी दिली. दुष्काळ असूनहि सरकारनें सारावसुलीचें काम सुरू केल्यामुळें त्याच्या निषेधार्थ पुष्कळ सभा झाल्या. हजारों शेतकरी सभेला येत. तारीख १३-१२-१९१७ या दिवशीं खेडा जिल्ह्यांतील शेतकऱ्यांची सभा नदियाड येथें भरली. तींत कलेक्टरकडे शेतकऱ्यांचें शिष्टमंडळ न्यावें व आपलीं रास्त गाऱ्हाणीं वेशीवर टांगावीं असें ठरलें. या मंडळाचें पुढारीपण पटेल व पारेख यांच्याकडे होतें. या उभय पुढाऱ्यांनीं थासरा गांवीं तीन प्रहरीं चार वाजतां कलेक्टरांची मुलाखत घेतली. त्यांच्याजवळ दुष्काळी स्थिति निवेदन केली; व सारा भरण्यास शेतकरी कसे समर्थ नाहींत तें सांगितलें. त्यावर कलेक्टरनें सांगितलें, कीं सरकारी नियमाप्रमाणें आम्ही सारातहकुबी देऊं शकत नाहीं. तरी पण मी मामलेदारांना ताकिदी दिलेल्या आहेत व त्याप्रमाणें आमचें शेवटचे हुकूम निघेपर्यंत शेतकऱ्यांवर सक्तीचे इलाज केले जाणार नाहींत. " यावर पटेल कलेक्टरला म्हणाले,

"सक्तीचे इलाज करण्याचें काम १५ दिवस तहकूब ठेवावें." त्यावर कलेक्टर म्हणाले, "तसें कांहीं मी तुम्हांला सांगूं शकत नाहीं. परंतु एकाद्या शेतकऱ्यानें तसा अर्ज केला तर त्याचा सहानुभूतिपूर्वक विचार होईल." नंतर पटेलांनीं शिष्टमंडळातर्फे कलेक्टरचे आभार मानले व ती सर्व मंडळी परतली. पण कलेक्टरनें मुलाखतींत जें अर्धवट आश्वासन दिलें होतें तें पोकळ ठरून ता. १६ जानेवारी १९१८ रोजीं सरकारनें प्रेसनोट प्रसिद्ध करून सारावसुलीचें काम सक्तीनें सुरू केलें. तेव्हां अहमदाबादच्या गुजराथ सभेनें हें प्रकरण नेटानें हातीं घेऊन दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना जरूर ती मदत व सल्ला देण्याचें ठरविलें. लवकरच सारा न देण्याची चळवळ करण्याचें ठरलें व तींत महात्मा गांधी सामील झाले. प्रेसनोटला गुजराथ सभेनें व पटेल–पारेख यांनीं रोखठोक जबाब दिले. सरकारला खरी परिस्थिति कशी समजली नाहीं, पिकांची आणेवारी करण्याची सरकारची रीत कशी चुकीची आहे, या चळवळीला जिल्ह्याबाहेर फूस मिळत आहे या सरकारच्या विधानांत कसें तथ्य नाहीं हें त्यांनीं जबाबांत स्पष्ट केलें. तसेंच शेतकऱ्यांची कशी बिकट परिस्थिति झाली आहे. त्यांना सरकारला सारा देणें कसें अशक्य झालें आहे हें त्यांनीं अनेक प्रमाणें देऊन सविस्तर सिद्ध केलें. पण त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. तेव्हां ता. ५ फेब्रुवारी १९१८ रोजीं महात्मा गांधी यांनीं पटेल, पारेख व सर दिनशा वाच्छा यांच्यासमवेत गव्हर्नरकडे दाद मागितली. पण त्याचाहि कांहीं उपयोग न होऊन सरकारनें सारावसुली चालविली. आणखी एक प्रयत्न पारेख–पटेल यांनीं कौन्सिलमध्यें करून पाहिला. तारीख २१–३–१९१८ रोजीं मुंबई कौन्सिलांत श्री. पारेख यांनीं ठराव आणला कीं "खेडा जिल्ह्यांतील प्रजा दुष्काळपीडित असून अन्नाला मोताद झाली आहे. धान्य न पिकल्यामुळें गरिबांना खायला अन्न नाहीं. म्हणून महुड्याच्या झाडांच्या फुलांचा उपयोग त्यांना खाण्याकडे करूं द्यावा." आतांपर्यंत या फुलांचा उपयोग जनावरांनाच होत असे. परंतु अबकारी कायद्याप्रमाणें त्याच्या उपयोगावर सरकारी नियंत्रण असल्यामुळें सरकारच्या आगाऊ परवानगीशिवाय कोणालाहि त्याचा उपयोग करतां येत नव्हता. पारेख व पटेल यांचें म्हणणें असें

कीं हें नियंत्रण सध्याच्या दुष्काळी परिस्थितींत काढून घ्यावें व त्या फुलांचा उपयोग जनावरांच्या व माणसांच्या खाण्याकडे सरकारच्या परवानगीवांचून करतां यावा. वास्तविक ही मागणी अगदीं न्याय्य होती. परंतु ती तशी आहे हें दाखविण्याकरितां पटेलांना दुष्काळाचें स्वरूप कसें तीव्र आहे तें सविस्तर सांगावें लागलें. याच वेळीं सरकारनें चालविलेल्या शेतकऱ्यांवरील छळाचा पाढा पटेलांनीं वाचला. त्यांनीं सरकारला कित्येक प्रश्न या बाबतींत विचारले. परंतु हे प्रश्न विचारतां येत नाहींत म्हणून त्यांचीं उत्तरें देण्याची आवश्यकता नाहीं असा सरकारनें लेखणीच्या एका फटकाऱ्यानें निर्णय केला. जेव्हां मूळ ठराव मतास घातला तेव्हां तो नापास झाला यांत आश्चर्य नाहीं.

याप्रमाणें सर्व प्रयत्न निष्फळ झाल्यावर दुसऱ्याच दिवशीं म्हणजे तारीख २२ मार्चला नडियाद येथें मोठी सभा भरून तींत सत्याग्रहाच्या लढ्याची घोषणा करण्यांत आली. महात्मा गांधींनीं सत्याग्रहाची शपथ–पत्रिका तयार केली; सुरवातीस सुमारें तीनशें इसमांनीं त्या पत्रिकेवर सह्या केल्या. सरकारी अधिकारी गरीब शेतकऱ्यांना धमक्या देऊं लागले. परंतु "वाटेल तर आम्हांला तोफेच्या तोंडीं द्या नाहींतर फासावर चढवा आम्ही आमची प्रतिज्ञा मोडणार नाहीं," असें रोखठोक उत्तर खेडयांतील अडाणी लोकहि मामलेदारांना देऊं लागले. कलेक्टर, कमिशनर यासारख्या सरकारी अधिकाऱ्यांनाहि तोच अनुभव आला. सरकारनें वसुलीकरितां अधिक जारीचे उपाय योजण्यास सुरवात केली. तलाठ्याला नोकरीवरून काढणें, पीक जप्त करणें, जमीन खालसा करण्याचे हुकूम काढणें असे प्रकार सरकारनें आरंभले. उलट महात्मा गांधी, पटेल आदि पुढाऱ्यांनीं सारा न देण्याच्या चळवळीविषयीं शेतकऱ्यांत विलक्षण उत्साह निर्माण केला. चळवळींत स्त्रीपुरुष सामील झाले. ठिकठिकाणीं सभांतून प्रचार सुरू झाला. तारीख २३ एप्रिल रोजीं मुंबईस शांतारामाच्या चाळींत मोठी जाहीर सभा झाली. सभेला लोकमान्य टिळक, महात्मा गांधी, नामदार पटेल, बॅरिस्टर जयकर, श्रीयुत हॉर्निमन यांसारखे खंबीर पुढारी उपस्थित होते. पटेल अध्यक्षस्थानीं होते. या सर्वांनीं सत्याग्रहाच्या लढ्याला सहानुभूतिपूर्वक पाठिंबा दिला.

पटेलांनीं आपल्या अध्यक्षीय भाषणांत सांगितलें, कीं "मुंबई सरकारचें मन वळविण्याचे सर्व सनदशीर प्रयत्न लोकांनीं केले. परंतु ते निष्फळ झाले हे सर्व प्रयत्न केल्यानंतरच सत्याग्रहाला सुरवात झाली. कारण त्याशिवाय जनतेला आपलीं दुःखें निवारण्याकरितां दुसरा मार्गच उरला नव्हता. पण या चळवळीला विरोध करणारे कांहीं दीडशहाणे लोक या मुंबईत आहेत. मीं त्यांना विचारलें, कीं 'या संकटांतून पार पडण्याचा दुसरा मार्ग तुम्हांला सुचतो का? असला तर सांगा.' पण तो मार्ग त्यांना सांगतां येत नाहीं." असो. याप्रमाणें जेव्हां चोहोंकडून चळवळीचा अग्नि पेटला तेव्हां व्हाइसरॉयानींच लोकांना शांत करण्यासाठीं मुंबईच्या गव्हर्नरांकडे संदेश पाठविला, कीं सध्या खेडा जिल्ह्याला साऱ्याची तहकुबी द्यावी व सक्तीचे इलाज करण्याचें थांबवावें. अर्थात् कालांतरानें सर्व सारा वसूल झाला. या लढ्याचा अशा रीतीनें शेवट झाला. त्यांत पटेलांनीं जें काम केलें त्यामुळें त्यांची कार्यशक्ति, विद्वत्ता व देशप्रेम यांची ओळख जनतेला चांगली झाली व त्यांना आपलें पुढील कार्यक्षेत्र वाढविण्याची संधि मिळाली आणि हें कार्यक्षेत्र जसें कौन्सिलच्या बाबतींत तसें कौन्सिलाबाहेरहि त्यांनीं वाढविलें.

## मिश्रविवाहाच्या बिलाची वावटळ !

पटेलांची मुंबई कौन्सिलांतील कामगिरी त्यांतील लोकपक्षाच्या सभासदांना पटून त्यांनीं नंतर लवकरच त्यांची व्हाइसरॉयच्या वरिष्ठ विधिमंडळांत एकमतानें निवड केली. या वेळीं त्यांना कोणीहि विरोधी उभा राहिला नाहीं. ही त्यांची निवडणूक लोकांना आवडली. सार्वजनिक कामांची उत्तम माहिती असणारा असा एक शांत व निरलस कार्यकर्ता वरिष्ठ कौन्सिलांत निवडून आला ही एक इष्टच गोष्ट झाली अशा प्रकारचें उत्तेजन वृत्तपत्रांतूनहि त्यांना मिळालें. या निवडीमुळें पटेलांचें कार्यक्षेत्र अर्थात्च मोठें झालें. त्यांच्या मनोवृत्तींतहि फरक पडला होता. त्यांचे नेमस्त किंवा मवाळ विचार बदलून त्यांना त्या वेळच्या राजकारणांत जहाल पक्षाचे म्हणण्यांत येऊं लागलें. प्रथम त्यांच्या कौन्सिलविषयक वाढत्या

कार्यासंबंधींच सांगायचें म्हटलें तर त्यांच्या वरिष्ठ विधिमंडळांतील कार्यांचा उल्लेख केला पाहिजे. तारीख ४ सप्टेंबर १९१८ या दिवशीं अकरा वाजतां त्यांनीं वरिष्ठ कौन्सिलांत राजनिष्ठेचा औपचारिक शपथविधि केला. आणि कार्यतत्परता इतकी, कीं दुसऱ्याच दिवशीं त्यांनीं हिंदु मिश्र-विवाहाचें अत्यंत वादग्रस्त झालेलें बिल कौन्सिलपुढें आणलें. बिलाचा आशय असा, कीं हिंदूंमध्यें जे वर्ण व जाती आहेत त्यांचे आपसांतील विवाहसंबंध आतांपर्यंत कायद्यानें मान्य नव्हते ते यापुढें कायद्यानें मान्य केले जावे. मात्र हे विवाह नोंदणी पद्धतीनें न होतां हिंदूंच्या वैदिक संस्कारांनींच व्हावेत आणि विवाहित दांपत्य हिंदु म्हणूनच राहावें. पटेलांनीं कौन्सिलांत या बिलावर अनेक भाषणें करून हिंदूंचा बहुजन-समाज या बिलाला अनुकूल आहे असा आपला अभिप्राय व्यक्त केला. परंतु सामाजिक स्वरूपाचें हें बिल जनतेच्या माहितीकरितां जेव्हां प्रसिद्ध करण्यांत आलें तेव्हां साऱ्या हिंदुस्थानांत विलक्षण खळबळ उडाली. आसेतुहिमाचल या बिलावर अनुकूल व प्रतिकूल ठराव पास करणाऱ्या हजारों सभा झाल्या आणि त्यांचीं भेंडोळीं पटेलांच्या घरीं व गव्हर्नर आणि व्हाइसरॉय यांच्या बंगल्यांत जमूं लागलीं. विशेषतः बृहन्महाराष्ट्र व मद्रास इलाखा या भागांकडून फारच विरोध झाला. आर्यसमाजानें बिलाला संमति दर्शविली. या उलटसुलट ठरावांतील कांहीं मासलेवाईक उतारे मनोरंजक वाटतील म्हणून खालीं दिले आहेत :—

पंडित स्वामी विरूपाक्ष वेदतीर्थ वेदभाष्याचे प्रोफेसर संस्कृत कॉलेज इंदूर, हे लिहितात. "मिश्र विवाहाला अनुकूल असे हवे तितके पुरावे मी आपल्याला वेदांतून व इतर शास्त्रांतून काढून देईन; आणि या पुराव्यांवरून मी सिद्ध करीन, कीं अशा मिश्र विवाहांची पद्धति हिंदूंमध्यें वैदिक काळापासून होती."

श्रीमत् जगद्गुरू शंकराचार्य डॉ. कुर्तकोटी यांच्या अध्यक्षतेखालीं बेळगांवांत जाहीर सभा झाली तींत ठराव पास झाला, कीं हिंदुधर्मशास्त्र व रूढि यांना मिश्र विवाह मान्य नाहींत. तसेंच कोणाच्याहि धर्मांत ढवळा-ढवळ करायची नाहीं हें जें राणीच्या जाहीरनाम्यांत दिलेलें आश्वासन

आहे त्याला या बिलानें बाध येणार आहे; म्हणून या बिलाला या सभेचा विरोध आहे. त्याच वेळगांवांत बिलाला पाठिंबा देणारी दुसरी सभा झाली. त्या सभेंत एका डॉक्टर महाशयांनीं सभेला लिहिलेलें एक पत्र वाचण्यांत आलें. त्यांत लिहिलें होतें, कीं वैद्यकशास्त्रदृष्ट्या पटेलांचें बिल कुचकामी आहे. या शास्त्राचें प्रजाजननासंबंधीं एक महत्त्वाचें तत्त्व आहे, कीं "सजातीयांच्या संयोगानें चांगली प्रजा निपजते आणि विजातीयांच्या संयोगानें वाईट प्रजा होते." विजातीयांच्या प्रजेचें उदाहरण म्हणजे खेचर हें जनावर होय. या जनावरांत नरमादींचे वाईट तेवढे गुण आलेले असतात आणि त्यांच्यांत चांगला गुण एकहि नसतो! शिवाय खेचराच्या ठिकाणीं प्रजोत्पादनशक्ति नाहीं. हें बिल पास झालें तर जी गोष्ट खेचराची तीच मनुष्याचीहि होईल.! आणि कांहीं वर्षांत सारी मनुष्यजात विजातीय विवाहपद्धतीनें नाहींशी होईल ! या पत्राची सभेंतच अर्थात् टवाळी होऊन बिलाला पाठिंबा मिळाला.

महाभारताचार्य श्री. चिंतामणराव वैद्य यांनीं तर एक पुस्तकच प्रसिद्ध करून हें बिल हिंदुधर्मशास्त्राला कसें विरोधी आहे तें स्पष्ट केलें. शारदापीठ, करवीरपीठ, द्वारकामठाधिपति, कांची येथील प्रतिवादि भयंकर मठाचे जगद्गुरु इत्यादि सनातनी आचार्यांनीं विरोध केला यांत नवल नाहीं. परंतु डॉ. कुर्तकोटींसारख्या आधुनिकमतवादी आचार्यांनीहि बिलाला विरोध केला. बहिरामपूर येथील महिला समाजानें बिलाला अनुमति दिली व त्याशिवाय सामाजिक प्रगति होणार नाहीं असें मत व्यक्त केलें! देशांत फाटाफूट होऊं नये हाहि एक मुद्दा इतर सामान्य कारणांबरोबर पुण्याच्या 'माळी मराठी' समाजानें पुढें केला व बिल माघारीं घेण्याची पटेलांना आग्रहाची विनंती केली. पाचोरें येथील हिंदुसमाजातर्फे मुंबईच्या गव्हर्नराकडे एक लांबलचक अर्ज करण्यांत आला. त्यांतील एक मासलेवाईक उतारा :—"नामदार पटेल या गृहस्थानें ज्या कायद्यानें आज प्राचीन काळापासून सनातन हिंदुधर्माची वर्णव्यवस्था व जातिभेद नष्ट होईल व हिंदुधर्माच्या पावित्र्यास कमीपणा येईल असें हिंदु मिश्र विवाहाचें बिल दाखल केलें आहे. ह्यामुळें आम्हां हिंदु लोकांच्या पवित्र धार्मिक

भावनेला धक्का पोंचून आम्ही घाबरून गेलों आहोंत. या कायद्यानें हिंदु-धर्मशास्त्राप्रमाणें वडिलोपार्जित मिळकतीचे सारे हक्क या मिश्र विवाहाच्या संततीस प्राप्त होणार असल्यामुळें हें कायद्यानें हिंदु म्हणवून घेणारें बाटगें कुटुंब सनातन हिंदुधर्माप्रमाणें चालणाऱ्या त्यांच्या पूर्वाश्रमींच्या भाऊबंदाच्या घरांत अर्धा वांटा घेऊन हक्कानें राहाणार, इतकेंच नाहीं तर अर्धे देवहि मागण्यास तयार होणार, यामुळें एकंदर हिंदुसमाजांत या कायद्यानें केवढी अनर्थपरंपरा ओढवणार आहे हें नामदार साहेबांनीं लक्षांत घ्यावें अशी अर्जदारांचीं नम्र विनंती आहे."

पाचोरें येथील हिंदुसमाजानें पटेलांकडेहि निषेध लिहून पाठविला. या बिलासंबंधीं खुद्द पुण्याचे डिस्ट्रिक्ट जज्ज मि. पी. ई. पर्सीव्हल यांनीं लिहिलें, कीं "ज्या अर्थी या बिलाला तीव्र विरोध आहे आणि तोहि विशेषत: पुण्यांतील व पुण्याबाहेरील ब्राह्मणसमाजाकडून होत आहे, त्या अर्थी सरकारनें या बिलाच्या बाबतींत तटस्थ राहाणेंच योग्य होईल." असो. असें हें वादग्रस्त झालेलें बिल शेवटीं मात्र निकालांत न निघतां तसेंच राहिलें. वावटळ यावी, तिनें थोडा वेळ धूळ उडवावी, नासधूस करावी; नंतर मेघांचा गडगडाट व विजांचें कडाडणें सुरू व्हावें आणि वावटळीचें महत्त्व कमी व्हावें; तसाच या बिलाचा प्रकार झाला. दरम्यान देशांत तातडीचे प्रश्न निर्माण झाले आणि त्यांच्याकडे पटेलांना लक्ष द्यावें लागल्यानें हें बिल सिलेक्ट कमिटीच्या रिपोर्टापर्यंत थांबलें. देशांत ज्या नवीन चळवळी उत्पन्न झाल्या त्यांचे प्रतिध्वनी कौन्सिलांत उमटून पटेलांना सरकारकडे कौन्सिलांत दाद मागावी लागली; व त्याकरितां त्यांनीं अनेक ठराव कौन्सिलांत आणले. परंतु याच वेळीं पटेलांचें कार्य कौन्सिलाबाहेरहि वाढू लागलें. म्हणून या वेळीं कौन्सिलांत व बाहेर पटेलांनीं केलेल्या कामगिरीचा विचार पुढील स्वतंत्र प्रकरणांत करूं.

# मैदानांत उडी

" चांगल्या संधीची लाट प्रत्येकाच्या आयुष्यांत कधीं तरी येत असते " अशा अर्थाचें एक कविवचन आहे. मात्र आलेल्या सुसंधीचा योग्य उपयोग करून घेण्याला बुद्धि लागते हेंहि तितकेंच खरें आहे. खेडा सत्याग्रहाच्या वेळीं महात्मा गांधी, लोकमान्य टिळक यांसारख्या अव्वल दर्ज्याच्या पुढाऱ्यांचा सहवास आणि त्यांच्याबरोबर कार्य करण्याची संधि पटेलांना लाभली. त्यांचें नांवहि अधिकाधिक प्रसिद्ध होऊं लागलें. मोठमोठ्या परिषदांचीं आमंत्रणें त्यांना येऊं लागलीं. या परिषदा बऱ्याचशा राजकीय पण कांहीं सामाजिक व आर्थिक असत. कांहींतून त्यांना सन्मान्य पाहुणे म्हणून बोलावलें जाई. कांहीं सभांचें अध्यक्षस्थान त्यांच्याकडे येई. कांहींचे ते स्वागताध्यक्ष होत. हळूहळू लोकमान्य टिळकांच्या जहाल राजकारणाचे ते अनुयायी झाले. गांधीपक्षापेक्षां टिळकपक्षाकडे त्यांचा ओढा जास्त. पण आपण असुक एका पक्षाचेच आहोंत असें मात्र आग्रहानें त्यांनीं कधींच सांगितलें नाहीं; किंबहुना त्यांनीं आपलें खोल हृद्गत कोणालाहि कधीं उकलून दाखविलें नाहीं. एकदा असा एक प्रसंग आला, कीं खेडा सत्याग्रहानंतर गोध्रा येथें पहिली राजकीय परिषद भरली. महात्मा गांधी अध्यक्ष होते. पटेलहि सभेला आले होते. दोघे एकमेकाच्या शेजारीं बसले होते. गांधींची प्रकृति जरा ठीक नव्हती. ते बोलायला उठले तेव्हां ते विठ्ठलभाईंच्या खांद्यावर हात टेकून उभे राहिले; व थोडा वेळ त्याच स्थितींत ते भाषण करीत होते. नंतर स्वतःच्या आधारावर उभे राहिले तेव्हां ते म्हणाले, " मी पटेलांचें हृदय तपाशीत होतों. " गांधीजींचें भाषण संपल्यानंतर पटेलांची बोलण्याची पाळी आली तेव्हां गांधीजींच्या वरील उद्‌गारास उद्देशून पटेल म्हणाले, " गांधीजींनीं माझ्या हृदयावर हात ठेवला होता हें खरें, पण या हृदयांतलें

रहस्य त्यांना कांहीं उमगलें नाहीं." या बोलण्यानें गांधीजींसह सर्वांना हसूं आलें. पटेल कोणत्या वेळेला काय बोलतील याची कोणाला कल्पना व्हायची नाहीं. त्यांचे मित्र म्हणत, "पटेलांची दाढी हालेल पण पोटातलें पाणी हालायचें नाहीं." एकदम चमत्कारिक वाटणारें त्यांचें बोलणें ऐकून कोणीं जर त्यांना प्रश्न केला कीं "विठ्ठलभाई हें कसें काय हो?" आणि जर त्या प्रश्नाला सरळ उत्तर देण्यासारखें नसलें तर ते फक्त "नारायण नारायण" असा उच्चार करीत. यावरून पटेलांच्या स्वभावांतील एक छटा समजण्यासारखी आहे. असो. गोध्रा येथें राजकीय परिषद झाली, त्या वेळीं तेथें 'हरिजन' परिषदहि भरली होती. गांधींनीं अस्पृश्यांच्या वस्तीला भेट दिली, त्या वेळीं त्यांच्यामागून एक विचित्र वेष धारण करणारी व्यक्ति चालली होती. या व्यक्तीनें अंगांत कफनी घातली होती, आणि डोक्यावरून कानटोपी आच्छादली होती. बैराग्यासारख्या दिसणाऱ्या त्या व्यक्तीला पाहतांच गांधीजी म्हणाले, "या विठ्ठलभाई, आतां मात्र तुम्ही खरोखर साधु बनलांत! मला अशी आशा वाटते, कीं देशाकरितां तुम्ही खरे साधुच राहाल." पोशाखाचें महत्त्व सोडून दिलें तरी यापुढें पटेलांनीं देशाकरितां फकिरी वृत्ति धारण केली असें म्हटल्यास त्यांत अतिशयोक्ति नाहीं. यापुढील सगळें आयुष्य त्यांनीं देशकार्य करण्यांत वेंचलें. मुंबईस १९१५ सालीं कॉंग्रेस झाली तेव्हां तिच्या प्रतिनिधींच्या यादींत त्यांनीं आपलें नांव दाखल केलें. आणि या रीतीनें त्यांनीं राजकारणाच्या क्षेत्रांतील हालचालींना सुरवात केली. गोध्र्याची पहिली राजकीय परिषद झाल्यानंतर दुसरी राजकीय परिषद नडियाद येथें भरली व तिचें अध्यक्षस्थान पटेलांनीं मंडित केलें. नंतर समाजसुधारणा परिषद, शिक्षणपरिषद, विजापुरास भरलेली मुंबई प्रांतिक राजकीय परिषद या सर्व ठिकाणीं पटेलांची अध्यक्षपदीं योजना झाली. आणि या सर्व सभांतून पटेलांनीं राजकीय व सामाजिक क्षेत्रांतील आपले प्रगतिपर विचार जनतेपुढें मांडले. पुण्यास भरलेल्या पहिल्या स्थानिक-स्वराज्य परिषदेचे अध्यक्षहि पटेलच झाले. परंतु या सर्वांमध्यें विजापुरास भरलेली राजकीय परिषद त्यांच्या भावी आयुष्यक्रमाच्या दृष्टीनें अत्यंत महत्त्वाची अशी झाली. कारण ही परिषद

१९१८ सालीं झाली व या वेळीं त्यांनीं ब्रिटिश सरकारनें काढलेल्या सुधारणांच्या जाहीरनाम्यावर आपलें स्पष्ट मत व्यक्त केलें.

## विजापूरची प्रांतिक परिषद्

त्या वेळचे भारतमंत्रि मि. मॉटेग्यू यांनीं हिंदुस्थानास द्यायच्या सुधारणांची घोषणा तारीख २० ऑगस्ट १९१७ मध्यें पार्लमेंटास केली होती. हिंदुस्थानला आम्ही आस्ते कदम वसाहतीच्या स्वराज्याचे हक्क देणार आहोंत असा बादशहांचा संदेश असल्याचें मॉटेग्यूसाहेबांनीं जाहीर केलें होतें. अर्थात् या जाहीरनाम्याचा विचार परिषदेंत होणें साहजिकच होतें. परिषदेला महात्मा गांधी, सेनापति बापट, कै. न. चिं केळकर यांसारखी मंडळी आल्यामुळें तिला महत्त्व प्राप्त झालें. पटेलांचें अध्यक्षीय भाषण अत्यंत व्यवहारी व माहितीपूर्ण झालें. त्यांत त्यांनीं जाहीरनाम्यावर बोलण्यापूर्वी युरोपांत त्यावेळीं चाललेल्या महायुद्धाचा जो उल्लेख केला तो सयुक्तिक होता. त्यानंतर एकवीस वर्षांनीं १९३९ सालीं युरोपांत जें महायुद्ध सुरू झालें त्यालाहि पटेलांचे उद्गार बहुतांशीं लागू पडतात. महायुद्धासंबंधीं उल्लेख करतांना पटेल म्हणाले होते, "या देशांत लष्करी सामर्थ्य प्रचंड आहे, पण तें सुप्तावस्थेंत आहे. सरकारनें जनतेंत विश्वास उत्पन्न करून तें जागृत केलें पाहिजे. परंतु तसें सरकारनें केलें नाहीं ही शोचनीय गोष्ट आहे. जर्मनी पूर्वेकडे सरकत बलाढ्य होत चालला आहे; इंग्लंडच्या मुख्य प्रधानांनीं रणशिंग फुंकलें आहे आणि हिंदुस्थान सरकार व हिंदवासी लोक यांना युद्धांत भाग घेऊन आलेल्या हल्ल्याचा प्रतिकार करण्याला बोलावलें आहे. जनतेच्या पुढाऱ्यांना या संकटाची पूर्ण जाणीव आहे. परंतु लोक तयार नाहींत हा दोष पुढाऱ्यांचा नसून तो सरकारचा दोष आहे. सरकारनें या संकटाला तोंड देण्याची तयारी यापूर्वीच कितीतरी वर्षें करायला पाहिजे होती. निःशस्त्र व निर्बळ अशा हिंदी लोकांचें रक्षण सरकार करणार तरी कसें ? आमच्या सुशिक्षितांनीं कित्येक वर्षें सरकारच्या कानीं कपाळीं ओरडून सांगितलें, कीं तुम्हीं लोकांना लष्करी शिक्षण द्या, आणि त्यांना स्वतःच्या देशाचें संरक्षण करण्यास समर्थ बनवा. पण ऐकतो कोण ?

सुशिक्षितांची ही ओरड अरण्यरुदनासारखीच ठरली ! आणि आतां जरी हिंदी लोक वाढत्या संख्येनें लष्करांत गेले तरी त्यांना युरोपियन सैनिकांप्रमाणें वागविण्यांत आलें पाहिजे असा आम्हीं आग्रह धरला पाहिजे. हिंदी लोकांचा पोशाख, त्यांची व्यवस्था, त्यांचे हक्क हे युरोपियन सैनिकांप्रमाणेंच हवेत असें आम्हीं ठासून सांगितलें पाहिजे; आणि त्यांच्यांत विषमता न ठेवतां साऱ्या देशाची लष्करी संघटना सरकारनें केली पाहिजे. लष्करी, आरमारी आणि हवाई दल या सर्व ठिकाणीं हिंदी लोकांना वाढता प्रवेश मिळणें अवश्य झालें आहे. अजून वेळ गेली नाहीं. सरकारनें किती जरी चुका आतांपर्यंत केल्या असल्या तरी त्यांना अजून घडी सावरतां येईल. " महायुद्धाचा उल्लेख केल्यानंतर जाहीरनाम्याकडे वळणें ओघानेंच आलें. कारण नुकतीच जी युद्धपरिषद दिल्लीला व्हाइसरॉयांच्या अध्यक्षतेखालीं झाली तींत हिंदुस्थानांतील लोकांनीं ब्रिटिश सरकारला युद्धाच्या कामीं मदत करावी असें सरकारतर्फे सुचविण्यांत आलें होतें. पण लोकांना त्यांच्या इच्छेप्रमाणें सुधारणा मिळेपर्यंत त्यांनीं सरकारला उत्साहानें मदत तरी कशी करावी असा विचार लोकपक्षीय पुढाऱ्यांमध्यें अर्थात्‌च उत्पन्न झाला. पण हा विचार युद्धपरिषदेंत करणें अस्थानीं आहे असें म्हणून सरकारनें परिषदेस आलेल्या लोकप्रतिनिधींना निराश केलें, आणि असा ठराव पास करून घेतला, कीं हिंदुस्थानांतील लोकांनीं कर्तव्यदक्ष व राजनिष्ठ राहून साम्राज्यसरकारला संकटांत कसोशीनें मदत करण्याचा निश्चय केला आहे. या युद्धपरिषदेंतील ठरावांचा उल्लेख केल्यावर पटेल आपल्या भाषणांत म्हणाले, कीं " आतां हिंदुस्थान सरकारनें व ब्रिटिश सरकारनें आमचा मार्ग मोकळा केला पाहिजे. आम्हीं जर त्यांना बिनशर्त व आनंदानें मदत करण्याचें ठरविलें आहे तर त्यांनींहि आतां आम्हांला ताबडतोब व कोणतीहि मर्यादा न घालतां पूर्ण जबाबदारीच्या स्वराज्याचे हक्क दिले पाहिजेत. द्विदल राज्यव्यवस्थेसारखे अर्धवट व तुटपुंजे अधिकार आम्हांला नकोत. " मूळ पटेलांचें भाषण बत्तीसपानी आहे. परंतु स्थलाभावीं त्याचा येथें अगदींच त्रोटक निर्देश करावा लागला आहे. या भाषणाचा व एकंदर परिषदेंत झालेल्या चर्चेचा निष्कर्ष असा, कीं

कॉंग्रेस व मुस्लिम लीग यांनीं मिळून स्वराज्याच्या मागणीची जी संयुक्त योजना तयार केली आहे ती हिंदुस्थानला लागू केल्याशिवाय लोकांचें समाधान होणार नाहीं व ते युद्धामध्यें सरकारला उत्साहानें मदत करण्यास तयार होणार नाहींत; पण लोकांना हक्क दिले तर मात्र सैन्यभरती जोरानें होईल. यावेळीं सरकारनें लष्करभरतीकरितां ठिकठिकाणीं रिक्रूटिंग कँप उघडले होते. असा एक कँप विजापुरासहि परिषद झाली तेथें होता. मंडपांत परिषदेचा शेवट होत आला होता. त्या वेळीं शहरांत भुमका उठली कीं रिक्रूटिंग कँप उघडून जी सैन्यभरती होत आहे ती सक्तीनें होत आहे. तशांत परिषदेंतल्या भाषणांनींहि लोकांवर परिणाम झालेला होता. ज्वाला भडकण्यास ठिणगी लागण्याचाच अवकाश होता. एक म्हातारी बाई कँपापाशीं रडत आली व माझ्या मुलाला कशाला रिक्रूटिंगमध्यें नेतां म्हणून मोठ्यानें अक्रोश करूं लागली. परिषदेस सेनापति बापट आले होते. त्यांनीं ही बातमी ऐकली व ते तडक कँपाकडे धावत गेले व स्वतःच मोठमोठ्यानें ओरडूं लागले. बापटांचें ओरडणें ऐकून हजारों लोक त्यांच्याभोवतीं गोळा झाले. तेव्हां त्या वेळचे असिस्टंट कलेक्टर श्री. मदन यांनीं पोलीस पार्टी बोलावली व तिला जमावावर गोळीबार करण्याचा हुकूम केला. परिषदेच्या स्वागत मंडळांतील विजापूरचे सुप्रसिद्ध पुढारी श्री. श्रीनिवासराव कौजलगी यांनीं पटेल वगैरे मंडळींना आपापल्या जागीं पोंचविलें व ते स्वतः जमावाकडे गेले. त्यांनीं कलेक्टरला सांगितलें, "तुम्ही मला दहा मिनिटें वेळ द्या; मी जमाव मोडतों." असें म्हणून कौजलगी यांनीं बापटांना अलगद उचललें व एका खोलींत नेऊन ठेवलें. त्यांनीं परिषदेच्या स्वयंसेवकांना सांगितलें, कीं तुम्ही बापटांना थिएटरांत नेऊन ठेवा. त्याप्रमाणें स्वयंसेवकांनीं केलें. पुढें असें कळलें, कीं ज्या मुलाकरितां बाई रडत होती तो तिचा मुलगा सैन्यांतून पळून आला होता व म्हणून त्याला पकडून कँपांत ठेवलें होतें. हें जेव्हां लोकांना समजलें तेव्हां जमाव मोडला व गोळीबार टळला. मध्यंतरीं पोलीस व परिषदेचे स्वयंसेवक यांची बाचाबाची होऊन कांहीं दुखापतीहि झाल्या. नंतर पोलिसांनीं स्वयंसेवकावर फिर्याद गुदरली. तेव्हां कौजलगी व परिषदेला आलेली

r130ny

कांहीं पुढारी मंडळी फौजदाराकडे गेली व त्यांनीं फौजदाराला सांगितलें कीं ", तुम्हीं स्वयंसेवकांवर केलेली फिर्याद काढून टाकावी हें बरें. तसें तुम्हीं केलें नाहीं तर ते तुमच्या विरुद्ध जातील व सैन्यभरतीच्या विरुद्ध उपदेश करूं लागतील आणि पुढाऱ्यांनाहि तोच मार्ग स्वीकारावा लागेल." याचा परिणाम होऊन पोलिसांनीं फिर्याद काढून घेतली. या रीतीनें परिषदेच्या अखेरीस आलेलें हें विघ्न नाहींसें झालें.

## मुंबईची जादा कॉंग्रेस

विजापूरच्या परिषदेनें पटेलांच्या आयुष्याला वळण दिलें तें कायमचेंच. ते आतां पुरते राजकारणांतील जहाल पक्षाचे बनले. आतांपर्यंत नेमस्त मंडळी त्यांना आपल्या पक्षांतले समजत. परंतु मॉंटेग्यूसाहेबांनीं हिंदुस्थानांत दौरा काढून जो मॉंटेग्यूचेम्सफर्ड नांवाचा रिपोर्ट प्रसिद्ध केला त्यानंतर नेमस्त व जहाल ( किंवा होमरूलर ) यांचा बेबनाव वाढला. या रिपोर्टांत मॉंटेग्यू भारतमंत्री व चेम्सफर्ड व्हाइसरॉय यांच्या सह्यांनीं सुधारणांच्या योजनेचा मसुदा प्रसिद्ध झाला व सरकार नव्या सुधारणा काय देणार याची रूपरेषा समजली. हा रिपोर्ट जहालांच्या मतें अपुरा व निराशाजनक होता तर नेमस्तांना त्यांतून सुधारणांचा पूर वाहाणार असें वाटलें. पटेलांच्या शब्दांत सांगायचें तर "सरकारची ही योजना फारच पोकळ होती." तर नेमस्तांच्या मतें तो एक प्रामाणिक व भरीव प्रयत्न होता. असा तीव्र मतभेद असतांना पटेलांचें नेमस्त पुढाऱ्यांशीं जमणें शक्य नव्हतें. टिळक, पटेल, खापर्डे, मालवीय, बेझंट, केळकर हे नामवंत पुढारी आतां चळवळीच्या आघाडीला होते. उलट सर दिनशा वाच्छा, सर सुरेंद्रनाथ बानर्जी यांसारखे एके काळीं गाजलेले लोकाग्रणी त्यांच्या गुळमुळीत धोरणामुळें आतां मागें पडले. १९१६ सालांतील लखनौच्या कॉंग्रेसमध्यें टिळकांचा राष्ट्रीय पक्ष प्रबल झालेला होता. तरीसुद्धां त्या पक्षांतील कांहींजणांनीं नेमस्त पक्षाला कॉंग्रेसकडे वळविण्याची खटपट चालविली होती. स्वराज्याची मागणी एकमुखी व्हावी हा हेतु त्यांत होता हें उघड आहे. आतां जुलै १९१८ मध्यें जेव्हां मॉंटफर्ड रिपोर्ट प्रसिद्ध झाला त्या वेळीं हा एकीचा प्रयत्न नेटानें करण्यांत

आला व या रिपोर्टावर देशाचें म्हणणें काय आहे तें जाहीर करण्याकरितां ऑगस्ट महिन्यांत मुंबई येथें जादा काँग्रेस भरविण्याचें ठरलें. परंतु नेमस्तांनीं आधींच काँग्रेसमधून फुटून आपली निराळी बैठक भरविण्याचें ठरविलें होतें. जादा काँग्रेस २८ ऑगस्टपासून भरणार होती. परंतु मालवीयांनीं अगदीं आयत्या वेळीं नेमस्तांशीं तडजोड करण्याचा आणखी एक प्रयत्न करून पाहिला. तो निष्फळ ठरला; पण त्यांत एक दिवस फुकट गेल्यामुळें काँग्रेसच्या या जादा अधिवेशनाला प्रत्यक्ष सुरवात २९ ऑगस्टला झाली. अध्यक्ष बॅ. हसन इमाम व स्वागताध्यक्ष विठ्ठलभाई पटेल होते. मरीन लाइन्सच्या मैदानावर प्रशस्त मंडप उभारला होता. सुमारें चार हजार प्रतिनिधी व सुमारें दोन हजार निमंत्रित लोक उपस्थित होते. अधिवेशनास दुपारीं एक वाजतां प्रारंभ झाला. प्रथम मुलींनीं ' वंदे मातरम् ' हें गीत व नंतर गांधर्वमहाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनीं 'भारत हमारा देश है' हें गीत म्हटल्यावर स्वागताध्यक्ष पटेल यांनीं आपल्या भाषणास सुरवात केली. त्यांचें भाषण श्रोतृसमूह फार लक्षपूर्वक ऐकत होता, आणि मधूनमधून टाळ्यांचा गजर करून त्यांच्या भाषणाला आपली पसंती व्यक्त करीत होता. प्रतिनिधींचें स्वागत करून व हें खास अधिवेशन विशिष्ट कारणाकरितां भरविलें आहे असें सांगून पटेल पुढें म्हणाले, " आज काँग्रेसवर जी जबाबदारी येऊन पडली आहे तशी तिच्या स्थापनेपासून म्हणजे गेलीं तेहतीस वर्षें पडली नव्हती. या ठिकाणीं तुम्ही ज्या गोष्टीचा निर्णय करण्यासाठीं जमलां आहांत त्या निर्णयामुळें आपल्या मातृभूमीचें भवितव्य ठरणार आहे. हें भवितव्य यापुढील निदान अर्धशतकाचें तरी आहे. काँग्रेस आतां वटवृक्षासारखी विस्तार पावूं लागली आहे. १८८५ सालीं याच शहरीं नाताळांत जेव्हां पहिली काँग्रेस भरली तेव्हां प्रतिनिधींची संख्या पुरती शंभर देखील नव्हती. लॉर्ड डफरीन यांनीं तर "मूठभर लोक" म्हणून तिची थट्टाच केली. परंतु तिनें आपलें कार्य न डगमगतां अखंड चालू ठेवलें आणि आतां तिला बहुजनसमाजाचा जोराचा पाठिंबा मिळाला आहे. आतां काँग्रेस 'जी हुजुरां'ची राहिली नसून तिच्याकडे आतां न्यायाधीशाचें काम आलें आहे. हिंदुस्थानला नक्की काय पाहिजे याचा निर्णय आतां

काँग्रेसनें करायचा आहे. काँग्रेस ही प्रातिनिधिक स्वरूपाची आहे. असें असून आमच्यांतील कांहीं लोक तींतून योग्य कारण नसतांना फुटून गेले ही फार वाईट गोष्ट झाली. परंतु या त्यांच्या कृतीमुळें आतां आपली जबाबदारी फारच वाढली आहे. आम्हीं सुधारणांची योजना अजिबात टाकूनच दिली असती तर त्यांच्या फुटून निघण्यांत कांहीं तरी अर्थ राहिला असता. पण तेवढीहि त्यांनीं वाट पाहिली नाहीं. काँग्रेस काय निर्णय करणार आहे हें समजण्यापूर्वीच ते तिला शाप देऊन मोकळे झाले आहेत, आणि आतां आपली निराळी बैठक भरविणार आहेत. राजकारणांत देवाण घेवाण, सयुक्तिकता, सबळता, या सर्वच गोष्टी सर्वांनीं पाहाव्या लागतात. परंतु या गोष्टी त्यांनीं आमच्याबरोबर मनावर न घेतल्यामुळें आमचा मार्ग आतां आम्हींच पाहिला पाहिजे. हा रिपोर्ट आम्हांला बराचसा मान्य नाहीं. त्यांना तो थोडासाच अमान्य आहे; हा त्यांच्या आमच्यांत तीव्रतेचा फरक आहे. एकूण हा रिपोर्ट कोणालाहि सर्वस्वीं मान्य नसतां त्याच्यासाठीं वाद माजवा, फूट पडावी हें आश्चर्य आहे.

## सध्या इतक्या गोष्टी ताबडतोब पाहिजेत

यानंतर कोणते महत्त्वाचे फरक सुधारणेच्या योजनेंत झाले पाहिजेत तें सांगतांना पटेल म्हणाले, "जादा काँग्रेसनें ज्या सुधारणा नवीन कायद्यांत सुचवाव्या त्या या, कीं भारतमंत्र्याचें कौन्सिल मोडून टाकावें व त्यांना दोन मदतनीस द्यावे व त्यांतला एक हिंदी असावा. हिंदुस्थानला तिजोरीचा ताबा द्यावा. महत्त्वाच्या प्रांतांना पूर्ण स्वराज्य आधीं द्यावें. कसेंहि करून दहा वर्षांत सर्व प्रांतांना पूर्ण स्वायत्तता मिळावी. प्रांतिक कौन्सिलांत $\frac{4}{5}$ प्रतिनिधी लोकनियुक्त असावे. हिंदुस्थानच्या सरकारच्या कौन्सिलांत प्रथम प्राप्तीवरील कर, मीठ, स्टँप, पोस्ट, तार व रेल्वे वगैरे खातीं लोकप्रतिनिधींच्या हातांत असावीं. एकंदरींत वीस वर्षांत हिंदुस्थानला संपूर्ण जबाबदारीचें स्वराज्य मिळेल असें अभिवचन देण्यांत यावें. वरिष्ठ कौन्सिलांत $\frac{3}{4}$ लोकनियुक्त प्रतिनिधि असावेत व त्यांना बजेटावर नुसती चर्चा करण्याचा मर्यादित हक्क न ठेवतां तें मतांस घालून मंजूर करण्याचा हक्क

द्यावा. राज्यकारभाराची चौकशी करण्याकरितां जें कमिशन नेमायचें त्यांत हिंदी सभासद असावेत. हिंदुस्थानाला स्वसंरक्षण करतां येईल अशा-विषयीं कांहीं तरी योजना करण्यांत यावी." जागेच्या अभावीं पटेलांच्या भाषणाचा येथें अगदीं थोडक्यांत सारांश दिला आहे. पटेलांनीं ज्या ज्या सुधारणा सुचविल्या त्यांना अनुसरूनच जादा कॉंग्रेसनें ठराव पास करून आपलें धोरण जाहीर केलें. लोकमान्य टिळक यांनीं सुधारणांची योजना असमाधानकारक व निराशाजनक आहे असें जें म्हटलें होतें त्याचाहि अनुवाद करून हिंदुस्थान आज स्वराज्याला लायक आहे असें कॉंग्रेसनें घोषित केलें; रौलेट कमिटीच्या रिपोर्टाचा निषेध करण्यांत आला व शेवटीं विलायतेस शिष्टमंडळ पाठविण्याकरितां एक कमिटी नेमण्यांत आली. शिष्टमंडळाचा विलायतेस जाण्याचा उद्देश असा, कीं त्यांनीं तेथें जाऊन रिपोर्टांत इष्ट त्या सुधारणा घडवून आणण्याचे शक्य ते सर्व प्रयत्न करून पाहावे. कॉंग्रेसच्या डिसेंबरांतील दिल्लीच्या अधिवेशनांत जादा कॉंग्रेसचा ठराव मंजूर करण्यांत आला. पटेलांना कॉंग्रेसतर्फे विलायतेस पाठवायच्या शिष्टमंडळाचे सेक्रेटरी नेमण्यांत आलें व त्यांनाच कॉंग्रेसचे जनरल सेक्रेटरीहि नेमण्यांत आलें.

## काळीं बिलें

दिल्लीची कॉंग्रेस २६ डिसेंबरला सुरू झाली व त्यापूर्वी ११ नोव्हेंबरला महायुद्ध थांबलें. दोस्त राष्ट्रांचा पूर्ण विजय झाला व ब्रिटिश आणि अमेरिकन मुत्सद्द्यांनीं स्वयंनिर्णयाच्या तत्त्वाची घोषणा केली. या घोषणेनुसार सुधारणा कायद्यांचा विचार दिल्ली कॉंग्रेसमध्यें झाला हें योग्यच झालें. हिंदी मुत्सद्द्यांना वाटलें, कीं आतां आगामी सुधारणासंबंधीं शांतपणें अधिक विचार करतां येईल. परंतु दिल्ली कॉंग्रेसनंतर देशांत शांतता राहिली नाहीं. रौलेट बिलांनीं १९१९ फेब्रुवारीमध्यें आपलें डोकें वर काढलें. या कुप्रसिद्ध रिपोर्टांत क्रांतिकारक चळवळींशीं संबंध असलेल्या कटांचें स्वरूप, त्यांच्या बंदोबस्तांत येणाऱ्या अडचणी व त्या दूर करण्याकरितां उपाय यांचा विचार केलेला होता. या बाबतींत रिपोर्ट करण्याला जी चौकशी कमिटी नेमण्यांत

आली व जिनें सुचविल्याप्रमाणें बिलें वरिष्ठ कौन्सिलांत आलीं त्या कमि-टीचा अध्यक्ष सर सिडने रौलेट हा होता व म्हणून बिलांना रौलेट बिलें असें म्हटलें आहे. हीं दोन वेगळीं बिलें होतीं. त्यापैकीं पहिलें बिल हिंदुस्थान सरकारनें मध्यवर्ती कौन्सिलपुढें तारीख १ फेब्रुवारीला आणलें. या बिलाला विरोध करणारे पहिले बिनसरकारी सभासद म्हणजे पटेलच होते. पटेल त्या वेळीं दिल्लीला श्री. के. व्ही. रंगास्वामी आयंगार यांचे पाहुणे होते. या बिलाला हाणून पाडण्यास कोणते मार्ग शोधून काढावेत याचा विचार कर-ण्यांतच त्यांचा बहुतेक वेळ निघून जाई. या बिलानें व्यक्तिस्वातंत्र्यावर घाला येणार होता. स्वाभाविक हक्कांवर गदा येणार होती. या बिलांत नमूद केलें होतें, कीं अराजक गुन्ह्यांची चौकशी हायकोर्टाच्या तीन जज्जांसमोर तावडतोब करण्यांत यावी; या कोर्टाविरुद्ध अपील करण्याचा हक्क नसावा. बादशहाविरुद्ध गुन्हा करण्याचा संशय आलेल्या इसमांकडून जामीन घेणें, त्यांना एकाद्या विशिष्ट जागीं राहाण्यास लावणें, निर्दिष्ट केलेलीं कृत्यें कर-ण्यास मनाई करणें, सार्वजनिक सुरक्षिततेला बाध येईल अशा कृत्यांशीं संबंध असलेल्या इसमाला पकडण्याचा अधिकार स्थानिक स्वराज्य संस्थांना देणें, भयंकर कृत्यें करणाऱ्या इसमाला तुरुंगांत डांबून ठेवणें इत्यादि अधिकारांचा समावेश या पहिल्या बिलांत केला होता. दुसरें बिल गाळून टाकण्यांत आलें व पहिलें बिल मांडण्यांत आलें. या बिलाला बिनसरकारी अशा बहुतेक सभासदांचा प्रथमपासून विरोध होता, पण लवकरच या विरोधाला कुठून कशी गळती लागली कोणास ठाऊक! सरकारनें भेदनीति करून तिघां सभासदांना या विरोधाच्या फळींतून फोडण्याचा प्रयत्न केला. व त्यांत बरेंच यश येईल अशी सरकारला आशा वाटूं लागली! दिल्लींतल्या एका वर्तमानपत्रकाराला सरकारच्या या कृत्याचा सुगावा लागला! व त्यानें पटेल, खापर्डे, अयंगार आणि कामिनीकुमार चंदा या सभासदांना विचा-रून कलकत्त्याच्या अमृतबझार पत्रिकेंत ही बातमी प्रसिद्ध केली! अर्थात् वरकरणी विरोधाचा आव आणून आंतून सरकारच्या भेदनीतीला बळी पडणारे ते तीन सभासद चांगलेच वरमले व त्यांनीं बिलाला विरोध पूर्वी-प्रमाणें कायम ठेवला. परंतु लोकमताची सरशी होऊं नये अशीच त्या

वेळच्या कौन्सिलची घटना असल्यामुळें हें बिल सरकार पास करून घेणार हें ठरल्यासारखेंच होतें. म्हणन त्यावर पटेलांनीं एक तोड काढून ती कितपत यशस्वी होते हें पाहाण्याकरितां तारीख ६ फेब्रुवारीला कौन्सिलांत या बिलावर अशी एक उपसूचना आणली, कीं हें कायदेमंडळ बरखास्त झाल्यानंतर सहा महिन्यांचा अवधि जाईपर्यंत या बिलाचा विचार रहित करावा. या उपसूचनेवर भाषण करतांना पटेल म्हणाले, " १९१९ च्या सुधारणा कायद्यानें जीं कौन्सिलें अस्तित्वांत येणार आहेत त्यांनीं या बिलाचा पाहिजे तर विचार करावा. याचा अर्थ असा नाहीं, कीं सध्याच्या कौन्सिलास याचा विचार करतां येणार नाहीं. पण हें चालू कौन्सिल स्वतंत्र रीतीनें कांहींच करूं शकत नाहीं. सरकार त्याला जबाबदार नाहीं. नवीन सुधारणांबद्दल सरकारला लोकांत जर विश्वास उत्पन्न करायचा असेल तर या शांततेच्या काळांत अशा बिलाचा विचार करूं नये. मी हें चक्क सांगतों कीं सारा देश या बिलाच्या पूर्णपणें विरुद्ध आहे. सुधारणा देऊं केल्यानें देशांत सरकारबद्दल जें कांहीं विश्वासाचें वारें उत्पन्न झालें असेल तें या बिलानें पार नाहींसें झालें आहे व हें बिल पास झालें तर देशांत भयंकर व अभूतपूर्व खळबळ उडाल्याशिवाय राहाणार नाहीं अशी माझी पक्की खात्री आहे. अशा वेळीं हें बिल आणण्यांत सरकारनें भयंकर चूक केली आहे. कौन्सिलांत या वेळीं वास्तविक लोकहिताच्या गोष्टी ठरविल्या पाहिजेत त्या सोडून अशा प्रकारचें हें बिल मांडलें तरी कसें याचें मला राहून राहून आश्चर्य वाटतें ! महायुद्ध थांबलें आहे, जगाला शांतता देण्यासाठीं परिषद चालू आहे, नवीन सुधारणांचा गाजावाजा होत आहे. अशा वेळीं हें बिल आणणें म्हणजे समयसूचकतेचा अभाव प्रकट करणें होय! सरकारनें मुळीं हें बिल कौन्सिलापुढें आणायलाच नको होतें. " पटेलांनीं बिलाची वाक्यन् वाक्य छाननी करून त्याला कसून विरोध केला. त्यांनीं त्या वेळीं दाखविलेलें धैर्य, चिकाटी आणि कळकळ पाहून सर्व सभासद थक्क झाले. त्या दिवशींची बैठक त्यांच्या भाषणामुळें पहाटे एक वाजेपर्यंत लांबली! अखेर हें बिल सरकारी बहुमतानें पास झालें.

## भविष्य खरें ठरलें?

वास्तविक या बिलाचा उपयोग सरकारनें कधीं केलाच नाहीं. पण बिल पास करून त्याचा उपयोग करण्याची धमकी देऊन ठेवली हें काय थोडें झालें? या काळ्या बिलासंबंधीं पटेलांनीं कौन्सिलांत वर्तविलेलें भविष्य खरें ठरलें. महात्मा गांधींनीं या बिलाविरुद्ध सत्याग्रहाची प्रचंड चळवळ देशांत सुरू करण्याचें योजिलें. ता. १८ मार्च रोजीं त्यांनीं सत्याग्रहाची शपथ जाहीर केली, कीं हीं दोन्ही रौलेट बिलें अन्यायमूलक आहेत म्हणून या बिलांना कायद्याचें स्वरूप प्राप्त झाल्यास तीं रद्द होईपर्यंत आम्ही या कायद्यांचा व या कामाकरितां नेमलेली कमिटी यापुढें ठरवील त्या कायद्यांचा विनयपूर्वक भंग करूं मात्र या झगड्यांत सत्य सोडणार नाहीं आणि कोणाच्या जीविताला किंवा मालमत्तेला धक्का लागेल असें अत्याचाराचें कृत्य आम्ही करणार नाहीं. त्याप्रमाणें एप्रिलमध्यें सत्याग्रहाची मोहीम सुरू झाली. या वेळीं हिंदुमुसलमानांची देशांत एकी होती आणि शांततेचा भंग झालेला नव्हता. तरी सरकारनें पंजाबांत निष्कारण हत्याकांड जारी केलें. हिंदुस्थानांत ही घडामोड चालू असतां इंग्लंडमध्यें लॉर्ड मेलबोर्न यांच्या अध्यक्षतेखालीं जॉईंट पार्लमेंटरी कमिटीचें काम सुरू झालें होतें. आपलें म्हणणें या कमिटीपुढें मांडण्याकरितां हिंदुस्थानांतून अनेक शिष्टमंडळें इंग्लंडला गेलीं होतीं. त्यापैकीं काँग्रेसच्या शिष्टमंडळांत पटेलांचा समावेश होता. आणि तेच काँग्रेसचे जनरल सेक्रेटरी असल्यानें शिष्टमंडळाचें सर्व काम त्यांच्याच नांवानें करण्यांत आलें. पटेलांनीं या वेळीं विलायतेंत जी कामगिरी केली ती पुढील स्वतंत्र प्रकरणांत सांगू. येथें शेवटी एवढें सांगायचें, कीं काँग्रेसच्या शिष्टमंडळाशिवाय दोन होमरूल लीगचीं शिष्टमंडळेंहि विलायतेला गेलीं, आणि एक नेमस्तांचें शिष्टमंडळ गेलें. एका होमरूल लीगच्या शिष्टमंडळाचे अध्यक्ष लोकमान्य टिळक होते. तसेंच टिळकांचा समावेश काँग्रेसच्या शिष्टमंडळांतहि केलेला होता त्यामुळें टिळकांची होमरूल लीग व काँग्रेस यांच्या शिष्टमंडळांनीं विलायतेंतील बहुतेक काम सहकार्यानें केलें. बिझांटबाई ज्याच्या अध्यक्ष होत्या तें दुसरें होमरूल लीगचें शिष्टमंडळ व नेमस्तांचें शिष्टमंडळ यांचा मात्र टिळक व काँग्रेस यांच्यांशीं मतभेद होता. या सर्व शिष्टमंडळाच्या मागण्या एकमुखी व्हाव्या याबद्दल प्रयत्न करण्यांत आले होते. परंतु त्याविषयीं उल्लेख पुढील प्रकरणांतच ओघानें होईल.

# विलायतेंतील हालचाली

**विघ्नैः पुनः पुनरपि प्रतिहन्यमानाः ।**
**प्रारब्धमुत्तमजना न परित्यजन्ति ॥**

दिल्लीच्या कॉंग्रेसचे ठराव हातांत घेऊन कॉंग्रेस शिष्टमंडळापैकीं दोन प्रतिनिधि म्हणजे पटेल व केळकर हे मुंबई बंदरांतून 'मॅनोरा' नामक बोटीनें तारीख २९ एप्रिलला विलायतेस जाण्यास निघाले. नेमस्तांपैकीं ना. श्रीनिवासशास्त्री व पं. हृदयनाथ कुंझरू हेहि त्याच बोटीनें निघाले. या चौघांना मिळून एकच खोली देण्यांत आली. चौघांचें सामानहि त्याच खोलींत. पण बोट निघाल्यावर विठ्ठलभाई पटेलांचें सामान गेलें तें दहा दिवसपर्यंत सांपडलेंच नाहीं. ना. शास्त्री यांचीहि एक पेटी चुकून राहिली. केळकरांचें सामान मात्र रगड होतें व त्याचा आयत्या वेळीं उपयोग झाला. खोलींतले खालचे दोन बाक पटेल केळकरांना व वरचे दोन बाक शास्त्री कुंझरूंना मिळाले. शास्त्री कुंझरू थट्टेनें या दोघांना म्हणत, "आम्ही नेमस्त पण पाहा तुम्हां जहालांच्या डोक्यावर चढलों आहों कीं नाहीं ?" त्यावर पटेल—केळकर उत्तर देत कीं "वर खालीं हा भेद आम्ही इथें मानीतच नाहीं. फक्त इंग्रजींतील म्हणीप्रमाणें 'आम्ही एकाच बोटींतले आहोंत' एवढेंच आम्हीं मानतों." या बोटीनें कॉंग्रेसच्या शिष्टमंडळापैकीं दिवाणबहादुर माधवराव आपल्या पुतण्यासह निघाले होते. तसेंच सत्यमूर्ति, डॉ. मेथा व डॉ. पेटीकाका हेहि हिंदी गृहस्थ या बोटीनें निघाले. या सर्वांचा गट एक असे. म्हणजे एकत्र येऊन संभाषणें व्हायचीं. पण यांत भिन्न मतांचे लोक असल्यानें राजकारणावरील चर्चा बहुतेक व्हायची नाहीं; व झाली तर ती लवकर आटपे. ही सारी मंडळी अखेर लंडन येथें २५ मेला सुखरूप येऊन पोंचली. टिळक यापूर्वीच चिरोल केसकरितां व सुधारणांसंबंधीं राजकीय चळवळ करण्याकरितां विलायतेला गेले होते. त्यांच्या बिऱ्हाडीं पटेल—केळकर उतरले. हें घर

सुंदर व सोईचें असून लिहिण्यावाचण्याचीं सर्व साधनें तेथें होतीं. युरोपियन नोकर होते ते हिंदी अन्नाचे दोन तीन पदार्थ चांगले तयार करीत.

दुसऱ्या दिवसापासून हिंदी मंडळी टिळक–पटेल–केळकरांच्या भेटीला येऊं लागली. इंग्लंडमध्यें असलेल्या ब्रिटिश कॉंग्रेस कमिटीचें धोरण राष्ट्रीय सभेशीं मिळतें नव्हतें, तें करण्याकरितां आपण यापूर्वी कसकशी खटपट केली तें टिळकांनीं सांगितलें; तेव्हां ते म्हणाले, "मीं कमिटीला विचारलें 'तुम्ही दिल्ली कॉंग्रेसचे ठराव मानतां काय आणि त्याप्रमाणें तुम्ही त्या ठरावांकडे देशांतील लोकांचें लक्ष वेधेल असं केलं आहे काय! तसेंच मी त्यांजकडे अशीहि तक्रार केली कीं 'तुम्ही कॉंग्रेसच्या ठरावाप्रमाणें वागत नाहीं आणि तुम्ही जें 'इंडिया' हें वर्तमानपत्र काढतां त्यांतहि तुम्ही कॉंग्रेसचें धोरण ठेवीत नाहीं. तुम्हीं जर कॉंग्रेसच्या कार्यक्रमाप्रमाणें व्यवस्था केली नाहीं तर ती आम्हांला करावी लागेल," टिळकांच्या भाषणावर कॉंग्रेस कमिटीच्या त्या सभेंत दोन तास चर्चा चालली होती. अखेर कमिटीचे जे तात्पुरते अध्यक्ष होते त्यांनीं सांगितलें कीं "सध्या आम्हीं कांहींच न करण्याचें ठरविलें आहे! कॉंग्रेसचें शिष्टमंडळ आलें म्हणजे पाहूं!" कमिटीनें टिळकांना या रीतीनें निराश केलें.

## इंडिया हाऊसनेंहि पानें पुसलीं!

पटेल हे कॉंग्रेसच्या शिष्टमंडळाचे सर्वाधिकारी असल्यामुळें त्यांनीं इंग्लंडमध्यें पाय ठेवल्यावर दुसऱ्याच दिवशीं म्हणजे ता. २६ मे रोजीं ब्रिटिश कॉंग्रेस कमिटीच्या अध्यक्षांना लिहिलें, कीं "आम्ही हिंदी राष्ट्रीय सभेतर्फे येथें आलों आहोंत. तुम्हांला व इतर सभासदांना कॉंग्रेस शिष्टमंडळातर्फे भेटण्याची संधि मला लवकर द्यावी." या पत्रास अनुकूल उत्तर येतांच पटेल कमिटीच्या ऑफिसांत गेले. व 'इंडिया' पत्राचे संपादक मि. पोलॉक आणि सेक्रेटरी मि. हॉल यांना भेटले. पटेलांनीं पोलॉकना विचारलें, "तुमची कमिटी आमच्याशीं सहकार्य करील कां? तसेंच तुमच्या ऑफिसमधल्या खोल्या शिष्टमंडळाच्या ऑफिसकरितां तुम्ही देऊं शकाल कां?" पोलॉक म्हणाले, "तुम्ही कमिटीच्या अध्यक्षांना या बाबतींत लिहा."

लगेच पटेलांनीं कमिटीचे अध्यक्ष डॉ. क्लार्क यांना त्याप्रमाणें लिहिलें. डॉ. क्लार्ककडून लेखी निरोप आला, कीं येत्या सोमवारीं म्हणजे ता. २ जूनला आमची कमिटी भरेल त्या दिवशीं तीन प्रहरीं चार वाजतां आम्ही काँग्रेसच्या शिष्टमंडळाची भेट घेऊं, व मग काय तें ठरवूं. त्याप्रमाणें सोमवारीं कमिटी भरली. कमिटीच्या सभासदांशिवाय, टिळक, पटेल, केळकर, माधवराव, सत्यमूर्ति हे काँग्रेसतर्फे आले होते. सभेंत पटेलांनीं कमिटीला शिष्टमंडळाच्या वतीनें सांगितलें, कीं "सुधारणांच्या सिलेक्ट कमिटी-पुढें साक्षी देण्याच्या कामीं तुम्हीं शिष्टमंडळाला मदत करावी; तसेंच बिलांत दुरुस्त्या करणें, पार्लमेंटच्या सभासदांना, भारतमंत्र्यांना व इतर अधिकाऱ्यांना भेटणें, जाहीर सभा भरविणें, पत्रकें प्रसिद्ध करणें वगैरे गोष्टींत तुमचें सहकार्य आम्हांला पाहिजे." कमिटीच्या ऑफिसांतली जागा शिष्टमंडळाच्या ऑफिसकरितां द्यावी अशी पटेलांनीं विनंती केली व शेवटीं कमिटीला विचारलें, कीं "दिल्ली काँग्रेसच्या ठरावाप्रमाणें वागण्यास तुमची कमिटी तयार आहे कीं नाहीं तें आम्हांस सांगा." तेव्हां अध्यक्ष डॉ. क्लार्क म्हणाले, "दुर्दैवानें काँग्रेसमध्यें दुफळी झाल्यापासून आमच्या कमिटींतहि मतैक्य नाहीं. स्वतंत्र संस्था म्हणून कमिटी हिंदुस्थानच्या हिताचा विचार करील. आम्ही तुम्हांला एरवीं शक्य ती मदत करूं. पार्लमेंटचे सभासद व इतर इंग्लंडची पुढारी मंडळी यांची भेट घेण्याच्या कामांत तुम्हांला साहाय्य होईल. सकाळीं दहा ते दुपारीं दोन वाजेपर्यंत तुम्हांला कमिटीच्या खोल्या वापरायला मिळतील." याप्रमाणें ठरल्यानंतर दुसऱ्याच दिवसापासून शिष्ट-मंडळाची कचेरी कमिटीच्या जागीं गेली. हें झालें. पण महत्त्वाच्या गोष्टींत मात्र कमिटीनें चालढकलच चालवली होती. वास्तविक जर कमिटीला काँग्रेसचे ठराव मानायचे नव्हते तर तिनें ब्रिटिश काँग्रेस कमिटी हें नांव तरी स्वतःला चिकटवून घ्यावें कशाला? या नांवावरूनहि वाद झालाच. नांवावरून घोटाळा होतो तर तें बदलूनच टाकावें असें म्हणण्यांत येऊं लागलें. पण यावर अध्यक्ष डॉ. क्लार्क आग्रहानें सांगूं लागले कीं "ब्रिटिश काँग्रेस कमिटी ही एक स्वतंत्र कमिटी आहे, हिंदुस्थानला जास्तींत जास्त स्वराज्याचे हक्क कसे मिळतील हें तिचें पाहाणें असतें." व एवढ्या-

8122

करितां त्यांनीं पटेल आदि प्रतिनिधींना सांगितलें कीं "हिंदुस्थानांतून तुमच्यासुद्धा जीं शिष्टमंडळें आलीं आहेत त्यांनीं मिळतें घेऊन एकमुखी मागणी ठरवावी. म्हणजे मग कमिटीला विचार करतां येईल!" अर्थात् कुणीकडून तरी कमिटीला आपला एकांडी शिलेदारी बाणा दाखवायचा होता आणि तो सिद्धीस जाण्यासाठीं साऱ्या शिष्टमंडळांची मिनतवारी तिला पाहिजे होती! वास्तविक कमिटी नेमस्तांची पक्षपाती होती. परंतु कमिटीला एवढें समजलें नसेल असें म्हणवत नाहीं, कीं एकमुखी मागणी करायची तर ती हिंदुस्थानांतच झाली असती! ती करायला विलायत गांठण्याचें काय कारण होतें? अर्थात् वरील क्लार्कसाहेबांच्या म्हणण्याला पटेलांनीं योग्य तेंच उत्तर दिलें, कीं "तुम्हांला नेमस्तांची भेट घ्यायची असेल तर आमची कांहीं हरकत नाहीं. परंतु तुम्हांला इतकेंच सांगूं इच्छितों कीं सध्यां ते काँग्रेसमध्यें नाहींत आणि म्हणून कमिटीला आपल्या अधिकारांत त्यांच्याशीं कांहीं बोलणें करतां येत नाहीं." कमिटीला पटेलांचें म्हणणें पटलें आणि अखेर नेमस्तांची अनौपचारिक रीतीनेंच भेट घेण्याची कमिटीनें इच्छा व्यक्त केली. कमिटीनें निर्णय मात्र कांहींच केला नाहीं. याप्रमाणें कमिटी व काँग्रेस शिष्टमंडळ यांच्यांतील वाटाघाटींना तोंड लागलें असतांना पटेलांनीं त्याबरोबरच माँटेग्यूसाहेबांशींहि पत्रव्यवहार सुरू केला. ता. २८ मेच्या पत्रांत पटेलांनीं भारतमंत्री मि. माँटेग्यू यांना लिहिलें, कीं सुधारणा बिलाबद्दल काँग्रेसचें म्हणणें काय आहे तें ब्रिटिश सरकारपुढें व लोकांपुढें मांडण्यासाठीं दिवाण माधवराव, केळकर व मी असे तिघे काँग्रेसच्या शिष्टमंडळापैकीं येथें आलों आहों. तरी आपण शिष्टमंडळांतील प्रतिनिधींस व्यक्तिशः किंवा एकदम सर्वांना मुलाखत द्यावी अशी विनंती आहे. त्यावर माँटेग्यूसाहेब ता. १ जूनला शिष्टमंडळाची भेट इंडिया ऑफिसमध्यें घेतील असें पटेलांना लिहून आलें. त्यापूर्वी माँटेग्यूसाहेबांनीं हाउस ऑफ कॉमन्सच्या भोजनगृहांत सर्व हिंदी पाहुण्यांना मेजवानी दिली होती. त्यांत जेवणाच्या आधीं व नंतर पार्लमेंटच्या प्रचंड गच्चीवर काँग्रेस व नेमस्त यांच्या प्रतिनिधींनीं कित्येक युरोपियन गृहस्थांशीं हसत खेळत खुलासेवार चर्चा केली. ठरल्याप्रमाणें ११ जून १९१९ रोजीं काँग्रेसचें शिष्टमंडळ

मॉँटेग्यूसाहेबांच्या भेटीस गेलें; त्यांनीं त्यांच्यापुढें कॉंग्रेसची बाजू मांडली व सुधारणेच्या योजनेंत कसकशा दुरुस्त्या पाहिजेत तें मॉँटेग्यूसाहेबांपुढें स्पष्ट केलें. मॉँटेग्यू म्हणाले, "तूर्त प्रांतांना पूर्ण स्वातंत्र्य देतां येत नाहीं म्हणून आम्हीं द्विदल राज्यपद्धतीचा मार्ग काढला आहे." त्यावर पटेल म्हणाले, "तसें न करतां पुढारलेल्या प्रांतांना प्रथम पूर्ण स्वातंत्र्य द्यावें. द्विदल राज्यपद्धति अव्यवहार्य ठरेल." शिष्टमंडळाचें म्हणणें मॉँटेग्यूसाहेबांना फारसें पटलें नाहीं. तरीपण बोलण्यांत मॉँटेग्यू बरे वाटले.

## पार्लमेंटांत मॉँटेग्यूंची स्पष्टोक्ति

पटेल विलायतेंत गेल्यानंतर सुधारणा बिलाचीं दोन वाचनें पार्लमेंटांत झालीं. त्यावेळीं पटेल सभागृहाच्या गॅलरींत प्रेक्षक वर्गात बसत. गॅलरींत प्रेक्षकांची गर्दी असायची, पण खालीं सभासद मात्र दहा किंवा बारा! व तेहि सारे बिलाला अनुकूल! पहिल्या वाचनाला तर प्रतिपक्षी कोणीच हजर नाहीं! मॉँटेग्यूसाहेब मात्र एखाद्या अफाट जनसमुदायासमोर बोलावें तसें जोरानें बोलत! सुधारणेसारख्या महत्त्वाच्या विषयासंबंधीं ब्रिटिश लोकांची ही आस्था! बिलाच्या पहिल्या वाचनाच्या वेळीं मॉँटेग्यूनें हिंदुस्थानच्या लोकांना दिलेलें वचन पाळण्याचें महत्त्व जोरजोरानें प्रतिपादन केलें. हिंदुस्थानांतील अस्वस्थता नाहींशी करण्याकरितां साऱ्या गोष्टी सात्त्विक खेळीमेळीनें झाल्या पाहिजेत असें त्यांनीं सांगितलें. पुढें सुमारें दोन आठवड्यांनीं म्हणजे तारीख १२ जूनला बिलाचें दुसरें वाचन झालें. त्यावेळींहि पटेल हजर होते या प्रसंगाचें चक्षुर्वैसत्यं असें वर्णन पटेलांचे सहकारी केळकर यांनीं केलें आहे. ते लिहितात, "मॉँटेग्यूसाहेब आपलें भाषण कागदावरून न वाचतां स्मरणानें व स्फूर्तीनें बोलतांना प्रत्येक शब्दावर जोर देतात; आपणांपुढील पेटी (ट्रेझरी बॉक्स) वर मधून मधून बुक्की वळून ठोसे लगावतात; मधून मधून स्मित करितात; त्यांचा आवाज मोठा असून वक्त्याचे पुष्कळसे गुण त्यांच्या ठिकाणीं आहेतच; पण रिकाम्या बाकांपुढें उत्साहानें बोलण्याचा गुण साध्या वक्त्यामध्यें नसतो तोहि त्यांच्यामध्यें आहे." मॉँटेग्यूसाहेबांनीं जोरानें सांगितलें, कीं "हिंदुस्थानच्या किंवा

इंग्लंडांतल्या कोणत्याच सिव्हिल सर्व्हिसच्या हातून आजवर कोणतीहि सुधारणा मिळाली नाहीं व पुढेंहि मिळायची नाहीं. या सिव्हिल सर्व्हंटांचा उपयोग सांगकाम्याप्रमाणेंच खरा होतो. राजकीय सुधारणाची कल्पना बिनसरकारी लोकांनाच सुचायची व त्यांच्याकडूनच त्या फलद्रूप होतात." या मॉंटेग्यूच्या विधानांनीं सभागृहांत बरीच खळबळ उडाली! बिलाचें काम रात्रीं १२ वाजतां संपलें. नंतर बिलाचें वाचन लॉर्डांच्या सभेंत होऊन तें सिलेक्ट कमिटीकडे रवाना झालें. या सिलेक्ट कमिटीनें साक्षी घेण्याचें कामहि १६ जुलैपासून सुरू केलें.

## इंडिया पत्राचें धोरण!

सिलेक्ट कमिटीपुढें साक्षी देण्यापूर्वीं कॉंग्रेस शिष्टमंडळाला प्रथम दोन गोष्टी साधायच्या होत्या. इंग्लंडांत स्वतःला कॉंग्रेसचें म्हणविणारें जें इंडिया नांवाचें वर्तमानपत्र प्रसिद्ध होत असे त्याला नेमस्तांच्या धोरणा-वरून कॉंग्रेसच्या धोरणावर आणायचें ही एक; व दुसरी म्हणजे ब्रिटिश कॉंग्रेस कमिटीला कॉंग्रेसच्या धोरणाप्रमाणें वागायला लावायचें. कमिटीनें तर अशी बढाई मारली होती, कीं कमिटीहि हिंदुस्थानच्या हिताचा विचार करणारी अशी एक पक्षनिरपेक्ष संस्था आहे. परंतु त्यावर पटेलांनीं त्यांना जें उत्तर दिलें होतें त्याचा उल्लेख पूर्वीं आलेलाच आहे. त्यानंतर कमिटीनें कॉंग्रेस शिष्टमंडळ वगळून नेमस्त व बिझांट बाईच्या शिष्टमंड-ळांना १८ जूनला मुलाखत दिली. तींत नेमस्तांचे प्रतिनिधि सुरेंद्रनाथ बानर्जी यांनीं कमिटीला सांगितलें कीं "आमचा सुधारणा बिलाला पाठिंबा देण्याचा निश्चय झालेला आहे. अर्थात् मॉंटफर्ड रिपोर्टपेक्षां बिलांत ज्या कांहीं गोष्टी कमी आहेत त्या भरून काढण्याकरितां आम्ही कसून प्रयत्न करूं." त्यांनीं आणखी हें सांगितलें कीं "आम्हांला द्विदल राज्यपद्धति (डायार्की) पसंत आहे. पूर्ण प्रांतिक स्वराज्य मागणें आम्हांला इष्ट वाटत नाहीं!" बिझांट बाईनीं बानर्जींचीच साथ केली! झालें. कमिटीनें तर आतां निर्णयच केला कीं आलेल्या शिष्टमंडळांत एकी होणें शक्य नाहीं तेव्हां आतां पुढच्या बोलाचाली करा कशाला? परंतु या

निर्णयानें कॉंग्रेसचें शिष्टमंडळ डगमगणें शक्य नव्हतें. कमिटीला कॉंग्रेसचीच खरीखुरी प्रातिनिधिक संस्था करायची असें त्यांनीं ठरविलें व पटेलांनीं त्या खटपटीस सुरवात केली. प्रथम कॉंग्रेसच्या शिष्टमंडळानें असा एक ठराव पास करून घेतला कीं " इंडिया पत्र हें राष्ट्रीय सभेचें इंग्लंडांतील मुखपत्र म्हणून स्थापन झालें आहे. आणि म्हणून त्याला कॉंग्रेसनें वेळोवेळीं पैशाची मदत केली आहे. असें असतांना त्या पत्राचें धोरण कॉंग्रेसच्या ठरावांना अनुकूल नसतें ! म्हणून कमिटीला व त्या पत्राच्या चालकांना आम्ही कळवीत आहों कीं इतःपर इंडिया पत्रानें कॉंग्रेसच्याच धोरणाला संपूर्ण पाठिंबा दिला जाईल अशी तुम्हीं आम्हांला हमी द्यावी." हा ठराव रीतसर कमिटीकडे पाठविण्यांत आला. पुढें ४ जुलैला कमिटीची सभा झाली आणि तींत हा ठराव विचाराकरितां निघाला. परंतु सभेला हजर असलेल्यापैकीं भूपेंद्रनाथ बसू व बेझंट यांनीं मुळीं ठराव पुढें आणतांच येत नाहीं असें सांगितलें. त्यांचें म्हणणें असें कीं " कॉंग्रेसला काय, ती दर वर्षाला बदलेल ; तिला कमिटीला हुकूम करण्याचा कांहीं अधिकार नाहीं ! आतांपर्यंत इंडिया पत्राचें जें धोरण आहे तें नापसंत ठरविण्याला आम्हांला कांहींच कारण दिसत नाहीं ! म्हणून इंडियाचे संपादक जे पोलॉकसाहेब ते कमिटीच्या इच्छेप्रमाणें वागले तेंच बरोबर आहे ! " डॉ. रुदरफोर्ड साहेब यांनीं अशी मखलाशी केली, कीं " कमिटी ही सर्व पक्षांशीं स्नेहानें वागणारी आहे ; तिचा कोणाशींहि हेवादावा नाहीं आणि कॉंग्रेसच्या शिष्टमंडळाला हें पटावें म्हणून त्यांना एकदा फार तर कमिटीनें भेटीला बोलवावें ! " अखेर कांहीं एक निर्णय न होतां सभा विसर्जन पावली. परंतु पटेल एवढ्यानें स्वस्थ बसले नाहींत. त्यांनीं इंडिया पत्राच्या डायरेक्टरांना जागें करून त्यांच्याकडून ठराव पास करून घेतला कीं " यापुढें इंडिया पत्राच्या संपादकांनीं दिल्ली कॉंग्रेसच्या ठरावाला पाठिंबा देणारें धोरण ठेवलें पाहिजे." हा ठराव कमिटीकडे पाठविण्यांत आला व तिनें तारीख ११ जुलैच्या सभेंत त्याचा विचार केला. या वेळीं मात्र सभेनें डायरेक्टरांचा ठराव बहुमतानें मान्य केला. इतकें झालें तरी इंडियाचे संपादक पोलॉक यांनीं आपला हेकेखोरपणा सोडला

नाहीं व त्यांनीं पूर्वीप्रमाणें कॉंग्रेसच्या धोरणाला विसंगत असें इंडियांत लिहिणें चालू ठेवलें. अखेर शिष्टमंडळानें पोलॉकसाहेबांना संपादकत्वाचा राजीनामा देणें भाग पाडलें! त्यानंतर मिस् नॉर्मेंटन व केळकर हे इंडियाचे संपादक व सहसंपादक झाले.

## ब्रिटिश कॉंग्रेस कमिटीचा अनागोंदी कारभार

ब्रिटिश कमिटीनें अद्यापि कॉंग्रेसच्या धोरणाला कागदोपत्रीं मान्यता दिली नव्हती. ती तिनें देणें अवश्य होतें व त्या उद्योगाला शिष्टमंडळ लागलें. वास्तविक ब्रिटिश कमिटीचे एक सभासद श्री. पारीख यांनीं यापूर्वी कमिटींत एक सूचना आणली होती, कीं टिळक माधवराव, खापर्डे, पटेल, केळकर आणि सत्यमूर्ति यांना त्यांच्या इंग्लंडच्या मुक्कामांत कमिटीचे सभासद म्हणून निवडावें. पण या सूचनेला कोणीं दुजोरा दिला नाहीं. मात्र डॉ. रुदरफोर्ड यांच्या सूचनेवरून एक ठराव पास झाला, कीं इंग्लंडांत आलेल्या पांच शिष्टमंडळांपैकीं प्रत्येकाचा कोणी तरी एक प्रतिनिधि कमिटींत नेमावा; पण त्याला मताचा अधिकार असणार नाहीं! या मिळमिळीत सूचनेला बेझंट व बसू यांनीं पाठिंबा दिला हें त्यांच्या आतांपर्यंत दिसून आलेल्या अवसानघातकीपणाला शोभूनच होतें! परंतु या ठरावामुळें पटेल व त्यांच्या सहकारी मंडळींना सात्त्विक संताप आला तर त्यांत नवल कसलें! पटेलांनीं शिष्टमंडळातर्फे कमिटीला दोन संणसणीत पत्रें पाठविलीं. त्यांपैकीं एकांत लिहिलें, कीं "कॉंग्रेसच्या शिष्टमंडळाशिवाय इतर शिष्टमंडळानांहि तुम्ही मान्यता देतां व प्रत्येकाचा एक प्रतिनिधि कमिटींत बसवा असें म्हणतां हें पाहून आम्हांला अतिशय आश्चर्य वाटतें. नेमस्त मंडळी कॉंग्रेसपासून फुटून निघाली आहेत हें तुम्हांला माहीत आहे. आणि त्यामुळें कॉंग्रेस कमिटी हें नांव धारण करणाऱ्या कोणत्याहि संस्थेला त्यांच्याशीं वाटाघाटी करण्याचा किंवा त्यांच्या गटाला मान्यता देण्याचा अधिकार रहात नाहीं. तेव्हां तुम्ही या गोष्टींचा विचार करावा. तुमच्यापैकीं ज्यांना आमचें म्हणणें पटत नसेल त्यांनीं कमिटीशीं यापुढें संबंध ठेवूं नये. बरें, नेमलेल्या प्रतिनिधींना कमिटींत मताधिकार

राहणार नाहीं असेंहि तुम्ही म्हणतां! या तुमच्या निर्णयाला आम्ही विरोध करतों. आमचें म्हणणें असें, कीं आमच्यापैकीं प्रत्येकाला कमिटींत बसून मत देण्याचा अधिकार असला पाहिजे! परंतु ज्या अर्थी तुम्हीं भलताच ठराव केला आहे. त्या अर्थी आमच्यापैकीं कोणीहि प्रतिनिधि तुमच्या कमिटींत बसण्यास तयार नाहीं हें कळविण्यास दिलगिरी वाटते. या माझ्या पत्रावर तुमचा काय निर्णय होतो तें लवकर कळवाल असा विश्वास आहे." आणखी एका पत्रांत त्यांनीं लिहिलें, कीं "दिल्ली काँग्रेसच्या ठरावांना पाठिंबा देण्यांत तुम्ही आमच्याशीं सहकार्य करणार कीं नाहीं याबद्दल मीं तुम्हांला मागेंच महिन्यापूर्वी विचारलें होतें. परंतु त्याला तुमच्याकडून अद्यापि कांहींच उत्तर आलें नाहीं! तरी आतां विलंब न लावतां उत्तर द्यावें अशी विनंती आहे. तुमच्यापैकीं ज्यांना काँग्रेसचें म्हणणें मान्य नसेल त्यांनीं कमिटीशीं संबंध न ठेवणेंच बरें."

या दोन्हीं पत्रांचा विचार कमिटीनें केला. या वेळींसुद्धा बिझांट बाई व इतर कांहीं सभासदांनीं या पत्रांवर आक्षेप घेतले. अखेर निर्णय झाला नाहीं. कारण कमिटीनें 'येरे माझ्या मागल्या' हा सूर न सोडतां आम्हीं पूर्णपणें स्वतंत्र आहोंत; कोणत्याहि शिष्टमंडळाचे आम्हीं पक्षपाती नाहीं असें प्रतिपादन केलें! त्यावर शिष्टमंडळानें पटेल व खापर्डे यांची एक कमिटी नेमली. उद्देश हा, कीं ब्रिटिश काँग्रेस कमिटीनें आतांपर्यंत जो अनागोंदी कारभार चालविला तो बंद पाडून कमिटीची कांहींतरी घटना ठरवावी; व त्या घटनेंत जे नियम होतील त्याप्रमाणेंच कमिटीनें वागावें. आतांपर्यंत कमिटीला कांहींच घटना नसल्यामुळें तिनें आतांपर्यंत काँग्रेसच्या मागण्यांना झिडकारलें होतें. म्हणून पटेल खापर्डे यांनीं एक घटना तयार करून ती कमिटीपुढें ठेवली आणि कमिटीला ती पसंत करायला लावली. या घटनेप्रमाणें ब्रिटिश काँग्रेस कमिटी ही काँग्रेसची ब्रिटनमधील एक कार्यकारी संस्था बनली आणि यापुढें काँग्रेसचेंच धोरण पाळण्यास ती बांधली गेली. आतां मात्र कमिटींत शिष्टमंडळाचें आसन स्थिर झालें. कारण मंडळाचे सारे सभासद घटनेप्रमाणें कमिटीचेहि सभासद होऊं शकले व कमिटीपुढें येणाऱ्या प्रश्नांचा निर्णय लावण्याचें काम बरेंचसें त्यांच्या हातांत आलें.

## शिष्टमंडळाचा तिहेरी उद्योग

हें रेंगाळणारें काम तडीस नेल्यानंतर शिष्टमंडळ आपल्या मुख्य उद्योगाला लागलें. हा उद्योग तीन प्रकारचा होता; सुधारणा कमिटीपुढें पुरावे तयार करून साक्षी देणें; भारतमंत्री व इतर अधिकाऱ्यांच्या भेटी घेणें व कॉंग्रेसच्या मागण्यांबद्दल ब्रिटिश जनतेचें मत अनुकूल करणें हीं तीं कामें होत. सुधारणा कमिटीचें काम लॉर्ड मेलबोर्न यांच्या अध्यक्षतेखालीं १६ जुलैला ११ वाजतां सुरू झालें, व एकामागून एक साक्षीदार सुधारणांसंबंधीं आपलें म्हणणें कमिटीपुढें मांडूं लागले. ही कमिटी हाऊस ऑफ लॉर्ड्सच्या कमिटीरूममध्यें बसली होती. कमिटीच्या प्रत्येक बैठकीस पटेल–केळकर हजर असत व साक्षी चालू असतांना टिपणें करून घेत. अध्यक्षांच्या उजव्या हाताला मॉंटेग्यूसाहेब, डाव्या हाताला लॉर्ड सिंह, एका बाजूस ओळीनें तीन सेक्रेटरी व दुसऱ्या बाजूस मॉंटेग्यूसाहेबांचे मदतनीस अशी कमिटी बसली होती. बैठकीला जागा बेताचीच. त्यामुळें प्रेक्षक वर्गाच्या बाकांवर जागा मिळाली नाहीं कीं पटेल–केळकर वर्तमानपत्रांच्या बातमीदारांत शिरत. दिसायला थाट मात्र न्यायकोर्टाचा होता!

कमिटी बसली त्याच्या दुसऱ्याच दिवशीं म्हणजे १७ जुलैला पटेलांनीं कमिटीला एक महत्त्वाचें पत्र लिहिलें, आणि त्यामुळें कमिटींत खळबळ उडाली. त्या पत्रांत पटेलांनीं लिहिलें, कीं " कॉंग्रेसचें शिष्टमंडळ हें साऱ्या हिंदुस्थानचें खरेंखुरें प्रातिनिधिक मंडळ आहे. हिंदुस्थानच्या हिताची जबाबदारी या शिष्टमंडळानेंच पत्करली आहे. अर्थात् इतर कोणत्याहि शिष्टमंडळापेक्षां, किंबहुना इतर सारीं शिष्टमंडळें एकत्र केलीं तरी त्या सर्वांपेक्षां आमच्या शिष्टमंडळाला अधिक हक्क असणें जरूर आहे म्हणून आमच्यापैकीं प्रत्येक सभासदाला तुम्हीं साक्ष देण्यास बोलावणें अवश्य आहे. दुसरें असें, कीं सुधारणा बिलाला हिंदुस्थानच्या लोकांनीं अनुमति द्यावी असें जर ब्रिटिश सरकारास वाटत असेल तर रौलेट बिल व त्यासारखीं इतर दडपशाहीचीं कृत्यें बंद करून त्यानें लोकांचें समाधान करावें. तसें झालें नाहीं तर सरकारच्या हेतूबद्दल लोक साशंक रहातील

आणि कमिटीचे सारे श्रम वायां जातील. म्हणून तुमच्या पुढें साक्ष देतांना तुम्हीं आमच्या प्रतिनिधींना हिंदुस्थानांत सरकारनें चालविलेल्या दडपशाहीचा उल्लेख करण्याची परवानगी द्यावी अशी विनंती आहे." त्यावर कमिटीनें पटेलांना त्यांच्या शिष्टमंडळांत किती प्रतिनिधी आहेत हें विचारलें. पण पटेलांनीं पत्राच्या दुसऱ्या भागांत हिंदुस्थानांत चालविलेल्या सरकारी दडपशाहीसंबंधीं जी विचारणा केली होती त्यावर मात्र कामिटी मूग गिळून बसली ! आणि 'पुढें' येणारी कोणती साक्ष विचारांत घ्यायची, कोणती नाहीं हें कमिटी ठरवील असें उडवाउडवीचें उत्तर दिलें ! अखेर कॉंग्रेस शिष्टमंडळापैकीं फक्त दोनच प्रतिनिधी म्हणजे पटेल व दिवाण माधवराव एवढ्यांच्याच साक्षी घेण्याचें कमिटीनें ठरविलें !

## पंजाब प्रकरण व पटेल

परंतु प्रत्यक्ष साक्षीला जाण्यापूर्वी पटेलांनीं आपली बाजू शक्य तितकी बळकट करण्याचा प्रयत्न चालविला. विशेषतः पंजाबांतील सरकारी अत्याचारांविरुद्ध सर्व शिष्टमंडळांचें मतैक्य कसें होईल याबद्दलची विलक्षण तळमळ कॉंग्रेसच्या प्रतिनिधींना लागली होती, यांत कांहींच नवल नाहीं. आणि म्हणूनच पंजाब प्रकरणाचा पाढा कमिटीपुढें वाचायला मिळावा हा पटेलांचा आग्रह होता. या प्रकरणांत कॉंग्रेसच्या मुख्य तीन मागण्या होत्या. त्या म्हणजे ज्या अधिकाऱ्यांनीं लोकांवर अत्याचार केले त्यांची चौकशी करून त्यांना शिक्षा करावी; व्हाइसरॉय चेम्सफर्ड यांना परत इंग्लंडांत बोलवावें, आणि रौलट ॲक्ट रद्द करावा. या मागण्या ब्रिटिश पार्लमेंटपुढें व ब्रिटिश जनतेपुढें मांडाव्या व झालेले अन्याय दूर करून घ्यावे यासाठीं प्रयत्न करण्याकरितां कॉंग्रेसनें ब्रिटिश कमिटी व पटेल यांना सर्वाधिकार दिले होते. त्याप्रमाणें पटेलांनीं तारीख ५ जुलै रोजीं सर्व शिष्टमंडळांना लिहून कळविलें, कीं "हिंदुस्थानांत सध्या पंजाब प्रकरणीं जी परिस्थिति निर्माण झाली आहे ती आपणांला माहित आहे. ब्रिटिश प्रधान, ब्रिटिश जनता व पार्लमेंट यांना हिंदुस्थानांत सरकारनें जीं कृत्यें चालविलीं आहेत त्यांची खरी माहीत ताबडतोब देणें अवश्य झालें आहे.

अशा वेळीं निदान या एका बाबतींत तरी सर्व शिष्टमंडळांचा एक विचार होणें जरूर आहे. एवढ्याकरितां सर्व शिष्टमंडळांनीं तारीख ९ जुलै रोजीं काँग्रेस शिष्टमंडळाच्या कचेरींत जमावें आणि निर्णय करावा अशी आमची कळकळीची विनंती आहे." पुढें ९ व १० जुलैला शिष्टमंडळाच्या सभा झाल्या. मात्र या सभांना नेमस्तांचा एकहि प्रतिनिधि कधीं हजर राहिला नाहीं ! एवढेंच नव्हे तर त्यांनीं दहा बारा दिवसपर्यंत नुसतें उत्तरहि दिलें नाहीं ! अखेर तारीख २१ जुलैला नेमस्तांच्या वतीनें ना. चिंतामणींनीं पटेलांना लिहिलें, कीं "पंजाब प्रकरणीं नेमस्ताच्या शिष्टमंडळानें स्वतंत्र रीतीनें वागण्याचें धोरण ठरविलें आहे." अर्थात् नेमस्तांना वगळून बाकीच्या शिष्टमंडळांनीं हिंदुस्थानांतील परिस्थितीसंबंधानें विशेषतः पंजाब प्रकरणाच्या बाबतींत आणि सरकारनें जे दडपशाहीचे कायदे केले होते त्यांबद्दल व विशेषतः प्रेस ॲक्टच्या बाबतींत दाद लावून घेण्याकरितां सहकार्यानें काम करण्याचें निश्चित केलें व आपल्यांतून एक संयुक्त शिष्टमंडळ भारतमंत्र्याकडे पाठविण्याचें ठरविलें. नेमस्तांना या संयुक्त योजनेंत सामील करून घेण्याचा प्रयत्न दोन महिने चालू होता. परंतु ते अखेरपर्यंत वश झाले नाहींत. एवढेंच नाहीं तर पंजाब प्रकरणीं सर्वांचा संयुक्त प्रयत्न व्हावा यासाठीं काँग्रेस शिष्टमंडळानें जी खटपट चालविली होती तिचा त्यांनीं अव्हेर केला व शेवटीं त्या खटपटीविषयीं तुच्छता दर्शविली ! नेमस्तांची मजल आणखीहि पुढें गेली होती. वास्तविक आपलें धोरण एककल्ली का होईना, पण त्यांनीं स्पष्ट तरी करून सांगायचें होतें. पण तसें न करतां नेमस्तांनीं हिंदुस्थानला पाठविलेल्या टपालांत अशी उलटी आरोळी ठोकली, कीं संयुक्त प्रयत्नाच्या बाबतींत काँग्रेस शिष्टमंडळाचेच कांहीं लोक आडवे येत आहेत ! पण हा केवळ वस्तुविपर्यास होता हें जगाला कळल्याशिवाय राहिलें नाहीं. कारण सर्व शिष्टमंडळांचें एकीकरण होण्याच्या बाबतींत कसकसे प्रयत्न झाले याबद्दल पुढें नामदार मुर्ग्रीं यांनीं एक पत्रक काढलें. त्यांत नामदारसाहेब म्हणतात, "सर्व शिष्टमंडळांची एकी व्हावी याकरितां पटेलांनीं जितके प्रयत्न केले तितके दुसऱ्या कोणींहि केले नसतील. उदाहरणार्थ हिंदुस्थानांतील परिस्थिति व पंजाब प्रकरण या बाबतींत त्यांनीं

मतैक्य घडवून आणण्याची खटपट चालविली व सभा बोलावली. परंतु पटेलांनीं केलेल्या निमंत्रणाला साधें उत्तरहि पाठविण्याची सभ्यता नेमस्तांनीं दाखविली नाहीं! त्यांचें उत्तर आलें नाहीं म्हणून पहिल्या दिवशीं सभाहि तहकूब केली होती. उद्देश हा कीं नेमस्तांना हजर राहतां यावें. पण ते कधींच हजर राहिले नाहींत. हिंदुस्थानवर जे निर्दय अन्याय सरकारनें चालविले होते त्याच्या निषेधार्थ नेमस्तांनीं कधीं जाहीर सभा भरविल्या नाहींत. तें काम कॉंग्रेसच्या शिष्टमंडळानें केलें." एवढें मनामिळाऊ धोरण सर्व पक्षांशीं ठेवूनहि नेमस्तांना वळविण्याच्या कामांत मात्र कॉंग्रेस शिष्टमंडळ निराश झालें खरें!

## पेटलेला पंजाब व मालवीयजींचा विद्युत्संदेश

इकडे हिंदुस्थानांतून अधिकाधिक भयंकर वार्ता इंग्लंडांत येऊन थडकत होत्या. त्यांत पंजाबांत चाललेल्या अमानुष छळाची हकीगत होती. लहान मुलांबाळांपासून वृद्धांपर्यंत शेंकडों लोकांना जनावरांसारखें वागविण्यांत आलें होतें. गोळीबार, बॉंब, फटके, पोटावरून सरपटायला लावणें, मुलांना तासन्‌तास उन्हांतून हिंडवणें असे एक ना दोन अत्याचार चालू होते. असंतोष भडकू नये म्हणून हिंदुस्थान सरकारनें दडपशाहीचे कायदे केले होते. मुद्रण, भाषण व आचार स्वातंत्र्यावर गदा आणली होती. थोर पुढाऱ्यांच्या हालचालींवर निर्बंध घातले होते. सरकारनें मार्शल लॉ जाहीर केला होता. लोकांच्या विश्वासांतले हॉर्निमनसारखे पुढारी हद्दपार केले होते. मालमत्ता जप्त करून वर्तमानपत्रें बंद केलीं होती. पंजाबातील एक प्रसिद्ध कॉंग्रेस पुढारी व धनिक गृहस्थ लाला हरकिसनलाल यांना जन्मठेप काळ्या पाण्याची शिक्षा देण्यांत आली व चाळीस लाखांची त्यांची मालमत्ता जप्त करण्यांत आली होती. प्रमुख देशभक्त पुढाऱ्यांना कांहींतरी काल्पनिक कारणांवरून तुरुंगांत टाकलें होतें. लष्करी कोर्टापुढें आरोपींना आपला वकील देण्याचीहि संधि दिली नव्हती. व्यापार व्यवहारावर नियंत्रण आलें होतें. निरनिराळ्या शहरांतून कर्फ्यू ऑर्डर जारी करण्यांत आली होती. मार्शल लॉची मुदत वाढविल्याबद्दल निषेध म्हणून १९ जुल राजा सर

शंकर नायर यांनीं व्हाइसरॉयाच्या एक्झिक्यूटिव्ह कौन्सिलमधल्या आपल्या जागेचा राजीनामा दिला. १९ व २० जुलै रोजीं कलकत्ता येथें ऑल इंडिया काँग्रेस कमिटीची सभा झाली व पंजाब प्रकरणीं काँग्रेसच्या चौकशी कमिटीकरितां दहा हजार रुपये मंजूर करण्यांत आले. या साऱ्या बातम्या विलायतेंत समजल्या तेव्हां शिष्टमंडळांतील बहुतेक मुत्सद्यांचें असें मत पडलें, कीं हिंदुस्थान सरकारच्या या निष्ठुर कर्माचा निषेध व्यक्त करण्याकरितां शिष्टमंडळानें काँग्रेस कमिटीची परवानगी मिळाल्यास विलायतेंतील सिलेक्ट कमिटीपुढें साक्षी देण्याचें नाकारावें. अर्थात् ज्या कामाकरितां शिष्टमंडळ विलायतेस गेलें होतें तें काम या निर्णयानें बाजूला राहिलें असतें परंतु तसें होणें बरें नाहीं असें वाटल्यावरुन पटेलांनीं दिल्ली काँग्रेसचे अध्यक्ष पंडित मदनमोहन मालवीय यांना हा प्रकार तारेनें कळविला. लगेच मालवीयांनीं तारेनें उत्तर दिलें कीं, " तुमची तार मिळाली. इतर सभासदांचा सल्ला घेतला. शिष्टमंडळानें साक्षी देण्याचें नाकारावें. ही कल्पना आम्हांला पसंत नाहीं. आतांपर्यंत ज्या साक्षी इतरांनीं दिलेल्या आहेत त्या असमाधानकारक आहेत. भारतमंत्री व लॉर्ड सिंह यांना आम्ही तारेनें कळविलें आहे, कीं ' पंजाब प्रकरणीं अधिकाऱ्यांना योग्य शिक्षा करण्याकरितां ताबडतोब निराळें कमिशन नेमा ' या बाबतींत तुम्ही त्यांचा पिच्छा पुरवा. पंजाबांत सरकारनें जो जुलमी कारभार चालविला आहे त्यामुळें तुमच्या मागण्यांना जोर येणार आहे. शिष्टमंडळ काँग्रेसच्या मागण्या कमिटीपुढें आग्रहानें मांडील अशी आशा आहे. " हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याकरितां परदेशांत झालेल्या चळवळींचा इतिहास जर कोणीं लिहिला तर त्यांत मालवीयांच्या या विद्युत्संदेशाला महत्त्वाचें स्थान दिलें पाहिजे. या तारेनें शिष्टमंडळांतील विषादाचें वातावरण निवळलें व ते पुढील उद्योगास लागले.

मालवीयांची तार आल्यावर पटेलांनीं मॉंटेग्यूसाहेबांना लिहिलें, कीं " हिंदुस्थानच्या परिस्थितीसंबंधीं व सुधारणा बिलासंबंधीं मला आपल्याशीं कांहीं बोलायचें आहे. तरी आपल्या सोयीप्रमाणें मला मुलाखत द्यावी अशी विनंती आहे. " पुढें ही मुलाखत ३० जुलैला तीन

प्रहरीं सव्वातीन वाजतां झाली; व तींत काँग्रेसच्या मागण्या पटेलांनीं मॉंटेग्यूसाहेबांना खुलासेवार निवेदन केल्या. आदल्या दिवशींच टिळकांनीं मॉंटेग्यूची मुलाखत घेतली होती. या दोन्ही मुलाखतींवरून पंजाबप्रकरणीं सरकार लवकरच आपलें धोरण जाहीर करील असा अदमास उभयतांनीं केला. तशांत तिकडे सिलेक्ट कमिटीचें काम भरांत आलें होतें. आणि त्या कमिटीपुढें साक्ष देण्याची तयारी पटेलांनीं चालविली होती. तींत त्यांचा बहुतेक वेळ जाई. या सर्व गोष्टींमुळें पंजाब प्रकरणांत शिष्टमंडळ मॉंटेग्यूसाहेबांकडे गेलें नाहीं.

## सिलेक्ट कमिटीपुढील साक्षी

काँग्रेसतर्फे पटेल व दिवाण माधवराव यांना सिलेक्ट कमिटीनें साक्षीला बोलावलें. टिळकांनीं होमरूल लीगतर्फे साक्ष दिली, तरी ती काँग्रेसच्या मागण्यांना पोषक व पूरक अशीच होती. या तिघांच्या साक्षींत मिळून कमिटीपुढें काँग्रेसचें म्हणणें सविस्तर व स्पष्ट मांडलें गेलें. व हिंदुस्थान स्वराज्याला लायक आहे हा मुद्दा त्यांत जोरानें त्यांनीं पुढें आणला. दिल्ली काँग्रेसनें मुख्यतः पांच गोष्टी आग्रहानें प्रतिपादन केल्या व त्या त्यांनीं विस्तारशः कमिटीपुढें विशद केल्या. त्या पांच गोष्टी म्हणजे, प्रांतांना पूर्ण स्वायत्त करावें; मध्यवर्ती सरकारांत जबाबदार राज्यपद्धतीला सुरवात करावी; पंधरा वर्षांत सबंध हिंदुस्थानला पूर्ण स्वायत्तता द्यावी; इंडिया कौन्सिल बंद करावें अर्थात् स्वतंत्र वसाहतीप्रमाणें स्वराज्य द्यावें. व तिजोरीवर पूर्ण ताबा द्यावा. पटेलांनीं कमिटीपुढें कैफियत दिली तिच्यांतल्या इतक्या जहाल व प्रगतिपर मागण्या दुसऱ्या कोणत्याहि शिष्टमंडळानें केल्या नाहींत. पटेलांची साक्ष २ ऑगस्ट १९१९ रोजीं सुमारें तीन तास झाली. त्या वेळचें प्रत्यक्ष वस्तुस्थितीचें वर्णन पटेलांचे सहकारी केळकर यांनीं फार सुरेख केलें आहे : " आधीं राष्ट्रीय सभा नावडती, त्यांतून पेटल हे स्वभावतःच थोडे 'भांडल्यासारखें' बोलतात. त्यांतूनहि राष्ट्रीय सभेचें म्हणणें जोरानें मांडलें जावें त्यांत कसूर होऊं नये, अशा बुद्धीनें ते ठासून बोलले. त्यांतच त्यांनीं इतर होमरूल लीग, नेमस्त परिषद वगैरेंचा उल्लेख केला. यामुळें कमिटीच्या

खोलींत थोडासा मिरच्यांची पूड उधळल्यासारखा प्रकार झाला. शिंक कोणासच आली नाहीं, पण बऱ्याच लोकांना ठसका लागला. पटेल यांनीं वास्तविक खऱ्या त्याच गोष्टी सांगितल्या. मला इतकेंच सांगणें जरूर वाटतें, कीं (पटेलांनीं मांडलेल्या राष्ट्रीय सभेच्या) मागणीला कमिटी मान्यता देवो अगर न देवो, राष्ट्रीय सभेचें म्हणणें जसेंच्या तसें, रतिभर कसूर न होता कमिटीच्या सभासदांना कळविण्यांत आलें, येवढें समाधान मानण्यास भरपूर जागा आहे.'' पटेलांच्या साक्षीविषयीं केळकरांनीं 'मराठा' पत्रांत लिहिलें, कीं " कमिटीकडून फारसे प्रश्न कॉंग्रेस शिष्टमंडळाला विचारले जाणार नाहींत असें वाटल्यावरून पटेलांनीं कमिटीकडून कोणते प्रश्न येतील त्याची पूर्वकल्पना करून त्यावर कॉंग्रेसच्या मागण्यांना अनुरूप अशीं सविस्तर उत्तरें दिलीं. कॉंग्रेसच्या मागण्यांना वाढतें स्वरूप कसें आलें आणि कांहीं नेमस्तांनींच त्या वाढीला कशी काय मदत केली हें पटेलांनीं स्पष्ट रीतीनें, विस्तारानें आणि निर्भीडपणानें सांगितलें. त्यामुळें कमिटीच्या कांहीं (नेमस्त पक्षपाती) सभासदांना साहाजिकच आश्चर्य वाटलें व धक्का बसल्यासारखें झालें. पण पटेलांना आपलें कर्तव्य करावयाचें होतें व तें त्यांनीं कोणाच्या निंदा स्तुतींची पर्वा न बाळगतां केलें. पटेलांनीं या वेळीं जी चिकाटी दाखविली, व कॉंग्रेसनें त्यांच्यावर सोंपविलेल्या कामांत त्यांनीं जी हिंम्मत दर्शविली त्याची हिंद देशाला जेव्हां पूर्ण जाणीव होईल तेव्हां तो त्याचें खात्रीनें हार्दिक अभिनंदनच करील!" " कॉंग्रेस शिष्टमंडळानें केलेली पटेलांची निवड सर्वथैव योग्य होती. त्यांच्या बोलण्यांत मवाळपणा किंवा शरणागति नव्हती. विचारांचें स्वातंत्र्य व सरळपणा त्यांच्या साऱ्या भाषणांत व्यक्त होत होता.'' असे उद्गार मजूरपक्षाचे एक पुढारी व कमिटीचे एक सभासद बेनस्पूर यांनीं काढले. केळकरांनीं लिहिल्याप्रमाणें मिरच्यांची पूड केव्हां उधळली तें खालील संभाषणावरून सहज समजतें.

कमिटीचे सभासद बेनेट यांचा प्रश्न—हिंदुस्थानला संपूर्ण जबाबदार राज्यपद्धति पंधरा वर्षांत मिळावी असें तुम्ही कां म्हणतां? पांच वर्षांचा किंवा दुसरा कांहीं आंकडा कां नाहीं सांगत?

पटेलांचें उत्तर—तुम्हीं स्वराज्य आतांच देणार असलां तरी तें घ्यायला आम्ही तयार आहोंत !

प्रश्न—पण असें पाहा, आतांच कसें देतां येईल ? लायकीचा व सुरक्षितपणाचा प्रश्न आहेच कीं ?

उत्तर—पण हा प्रश्नच उद्भवत नाहीं. कारण आतांसुद्धा आम्ही स्वराज्याला लायक आहोंत.

लॉर्ड इस्लिंग्टनचा प्रश्न—समजा, बिल पास झालें तर त्यांतल्या सुधारणा तुम्ही यशस्वीपणानें राबवाल काय ?

पटेल—आम्ही राबविण्याचा कसून प्रयत्न करूं पण जास्त मिळविण्याकरितां झगडा चालूच ठेवूं आमचें समाधान अशा क्षुल्लक गोष्टीनें व्हायचें नाहीं. We are not going to be satisfied with this little thing ).

मॉंटेग्यूसाहेबांचा प्रश्न—काय पटेल, तुम्ही हें बिल म्हणजे क्षुल्लक गोष्ट समजतां ? तुमच्या बोलण्याचा नक्की अर्थ तरी काय ?

पटेल—आम्ही म्हणतों कीं हें बिल बिलकुल समाधानकारक नाहीं. प्रांतिक कारभारांत थोडीशीं खातीं देऊन मध्यवर्ती सरकारांत आम्हांला कांहींच अधिकार तुम्ही ठेवले नाहींत म्हणून हें बिल अत्यंत निराशाजनक आहे.


मॉंटेग्यूसाहेब—पण तुम्ही या बिलाला क्षुल्लक असें कां म्हणतां ?

पटेल—मी तसंच म्हणणार !

मॉंटेग्यूसाहेब—हें बिल तुम्हांला निराशाजनक वाटतें यांत मला कांहीं संशय वाटत नाहीं. पण तुम्ही तर म्हणतां ती एक क्षुल्लक गोष्ट आहे !


पटेल—होय, क्षुल्लक नाहीं तर काय ? राजेसाहेबांच्या २० ऑगस्टच्या जाहीरनाम्याशीं तुलना केली तर हें बिल म्हणजे क्षुल्लक गोष्टच आहे.

पटेलांचें धैर्य व स्पष्टवक्तेपणा पाहून भारतमंत्री मॉंटेग्यू स्तिमित झाले तर त्यांत काय आश्चर्य ? असो. पटेलांची साक्ष झाल्यानंतर त्यांचे सहकारी दिवाण माधवराव यांची कॉंग्रेस शिष्टमंडळातर्फेंच साक्ष झाली. त्यांनीं तर सिव्हिल सर्व्हंटांची खरपूस हजेरी घेतली व त्याबरोबर कॉंग्रेसच्या



ना० पटेल, पं० मालवीय, दि. ब. माधवराव, श्री० न. चिं. केळकर

[ १९१९ ]



पं. मोतीलाल नेहरू व श्रीमती सरोजिनी नायडू यांच्या समवेत दिल्ली येथें
श्री. विठ्ठलभाई पटेल

मागण्याहि कमिटीपुढें निवेदन केल्या. त्यानंतर टिळकांची साक्ष झाली. व अशा रीतीनें या त्रिमूर्तींनीं स्वदेशाचीं गाऱ्हाणीं कमिटीच्या वेशीवर टांगून ठेवलीं. देशहिताच्या दृष्टीनें या तिघांच्या साक्षी इतरांच्यापेक्षां महत्त्वाच्या व वस्तुस्थितीच्या पूर्ण निदर्शक होत्या असेंच कोणाहि निःपक्षपाती मनुष्यास म्हणावें लागतें. त्यांत रागलोभाचा प्रश्न नाहीं. इतर शिष्टमंडळांतील साक्षीदारांनीं देशाच्या हिताच्या साक्षी दिल्या नाहींत असा त्याचा अर्थ नाहीं. इतरांनाहि हिंदुस्थानच्या हिताचीच बुद्धि होती पण मागण्यांतला जो फरक होता तो तीव्रतेचा मोठा फरक होता. १९३७ सालीं जी पूर्ण स्वायत्तता प्रांतांना मिळाली ती कॉंग्रेसला १९१९ सालींच तांबडतोब पाहिजे होती व तिचा आग्रह पटेलांनीं साक्षींत धरला; इतर म्हणजे बेझंटबाईच्या व नेमस्तांच्या शिष्टमंडळांना ही स्वायत्तता आस्तेकदम पाहिजे होती हा तो फरक होता. याप्रमाणें तपशिलांत जरी फरक होता तरी थोडासा तात्त्विक भेदहि होता. तो असा कीं कॉंग्रेसला द्विदलराज्यपद्धतीसारखी अर्धवट किंवा धेडगुजरी राज्यपद्धति मुळींच नको होती. पण बेझंट व नेमस्तांना ती पसंत होती.

सिलेक्ट कमिटीच्या पुढील साक्षी संपून तिचा समग्र रिपोर्ट बाहेर पडेपर्यंत कॉंग्रेस शिष्टमंडळानें आणखी एक महत्त्वाचें काम हातांत घेतलें. तें म्हणजे कॉंग्रेसच्या मागण्यांचा साऱ्या विलायतेंत प्रचार करायचा हें होय. त्याकरितां कॉंग्रेस शिष्टमंडळानें ठिकठिकाणीं व्याख्यानांचे दौरे काढले व ब्रिटिश जनतेची कॉंग्रेसबद्दल सहानुभूति वाढविण्याचा प्रयत्न केला. त्याबरोबरच त्यांनीं विलायतेंतील ठळक व्यक्तींच्या मुलाखतीहि घेतल्या. या बाबतींत टिळकांनीं शिष्टमंडळ विलायतेंत येण्यापूर्वी बरेंच काम केलें होतें व कॉंग्रेस शिष्टमंडळाचा पुढील मार्ग साफसूफ करून ठेवला होता त्याचा फार उपयोग झाला. टिळकांनीं पूर्वी अनेक संस्थांतर्फे सभा भरवून व्याख्यानें दिलीं होतीं. त्यामुळें जेव्हां कॉंग्रेसतर्फे व्याख्यानांचा दौरा निघाला तेव्हां शिष्टमंडळाचें ठिकठिकाणीं सहानुभूतिपूर्वक स्वागत झालें व त्यांच्या मागण्यांना अनुकूल वातावरण निर्माण झालें. कॉंग्रेस शिष्टमंडळानें सर्व पक्षांच्या पुढाऱ्यांच्या जरी भेटी घेतल्या तरी त्यानें मजूरपक्षाशीं आपला

संबंध अधिक निकटचा ठेवला. कारण मजूरपक्षांत लॅन्सबरी, वेजवूड, स्पूर यांसारखे जे पुढारी होते त्यांची कॉंग्रेसबद्दल सर्वांत अधिक सहानुभूति होती व हिंदुस्थानच्या हिताबद्दल त्यांना सर्वांत जास्त आस्था वाटत होती. पटेलांनीं तर स्पूरशीं सर्वांत अधिक स्नेह ठेविला. एक तर स्पूरना पटेलां-विषयीं व त्यांच्या कामाविषयीं व पद्धतीविषयीं आदर वाटत असे. शिवाय स्पूर हे एक तडफदार गृहस्थ असून मजूर पक्षाचे पार्लमेंटांतील नव्यानें निवडून आलेले प्रतिनिधि होते तसेच, सिलेक्ट कमिटीचेहि ते सभासद होते. अर्थात् त्यांच्या सहवासानें पटेलांच्या पुष्कळ लोकांशीं गांठीभेटी होऊन ओळखी झाल्या व खाजगी रीतीनेंसुद्धा त्यांना आपलें म्हणणें मांडण्याची संधि मिळाली. पुष्कळदा व्याख्यानें देऊन जें काम होत नसे तें अशा खाजगी भेटीगांठींनीं अधिक परिणामकारक होई.

इंग्लंड, स्कॉटलंड व वेल्स या भागांत निरनिराळ्या शहरीं सुमारें दोन महिने व्याख्यानांचा कार्यक्रम चालू होता. ब्रिटिश कमिटीनें या दौऱ्यांत शिष्टमंडळाशीं चांगलें सहकार्य केलें. व्याख्यानांच्या वेळीं जनसमुदायहि चांगला जमत असे. शिष्टमंडळांतील बारा सभासदांपैकीं बहुतेकांचीं व्याख्यानें झालीं. पटेलांनीं बोर्नमथ, साउदॅम्प्टन, लिव्हरपूल, न्यू कॅसल, मँचेस्टर या ठिकाणीं व्याख्यानें दिलीं. बोर्नमथ येथें पटेलांच्या बरोबर सरोजिनी नायडू, दिवाण माधवराव, खापर्डे ही मंडळी होती. पटेल म्हणाले, "आम्हांला ब्रिटिश लोकशाहीकडे पाहायचें आहे. आतांपर्यंत पार्लमेंटनें आमचें कांहीं ऐकलें नाहीं. परंतु समजूतदार व स्वातंत्र्यप्रेमी ब्रिटिश लोक आमचें ऐकतील अशी आशा आहे. आम्हांला पार्लमेंटनें दहा वर्षांची उमेदवारी करायला सांगितली आहे व त्यानंतर आमची लायकी ठरविण्याचा विचार होणार आहे. त्या दहा वर्षांनंतर पुन्हा दहा वर्षांनीं आमची परीक्षा होणार आहे! म्हणजे हें परीक्षेचें शेपूट लांबत चाललें! दीडशें वर्षें ब्रिटिश सत्ता हिंदुस्थानांत आहे. तरी तो देश अतिशय दरिद्री राहिला आहे. ही गोष्ट राज्यकर्त्यांना खात्रीनें भूषणावह नाहीं. हिंदुस्थान आजहि स्वराज्याला लायक आहे. आपलें काय व्हायचें तें ती पाहून घेईल. पण आतां आम्हांला कोरडीं अभिवचनें व आश्वासनें नकोत! एकच उदाहरण सांगतों. न्याय-

खातें व वसुलीखातें हीं वेगवेगळीं ठेवावींत असा ठराव पार्लमेंटनें करून कितीक वर्षे झालीं ! पण अद्याप त्या बाबतीत कांहींच केलें गेलें नाहीं ! आम्हांला भाषण, मुद्रण व सभा स्वातंत्र्य पाहिजे." शेवटीं ब्रिटिश सत्तेपूर्वी हिंदुस्थान कसा वैभवशाली देश होता हें पटेलांनीं मेकॉलेच्या एका लेखांतून वाचून दाखविलें व आपलें भाषण संपविलें.

साउदॅम्प्टन येथें पटेल व दिवाण माधवराव यांचीं भाषणें तेथील प्रौढ-शिक्षणसंघातर्फे झालीं. त्यांच्या भाषणानंतर संघानें ठराव पास केला, कीं "या सभेनें उभयतांचीं भाषणें ऐकलीं आहेत व या सभेचें असें आग्रहाचें सांगणें आहे कीं कॉंग्रेसच्या मागण्यांप्रमाणें सुधारणाबिलांत दुरुस्त्या व्हाव्या व हिंदुस्थानला वसाहतीचें स्वराज्य मिळेल अशी योजना करावी." हा ठराव भारतमंत्री मि. मॉंटेग्यू, साउदॅम्प्टनतर्फे निवडलेले पार्लमेंटांतील प्रतिनिधि व मुख्य प्रधान यांच्याकडे पाठविण्याचें ठरलें. लिव्हरपूलच्या व्याख्यानांत पटेलांनीं सांगितलें, कीं "गेल्या महायुद्धांत हिंदुस्थाननें ब्रिटनला पंधरा कोटी पौंडाची देणगी दिली. पण देणगीची गोष्ट सोडली तरीसुद्धा स्वातंत्र्यप्रिय राष्ट्र म्हणून हिंदुस्थान हे समानतेचे हक्क मागत आहे त्यांत काय बिघडलें ? स्वातंत्र्य हा प्रत्येक राष्ट्रांतील लोकांचा जन्मसिद्ध हक्क आहे." या भाषणावरहि एकमतानें ठराव पास करण्यात आला व अशा रीतीनें हिंदुस्थानच्या न्याय्य मागणीला सहानुभूति दर्शविण्यांत आली. वास्तविक हिंदुस्थानचा प्रश्न निघाला, कीं विलायतेंतले लोक त्याबद्दल उदासीन असायचे. परंतु या प्रकारच्या व्याख्यानांनीं ब्रिटिश लोक हिंदुस्थानबद्दल थोडा तरी विचार करूं लागले. न्यूकॅसलच्या सभेंत पटेलांनीं सांगितलें कीं पांच दहा वर्षांत हिंदुस्थानला स्वराज्य पाहिजे, अशी आमची आग्रहाची मागणी आहे. मॅंचेस्टरच्या सभेंत पटेलांनीं श्रोत्यांना विचारलें, "वार्षिक दोन पौंड उत्पन्ना-वर माणसाला जगणें शक्य आहे काय ?" हा प्रश्न ऐकून सभेंत हशा पिकला. पटेल म्हणाले, "हिंदुस्थानांत मात्र एवढ्याशा उत्पन्नावर लाखों लोक अर्धपोटीं आहेत." हें विधान ऐकणाऱ्यांना आश्चर्यकारक वाटलें. पण तें खरें असल्याचें पटेलांनीं त्यांना पटवून दिलें. हिंदुस्थानच्या एकूर

स्थितीची जाणीव विलायतेंत उत्पन्न करणें अतिशय आवश्यक आहे एवढें मात्र त्यावरून दिसलें.

शिष्टमंडळाचा व्याख्यानांचा दौरा यशस्वी झाला; पण त्यांत त्यांना बऱ्याच अडचणींना तोंड द्यावें लागलें. या अडचणी त्या वेळीं चालू असलेल्या रेल्वेंतील संपामुळें उद्भवल्या. पूर्वी आंखलेल्या कार्यक्रमाप्रमाणें जरी पुष्कळ ठिकाणीं व्याख्यानें झालीं तरी संपामुळें सर्व ठिकाणीं व्याख्यानें झालीं नाहींत. कारण पुढेंपुढें संपाच्या वाढत्या जोरामुळें व्याख्यानें देणें अवघडच नव्हे तर अशक्य होऊं लागलें. जेथें व्याख्यानें झालीं त्या ठिकाणींसुद्धा कशा गैरसोयी व अडथळे उत्पन्न झाले त्याचीं थोडीं उदाहरणें देतों. आगगाडया व मोटारी या नेहमीं माणसांनीं भरून जात असल्यामुळें शिष्टमंडळांतील सभासदांना ठिकाणाला बोटीनें जावें लागे. त्यामुळें ज्या प्रवासाला एरवीं पांच तास लागायचे त्याला अकरा तास लागले ! शिवाय ज्या ठिकाणीं इतकी गैरसोय सोसूनहि सभासद जात तेथेंसुद्धा त्यांची उतरण्याची व जेवण्याची सोय होणें मुष्किलीचें होई, कारण जेथें उतरायचें व जेवायचें अशीं सारीं चांगलीं हॉटेलें माणसांनीं गच्च भरलेलीं असत ! मग अखेर दुधाची तहान ताकावर भागवावी त्याप्रमाणें एकादें घर उतरायला पाहून व कुठेंतरी एकाद्या रेस्टारंटमध्यें जाऊन सभासदांना आपला आहार उरकून घ्यावा लागे ! तरीपण ज्याचा शेवट गोड तें सारेंच गोड असें सर्वांनीं मानून घेतलं.

इकडे व्याख्यानांचा दौरा ऑक्टोबरच्या अखेरीस संपण्याच्या सुमारास तिकडे सिलेक्ट कमिटीचें साक्षी घेण्याचें कामहि संपलें व आतां कमिटी रिपोर्ट तयार करण्याच्या उद्योगास लागली. रिपोर्टाबद्दलच्या वादविवादास खाजगी रीतीनें सुरवात झाली. त्यांतून सर्वसाधारणपणें असा ध्वनि निघत होता, कीं हिंदुस्थानला जबाबदारीची राज्यपद्धति टप्याटप्यानें देण्यांत येईल. द्विदल राज्यपद्धति प्रांतांना लागू होईल; मध्यवर्ती सरकारांत मात्र कोणतींच खातीं लोकनियुक्त प्रतिनिधींच्या ताब्यांत दिलीं जाणार नाहींत, इत्यादि. एकंदरीनें हा कयास पुढें खरा ठरला. मात्र "तुम्ही ही एक क्षुल्लक गोष्ट आम्हांला देतां आहांत." या पटेलांच्या बोलण्याचा मॉंटेग्यूसाहेबांवर परिणाम झाल्याशिवाय राहिला नाहीं. हिंदुस्थानचें हित पाहा-

ण्याला हिंदुस्थानच समर्थ आहे; तें पाहाण्याचें व ठरविण्याचें काम कांहीं नुसत्या पार्लमेंटचें नाहीं हें जें पटेलांचें आग्रहाचें सांगणें होतें त्याचा पुष्कळ उपयोग झाला. कारण सुधारणेच्या कायद्याच्या प्रस्तावनेंत हिंदुस्थानांतील लोकांच्या सहकार्यानें पार्लमेंट सुधारणा घडवून त्या अमलांत आणील अशा अर्थाचें जें वाक्य आहे तें या पटेलांच्या आग्रहामुळें घातलें गेलें असें पुष्कळांचें मत आहे.

पटेलांचे मजूरपक्षांशीं संबंध फार सलोख्याचे होते हें वर सांगितलेंच आहे. मजूरपक्षातर्फे सभा बोलावून व मुलाखती करून त्यांनीं ते अधिक दृढ केले. यापैकीं एक महत्त्वाची सभा मजूरपक्षाचे पुढारी लॅन्सबरी यांच्या अध्यक्षतेखालीं तारीख २५ ऑक्टोबरला आल्बर्ट हॉलमध्यें भरविण्यांत आली. बेझंटबाईचा पक्ष, काँग्रेस पक्ष व होमरूल लीग या सर्वांना आपलें म्हणणें मजूरपक्षानें कॉमन्ससभेपुढें मांडावें असें वाटणें साहजिक होतें व या सभेच्या निमित्तानें ही सर्व मंडळी एकत्र जमण्याचा योग आला. टिळक, खापर्डे, हॉर्निमन, पटेल, चमनलाल इत्यादिकांना निमंत्रणें होतीं. जशाच्या तशा बिलाला पाठिंबा देणारी ही सभा असेल तर आपण सभेला येणार नाहीं असें टिळकांनीं सांगितलें. सभेंत स्वयंनिर्णयाच्या हक्काचा सर्वंकष ठराव येईल असें आश्वासन मिळाल्यावर टिळक सभेला गेले. परंतु प्रत्यक्ष सभा चालू झाल्यावर तीव्र मतभेद दिसून आले. एका बाजूला बिझांटबाईचा पक्ष व दुसऱ्या बाजूला होमरूल लीग व काँग्रेसपक्ष असा हा सामना तर होताच पण दुसऱ्या पक्षांतहि दोन पंथ होते. टिळक पटेलांचें म्हणणें, कीं बिलांत आम्हीं सांगूं त्या दुरुस्त्या करून तें पास करावें तर हॉर्निमन चमनलाल यांचें म्हणणें, कीं मुळीं असें बिलच आम्हांला नको. बिझांटबाईंना तर बिल सर्व पसंत होतें. त्यांनीं मॉंटेग्यूसाहेबांच्या बिलाला निःसंदिग्ध शब्दांत पाठिंबा दिला. पटेलांनीं अर्थात्च आपल्या भाषणांत बिझांटबाईंना जोराचा विरोध केला. त्याच वेळीं खापर्डे यांनीं आपल्या मर्मभेदक विनोदी भाषणांत बिझांटबाईंना पूतना मावशीची उपमा दिली ! बिझांटबाईंनीं या उपमेला हरकत घेतली. पण पटेलांनीं खापर्ड्यांच्या या उपमेचें पूर्णपणें समर्थनच केलें ! याप्रमाणें

इकडे बिझांटबाई एका टोकाला जाऊन बिलाला अनुकूल होत्या तर तिकडे हॉर्निमन व चमनलाल हे बिलच नको म्हणून दुसऱ्या टोकाला गेले होते. पण टिळक, पटेल, खापर्डे, यांनीं सुवर्णमध्य साधून दुरुस्त्यांसह बिल पाहिजे असें प्रतिपादन करून सभा जिंकली. या सभेनतर लवकरच म्हणजे ३ नोव्हेंबरला टिळक, केळकर, हिंदुस्थानास यायला निघाले व पुढील कामासाठीं पटेल—खापर्डे विलायतेंत राहिले. कारण अद्यापि सिलेक्ट कमिटीचा रिपोर्ट तयार व्हायचा होता; व तो झाल्यावर सुधारणांचें बिल पार्लमेंटांत यायचें होतें. तेव्हां त्या वेळीं मजूरपक्षाच्या साहाय्यानें बिलाला उपसूचना आणाव्या अशा हेतूनें पटेल पुढील उद्योगास लागले. कॉंग्रेसच्या मागण्यांना अनुकूलता दाखविणारे फक्त बेनस्पूर हे एकच मजूरपक्षाचे प्रतिनिधि सिलेक्ट कमिटीवर होते. स्पूरशीं स्नेह ठेवून पटेल त्यांच्याबरोबर बिलासंबंधीं चर्चा करण्यांत तासचे तास घालवीत; आणि त्यांना सर्व प्रकारची माहिती पुरवून आपल्या मागण्या कशा न्याय्य आहेत तें त्यांना पटवून देत. त्याचा परिणाम पटेलांनीं दिल्ली कॉंग्रेसच्या ठरावानुसार ज्या सुधारणा सुचविल्या त्या बेनस्पूरनीं कमिटीपुढें मांडण्याचें आश्वासन दिलें व त्याप्रमाणें त्यांनीं केलें. परंतु साऱ्या कमिटींत आपण एकटेच एका बाजूला आहोंत अशी जेव्हां त्यांची खात्री झाली तेव्हां त्यांना सखेदाश्चर्य वाटलें यांत विशेष नाहीं. तरीपण जेव्हां बिल पार्लमेंटांत चर्चेला निघेल तेव्हां आपण पटेलांनीं सांगितलेल्या उपसूचना मांडूं असें त्यांनीं कबूल केलें. त्याबरोबरच मजूरपक्षाच्या इतर सभासदांना भेटून त्यांच्यापुढें आपलें म्हणणें स्पष्ट करावें असेंहि पटेलांना त्यांनीं सांगितलें. त्याप्रमाणें पटेलांनीं मजूरपक्षाच्या निरनिराळ्या पुढाऱ्यांच्या गांठी घेऊन त्यांना आपलें म्हणणें पटवून दिलें. याप्रमाणें सरळ गोष्टी चालू असतांना त्यांत कांहीं भानगड झाली नाहीं तरच आश्चर्य असें म्हणावें लागतें! कारण याच वेळीं बिझांटबाईनीं मजूरपक्षाच्या पुढाऱ्यांना फोडून आपल्या बाजूकडे वळविण्याची कारवाई सुरू केली! बाहेरच्या लोकांशीं भांडत बसणें ही गोष्ट तितकीशी कठीण नसते पण घरच्या भांडणांना तोंड देतांना मनुष्याला फार जपून वागावें लागतें व त्यामुळें जिकीर वाढते. बिझांटबाईच्या कारस्थानामुळें पटेलांच्या अडचणी

वाढल्या. कारण बाई मजूर पुढाऱ्यांना चक्क सांगत, कीं तुम्ही पटेलांच्या उपसूचनांकडे मुळींच लक्ष देऊं नका ! परंतु याहि कठीण प्रसंगांतून पटेल चिकाटी धरून पार पडले व त्यांनीं मजूरपक्षाला आपलें म्हणणें पार्लमेंटांत मांडण्यास प्रवृत्त केलें. एवढ्यावरच पटेल थांबले नाहींत. इतर पक्षांतल्या लोकांबरोबरहि त्यांनीं वाटाघाटी केल्या व त्यांना काँग्रेसच्या उपसूचना समजावून दिल्या. त्या लोकांपैकीं फक्त मॅकलम स्कॉट हे पटेलांच्या उपसूचनांना पाठिंबा देण्याला तयार झाले. पटेलांनीं त्यांना चार वेळां भेटून सर्व गोष्टी स्पष्ट केल्या व ज्यांना ज्यांना उपसूचनांवर कांहीं खुलासे पाहिजे असतील त्या सर्वांना त्यांनीं खुलासे पुरविले. पुढें ३ डिसेंबरला बिल पार्लमेंटांत आलें. त्यावर तीन दिवस चर्चा झाली. पटेलांना गॅलरीखालीं सभासदांच्या बसण्याच्या ठिकाणाजवळच एक जागा मिळाली. त्यामुळें त्यांना वादविवाद चांगले ऐकायला मिळत व उपसूचना मांडणाऱ्या सभासदांना चांगला आधार देतां येई. मधून मधून सभासद धूम्रपानाच्या खोलींत किंवा भोजनगृहांत किंवा लॉबीमध्येंहि जात. त्यांच्याबरोबर पटेल हळू आवाजांत चर्चा करून त्यांना आयत्या वेळीं अवश्य त्या गोष्टींची माहिती सांगत असत. पटेलांच्या एकट्याच्या या साऱ्या हालचाली मॉंटेग्यूसाहेबांना कशा जाणवल्या हें लवकरच निदर्शनास आलें. मॉंटेग्यूसाहेबांनीं घाईघाईनें एक चिठ्ठी पेन्सिलीनें लिहिली व बिलाला उपसूचना आणणाऱ्या एका सभासदाला तेथेंच ती पोंचती केली. ही चिठ्ठी त्या सभासदाकडे येतांच ती अर्थात्‌च पटेल जवळ बसले असल्यामुळें त्यांनाहि वाचयला मिळाली. या चिठ्ठींत मॉंटेग्यूसाहेबांनीं असा मजकूर खरडला होता, कीं "निदान या वेळेला तरी तुम्ही बिलावर विरोधी टीका करूं नका. आपल्याला फार मोठे राजकीय हक्क मिळताहेत असें हिंदुस्थानच्या लोकांना वाटेल असें कांहीं तरी यावेळीं बोला !" त्या वेळीं पटेलांच्या शेजारीं निहालसिंग बसले होते. त्यांच्याजवळ त्या सभासदानें चिठ्ठी दिली आणि सांगितलें, कीं तुम्ही विलायतेंत हिंदुस्थानकरितां जी कामगिरी केली तिच्याबद्दल बक्षीस ही चिठ्ठी आपल्याजवळ ठेवा ! अखेर कोणतीच उपसूचना पास झाली नाहीं तरी हिंदु-

स्थानची खरी बाजू कोणती ती पटेलांच्या मदतीमुळें व प्रयत्नांमुळें ब्रिटिश सरकारपुढें स्पष्टपणें मजूर पक्षाला मांडता आली.

याप्रमाणें सुधारणा कायद्याची पार्लमेंटांत चर्चा चालली असतां हिंदुस्थानांत पंजाब प्रकरणांतील दुष्कृत्यांवर साफसुफी करण्याकरितां सरकारनें हंटर चौकशी कमिशनची नेमणूक केली होती. पण त्यावर काँग्रेस व मुस्लिम लीग यांचा एकहि प्रतिनिधि सरकारनें घेतला नाहीं. तशांत जखमेवर मीठ चोळावें त्याप्रमाणें हिंदुस्थान सरकारनें इंडेमूनिटी बिल ( नुकसान भरपाईचें बिल) पास केलें व या रीतीनें जे अधिकारी गुन्हेगार ठरतील त्यांना शिक्षा न होण्याची तजवीज करून ठेवली ! अशा वेळीं ब्रिटिश काँग्रेस कमिटीनें व काँग्रेस शिष्टमंडळानें एक जाहीरनामा काढला व हिंदुस्थान सरकारच्या अविचारीपणामुळें व अविश्वासूपणामुळें किती गंभीर परिस्थिति निर्माण झाली आहे याची जाणीव ब्रिटिश जनतेला करून दिली. पंजाब प्रकरणाची तड लावण्याकरितां पटेलांनीं आपल्याकडून शक्य तेवढी खटपट विलायतेंत केली. १८ डिसेंबरला मि. बेनस्पूर यांनीं कॉमन्सच्या सभागृहांत शिष्टमंडळांना मोठी मेजवानी दिली. त्यांत पटेलांना निमंत्रण असल्यानें ते आले होते. बेनस्पूर साहेबांनीं पटेलांचा गौरवपर उल्लेख केला. पटेलांनीं उत्तरादाखल विस्तृत भाषण केलें. त्यांत त्यांनीं हिंदुस्थानची पूर्ण स्वराज्याची मागणी कशी न्याय्य आहे याचें खुलासेवार विवेचन केलें व मजूरपक्षाला या मागणीस सहानुभूतिपूर्वक पाठिंबा देण्याची विनंती केली. हिंदुस्थान सरकार हें लांकडी ठोकळ्यासारखें बध्थड व ताठर झालें आहे असें ते म्हणाले. मेजवानीचा समारंभ संपल्यावर पटेलांनीं पंजाब प्रकरणाचा उल्लेख करून सांगितलें, कीं हिंदुस्थानच्या पांच मागण्या तर ताबडतोब पुऱ्या झाल्या पाहिजेत. त्या म्हणजे, व्हाइसरॉयांना परत बोलवावें, ओडवायरची चौकशी करावी, डायरला नोकरीवरून काढून टाकून त्याला शिक्षा करावी, इंडेम्निटी व रौलॅट कायदे रद्द करावे व खिलाफतीचा प्रश्न समाधानकारक रीतीनें सोडवावा. या गोष्टी जर झाल्या नाहींत तर भयंकर परिस्थिति होईल असें स्पष्ट सांगितलें. यावर बेनस्पूरनीं मजूरपक्षानें या मागण्यांचा जरूर विचार करावा असें म्हटलें. हरंतु पंजाबप्रकरणाचा पाठपुरावा करायचा म्हणजे नुसत्या मजूर-

पक्षाची सहानुभूति त्या वेळेला तरी उपयोगीं पडणारी नव्हती; कारण तो पक्ष कांहीं तेव्हां अधिकारारूढ नव्हता. म्हणून ऑल इंडिया काँग्रेस कमिटीच्या ठरावानुसार पटेलांनीं पुढल्या वर्षी म्हणजे १९२० सालीं खुद्द मॉंटेग्यू साहेबाची भेट घेतली. त्यांत पटेलांनीं हिंदुस्थानच्या परिस्थितीसंबंधीं विशेषतः पंजाबप्रकरणीं काँग्रेसच्या ज्या आग्रहाच्या व तावडतोबीच्या मागण्या होत्या त्या खुलासेवार सांगितल्या. पण चेम्सफर्डसाहेबांना हिंदुस्थानांत व्हाइसरॉयाच्या जागीं न ठेवतां त्यांना विलायतेंत परत बोलवावें या मागणीला मॉंटेग्यूंनीं जोराचा विरोध केला. त्यांचें म्हणणें असें कीं चेम्सफर्ड हे तर व्हाइसरॉयाल्या जागीं राहिलेच पाहिजेत! कारण ते नसते तर सुधारणा बिलच अस्तित्वांत आलें नसतें! त्यांनीं असेंहि सांगितलें कीं ओडवायरसारख्या अधिकाऱ्याना शिक्षा करण्यानें किंवा व्हाइसरॉयाला परत बोलावण्यानें कांहीं उपयोग होणार नाहीं. ओडवायरच्या कृत्यांबद्दल आम्हीं त्याच्यावर कागदोपत्रीं सपाटून टीका केली आहे तेवढी शिक्षा त्याला पुरी आहे! पटेलांनीं यावर उत्तर दिलें, कीं ओडवायर आणि व्हाइसरॉय यांना तर तुम्हीं शिफारसपत्रें दिलीं! असें असतांना तुम्हीं त्यांच्यावर टीका केली या म्हणण्यांत काय अर्थ आहे? पुढें रौलेक्ट ॲक्टाचा मुद्दा निघाला तेव्हां मॉंटेग्यू म्हणाले, कीं या ॲक्टाचा प्रत्यक्ष उपयोग सरकारनें कांहींच केलेला नाहीं. कायदेमंडळाला तो पहिल्याच अधिवेशनांत रद्द करतां येईल. त्यावर पटेलांनीं विचारलें कीं रौलॅट ॲक्ट निरुपयोगी ठरला आहे म्हणतां मग तो सरकारनें दप्तरांत ठेवला तरी कशाला? शिवाय तुम्ही म्हणतां कीं कायदेमंडळाला तो रद्द करतां येईल. पण सुधारणा कायद्याप्रमाणें एकाद्या बिनसरकारी सभासदानें जर रौलॅट ॲक्ट रद्द करणारें बिल कायदेमंडळांत आणलें तर व्हाइसरॉय त्याला प्रतिबंध करूं शकेल त्याची काय वाट? मॉंटेग्यूसाहेबांनीं यावर सांगितलें, कीं अशा प्रकारच्या बिलाला व्हायसरॉय अडथळा आणील असें फारसें वाटत नाहीं! तरीपण आपल्या मागण्यांची दाद लावण्याकरितां तुम्हीं जर सनदशीर चळवळ केलीत व ती करतांना माझ्यावर किंवा विलायत सरकारवर किंवा हिंदुस्थान सरकारवर तुम्हीं जरी टीका केलीत तरी, माझी त्याला हरकत नाहीं. मात्र तुमच्या त्या असहकारितेच्या

चळवळीला माझा तीव्र विरोध आहे. ( नुकतेंच महात्मा गांधींनीं असहकारितेच्या चळवळीसंबंधीं एक जाहीर पत्रक काढलें होतें. ) या चळवळीमुळें देशांत शांतता नांदणार नाहीं असें मॉंटेग्यू म्हणाले. पटेलांनीं यावर स्पष्ट सांगितलें, कीं कॉंग्रेसच्या मागण्या तुम्हीं जर पुऱ्या केल्या नाहींत तर या चळवळीचा जोर वाढल्याशिवाय राहाणार नाहीं. परंतु पटेलांचा इशारा मॉंटेग्यूंनीं मनावर घेतला नाहीं. पंजाब प्रकरणाबद्दल तर त्यांनीं असें सांगितलें कीं ब्रिटिश प्रधानमंडळ त्या बाबतींत जें ठरवील तें मला प्रमाण आहे, तरी माझें तुम्हांला आग्रहाचें सांगणें आहे, कीं " झालें गेलें तें विसरा व पुढच्या कार्याला लागा." याप्रमाणें पटेलांनीं विलायतेंत प्रतिकूल परिस्थितीला धैर्यानें तोंड देऊन देशाची कामगिरी केली व त्याबद्दल त्यांना अनेकांनीं धन्यवाद दिले. त्यांतील कांहींचा उल्लेख खालीं करून हें प्रकरण पुरें करूं. कॉंग्रेसनें प्रसिद्ध केलेल्या शिष्टमंडळाच्या कामाच्या रिपोर्टांत म्हटलें—"आम्हांला सांगण्यास मुळींच संकोच वाटत नाहीं कीं कॉंग्रेसची आज्ञा पाळण्यांत आम्हांला जें कांहीं यश मिळालें तें केवळ पटेलांच्या प्रयत्नांमुळें मिळालें. म्हणून पटेलांनीं कॉंग्रेसचे जनरल सेक्रेटरी या नात्यानें शिष्टमंडळाची जी अपूर्व सेवा केली तिजबद्दल आम्हांला अतिशय आदर वाटत आहे व तो आम्ही नमूद करून ठेवीत आहों. त्यांनीं शिष्टमंडळाचें काम इतकें कौशल्यानें केलें, कीं त्यांत भांडणाचे प्रसंग क्वचितच उद्भवले आणि त्यांत एकंदरीनें ऐकमत्यच राहिलें असें म्हणावयास कांहींच हरकत नाहीं. आम्ही इतर मंडळी हिंदुस्थानांत यावयास निघालों व आमच्याबरोबर पटेलांनींहि निघण्याची तयारी केली होती. परंतु बिल निकालांत निघेपर्यंत ते केवळ कर्तव्यबुद्धीनें मागें राहिले ही गोष्ट विशेष उल्लेख करण्यासारखी आहे." मजूरपक्षानें कॉंग्रेसला तार पाठविली त्यांत म्हटलें—"कॉंग्रेसला शिष्टमंडळानें व विशेषतः कॉंग्रेसचे जनरल सेक्रेटरी पटेल यांनीं हिंदुस्थानच्या पूर्ण स्वराज्याच्या न्याय्य मागणीची जाणीव करून देण्यास आम्हांला जी मदत केली त्याबद्दल आम्हांला त्यांचेविषयीं अतिशय आदर वाटत आहे व तो व्यक्त करण्याची संधि आम्ही या तारेनें घेत आहोंत."

पटेलांनीं विलायतेंत राहून जी देशसेवा केली तिला हिंदी राष्ट्राच्या इतिहासांत खात्रीनें फार महत्त्वाचें स्थान आहे. हिंदुस्थानच्या वतीनें परदेशांत जागृति करणें ही किती आवश्यक गोष्ट आहे हें त्यांना व इतर सुज्ञ पुढाऱ्यांना त्या वेळीं पूर्णपणें पटलें. पटेलांची परदेशांत चळवळ करण्याची इच्छा अखेरपर्यंत कशी कायम होती व ती फलद्रूप होण्याकरितां त्यांनीं कसे जिवापाड परिश्रम केले हें आपल्याला पुढें ओघानें समजणारच आहे.

पटेल विलायतेंतून हिंदुस्थानांत परत आल्यानंतर त्यांचें ठिकठिकाणीं मोठें स्वागत करण्यांत आलें, व राष्ट्रीय सभेनेंहि त्यांच्या विलायतेंतील कार्याचा गौरवपर उल्लेख केला. परंतु थोड्याच अवधींत पटेलांना हिंदुस्थानांतील नव्या परिस्थितीला तोंड द्यावें लागलें. तिचा विचार पुढील प्रकरणांत करूं.

# पटेल व गांधीयुगाचा उदय

लोकमान्य टिळक विलायतेहून आल्यानंतर ते पुढल्या वर्षी म्हणजे १९२० साली ३१ जुलैच्या मध्यरात्रीं दिवंगत झाले; आणि दुसऱ्याच दिवशीं सकाळीं राजकारणांत ज्याला गांधीयुग म्हणतात त्याचा उदय झाला. हिंदुस्थानच्या अलीकडील इतिहासात हा योगायोग विलक्षण होता यांत शंका नाहीं. लोकमान्यांच्या आकस्मिक मृत्यूमुळें आपला मोठा आधार ढासळला असें पटेलांना सहाजिकच वाटलें. कारण त्यापूर्वी पांच-सहा वर्षे व विशेषतः विलायतेंत टिळक व पटेल हे राजकारणांत एकदिलानें वागत होते आणि त्यांचा स्नेह दृढ होत चालला होता. मिळेल तें जतन करावें व अधिक मिळविण्याकरितां सरकारशीं सर्व बाजूंनीं सारखा झगडा चालू ठेवावा हें उभयतांचें राजकीय धोरण असे. टिळक हे मोठे व्यवहारचतुर, उद्योगी, विचारवंत आणि राजकारणाचा सूक्ष्म अभ्यास करणारे कार्यकुशल मुसद्दी असल्यानें त्यांच्या मृत्यूमुळें देशाची सर्वांत मोठी हानि झाली असें त्यांचें मत होतें. ते त्या वेळीं एके ठिकाणीं म्हणाले, कीं "टिळक हे जनतेचे जन्मजात पुढारी होते. आधुनिक भारताचे ते निर्माते होते असें म्हटल्यास त्यांत कांहींच अतिशयोक्ति नाहीं. हिंदुस्थानावरील प्रेम हा त्यांचा धर्म होता. हिंदी स्वातंत्र्याच्या लढ्याचा इतिहास जेव्हां लिहिला जाईल, तेव्हां त्यांत टिळकांचें नांव अग्रभागीं चमकेल. "स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळविणारच." हा स्फूर्तिकारक संदेश त्यांनीं देशाला दिला. आणि मी हें निश्चित सांगतों कीं त्यांनीं स्वराज्य पुष्कळ वर्षें अलीकडे आणलें आहे." टिळकांचें धोरण पटेलांना कसें पटलें होते हें या उद्गारांवरून समजतें.

आतां, असहकारितेच्या चळवळीचा साद्यंत इतिहास लिहिणें हें या पुस्तकाच्या कक्षेंत येत नसल्यामुळें या चळवळीशीं पटेलांचा संबंध कसकसा आला व पटेलांनीं या वेळीं देशकार्य कोणतें साधलें एवढेंच आपणांला पाहा-

यचें आहे. परंतु प्रथमतः एक गोष्ट स्पष्ट केली पाहिजे, कीं पटेलांना गांधीं-बद्दल व्यक्तिशः आदर कितीहि असला तरी राजकारणांत दोघांचें एकमत झालें नाहीं. गांधींची राजकीय चळवळीची विशिष्ट पद्धति पटेलांना मना-पासून आवडणें शक्य नव्हतें. गांधींचें व्यक्तिमत्व त्यांच्या चळवळीचा जोर, त्यांचें राजकीय तत्त्वज्ञान व ध्येयवादित्व यांपुढें जरी पटेलांनीं अनेकदा नमतें घेतलें तरी तें देशांत एकोपा राहावा व कॉंग्रेसचें वर्चस्व टिकावें यासाठीं. एरवीं गांधींच्या धोरणाबद्दल आपलीं मतें त्यांनीं अनेकदा निर्भीड-पणें बोलून दाखवलीं आहेत. यासंबंधीं एक दोन उदाहरणें नमूद करण्यास हरकत नाहीं. गांधी-आयर्विन करार ही एक भयंकर चूक होती असें त्यांचें म्हणणें होतें. ज्या वेळीं हरिजनकार्याकरितां गांधींनीं तीन आठवड्यांचें उपोषण केलें व नंतर त्यांची बंधमुक्तता झाली तेव्हां त्या कार्याकरितां त्यांनीं कायदेभंगाची चळवळ बंद केली. या वेळीं पटेल व्हिएन्ना येथें मृत्युशय्येवर असतांना ते व सुभाषचंद्र बोस या उभयतांनीं एक पत्रक प्रसिद्ध केलें कीं "गांधींची ही वृत्ति म्हणजे कॉंग्रेसचें सध्यांचें धोरण अपयशीच ठरलें याचा कबुलीजबाबच होय. राजकीय पुढारी म्हणून महात्मा गांधी हे अय-शस्वी ठरले आहेत असें आमचें स्पष्ट मत आहे. नवीन तत्त्वावर व नवीन धोरणावर कॉंग्रेसची आमूलाग्र पुनर्घटना करण्याची वेळ येऊन ठेपली आहे. याकरितां राष्ट्राचें पुढारीपण बदलणें अवश्य झालें आहे. कारण महात्मा गांधी जोंपर्यंत पुढारी वर्गात आहेत तोंपर्यंत हा बदल त्यांच्या तत्त्वांविरुद्ध करणें म्हणजे त्यांच्यावरच अन्याय करण्यासारखें आहे. कॉंग्रेसमध्येंच जर हा बदल घडून आला तर उत्तमच. पण जर तसें न झालें तर कॉंग्रेसमध्येंच एक नवा जहालांचा गट स्थापन करावा लागेल. असहकारिता टाकतां यायची नाही पण जी असहकारिता करायची ती चढाईच्या स्वरूपाची आणि सर्व बाजूंनीं व्हायला पाहिजे."

आतां पटेल जेव्हां आपली कामगिरी संपून हिंदुस्थानांत आले त्या सुमाराची परिस्थिति कशी होती पाहा. नुकऱ्याच झालेल्या अमृतसरच्या कॉंग्रेसमध्यें मॉंटेग्यू-चेम्सफर्ड सुधारणा या अपुऱ्या, असमाधानकारक व निराशाजनक आहेत असें ठरविण्यांत आलें होतें तरीपण त्या राबवाव्या

व अशा रीतीनें काँग्रेसनें सरकारशीं प्रतियोगी सहकारिता करावी असें या काँग्रेसमध्यें ठरविण्यांत आलें. या प्रतिसहकारितेला यावेळीं गांधींची पूर्ण संमति होती. एवढेंच नव्हे तर या ठरावांत 'निराशाजनक' हा शब्द गाळला तर बरें असें त्यांना वाटत होतें. पण लोकमान्यांच्या वर्चस्वामुळें त्या वेळीं तो शब्द ठरावांत घालण्यांत आला. परंतु ही काँग्रेस संपल्यानंतर दोन तीन महिन्यांनीं जणूं काय इकडची सृष्टि तिकडे होऊन गेली! पंजाब प्रकरणाची चौकशी करण्याकरितां सरकारनें जी हंटर कमिटी नेमली होती तिचा रिपोर्ट बाहेर पडला आणि सरकारी अधिकाऱ्यांना गुन्ह्यांपासून संरक्षण देण्याचा कायदा पास करण्यांत आला. डायर व ओडवायर यांना निर्दोषी ठरविण्यांत आलें. इंग्लंडचे मुख्य प्रधान मि. लॉइड जॉर्ज यांनीं हिंदुस्थानांतील मुसलमानांना जीं अभिवचनें दिलीं तीं पूर्ण केलीं नाहींत आणि तुर्की साम्राज्याचा आशियांतील खलिफाच्या हद्दींतला भाग ब्रिटन व फ्रान्स यांनीं वांटून घेतला! याविरुद्ध हिंदी मुसलमानांनीं चळवळ सुरू केली. तिलाच खिलाफतीची चळवळ म्हणतात व तिला गांधींनीं उचलून धरलें. इतकें कीं १९२० सालच्या पहिल्या तीन महिन्यांचें राजकारण गांधींनीं या चळवळीभोंवतीं हिंडविलें! मार्चच्या आरंभीं मुसलमानांचें शिष्टमंडळ मौ. महंमदअल्ली यांच्या नेतृत्वाखालीं इंग्लंडला रवाना झालें. यानंतर तारीख १९ मार्च हा दिवस राष्ट्रीय शोकदिन मानून त्या दिवशीं उपवास, प्रार्थना व हरताळ पाळावा, असें ठरविण्यांत आलें. मुसलमानांची मनें संतुष्ट होतील अशा रीतीनें तुर्की साम्राज्याचा प्रश्न जर विचारांत घेतला जाणार नाहीं तर असहकारितेची चळवळ मी माझ्या नेतृत्वाखालीं सुरू करीन असें गांधींनीं जाहीर केलें.

अशा रीतीनें सरकारशीं असहकारितेची कल्पना ही खिलाफतीच्या प्रश्नापासून मुख्यतः उद्भवली. तरीहि मध्यंतरीं पंजाब प्रकरणीं हंटर कमिटीच्या रिपोर्टानें अन्याय दूर न करण्यांत दाखविलेला अदूरदर्शीपणा; आणि स्वराज्याचे अधिक हक्क न देण्यांत ब्रिटिश सरकारनें केलेला कृपणपणा यामुळेंहि सरकारशीं असहकारिता करण्याच्या कल्पनेला ज़ोर मिळाला. १९२० च्या उन्हाळ्यांत ही परिस्थिति अत्यंत गंभीर होऊन गेली!

पट्टाभिसीतारामय्या यांच्या शब्दांत सांगायचें तर या वेळीं "खिलाफत, पंजाब व अपुऱ्या सुधारणांचा गुप्त प्रवाह ही त्रिवेणी राष्ट्रीय असंतोषरूपी महापुरानें दुथडी भरून चालली." असहकारितेच्या कल्पनेला सर्व प्रांतांतून पाठिंबा मिळाल्यानंतर कलकत्ता येथील कॉंग्रेसच्या जादा अधिवेशनाला सुरवात झाली. हें अधिवेशन ४ ते ९ सप्टेंबर १९२० पर्यंत चाललें होतें. लाला लजपतराय अध्यक्ष होते. पटेल अर्थातच कॉंग्रेसचे जनरल सेक्रेटरी असल्यानें हजर होते. मुख्य ठराव असहकारितेसंबंधींचा होता. तो गांधीनीं मांडला व १८८६ विरुद्ध ८३४ मतांनीं पास झाला. सरकारी पदव्या व बिनपगारी अधिकाराचे हुद्दे सोडणें, सरकारी दरबार वगैरे सरकारी समारंभांस हजर न राहाणें, सरकारी किंवा सरकारची मान्यता असलेल्या शाळा कॉलेजांतून मुलें हळूहळू काढणें व त्याऐवजीं राष्ट्रीय शाळा कॉलेजें काढणें, ब्रिटिश कोर्टांवर हळूहळू बहिष्कार टाकणें व त्याऐवजीं खाजगी पंचायत कोर्टें स्थापणें, मेसापोटेमियांतील लष्करी, कारकुनी व मजूरदार पेशाच्या लोकांनीं भरती होण्याचें नाकारणें, कायदे कौन्सिलावर बहिष्कार घालणें, व परदेशी मालावर बहिष्कार घालणें या मुख्य गोष्टी ठरावांत होत्या. या ठरावाची अम्मलबजावणी कसकशी करावयाची त्याचा तपशील ठरविण्याकरितां म. गांधी, पंडित मोतीलाल नेहरू व विठ्ठलभाई पटेल यांची कमिटी नेमण्यांत आली. कॉंग्रेसच्या ठरावानुसार पटेलांनीं आपलें नांव कौन्सिल ऑफ स्टेटच्या उमेदवारींतून परत घेतलें आणि असेंब्लीच्या जागेचा राजीनामा देणारे पटेल हे पहिलेच सभासद होते. तसेंच त्यांनीं वांद्रें येथील लोकल बोर्डांतील सरकारनियुक्त जागेचा राजीनामा दिला.

येथवर प्रत्यक्ष हकीगत काय घडली ती सांगितली. आतां या वेळीं पटेलांचे स्वतःचे कोणते विचार होते तें सांगणें अवश्य आहे. वर सांगितल्याप्रमाणें ज्या वेळीं गांधी, नेहरू व पटेल यांची कमिटी नेमली जाऊन तींत चर्चेला सुरवात झाली तेव्हां चर्चेलाच मुळीं फाटे फुटूं लागले. कलकत्त्याच्या ठरावांतील कायदे कौन्सिलावरील बहिष्कार हीच मतभेदाची सर्वांत महत्त्वाची बाब होऊन बसली. गांधी व नेहरू एका बाजूला व पटेल दुसऱ्या बाजूला असें दुमत या कमिटीच्या रिपोर्टांत दिसून आलें.

पटेलांना कौन्सिलावरील बहिष्कार पसंत नव्हता. केवळ शिस्तीकरितां त्यांनीं काँग्रेसचा ठराव मान्य केला. चळवळीच्या सुरवातीला कोणत्याहि व्यक्तीला भलताच स्वार्थत्याग करायला लावूं नये, आरंभीं सर्व कांहीं बेताबेतानेंच घेतलें पाहिजे असें त्यांचें मत होतें. प्रथम उत्साहाचा पूर ओसरून जावा आणि पुढें मग सर्वत्र खडखडाट व्हावा किंवा किंकर्तव्य-मूढ जनता व्हावी हें राष्ट्रीय दृष्ट्या अनिष्ट होतें असें त्यांना वाटे. प्रत्येक निवडणूक लढवावी व निवडणुकीनंतर कौन्सिलांत काम करावें ही गोष्ट अत्यंत जरूरीची आहे असें ते समजत. त्यांचें म्हणणें असें कीं निवड-णुकीच्या प्रसंगानें राष्ट्रांतल्या विविध शक्ती एकवटण्याची संधि मिळते; आणि कौन्सिलावरील बहिष्कारानें एक मोठा तोटा असा कीं आपले प्रति-पक्षी कौन्सिलांत बिनविरोध निवडून येतात व आपणच काय ते लोकांचे प्रतिनिधि आहोंत असा दिमाख त्यांना मिरवितां येतो. बरें, कौन्सिलांतील काम जरी चालू असलें तरी चळवळीचीं इतर अंगं वाढविण्याला त्यामुळें नेहमीं मदतच होते, हा कौन्सिलप्रवेशाचा फायदाच समजला पाहिजे. असो. आतां यापुढील हकीगतीचें दिग्दर्शन करूं. कलकत्त्यास पास झालेला असहकारितेचा ठराव अधिक व्यापक स्वरूपांत डिसेंबरांत भरलेल्या नाग-पूरच्या काँग्रेसमध्यें सर्वांनुमतें पसार झाला. या काँग्रेसनें कौन्सिल-बहिष्कार गच्च आवळला. बऱ्याच जणांना गुदमरल्यासारखें झालें. पण तें गुदमरणें प्राणायामांतील कुंभकासारखें किंवा श्वास निरोधनासारखें होतें. कुंभकानें फुफ्फुसांची अंतःशुद्धि केल्यावर साचलेले विषारी वायू उच्छ्वासावाटे बाहेर येतात. त्याप्रमाणें परिणामीं कौन्सिल-बहिष्कार हा काँग्रेसच्या अंतःशुद्धी-पुरता फक्त उपयोगी ठरणार होता. तो कांहीं काँग्रेसचा प्रकृतिधर्म राहा-णार नव्हता. परंतु पटेलांना गांधींची असहकारिता मान्य होती तरी त्यांचा आत्यंतिक स्वरूपाचा कौन्सिल-बहिष्कार मान्य नव्हता. अर्थात् या काँग्रेसमध्यें त्यांनीं काँग्रेसमधील आपली सरचिटणिसांची जागा सोडली, त्या वेळीं काँग्रेसनें ठराव केला, कीं "आमचे सरचिटणीस श्री. व्ही. जे. पटेल यांनीं हिंदुस्थानांत व इंग्लंडांत जी स्वदेशाची बहुमोल कामगिरी केली त्याबद्दल ही राष्ट्रीय सभा त्यांचे कृतज्ञतापूर्वक आभार मानते." हा ठराव

मांडला जात असतांना जेव्हां पटेलांच्या नांवाचा उच्चार झाला तेव्हां नागपुरास जमलेल्या अफाट जनसमुदायानें टाळ्यांचा प्रचंड गजर करून पटेलांबद्दल आपला आदर व्यक्त केला.

कौन्सिल बहिष्कार ही गोष्ट जरी असहकारितेच्या कार्यक्रमांतील एक तीव्र मतभेदांची बाब होती तरी आश्चर्याची गोष्ट ही, कीं असहकारितेचे प्रणेते जे गांधी त्यांनासुद्धा कौन्सिल बहिष्कार हा असहकारितेच्या कार्यक्रमांत आपण कधीं पुढें घालूं अशी कल्पनाहि पूर्वी नव्हती. कौन्सिल बहिष्कार असहकारितेच्या ठरावांत कसा आणला गेला त्याची बोधप्रद हकीगत पुढें कांहीं दिवसांनीं पटेलांनीं स्वहस्तानें लिहून ठेवली. ते म्हणतात, "प्रश्न असा कीं कौन्सिल बहिष्कार कायम ठेवून आपण देशांत ऐक्य प्रस्थापित होण्याला मदत करूं शकूं कीं नाहीं? याला माझें उत्तर 'नाहीं' असें आहे. कांहीं म्हणा, या बहिष्कारानें आपण सरकारचें कंबरडें मोडूं अशी जी आशा पुष्कळांना वाटत होती ती फोल ठरली आहे. कौन्सिलांपासून दूर पळून जाण्यानें त्यांचा अंत होणें शक्य नाहीं. कौन्सिलांत जी इतर लोकांची भरती होते ती न होऊं दिल्यानेंच सध्यांचीं कौन्सिलें मोडण्याचा हेतु साध्य होणार आहे. आणि हें काम कॉंग्रेस व खिलाफत यांनीं निवडणुकी लढविण्याचा निर्धार केला तरच होईल. खरोखर पाहिलें तर असहकारिता सर्व हिंदुस्थानभर लागू करण्याची कल्पना जेव्हां प्रथम उद्भवली तेव्हां तींत कौन्सिल बहिष्काराच्या सूचनेचा मागमूसहि नव्हता.

"मला असें आठवतें कीं जून १९२० सालापर्यंत महात्माजींनीं 'नवजीवन' मध्यें 'मतदाराचीं कर्तव्यें' या विषयावर कांहीं लेख लिहिले होते व त्या लेखांतून त्यांनीं मतदारांनीं आपल्यांतील उत्तम माणसें कौन्सिलांत पाठवावीं असें प्रतिपादन केलें होतें व असा एक लेख ९ जून १९२० च्या 'यंग इंडियां'त प्रसिद्ध झाला होता. त्या वेळीं एक तपशीलवार योजना मांडण्याकरितां एक कमिटीहि नेमली होती. पण त्यानंतर झालेल्या एका घटनेनें पारडें फिरलें. त्या वेळीं लाला लजपतराय यांचें एक पत्र प्रसिद्ध झालें होतें. त्यांत त्यांनीं पंजाबांतील परिस्थिति निवेदन करतांना सांगितलें, कीं

" पंजाबांतील मार्शल लॉ पुकारणाऱ्या अधिकाऱ्यांना शिक्षा नाहीं एवढेंच नव्हे तर त्यांची बदलीहि करण्यांत आली नाहीं व म्हणून पंजाबच्या कायदे-मंडळांत शिरकाव केल्यानें कांहीं उपयोग होणार नाहीं, बाहेर राहूनच कांहीं तरी उपयुक्त कार्य करतां येईल." महात्मा गांधींनीं तें पत्र वाचलें. लाला लजपतराय यांनीं 'वंदे मातरम्' ह्या उर्दू पत्रांत आपण निवडणुकीला उभे राहाणार नसल्याचा निर्धार प्रकट केला होता. लालाजींची सूचना गांधींना पसंत पडून त्यांनीं कायदे मंडळावरील बहिष्कार पंजाबपुरताच न ठेवतां साऱ्या हिंदुस्थानला लागू केला. कौन्सिल बहिष्काराचा पूर्वेतिहास हा असा आहे. यासंबंधीं पुढें वेळोवेळीं सांगावें लागणारच आहे. तेव्हां तूर्त हा विषय येथेंच ठेवून पुढील हकीगतीकडे वळूं.

## काँग्रेस वर्किंग कमिटीचा जन्म

नागपूरच्या काँग्रेसमध्यें असहकारितेचा ठराव ही जशी एक महत्त्वाची गोष्ट झाली तशीच दुसरी विशेष गोष्ट म्हणजे या राष्ट्रीय सभेत तिची घटना ठरविण्यांत आली. राष्ट्रीय सभेची ही नवीन अशी पहिली घटना ठरविण्याचें काम गांधींनीं ज्या पुढाऱ्यांवर सोंपविलें त्यांत श्री. केळकर व श्री. पटेल हे प्रमुख होते. या घटनेस अनुसरून राष्ट्रीय सभेचें क्रीड नवीन करण्यांत आलें. "न्याय्य व शांततेच्या मार्गांनीं स्वराज्य मिळविणें" हें तें नवें क्रीड होय व तें अद्यापिहि कायम आहे. तसेंच या घटनेप्रमाणें भाषावार प्रांतरचना करण्यांत आली व काँग्रेस कमिटयांविषयीं नियम करण्यांत येऊन त्यांची पुनर्घटना झाली. ऑल इंडिया काँग्रेस कमिटीच्या सभासदांची संख्या वाढविण्यांत आली. या नव्या घटनेचा आणखी एक विशेष म्हणजे ऑल इंडिया काँग्रेस कमिटींतून निवडलेल्या पंधरा सभासदांची एक वर्किंग कमिटी नेमण्याचें ठरलें. काँग्रेसच्या दैनंदिन कामाकडे पाहाण्याच्या दृष्टीनें वर्किंग कमिटीच्या नेमणुकीमुळें मोठीच क्रांति घडून आली असें म्हणण्यास हरकत नाहीं.

नागपूरच्या काँग्रेसनंतर देशांत असहकारितेचा कार्यक्रम अमलांत आणण्याचे प्रयत्न जोरानें सुरू झाले. त्यांत शेंकडों वकिलांनीं आपला धंदा सोडला. नवीन राष्ट्रीय शाळा—कॉलेजें स्थापन करण्यांत आलीं. कायदे

कौन्सिलावरील बहिष्कार तर काँग्रेसनें पूर्णपणें पाळला. १९२१ च्या जानेवारींत डयूक ऑफ कॉनॉट हिंदुस्थानांत आले. तेव्हां त्यांच्या आगमनावर लोकांनीं स्वयंस्फूर्तीनें प्रचंड प्रमाणावर बहिष्कार घालून हरताळ पाळला. इकडे डयूकसाहेबांची स्वारी रिकाम्या रस्त्यांतून जात असतांना दुसरीकडे पुढाऱ्यांच्या नेतृत्वाखालीं टोलेजंग सभा भरूं लागल्या. या वेळीं उत्साहाचा उपयोग काँग्रेसनें विधायक कार्याकडे करण्याचें ठरविलें. व बेझवाडा येथें ३१ मार्च व १ एप्रिल रोजीं ऑल इंडिया काँग्रेस कमिटीनें खालील योजना मुख्यतः ठरविल्या :– (१) एक कोट रुपये गोळा करणें, (२) एक कोट काँग्रेसचे सभासद करणें (३) हिंदुस्थानांतील खेडयापाडयांतून व घराघरांतून ३० जूनपर्यंत वीस लाख चरख्यांचा प्रसार करणें; या त्या महत्त्वाच्या योजना होत्या. यापैकीं एक कोट रुपये गोळा करण्याची योजना फार थोडया वेळांत सफळ झाली. पटेलांनीं मुंबई व गुजराथ या भागांत फंड गोळा करण्यांत सुंदर मदत केली. अवघ्या आठ आठवडयांत एवढी थोरली रक्कम राजकीय कार्याकरितां गोळा झाल्याचें हें पहिलेंच उदाहरण होय. पुढें २८, २९ व ३० जुलै रोजीं मुंबईला ऑल इंडिया काँग्रेस कमिटीची सभा होऊन टिळक स्वराज्य फंडाकरितां एक कोट पंधरा लाख रुपये जमा झाले याबद्दल व चरख्यांची संख्या जवळ जवळ वीस लाख झाल्याबद्दल आनंद प्रदर्शित करण्यांत आला. तसेंच या सभेनें सर्वानुमतें परदेशी कापडावरील बहिष्कार मंजूर केला; व तो बहिष्कार कसा अंमलांत आणावा याचीं साधनेंहि ठरविलीं. त्यासंबंधीं या सभेनें मुख्यतः असें ठरविलें, कीं राष्ट्रीय शिक्षणसंस्थांचा उपयोग चरख्यावर सूत काढणें व हातमागावर कापड विणणें या गोष्टींकडे शक्य तों करावा व ज्या घरांत अद्याप चरखे गेले नाहींत त्यांत त्यांचा शिरकाव करावा. याकरितां परदेशी कापडाच्या संपूर्ण बहिष्काराच्या चळवळीवर व खादीच्या पैदाशीवर काँग्रेसनें आपली शक्ति खर्च करावी असें ठरलें. पण यांपैकीं बऱ्याच गोष्टांशीं पटेलांचा मतभेद होता. परदेशी कापडावर बहिष्कार घालावा हें तत्त्व पटेलांना पूर्णपणें मान्य होतें. परंतु हातानें चरख्यावर सूत काढून खादी काढणें या गोष्टीला त्यांचा विरोध होता. परदेशी कापडावरील बहिष्कार तीव्र स्वरूपांत

दाखविण्याला खादी हें एक प्रकारचें राजकीय हत्यार आहे. खादी हें राजकीय उन्नतीचें साधन आहे, आर्थिक उन्नतीचें नव्हे, असें त्यांना वाटे. कारण पटेलांचें असें ठाम मत होतें, कीं हिंदुस्थान राजकीय दृष्ट्या स्वतंत्र झाल्याशिवाय इतर कोणत्याहि मार्गांनीं किंवा साधनांनीं त्याची आर्थिक किंवा सांपत्तिक स्थिति सुधारणें शक्य नाहीं. किंबहुना हिंदुस्थानची आर्थिक उन्नति करण्याकरितांच तर राजकीय झगडा सर्व बाजूंनीं व सर्व साधनांनीं चालविला पाहिजे व त्यांत खादी हें एक केवळ साधन—मात्र तें प्रभावी असें—एक साधन आहे. खादी वापरायची ती समजून उमजून वापरली तरच स्वराज्य मिळेल असें त्यांचें म्हणणें होतें. खादी ही आर्थिक परिस्थिति सुधारणारी किमया आहे ही समजूत त्यांना भ्रामक वाटे आणि म्हणून ज्या वेळीं वर लिहिल्याप्रमाणें बेझवाड्यास व मुंबईस ऑल इंडिया काँग्रेस कमिटीच्या सभा होऊन त्यांनीं खादीचे एकांतिक स्वरूपाचे ठराव पास केले तेव्हां पटेलांनीं अर्थात्‌च निर्भीडपणें आपलें मत प्रदर्शित केलें. त्यांनीं सांगितलें कीं या दोन्ही सभांचे ठराव काँग्रेसच्या मूळ ठरावाहून निराळे व एकांडे आहेत. आतां मूळ कलकत्त्याच्या काँग्रेसचा या बाबतींतला ठराव असा होता, कीं गिरण्यांतलें कापड हें सध्या पुरवठ्याला येत नाहीं व आणखी बरींच वर्षे येणार नाहीं म्हणून चरख्यावर सूत काढणें व विण- या गोष्टी मोठ्या प्रमाणावर सुरू केल्या पाहिजेत. म्हणजे गिरणीच्या काप- डाला भर म्हणून चरख्यावर सूत काढायचें एवढाच त्याचा अर्थ होता, असें पटेलांचें म्हणणें होतें. गिरणींतून कापड पुरेसें निघो वा न निघो, चरख्यावर हातानें सूत काढलेंच पाहिजे, असा काँग्रेसच्या ठरावाचा अर्थ होत नाहीं. पण गांधींनीं मात्र असा अर्थ केला व तोच अर्थ त्यांनीं बेझवाड्यास व मुंबईस झालेल्या ठरावांत आणला. भविष्यकाळीं हिंदुस्थानांत घरोघर चरखे फिरत राहावे हा विचार करणें पटेलांना अशक्य वाटे. कारण सूत काढण्यानें स्वराज्य मिळणें तर लांबच राहिलें पण चालू यंत्रयुगांत महात्मा गांधींचें हें हातसुताच्या खादीचें तत्त्वज्ञान हिंदुस्थानला फायद्याचें नाहीं, असें पटेलांना वाटत होतें. जग हें ज्या दिशेनें जात आहे त्याच्या विरुद्ध दिशेनें हिंदुस्थानला नेऊं म्हटलें तरी तें शक्य नाहीं.

हिंदुस्थानला जगापासून असें तुटक वागतां येणार नाहीं. फारतर हातमागावर कापड विणणें ही गोष्ट मात्र सध्या शक्य व व्यवहार्य आहे. ज्यांना इतर कोणत्याहि धंद्यांत दोन आणेसुद्धा रोज मिळत नाहीं त्यांनीं सूत काढायाला हरकत नाहीं. परंतु याचा अर्थ प्रत्येकानें सूत काढीत बसलें पाहिजे व त्याकरितां घरोघरीं चरखे पाहिजेत असा होत नाहीं. हिंदुस्थानचें दारिद्र्य सूत कातण्यानें दूर होणारें नाहीं, तर तें दूर करण्याला राजकीय सत्ताच हातीं आली पाहिजे. परंतु त्यापूर्वी दारिद्र्यनाशाचे तात्रडतोबीचे असे उपाय त्यांनीं जें सुचविलें ते असें, कीं लोकांनीं विणण्याच्या धंद्याकडे अधिक लक्ष द्यावें; त्याकरितां विणकरांची संघटना झाली पाहिजे. तसेंच शिवणकाम, नक्षीकाम, सुतारकाम, चामडीं कमावणें, कांचकाम या धंद्यांना हळूहळू उत्तेजन दिलें पाहिजे. म्हणजे सूत काढण्यानें रोजीं जे दोन आणे मिळायचे त्यापेक्षां कांहींतरी अधिक लोकांच्या पदरांत पडावें. शेतीचीं साधनें सुधारलीं पाहिजेत, गरीब लोकांवरील कर कमी केले पाहिजेत, दारूबंदी अमलांत आणली पाहिजे, स्वदेशीला उत्तेजन पाहिजे, विदेशी भांडवलदारांना वाव न दिला पाहिजे व निरक्षरता घालविली पाहिजे. परंतु या सर्व गोष्टी समाधानकारक रीतीनें साधायच्या तर राजकीय सत्ता हातीं पाहिजे व तीच मिळविण्याकरितां सर्व बाजूंनीं प्रयत्न होणें अवश्य आहे. परंतु आर्थिक स्थिति सुधारल्याशिवाय आणि दारिद्र्य नाहींसें झाल्याशिवाय स्वराज्य मिळायचें नाहीं असाच जर आग्रह आपण घेऊन बसलों तर मात्र आपली स्थिति दुर्घट आहे. वस्तुतः याच्या उलट प्रकार आहे. दारिद्र्य नाहींसें व्हावें एवढ्याकरितां आपल्याला स्वराज्य पाहिजे. आपण दरिद्री व हीन दीन कां झालों ? तर आपल्या हातची राजकीय सत्ता गेली म्हणून. मग असें जर आहे तर ती सत्ता परत आपल्याला मिळाल्याशिवाय आपलें दारिद्र्य दूर होणें शक्य नाहीं हें उघड आहे. दारिद्र्याच्या मुळाशीं परकीय सत्ता आहे व एवढ्याकरितां जितके धंदे म्हणून सुचवितां येतील तेवढ्या धंद्यांत लोकांनीं पडलें पाहिजे. केवळ सूत काढण्यानें आपला कार्यभाग होणार नाहीं. वर जे धंदे सांगितले त्याशिवाय आणखी इतर उद्योग म्हणजे, साखरेचे कारखाने काढणें, कागद, साबण, तेलं, मेणबत्त्या, आगपेट्या यांचे कारखाने काढणें हे होत.

याच्या उलट चरख्यांची चळवळ मुंबई येथें झालेल्या कॉंग्रेस कमिटीनें ठराव करून अगदीं दुसऱ्या टोकाला नेली होती. असो.

## बहिष्कार—परदेशी कापडावर कीं ब्रिटिश मालावर?

स्वदेशी व विशेषतः चरख्यावर काढलेल्या सुताची खादी यासंबधीं पटेलांचे विचार कोणते होते तें येथवर सांगितलें. आतां याबरोबरच परदेशी मालावरील बहिष्कारासंबंधानें पटेलांचें काय मत होतें व त्या बाबतींतहि गांधी आणि त्यांचे अनुयायी व पटेल यांची विचारभिन्नता कशी होती हें पाहाणें उद्बोधक आहे पटेलांच्या मतें सर्वच ब्रिटिश मालावर बहिष्कार घालणें अवश्य होतें. ब्रिटिशांच्या बाबतींत बहिष्कार हा फक्त ब्रिटिश कापडापुरताच मर्यादित करतां कामा नये. मात्र इतर देशांच्या फक्त कापडावर बहिष्कार घालावा. उलट गांधींचें म्हणणें कापडाखेरीज कोणत्याहि ब्रिटिश वस्तूवर बहिष्कार घालूं नये. कारण नाहींतर सरसकट ब्रिटिश मालावरील बहिष्काराची चळवळ ही द्वेषमूलक ठरते. मूळपासून महात्मा गांधी हे अनत्याचारी वृत्तीचा पुरस्कार करणारे होते व म्हणून बहिष्काराच्या कल्पनेस त्यांचा विरोध होता व ते फक्त स्वदेशीचाच प्रचार करण्याच्या बाजूचे होते. पुढें असहकारितेच्या काळांत त्यांनीं परदेशी कापडावरील बहिष्कार हा खादीला उत्तेजन देण्याकरितां म्हणून स्वीकारला. गांधींच्या या धोरणाची मजल तर येथवर गेली, कीं पुढें गयेच्या कॉंग्रेसमध्यें विलायती मालावरील बहिष्काराचा निषेधहि करण्यांत आला! बहिष्काराचा ठराव त्या कॉंग्रेसमध्यें मांडला गेला तेव्हां गांधींचे कट्टर अनुयायी श्री. राजगोपाळाचारी यांनीं त्याला जोराचा विरोध करून तो ठराव उलथून पाडला! व सामान्यतः जे लोक अशा ठरावाविरुद्ध असायचे नाहींत, किंबहुना ज्यांनीं अशा बहिष्काराचा उपदेश देशाला आजवर सतत केला अशांनींहि ठराव उलथून पाडण्यास मदत केली. स्वदेशीला खरेंखुरें उत्तेजन मिळायचें तर तें गांधींच्या या निष्प्रतिकारी धोरणानें न मिळतां, बहिष्काराच्या प्रतिकारी चळवळींनेंच मिळण्यासारखें असतें, अशी पटेलांची दृढ समजूत होती व म्हणून साऱ्या ब्रिटिश मालावर कडकडीत बहिष्कार घालून स्वदेशीची जोपासना करण्याचा एक मार्ग साधावा असें त्यांचें म्हणणें होतें. परंतु या ठिकाणीं हेंहि सांगितलें पाहिजे, कीं ब्रिटिश

मालावरील बहिष्कार हें केवळ आर्थिक उन्नतीचेंच अंग आहे असें नसून त्याच्या बुडाशीं पटेलांना राजकीय हेतुहि दिसत होता. जे लोक आपल्यावर राज्य करतात त्यांच्याच मालावर बहिष्कार घातल्यानें लोकांची प्रतिकारबुद्धि जागृत होते, व कोणत्याहि राजकीय लढ्यांत ही बुद्धि जागृत होणें ही एक अवश्य गोष्ट आहे असें त्यांचें मत होतें. आणि म्हणूनच पुढें ज्या स्वराज्य पक्षांत विठ्ठलभाई पटेल सामील झाले त्याचेंहि धोरण स्वदेशी व बहिष्कार या बाबतींत पटेलांचेप्रमाणें होतें. असो. या लहानशा प्रकरणांत येथपर्यंत पटेल व गांधीवाद यांच्यामधील मतभेदाची चर्चा केली. आतां ही चर्चा केवळ तात्त्विक स्वरूपाची झाली. कारण हा मतभेद सांगण्यांत पटेलांनीं प्रत्यक्ष कार्य कोणतें केलें त्यासंबंधीं उल्लेख या प्रकरणांत आलेला नाहीं. म्हणून आतां पुढील प्रकरणांत पटेलांनीं गांधीयुगाच्या पहिल्या दोन तीन वर्षांत कोणतें प्रत्यक्ष कार्य केलें त्याचें दिग्दर्शन करूं.

# पटेल व कायदेभंगाची चळवळ

मागील प्रकरणांत पटेल व गांधीवाद यांजमधील तात्त्विक मतभेदांचीच चर्चा मुख्यतः करावी लागली. परंतु तसें प्रथम करणें आम्हांला अपरिहार्य वाटलें. कोणाच्याहि कार्याची माहिती सांगतांना त्यांत त्याचे हेतू कोणते होते हें जर आपल्याला आधीं समजलें तर गैरसमजाला जागा राहात नाहीं, व बुचकळल्यासारखें होत नाहीं. पटेलांचे कार्य सांगण्यापूर्वींहि आम्हीं हीच रीत लागू केली. पटेलांचें कार्य सांगायचें असहकारितेच्या काळांतलें. परंतु त्या असहकारितेचे प्रणेते व पुरस्कर्ते जे महात्मा गांधी त्यांच्याशीं मतभेद असून काम मात्र त्यांच्याबरोबर करायचें ही राजकारणाची तारेवरील कसरत दिसायला जितकी चमत्कृतिपूर्ण तितकीच ती कठीण होती. परंतु पटेलांनीं आपल्या मुत्सद्दीगिरीनें ती उत्तम साधली हें त्यांच्या कार्यावरून कोणालाहि मान्य करतां येण्यासारखें आहे.

महात्मा गांधींच्या प्रभावी नेतृत्वाखालीं असहकारितेची चळवळ देशांत वणव्यासारखी पसरूं लागली व त्या वणव्यानें देशांतील आलस्य जळून भस्म होऊं लागलें. सरकारनें दडपशाही सुरू केली आणि हजारोंनीं राजकीय कैदी तुरुंगांत जाऊं लागले. १७ नोव्हेंबर १९२१ रोजीं प्रिन्स ऑफ वेल्स हिंदुस्थानांत उतरले तेव्हां त्यांच्या आगमनावर साऱ्या हिंदुस्थानांत बहिष्कार घातला गेला. अलीबंधूंना पकडण्यांत आलें व त्यांची तुरुंगांत रवानगी झाली. १९२१ च्या अहमदाबाद काँग्रेसचे नियोजित अध्यक्ष देशबंधु चित्तरंजन दास यांनाहि ती काँग्रेस भरण्यापूर्वी अटक होऊन कारावास सोसावा लागला. लाला लजपतराय, जवाहरलाल नेहरू यांसारख्या पुढाऱ्यांनाहि शिक्षा झाल्या. अर्थात् काँग्रेसनेंहि आपल्या कार्यक्रमाची अंमलबजावणी अधिक करडी करण्याची ठरविली तर त्यांत आश्चर्य नाहीं. असहकारितेच्या चळवळींत आतां कायदेभंगालाच प्रमुख स्थान द्यायचें असें या राष्ट्रीय सभेनें ठरविलें. हिंदुस्थानच्या सध्याच्या

बेजबाबदार सरकारला स्थानभ्रष्ट करून त्या ठिकाणीं लोकशाही स्वराज्य स्थापायचें आहे. अर्थात् ही गोष्ट साध्य होण्याकरितां सशस्त्र बंड करणें शक्य नाहीं. म्हणून आतां सविनय कायदेभंग करणें हाच काय तो सुधारलेल्या जगानें आचरलेला व प्रभावी असा उपाय उरला आहे. मात्र अशा प्रकारचा वैयक्तिक किंवा सामुदायिक कायदेभंग करायचा तर लोकांनीं अनत्याचाराचें तत्त्व पूर्णपणें पाळलें पाहिजे, शांततेच्या वातावरणाची चळवळीला फार जरूरी आहे असा इशारा या काँग्रेसनें दिला.

## कायदेभंगाचा ठराव व अंमलबजावणी

पटेलांनीं या अहमदाबादच्या काँग्रेसमध्यें प्रमुखपणानें भाग घेतला. कायदेभंगाचा ठराव गांधींनीं मांडला आणि पटेलांनीं त्या ठरावाला पुष्टि दिली. त्या वेळीं ते म्हणाले, कीं "मी या ठरावाला अनुमोदन देतों, एवढेंच नव्हे तर या ठरावांतील प्रत्येक शब्दाला माझी संमति आहे. हिंदुस्थानाला युद्ध करून स्वराज्य मिळेल किंवा ब्रिटिशांची देणगी म्हणून मिळेल असे जे उद्गार लॉर्ड रीडिंग साहेबांनीं कलकत्त्याच्या भाषणांत काढले त्यांना या ठरावानें चोख उत्तर दिलें आहे. तुम्हीं हा ठराव मान्य केलात तर त्याचा अर्थ असा, कीं तुम्ही ईश्वराला साक्ष ठेवून तुरुंगांत जाण्यास आणि देशासाठीं शांततेनें आणि आनंदानें मरण्यास तयार झालांत. अनत्याचाराचें तत्त्व मान्य केल्याशिवाय तुम्हांला हा ठराव संमत होऊंच शकत नाहीं. दुसऱ्याला कोणत्याहि प्रकारचें शारीरिक किंवा मानसिक दुःख आतां आपण देतां कामा नये. आम्हांला स्वराज्य किती मुदतींत मिळेल याचें कोणत्याहि प्रकारचें आश्वासन ब्रिटिशांकडून मिळालेलें नाहीं. तेव्हां स्वाभाविकच हिंदी जनता आतां त्याबद्दल निराश झाली असून स्वराज्य मिळविण्याला अत्युत्सुक झाली आहे." याप्रमाणें कायदेभंगाचा ठराव काँग्रेसनें मान्य केल्यावर महात्मा गांधींना काँग्रेसनें असहकारितेच्या चळवळीचे सर्वाधिकारी नेमलें व त्यांच्या पश्चात् त्या पदावर कोणीं राहावें हें ठरविण्याचा अधिकारहि काँग्रेसनें गांधींनाच दिला.

अहमदाबादच्या काँग्रेसनंतर कायदेभंगाच्या ठरावाची अंमलबजावणी करण्याची वेळ आली. जानेवारी व फेब्रुवारीचा पूर्वार्ध साऱ्या हिंदुस्थानांत

कायदेभंगाच्या तयारीचे घेड दुप्पट जोमानें व निश्चयानें, कसून गिरविले जात होते. मोठमोठ्या पुढाऱ्यांच्या धरपकडी व दडपशाहीचीं इतर कृत्यें सरकारनें चालविली होतीं. तरी त्यांनीं डगमगून न जातां मोठमोठ्या सभा भरवून त्यांचा जाहीर निषेध काँग्रेस कार्यकर्ते करीत होते. कलकत्ता, अलाहाबाद, लखनौ व इतरहि शेंकडों ठिकाणीं स्वयंसेवकांचीं पथकें पदकें लावून स्वराज्याचीं निशाणें घेऊन हमरस्त्यावरून फिरत व पोलीस चौकीपाशीं येत. तरी त्यांतल्या बहुतेकांना मोकळें सोडलें जाई. राजकीय बंदिवानांनीं तुरुंग भरून चालले होते. हे सर्व प्रकार पाहून " आपण अगदीं गोंधळून गेलों आहोंत व अगदीं त्रस्त झालों आहोंत " असें व्हाइसरॉयसाहेबांना डिसेंबर महिन्यांत कबूल करावें लागलें. आणि आतां अहमदाबादची काँग्रेस झाल्यानंतर सारेंच्या सारें राज्ययंत्रच कोसळून मोडून तोडून छिन्न भिन्न होणार अशी सकारण भीति व्हाइसरॉयांच्या मनांत डोकावूं लागली. मध्यंतरीं मालवीय वगैरे कांहीं पुढाऱ्यांनीं तडजोडीचे प्रयत्न चालविले होते, परंतु शेवटीं ते सर्व फिसकटले व कायदेभंगाच्या निश्चयाला जोर आला. कायदेभंगाच्या चळवळींतील महत्त्वाची बाब म्हणजे करबंदी. तिच्याकडे आतां देशाचें लक्ष लागलें. गुजराथेंतील बार्डोली तालुक्यांत या चळवळीला सुरवात करायची असें गांधींनीं ठरविलें. व त्याप्रमाणें २९ जानेवारी १९२२ रोजीं बार्डोलीनें हा सामुदायिक कायदेभंग करण्याचें निश्चित केलें. स्वतःच्या प्रत्यक्ष देखरेखीखालीं सामुदायिक कायदेभंगाचा हा पहिला प्रयोग करण्याचा गांधींचा विचार होता. त्या तालुक्यामध्यें दक्षिण आफ्रिकेंतून आलेले पुष्कळ हिंदी लोक होते. गांधींजींचें धोरण त्यांना परिचित होतें. हा प्रयोग हिंदुस्थानांतील इतर प्रांतांनीं पाहावा व त्यापासून सामर्थ्य व स्फूर्ति घ्यावी अशी गांधींची इच्छा होती. या चळवळीकडील लक्ष दुसरीकडे वेधलें जाईल असें कोणतेंहि कृत्य करण्यांत येऊं नये, असेंहि गांधींचें म्हणणें होतें.

आतां या बार्डोलीच्या कायदेभंगासंबंधीं पटेलांचे विचार काय होते तें समजणें मोठे उद्बोधक आहे. प्रथम ही एक गोष्ट स्पष्ट केली पाहिजे कीं आधीं चळवळींत पाय रोवायचा तर पूर्ण विचार करून रोवला पाहिजे आणि एकदा रोवला कीं, तो मागें घेतां कामा नये असें पटेलांचें धोरण

होतें. बार्डोलीनें केलेला निश्चय अंतिम आणि अचल आहे असें गांधींचें म्हणणें होतें. पण पटेलांसारख्या चाणाक्ष आणि अनुभवी मुत्सद्द्याला मात्र तसें वाटलें नाहीं. हा एक चमत्कारिक योगायोग होता. कारण बार्डोलीचा कायदेभंगाचा संग्राम या वेळीं सुरू करणें बरोबर नाहीं असें पटेलांना वाटत होतें. यासंबंधीं पटेलांचे मित्र इंदुलाल याज्ञिक यांनीं एक आठवण नमूद केली आहे. खाजगी चर्चा चालू असतां पटेल याज्ञिक यांना म्हणाले, " गांधींना काय सांगावें ? खेड्यांतला एकादा गोम्या नाहीं तर सोम्या उठतो आणि त्यांना सांगत सुटतो, कीं हजारों खेडूत बंड करण्याला आणि अंगावर गोळ्या घेण्याला तयार आहेत. आणि त्या सांगण्यावर गांधींचा विश्वास बसतो ! याज्ञिक, गांधीजी हे अनुभवानें नवे आहेत. पण मला गुजराथेंतल्या खेडुतांचा कित्येक वर्षांचा अनुभव आहे. जर का सरकारनें मार्शल लॉ पुकारला तर एकहि खेडूत जिवावर उदार होणारा दिसणार नाहीं ! " निदान त्या वेळेला तरी गांधींना वाटत होती तितकी खेडुतांची तयारी नव्हती असा पटेलांच्या बोलण्याचा रोख होता. अर्थात् पटेलांचें हें वैयक्तिक मत होतें हें लक्षांत ठेवणें जरूर आहे. कारण ज्या वेळीं कॉंग्रेस कमिटीनें बार्डोलीच्या कायदेभंगास संमति दिली त्या वेळीं पटेलांनीं शिस्तीचें पालन करून त्या संग्रामांत पुढाकार घेतला. यापूर्वी पूर्ण चौकशी करून बार्डोलीच्या कायदेभंगाचा निर्णय तहकूब करणेंच योग्य आहे असें जरी पटेलांना आढळून आलें होतें तरी केवळ कर्तव्य म्हणून ते कॉंग्रेसच्या आज्ञेबाहेर गेले नाहींत. आणि २९ जानेवारीला तर खुद्द पटेलांच्या अध्यक्षतेखालीं बार्डोली तालुक्यांतील रयतांची सभा भरून कायदेभंग सुरू करण्याचें ठरून पहिला पथकाचें नेतृत्व पटेलांनाच देण्यांत आलें.

## चळवळीची अनपेक्षित तहकुबी

मानवी जीवनांत अशा प्रकारचे प्रसंग कांहीं कमी घडतात असें नाहीं. मग पटेलांच्या आयुष्यांतहि असे प्रसंग आले तर त्यांत आश्चर्य नाहीं. आपलें मत आणि आपलें कर्तव्य यांच्यातला हा विशेष विरोध हजारों वर्षांच्या इतिहासांत सुद्धा आपल्याला ठिकठिकाणीं दिसून येतो. आणि ज्याच्या त्याच्या स्वभावरचनेप्रमाणें कालमान पाहून कोणी मनाकडे झुकतो

तर कोणी कर्तव्याकडे वळतो. कोणी आपलें मत समाजाला पटवून देऊन त्या मतानुसार समाजाची कर्तव्याची दिशा बनवितो. तर कोणी समाजाला त्याच्या निराळया इच्छेप्रमाणें वागूं देऊन शेवटीं आपलें मतच कसें प्रभावी आहे याची समाजाला निश्चिति करून देतो. बार्डोलीच्या बाबतींत तरी या मागाहून सांगितलेल्या प्रकारांत पटेल बसूं शकतात. कारण शेवटीं अकल्पितपणें त्यांचेंच म्हणणें खरें झालें ! गांधींनीं मुळीं बार्डोलीचा कायदेभंगच एकदम रद्द केला ! याप्रमाणें बार्डोलीचा बार फुकट गेला. मग त्याची कारणमीमांसा कोणी कशीहि करो. तिकडे संयुक्तप्रांतांत ५ फेब्रुवारीला चौरीचौऱ्याला दंगा झाला, अर्थात् कायदेभंगाला जें शांततेचें वातावरण हवें तें राहिलें नाहीं. लोक अनत्याचारी पूर्णपणें बनलेले दिसत नाहींत म्हणून ही चळवळ माघारीं घ्यावी लागत आहे असें गांधींनीं सांगितलें. तसेंच त्यापूर्वी २३ जानेवारीला युवराज मद्रासला गेले असतां तेथेंहि दंगा झाला होता. या शेंकडों मैलांवर झालेल्या दोन दंग्यांचीं कारणें दाखवून बार्डोली येथें १२ फेब्रुवारीला भरलेल्या वर्किंग कमिटीच्या सभेनें कायदेभंगाची चळवळ बार्डोलीला व इतर ठिकाणीं तहकूब ठेवली असल्याचें जाहीर केलें. सारेंच अकल्पित व अघटित ! पटेलांच्याच मताचा पण एखादा पोकळगर्वी मनुष्य असता तर त्याला "जितं मया" म्हणून या वेळीं आनंद झाला असता ! पण एकदा पुढें टाकलेलें पाऊल मागें फिरवायचें नाहीं असा पटेलांचा बाणेदार स्वभाव असल्यानें त्यांना गांधींच्या या आकस्मिक निर्णयामुळें दुःख व आश्चर्य वाटलें. गांधींच्या मनावर आयत्या वेळीं असा मृदुतेचा व कारुण्याचा पगडा बसावा हें त्यांना इष्ट वाटलें नाहीं. त्या प्रसंगाचें वर्णन करतांना पटेल म्हणाले, " गांधींनीं आपल्या विचाराप्रमाणें एकदम फतवा बाहेर काढला आणि ही लढत साऱ्या हिंदुस्थानांत बंद केली. खरोखर ही लढत बार्डोलीला चालू ठेवली असती तर आम्हीं हार खाल्ली नसती. निदान आमच्यातलं तेज तरी जगाला प्रकट केल्याशिवाय आम्ही राहिलों नसतों. पण केवळ गांधींच्या शब्दाखातर ही चळवळ साऱ्या हिंदुस्थानांत एकाच वेळीं बंद करण्यांत आली हें बरं झालं नाहीं. हा फतवा बाहेर पडला तेव्हां मी बार्डोलीलाच होतों. मीं महात्माजींना हात जोडून

विनवणी केली, ' एक चौरीचौरा नाहींतर एक मद्रासचा दंगा झाला म्हणून तुम्ही ही चळवळ साऱ्या हिंदुस्थानांत काय म्हणून बंद करतां ? ' पण अहिंसेच्या तत्त्वावर व शांततेच्या मार्गावर त्यांचा इतका विश्वास दिसून आला, कीं हिंसेची थोडीशी जरी कुठें कुरबुर झाली किंवा थोडीशी जरी अशांतता कुठें झाली तरी ती त्यांना नको होती. म्हणून ही लढत त्यांनीं थांबविली. एरवीं लढा सुरू केल्यावर बार्डोली हटली नसती. " गांधींनीं ही चळवळ थांबविल्याबद्दल केवळ पटेलांनींच तक्रार केली असें नसून त्या वेळीं तुरुगांत असलेले पंडित मोतिलाल नेहरू व लाला लजपतराय यांनींहि आक्षेप घेतले. त्यांनीं कारागृहांतून लांबलचक पत्रें बाहेर पाठविलीं व कांहीं थोडया लोकांच्या अपराधाकरितां सर्व राष्ट्राला शिक्षा दिल्याबद्दल त्यांनीं गांधींच्या कृत्याला हरकत घेतली. कन्याकुमारीजवळील एकादें खेडें अहिंसा व्रत पाळूं शकलें नाहीं म्हणून हिमालयाच्या पायथ्याजवळील शहराला काय म्हणून शिक्षा द्यायची असें पंडितजींनीं विचारलें. चौरीचौरावर किंवा गोरखपूरवर बहिष्कार टाका, परंतु वैयक्तिक किंवा सामुदायिक कायदेभंग सुरू ठेवा, असें पंडितजी व लालाजी यांचें म्हणणें होतें. लोकनायक बापूजी अणे यांनींहि अशाच प्रकारचे विचार प्रकट केले. ऑल इंडि[illegible] काँग्रेस कमिटीची सभा झाली तेव्हां गांधींना बार्डोलीच्या ठरावाबद्दल [illegible] [illegible]ण्यांत आला. व विशेषतः महाराष्ट्र व बंगाल यांनीं त्यांत पुढाकार घेतल[illegible] परंतु अखेर गांधींच्या निश्चयाप्रमाणेंच वागण्याचें ठरलें. आपल्या केवळ अंगुलिनिर्देशानें जो प्रचंड चळवळीची लाट एकदम थांबवूं शकतो तो जनतेचा पुढारी असामान्य होय आणि म्हणून गांधींजींचें हें वर्चस्व लक्ष्यांत घेऊन सरकारनें लवकरच म्हणजे १५ मार्च रोजीं गांधींना अटक केली व लोकमान्य टिळकांप्रमाणें राजद्रोहाच्या आरोपावरून गांधींना सहा वर्षें कारावासाची शिक्षा दिली. याप्रमाणें गांधींना शिक्षा झाल्यावर राष्ट्राच्या विस्कळित झालेल्या सर्व शक्तींची जुळवाजुळव करण्याला वर्किंग कमिटीला तीन महिने लागले. लखनौ येथें ७, ८, व ९ जून १९२२ रोजीं ऑल इंडिया काँग्रेस कमिटीची सभा होऊन तींत नवीन परिस्थितीचा विचार करण्यांत आला. असहकारिता अशा प्रकारची असावी, कायदेभंगाची चळवळ कोणत्या

स्वरूपांत असावी वगैरे गोष्टींची चर्चा या कमिटींत झाली. अहिंसामय असहकारितेच्या तत्त्वावर विश्वास प्रकट करण्यांत आला. तरी त्या चळवळीचें स्वरूप कसें असावें या प्रश्नावर मतभेद होता. पटेलांचा असहकारितेला पाठिंबा होता तरी त्या चळवळींत बदल करणें अवश्य आहे असें त्यांचें म्हणणें होतें. नोकरशाहीच्या बालेकिल्ल्यांत जाऊन तेथें असहकारितेचा लढा चालविला पाहिजे असा त्यांचा विचार होता. तसेंच कायदेभंगासंबंधीं कांहीं तरी योजना ठरविली पाहिजे असें या कमिटीनें ठरविलें व ऑगस्टपर्यंत कमिटीची सभा तहकूब करण्यांत आली. मध्यंतरीच्या काळांत सर्व देशांत दौरा काढून कोणत्या स्वरूपांत व कोठें कायदेभंग करणें शक्य आहे याची चौकशी करण्याकरितां व तिजवरून रिपोर्ट करण्याकरितां एक कमिटी याच वेळीं नेमण्यांत आली. कायदेभंगाच्या प्रश्नावर कॉंग्रेसला साह्य करणें हा या कमिटीचा उद्देश होता. पटेल हे या कमिटीचे एक प्रमुख सभासद होते. त्यांच्याबरोबर पंडित मोतीलाल नेहरू, डॉ. अनसारी, जमनालाल बजाज, सी. राजगोपालाचारी, शेट छोटाणी यांनाहि या कमिटीवर सभासद म्हणून घेण्यांत आलें. हकीम अजमलखान हे या कमिटीचे अध्यक्ष होते. शेट जमनालाल बजाज यांना ही जागा स्वीकारणें शक्य नसल्यामुळें श्री. कस्तुरीरंग आयंगार यांची नेमणूक करण्यांत आली. शेट छोटाणी या कमिटीबरोबर काम करूं शकले नाहींत.

## चौकशी कमिटींतील पटेलांचें कार्य

या कायदेभंग चौकशी कमिटींत पटेलांनीं केलेलें कार्य फार महत्त्वाचें आहे यापुढील काळांत राजकारणामध्यें जें स्थित्यंतर झालें व त्यांत जे अनेक पुढारी सामील झाले त्याला कारण मुख्यतः पटेल हेच होते असें म्हणण्यास हरकत नाहीं. आधीं मुळीं अशा कायदेभंग चौकशी कमिटीची कल्पना ज्यांना सुचली त्यांत पटेल हे प्रमुख होते. ते जर या कमिटींत नसते तर तिच्या कार्याला जो उठाव आला तो आला नसता असेंच परिणामावरून म्हटलें पाहिजे. कौन्सिल-प्रवेशाच्या बाबतींत नेहरू, हकीम अजमलखान, व दास यांना अनुकूल करण्यांत पटेलांची खटपट कारणीभूत झाली; व कमिटीच्या बाहेर श्री. न. चिं. केळकर यांच्या परिश्रमानें कौन्सिलप्रवेशासंबंधीं अनुकूल वातावरण देशांत

निर्माण झालें. या कमिटींतील सभासदांनीं २ जुलैपासून १५ ऑगस्टपर्यंत देशांतील प्रमुख ठिकाणीं जाऊन पुढाऱ्यांच्या साक्षी घेतल्या; आणि त्यासंबंधीं रिपोर्ट काँग्रेसला सादर केला. त्यांतून महत्त्वाचे असे दोन निर्णय आहेत ते प्रथम पाहूं. पहिला निर्णय सर्वानुमतें असा होता, कीं सध्या देशांतील कोणताहि प्रांत किंवा जिल्हा सार्वत्रिक, सामुदायिक कायदेभंगाला अथवा सार्वत्रिक करबंदीची चळवळ करण्याला तयार नाहीं. दुसरा निर्णय कौन्सिलप्रवेशासंबंधीं होता. परंतु त्याला दोन सारखे फाटे फुटले. कमिटींतील राजगोपालाचारी, अनसारी व आयंगार या तीन सभासदांनीं आपलें मत कौन्सिलप्रवेशाच्या विरुद्ध आहे असें सांगितलें. तर बाकीचे तीन सभासद म्हणजे नेहरू, हकीम अजमलखान व पटेल यांनीं आपण कौन्सिलप्रवेशाला अनुकूल असल्याचें सांगितलें. पहिल्या तिघांचें म्हणणें असें, कीं कोणत्याहि तऱ्हेचा कौन्सिलप्रवेश हा असहकारितेच्या तत्त्वाला बाधक असून कलकत्त्याची जादा काँग्रेस व नागपूर व अहमदाबाद या ठिकाणीं झालेल्या काँग्रेसच्या ठरावांना विरोध करणारा आहे. काँग्रेसनें आंखलेल्या धोरणाला विलक्षण यशःप्राप्ति झालेली आहे व म्हणून तें धोरण त्याज्य ठरविणें सयुक्तिक होणार नाहीं. शिवाय त्यांचें म्हणणें असें, कीं 'कौन्सिलांत जाऊन अडवणुकीचें धोरण स्वीकारायचें व सरकारला पेचप्रसंग निर्माण करून सुधारणांचा कुचकामीपणा उघड करायचा या बोलण्यांत कांहीं अर्थ नाहीं, कारण सरकारच्या हातांत कायद्यानें राखीव अधिकार दिले आहेत. व कौन्सिलांतील लोकमताची पर्वा न करतां सरकारला आपल्या इच्छेप्रमाणें वागतां येण्यासारखें आहे. म्हणून सरकारला वठणीवर आणायचें तर आपले प्रयत्न बाहेरूनच झाले पाहिजेत. गेल्या दोन वर्षांच्या चळवळीवरून ज्या सुधारणा आधींच फोल ठरल्या गेल्या आहेत त्या पुनः राबविण्याकरितां कौन्सिलांत शिरून देशांची शक्ति फुकट घालविण्यांत काय हित आहे ? कौन्सिलांत जाऊन सरकारची अडवणूक करायाची किंवा सरकारशीं प्रतियोगी सहकारिता करायची असें जे लोक म्हणतात त्यांची मुळीं अशी समजूत झालेली दिसते, कीं गांधीप्रणीत असहकारिता ही आपलें उद्दिष्ट साध्य करण्यांत फसली आहे. परंतु वस्तुस्थिति हा विलक्षण विपर्यास आहे. उलट आम्हांला चौकशींत असें आढळून आलें

कीं देशाला असहकारितेचा आतांपर्यंचा कार्यक्रम पटलेला आहे. फक्त आतां पाहिजे तें एवढेंच, कीं देशांतील पुढाऱ्यांनीं काँग्रेसचा विधायक कार्यक्रम पूर्णपणें पाळण्यांत आपलें शक्तिसर्वस्व ओतलें पाहिजे. आणि लोकांचें लक्ष त्यांनीं इतर कोणत्याहि गोष्टीकडे वेधूं देतां कामा नये. कौन्सिल प्रवेश मान्य केला तर आणखी असें अहित होईल कीं काँग्रेसचें महत्त्व कमी होऊन कौन्सिल निवडणुकीलाच नसतें महत्त्व प्राप्त होईल. ही अदलाबदल देशाच्या दृष्टीनें हितकारक नाहीं.' एकंदरीनें काँग्रेसच्या पूर्वीच्या धोरणांत फेरफार करणें इष्ट नाहीं असें राजगोपाळाचारी आदि तीन सभासदांनीं म्हटलें.

हें झालें नाफेरवाल्याचें म्हणणें. आतां निराळ्या बाजूनें पटेलांदिकांचें व त्यांतूनहि पटेलांचें प्रथमपासूनच मत असें होतें, कीं कौन्सिलप्रवेश करण्यानें काँग्रेसच्या धोरणाला कोणत्याहि प्रकारें विरोध होत नाहीं. कौन्सिलप्रवेशाच्या बाबतींत पटेलांनीं जो पुढाकार घेऊन नेट धरला तो त्यांनीं धरला नसता तर या कमिटीचे बहुतेक श्रम व्यर्थ गेले असते असें म्हटलें तर त्यांत अतिशयोक्ति होणार नाहीं. इतकें महत्त्वच या वेळीं कौन्सिलप्रवेशाच्या प्रश्नाला आलेलें होतें. आणि यापुढील चार पांच वर्षें राजकारणाचीं सूत्रें काँग्रेसच्या निकट राहून पटेलांनीं मुख्यतः हलविलीं. या ठिकाणीं पटेलांचें कौन्सिलप्रवेशाबाबतचें धोरण जरा खुलासेवार मांडणें अवश्य आहे. त्यांचें म्हणणें असें, कीं देश जर खरोखरीच कायदेभंगाला तयार असता तर कौन्सिलांवरील बहिष्कार सध्या आहे तसा ठेवायला हरकत नव्हती. परंतु आपल्याला परिस्थितीकडे डोळेझाक करून चालणार नाहीं. राजकीय डावपेच हे नेहमीं जसेच्या तसे निश्चल राहूं शकत नाहींत. त्यांत इष्ट तो फेरबदल करणें क्रमप्राप्त असतें. खुद्द महात्मा गांधींनींसुद्धा अनेक वेळां असे फेरबदल केलेले आहेत, हें १९१९ सालापासून त्यांना अटक होईपर्यंतच्या काळांत आपणांला दिसून आलें. मग आम्हीं जर काळवेळ पाहून योग्य ते फेरबदल नुसते सुचविले तर आम्हीं खुळे ठरतों हें कसें? उलट तसे फेरबदल आम्ही सुचविले नाहींत तरच आम्ही राजकारणाच्या क्षेत्रांत खुळे ठरूं. महात्माजींना वाटलें त्याप्रमाणें कौन्सिलांवरील बहिष्कार हा जर अगदीं

पूर्णपणें पाळला गेला असता आणि एकहि हिंदी प्रतिनिधि जर कौन्सिलांत गेला नसता तर मात्र सरकार नमलें असतें असें मानण्यास पुष्कळ जागा आहे. पण तसें झालें नाहीं. कारण नेमस्त प्रतिनिधि कौन्सिलांत गेले व त्यांनीं प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रीतीनें सरकारच्या दडपशाहीच्या धोरणाला हात-भार लावला. पण आतां परिस्थिति बदलली आहे. सरकारशीं होणारा झगडा लांबणीवर पडला आहे. कोर्टें, शाळा व कॉलेजें यांजवरील बहिष्कार गांधींनीं बार्डोलीला ढिला केला, त्या वेळीं कौन्सिलांचा प्रश्न इतकासा पुढें आला नाहीं परंतु आतां तो आम्हांला हातीं घ्यावा लागत आहे. कौन्सिलांपासून सध्या कांहीं हित होत नाहीं हें तर दिसतें आहे, पण उलट सध्याच्या स्थितींत देशाचा त्यामुळें घातच होत आहे. आतां मवाळांनीं सरकारशीं सहकार्य केलें किंवा नाहीं हा प्रश्न जरी बाजूला ठेवला किंवा देशावर कराचा बोजा लादला गेला आहे ही गोष्ट जरी बाजूला ठेवली तरी नुसत्या मवाळांच्या कौन्सिलप्रवेशानेंच देशाचें नुकसान होत आहे. कारण असें पाहा, कीं मवाळ हे कांहीं बहुजन समाजाचे खरे प्रतिनिधी नव्हत, पण ते मात्र स्वतःला तसे म्हणवितात आणि सरकारहि जगाला सांगतें कीं हे लोकांचे प्रतिनिधी आहेत. म्हणजे देशांत असहकारितेची चळवळ दडपून टाकण्याच्या कामीं कौन्सिलांनीं सरकारला अधिकच प्रबळ करून सोडलें आहे. यापुढें असे अनिष्ट प्रकार टाळायचे असतील तर आपण येत्या गया कॉंग्रेसमध्यें खालील गोष्टी केल्या पाहिजेत. पंजाब, खिलाफत आणि स्वराज्य या तीन प्रश्नांवर असहकारितावाद्यांनीं येत्या कौन्सिल निवडणुकी लढवाव्या व सरकारला ज्यांनीं आतांपर्यंत मदत केली त्यांना बाहेर ठेवावें आणि लोकांना घातक अशा ज्या योजना सरकारला आपल्या न जाणण्यानें करतां आल्या त्यांना आळा घालावा. बहुजन समाजांत कॉंग्रेसचें तत्त्वज्ञान फैलावायला आणि देशांतील सामाजिक आर्थिक व राजकीय प्रश्नांवर चर्चा करायला कौन्सिलच्या निवडणुकी-करितां वाढलेल्या मोहिमांनीं फार मदत होते. कौन्सिलांत गेल्यावरहि आपण राजकीय गाडा असाच चालविला पाहिजे, कीं सरकारनें आमचें म्हणणें तरी कबूल केलें पाहिजे नाहींतर आम्हांला न विचारतां शिकेबाजानें

राज्य चालविलें पाहिजे. यापैकीं दुसरी गोष्ट जर घडून आली तर आतांची कौन्सिलें ही कशीं कुचकामी आहेत हें जगाला पटवितां येईल. पण सध्या काय आहे? आपण कौन्सिलांवर बहिष्कार घातला. पण तिकडे मात्र कौन्सिलांतून सरकारी दडपशाही चालू आहे. आतां आम्ही जरी कौन्सिलांत शिरलों तरी त्यामुळें कॉंग्रेसच्या विधायक कामाला कोणताहि बाध येणार नाहीं. आंतून व बाहेरून अशा दोन्ही बाजूंनीं लढा चालू ठेवला म्हणजे असहकारितेच्या चळवळींतील कायदेभंग व करबंदी या योजना पार पाडण्याला अनुकूल वातावरण निर्माण होईल. आतां असा एक प्रश्न येथें उत्पन्न होतो, कीं समजा, आम्ही असहकारितावादी कौन्सिलच्या निवडणुकीला उभे राहिलों तर आम्हीं बहुमतानें कौन्सिलांत निवडून येऊं कीं नाहीं? आम्हीं ज्या साक्षी घेतल्या त्यावरून आम्हांला स्पष्ट असें आढळून आलें कीं आम्ही कौन्सिलांत बहुमतानें निवडून येऊं. तसा विश्वास जनतेनें आमच्यांत उत्पन्न केलेला आहे. मात्र याला कॉंग्रेस व खिलाफत यांनीं संमति दिली म्हणजे झालें. जे कौन्सिलप्रवेशाच्या अगदीं विरुद्ध आहेत व कौन्सिलप्रवेश करणें म्हणजे राष्ट्रावर संकट ओढवणें आहे असें ज्यांना वाटतें त्यांनीं सुद्धा म्हटलें आहे, कीं असहकरितावाद्यांची निवडणुकींत सरशीच होईल.

## "निराशावाद आम्हांला मान्य नाहीं"

"कौन्सिलबहिष्कारवाले आम्हांला सांगतात कीं कौन्सिलांत जाण्यानें कौन्सिलाबाहेर काम करणाऱ्या कांहीं उत्तम कार्यकर्त्यांचा तुटवडा पडेल व त्यामुळें बाहेरच्या चळवळीला जोर राहाणार नाहीं. परंतु या बोलण्यांत कांहीं तथ्य नाहीं. आपण तावडतोब कायदेभंगालाच सुरवात करणार असतों तर हें म्हणणें आम्ही मान्य केलें असतें. कारण तशा वेळीं चांगले कार्यकर्ते चळवळींत असावे लागतात. पण आपण तर ही कायदेभंगाची चळवळ तहकूब केली आहे. फक्त आपल्याला बाहेरून विधायक कार्य करायचें, पण त्याला कौन्सिलांतील कामानें अडथळा न येतां मदतच होईल. शिवाय कौन्सिलांतहि आपण असे किती लोक पाठविणार? सगळे कांहीं पुढारी तेथें जाणार नाहींत. शिवाय कौन्सिलबहिष्कारवाले असेंहि बोलतात कीं

एकदा लोक कौन्सिलांत शिरलें कीं त्यांना ते लालचावतील, जसा मासा गळाला लागलेल्या आमिषाला भुलतो ! पण या विधान करणारांचीं आम्हांला कींव येते. ज्या लोकांनीं आजवर एवढी विशाल चळवळ शुद्ध अंतःकरणानें बाहेरून चालविली ते लोक कौन्सिलांत जाऊन जर तेथल्या मोहाला बळी पडणार असतील तर झाली ती चळवळ खऱ्या उच्च भूमिकेवरून झाली नाहीं असें म्हणणें त्यांना भाग आहे. परंतु त्यांना वाटते ती भिति निरर्थक आहे. कारण जे लोक आपण कौन्सिलांत पाठवूं ते आपण नीट पारखूनच पाठवूं. आणि यदाकदाचित् त्यांनीं कॉंग्रेसची किंवा मतदार वर्गाची आज्ञा पाळण्यांत कसूर केली तर त्यांना कॉंग्रेस कमिटींतून राजीनामा द्यावा लागेल. कौन्सिलांत पाठवायचे थोडे लोकहि जर चांगले प्रामाणिक मिळूं शकले नाहींत तर मग आपली स्वराज्याची लायकी ती काय राहिली ? तेव्हां कौन्सिलबहिष्कारवाल्यांचा निराशावाद आम्हांला मान्य नाहीं. आम्ही आशावादी आहोंत. आम्हांला चांगले पुढारी कौन्सिलांत निवडून यावेत अशी इच्छा आहे व तसे ते आम्हांला मिळतील. आतां शेवटीं एवढें सांगायचें कीं सध्या कायदेभंग तर तहकूब झालेला आहे. पण त्याचें समूळ उच्चाटन आपण केलेलें नाहीं. कायदेभंगाशीं ज्याचें जवळचें नातें आहे असें कांहींतरी पाहिजे अशी सर्वांचीच इच्छा आहे. पण हें 'कांहींतरी' म्हणजे काय तें मात्र कौन्सिलबहिष्कारवाल्यांनीं सांगितलेलें नाहीं. म्हणून कौन्सिलप्रवेश करून त्यांत सरकारशीं झगडा चालविण्याचें धोरण आम्हीं सुचविलें आहे. चालू घटकेची ही निकडीची गरज आहे. हिंदुस्थानांतील एक लक्षांश लोकांना सुद्धा खादीचा वेष देईपर्यंत जरी तुम्ही थांबलांत, राष्ट्रीय शिक्षणाचा नुसता ओनामा देईपर्यंत जरी तुम्हीं वाट पाहिलीत, अस्पृश्योद्धाराच्या मार्गांत थोडीशी जरी प्रगति करूं लागलांत आणि जातीय ऐक्याचे प्रयत्न करण्यांतच तुम्ही काळाचा अपव्यय जर करूं लागलांत तर तुमचा विनाशकाळ आलाच म्हणून समजा. कारण हीं सर्व कार्यें प्रचंड व नित्य चालणारीं व जितकीं करावीं तितकीं आहेत. पण सध्याच्या या निकडीच्या गरजेकडे तुम्हीं जर लक्ष दिलें नाहीं व ही संधि आपण घालविलींत तर आपण महाभयंकर चूक केल्यासारखें होईल. आम्हीं ही अत्यंत महत्त्वाची बाब आतां ऑल इंडिया कॉंग्रेस कमिटीकडे सोंपवितों."

## कौन्सिलप्रवेशाच्या प्रश्नावर फूट

रिपोर्टाच्या या भागावरून पटेलांचाच हात बराचसा फिरलेला आहे असें साहजिकच वाटतें. या कायदेभंग चौकशी कमिटीनें ज्या इतर शिफारशी केल्या त्यांपैकीं कांहीं महत्त्वाच्या शिफारशींबद्दल पटेलांनीं आपला मतभेद कसा व्यक्त केला हें पाहाणें उद्बोधक होईल. प्रथम आत्मसंरक्षणाच्या हक्काची शिफारस पहा. कायद्याच्या मर्यादेंत आत्मसंरक्षण करण्याचा पूर्ण हक्क व्यक्तिमात्राला असावा पण काँग्रेसचें किंवा काँग्रेसशीं संबंध असलेलें काम आलें कीं मग मात्र दंग्याचा संभव असल्यास हा हक्क बजावूं नये अशी शिफारस पटेलांखेरीज सर्व सभासदांनीं केली. पटेलांनीं मात्र अशी शिफारस केली, कीं कायद्याच्या मर्यादेंत आत्मसंरक्षणाचा हक्क कोणत्याहि परिस्थितींत प्रत्येकाला असला पाहिजे. मग तें काम काँग्रेसचें असो वा नसो. मात्र त्यामुळें दंग्याचा संभव असूं नये म्हणजे झालें. दुसरी गोष्ट म्हणजे मजूर संघटनेच्या प्रश्नावर इतर कोणत्याहि सभासदापेक्षां पटेलांचे विचार अत्यंत प्रभावी असे होते. जाणत्या मजूर वर्गाचा आधार मिळाल्याशिवाय आपल्याला खरें स्वराज्य मिळायचें नाहीं असें त्यांना वाटे. या कायदेभंग-चौकशी कमिटींत कौन्सिलप्रवेशावर जरी मतविभागणी झाली तरी म्युनिसिपालिट्या व लोकलबोर्डें या सारख्या स्थानिक संस्थांवर काँग्रेसनें बहिष्कार टाकूं नये अशी कमिटीनें सर्वानुमतें शिफारस केली. या संस्थांच्या निवडणुकी काँग्रेसनें लढवाव्या व विधायक कार्यक्रमाला सुरवात जोरानें करावी असें कमिटीनें सुचविलें. या कमिटीच्या शिफारशींचा विचार करण्याकरितां कलकत्ता येथें ऑल इंडिया कमिटीची सभा भरली. परंतु कौन्सिलप्रवेशाचा जो सर्वांत वादग्रस्त मुद्दा होता त्याचा निकाल करण्याचें काम गया काँग्रेसवर सोंपविण्यांत आलें. तसेंच ब्रिटिश मालावर बहिष्कार घालावा कीं घालूं नये हा प्रश्नहि गया काँग्रेसवरच सोंपविण्यांत आला. यासंबंधीं पटेलांचें मत काय होतें, तसेंच गांधींचें व अर्थात् गांधीवादी लोकांचें म्हणणें काय होतें व त्यांत फरक कोणता होता हें आम्हीं मागें सांगितलें आहेच. असो. कायदेभंग चौकशी कमिटीचा रिपोर्ट प्रसिद्ध झाल्यानंतर कौन्सिलप्रवेशाच्या बाबतींत देशांत फेरवाले व नाफेरवाले असे दोन पक्ष निर्माण

झाले. व गयेला १९२२ सालीं जी काँग्रेस झाली तींतहि या दोन पक्षांची चुरस लागली. या काँग्रेसचे अध्यक्ष फेरवाले देशबंधु दास हे होते. तसेंच पटेल, मोतीलाल नेहरू व महाराष्ट्र आणि बंगाल हे सर्व काँग्रेसच्या कौन्सिलप्रवेशाच्या धोरणांत फेर करावा असें म्हणणारे होते. काँग्रेसनें कौन्सिलच्या निवडणुकी जरूर लढवाव्या असें त्यांनीं आग्रहानें प्रतिपादन केलें. परंतु या काँग्रेसमध्यें नाफेरवाल्यांचें बहुमत असल्यानें फेरवाल्यांना तात्कालिक यश आलें नाहीं. नुसत्या कौन्सिलप्रवेशाच्या प्रश्नाचा निर्णय लावण्यासाठीं काँग्रेसला पांच दिवस खर्चावे लागले. इतका हा प्रश्न अत्यंत महत्त्वाचा होऊन गेला. परंतु शेवटीं कौन्सिलबहिष्कार बहुमतानें मान्य होऊन फेरवाल्यांचा जरी पराजय झाला तरी त्यांत त्यांच्या पुढील विजयाचें बीज रुजलें गेलें. प्रसिद्ध नाफेरवादी पट्टाभि सीतारामय्या या वेळचें वर्णन करतांना लिहितात, कीं "देशबंधु दास हे गया काँग्रेसचे अध्यक्ष झाले त्या वेळीं त्यांच्या खिशांत दोन महत्त्वाचे कागद होते. एक त्यांचें अध्यक्षीय भाषण व दुसरा कागद म्हणजे अध्यक्षपदाचा राजीनामा व त्याचबरोबर असलेली स्वराज्यपक्षाची घटना हा होय." आतां गयेंत स्वराज्यपक्षाचा उदय कसा झाला व तो पक्ष कसा वाढीस लागला, त्यांत पटेलांनीं कोणतें कार्य केलें, तें सांगण्यापूर्वीं पटेलांनीं भाग घेतलेल्या एका महत्त्वाच्या चळवळीचा आढावा घेऊं. ती चळवळ म्हणजे नागपूरचा झेंडा-सत्याग्रह होय.

# नागपूरचा झेंडा-सत्याग्रह

हा सत्याग्रह अखिल भारतीय स्वरूपाचा झाला. या चळवळीशीं कांहीं मोठ्या पुढाऱ्यांचा संबंध आला हें खरें. पण हीहि गोष्ट तितकीच सत्य आहे, कीं या सत्याग्रहाचे योजक व सूत्रधार विठ्ठलभाई पटेल हेच होते. या सत्याग्रहांतील पटेलांची कामगिरी इतर सर्वांना शिरोधार्य झाली. या सत्याग्रहाची नांदी नागपुरांतील कांहीं उत्साही स्वयंसेवकांनीं म्हटली; पण तिला साथ पटेलांची होती. आणि शेवटीं भरतवाक्य म्हणतांनाहि पटेलच प्रमुख होते.

तारीख १८ मार्च १९२३ ची गोष्ट. गांधीदिनानिमित्त प्रथम जबलपुरास सत्याग्रहाची ठिणगी उडाली. कँटोनमेंटच्या हद्दींत कांहीं तरुण स्वयंसेवकांनीं राष्ट्रीय निशाणाची मिरवणूक काढली. ते म्युनिसिपालिटीच्या इमारतीवर चढले व तिच्या शिखरावर त्यांनीं राष्ट्रीय निशाण रोंवलें. तेव्हां पोलीस आले व त्यांनीं निशाण खालीं पाडून तुडविलें. त्या म्युनिसिपालिटीचा अध्यक्ष युरोपियन होता व त्याची पोलिसांच्या कृत्याला संमति होती. तेव्हां तेथल्या जिल्हा काँग्रेस कमिटीनें निशाणाच्या सत्याग्रहाला उचलून धरलें व पुन्हा मिरवणुकी काढल्या. त्या मिरवणुकींना बंदी करण्यांत आली. अखेर सरकारला हार खावी लागली. जबलपुरास उडालेली ठिणगी नागपुरांत आली. तेव्हां तेथें भडका उडाला व हां हां म्हणतां साऱ्या हिंदुस्थानांत त्याची उष्णता भासूं लागली. नागपुरास तारीख १३ एप्रिल रोजीं सत्याग्रहाला सुरवात झाली. तो दिवस जालियनवाला बाग दिन म्हणून सबंध हिंदुस्थानांत पाळला गेला. कारण बरोबर चार वर्षांपूर्वी याच तारखेला अमृतसर येथें डायरनें जालियनवाला बागेंत भरलेल्या सभेची कत्तल केली होती. असो. त्या दिवसाच्या स्मरणार्थ कायदेभंग करावा म्हणून कांहीं तरुण स्वयंसेवकांनीं नागपुरास सिव्हिल स्टेशनमध्यें राष्ट्रीय निशाणाची मिरवणूक काढली. पोलिसांनीं या मिरवणुकीला मनाई केली. पण स्वयंसेवकांनीं

आपला निश्चय टिकवल्यामुळें त्यांना अटक झाली व शिक्षा करण्यांत आली. पुढें तारीख १ मे पासून दररोज १०–१२ सत्याग्रही निशाणाची मिरवणूक काढून कायदेभंग करूं लागले. मे अखेर सत्याग्रहींची संख्या अडीचशें-पर्यंत गेली. त्यांतल्या बहुतेकांना अटक व कारावासाची शिक्षा झाली. पण अद्यापहि या घटनेकडे कॉँग्रेसचें लक्ष वेधलें नाहीं. देशांत कायदेभंगाचें वातावरण असूं नये अशी कॉँग्रेसमधल्या कार्यकर्त्यांची इच्छा होती. पटेलां-सारख्या लढवय्याला ही स्वस्थ बसण्याची रीत आवडणें शक्य नव्हतें. पण आपलें हृद्गत मात्र त्यांनीं खाजगीं रीतीनें सुद्धां कोणाला बोलून दाखविलें नाहीं. पटेल त्या वेळीं मुंबईस होते. तेथील मांडवी कामिटीशीं त्यांचा स्नेहसंबंध होता. त्या कमिटीचे अध्यक्ष शेठ छोटाणी यांच्याजवळ त्यांनीं सहज म्हणून बोलणें केलें, कीं " कामिटीतर्फे एक जाहीर सभा बोलवावी अशी माझी इच्छा आहे. " कशाकरितां असें छोटाणींनीं विचारलें. तेव्हां पटेलांनीं सांगितलें, कीं बऱ्याच दिवसांत आपण कमिटीतर्फें सभा केली नाहीं. तेव्हां आतां एक सभा बोलवावी व सभेचा विषय ' आपल्यापुढील कार्य ' हा ठेवावा; मुख्य भाषण मी करीन. छोटाणींनीं होय म्हणून सांगितलें व त्याप्रमाणें जाहीर सभा झाली. सभेंत पटेल काय बोलणार याची कोणालाच कल्पना नव्हती. कारण ' आपल्यापुढील कार्य ' अशा प्रकारचा अगदीं मोघम विषय होता व त्याची रूपरेखाहि पटेलांनीं आधीं कोणाला सांगितली नव्हती. सभेला शेठ छोटाणी अध्यक्ष होते. पटेल व गांधी यांचे मदतनीस मणिलाल कोठारी हे सभेला हजर होते. इतर मुंबईचे कॉँग्रेस कार्यकर्तेहि सभेला आले होते. पटेलांनीं मुख्य भाषण केलें. त्यांत ते म्हणाले, " आजचा विषय ' आपल्या-पुढील कार्य ' हा आहे. पण आपण खरोखरी त्या कार्याकडे लक्ष तरी देत आहोंत काय ? मग त्यांत प्रत्यक्ष भाग घेणें तर दूरच राहिलें. आज नाग-पुरांत शेकडों तरुण लोक झेंडा–सत्याग्रह करून तुरुंगांत जात आहेत. पण आपण काय करीत आहोंत ? महात्मा गांधी हे तर कारागृहांतच आहेत. तिकडे प्रतिगांधी राजगोपालाचार्य मद्रासमध्यें चरख्यावर सूत काढीत बसले आहेत. सगळ्या कॉँग्रेस कमिट्या जशा कांहीं कानावर हात ठेवून बसल्या आहेत. नागपुरांत जे स्वयंसेवक सत्याग्रह करीत आहेत ते आपल्यांतले

नाहींतच काय ? ते जर आपलेच आहेत तर त्यांच्या कृत्याला आपण सक्रिय सहानुभूति अवश्य दर्शविली पाहिजे. तसें न केल्यास आपण कर्तव्य-शून्य ठरूं. म्हणून नागपूरच्या झेंडा-सत्याग्रहाकडे मी या सभेचें व वर्किंग कमिटीचें लक्ष वेधूं इच्छितों. " याप्रमाणें पटेलांचें भाषण झाल्यावर कोणीं एकानें प्रश्न केला, कीं " वर्किंग कमिटी सत्याग्रहाला पाठिंबा देत नाहीं तर मग तुम्हांला तो न द्यायला काय झालें ? तुम्ही सत्याग्रहांत जा. " पटेलांनीं उत्तर दिलें, कीं " वर्किंग कमिटीची जर तशी मला आज्ञा असेल तर मीहि सत्याग्रहांत जरूर जाईन. आम्हांला सत्याग्रहांत जायला सांगणें हें काम वर्किंग कमिटीचें आहे. पण वर्किंग कमिटी तर स्वस्थ बसली आहे. तेव्हां तिला जागृत करा असें मला या सभेला सांगायचें आहे. " याप्रमाणें वादविवाद होऊन सभा संपली. आश्चर्याची गोष्ट ही कीं असा महत्वाचा विषय त्यासंबंधीं आगाऊ कांहींहि न बोलतां सभेपुढेंच आणून व त्यावर भाषण करून व शंकाकुशंका दूर करून पटेलांनीं काँग्रेसच्या गोटांत खळबळ उडवून दिली; व काँग्रेसला कार्यप्रवृत्त करण्याचें श्रेय संपादन केलें. कारण लगेच काँग्रेस कार्यकर्त्यांच्या हालचालींना सुरवात झाली. दुसऱ्याच दिवशीं विठ्ठलभाई पटेलांचे धाकटे बंधु वल्लभभाई पटेल हे तडक अहमदाबादेहून मुंबईस निघून आले. व त्यांनीं विठ्ठलभाईंची गांठ घेतली. वल्लभभाई हे वर्किंग कमिटीचे एक प्रमुख सभासद होते. त्यांना विठ्ठलभाईंनीं सर्व गोष्टी समजावून दिल्या. नागपुरास झेंडा-सत्याग्रहाला पाठिंबा देण्यानें वर्किंग कमिटीची इभ्रत राष्ट्रांत कशी वाढेल हें विठ्ठलभाईंनीं स्पष्ट केलें व शेवटीं वल्लभभाईंना विनंती केली, कीं " तुम्ही आतां तावडतोब नागपुरास जा आणि तेथील सत्याग्रहींना धीर द्या. तोंवर सत्याग्रहींच्या टोळ्या साऱ्या हिंदुस्थानांतून नागपुरास जमतील अशी खटपट मी करतों. आणि तुम्हीहि पुढें त्या खटपटीला लागा. मात्र सारा पत्रव्यवहार वगैरे तुमच्याच ( वल्लभभाईंच्याच ) सहीनें होऊं द्या. " याप्रमाणें वडील बंधूंचें म्हणणें ऐकल्यावर वल्लभभाई नागपुरास रवाना झाले.

## विठ्ठलभाईंनींहि नागपूर गांठलें

त्यावेळीं पटेल मुंबई म्युनिसिपालिटीचे सभासद होते. कांहीं कामकाजा-

निमित्त पटेल व त्यांची मित्रमंडळी म्युनिसिपालिटीच्या सभागृहांत जमली होती. त्यांत श्री. जम्नादास मेहता व श्री. महेश्वरी हे होते. दोघेहि पटेलांचे निकटवर्ती विश्वासाचे स्नेही होते. मध्यंतरीं चहाची वेळ झाली तेव्हां पटेल, मेहता व महेश्वरी हे तिघे चहा घेण्याच्या खोलींत बसले. इतर शिळोप्याच्या गप्पा चालू झाल्या. चहापान संपल्यावर पटेल म्हणाले, " मला जरा बाहेर काम आहे; मी आतां जातों." मेहता–महेश्वरींना वाटलें कीं असेल कांहीं पटेलांचें स्वतःचें काम; जाऊन येतील लवकर परत. म्हणून त्यांनीं पटेलांना कांहीं विचारलें नाहीं. इकडे पटेल चहापानाच्या खोलींतून बाहेर पडले ते लगेच स्टेशनवर जाऊन नागपूरच्या गाडींत बसले व तसेच नागपुरास गेले. तेथें गेल्यावर वर्तमानपत्रांत जेव्हां प्रसिद्ध झालें कीं विठ्ठलभाई पटेल हे नागपुरास आले आहेत तेव्हां मुंबईच्या मित्रांना पटेलांच्या कृत्याचें आश्चर्य वाटलें. कोणतेंहि काम उगीच बोलून न दाखवतां प्रत्यक्ष करीत राहायचें ही पटेलांची नेटमींचीच रीत होती. व तिचें प्रत्यंतर यावेळींहि त्यांच्या मित्रांना जरी आलें तरी तेंहि आकस्मिक रीतीनें आल्यामुळें मेहता-महेश्वरी ही त्यांचसारखी मित्रमंडळीहि थक्क झाली.

## झेंडा सत्याग्रहांत पटेलांचा पुढाकार

पटेल नागपुरास येऊन पोचल्यावर त्यांनीं विठ्ठलभाईना सर्व प्रकारें नंतर सल्लामसलत देऊन कार्याची दिशा दाखविली. दोघां बंधूंच्या विचारें अनेक पत्रें हिंदुस्थानांतील ठिकठिकाणच्या प्रांतिक कॉंग्रेस कमिट्यांना पाठविण्यांत आलीं. त्यांत " तुमच्याकडून स्वयंसेवक पाठविले जावे " अशी विनंती त्या कमिट्यांना करण्यांत आली होती. खुद्द नागपुरांतहि विठ्ठलभाईंच्या आगमनानें विलक्षण उत्साह स्वयंसेवकांत दिसून आला. व त्यांच्याच प्रयत्नानें दिवसेंदिवस सत्याग्रहींची संख्या वाढूं लागली. मात्र आम्हांला स्वयंसेवकांची गरज आहे असें पटेलांनीं जाहीर रीतीनें कधींच कोणाला सांगितलें नाहीं. तरी ठिकठिकाणाहून सत्याग्रही स्वयंसेवक नागपुरास येऊं लागले. अखेर खुद्द मुंबई प्रांतिक कमिटीनें तीस स्वयंसेवकांची एक तुकडी नागपुरास पाठविली. अर्थात्

वर्किंग कमिटीनें या चळवळीला पाठिंबा लवकरच दिला. चळवळीचा वाढता जोर पाहून मध्यप्रांताचे गव्हर्नर सर फ्रँक स्लाय हे २३ जूनला नागपुरांत येऊन राहिले. पुढें जुलै महिन्यांत झालेल्या ऑल इंडिया काँग्रेस कमिटीच्या सभेनेंहि नागपूर सत्याग्रह कमिटीला साहाय्य करण्याचा ठराव पास केला. तारीख १८ जुलै रोजीं साऱ्या हिंदुस्थानांत झेंडा दिन पाळण्यात यावा व त्या दिवशीं झेंडयाची मिरवणूक काढून लोकांनींहि सार्वजनिक रीतीनें या झेंडयाला वंदन करावें असें ठरविण्यांत आलें. याप्रमाणें या चळवळीला अखिल भारतीय स्वरूप प्राप्त झालें. यापूर्वींच शेट जम्नालाल बजाज इत्यादि पुढाऱ्यांना सरकारनें अटक केली. तरी या चळवळीचीं खरीं सूत्रें प्रथमपासूनच विठ्ठलभाई व वल्लभभाई या पटेल बंधुद्वयांच्या हातात होतीं. व त्या दोघांतूनहि योजकता विठ्ठलभाईकडेच होती. आतांपर्यंत एक हजारांवर स्वयंसेवकांना अटक झाली होती. ता. १८ जूनला सरकारनें १४४ कलम जारी करून झेंडा मिरवणूक बंदीची मुदत आणखी दोन महिने वाढविली. पण त्यामुळें चळवळ दडपून न जातां तिला अधिक बळ येत चाललें. नागपूरच्या प्रांतिक कौन्सिलांत तारीख ७ ऑगस्टच्या बैठकींत सरकारतर्फे सर मोरोपंत यांनीं खुलासा केला कीं तारीख १७ ऑगस्टपर्यंत दंगाधोपा न होईल तर मनाई हुकूम पुन्हा काढण्यांत येणार नाहीं व 'मिरवणुकीला पोलिसांची परवानगी घेतल्यास सिव्हिल लाइन्समधून मिरवणूक जाऊं दिली जाईल. पण त्यावर लोकपक्षाचे शेठ शिवलाल यांनीं ठराव मांडला कीं नागपुरांतील १४४ कलमाची बंदी सरकारनें ताबडतोब विनशर्त काढून टाकावी. या ठरावावर दोन दिवस पुरा वादविवाद होऊन तो ३१ विरुद्ध २६ मतांनीं पास झाला. तसेंच सत्याग्रह्यांवर यापुढें खटले भरूं नयेत व भरले असतील तर काढून टाकावे व आतांपर्यंत दिलेली शिक्षा भोगीत असलेले सगळे सत्याग्रही कैदी बंधमुक्त करावे असे दोन ठराव पुढें येऊन तेहि बहुमतानें मंजूर झाले. अशा रीतीनें सरकारचा तीन दिवसांत तीन वेळां पराजय झाला. लोकपक्षाला हे जे मोठे विजय प्राप्त झाले त्याच्या मुळाशीं पटेलांचेच अविश्रांत परिश्रम होते असें म्हणण्यांत अतिशयोक्ति नाहीं. कारण पटेलांनीं कौन्सिल-

रांच्या गांठी प्रत्यक्ष घेऊन त्यांच्यांशीं विचारविनिमय केला होता. फक्त त्यांचे परिश्रम लोकांना उघड दिसले नाहींत इतकेंच. यानंतर १८ ऑगस्टला झेंडयाची प्रचंड मिरवणूक काढावी असें ठरविण्यांत आलें. परंतु त्यापूर्वी या चळवळीचे सूत्रधार विठ्ठलभाई पटेल यांनीं आपल्या बंधूंसह गव्हर्नरांच्या बऱ्याचदा भेटी घेतल्या. गव्हर्नर व विठ्ठलभाई यांची पूर्वीपासून वैयक्तिक दाट मैत्री होती. त्या दोघांच्याहि मनांतून कांहींतरी उभयपक्षीं समाधानकारक निकाल व्हावा असें होतें. म्हणजे धरपकडी तर होऊं नयेत आणि झेंडयाचाहि मान राखला जावा. व त्याप्रमाणें गव्हर्नर व पटेल यांच्या आपसात समजुती झाल्या. तारीख १८ ऑगस्टला मिरवणूक काढण्याचें ठरवून तिची वेळ व रस्ताहि जाहीर केला. मनाई हुकूम कायमच होता; एवढेंच नव्हे तर तो पुन्हा जाहीर करण्यांत आला होता. तथापि १८ तारखेच्या झेंडयाच्या मिरवणुकीला कोणताहि अडथळा सरकारनें केला नाहीं. या बाबतींत वर्तमानपत्रांतून वादळ सुरू झालें. कोणी अँग्लोइंडियन वर्तमानपत्रांनीं प्रसिद्ध केलें कीं कॉंग्रेसनें सरकारकडे अर्ज करून मिरवणुकीकरितां परवानगी मागितली. पण ही बातमी खोटी आहे असें कॉंग्रेसनें जाहीर केलें. व अशा खोट्या कंडया पिकविणारांचा निषेध केला. एवढेंच कीं ही आपसांतील समजुतीची एक तडजोड होती. आणि पटेल हे जसे तत्त्वाकरितां लढणारे होते तसेंच जेव्हां सन्माननीय समेट करण्याची वेळ येईल तेव्हां तशा समेटाला ते दूर करणारे नव्हते हेंहि यावरून दिसून आलें. नाहींतरी राष्ट्रीय चळवळीचे जे विरोधक आहेत ते अशी एकादी सन्माननीय तडजोड जरी घडली तरी ती घडून आल्याबरोबर तिच्याविरुद्ध नाना प्रकारच्या टीका करतात हा साधारणपणें नेहमींचा रिवाज आहे. तथापि दिल्ली कॉंग्रेसनें नागपूरच्या सत्याग्रह चळवळीच्या कार्यकर्त्यांचें अंतःकरणपूर्वक अभिनंदन केलें; व हा लढा यशस्वी करून नागपूरनें राष्ट्राच्या मानांत भर घातली असें जाहीर केलें. असो. याप्रमाणें सत्याग्रह थांबला व वर निर्देशलेल्या तीनहि ठरावांची अंमलबजावणी सरकारला करावी लागली. पण सत्याग्रह आतां थांबला हें जणू काय लक्षांत न येऊन नागपूरच्या कौन्सिलांत कांहीं अराष्ट्रीय लोकांनीं सत्याग्रही कैद्यांच्या निर्वाहाकरिता एक पुरवणी

ग्रँट मंजूर करून घेतली ! ही वार्ता पटेलांना मुंबईस समजली तेव्हां मारवाडी विद्यालयांत एक जाहीर सभा भरविण्यांत आली तींत पटेलांनीं स्वच्छ सांगितलें कीं "पाहा हे कौन्सिलांतले दीडशहाणे लोक ! राष्ट्रीय वृत्तीच्या लोकांनीं कौन्सिलांत जरूर शिरावं असं मी म्हणतों तें एवढ्याकरितां कीं त्यांच्या हातून असा मूर्खपणा तरी होणार नाहीं. सत्याग्रह थांबला हें त्यांच्या गांवींहि नाहीं आणि पुरवणी ग्रँट मात्र मंजूर करून घेतली ! यावरून सध्या जे लोक कौन्सिलांत आहेत त्यांच्या अज्ञानाचं आणि हलक्या मनोवृत्तीचेंहि प्रदर्शन होत आहे ! आणि पुन्हा हे लोक आपणांला जनतेचे प्रतिनिधी म्हणवून घ्यायला तयारच ! आहे कीं नाहीं उलटा न्याय ? 'कुऱ्हाडीचा दांडा गोतास काळ' असे हे लोक आहेत. हेच जर आपण आपले राष्ट्रीय वृत्तीचे आणि समंजस प्रतिनिधी कौन्सिलांत पाठविले तर असले प्रकार व्हायचे नाहींत." यावरून कौन्सिलाबाहेरीलसुद्धा कायदेभंग किंवा सत्याग्रह यशस्वी होण्याकरितां कौन्सिलप्रवेशाची किती आवश्यकता आहे हें पटेलांनीं पटवून दिलें. असो. लवकरच मुंबईच्या प्रांतिक काँग्रेस कमिटीनें मुंबईस राष्ट्रीय निशाणाची टोलेजंग मिरवणूक काढली. पटेल हेच त्या मिरवणुकीचे नेते होते.

नागपूरच्या झेंडा-सत्याग्रहाचें प्रकरण पटेलांच्या अव्वल दर्जाच्या बुद्धिमत्तेची साक्ष देते. त्यांच्या बुद्धितेजानें वल्लभभाईसारखे काँग्रेसचे कार्यकर्ते तर दिपून गेलेच, पण कौन्सिलर गव्हर्नर, व खुद्द काँग्रेसची वर्किंग कमिटी या सर्वांवर त्यांनीं छाप पाडली व काँग्रेसच्या मानांत भर घातली. लवकरच सर्व सत्याग्रही कैदी सरकारनें बंधमुक्त केले. अशा रीतीनें तारीख १ मे पासून तारीख १८ ऑगस्टपर्यंत म्हणजे सुमारें अडीच महिन्यांपेक्षां अधिक दिवस सतत चाललेला हा सत्याग्रह शेवट गोड होऊन थांबला व नागपुरास सत्याग्रहींचा विजय झाला, असें वर्किंग कमिटीतर्फे वल्लभभाई पटेल यांनीं जाहीर केलें. पुढें दिल्लीच्या काँग्रेसनें या सत्याग्रहाची प्रशंसा केली तेंहि योग्य असेंच झालें.

# आगामी लढ्याचा पूर्वरंग

## ( कार्पोरेशनमधील कामगिरी )

**प्रसादचिन्हानि पुरःफलानि ।**

" ज्यांनीं मुंबई म्युनिसिपालटीचें अध्यक्षपद सजविलें त्या कर्तृत्वशाली पटेलांच्या हातांत मी आतां असेंब्लीच्या अध्यक्षाचीं सूत्रें देत आहे व त्याबद्दल मला समाधान वाटतें. " असे उद्गार हिंदस्थानच्या असेंब्लीचे पहिले सरकारनियुक्त अध्यक्ष मि. फ्रेडरिक व्हाइट यांनीं पटेलांविषयीं काढले होते. यावरून एवढें दिसून येतें कीं मुंबईच्या म्युनिसिपालटीचें अध्यक्षपद हें गौरवास्पद तर होतेंच पण पटेलांच्या यशाचें बीज त्यांच्या मुंबईच्या अध्यक्षपदांतच रुजलेलें होतें हें अगदीं स्पष्ट आहे. साऱ्या हिंदुस्थानांतील म्युनिसिपालिट्यांत मुंबईची म्युनिसिपालिटी ही अग्रगण्य समजली जाते. मुंबई म्युनिसिपालिटीचा कारभार म्हणजे एकाद्या बडया संस्थानच्याच कारभारासारखा. परंतु आतांपर्यंत म्हणजे १९२२ सालापर्यंत या संस्थानचा कारभार जशा राष्ट्रीय वृत्तीनें चालायला पाहिजे तसा चाललेला नव्हता. सर्वत्र स्वाभिमानशून्यता दिसून येत होती. एकादी सरकारी संस्था आणि ही मुंबईची स्थानिक स्वराज्य संस्था यांत अंतर दिसून येत नव्हतें. सरकारी हुकूम कसेहि असले तरी त्यापुढें निमूटपणें मान वाकवावी आणि ही ' बाबांची विहीर, म्हणून एकाद्या भोळसट किंवा गतनुगतिक मुलानें जसें तिचें खारट पाणीहि प्यावें तशीच स्थिति जवळजवळ या म्युनिसिपालिटीची झालेली होती. परंतु पटेल या म्युनिसिपालिटीचे सभासद व अध्यक्ष होतांच त्यांनीं तिच्या कारभारांत विलक्षण क्रांति केली. अनेक जुनाट रूढींचीं जाळीं जाळून टाकलीं, स्वाभिमानशून्यतेला रेसभरहि वाव ठेवला नाहीं. आणि म्युनिसिपालिटी ही खरीखुरी लोकांची संस्था आहे, तिच्या कारभारांत व तिला घालून दिलेल्या मर्यादेंत सरकारला ढवळाढवळ करण्याचा अधि-

कार नाहीं हें पटेलांनीं कृतीनीं पटवून दिलें. त्यांनीं म्युनिसिपालिटींत कांहीं अगदीं नवीन असे उपक्रम सुरू केले आणि ते सर्वच उपक्रम लोकादरास पात्र झाले. त्यांना मुंबई म्युनिसिपालिटीच्या कारभारांत जे अनुभव आले त्यांवर आपल्या भावी कर्तृत्वाची भव्य इमारत त्यांना पुष्कळशी रचतां आली. म्युनिसिपालिटीचें अध्यक्षपद म्हणजे त्यांच्या आयुष्याच्या मुख्य परीक्षेची पूर्वतयारी ठरली. पटेलांनीं म्युनिसिपालिटींत केलेल्या कामगिरीला आगामी लढ्याचा पूर्वरंग म्हणण्यास हरकत नाहीं.

## म्युनिसिपल नॅशनॅलिस्ट पक्ष

पटेलांनीं आपल्या आगमनानें मुंबईच्या स्थानिक स्वराज्यांत नवचैतन्य निर्माण केलें असें म्हणण्यास कारण हें, कीं त्या स्वराज्यांतील अशी कोणतीही बाब नव्हती कीं जिकडे त्यांनीं जातीनें लक्ष घातलें नाहीं किंवा ती सुधारली नाहीं. परंतु पटेलांचें व्यक्तिशः सामर्थ्य जरी म्हटलें तरी त्यामागें संघटना होती. व ती नदीच्या मुळाप्रमाणें जरी प्रथम लहान होती तरी पुढें त्यांच्या प्रयत्नानें विस्तार पावली. ही संघटना म्हणजे मुंबई म्युनिसिपालिटीच्या निवडणुका राष्ट्रीय पक्ष नें लढवाव्या या हेतूनें पटेलांच्याच खटपटीनें स्थापन झालेल्या म्युनिसिपल नॅशनॅलिस्ट पक्षाची संघटना होय. कौन्सिलांवर कॉंग्रेसनें बहिष्कार घातला होता तसा स्थानिक स्वराज्य संस्थांवर घातला नव्हता. व म्हणून ही मुंबईची प्रचंड संस्था हस्तगत करण्याचें या राष्ट्रीय पक्षानें ठरविलें. प्रथम मे १९२३ सालीं पटेलांच्या नेतृत्वाखालीं या राष्ट्रीय पक्षाची स्थापना झाली. म्युनिसिपालिटीच्या जागा कॉंग्रेसनें लढवाव्या ही कल्पना मुंबईच्या मांडवी भागांत निघाली. त्या वेळीं या पक्षाचे फक्त दहा लोक होते. त्यांत डॉ. वेलकर, बॅ. जम्मादास मेहता, श्री. नरीमन वगैरे प्रसिद्ध पुढारी होते. व ते सर्व त्या वेळच्या म्युनिसिपालिटींतहि सभासद होते. त्याच सर्वांची एक सभा वर लिहिल्याप्रमाणें तारीख २३ मे १९२२ रोजीं आर्यभुवनमध्यें भरली व तींत पक्षाची घटना ठरविण्यांत आली. पटेल हे या पक्षाचे अध्यक्ष झाले. पुढें म्युनिसिपालिटीच्या नवीन निवडणुकी जवळ आल्या म्हणून आतां म्युनिसिपालिटींत राष्ट्रीय पक्षाचे लोक अधिक जावेत

व त्या पक्षाची संघटना मोठी व्हावी यासाठीं २९ जानेवारी १९२३ सालीं या पक्षाची पुन्हा सभा झाली व त्या पक्षाला म्युनिसिपल नॅशनलिस्ट पार्टी असें नांव देण्यांत आलें. तींत ठरविण्यांत आलें, कीं पक्षाचा प्रत्येक सभासद हा काँग्रेसचा सभासद असला पाहिजे. तसेंच म्युनिसिपालिटींत व बाहेर त्याची दृष्टि लोकहिताचीच असली पाहिजे. या पक्षाचा कार्यक्रमहि लवकरच प्रसिद्ध झाला. त्यांत मुख्यत: असें म्हटलें होतें, कीं या पक्षाचा उद्देश मुंबईच्या स्थानिक स्वराज्याच्या घटनेंत सुधारणा करणें हा असून मुंबईची म्युनिसिपालिटी सर्वतोपरि लोकनियुक्त करण्याचें या पक्षाचें धोरण राहील. तसेंच प्रत्येक प्रौढ स्त्रीपुरुषाला मतदानाचा अधिकार मिळवून देण्याची हा पक्ष खटपट करील. त्याचप्रमाणें लोकसंख्येच्या प्रमाणांत प्रतिनिधींची प्रमाणशीर निवडणूक व्हावी, म्युनिसिपल कारभारांत पूर्ण स्वायत्तता असावी, त्यांत सरकारनें हस्तक्षेप करूं नये, म्युनिसिपालिटीचा कारभार काटकसरीचा पण चोख व्हावा, मोफत व सक्तीचें प्राथमिक शिक्षण सुरू करण्यांत यावें, हिंदुस्थानी भाषेचा अभ्यास शाळांतून सुरू करावा, संपूर्ण दारूबंदी अमलांत आणावी, काँग्रेसचा विधायक कार्यक्रम शक्य तों पार पाडावा, देशी वैद्यकाला उत्तेजन द्यावें म्युनिसिपालिटींतील भाषणें इंग्रजींत तशीं देशी भाषांतहि व्हावी इत्यादि लोकहिताच्या व महत्त्वाच्या गोष्टींचा या पक्षाच्या कार्यक्रमांत समावेश झाला होता. यावरून पक्षानें आपल्यापुढील कार्यक्षेत्र किती व्यापक स्वरूपाचें व राष्ट्रीय बाण्याचें ठेवलें याची सहज कल्पना होते. १९२३ सालापर्यंत मुंबईची म्युनिसिपालिटी ही खरी प्रातिनिधिक संस्था नव्हती. तींत पूर्वी बडे व्यापारी व भांडवलवाले यांचाच भरणा असे. त्यामुळें मध्यम व इतर कामकरी इत्यादि वर्गांच्या हिताकडे दुर्लक्ष होई. त्या वेळीं मुंबई शहरांत दरमहा शेंकडों रुपये भाडें देऊन राहाणाऱ्या भाडेकऱ्यांना नुसता मत देण्याचाहि अधिकार नव्हता. तो अन्याय दूर होऊन १९२३ सालच्या निवडणुकीच्या वेळीं भाडेकऱ्यांना मत देण्याला संधि मिळाली व तिचाच फायदा घेऊन बहुजनसमाजाला जागृत करण्याची तयारी पटेलांच्या राष्ट्रीय पक्षानें चालविली. पण कोणत्याहि सत्कार्याला विघ्नें आलीं नाहींत तर त्याची प्रसिद्धि तरी जगांत व्हावी कशी? प्रथम

१९२२ सालच्या निवडणुकींचीच गोष्ट घेऊं. वास्तविक पटेल ज्या मांडवी भागाचे हितसंबंधी होते तेथूनच या राष्ट्रीय पक्षाची प्रेरणा झाली व त्याच भागानें कॉंग्रेसतर्फे प्रथम १९२२ सालीं निवडणुकी लढविण्याचा चंग बांधला. पण ही इष्ट अशी गोष्टहि पटेलांविषयीं मत्सरग्रस्त असणाऱ्या कांहीं विघ्नसंतोषी लोकांना अनिष्ट वाटली. कारण काय तर सबंध मुंबई शहरातर्फे कॉंग्रेसची प्रतिनिधि संस्था म्हणजे जी मुंबई प्रांतिक कॉंग्रेस कमिटी तिनें निवडणुकी लढविण्याबद्दल कांहींच ठरविलें नसतांना मांडवी वॉर्ड कॉंग्रेस कमिटीनेंच तो निर्णय वरिष्ठांना न विचारतां कसा केला ? परंतु मुंबई कॉंग्रेस कमिटी ही निवडणुकी लढवीत नाहीं असें दिसून आल्यावरच तिची शाखा जी मांडवी कमिटी तिनें स्वतःच्या जबाबदारीवर तें कार्य करण्याचें ठरविलें. अशा रीतीनें १९२२ सालच्या निवडणुकींत मांडवी भागांतूनच कॉंग्रेसचे प्रतिनिधी पहिल्यांदा म्युनिसिपालिटींत शिरणार होते.

## मांडवी भागांत बिनविरोधी यश

मांडवी भाग हा राष्ट्रीय पक्षाचा बालेकिल्ला होता. व तो जेव्हां स्थापन झाला त्यापूर्वी म्हणजे १९२२ सालीं त्या भागांतून आठ प्रतिनिधी म्युनिसिपालिटींत निवडून यायचे होते. पटेलांची तर अशी महत्त्वाकांक्षा कीं हे आठहि प्रतिनिधि राष्ट्रीय पक्षांतूनच बिनविरोध निवडून यावेत. पण आयत्या वेळीं आठ जागांकरितां दहा उमेदवार उभे राहिले. त्यापैकीं आठ तर राष्ट्रीय पक्षाचे होते व बाकीचे दोन स्वतंत्र होते. पण अखेर तडजोड होऊन या दोन स्वतंत्र उमेदवारांपैकीं एकानें आपलें नांव मागें घेतलें व राष्ट्रीय पक्षाच्या आठ प्रतिनिधींपैकीं एकानें आपलें नांव मागें घेतलें. व म्हणून आतां जे आठ सभासद राहिले ते सर्वच्या सर्व बिनविरोध निवडून आले. फक्त एक सभासद स्वतंत्र होता व बाकीचे सात राष्ट्रीय पक्षाचे होते. याप्रमाणें सन्मान्य तडजोड होऊन राष्ट्रीयपक्षाला जो मोठा मानाचा विजय प्राप्त झाला त्याचें सारें श्रेय पटेलांच्याच बुद्धिचातुर्याला व व्यवहारकुशलतेला दिलें पाहिजे. पटेलांच्याच वर्चस्वानें व हिकमतीनें सारे सभासद बिनविरोध निवडून आले व त्यांत आठांपैकीं सात त्यांचेच लोक होते. ही गोष्ट पटेलांनीं सर्वथैव अभूतपूर्व अशी घडवून आणली. कारण यापूर्वी या मांडवी भागांतून बिनविरोध

निवडणूक तर दूरच राहिली पण चुरशीच्या ज्या निवडणुकी होत त्यांतहि अनेक भांडणेंतंडणें व कुलंगडीं वारंवार उपस्थित होत असत व यांतलीं कांहीं प्रकरणें कोर्टापर्यंतहि जात असत. अर्थात् या वेळीं या भांडखोर वॉर्डांतहि जी बिनविरोध निवडणूक झाली त्यामुळें सारी मुंबईनगरी आश्चर्यानें थक्क झाली व पटेलांना धन्यवाद देऊं लागली.

## राष्ट्रीय पक्षाचा विजय

परंतु यापुढील वर्षाच्या म्हणजे १९२३ सालच्या निवडणुकी अधिक महत्त्वाच्या होत्या. कारण त्या वेळीं मतदानाचा हक्क वाढविण्यांत आला होता. म्हणजे आतां दहा रुपये भाडें देणाऱ्यांनाहि मतदानाचा अधिकार मिळाला. संख्याहि वाढली होती. उदाहरणार्थ १९२२ सालीं वर लिहिल्याप्रमाणें मांडवी भागांतून फक्त आठच प्रतिनिधी निवडून यावयाचे होते. तर आतां त्या भागांतून प्रतिनिधींच्या जागा सोळा होत्या. या वेळीं पटेलांनीं आपल्या मांडवी भागांतच नव्हे तर मुंबईच्या प्रत्येक वॉर्डांतून काँग्रेसतर्फें उमेदवार उभे केले. आणि निवडणुकीची मोहीम इतकी जोरानें सुरू केली, कीं मुंबई शहराच्या इतिहासांत ती केवळ अपूर्व होती. आपल्या उत्साही सहकाऱ्यांच्या मदतीनें पटेलांनीं निवडणुकी लढविण्याकरितां जी संघटना व जागृति केली तिला तोड नव्हती. कारण अवघ्या एक महिन्याच्या अवधींत एकट्या पटेलांनींच साऱ्या भागांत हिंडून सुमारें अडीचशें सभा करून त्यांत भाषणें केलीं व निवडणुकींत आपली दृष्टि केवळ राष्ट्रीय कशी आहे हें मतदारांना स्पष्ट करून सांगितलें. शेवटीं पटेलांच्या व त्यांच्या सहकाऱ्यांनीं जी खटपट केली तिला उत्तम यश प्राप्त झालें. कारण बड्या व्यापारी व भांडवलदारांचा भयंकर विरोध असतांनाहि या वेळीं एकंदर अठ्ठेचाळीस लोक राष्ट्रीय पक्षातर्फें म्युनिसिपालिटींत निवडून आले. पटेलांनीं केलेल्या संघटनेचा प्रभाव याहि वेळीं दिसून आला. वर सांगितलेंच, कीं खास पटेलांच्या मांडवी भागांतून सोळा प्रतिनिधी निवडून यायचे होते. पण या सोळा जागांकरितां सव्वीस उमेदवार उभे राहिले. प्रथम पटेलांनीं काँग्रेसतर्फें सारेचे सारे म्हणजे सोळा उमेदवार उभे केले होते.

पण या वेळीं प्रतिपक्षी उमेदवार इतके भेदरून गेले, कीं ते स्वतः पटेलांशीं तडजोड करण्यास तयार झाले. तेव्हां दूरदर्शी पटेलांनींहि तडजोडीच्या दृष्टीनें आपल्या सोळांपैकीं दोन जागा सोडल्या व त्या प्रतिपक्षांना दिल्या. म्हणजे आतां विरुद्ध पक्षाचे जे दहा उमेदवार होते त्यांतील आठांनीं आपलीं नांवें मागें घेतलीं व कॉंग्रेसचे चौदा आणि इतर फक्त दोन असे सोळा प्रतिनिधी बिनविरोध निवडून आले. मांडवींत बिनविरोध निवडणुकीचा हा दुसरा प्रसंग होय. या दोन्ही प्रसंगांचें श्रेय पटेलांनाच दिलें पाहिजे.

याप्रमाणें निवडणुकींचा रागरंग झाला. आतां म्युनिसिपालिटींत शिरल्यानंतर पटेलांनीं राष्ट्रीय पक्षाच्या वतीनें कोणती महत्त्वाची कामगिरी केली ती पाहाणें अवश्य आहे. त्यापूर्वी पटेलांच्या उमेदवारीला कशी हरकत आली होती तें सांगणें उद्बोधक होईल. पटेल ज्या मांडवी वॉर्डांत उभे होते त्या वॉर्डातर्फे उमेदवार म्हणून उभें राहण्यास ते पात्र नाहींत अशी कोणीतरी तक्रार म्युनिसिपल कमिशनर मि. क्लेटन यांच्याकडे केली. त्यावर कमिशनर-साहेबांनीं सांगितलें, कीं त्यांच्या उमेदवारीस अडथळा आणण्यासारखें मला तरी कांहीं दिसत नाहीं. तुम्हांला दिसत असल्यास तुम्ही कोर्टामार्फत दाद मिळवा. पण अखेर पटेलांच्या विरुद्ध कोणींहि कोर्टांत गाऱ्हाणें केलें नाहीं.

## पटेलांनीं रूढि मोडली

पटेलांच्या व्यक्तिमत्तेचा हा प्रभाव होता असें म्हटल्यास अतिशयोक्ति नाहीं. असो. पटेलांचा ४८ सभासदांचा राष्ट्रीय पक्षाचा एक गट म्युनिसिपालिटींत शिरला तेव्हांपासून तिच्या इतिहासाला निराळें वळण लागत चाललें. तोंपर्यंत अशी रूढि होती, कीं दर वर्षी वेगळ्या धर्माचा अध्यक्ष म्युनिसिपालिटींत असावा. म्हणजे या वर्षी हिंदु असला तर पुढच्या वर्षी निराळ्या धर्माचा अध्यक्ष असावा. व ही रूढि आतांपर्यंत कोणी मोडली नव्हती. पटेल १९२३ सालीं ज्या वेळीं म्युनिसिपालिटीचे सभासद झाले त्या वेळीं पारशी मनुष्याची अध्यक्ष होण्याची पाळी होती. अर्थात् सारे पारशी उमेदवारच अध्यक्षपदाकरितां उभे राहात व त्यांपैकीं एक पारशी मतदानपद्धतीनें निवडून येई. पण पटेलांनीं ही रूढि मोडली. त्यांचें

म्हणणें असें, कीं रूढि कुचकामी आहे. जो मनुष्य अध्यक्षपदाकरितां लायक असेल, मग तो कोणत्याहि धर्माचा असो, त्यानें अध्यक्षपदाकरितां कोणत्याहे वर्षी निवडून येण्यास हरकत नसावी. या उद्देशानें या वर्षी पारशी गृहस्थाची पाळी होती तरी पारशी उमेदवारांबरोबर पटेलांनींहि आपलें नांव अध्यक्षपदाकरितां दाखल केलें. पार्शी उमेदवार दोघे होते; एक श्री. एच्. पी. मोदी व दुसरे डॉ. सुखिया. पण या वेळीं पटेल हे आणखी तिसरे हिंदु उमेदवार उभे राहिले. अध्यक्षपदाची निवडणूक चुरशीची झाली. मोदींना ५० मतें, पटेलांना ४७ मतें व डॉ. सुखियांना अवघीं ५ मतें पडलीं. अर्थात् मोदी अध्यक्ष झाले. तरी पण पटेलांनीं रूढि मोडूनहि जीं ४७ मतें मिळविलीं तीं निःसंशय त्यांना गौरवास्पद होतीं. पटेलच यावेळीं वास्तविक निवडून यायचे. परंतु कांहीं राष्ट्रीय पक्षाचे सभासद गैरहजर असल्यानें त्यांना कमी मतें मिळालीं व म्हणून त्यांची मोदींवर सरशी झाली नाहीं.

याप्रमाणें मोदी अध्यक्ष झाले खरे, पण त्यांना पटेलांची हजिरी जाणवल्याशिवाय राहिली नाहीं. एकदां असा प्रसंग घडला कीं, म्युनिसिपालींत एका महत्त्वाच्या ठरावावर चर्चा होणार होती. त्या वेळीं प्रेक्षकांची इतकी गर्दी झाली, कीं गॅलऱ्या व मुख्य हॉल हे सर्व लोकांनीं भरून गेले. एवढी मोठी दाटी हॉलमध्येंसुद्धा झालेली पाहून मोदींनीं लोकांना हॉलमधून बाहेर निघण्याचा हुकूम फर्माविला. विठ्ठलभाई पटेल त्या वेळीं हजरच होते. त्यांनीं त्याच वेळीं या हुकुमाला विरोध करतांना म्हटलें कीं "कार्पोरेशनचें कामकाज हें जाहीर रीतीनें चालविण्याचा रिवाज आहे. आणि मुंबई शहरांतील प्रत्येकाला तें कामकाज पाहाण्याचा जन्मसिद्ध हक्क आहे. वरतीं गॅलरींत जागा नाहीं मिळाली तर या हॉलमध्येंसुद्धा लोकांना उभे राहाण्यास कांहीं हरकत नसावी. जशी गॅलरी तसा हा हॉलहि लोकांच्या कामाकरितांच मोकळा आहे. जोंपर्यंत ते तुमच्या कामाला अडथळा आणीत नाहींत तोंपर्यंत तुम्ही त्यांना बाहेर काढूं शकत नाहीं." पटेलांचें हें म्हणणें अध्यक्ष मोदी ऐकून घेण्यास तयार नव्हते. ते म्हणाले, "मीं रूलिंग दिलें आहे, कीं लोकांनीं बाहेर जावें. त्याप्रमाणें त्यांनीं बाहेर गेलें पाहिजे.

नाहींतर त्यांना बाहेर काढण्यांत येईल." अध्यक्षांच्या या भाषणानें सारी गडबड उडाली. विठ्ठलभाई मनांतून संतप्त झाले. पण त्यांनीं आपला राग अनावर होऊं दिला नाहीं. दोन तीन मिनिटें ते शांतपणें उभे राहिले व मग म्हणाले, "आजची सभा तहकूब करावी अशी माझी सूचना आहे." या सूचनेनुसार सभेचें मत घेण्यांत आलें. तेव्हां पटेलांच्या सूचनेला बहुमत मिळालें. अशा रीतीनें लोकांच्या हक्काला बाध येईल असें कांहीं न करतां सभेचा कार्यभाग साधला गेला. असो.

पटेलांनीं साधे सभासद या नात्यानें प्रथम जें कार्य म्युनिसिपालिटींत केलें तेंहि कांहीं कमी महत्त्वाचें नव्हतें. ते राष्ट्रीय पक्षाचे अध्यक्ष व पुढारी असल्यानें त्यांना म्युनिसिपालिटीच्या कार्यांत मानाचें पण जबाबदारीचें स्थान होतें. व त्यांनीं केलेली कामगिरी त्यांना भूषणास्पद अशीच झाली.

## देशी भाषेंतून भाषणांचा उपक्रम

आतांपर्यंत म्युनिसिपालिटींत जीं भाषणें होत तीं इंग्रजींतूनच व्हावींत अशी रूढि असे. पटेलांनीं तारीख २३ एप्रिल १९२३ च्या सभेंत यांत दुरुस्ती करणारा असा ठराव आणला, कीं "यापुढें कोणात्याहि सभासदाला इंग्रजी, गुजराथी, मराठी किंवा हिंदुस्थानी यांपैकीं कोणत्याहि भाषेंतून बोलण्याची मोकळीक असावी." वादविवाद होऊन शेवटीं हा ठराव अशा स्वरूपांत पास झाला, कीं "ज्याला इंग्रजींतून बोलतां येत नसेल त्याला गुजराथी, मराठी किंवा उर्दू यांपैकीं कोणत्याहि भाषेंतून बोलण्याची परवानगी असावी." कोणत्याहि सभासदाला आपले विचार मनमोकळे-पणानें व योग्य रीतीनें सांगतां यावे हा या ठरावाचा अगदीं साधा सरळ उद्देश होता व तो उद्देश साध्य करण्याचें श्रेय प्रथम पटेलांनाच मिळवितां आलें. पण ही रूढि ठराव पास होण्यापूर्वीच पटेलांनीं मोडली होती. मात्र ती कॉर्पोरेशनच्या सभेंत न मोडतां त्यापूर्वीं भरलेल्या स्कूलकमिटीच्या नव्या वर्षाच्या पहिल्या सभेंत मोडली. ही सभा १४ एप्रिल १९२३ रोजीं भरली होती. या सभेला पटेल, मेहता वगैरे १२ सभासद हजर होते. प्रथम स्कूलकमिटीच्या नव्या वर्षाच्या अध्यक्षाची निवडणूक झाली.

विठ्ठलभाई पटेल हे अध्यक्ष व्हावेत अशी सूचना जमनादास मेहता यांनीं आणली व तिला अब्दुल कादर बावला यांनीं अनुमोदन दिलें. जम्नादासांच्या सूचनेवर वादविवाद होऊन सात विरुद्ध चार मतांनीं पटेलांची अध्यक्षपदावर निवडणूक झाली. पटेल अध्यक्षाच्या जागीं बसल्यावर त्यांनीं आपली मातृभाषा जी गुजराथी तींत भाषण केलें व आपल्याला हा मान दिल्याबद्दल सभेचे आभार मानले. पटेलांच्या या भाषणानंतर डॉ. जावळे यांनीं असा एक मुद्दा उपस्थित केला, कीं ही स्कूल्सकमिटी ही कॉर्पोरेशनची एक शाखा आहे. कॉर्पोरेशनमध्यें सारीं भाषणें इंग्रजींतून करण्याचा प्रघात आहे. असें असतांना स्कूल्सकमिटींत सारीं भाषणें इंग्रजींतून कां होऊं नयेत ! कॉर्पोरेशनच्या रूढीप्रमाणें तीं येथेंहि इंग्रजींतूनच झालीं पाहिजेत. यावर अध्यक्ष पटेल यांनीं असा निर्णय केला, कीं " भाषणें इंग्रजींतूनच व्हायला पाहिजेत असा कांहीं स्वतंत्र नियम किंवा कायदा झालेला नाहीं. मग असें असतांना इंग्रजीचा आग्रह काय कामाचा ? स्कूल्सकमिटीपुरतं तरी मी असं सांगतों, कीं यापुढें या कमिटींत कोणत्याहि सभासदाला इंग्रजींत किंवा इतर लोकांना कळणाऱ्या अशा भाषेंत म्हणजे मराठी, गुजराथी किंवा हिंदुस्थानींत भाषण करण्याची मोकळीक राहील."

" आधीं केलें मग सांगितलें " या सदुक्तीप्रमाणें तंतोतंत वागणूक या बाबतींत पटेलांची होती व ज्याप्रमाणें स्कूल्सकमिटीमध्यें त्याचप्रमाणें कॉर्पोरेशनमध्यें त्यांच्या ठरावामुळें बहुसंख्य सभासदांचीं भाषणें करण्याची मोठी सोय झाली. एवढेंच नव्हे तर म्युनिसिपालिटींत चाललेलें कामकाज बहुजनसमाजाला समजेल अशीहि सोय इंग्रजी भाषेची अडगळ नाहींशी करणाऱ्या पटेलांच्या या ठरावामुळें झाली हें निर्विवाद आहे.

## ' शाळांत राजकारण घुसडलें ! '

पटेल हे पुढें कॉर्पोरेशनचे अध्यक्ष होण्यापूर्वी त्यांनीं स्कूल्सकमिटीचे अध्यक्ष म्हणून शिक्षणक्षेत्रांत उपयुक्त कामगिरी केली होती; व कॉर्पोरेशनचे अध्यक्ष झाल्यानंतर ते त्या कमिटीचे अध्यक्ष होते. दोन्हीकडे एकच मनुष्य अध्यक्ष असणें ही प्रथा अगदीं सर्वस्वीं नवीन होती. असो. कमिटीच्या

नव्या वर्षाच्या पहिल्याच दिवशीं भाषेची अडचण कशी नाहींशी केली हें आपण आतांच पाहिलें. नंतर या कमिटीच्या कामाच्या सोयीसाठीं ज्या अनेक पोटकमिट्या नेमल्या गेल्या त्या प्रत्येकीचे पटेल सभासद तर होतेच पण प्रत्येक पोटकमिटीचे ते अध्यक्षहि होते. नवीन शाळा काढणें, काटकसरीनें खर्च कसा करतां येईल याची योजना करणें वगैरे कामासाठीं या पोटकमिट्या नेमलेल्या होत्या. या स्कूलसकमिटीनें दलितवर्गाच्या शिक्षणाला मदत करून उत्तेजन दिलें. तसेंच शाळांतून राष्ट्रभाषा जी हिंदी तिच्या शिक्षणाची सोय करण्यांत आली व त्याकरितां एका स्वतंत्र हिंदी शिक्षकाची योजना झाली. या शिक्षकाचें नांव कृष्णलाल वर्मा असें होतें. पटेलांच्या खटपटीमुळें 'एफ्' आणि 'जी' या वॉर्डांत मोफत व सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाची सोय झाली. पटेलांच्या सूचनेवरून स्कूल्सकमिटीच्या शिपाई, हमाल, पोर्टर वगैरे कनिष्ठ नोकरांना शुद्ध स्वदेशी खादीच्या छत्र्या मोफत देण्यांत आल्या व स्वदेशीच्या प्रसाराकरितां म्युनिसिपल स्टोअरचीहि योजना झाली. पटेलांच्या अवघ्या दीड वर्षाच्या कारकीर्दीत शाळेंत येणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या पूर्वीपेक्षां दुप्पट वेगानें वाढली. तसेंच बक्षिसें द्यावयाच्या रकमेंतहि बरीच वाढ करण्यांत आली. एकंदरीनें अगदीं किरकोळ बाबींपासून तों अत्यंत महत्त्वाच्या गोष्टीपर्यंत पटेल स्वतः लक्ष घालीत व त्यामुळें स्कूल्सकमिटीचे अध्यक्ष म्हणून त्यांनीं केलेलें कार्य लोकप्रिय झालें यांत आश्चर्य नाहीं. परंतु चांगल्या कृत्यालाहि नांवें ठेवणारे कांहीं दुराराध्य लोक असतातच. ते म्हणत असत, कीं पटेल हे स्कूल्स-कमिटींत शिरल्यापासून त्यांनीं शाळांत राजकारण घुसडलें आहे व अशा लोकांचा पटेलांच्या कारभारावर हा मोठा आरोप होता. परंतु आपलीं स्कूल-कमिटीच्या अध्यक्षपदाचीं अधिकारसत्रें ज्या वेळीं पटेलांनीं खालीं ठेविलीं त्या वेळीं त्यांनीं अशा टीकाकारांना सभेंत योग्य उत्तर दिलें. आरंभीं ते सभासदांना म्हणाले, "तुमच्या सहकार्यानें व सौजन्यानें मीं आजपर्यंत या अध्यक्षपदाची जबाबदारी पार पाडली. मी १८ महिन्यांपेक्षां अधिक काळ या जागेवर होतों व तेवढ्या अवधींत कसकसें कार्य झालें तें आपल्या-समोर आहेच. कोणी म्हणतात, कीं मीं अध्यक्ष झाल्यापासून शाळांत राजकारण

आणलें आहे. परंतु हा आरोप अगदीं चुकीचा आहे. शिक्षकांचीं व शिक्षणाधिकाऱ्यांचीं सर्व गाऱ्हाणीं आमच्या कमिटीनें दूर केलीं आहेत. आम्हीं त्यांना आणखीहि असें आश्वासन दिलें आहे, कीं जोंपर्यंत शाळेच्या कामाला किंवा कमिटीच्या कारभारांत अडथळा येत नाहीं तोंपर्यंत प्रत्येक शिक्षकाला किंवा कमिटीच्या नोकराला किंवा अधिकाऱ्याला आपलीं स्वतंत्र अशीं राजकीय, सामाजिक किंवा नैतिक मतें प्रतिपादन करण्याचा पूर्णपणें हक्क आहे. मग एवढें आम्हीं त्यांना स्वातंत्र्य दिलें यांत आम्ही राजकारण आणलें हें कसें सिद्ध होतें? असो. आतांपर्यंत तुम्ही जी आनंदानें मला मदत केलीत त्याबद्दल मी तुमचे आभार मानतों." या भाषणांवरून दुराराध्य लोकांना परस्परच उत्तर मिळालें.

## कॉंग्रेसनें नगरपालिका काबीज केल्या

आतां आपण पटेलांच्या कॉर्पोरेशनमधील कार्याकडे वळूं. १९२३ साल संपलें व १९२४-२५ सालाकरितां नवीन अध्यक्षाची निवडणूक होण्याची वेळ आली. पटेल या जागेकरितां उभे राहिले. त्यांचे प्रतिस्पर्धी डॉ. जावळे होते. ही निवडणूक ३ एप्रिल १९२४ रोजीं झाली. पटेलांना ५३ मतें व डॉ. जावळे यांना ४७ मतें मिळालीं. अर्थात् पटेलांची अध्यक्ष म्हणून निवडणूक झाली व त्याबरोबरच मुंबई म्युनिसिपालिटीच्या इतिहासांत नव्या युगाला सुरवात झाली. एवढेंच नव्हे तर त्याचे प्रतिध्वनी साऱ्या हिंदुस्थानांत ऐकूं येऊं लागले. पटेलांसारखा एक मोठा देशनेता अध्यक्ष झाल्याची वार्ता पसरतांच त्यांच्यावर हिंदुस्थानांतील मोठमोठ्या स्थानिक व इतर संस्थांकडून संदेशांचा वर्षाव होऊं लागला. त्या वेळीं योगच असा आला, कीं देशाचे प्रख्यात पुढारी आपआपल्या प्रांतांतील वरिष्ठ म्युनिसिपालिट्यांच्या अध्यक्षस्थानीं विराजमान झाले. इकडे पटेलांनीं मुंबई म्युनिसिपालिटीचे अध्यक्षस्थान सजविलें तर तिकडे कलकत्ता म्युनिसिपालिटीच्या अध्यक्षस्थानीं बंगालचे पुढारी देशबंधु चित्तरंजनदास यांची निवड झाली. विठ्ठलभाई पटेलांचे बंधु वल्लभभाई हे अहमदाबाद म्युनिसिपालिटीच्या अध्यक्षपदावर विराजमान झाले व पंडित

जवाहरलाल नेहरू यांनीं अलाहाबाद कॉर्पोरेशनचें अध्यक्षस्थान मंडित केलें तसेंच बाबू राजेंद्रप्रसाद पाटणा म्युनिसिपालिटीचे अध्यक्ष झाले. याप्रमाणें देशांतील पांच मोठ्या स्थानिक स्वराज्य संस्था काँग्रेसच्या पुढारी वर्गानें हस्तगत केल्या. काँग्रेसचा विधायक कार्यक्रम पार पाडण्याकरितां देशांतील स्थानिक स्वराज्य संस्था हस्तगत करण्याचें ठरलें होतें. व त्याप्रमाणें अंमल होण्यास सुरवात झाली. या नव्या युगांतील संस्थांनीं सरकारच्या विरोधास न जुमानतां देशांत नवचैतन्य निर्माण केलें, यांत शंका नाहीं.

## पटेलांची कार्यदक्षता

म्युनिसिपालिटीचा अध्यक्ष किती कर्तव्यनिष्ठ आणि जबाबदारीची जाणीव असलेला पाहिजे, हें प्रथम पटेलांनीं निदर्शनास आणलें. अध्यक्षाची जागा ही नुसत्या मानसन्मानाची नसून ती कर्तव्याची भूमि आहे, लोकसेवा हेंच तिचें ध्येय आहे हें पटेलांनींच प्रथम आपल्या स्वतःच्या उदाहरणावरून सिद्ध केलें असें म्हणण्यास हरकत नाहीं. आतांपर्यंत जेव्हां म्युनिसिपल कौन्सिलच्या सभा असतील त्याच वेळीं साधारणपणें अध्यक्ष हजर असायचा. बाकी इतर वेळेला सरकारनें नेमलेला जो म्युनिसिपल कमिशनर त्याजकडेच बहुतेक काम सोंपविलेलें असायचें ! मग अशा स्थितींत म्युनिसिपालिटीचें काम किती लोकमतानुवर्ती चालत असेल याची कल्पनाच करावी ! कारण अध्यक्षाच्या गैरहजिरींत तर, हा एक कमिशनर म्युनिसिपालिटीच्या सर्वसत्ताधिकाऱ्याप्रमाणें वागे ! आणि असा अध्यक्ष सभांच्या वेळीं हजर राहिला तरीसुद्धा त्याला कामाची माहिती पुरेशी नसल्यानें सरकारनियुक्त कमिशनर हाच बहुशः लोकनियुक्त अध्यक्षांचा मार्गदर्शक होई ! पटेलांनीं ही स्थिति पार बदलून टाकली. अध्यक्षाला वास्तविक पगार नाहीं कीं पेन्शन नाहीं. पण तो जनतेचा सेवक आहे. त्यानें म्युनिसिपालिटीच्या इतर नोकरांप्रमाणें काम केलें पाहिजे. या गोष्टी पटवून देण्यासाठीं पटेल अध्यक्षपदाच्या कारकीर्दीच्या अगदीं पहिल्या दिवसापासून दररोज सकाळीं ११ ते सायंकाळीं ६ वाजेपर्यंत म्युनिसिपालिटींत इतर नोकरांप्रमाणें हजर राहून काम करीत. पहिल्या दिवशीं ११ वाजतां जेव्हां अध्यक्ष पटेल म्युनिसिपालिटींत आले तेव्हां

ते तडक कमिशनरच्या ऑफीसमध्यें गेले व त्यांनीं कमिशनरला विचारलें, "माझें ऑफिस कुठें आहे?" तेव्हां कमिशनर मि. क्लेटन म्हणाले, "अध्यक्षाकरितां अद्यापि स्वतंत्र ऑफिस नाहीं!" "मोठी आश्चर्याची गोष्ट आहे ही!" पटेल म्हणाले, "चला आत्तां मला ऑफिस तयार करून पाहिजे." असें म्हणून पटेलांनीं कॉर्पोरेशनच्या हॉलमध्येंच कमिशनरकडून एक पडदा बांधवून एका बाजूला आपलें ऑफिस थाटलें! कमिशनरला या सर्व गोष्टी झटक्यासरशीं झालेल्या पाहून आश्चर्य वाटलें. कारण अध्यक्षानें पहिल्याच दिवशीं एकदम कमिशनरच्या खोलींत जाणें, त्याच्या कामाची पाहाणी करणें, स्वतःचें स्वतंत्र ऑफिस करवून घेऊन सायंकाळीं सहा वाजेपर्यंत काम करणें या कृती कोणत्याहि अध्यक्षाकडून अद्यापि घडलेल्या नव्हत्या. त्या प्रथम पटेलांनीं घडविल्या, आपल्या कामावर देखरेख करणारा आपल्या वरचा कोणी तरी अधिकारी आहे ही जाणीव अद्यापि युरोपियन कमिशनरला झालेली नव्हती. ती त्याला पटेलांनीं करून दिली. आतां जुना जमाना जाऊन नवी विटी नवें राज्य सुरू झालें, असें पट्टेवाल्यापासून कमिशनरपर्यंत सर्वांना वाटूं लागलें. अध्यक्ष हा सभांच्या वेळांव्यतिरिक्त इतर वेळीं काम करीत नसल्यानें आंतापर्यंत त्याला स्वतंत्र ऑफिसची गरज भासली नाहीं. पटेलांच्या मतें हीं स्थिति इष्ट नव्हती. त्याबरोबर हेंहि लक्षांत ठेवलें पाहिजे, कीं पटेलांनीं आपल्या अध्यक्षपदाची बडेजावी कधीं मिरविली नाहीं. कारण त्यांनीं जें ऑफिस मागितलें तें केवळ हॉलमध्यें एक पडदा घालून थाटलें होतें! पण पटेलांनीं अध्यक्षपद सोडल्यानंतर ते जेव्हां साधे सभासद झाले तेव्हां त्यांनीं अध्यक्षाला ऑफिसकरतां एक स्वतंत्र खोली असावी व त्याकरितां सर्व फर्निचर व इतर सामानसुमान, नोकरचाकर व अध्यक्षांकरितां एक स्वतंत्र मोटार असावी असा ठराव आणला व तो पास झाला. याप्रमाणें अध्यक्षाचा जामानिमा व इतमाम उपभोगणारे पहिले अध्यक्ष म्हणजे बॅरिस्टर बॅप्टिस्टा होत. ही सर्व व्यवस्था स्वतःला करून घेतां येण्यासारखी असूनसुद्धा पटेलांनीं स्वतःला अध्यक्षपद असेपर्यंत करून घेतली नाहीं, यांत त्यांची विनयशील, त्याचप्रमाणें त्यागी वृत्ति दिसून येते. पटेल म्युनिसिपालिटीचे अध्यक्ष असतांना स्कूल्सकमिटीचेहि अध्यक्ष

होते व तिच्या कामांत व शाळांच्या तपासणींत ते बारकाईनें लक्ष घालीत. अशा रीतीनें दोन्हीकडे अध्यक्ष राहाणें ही अगदीं नवी गोष्ट होती यासंबंधीं वर उल्लेख केलाच आहे. पण एवढ्यावरूनच पटेलांना कामाचा उरक किती असेल याची जरी कल्पना करतां आली तरी पटेल खुद्द अध्यक्ष असतांना त्यांनीं जें काम केलें तें आतांपर्यंतच्या कोणत्याहि अध्यक्षाच्या किंवा इतर अधिकारीवर्गाच्याहि कल्पनेबाहेरचें होतें. पटेल हे कॉर्पोरेशनचे व स्कूल्सकमिटीचे अध्यक्ष असून शिवाय सर्व स्पेशल कमिट्यांचे अध्यक्ष होते. त्यांनीं अशा स्पेशल मीटिंगच्या सभा एक हजाराच्यावर भरविल्या ! प्रत्येक सभेला पटेल हजर राहून काम पाहात. दिवसा काम संपलें नाहीं तर पटेल रात्रींच्या सभा बोलवीत पण ठराविक वेळांत काम संपलेंच पाहिजे याबद्दल दक्षता बाळगीत. ज्या त्या महिन्यांतील ठरावांची यादी त्या त्या महिन्यांत निकालांत ते काढीत. त्यामुळें या महिन्याचें काम पुढच्या महिन्याला उरत नसे. पटेलांच्या कार्यपद्धतीचें हें वैशिष्टय होतें. कारण त्यापूर्वीं व अजूनहि तीनतीन चारचार महिन्यांचीं शिलकी कामें राहिलेलीं आढळून येतात. पटेलांनीं असें शिलकी काम एका महिन्याचें दुसऱ्या महिन्याला कधींहि ठेवूं दिलें नाहीं. त्यांनीं काम संपण्याकरितां रात्रींच्या सभा भरविण्याची रीत प्रथमच सुरू केली. पूर्वीं अध्यक्षाची मुदत संपली म्हणजे त्यानें गव्हर्नरला पार्टी, मेजवानी द्यावी असा रिवाज असे. या पार्टींत मद्याचा उपयोग केला जाई. पण पटेल हे जेव्हां अध्यक्षपदावरून निवृत्त झाले तेव्हां त्यांनीं गव्हर्नराला पार्टी देण्याची पद्धत बंद करून टाकली. अशा रीतीनें खर्चांत स्वतःपुरतीच काटकसर न करितां ती त्यांनीं सरसहा म्युनिसिपालिटी व स्कूल्सकमिटीच्या कारभाराला लागू केली. ही सर्व काटकसर स्वाभिमानानें प्रेरित अशीच होती. म्युनिसिपालिटींत कमिशनरची जागा आतांपर्यंत युरोपियन माणसाकडेच असे, पण या जागेवर हिंदी मनुष्य यावा अशी पटेलांनींच योजना केली. म्युनिसिपालिटीच्या व स्कूल्सकमिटीच्या कारभारांत स्वदेशी मालाचा प्रचार त्यांनींच केला. शेंकडों लांड्यालबाड्या व अफरातफरी त्यांनीं शिताफीनें उघडकीस आणल्या व त्या करणाऱ्यांना कडक शासन केलें. एफ्. व जी. या वॉर्डांत त्यांच्या

स्वतःच्या खटपटीनें मोफत व सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाची सोय झाली हें तर उल्लेखिलेलेंच आहे. याप्रमाणें आपल्या आमदानींत पटेलांनीं अनेक लोकोपयुक्त कामें केलीं. परंतु या सर्वांपेक्षां ज्या प्रसंगांनीं सभासद या नात्यानें व अध्यक्षपदावरूनहि साऱ्या हिंदुस्थानचें लक्ष पटेलांनीं आपल्याकडे वेधलें ते महत्त्वाचे प्रसंग आतां सांगूं.

## इंग्रज अधिकाऱ्यांचें कटु स्वागत

पहिला प्रसंग म्हणजे १९२३ च्या डिसेंबरमध्यें मुंबई म्युनिसिपालिटीनें मुंबई इलाख्याचे गव्हर्नर सर जॉर्ज लॉइड यांना मानपत्र देण्याचा ठराव पास केला त्या वेळेचा होय. १९२३ या सालीं पटेल हे म्युनिसिपालिटीचे साधे सभासद होते. तरी मानपत्र देण्याचा हा ठराव त्यांना स्वतःला व त्या संस्थेलाहि मानहानिकारक आहे असेंच वाटलें व म्हणून या कृत्याबद्दल त्यांनीं त्या संस्थेच्या ठरावाचा निर्भय रीतीनें उघड निषेध केला. या ठरावाच्या निषेधार्थ चौपाटीवर तारीख २ डिसेंबर रोजीं प्रचंड जाहीर सभा भरविण्यांत आली. व तींत निषेधाचा ठराव खुद्द पटेलांनीं मांडला, तो असाः—( १ ) मुंबईवासीयांची ही जाहीर सभा सर जॉर्ज लॉईड यांच्या कारभाराचा कडक निषेध करीत आहे. कारण त्यांनीं आपलपोट्या व दडपशाहीच्या धोरणानें हॉर्निमनच्या हद्दपारीस सुरवात केली, महात्मा गांधींना कैद केलें आणि आमच्या राष्ट्रीय भावनांचा दुश्मनाप्रमाणें द्वेष केला. ( २ ) मुंबईनगरवासीयांच्या इच्छेला न जुमानतां त्यांच्या नांवानें म्युनिसिपालिटीनें गव्हर्नरला मानपत्र देण्याचा जो ठराव केला आहे त्याबद्दल मुंबईवासीयांची ही जाहीर सभा म्युनिसिपालिटीचा तीव्र निषेध करीत आहे. आणि ज्या सभासदांनीं मानपत्राच्या बाजूनें मतें दिलीं ते शहराचे प्रतिनिधी नाहींत असें आम्हीं समजतों. म्हणून त्यांनीं आपल्या जागांचे राजीनामे द्यावेत व पुन्हा त्यांच्याबद्दल निवडणुका व्हाव्यात अशी ही सभा म्युनिसिपालिटीला सूचना करीत आहे.

पटेलांनीं हा ठराव मांडून त्यावर भाषण केल्यानंतर तो या जाहीर सभेंत पास झाला.

राष्ट्रकार्यांत पटेलांची मनःप्रवृत्ति कशी होती हें कळण्याच्या दृष्टीनें या प्रसंगाचें महत्त्व आहे हें स्पष्ट होतें. व्यक्तीपेक्षां संस्था श्रेष्ठ व संस्थेपेक्षां जनता श्रेष्ठ हें तत्त्व या प्रसंगानें पटेलांनीं चांगलें बिंबविलें व हें त्यांचें कार्य अगदीं योग्य असेंच होतें असें कोणीहि सुज्ञ मनुष्य म्हणेल. परंतु या प्रसंगाहून दुसरा प्रसंग अधिक महत्त्वाचा होता व तो जेव्हां पटेल १९२४ सालीं अध्यक्ष झाले त्या वेळीं घडून आला. त्याची माहिती वाचकांना उद्बोधक होईल म्हणून जरा विस्तारानें आतां खालीं दिली आहे.

मंगळवार तारीख २ डिसेंबर १९२४ या दिवशीं हिंदुस्थानचे व्हाइसरॉय लॉर्ड रीडिंग हे आपल्या पत्नीसह मुंबई नगरींत प्रवेश करणार होते. त्या वेळीं सकाळीं स्टेशनवर त्यांचें सार्वजनिक रीतीनें मोठें स्वागत करण्याकरितां ज्या लोकांना सरकारकडून बोलावण्यांत आलें त्यांत म्युनिसिपालिटीचे अध्यक्ष म्हणून पटेलांचें नांवहि समाविष्ट होतें. तसेंच लॉर्ड व लेडी रीडिंग यांना गव्हर्मेंट हाउसवर थाटाची मेजवानी द्यायची होती तिलाहि हजर राहाण्याकरितां पटेलांना अध्यक्ष म्हणून निमंत्रण होतें. शिवाय ४ डिसेंबरला सायंकाळीं व्हाइसरॉय साहेबांच्या हस्तें ' गेटवे ऑफ इंडिया ' चा उद्घाटन समारंभ व्हायचा होता त्याकरितांहि अध्यक्ष पटेलांना हजर राहाण्याविषयीं बोलावलें होतें. तेव्हां या व्हाइसरॉयांचें आगमन होण्यापूर्वी पटेलांनीं तारीख २४ नोव्हेंबरला मुंबई सरकारच्या राजकीय खात्याच्या सेक्रेटरीला खालील-प्रमाणें उत्तर लिहिलें:—

" महाराज,

व्हाइसरॉय व त्यांच्या पत्नी यांच्या स्वागतार्थ जे तीन निरनिराळे समारंभ होणार आहेत त्यांना हजर राहाण्याकरितां मला आपणांकडून निमंत्रणें आलीं. परंतु या तीनहि समारंभापैकीं एकाहि समारंभास मला हजर राहतां येणें शक्य नाहीं हें आपणास कळविण्यांस मला अत्यंत खेद होत आहे. सध्या देशांत जी राजकीय स्थिति आहे तिचा विचार केला तर माझ्या हजारों देशबांधवांप्रमाणें मलाहि अशा समारंभास हजर न राहाण्यांतच स्वाभिमान आहे असें वाटतें. तरी आपण व्हाइसरॉय व त्यांच्या पत्नी यांना कृपा

करून कळवा, कीं या समारंभास हजर राहण्यास मी असमर्थ आहें याबद्दल मला दिलगिरी वाटते. आणि त्यांना असेंहि स्पष्ट सांगा, कीं अशा समारंभास हजर न राहण्यांत मी माझें अवश्य असें राष्ट्रीय कर्तव्यच बजावीत आहें. त्यांत व्हाइसरॉयसाहेबांचा अपमान करण्याचा माझा हेतु नाहीं. कळावें.

आपला,

**व्ही. जे. पटेल**

हें महत्त्वाचें पत्र पटेलांनीं आधीं पाठवून दिलें व त्याच दिवशीं व्हाइसरॉयांच्या आगमनाचा विचार करण्याकरितां कॉर्पोरेशनची तांतडीची संस्मरणीय सभा भरविण्यांत आली. कॉर्पोरेशनच्या नित्याच्या कामाला सुरवात करण्यापूर्वी पटेल म्हणाले, " सभ्य गृहस्थहो व भगिनींनो, आजच्या नेहमींच्या कामाला सुरवात करण्यापूर्वी मला व्यक्तिशः एका महत्त्वाच्या सार्वजनिक बाबतींत आपल्याला कांहीं सांगायचें आहे. आपल्याला माहीतच आहे कीं पुढच्या मंगळवारीं व्हाइसरॉय लॉर्ड रीडिंग आपल्या पत्नीसमवेत मुंबानगरींत येणार आहेत. त्यांच्या मुक्कामांत त्यांच्या सन्मानार्थ निरनिराळे समारंभ होणार आहेत. मला या समारंभास हजर राहाण्याबद्दल निमंत्रणें आलीं आहेत. आणि कॉर्पोरेशनच्या अध्यक्षाला निमंत्रण असल्यामुळें तो समारंभास हजर असणें हें अपेक्षित आहे. परतु बराच विचार केल्यानंतर आणि मनोदेवतेला साक्ष ठेवून अशा कोणत्याहि समारंभाला मी हजर न राहण्याचें ठरविलें आहे. त्याची कारणें आपल्याला चांगलीं माहीतच आहेत. तरी पण या ठिकाणीं ही गोष्ट मला स्पष्टपणें सांगितली पाहिजे, कीं माझा हा निर्णय फक्त माझ्यापुरताच आहे. माझ्यामागून येणाऱ्या अध्यक्षाला तो कोणत्याहि प्रकारें बंधनकारक नाहीं. कारण ही ज्याच्या त्याच्या मर्जीची गोष्ट आहे. मला असेंहि जाहीर रीतीनें सांगितलें पाहिजे, कीं व्हाइसरॉयसाहेबांच्या सन्मानार्थ होणाऱ्या समारंभास हजर न राहाण्यांत मला त्यांच्याबद्दल कोणत्याहि प्रकारचा अनादर व्यक्त करायचा नाहीं. तर तसें करण्यांत मी अवश्य असें माझें राष्ट्रीय कर्तव्यच बजावीत आहें असें मला वाटतें. मीं या संबंधांत आतां जें सांगितलें तसें पत्र मुंबई सरकारच्या राजकीय सेक्रेटरीला पाठविलं आहे."

## कार्पोरेटरांवर वज्राघात !

हें पत्र वाचल्याबरोबर वज्राघात व्हावा किंवा आकाशांतून वीज कडाडून खालीं पडावी आणि मग कांहीं लोकांच्या हृदयांत धडकी भरावी किंवा सर्वांगांत भीतीचें कांपरें संचरावें अशी स्थिति कॉर्पोरेशनमधील मवाळ सभासदांची होऊन गेली. व्हाइसरॉयांच्या स्वागतावर बहिष्कार ! आणि तोहि अध्यक्षानें घालायचा ! मुंबानगरीची केवढी ही अप्रतिष्ठा ! ! व्हाइसरॉयांचा केवढा हा अपमान ! त्यापेक्षां असा हा नामुष्की आणणारा अध्यक्षच नको असें त्यांना वाटूं लागलें. या बहिष्कारभीरूंचे अग्रणी जे राजपदवीविभूषित वसंतराव दाभोळकर त्यांनीं तर अशी सूचना आणली, कीं ज्या महत्त्वाच्या कामाकरितां आजची सभा बोलावली आहे त्या कामाला अडथळा आणूं पाहाणारे पटेल हे अध्यक्षस्थानीं बसूं शकतात काय असा माझा सवाल आहे. या सूचनेवर झालेली चर्चा ऐकल्यानंतर पटेलांनीं निर्णय दिला, कीं “ मला अध्यक्षस्थानीं बसण्याचा अधिकार चालू ठेवतां येतो. मीं माझी अध्यक्षाची खुर्ची आनंदानें रिकामी केली असती, आणि साधा सभासद म्हणून बसलों असतों. पण नियमांतच तसें करतां येत नाहीं असें आहे त्याला कोण काय करणार ? ” झालें, सभा चूप झाली. इतर मामुली कामें संपल्यावर अध्यक्षांनीं त्या दिवशींची बैठक बरखास्त केली. पुन्हा १ डिसेंबरला म्हणजे व्हाइसरॉयांच्या आगमनाच्या एक दिवस आधीं कॉर्पोरेशनची सभा झाली. व त्या सभेंत अध्यक्षांनीं कॉर्पोरेशनतर्फे निमंत्रणाप्रमाणें स्वागताला हजर असावें असा ठराव ५० विरुद्ध ४४ मतांनीं पास झाला. अनुकूल असणाऱ्या ५० सभासदांत सरकार-नियुक्तांचीच पुष्कळशी भरती होती. या लोकांनीं पटेल हे कॉर्पोरेशनला न विचारतां व्हाइसरॉयांच्या स्वागतावर बहिष्कार घालीत आहेत याबद्दल लांबलचक ठराव करून दुःखाचें प्रदर्शन केलें ! विरुद्ध असलेल्या ४४ सभासदांत बॅ. बॅप्टिस्टा, डॉ. वेलकर, अवंतिकाबाई गोखले इत्यादि राष्ट्रीय बाण्याची मंडळी होती. आणि ठराव पास करणाऱ्या सभासदांत मोदी, सेठना, दाभोळकर ही सरकारी कृपेची पाखर इच्छिणारी मंडळी होती. ठरल्याप्रमाणें व्हाइसरॉय

येऊन गेले. त्यानंतर पांच तारखेला कॉर्पोरेशनची बैठक भरली. तींत पटेलांवर निंदाव्यंजक ठराव आणण्याची कारवाई होणार होती, पण त्यापूर्वींच पटेलांनीं म्युनिसिपल सेक्रेटरीला एक पत्र पाठविलें होतें. तें या बैठकींत सेक्रेटरींनीं प्रथम वाचून दाखविलें. त्यांत पटेलांनीं लिहिलें, कीं "तारीख १ डिसेंबरला स्वागताबद्दलचा जो ठराव झाला तो मीं पाहिला. पण त्याप्रमाणें मला वागतां येणार नाहीं याबद्दलचीं माझीं कारणें सभासदांना मी पूर्वीं चांगलीं माहीत करून दिलीं आहेत. अर्थात् अशा परिस्थितींत मला माझ्या अध्यक्षपदाचा राजीनामा देणें भाग आहे व तो मी या पत्रानें देत आहें. माझ्या कित्येक स्नेह्यांनीं मला आग्रहून सांगितलें, कीं मला राजींनामा देण्याचें कांहीं कारण नाहीं. कारण लोकमत हें माझ्या बाजूचें आहे. ठरावाविरुद्ध मत देणारे सभासद बहुतेक लोकनियुक्त होते आणि त्या बाजूला मत देणाऱ्यांत सरकारपक्षाचे बरेचसे सभासद होते. या सर्व गोष्टींची जाणीव जरी मला आहे तरी एकदा राजीनामा देण्याचा निश्चय केल्यानंतर तो आतां मला रद्द करण्याची इच्छा नाहीं. ज्यांनीं मला अध्यक्ष म्हणून निवडून दिलें त्या सभासदांनीं जर बहुमतानें ठराव पास केला आहे व जर असा ठराव मला मान्य नाहीं तर मी त्या जागेवर न राहाणेंच योग्य आहे. झाला तो ठराव इष्ट झाला कीं नाहीं हा या ठिकाणीं मुद्दा नाहीं. फक्त आहे त्या परिस्थितींत लोकशाहीच्या तत्त्वाप्रमाणें कारभार चालला आहे कीं नाहीं तेवढें पाहायचें आहे व तसा तो चालू द्यावा अशी माझी इच्छा आहे व म्हणून त्या तत्त्वास अनुसरून मी राजीनामा दिला आहे." याप्रमाणें पटेलांनीं व्हाइसरॉयांच्या स्वागतावर बहिष्कार घालून अध्यक्षपदाचा राजीनामा दिला ही बातमी वणव्यासारखी मुंबई इलाख्यांत पसरली व त्यांचें चोंहीकडे या बाणेदार कृत्याबद्दल सार्वजनिक रीतीनें अभिनंदन करण्यांत आलें. पण पटेलांनीं जरी अध्यक्षपदाचा राजीनामा दिला तरी पुनः अध्यक्षाची निवड होईतों त्या खुर्चीवर कोणी तरी काम चालू करण्यास असलें पाहिजे, म्हणून त्या जागेकरितां प्रथम वसंतराव आनंदराव दाभोळकर यांचें नांव सुचविलें गेलें. पण त्याला जमनादास मेहता यांनीं उपसूचना आणली, कीं आजच्या बैठकीला पटेलांनीं अध्यक्ष असावें. ही उपसूचना प्रचंड

बहुमतानें मंजूर होऊन पटेलांनीं अध्यक्षाचें काम चालविलें. पुन्हा तारीख ८, ११ व १८ या दिवशीं ज्या बैठकी झाल्या त्या प्रत्येकींत पटेलांचीच तात्पुरते अध्यक्ष म्हणून निवड झाली. परंतु असें फार दिवस चालणें शक्य नव्हतें. कारण नेहमींच्या अध्यक्षाची निवड कधीं तरी व्हावयास पाहिजेच होती व त्याप्रमाणें तारीख ५ जानेवारी १९२५ या दिवशीं अध्यक्षाची निवडणूक करण्याचें ठरलें. निवडणूक चुरशीची झाली. पटेल व जावळे असे अध्यक्षपदाच्या निवडणुकीला उभे राहिले. पटेलांना ५० व जावळे यांना ४५ मतें मिळून, पटेल हे पुन्हा अध्यक्षपदीं निवडले गेले. त्या वेळीं पटेल म्हणाले, "मीं एकदा राजीनामा दिला असतांहि तुम्ही मला पुन्हा या ठिकाणीं निवडून आणलें याबद्दल मी तुमचे आभार तर मानतोंच, पण यावरून ज्या कारणांकरितां मी राजीनामा दिला तें कारण अयोग्य नव्हतें ही गोष्ट तुम्हीं चांगली सिद्ध केली आहे, असें मला वाटतें. मला पुन्हा निवडून आणण्यांत तुम्हीं माझ्या व्यक्तीचा गौरव केला असें नसून त्यापेक्षां महत्त्वाची जी आपली जनता तिचाच गौरव केला आहे. तिच्या इच्छेला तुम्हीं मान दिला आहे." यानंतर पटेलांच्या अध्यक्षपदाची मुदत लवकरच संपली. तेव्हां त्यांना त्यांच्या मित्रांनीं व चाहत्यांनीं थाटाची मेजवानी केली व सहा हजार रुपयांची थैली अर्पण केली. पण त्यांपैकीं तीन हजार रुपये पटेलांनीं स्वराज्य पक्षाला दिले व तीन हजार रुपये राष्ट्रीय पक्षाला दिले व स्वतःला एक पैहि त्यांतून ठेवली नाहीं !

## नगरपित्यांकडून

यानंतर पुढील सालाकरितां ६ एप्रिल १९२५ च्या सभेंत बॅ. बॅप्टिस्टा यांची अध्यक्षस्थानीं जेव्हा निवड झाली तेव्हां पटेलांच्या कामगिरीचा सन्मानपूर्वक उल्लेख करण्यांत आला. जम्नादास मेहता यांनीं त्या वेळीं त्या-संबंधीं ठराव मांडतांना सांगितलें, कीं "पटेलांनीं अध्यक्ष नात्यानें गतवर्षीं जी बहुमोल जनसेवा केली त्याबद्दल ही कॉर्पोरेशन त्यांची अत्यंत आभारी आहे. विशेषतः निरनिराळ्या कमिट्यांवर अध्यक्ष होऊन त्यांनीं कामाचा जो दांडगा उरक दाखविला त्याबद्दल आम्ही त्यांच्याविषयीं कृतज्ञता व्यक्त

करीत आहों. त्यांचा उत्साह, बुद्धिवैभव, मनमिळाऊपणा, कार्यकुशलता आणि निःपक्षपातीपणा या त्यांच्या अनेक गुणांबद्दल आम्हांला अत्यंत आदर वाटत असून तो आम्ही या ठिकाणीं दर्शवीत आहों." जम्नादासांचा हा गौरवपर ठराव कॉर्पोरेशनमध्यें टाळ्यांच्या प्रचंड गजरांत सर्वानुमतें संमत झाला.

यापुढें पटेलांनीं साधे सभासद असतांना अनेक लोकोपयुक्त ठराव आणून ते पास केले. शहरांतील वॉर्डांची संख्या त्यांनीं वाढवून घेतली व त्यांतील उमेदवारांच्या संख्येची पुनर्घटना करण्यांत आली. तसेंच अध्यक्षाकरितां नवीन ऑफिस व मोटार यांची तरतूद त्यांनीं करविली. शहरांत देशी दवाखाने स्थापण्याची त्यांनीं व्यवस्था करून घेतली. म्युनिसिपल कमिशनरकरितां स्वतंत्र बंगला बांधावा अशी जी एक टूम निघाली होती ती त्यांनीं रद्द केली व असा बंगला बांधण्यांत खर्च करण्याचें कारण नाहीं असें ठरवून घेतलें. मुंबई शहरांत मलेरियाची सांथ कमी करण्याकरितां हेल्थ ऑफिसरकडून जी उपाययोजना करण्यांत आली तिच्यावर देखरेख करण्याकरितां तिघांजणांची एक कमिटी नेमली होती तींत पटेल एक सभासद होते. या कमिटीनें उपयुक्त असें कार्य करून शहरांतील मलेरिया हटविण्याचें श्रेय संपादन केलें. असो. यानंतर लवकरच पटेलांची असेंब्लीच्या अध्यक्षस्थानीं निवड झाल्याची सुवार्ता कॉर्पोरेशनमध्यें आली तेव्हां बॅ. बॅप्टिस्टा यांनीं आनंद प्रदर्शित करून म्हटलें, कीं "पटेलांची असेंब्लीच्या अध्यक्षस्थानीं निवडणूक झाल्याचं समजून मला जसा आनंद झाला तसाच तो तुम्हांलाहि झाला असला पाहिजे असं मला खात्रीनें वाटतं. मी कॉर्पोरेशनचा अध्यक्ष या नात्यानें त्यांचं यापूर्वीच अभिनंदन करून त्यांना सुयश चिंतिलं आहे. मला असं निश्चितपणें वाटतं कीं पटेल हे आपल्या उदात्त व्यक्तिमत्त्वानें आणि निःपक्षपाती धोरणानें असेंब्लींतहि आदर्श अध्यक्ष म्हणून गाजतील. 'नृपतिजनपदानां दुर्लभः कार्यकर्ता' हें वर्णन त्यांना लागू करण्यास हरकत नाहीं. त्यांच्या कारकीर्दींत हिंदुस्थानला स्वराज्याचा मार्ग जलद आक्रमण करतां येईल असा मला विश्वास वाटतो.

"पण आपल्याला जो आनंद झाला आहे त्यांत थोडं दुःखाचं विरजण पडलं आहे. कारण पटेलांच्या अध्यक्षपदानें असेंब्लीचा जरी फायदा झाला असला तरी आपला तोटा झाला आहे. कॉर्पोरेशनला त्यांचा विरह होणार आहे. नॅशनल पार्टीला आतां पुढारी नाहीं. कांहींना आपला चांगला मित्र दुरावला असें वाटेल; कांहींना आपला उदात्त शत्रु लांब गेला असें वाटेल आणि कमिशनरला या दोन्ही गोष्टी झाल्या असें वाटेल. कांहीं असलं तरी या कॉर्पोरेशनला ही मोटी अभिमानाची व आनंदाची गोष्ट आहे, कीं हिंदुस्थानांतील वरिष्ठ कायदेमंडळाचा पहिला लोकनियुक्त अध्यक्ष या कॉर्पोरेशनमधील आहे."

## वृत्तपत्रांसाठीं लेखन

हातीं घेतलेलें काम शक्य तितक्या उत्तम रीतीनें पार पाडायचें हें पटेलांचें धोरण असे. त्यामुळें अध्यक्ष असतांना कॉर्पोरेशनचा कारभार अधिकाधिक लोकहितप्रवण कसा करतां येईल इकडेच त्यांचें लक्ष असे. व तेवढ्याकरिता ह्या कार्याचीं सर्व अंगोपांगें ते समृद्ध करीत. एककल्ली प्रयत्न कुठल्याहि बाबतींत होऊं देतां कामा नये. सर्व बाजूंनीं आणि सर्व योग्य प्रकारांनीं चळवळ वाढविली पाहिजे अशी त्यांची कार्यपद्धति होती. व मुंबईची कॉर्पोरेशन अधिक कार्यक्षम करण्यास पटेलांचे हे सर्वांगीण परिश्रमच कारणीभूत झाले. उदाहरणार्थ, म्युनिसिपालिटींत राष्ट्रीय पक्ष निवडून यावा याकरितां पटेलांनीं मुंबईच्या प्रत्येक विभागांत हिंडून, व्याख्यानें देऊन व इतर मार्गांनीं जी जागृति केली ती म्युनिसिपालिटीच्या इतिहासांत केवळ अपूर्व अशी होती. व याबद्दलचा उल्लेख वर आलेलाच आहे. शिवाय आधुनिक काळांत चळवळ करायची म्हणजे तिची प्रसिद्धि होण्याकरितां वर्तमानपत्राचा फार उपयोग होतो हें ते जाणून होते व म्हणून त्यांनीं आपले परममित्र श्री. महेश्वरी यांच्याकरवीं 'स्थानिक स्वराज्य' या नांवाचें गुजराती साप्ताहिक वर्तमानपत्र सुरू करविलें. पटेल कधीं मोठे लेखक म्हणून गाजले नाहींत तरी ते या वर्तमानपत्रांतून आपले लेख प्रसिद्ध करीत. त्यांना कधीं कोणावर टीका करायची असली किंवा विरोधी प्रतिपादन करायचें

असलें तर त्याकरितां ते कधीं लेखांचा उपयोग करीत नसत. त्यांना जें काय सांगावयाचें तें ते जाहीर सभांतून सांगत. आणि मग जरी एखाद्यानें त्याच्या भाषणाचा रिपोर्ट प्रसिद्ध केला तरी त्यांतील एखाद्या विपर्यस्त विधानाची जबाबदारी ते आपणाकडे कधींहि घेत नव्हते, व त्याला निष्कारण उत्तर देण्याचीं यातायातहि ते करीत नव्हते. परंतु स्थानिक स्वराज्य हें वर्तमानपत्र जेव्हां १९२३ सालीं सुरू झालें तेव्हां त्यात मात्र ते लेख देत. राष्ट्रीय पक्षाचें हें पत्र होतें व म्युनिसिपालिटीचा कारभार हा बहुजनसमाजाला माहीत व्हावा, त्याकडे जनतेचें लक्ष जावें व म्हणून तो लोकशाहीच्या तत्त्वाप्रमाणें चालला पाहिजे असें या पत्राचें प्रतिपादन होतें. पटेल जेव्हां त्यांत लेख देत तेव्हां तो लेख सांगण्याचें काम पटेलांचें असे व लिहून घेण्याचें काम त्या साप्ताहिकाचे सहसंपादक श्री. सीताराम शर्मा हे करीत. त्यासंबंधींची आठवण देतांना श्री. शर्मा म्हणतात, “ प्रथम ज्या दिवशीं लेख देण्याचें पटेलांनीं कबूल केलें असेल त्या दिवशीं मी पटेलांच्या आयभुवनमधील ऑफिसमध्ये गेलों. इतर अनेक उपयुक्त कामें मागें असतांनाहि ते सवड काढून स्थानिक स्वराज्याकरितां लेख लिहिण्याचें काम करीत होते. दोन तीन पानें त्यांनीं आपल्या हातानें लिहिलींहि होतीं. परंतु गुजराथी अक्षर लिहिण्याची सवय त्यांना नसल्यामुळें त्यांनीं लिहिण्याचे कागद माझ्या हातात दिले व मग ते मला म्हणाले, “ मि. शर्मा, मला स्वतःला फारसें लिहिता येत नाहीं. ” तेव्हां मग पटेलांनीं लेख सांगावा व मीं तो लिहून काढावा अशी आमची आपसांत तडजोड झाली. ज्या ज्या वेळीं मी त्यांच्याकडे जाई त्या त्या वेळीं ते कोणत्या तरी सार्वजनिक कामांत गढलेले मला दिसत. तरीपण तेवढ्या गर्दींतहि ते माझ्याकडून लेख लिहवात. आपला हेतु साध्य होण्यासाठीं कितीं जरी लहानशी बाब असली तरी तिकडे ते कसोशीनें लक्ष देत.

आणि इतके कार्यमग्न राहूनहि विठ्ठलभाई कधींकधीं आपला विनोदी स्वभाव प्रकट करीत. ऑफिसांतल्या मदतनिसांशीहि ते थट्टामस्करी करीत. मी त्यांच्याकडे लेख लिहिण्याकरितां गेलों कीं मला ते ‘ स्थानिक स्वराज्य ’ या नांवानें हाक मारीत. ”

या ‘ स्थानिक स्वराज्य ’ साप्ताहिकांत प्रसिद्ध झालेल्या पटेलांच्या लेखांतील कांहीं महत्त्वाचे उतारे खालीं देतों, त्यावरून त्यांच्या धोरणाचा खुलासा होईल :—

“ जोंपर्यंत स्वराज्य मिळत नाहीं तोंपर्यंत खरें स्थानिक स्वराज्य आपल्याला मिळालें असें होणार नाहीं. त्या वेळेला स्वराज्य मिळालें असें आपण म्हणूं कीं ज्या वेळेला सरकार प्रजेला जबाबदार होईल. जेव्हां हिंदुस्थानला स्वराज्य मिळेल तेव्हां स्थानिक स्वराज्य संस्थांवरहि लोकांचा खरा ताबा राहील; आणि त्याच वेळीं खरें स्थानिक स्वराज्य मिळालें असें म्हणतां येईल. यावरून असें कोणी समजूं नये कीं तोंपर्यंत या संस्थांवर बहिष्कार घालावा. या संस्थांवर बहिष्कार घालण्याचा काँग्रेसचा इरादा कधींच नव्हता. असें असूनहि कांहीं काँग्रेस कमिट्यांनीं या संस्थांवर बहिष्कार टाकला होता. १९२१ सालीं भडोच येथें भरलेल्या गुजराथ प्रांतिक परिषदेमध्यें या संस्थांशीं असहकार करण्याचा ठराव आणण्यांत आला होता व त्याला महात्मा गांधींची अनुमतिहि घेतली होती. मौलाना महंमद अल्ली या परिषदेला हजर होते. शेवटीं हा ठराव परत घेण्यांत आला, ही गोष्ट वेगळी.

## असहकारितेच्या मर्यादा

कायदेभंग चौकशी कमिटीनें पाहिलें, कीं कांहीं ठिकाणीं या संस्थांवर बहिष्कार घातला जावा हें योग्य नाहीं. म्हणून तिनें अशी शिफारस केली, कीं असहकारितावाद्यांनीं स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकी लढविणें ही इष्ट अशीच गोष्ट आहे. कारण त्यामुळें विधायक कार्यक्रम पार पाडण्याला मदतच होणार आहे. कमिटीची ही शिफारस काँग्रेसच्या विषयनियामक कमिटीपुढें ठेवण्यांत आली. पण या कमिटीनें या ठरावाला संमति न दिल्यानें तो काँग्रेसपुढें आला नाहीं. त्यामुळें लोकांना असें वाटलें कीं काँग्रेसनें या संस्थांशींहि असहकार पुकारला आहे. परंतु हा मोठाच गैरसमज होता. गयेच्या काँग्रेसनें पूर्वीच्या स्थितींत कांहींहि फरक केला नाहीं. असें असतांना काँग्रेसनें या संस्थांवर बहिष्कार घातला

आहे असें समजून घेण्यांत कांहीं अर्थ नाहीं. म्हणजे असहकारी लोकांना या संस्थांत दाखल होण्याला कोणताहि प्रतिबंध नाहीं. एवढेंच नव्हे तर ज्या प्रांतांत जशी परिस्थिति असेल त्याप्रमाणें निवडणुकी लढविण्याला कॉंग्रेसची मोकळीक आहे.

ज्या प्रांतांत लोकलबोर्डें व म्युनिसिपालिट्या कॉंग्रेस संस्थांच्या ताब्यांत आल्या आहेत त्या ठिकाणीं कॉंग्रेसच्या कार्यक्रमाला चांगल्या रीतीनें मदत होण्यासारखी आहे. या संस्थांचा ताबा आल्यास शाळांतून राष्ट्रीय वृत्ति वाढवितां येईल, तसेंच मद्यपानबंदी, अस्पृश्यांची सुधारणा, स्वदेशीचा प्रचार, हिंदी भाषेचा प्रचार इत्यादि विधायक कामें या संस्थांतून असहकारितावाद्यांना करतां येतील. परंतु एकदा या संस्थांत प्रवेश करण्याचें मान्य केल्यावर त्या ठिकाणीं सरकारशीं असहकारिता करणें योग्य होणार नाहीं. कॉंग्रेसचाहि तसा उद्देश नाहीं. कारण अशा संस्थांना क्षणोक्षणीं सरकारशीं सहकारिता करण्याची गरज भासत असते. ज्या असहकारितावाद्यांना असें वाटत असेल, कीं या संस्थांत प्रवेश करून सरकारशीं सहकारिता करावी लागते हें योग्य नाहीं, त्यांनीं दूर राहावें. पण त्याचा परिणाम मात्र असा होईल कीं सरकार अशा संस्था चालवील व त्यामुळें कॉंग्रेसच्याच कार्याची हानी होईल. म्हणून कायद्याच्या मर्यादेंत जितकें करता येणें शक्य आहे तितकें या संस्थांत जाऊन केलें पाहिजे. कॉंग्रेसनें असा कांहीं हुकूम केलेला नाहीं कीं असहकारितावाद्यांनीं या संस्थाशींहि असहकार करावा. तरीसुद्धा जे लोक असहकार करतात त्यांच्या कृतीला काय म्हणावें हें मला समजत नाहीं."

## सक्तीचें प्राथमिक शिक्षण

याप्रमाणें स्थानिक स्वराज्य संस्था काबीज करण्याचें महत्त्व सांगितल्यावर पटेलांनीं सक्तीच्या प्राथमिक शिक्षणासंबंधींहि या साप्ताहिकांत आपले विचार प्रकट केले आहेत. ते म्हणतात, "प्रजा सुशिक्षित झाली तर ती स्वराज्याला पात्र होईल असें म्हणण्यांत येतें, प्रजेला शिक्षण देण्याचें काम सरकारचें आहे. पण हिंदुस्थान सरकार हें विदेशीय आहे आणि त्यांनीं जर लोकांना शिक्षण दिलें तर त्यांना येथून निघून जावें लागेल. म्हणून आतांचें हें परकीय सर-

कार लोकांना शिक्षण देईल हें संभवत नाहीं. गेलीं दीडशें वर्षें सरकारनें जनतेला असेंच शिक्षण दिलें, कीं ज्या योगानें त्यांना आपलें राज्य चालवितां येईल. पण या शिक्षणामुळें शेंकडा फक्त ६ किंवा ७ माणसेंच साक्षर झालीं आहेत. म्हणून प्राथमिक शिक्षणाचा सार्वत्रिक प्रसार करणें हें काम आतां जनतेच्या पुढाऱ्यांनीं हातीं घेतलें पाहिजे. कॉंग्रेसच्या प्रयत्नानें गांवोगांवीं राष्ट्रीय शाळा स्थापन झाल्या पाहिजेत. म्युनिसिपालिट्या, लोकलबोर्डें व इतर स्थानिक संस्था या राष्ट्रीय पक्षाच्या लोकांनीं काबीज करून त्यांनीं त्यामार्फत प्राथमिक शिक्षणाचा फैलाव केला पाहिजे. खरी गोष्ट अशी आहे, कीं प्राथमिक शिक्षण जर सक्तीचें केलें तर थोड्या वर्षांत शिक्षणाचा पुष्कळ प्रसार होईल. पण सध्याचें हिंदुस्थान सरकार असें सक्तीचें शिक्षण करील हें शक्य वाटत नाहीं, आणि म्हणून स्वराज्याची प्राप्ति करायची असेल तर प्राथमिक शिक्षणाच्या प्रसाराकडे लक्ष देणें फार अगत्याचें झालें आहे. पण हें शिक्षण सक्तीचें करायचें म्हणजे तिजोरीची किल्ली आपल्या हातांत पाहिजे व ती मिळविण्याकरितां आपण सर्व प्रकारें झटलें पाहिजे."

या उताऱ्यावरून पटेलांची सार्वजनिक कार्यांतील भूमिका कशी होती हें उत्तम रीतीनें व्यक्त होतें. व प्रत्येक गोष्टीकडे राष्ट्रीय दृष्टीनें पाहाण्याची त्यांची वृत्ति होती हेंहि दिसून येतें. कोणत्याहि संस्थांत शिरायचें तर त्यांतील अधिकारांची आसक्ति न धरतां कार्य करीत राहायचें आणि आपल्या राष्ट्रीय ध्येयापासून ढळायचें नाहीं असें त्यांचें वागणें असे. व असें वागणें ठरलें म्हणजे मग स्थानिक स्वराज्य संस्थांत किंवा कौन्सिलांतून प्रवेश करण्याला कांहींच हरकत नाहीं, उलट तसें न करण्यानें देशाचें नुकसान होणार आहे असें पटेलांचें म्हणणें होतें.

## राजकारणांत स्त्रियांचा प्रवेश

स्वराज्याच्या लढ्यांत पुरुषांप्रमाणें स्त्रियांनींहि आलें पाहिजे व त्यांना येऊं दिलें पाहिजे; स्थानिक स्वराज्य संस्थांत काय किंवा कौन्सिलांत काय, पुरुषांप्रमाणें स्त्रियांनाहि निवडून येण्याचा हक्क असावा, याबद्दल पटेलांनीं पुष्कळ खटाट

केली होती. याबद्दल त्यांनीं विलायतेंत १९१९ सालापासून प्रयत्न चालविले होते. विलायतेंत स्त्रियांतर्फे जें शिष्टमंडळ हिंदुस्थानांतून गेलें त्याचें पुढारी-पण सरोजनी नायडू यांच्याकडे होतें. हें शिष्टमंडळ मॉंटेग्यूसाहेबांस भेटण्यास जाण्यापूर्वी सरोजिनीबाईनीं पटेलांना मुद्दाम निमंत्रण करून आपल्याबरोबर नेलें होतें. व या शिष्टमंडळाच्या मुख्य वाटाघाटी बाईनीं पटेलांचे मार्फत केल्या होत्या. यावरून पटेलांच्या ठिकाणीं असलेली स्त्रियांच्या उन्नतीविषयींची कळकळ बाईंना पूर्णपणें माहीत असली पाहिजे असें अनुमान काढण्यास हरकत नाहीं. असो. ज्या वेळीं हें शिष्टमंडळ मॉंटेग्यूसाहेबांच्या भेटीला गेलें त्या वेळीं पटेल त्यांना म्हणाले, "स्वतंत्र हिंदुस्थानांतील पुरुष ज्या दृष्टीनें त्यांतील स्त्रियांच्या प्रश्नांकडे पाहातील त्याच दृष्टीनें तुम्ही त्या प्रश्नाकडे पाहिलें पाहिजे." त्यावर मॉंटेग्यूंनीं विचारलें, "स्वतंत्र हिंदुस्थानांतील पुरुषांनीं काय केलें असतें?" पटेलांनीं उत्तर दिलें, "त्यांनीं स्त्रियांना मतदानाचे व उमेदवारीचे हक्क दिले असते." त्यावर मॉंटेग्यूसाहेबांनीं आपण या प्रश्नाचा विचार करीत आहों असें आश्वासन दिलें होतें. या ठिकाणीं विलायतेंतला हा प्रसंग सांगण्याचें कारण एवढेंच, कीं पटेलांनीं मॉंटेग्यूसाहेबांना जें सांगितलें तें त्यांनीं मुंबई म्युनिसिपालिटींत प्रत्यक्ष आचरणांत आणलें. १९२३ सालीं प्रथम मुंबई म्युनिसिपालिटींत स्त्रियांना निवडणुकीचे हक्क प्राप्त झाले होते व त्याचा भरपूर उपयोग करून घेण्याचें ठरविलें असें पटेलांनींच. त्यांच्याच प्रेरणेनें, त्यांच्याच उत्तेजनानें म्युनिसिपालिटींत स्त्रीप्रतिनिधींचा प्रवेश झाला होता. १९२३ सालीं जेव्हां म्युनिसिपल निवडणुकी लढविण्याकरितां राष्ट्रीय पक्षाची स्थापना पटेलांनीं केली तेव्हां त्यांत त्यांनीं तीन स्त्रिया सामील केल्या. त्या तीन स्त्रिया म्हणजे कु. बचूबेन लोटवाला, सौ. अवंतिकाबाई गोखले आणि श्री. सरोजिनी नायडू या होत. या तिघींनाहि त्यांनीं म्युनिसिपल निवडणुकींत उमेदवार म्हणून उभें केलें. प्रथम या स्त्रियांनीं उमेदवार म्हणून उभें राहाण्यास आढेवेढे घेतले, कारण निवडणुकीसारख्या धकाधकीच्या मामल्यांत स्त्रियांचा निभाव लागणें कठीण आहे असें त्यांचें म्हणणें पडलें. परंतु त्यांना निवड-

णुकींत मदत करण्याचें आश्वासन पटेलांनीं दिलें व त्यामुळें या तिन्ही स्त्रिया म्युनिसिपालिटींत निवडून येऊं शकल्या. असो.

मुंबई म्युनिसिपालिटीसारख्या हिंदुस्थानांतील अत्यंत महत्त्वाच्या स्थानिक स्वराज्य संस्थेंत पटेलांनीं केलेली कामगिरी येथवर निवेदन केली. परंतु कॉर्पोरेशनचीं मोठमोठीं कामें करीत असतांच पटेलांनीं हिंदुस्थानांतील स्वराज्याच्या लढ्यांतहि मोठी कामगिरी अव्याहत चालविली होती. ही गोष्ट सामान्य प्रतीच्या मनुष्यास साधणें कठीण आहे. पण दीर्घोद्योग, कार्यतत्परता आणि सार्वजनिक कार्याची आवड हीं जवळ असल्यानें पटेलांना आपल्या कामाचा व्याप मोठा असूनहि तो आवरतां आला. व यांतच त्यांच्या यशाचें व लोकप्रियतेचें रहस्य आहे हें कोणालाहि मान्य होण्यासारखें आहे.

मागील प्रकरणांत सांगितलेंच आहे कीं कायदेभंग चौकशी कमिटीचा रिपोर्ट प्रसिद्ध झाला व त्यानंतर गयेला कॉंग्रेस झाली. त्यानंतरच्या अडीच तीन वर्षांत पटेलांनीं कोणतें कार्य केलें तें पुढील प्रकरणांत सांगूं.

---

# पटेल व स्वराज्य-पक्ष

स्वराज्यपक्षाचें बीजारोपण गयेच्या कॉंग्रेसमध्यें १९२२ सालीं कसें झालें त्याचा उल्लेख मागील एका प्रकरणांत आलेलाच आहे. गयेच्या कॉंग्रेसमध्यें कौन्सिलबहिष्कारवाल्यांचें बहुमत होतें व त्यांनीं कौन्सिलबहिष्काराचा ठराव पास करून घेतला. तरी पण कौन्सिलप्रवेश करूं म्हणणारा दास, केळकर, नेहरू, पटेल, यांचा पक्षहि अल्पमतवाला असला तरी कांहीं कमी प्रबळ नव्हता. गया येथें कौन्सिलबहिष्कारी नाफेरवाल्यांचा विजय झाला खरा, पण तो फार दिवस टिकणें शक्य नव्हतें. गया कॉंग्रेस संपल्यानंतर लगेच तिचे अध्यक्ष देशबंधु चित्तरंजनदास यांनीं राजीनामा दिला. आणि कौन्सिल-प्रवेशास मान्यता देणाऱ्या कॉंग्रेस-खिलाफत-स्वराज्यपक्षाची स्थापना केली. दासांचा राजीनामा कॉंग्रेस कमिटीनें मंजूर केला नाहीं. पण इकडे दासांनीं मात्र कॉंग्रेसच्या अंतर्गत अशा आपल्या स्वराज्यपक्षाची संघटना वाढवि-ण्याचे प्रयत्न जोरानें चालविले. गया कॉंग्रेसनंतर लवकरच १९२३ सालीं स्वराज्यपक्षाचा जाहीरनामा प्रसिद्ध झाला व त्या पक्षाच्या चार चिटणिसां-पैकीं विठ्ठलभाई पटेल यांना एक चिटणीस नेमण्यांत आलें. इतर तीन चिट-णीस पंडित मोतीलाल नेहरू, श्रीयुत बी. एन्. ससमल व चौधरी खलिकुझमा हे होते. या जाहीरनाम्यांत असें म्हटलें होतें, कीं "गयेस भरलेल्या राष्ट्रीय सभेनें जो कार्यक्रम आंखला आहे त्यानें स्वराज्याची प्राप्ति लवकर होईल असें वाटत नसल्यामुळें, व ज्या विषयांचा सदर कार्यक्रमांत अंतर्भाव होणें जरूर होतें त्यांचा अंतर्भाव झाला नसल्यामुळें, आम्ही राष्ट्रीय सभेच्या छत्रा-खालींच एका नव्या पक्षाची स्थापना करीत आहों. शांततेच्या व न्याय्य ह्या सर्व मार्गांनीं स्वराज्य प्राप्त करून घ्यायचें हें राष्ट्रीय सभेचें ब्रीद व अन-त्याचारी असहकारितेचें तत्त्व आम्हांस मान्य आहे. या पक्षाचे अध्वर्युत्व देशबंधु चित्तरंजनदास यांस आम्ही देत असून पं. मोतीलाल नेहरू, श्रीयुत बी. एन्. ससमल, विठ्ठलभाई पटेल व चौधरी खलिकुझमा यांस चिटणीस नेमीत

आहे. या पक्षाची संघटना जानेवारी महिन्यांत व्हायची आहे. अध्यक्ष व चिटणीस यांनीं कार्यक्रम व कायदेकानू ठरवून ते चिटणीस ठरवतील त्या वेळीं व त्या ठिकाणीं सभासदांपुढें विचाराकरितां मांडावे. ऑल इंडिया काँग्रेस कमिटीच्या व राष्ट्रीय सभेच्या मिळून ११० सभासदांनीं आणि प्रतिनिधींनीं या जाहीरनाम्यावर सह्या केल्या. या जाहीरनाम्यावर सही करणारे प्रमुख गृहस्थ, अध्यक्ष व चार चिटणीस, शिवाय केळकर, जयकर, अणे, मुंजे, भोपटकर, गोखले, मेहता, संपूर्णानंद वगैरे होते.

## नव्या पक्षापुढील कार्यक्रम

गया काँग्रेसमध्यें अशा रीतीनें एका नव्या पक्षाची स्थापना होणें ही एक अपरिहार्य गोष्ट होती. कारण या काँग्रेसनें जो कार्यक्रम आंखला तो देशाला प्रगतिपथावर नेणारा नव्हता असें या पक्षाचें स्पष्ट मत होतें. गयेंतील नाफेरवाले ऊर्फ कौन्सिलबहिष्कारवाले यांना कायदे-कौन्सिलांत सहकारितेचा वास येत होता म्हणून त्यांना ती नको होती. स्थानिक स्वराज्य संस्थांचा त्यांनीं प्रामुख्यानें उल्लेखहि केलेला नव्हता. द्वेषबुद्धि उत्पन्न होते म्हणून परदेशी मालावर त्यांना बहिष्कार नको होता! ब्रिटिशांशीं आपलें वैर नाहीं म्हणून त्यांच्या मालावरहि त्यांना बहिष्कार नको होता! त्यांना परराष्ट्रीय राजकारण नको होतें! लोक पूर्ण अनत्याचारी बनले नाहींत म्हणून त्यांना कायदेभंग नको होता. त्यांना मजूर संघ नको होते, कारण त्यामुळें त्यांच्या मतें उद्योगधंदे व राजकारण यांची गल्लत होते! याप्रमाणें बऱ्याच महत्त्वाच्या मुद्दयांवर नवीन फेरवादी पक्षाचा नाफेरवादी पक्षाशीं मतभेद होता. हजारों स्वयंसेवक उभारले गेले आणि पंचवीस लक्ष रुपये जमा केले गेले एवढें जाहीर झालें म्हणजे त्यांचा कार्यक्रम तडीस गेला अशी नाफेरवाद्यांची भावना होती! तेव्हां देशाच्या राजकारणाला नवीन वळण लावण्याची वेळ आली आहे व म्हणून कालांतरानें आपण आपला कार्यक्रम जनतेला पटवून देऊं असा आत्मविश्वास स्वराज्यपक्षीयांना वाटूं लागला. गयेच्या काँग्रेसमध्यें जरी हा पक्ष लहान होता तरी तो पुढें प्रबळ होणार असें नाफेरवाद्यांनीं ओळखलें व म्हणून

मौ. अबुल कलाम आजाद यांनीं या पक्षाशीं समेटाचीं बोलणीं सुरू केलीं. अर्थात् ही गोष्ट नवीन पक्षाच्या वाढत्या बळाची निदर्शक होती. लवकरच म्हणजे फेब्रुवारी १९२३ च्या तिसऱ्या आठवड्यांत अलाहाबाद येथें स्वराज्यपक्षाची सभा सुमारें चार दिवस भरून तिनें आपली संघटना व कार्यक्रम निश्चित केला. राष्ट्रीय सभेच्या ध्येयाविरुद्ध न जातां नोकरशाहीला शक्य त्या सर्व बाजूंनीं प्रतिकार करायचा व त्यांना स्वराज्य देण्यास भाग पाडायचें असें आपलें धोरण स्वराज्य पक्षानें जाहीर केलें. कायदेभंगासंबंधानें या पक्षानें असें धोरण ठरविलें, कीं तो सध्या शक्य व व्यवहार्य नाहीं; पण जरूर तेव्हां त्याचा साधनासारखा उपयोग करावा. कायदेकौन्सिलच्या नवीन निवडणुकीच्या वेळीं सर्व देशभर राष्ट्रीयसभावादी उमेदवार उभे करण्याचें पक्षानें ठरविलें व त्या ठिकाणीं गेल्यानंतर सरकारनें जनतेच्या मागण्या पुरविल्या नाहींत तर त्यांना विरोध करून, त्यांना राज्यकारभार करणें अशक्य करून सोडायचें अशी या नवीन पक्षाची दृष्टि होती. शेतकरी व मजूर संघांना कॉंग्रेसनें जरी मान्यता दिली नसली तरी इतर सुधारलेल्या देशांप्रमाणें अशा संघाचा राजकारणाकडे उपयोग केला पाहिजे असें या पक्षाचें म्हणणें होतें; कारण कोणतीहि सामुदायिक चळवळ करायची तर त्यांत हे महत्त्वाचे संघ सामील झाले पाहिजेत. यानंतर राष्ट्रीय सभेच्या विधायक कार्यक्रमात ज्या बाबी होत्या त्या त्या म्हणजे खादी, स्वदेशी, मद्यपाननिषेध, अस्पृश्यता निवारण, राष्ट्रीय शिक्षण, पंचायतपद्धति, व राष्ट्रीय सभेचें बलवर्धन या सर्व गोष्टी नवीन पक्षानें आदरपूर्वक मान्य केल्या.

याप्रमाणें फेब्रुवारी महिन्यांत अलाहाबादेस स्वराज्य पक्षाचा कार्यक्रम ठरल्यानंतर पटेल मुंबईस परतले. हा कार्यक्रम ठरविण्यांत पटेलांचें अर्थातच प्रमुख अंग होतें व तो पार पाडण्याची जबाबदारी ज्या कार्यकर्त्यांवर येऊन पडली त्यांत पटेलांना महत्त्वाचें स्थान होतें. मुंबईस आल्यानंतर नव्या पक्षाला विरोध करणारे लोक पुष्कळच आहेत असें त्यांना दिसून आलें. परंतु हा विरोध नव्या पक्षाचें धोरण किंवा कार्यक्रम पुरा समजून न घेतल्यामुळें होत आहे हेंहि त्यांनीं पाहिलें. तेव्हां या गैरसमजांचें निराकरण करण्याकरितां व आपल्या पक्षाचें बीजरोपण मुंबईस करण्याकरितां

स्वराज्यपक्षातर्फे पटेलांना सर्व प्रकारचे प्रयत्न करावे लागले. त्यांना त्यांच्या नव्या कार्यक्रमाबद्दल पुष्कळ कट्टरांनीं धाक दाखविला व धमक्या दिल्या. परंतु हे धाक व या धमक्या लवकरच पोकळ ठरल्या. मुंबईत आल्यावर एके दिवशीं मांडवींत रात्रीं जाहीर सभा भरविण्यांत आली व त्यांत पटेलांनीं पांच हजार जनसमुदायासमोर स्वराज्यपक्षाची कैफियत मांडली. ती इतकी निर्दोष व बिनतोड होती कीं त्यांना विरोध करण्याला एकहि मनुष्य पुढें आला नाहीं. लवकरच स्वराज्य पक्षाच्या मुंबई शाखेची स्थापना झाली व पटेल तिचे अध्यक्ष झाले. त्या वेळीं त्यांनीं मारवाडी विद्यालयांत जें भाषण केलें तें अतिशय उत्कृष्ट असें होतें. स्वराज्यपक्षाची स्थापना कां करावी लागली व त्या पक्षाचें धोरण व कार्यक्रम कोणते हें त्यांनीं श्रोत्यांना इतकें उत्तम रीतीनें पटवून दिलें, कीं या नव्या पक्षाबद्दल जनतेंत तेव्हांपासून आदरबुद्धि उत्पन्न झाली. आणि स्वराज्यपक्ष ज्या नवीन कौन्सिल निवडणुकी लढविणार होता त्यांत जनतेचें सहकार्य मोठ्या प्रमाणांत मिळेल असा विश्वास पटेलांना वाटूं लागला.

## कॉंग्रेसचें दिल्ली येथील अधिवेशन

१९२३ साल हें स्वराज्यपक्षाच्या इतिहासांत अत्यंत महत्त्वाचें साल होतें. या वर्षी या पक्षानें हिंदुस्थानांत कौन्सिलप्रवेशाला अनुकूल वातावरण निर्माण करण्याचा अखंड प्रयत्न केला. आणि त्यांत यश मिळविलें. आणि या सर्व गोष्टी त्यांनीं कॉंग्रेसला राजी ठेवून केल्या. फेब्रुवारी महिन्यांत पक्षाची संघटना व कार्यक्रम निश्चित झाल्यानंतर त्याच्या ठिकठिकाणीं शाखा स्थापन झाल्या व आगामी कौन्सिल निवडणूक लढविण्याकरितां स्वराज्य पक्षाच्या पुढाऱ्यांनीं दौरे काढले. याचा परिणाम हळूहळू दिसून येऊं लागला. मुंबई येथें मे महिन्यांत ऑल इंडिया कॉंग्रेस कमिटीची सभा भरून तींत असें ठरलें, कीं राष्ट्रीय सभेचें मत कौन्सिल-प्रवेशाविरुद्ध असलें तरी कोणी कुठें कौन्सिलांत जाण्याची खटपट करीत असल्यास त्याविरुद्ध कोणत्याहि कॉंग्रेस कमिटीनें चळवळ करूं नये. अर्थात् या ठरावानें स्वराज्य पक्षाला आपल्या मताप्रमाणें कौन्सिल-प्रवेश

करण्याला मोकळीक मिळाली होती. किंबहुना स्वराज्य पक्षानें आपल्या प्रयत्नानें ती मिळविली होती असें म्हणण्यास हरकत नाहीं. पुढें दिल्ली येथें १९२३ सप्टेंबरच्या तिसऱ्या आठवड्यांत मौलाना अबुल कलाम आजाद यांच्या अध्यक्षतेखालीं कॉंग्रेसचें जादा अधिवेशन भरविण्यांत आलें आणि त्यांत स्वराज्य पक्षाच्या कार्यक्रमाला मान्यता देण्यांत आली. कौन्सिल प्रवेशाविरुद्ध सर्व प्रचार तहकूब करावा व विधायक कार्यक्रम अमलांत आणण्याकरितां दुप्पट जोरानें प्रयत्न करावा असा ठराव वरील अधिवेशनांत करण्यांत आला. या वेळीं महात्मा गांधींनीं अध्यक्षांकडे कळविलें कीं "मी माझ्या कार्यक्रमाला चिकटून राहाण्याचा आग्रह धरीत नाहीं. माझ्या कार्यक्रमांत देशकालपरिस्थितीप्रमाणें फेरफार करणें अवश्य असेल तर माझी हरकत नाहीं. देशप्रेमाकरितां असे फेरफार करूं देण्यास मी तयार आहें" या दिल्लीच्या कॉंग्रेसनें देशांतल्या चळवळीला नवी दिशा लागली. कारण स्वराज्य पक्षाला कॉंग्रेसची अवज्ञा न करतां आपले प्रयत्न चालू ठेवण्यास प्रोत्साहन मिळालें. आणि अशा रीतीनें गया येथें झालेलें बंड जवळजवळ यशस्वी झालें.

## पटेलांचा निवडणूक जाहीरनामा

असो. कौन्सिलच्या निवडणुकी आतां जवळ येऊन ठेपल्या. स्वराज्य पक्षानें ठिकठिकाणीं आपले उमेदवार उभे केले. असहकारितेच्या काळांत झालेल्या निवडणुकींच्या वेळीं हजारों मतदारांनीं कौन्सिल निवडणुकांवर बहिष्कार घातला होता. परंतु या वेळीं मात्र पूर्वीपेक्षां पुष्कळ मतदारांनीं आपलीं मतें स्वराज्य पक्षाच्या उमेदवारांस दिलीं. मध्यवर्ती लेजिस्लेटिव्ह असेंब्लीच्या निवडणुकीकरितां मुंबई शहरातर्फे स्वराज्य पक्षाचे पुढारी श्री. पटेल उभे राहिले. त्या वेळीं स्वराज्य पक्षाच्या लढवय्या उमेदवारांत सर्वश्रेष्ठ उमेदवार म्हणून पटेलांचा गौरव करण्यांत आला. एकंदर पांच उमेदवार होते त्यांपैकीं दोघे निवडून यायचे होते. पटेलांना चार प्रतिस्पर्धी उमेदवार उभे राहिले. ते म्हणजे सर चिमणलाल सेटलवाड, जम्नादास द्वारकादास, नवरोजी दुमासिया आणि जहांगीर बमनजी पेटिट

हे होत. यापैकीं पहिले तीन नोकरशाही पक्षाकडे ओढ घेणारे होते. आणि चौथे उमेदवार हे स्वतंत्र म्हणून उभे होते. निवडणूक १४ नोव्हेंबर १९२३ रोजीं व्हायची होती. त्या वेळीं मतदारांना उद्देशून पटेलांनीं एक पत्रक काढलें. त्यांत त्यांनीं सांगितलें, कीं "आपल्यातर्फे असेंब्लींत सभासद म्हणून जाण्याची माझी इच्छा आहे. मला तुम्ही ओळखतां. माझे विचार आणि कार्यपद्धति तुम्हां सर्वांना चांगली माहीत आहे. सरकारी अधिकाराविषयीं म्हणाल तर मला त्याची लालसा नाहीं. तुम्हीं मला निवडून आणलेंत तर राष्ट्रीय सभेच्या मागण्या मी कौंसिलांत मांडीन व त्या मान्य झाल्या नाहींत तर नोकरशाहीला हरेक शुद्ध उपायांनीं पदोपदीं हैराण करीन. त्यांना स्वस्थ बसूं देणार नाहीं !

"गेलीं पंधरा वर्षे सार्वजनिक जीवनांत जेवढी करता आली तेवढी लोकसेवा मीं केली आहे व ती आपण जाणतांच. त्या सेवेमुळें मी जर तुमच्या विश्वासास पात्र झालों असेन तर निवडणुकीच्या वेळी तुम्हीं तुमचीं दोन्हीं मतें मला द्यावी. अशी विनंती आहे.

"मी व्यक्तिशः किंवा स्वयंसेवकांमार्फत मतदारांना भेटण्यास असमर्थ आहें. कारण इतकें करण्याला मजजवळ द्रव्य नाहीं तसेंच सवडहि नाहीं. माझा हा संदेश म्हणजेच तुम्हांला दिलेली भेट आहे असें समजा. कांहीं लोक म्हणतात कीं मी खात्रीनें निवडून येणार. पण तुम्हीं मला आपलीं दोन्ही मतें दिल्याशिवाय मी निवडून येणें शक्य नाहीं."

ठराविक दिवशीं म्हणजे १४ नोव्हेंबर रोजीं मुंबईला असेंब्लीची निवडणुक झाली. व त्यांत पटेलांना सर्वांत जास्त मतें मिळून ते पहिल्या नंबरानें निवडून आले. व दुसरे दुमासिया निवडून आले. पटेलांना सहा हजारांवर मतें पडलीं. व दुमासियांना सुमारें तीन हजार मतें मिळालीं. नेमस्तांग्रणी सेटलवाड यांची स्थिति मात्र केविलवाणी झाली. कारण त्यांना या सामन्यात अवघीं सुमारें एक हजारच मतें मिळालीं व ते पडले.

याप्रमाणें पटेलच नव्हे तर स्वराज्यपक्षाचे सर्व उमेदवार ज्या ज्या ठिकाणीं उभे राहिले त्या त्या बहुतेक ठिकाणीं त्यांना यश मिळालें. एवढेंच नव्हे तर त्यांना निवडणुकींत पहिला नंबर मिळाला. त्यांच्या व त्यांच्या खालच्या नंबरच्या उमेदवारांत पुष्कळच मतांची तफावत पडली. यावरून स्वराज्यपक्षाचा कार्यक्रम जनतेला आवडला हें निर्विवाद सिद्ध झालें. लवकरच कोकानाडा येथें मौलाना महंमद अल्ली यांच्या अध्यक्षतेखालीं काँग्रेसचें अधिवेशन भरलें व तेथेंहि स्वराज्यपक्षाच्या कौन्सिलप्रवेशाला मान्यता देण्यांत आली. मौलाना महंमदअल्ली यांनीं तर आपल्या भाषणांत अशी एक कोटी केली, कीं " खुद्द महात्मा गांधी देखील कौन्सिलप्रवेशाला हरकत घेणार नाहींत असा दिव्य संदेश एक विहंगम माझ्या कानाशीं गुणगुणत आहे ! " अशा रीतीनें कोकानाडा काँग्रेसनें कौन्सिलबहिष्काराच्या तत्त्वाचा वास्तविक शेवटच करून टाकला. पूर्वीच्या गांधीप्रणीत असहकारितेच्या ठरावास दिलेला पाठिंबा वरकरणीच होता. आणि आतां कौन्सिलांतून व कौन्सिलांबाहेरूनहि असहकारितेची चळवळ करतां येतें असें कोकोनाडा काँग्रेसपासून मानण्यांत येऊं लागलें. दिल्ली आणि कोकानाडा येथें मिळालेले हे विजय अधिक दृढ करण्याच्या मार्गाला नेहरू पटेल हे स्वराज्यपक्षाचे पुढारी आतां लागले. आतांपर्यंत स्वराज्यपक्षाची घटना केवळ नांवाची होती. म्हणून ती घटना नीट ठरविण्याकरितां नेहरू व पटेल यांनीं स्वराज्यपक्षाच्या कार्यकारी मंडळाची सभा जुहू येथें तारीख २४–२५ एप्रिलला बोलाविली व तींत पक्षाची घटना व नियम व्यवस्थित ठरविण्यांत आले. याप्रमाणे स्वराज्यपक्ष चांगला संघटित झाला व नुकत्याच झालेल्या कायदेकौन्सिलच्या निवडणुकींत सर्व हिंदुस्थानभर उभे केलेले स्वराज्यपक्षाचे बहुतेक सर्व उमेदवार निवडून आले. मध्यवर्ती असेंब्लींत तर या पक्षाच्या ४५ सभासदांचा एक शिस्तीचा गट निवडून आला. मोतीलाल नेहरू बिनविरोध निवडून आले. व त्यांच्याकडे कौन्सिलांतील स्वराज्यपक्षाच्या अध्यक्षत्वाचा मान गेला. विठ्ठलभाई उपाध्यक्ष झाले. हिंदुपत्राचे संपादक श्री. ए. रंगास्वामी अय्यंगार यांना पक्षाचे चिटणीस व

श्री. न. चिं. केळकर यांना पार्टीचा व्हिप म्हणजे संचालक नेमण्यांत आलें.

## धोरण बदलत गेलें

पहिल्या वर्षी 'विधिमंडळांत सरकारची शक्य ती अडवणूकच करायची' असें या पक्षाचें जाहीर केलेलें धोरण होतें. व त्याप्रमाणें प्रथम या पक्षानें असेंब्लीचें सर्वच्या सर्व बजेट फेटाळून लावलें. पण पहिल्या सहा महिन्यांतच हें सतत अडवणुकीचें धोरण ढिलें पडलें. तें कसें तें पाहाण्यापूर्वी कौन्सिलाबाहेर पटेलांनीं स्वराज्यपक्षाची कोणती कामगिरी केली तें पाहू.

१९२४ साल उजाडलें आणि तारीख ५ फेब्रुवारीला गांधींची कारागृहांतून विनशर्त मुक्तता झाली. या वर्षांतील महत्त्वाची गोष्ट म्हणजे ऑगस्ट महिन्यांत स्वराज्य पक्षाचे पुढारी व गांधी यांच्यांत कलकत्ता येथें स्वराज्यपक्षाच्या सभेंत समेट होऊन स्वराज्यपक्षाचें कौन्सिलप्रवेशाचें धोरण गांधींनीं मान्य केलें. काँग्रेसमधील निरनिराळ्या गटांनीं विधायक कार्यक्रमातील निरनिराळीं कामें करावीं व स्वराज्य पक्षानें कौन्सिलांतील काम सांभाळावें असें या समेटांत ठरलें. हा समेट ऑल इंडिया कमिटीनें मान्य केला. याप्रमाणें गांधीजींनीं चळवळीचीं सूत्रें दास, नेहरू, पटेल, केळकर यांच्या हवालीं केलीं. तरी त्यांच्या बदला गांधींचें समाधान करणारी गोष्ट घडली. ती म्हणजे वार्षिक चार आण्याऐवजीं काँग्रेसच्या सर्व अधिकारारूढ व सामान्य सभासदांनीं दरमहा २ हजारवार कातलेलें सूत दिलें पाहिजे असें ठरविण्यांत आलें. या समेटाचें वर्णन करतांना गांधीजी म्हणतात "मी स्वराज्यपक्षाला शरण गेलों. मला ज्या ज्या गोष्टींचा त्याग करणं शक्य होतं त्या सर्वांचा त्याग करून मी त्यांच्या स्वाधीन झालों. मी इतका त्यागशील होईन असं मला किंवा माझ्या स्नेह्यांनाहि वाटलं नव्हतं. पण तें सर्व करण्यास ईश्वरानें मला धैर्य दिलं याबद्दल मी त्याचा आभारी आहें. उलटपक्षीं हात-सूत खादी यांचा समावेश काँग्रेस सभासदत्वाच्या अटींत मीं केला त्याला स्वराज्यपक्षाची तत्त्वतः हरकत होती. या गोष्टी स्वराज्यप्राप्तीला किंवा परदेशी कापडावरील बहिष्काराच्या यशाला आवश्यक किंवा अनिवार्य नाहींत

असं या पक्षाचं म्हणणं होतं. तरी पण ही कडू औषधाची गोळी गिळण्याचं अवघड काम त्यांनीं केलं आणि एकीकरितां आणि देशाकरितां त्यांनीं या अटीला मान्यता दिली याबद्दल मी त्यांचा आभारी आहें." असो. या सभेटानंतर लवकरच बेळगांवास काँग्रेसचें अधिवेशन भरविण्यांत आलें व महात्मा गांधी या अधिवेशनाचे अध्यक्ष झाले. जे लोक हातसुताची व हातविणीची खादी वापरतील व जे प्रतिमासीं स्वतः काढलेलें दोन हजार वार सूत काँग्रेसला वर्गणी म्हणून देतील त्यांनाच काँग्रेसचे सभासद होतां येईल असें या काँग्रेसनें ठरविलें. अर्थात् या ठरावामागें गांधींचीच प्रेरणा होती. पुष्कळांचा या ठरावाला प्रामाणिक विरोध होता. या विरोधकांत अर्थातच पटेल होते. कारण त्यांच्यामतें सुतास मत ही अट काँग्रेसच्या सभासदत्वास अडगळीसारखी बाधक होणार होती. या ठिकाणीं जातां जातां सांगण्यास हरकत नाहीं कीं पटेलांनीं हा प्रामाणिक विरोध प्रखर भाषेंत—मग तो खाजगी रीतीनें कां होईना—प्रकट करावा ही गोष्ट स्वराज्यपक्षाच्या कांहीं पुढाऱ्यांना पसंत नव्हती. खुद्द पंडित मोतीलाल नेहरू त्यांना म्हणत कीं "तुम्ही सुताच्या मतदारीला वेळीं अवेळीं इतका विरोध करावा हें मला पसंत नाहीं. आपल्या सर्वांना माहीत आहे कीं ही मतदारी यशस्वी व्हायची नाहीं व ती येत्या काँग्रेसमध्यें काढावी लागेल. पण तसा काँग्रेसनें ठराव केल्याशिवाय आपल्याला तींत हात घालतां येणार नाहीं. वर्षाअखेरीसच तिचा काय तो निकाल लागेल. सभांतून कितीहि भाषणें केलीं तरी ती बदलतां येणार नाहीं."

## पक्षाचें वाढतें यश

काँग्रेस झाल्यानंतर स्वराज्य पक्षीयांच्या मतांतील विरोधास प्रत्यक्ष पुष्टि मिळाली. काँग्रेसचे सभासद भराभर कमी होऊं लागले! सुतास मत या अटीचा हा प्रतिकूल परिणाम होता हें निश्चित होतें. स्वराज्य पक्षांतील विशेषतः जे महाराष्ट्रीय सभासद होते त्यांचा तर प्रथमपासूनच या अटीला तीव्रतम विरोध होता व म्हणून प्रथम महाराष्ट्रांतच या विरोधाला जाहीर वाचा फुटली हो अगदीं साहजिकच अशी गोष्ट झाली. बेळगांव काँग्रेस-

नंतर सातारा येथें १० मे १९२५ रोजीं महाराष्ट्र प्रांतिक परिषद भरविण्यांत आली. बॅ. रामराव देशमुख अध्यक्ष व श्री. भाऊसाहेब सोमण परिषदेचे स्वागताध्यक्ष होते. या परिषदेला पटेल, केळकर, अणे, बेळवी, बामणगांवकर, भोपटकर, बेझंटबाई इत्यादि पुढारी मंडळी हजर होती. गांधी, मालवीय, नायडू, जयकर, खापर्डे इत्यादिकांचे सहानुभूतीचे संदेश परिषदेला आले होते. श्री. ल. ब. भोपटकर यांनीं ठराव मांडला, कीं " काँग्रेस कमिट्यांच्या सभासदत्वावर ' सुतास मत ' या अटीचा प्रतिकूल परिणाम झाला असल्यानें या परिषदेची ऑल इंडिया काँग्रेस कमिटीला अशी विनंती आहे, कीं सुतास मत ही अट काढून टाकून त्या जागीं पूर्वींप्रमाणें चार आणे देऊन सभासद होण्याला मोकळीक देण्याबद्दल पुढील राष्ट्रीय सभेस शिफारस करण्यांत यावी. या ठरावावर पटेलांनीं जोरदार भाषण करून त्याला संपूर्ण पाठिंबा दिला, ते म्हणाले, " बेळगांवच्या काँग्रेसमध्यें फक्त खादी वापरणाऱ्या व सूत काढणाऱ्या मनुष्यासच काँग्रेसचे सभासद होतां येईल हा जो ठराव पास झाला त्यानें राष्ट्रावर मोटी आपत्ति ओढवली आहे. गेले तीन महिने या ठरावाच्या अमलबजावणीनें केवळ प्रलय मांडला आहे. काँग्रेसची इभ्रत झपाट्यानें कमी कमी होत चालली आहे. कोणी म्हणतात सभासदांची नुसती संख्या वाढविण्यांत अर्थ नाहीं. सगळं महत्त्व काय तें लायकी वाढविण्यांत आहे. परंतु हा कोटिक्रम जर चालू ठेवायचा असेल तर काँग्रेसनें यापुढें चक्क सांगावं कीं ' मी देशाची प्रतिनिधि नाहीं.' पण वस्तुस्थिति अशी आहे, कीं सध्या हिंदुस्थानांत काँग्रेस हीच एक प्रातिनिधिक राजकीय संस्था समजली जाते. मग हा समज जर खरा करायचा असेल तर तिचं संख्याबल हजारोंनीं वाढविलं पाहिजे. आणि ' सुतास मत ' ही विवेकशून्य अट काढून टाकली पाहिजे. साऱ्या हिंदुस्थानांत ज्या संस्थेविषयीं सरकारला भीति वाटते अशी जर कोणती संस्था असेल तर ती काँग्रेस हीच एक होय. बेळगांवच्या काँग्रेसमध्यें माझा या अटीला विरोध होता आणि अजूनहि जेव्हां प्रसंग येतो तेव्हां मी तो दर्शविल्याशिवाय राहात नाहीं. ही अडगळ जितकी लवकर नाहींशी होईल तितकें बरें होईल. कोणी म्हणतात कीं आज या ठरावाचा विचार

करण्याची वेळ नाहीं. पण मी विचारतों 'कां असें? एकादी गोष्ट जर वाईट आहे असं आढळलं तर ती ताबडतोब नाहींशी केली पाहिजे. या अटीमुळें कॉंग्रेसच्या व देशाच्या ऐक्याचा घात होत आहे हें आपणां सर्वांना दिसत आहे. लोकांचा खादीवर विश्वास असो वा नसो, त्यांना कॉंग्रेसचे सभासद होण्याचा हक्क आहे. या अटीला विरोध करण्यांत महाराष्ट्रानें पुढाकार घेतला आहे याबद्दल मला फार आनंद वाटतो. आणि खरोखरी मानवी व्यवहारांत असाच सरळ व स्पष्टवक्तेपणा असला पाहिजे. आजच्या अध्यक्षांनीं या विरोधाचें नेतृत्व पत्करलं आहे. त्यांना तुम्ही अनुसरलं पाहिजे. मीं यापूर्वी सांगितलेलें आहे व पुन्हाहि असंच सांगेन, कीं बेळगांवला त्या ठरावावर जें मतदान झालं तें मुळींच सरळ व प्रामाणिक झालं नाहीं. शेंकडा नव्वद लोकांनीं केवळ गांधी सांगतात म्हणून आपल्या सदसद्विवेकबुद्धीला सोडून त्या ठरावाला पाठिंबा दिला. त्यांना जें वाटत होतं तें त्यानीं तेथें बोलून दाखविलं नाहीं. खरं म्हटलं तर कॉंग्रेसमध्यें सर्व पक्ष समाविष्ट झाले पाहिजेत. कॉंग्रेसवर विश्वास एवढीच अट कॉंग्रेसचे सभासद होण्यास माझ्या मतें पुरेशी आहे. पण आतां मात्र ज्यांचा कॉंग्रेसवर विश्वास आहे, पण चरख्यावर विश्वास नाहीं त्यांना कॉंग्रेसचे सभासद होण्यास बंदी आहे! हा खरोखरी मोठा अन्याय आहे!''

याप्रमाणें पटेलांचें सडेतोड भाषण झाल्यावर भोपटकरांनीं मांडलेला मूळ ठराव पास झाला. सुताचा मताधिकार काढून टाकावा हा ठराव करण्यांत या परिषदेनें फार घाई केली-असा अनेकांपैकीं एक लंगडा आक्षेप या ठरावावर घेण्यांत आला. पण गंमत अशी कीं एकाहि टीकाकारानें छातीठोकपणें असें लिहिलें नाहीं, कीं सुताची मतदारी ही यशस्वी झाली आहे, सबब ती काढून टाकूं नये.

या परिषदेंत आणखी एक महत्त्वाचा ठराव झाला. केळकरांनीं मांडला असला तरी केळकर व पटेल या दोघांनीं मिळून तो तयार केलेला होता. तो ठराव असा:— " देशाच्या राजकारणांत मंदाई उत्पन्न झाल्याबद्दल परिषदेला वाईट वाटत आहे. परिषदेचें असें स्पष्ट मत आहे, कीं ही मंदाई

उत्पन्न होण्यास सर्वस्वीं नसलें तरी बव्हंशीं कारण म्हणजे कॉंग्रेसला स्वतःचा असा राजकीय कार्यक्रम सध्या नाहीं हें होय. कॉंग्रेसनें आपलें सर्व लक्ष राजकारणाशीं संबंध नसलेल्या विधायक कार्यक्रमाकडे लावलें आहे; व देशांतील अनेक राजकीय पक्षांत एकी नाहीं. म्हणून ही परिषद ऑल इंडिया कॉंग्रेस कमिटीला अशी शिफारस करते, कीं देशांतील राजकीय जीवनांत चैतन्य उत्पन्न होण्यासाठीं कॉंग्रेसनें राजकीय कार्यक्रम हातीं घ्यावा. अमृतसर कॉंग्रेसप्रमाणें कॉंग्रेसमध्यें इतर पक्ष सामील होण्यासाठीं अवश्य तर सर्वांस इष्ट अशा दुरुस्त्या स्वराज्यपक्षाच्या कार्यक्रमांत कराव्या, व अशा रीतीनें प्रस्तुतच्या राजकीय झगडयांत कौन्सिलांतून व बाहेरून सरकारशीं तोंड देण्यास अनुकूल परिस्थिति निर्माण करावी.''

वरील ठरावांत पटेलांच्या विचारांचें प्रतिबिंब उत्तम तऱ्हेनें दिसून येतें. त्यांत मुख्यतः ज्या गोष्टी दिसून येतात त्या अशा, कीं राष्ट्रीय सभेनें स्वतःचें असें राजकीय धोरण स्वीकारावें; स्वराज्यपक्षाचा कार्यक्रम हाच आपला कार्यक्रम तिनें मूलाधार म्हणून मानावा; राष्ट्रीय सभेंत सर्व पक्षांचा समावेश असावा; पण राष्ट्रीय सभा सर्वपक्षीय व्हायची तर माझाच कार्यक्रम आहे तसा राष्ट्रीय सभेनें घेतला पाहिजे असा आग्रह स्वराज्यपक्षाला धरतां यायचा नाहीं. याकरितां त्या कार्यक्रमांत तिला अवश्य तो फेरबदल करतां आला पाहिजे, आणि असहकारितेच्या युगाचा आरंभ होण्यापूर्वी अमृतसर येथें झालेल्या राष्ट्रीय सभेच्या प्रसंगीं जो कार्य-क्रम मान्य झाला, त्याचा पुनरुद्धार केल्यास तो आजहि सर्वसंमत असा कार्यक्रम मानला जाईल आणि राष्ट्रांत पुन्हा ऐक्य नांदूं लागेल. एकंदरींनें नाफेरवक्षास अप्रिय व बंडखोरीचे वाटणारे हे दोन ठराव पटेल व केळकर यांच्या संमतीनें व सहविचारानें सातारा परिषदेनें मान्य केले. अशा रीतीनें या परिषदेनें एक प्रकारें साऱ्या देशाला व कॉंग्रेसला नवी दिशा दाख-विण्याचें उपयुक्त कार्य केलें व त्यांत पटेलांचा वांटा मोठाच होता यांत शंका नाहीं. आतां हे महत्त्वाचे ठराव परिषदेंत पास झाले तरी ते बहुजन-समाजाला कितपत मान्य आहेत हें पाहायचें होतें. म्हणून त्यावर जाहीर मतें घेण्यात आलीं. तेव्हां जून व जुलै या दोन महिन्यांत महाराष्ट्रांतून तीन

हजारांवर मतें या दोनहि ठरावास अनुकूल अशीं लिहून आलीं व आणखीहि पुढें येणार होतीं. परंतु तिकडे ऑल इंडिया काँग्रेस कमिटींत सूतमतदानाच्या हक्काचे दिवस आधींच भरत आले होते. ऑल इंडिया काँग्रेस कमिटींत स्वराज्यपक्षाचें बहुमत होतें. व त्यांचा सुताच्या मतदारीला विरोध होताच.

## काँग्रेसच्या घटनेंत महत्त्वाचे फरक

ता. २१ सप्टेंबर १९२५ रोजीं पाटणा येथें ऑल इंडिया काँग्रेस कमिटीची सभा झाली. व तींत काँग्रेसच्या घटनेंत तीन महत्त्वाचे फरक घडून आले. खादीचें महत्त्व नष्ट करण्यांत आलें; काँग्रेसचे चार आण्याचें सभासद व मान्य करून सूतमतदानाचा हक्क वैकल्पिक करण्यांत आला व सर्व राजकीय कार्यक्रम स्वराज्यपक्षाकडे सोंपविण्यांत आला. यामुळें स्वराज्यपक्ष हा आतां नुसता काँग्रेसची एक शाखा म्हणून राहिला नाहीं किंवा विरोधी पक्ष म्हणूनहि राहिला नाहीं; तर आतां स्वराज्यपक्ष म्हणजेच काँग्रेस असें समीकरण झालें. म्हणून यापुढील कौन्सिलच्या निवडणुका आतां पूर्वीप्रमाणें एका पक्षातर्फें व्हायच्या नव्हत्या तर काँग्रेसतर्फें व्हायच्या होत्या. याप्रमाणें बेळगांव येथें जें झालें तें प्रथम झुगारून देण्याचा मान सातारा परिषदेनें घेतला. व सातारा परिषदेनें जें केलें त्याला अखेरची मान्यता पाटण्यांत मिळाली. यावरून त्या वेळीं स्वराज्यपक्षाचें वर्चस्व किती भारी होतें याची कल्पना करतां येते. पटेल, नेहरू व केळकर यांच्या राजकारणाचा हा विजय होता. लोक एकदा कौन्सिलवादी होऊन कौन्सिलांत शिरले म्हणजे त्यांची कौन्सिलाबाहेरील चळवळ थंडावते या नाफेरवाद्यांच्या आक्षेपाला आतां रोकडें उत्तर मिळालें. कारण कौन्सिलांत निवडून येऊनहि कौन्सिलाबाहेर राजकारण करतां येतें व देशाला मार्ग दाखवितां येतो हें या वेळीं स्वराज्यपक्षानें दाखवून दिलें. किंबहुना कौन्सिलप्रवेशामुळेंच चळवळीला दुप्पट जोर येतो हें स्वराज्यपक्षाच्या या विजयावरून चांगलें सिद्ध झालें. पटेलांचेंहि पहिल्यापासून हेंच मत कसें होतें हें आम्हीं मागील एका प्रकरणांत विस्तारानें सांगितलेंच आहे. स्वराज्यपक्षानें व त्यांतूनहि महाराष्ट्रपक्षानें देशांतील चळवळीला नवें वळण लावलें; त्यामुळें त्यांचें देशांत महत्त्व

वाढलें. याचा पुरावा लवकरच दिसून आला. तो म्हणजे येत्या कानपूर कॉंग्रेसच्या अध्यक्षपदाकरितां जीं दोन नावें सुचविण्यांत आलीं त्यांत पूर्वी स्वराज्यपक्षाचे व आतां त्यांतून निघालेल्या प्रतिसहकार पक्षाचे पुढारी श्री. न. चिं. केळकर यांचें नांव होतें. कौन्सिलांत एकजात अडवणुकीची भाषा बोलण्यांत कांहीं अर्थ नाहीं; तर शक्य तेथें अडथळा करावा, नसेल तेथें तटस्थ राहावें व मिळेल तेथें सत्ता किंवा अधिकारपदें बळकावून आक्रमण करीत जावें असें प्रतिसहकारपक्षाचें धोरण होतें. व तेंच यापुढें स्वराज्यपक्षानें, बोलण्यानें नाहीं तरी कृतीनें हळूहळू अंमलांत आणलें. तें कसें तें आपण पुढील प्रकरणांत पाहूं.

## कलकत्ता नागरिकांकडून मानपत्र

कलकत्ता येथें स्वराज्यपक्षाची सभा होऊन तींत फेरपक्ष व नाफेरपक्ष यांचा समेट झाल्याचा वृत्तांत पूर्वी सांगितलेलाच आहे. या समेटाच्या वेळीं कलकत्त्यास स्वराज्यपक्षाचे जे थोर पुढारी जमले होते त्यांत पटेलांची गणना अर्थातच प्रामुख्यानें होत होती. त्या वेळीं कलकत्ता कॉर्पोरेशननें पटेलांना मानपत्र दिलें. देशबंधु चित्तरंजन दास हे त्या कॉर्पोरेशनचे अध्यक्ष होते. त्यांनीं कॉर्पोरेशनतर्फें पटेलांना मानपत्र अर्पण केलें. मानपत्र नक्षीकाम केलेल्या चांदीच्या चौरंगावर कोरलेलें होतें. या चौरंगावर एका बाजूला चरख्याचें चित्र काढलें असून दुसऱ्या बाजूला पक्ष्याची वगैरे नक्षी काढली होती. हें मानपत्र अर्पण करण्याचा समारंभ सोमवार तारीख १८ ऑगस्ट, १९२४ रोजीं सायंकाळीं ९ वाजतां कलकत्त्याच्या टाऊन हॉलमध्यें झाला. बरोबर साडेसहा वाजतां कौन्सिलर व अधिकारीवर्ग ही मंडळी उच्चासनावरील पुढच्या व मागच्या रांगांत येऊन बसली. समारंभाकरितां शृंगारलेल्या कमानीपाशीं म्युनिसिपालिटीचे चीफ ऑफिसर यांनीं या समारंभाचे मुख्य पाहुणे पटेल व नेहरू यांचें स्वागत केलें. आंत प्रवेश केल्यावर उच्चासनाच्या पायथ्याशीं कॉर्पोरेशनचे अध्यक्ष दास यांनीं पाहुण्याचें स्वागत केलें. उच्चासनावर अध्यक्ष व पाहुणे आरूढ होतांच त्यांना वर बसलेल्या मंडळीनीं खडी ताजीम दिली. सर्व मंडळी आपापल्या आसनावर बसल्यानंतर

अध्यक्षांनीं पाहुण्यांना पुष्पहारमंडित केलें व नंतर त्यांच्यावर पुष्पवृष्टि झाली. स्वागतपर पद्य गाऊन झाल्यानंतर अध्यक्षांनीं मानपत्र वाचून दाखविलें. त्या वेळीं कौन्सिलर व अधिकारी मंडळी उभी होती. पाहुण्यांनीं उत्तरादाखल भाषणें केल्यावर हा समारंभ संपला. हें मानपत्र मोठें उद्बोधक व पटेलांच्या व्यक्तिमत्तेवर प्रकाश पाडणारें असल्यानें तें सारांशरूपानें खालीं दिलें आहे:

वन्देमातरम्

श्रीयुत विठ्ठलभाई जव्हेरभाई पटेल यांसी—

आपण या शहराला भेट दिली त्याप्रीत्यर्थ आम्हीं कलकत्ता कॉर्पोरेशनचे सभासद आपलें अत्यंत मनःपूर्वक स्वागत करतों.

आम्हांला आपल्याबद्दल जो परमोच्च आदर वाटत आहे तो व्यक्त करण्याची संधि आपण आम्हांला दिली याबद्दल आम्ही आपले फार आभारी आहों. आपला उत्कट स्वदेशाभिमान, उदात्त स्वार्थत्याग, आणि राष्ट्रैक्य साधण्यासाठीं केलेली चिरंतन देशसेवा या गुणांमुळें आपण आमच्या हृदयांत अखंड स्थान मिळविलें आहे. आपण हिंदुस्थानच्या स्वराज्यप्राप्तीकरितां जी विविध कामगिरी केली आहे ती आतां इतकी लोकविश्रुत आहे कीं, तिचा उल्लेख करणें अनावश्यक होईल. आपली निःसीम स्वदेशभक्ति, दूरदर्शी मुत्सद्दीपणा यामुळें जातींजातींतील संशयग्रस्त वातावरण नाहींसें झालें असून त्या ठिकाणीं प्रेमाचें, स्नेहभावाचें आणि अन्योन्य सहिष्णुतेचें बीजारोपण आपण केलें आहे व त्यामुळेंच संघटित हिंदुस्थानाचा पाया आपण रोंविला आहे.

आपण हिंदी जनतेंत मोठी जागृति केली असून तीमुळें त्यांच्यांत स्वाभिमान व आपल्या हक्कांबद्दल व जबाबदारीबद्दल जाणीव उत्पन्न झाली आहे. हिंदुस्थानला जगांतील स्वतंत्र राष्ट्रांत मानाचें स्थान मिळावें यासाठीं आपण हिंदी जनतेच्या हृदयांत आशा, विश्वास व धैर्य निर्माण केलें आहे. मानवसमाजाची सेवा हें सर्वांत उच्चप्रतीचें ध्येय आहे व आपलेंहि तेंच ध्येय

आहे. स्वातंत्र्यार्थ लढा हा सर्वांत श्रेष्ठ लढा होय व आपणहि तोच लढत आहां. हा लढा फार मोठा व संकटमय आहे. पण आपण आमच्या भविष्यकालाबद्दल आशावाद प्रकट केला आहे.

| | |
|---|---|
| कलकत्ता, | आपले |
| तारीख १८ ऑगस्ट, १९२४ | कलकत्ता कॉर्पोरेशनचे सभासद. |

# वैभवाच्या शिखरावर

## पहिला टप्पा

**विपदि धैर्यमथाभ्युदये क्षमा । सदसि वाक्पटुता युधि विक्रमः ।**
**यशसि चाभिरुचिर्व्यसनं श्रुतौ। प्रकृति सिद्धमिदं हि महात्मनाम् ॥**

१९२३ च्या कौन्सिल निवडणुकीचें वातावरण सरकारची अडवणूक—सतत व सुसंगत अडवणूक—या स्वराज्यपक्षीय घोषानें दुमदुमून गेलें होतें. आतांपर्यंत कॉंग्रेसनें कौन्सिलाबाहेर असहकारिता केली होती. आतां ती कौन्सिलांत शिरून सरकारशीं असहकारिता करण्याची भाषा बोलत होती. सरकारनें लोकांवर लादलेली घटना त्यांना मोडून तोडून फेकून द्यायची होती व म्हणून त्यांच्या दृष्टीनें नागपूरला रचलेला असहकारितेचा ठराव आतांच्या कौन्सिलप्रवेशाशीं मुळींच विसंगत नव्हता. स्वराज्याच्या मार्गांत अडथळा उत्पन्न करणाऱ्या नोकरशाहीच्या धोरणाचा प्रतिबंध करणें हा त्यांच्या 'अडवणूक' या शब्दाचा अर्थ होता व तो कॉंग्रेसच्या असहकारितेला अनुकूल असा होता. फरक एवढाच कीं, आतांपर्यंत कॉंग्रेसची असहकारिता एकांगी म्हणजे सर्वस्वीं कौन्सिलाबाहेर होती; आतां ती कौन्सिलांतहि सुरू होणार; व हा झगडा सर्व बाजूंनीं चालणार. स्वराज्यपक्षानें या अडवणुकीचा तपशील जाहीर केला. तो असा:—— आमच्या हक्कांना मान्यता मिळेपर्यंत आम्ही अंदाजपत्रकें फेटाळून लावूं, सरकारचीं कायद्याचीं बिलें फेटाळून लावूं. या कृतींत लहान सहान फायद्यांवर पाणी सोडण्याचीं वेळ आली तरी हरकत नाहीं. पण नोकरशाहीला अनियंत्रित सत्ता चालवूं देणें अशक्य करून टाकूं; नोकरशाहीची सत्ता नष्ट होईल व आमच्या राष्ट्रीय जीवनाची वाढ होईल असले कायदे व बिलें आम्ही कौन्सिलपुढें मांडूं. तसेंच कौन्सिलाबाहेर आम्ही कॉंग्रेसच्या विधायक कार्यक्रमास पाठिंबा देऊं.

## अडवणुकीच्या तत्त्वाचे उत्पत्ति–स्थिति–लयकर्ते !

आतां पटेलांचे या अडवणुकीसंबंधानें विचार कसे होते तें पाहाणें मोठें बोधप्रद आहे. कारण स्वराज्यपक्षाची भाषा जरी निखालस अडवणुकीची होती तरी त्या अडवणुकींतहि सौम्य, तीव्र किंवा वेळ येईल तसे फेरफार पुढें करावेच लागले व म्हणून पटेलांनीं आपली भूमिका आधींच स्पष्टपणें ठरविली होती. ती अशी: स्वराज्याचे तीन मार्ग शक्य आहेत असें त्यांनीं कल्पिलें. पहिला सहकारिता, दुसरा असहकारिता व तिसरा सहकारिता व अडवणूक मिळून. अर्थात् यापैकीं सहकारिता ही निष्फळ आहे. दुसरा मार्ग जो असहकारितेचा त्याचा प्रयोग नुकताच होऊन पूर्ण असहकारिता अशक्य आहे असें दिसून आलें आहे. कारण महात्मा गांधींनासुद्धा स्वदेशी, मद्य-पानबंदी या विधायक कार्यांकरितां 'सैतानी' सरकारची सहकारिता लागते. रेल्वे, पोस्ट, तारखातें, मोटारी यांच्यावांचून कांहीं चालत नाहीं. व त्यांच्यापुरती तरी सहकारिता करावीच लागते. तेव्हां आतां असहकारितेचा कांटा तिसऱ्या मार्गाकडे झुकत आहे. फरक एवढाच कीं ज्याला ते असहकारिता म्हणून म्हणतात त्याला आम्ही अडवणूक म्हणतों. शिवाय ही अडवणूक ज्या ठिकाणीं सरकार सहकारितेचा हात पुढें करील त्या ठिकाणीं कमी करायची आहे. म्हणजे जरूर व इष्ट तेथें सहकारिता व जरूर व इष्टतेथें अडवणूक सरकारला केली पाहिजे. केवळ असहकारिता सध्याच्या स्थितींत अशक्यप्राय असल्यानें वर सांगितलेला मार्गच सध्या व्यवहार्य ठरतो. कौन्सिलांत जाऊन याच मार्गाचा अवलंब करावा लागेल. पटेलांचें धोरण हें होतें व तेंच पुढें अंमलांत आणलें गेलें. पटेलांचें अध्यक्षपद, नेहरूंचें सरकारी कमिटीवरील सभासदत्व या गोष्टी केवळ अडवणूक सुचवीत नसून पटेलांचें धोरण त्यावरून दर्शविलें गेलें. व म्हणूनच कीं काय पटेलांच्या कायदेभंग चौकशीच्या निर्णयापासून तों त्यांनीं असेंब्लीचें अध्यक्षपद स्वीकारीपर्यंत जो काळ गेला त्याचा आढावा लक्षांत घेऊन एका वृत्तपत्रानें "अडवणुकीच्या तत्त्वाचे उत्पत्ति स्थिति लयकर्ते" असें पटेलांचें मौजेचें वर्णन केलें होतें ! असो.

असेंब्लींतील पटेलांचा शपथविधि तारीख ३० जानेवारी १९२४ सालीं झाला व ते रीतसर सभासद झाले. पटेल व त्यांचे स्वराज्यपक्षीय सहकारी

यांनीं असेंब्लींत पदार्पण करून आपल्या जागा घेतल्या त्या वेळेचें दृश्य मोठें उठावदार होतें ! कौरव-सभेंत जसे भीमार्जुन तसे ते नेहरू-पटेल असेंब्लीला आपल्या हजिरीनें भूषणभूत झाले होते. एक स्वराज्यपक्षाचे अध्यक्ष तर दुसरे उपाध्यक्ष. दोघेहि महान् मुत्सद्दी आणि खंबीर राजकारणपटु वीर. दोघांनीहि अपार लोकप्रियता मिळविलेली. भारतमंत्री लॉर्ड बर्कनहेड यांनीं स्वराज्यपक्षासंबंधीं बोलतांना " एक अत्यंत सुसंघटित पक्ष " अशी त्याची प्रशंसा केली होती व ती खरीच होती. अशा या प्रबळ व सुसंघटित पक्षाचा या दोघांना पाठिंबा होता. या लोकाग्रणींच्या नुसत्या आगमनानें सरकार-पक्षाच्या तारांबळीला सुरवात झाली ! नेहरू पटेलांच्या वाक्शरांनीं ह्रेले मुडिमन घायाळ होऊं लागले एवढेंच नव्हे, तर त्यांची ' दे माय धरणी ठाय ' अशी केंविलवाणी स्थिति होऊं लागली ! नेहरू-पटेलांचा दराराच तसा विलक्षण होता. नेहरूंचें विशाल भाल, उग्र मुद्रा, उन्नत नासिका, खानदानी रुबाब व खणखणीत भाषण; आणि पटेलांचे तीक्ष्ण नेत्र, दुसऱ्यावर छाप पाडणारी शुभ्र लांब दाढी, खोचक मुद्रा आणि मर्मभेदी वक्तृत्व या सर्व गोष्टींनीं आरंभींच सरकारी सभासदांना वाटूं लागलें, कीं यापुढें जी झुंज होणार ती कांहीं सामान्य प्रतीची किंवा नेभळट होणार नाहीं. तीला भयंकर जड जाणार; विलक्षण मानहानि सोसण्याचे प्रसंग येणार.

## "एवढ्या रात्रीं कां बोलाविलें ?"

साधे सभासद असेपर्यंतहि पटेलांनीं राज्यकारभारावरील अनेक प्रश्न विचारून सरकारी अधिकाऱ्यांना हैराण केलें; आणि लोकपक्षाची बाजू राखली. पटेलांची कार्यक्षमता विस्मयजनक होती. असेंब्लीचा आदर्श सभासद कसा असावा हें त्यांनीं आपल्या वागणुकीनें सिद्ध करून दिलें. पण ही कार्यतत्परता ते आपल्यापुरतीच मर्यादित करीत नव्हते. ते स्वतः झटून कामें करीत व दुसऱ्यानाहि कामें करायला लावीत. यासंबंधीं एक प्रसंग या ठिकाणीं नमूद करतों.

१९१९ च्या सुधारणा कायद्याची अंमलबजावणी कशी झाली त्याचें परीक्षण करण्याकरितां सरकारनें सर अलेक्झांडर मुडिमन यांच्या अध्यक्षतेखालीं १९२४ सालीं एक कमिटी नेमली. हिलाच मुडिमन कमिटी असें

नांव मिळालें. या कमिटीनें आपल्या कामाचा रिपोर्ट लिहून तो रात्रीं दहा वाजतां छापखान्यांतून बाहेर काढला. पटेलांनीं लगेच त्याच वेळीं रात्रीं त्या रिपोर्टाची एक नक्कल हस्तगत केली; व नंतर ते आपल्या निवासस्थानीं गेले. तेथून तावडतोब त्यांनीं आपले स्नेही बॅरिस्टर जम्नादास मेहता यांना बोलावून घेतलें. जम्नादास येतांच त्यांनीं पटेलांना विचारलें " एवढ्या रात्रीं मला येथें कां बोलावलें ? " तेव्हां पटेल त्यांना म्हणाले, " हें पहा जम्नादास, असा एक दिवस आपल्या आयुष्यांत येणार आहे, कीं त्या वेळीं आपण जे निजूं ते पुन्हा उठणार नाहीं. पण आजचा दिवस तरी असा आहे कीं आपण या दिवशीं निजणारच नाहीं. आज आपण जागेच राहूं." " आज जागरण का करायचं ? " असें जम्नादासांनीं विचारतां पटेल म्हणाले, " हा पहा मुडिमन कमिटीचा रिपोर्ट. आतां माझ्या हातांत पडला आहे. हा समग्र रिपोर्ट आज सबंध रात्रींत वाचून काढून, त्यावर आपल्या पक्षाचं म्हणणं काय आहे तें खुलासेवार लिहून, उद्यां सकाळीं प्रसिद्ध झालें पाहिजे. आणि वर्तमानपत्राच्या बातमीदारांना उद्यां या रिपोर्टाबद्दल आपण मुलाखती देऊं शकलों पाहिजे. " याप्रमाणें पटेलांनीं सांगतांच त्या दोघांनीं तो रिपोर्ट सबंध रात्रीं अलोचन जागरण करून वाचून काढला व त्यावर आपली टीकाहि लिहून काढली, दिवस उजाडतो तों त्या रिपोर्टावर ज्यांनीं आपलें मत पहिल्यांदा जाहीर केलें व मुलाखती दिल्या असे फक्त पटेलच होते. पटेल व जम्नादास यांखेरीज तिसऱ्या कोणींहि या वेळेपर्यंत रिपोर्ट वाचला तर नव्हताच; पण रिपोर्ट हातांत पडल्यावरदेखील त्याचें कव्हरहि उघडलें नव्हतें ! तेव्हां पटेलांनीं रिपोर्टाबद्दल इतक्या लवकर मत प्रदर्शित करण्याबरोबर सर्वांना त्यांच्या दक्षतेबद्दल आश्चर्य वाटलें !

## पटेल-नेहरूंची अलौकिक जोडी

पटेलांच्या कार्यदक्षतेबरोबर त्यांची स्पष्टवक्तेपणाबद्दलहि ख्याति होती. सरकारनें असेंब्लीपुढें ठेवलेल्या अंदाजपत्रकावर त्यांनीं जीं प्रखर भाषणें केलीं, तीं त्यांच्या स्पष्टवक्तेपणाची साक्ष देतात. १९२५ च्या अंदाजपत्रकाची तपशीलवार छाननी करण्यापूर्वी त्यांनीं सरकारला बजावून सांगितलें,

कीं "आतां आम्हांला एकच मार्ग उरला आहे; आणि तो म्हणजे तुमच्याशीं सारखं झगडत राहायचं ! तुमच्याशीं अव्याहत लढा चालू ठेवायचा ! कौन्सिलांत लढा व कौन्सिलबाहेरहि लढाच चालवायचा आणि लोकांना याहीपेक्षां प्रचंड आणि उदात्त असा स्वातंत्र्यसंग्राम चालविण्यास तयार करायचें ! जोंपर्यंत आम्ही येथें आहोंत तोंपर्यंत पावलापावलागणिक आम्ही कौन्सिलांतून सरकारशीं झगडत राहाणार ! आणि त्याचबरोबर साऱ्या राष्ट्रांत सविनय कायदेभंगाची मोहीम सुरू करण्याकरितां लोकांची संघटना करणार !" पटेलांप्रमाणें नेहरूंचें टीकास्त्रहि कठीण असे. याप्रमाणें या दोन थोर पुढाऱ्यांनीं आपापल्यापरी मोठी छाप बसविली तरी त्यांच्या बाह्य वागणुकींत वरवर पाहाणाराला केवढी तरी तफावत दिसून येई. त्यांच्यांतील या विरोधाचें श्री. केळकर यांनीं मार्मिक वर्णन केलें आहे. ते लिहितात, "नेहरू हे असेंब्लींत स्वराज्यपक्षाचे अध्यक्ष म्हणून जोरदार भाषणें करीत. तथापि त्यांचा आणि वरिष्ठ अधिकाऱ्याचा खाजगी स्नेह चांगलाच असे. पंडितजी हे खाण्यापिण्याच्या बाबतींत मोठे रसज्ञ असत. यामुळें युरोपियन अधिकारी निरनिराळे प्रसंग उत्पन्न करून ख्यालीखुशालींत समरस होण्याकरितां त्यांना लोभवून नेत; आणि पंडितजी हे त्या सामाजिक संगतींचे भोक्ते असल्यामुळें जात. पंडितजी खाजगी बोलण्याचालण्यांत मोठे चतुर. जेवणाखाणाच्या टेबलाशीं जीं नर्म संभाषणें, कोट्या-प्रतिकोट्या, हास्य-विनोद चालतो त्यांत युरोपियन लोकांच्या बरोबरीनें भाग घेणारे, किंबहुना त्यांच्यावर चढ करणारे असे होते. उलट, विठ्ठलभाई पटेल हे खाण्यापिण्यांत कमी करणारे नसले तरी ते युरोपियन लोकांशीं फटकून वागत." म्हणजे पटेल युरोपियन लोकांशीं जरी बोलले तरी त्यांच्या बोलण्यांत तिखटपणा असायचा. विनोद असे, पण तो केव्हांहि कोणाला तरी लागण्या बोचण्यासारखा असावयाचा. भांडखोर प्रतिपक्षी म्हणून ते ठरून गेले होते. त्यामुळें युरोपियन अधिकारी त्यांना कधीं जवळ करीत नसत. पंडितजींच्या व युरोपियन अधिकाऱ्यांच्या स्नेहाबद्दल पटेल तक्रार करीत. व याबद्दल खाजगी मित्रमंडळींत ते नेहरूंवर एकसारखें टीकास्त्र चालवीत; पण या भांडणाच्या मुळाशीं प्रेमबुद्धिच असल्यामुळें पटेल-नेहरूंची ही वागणूक कौतुकाचा विषय होऊन

नसली एवढेंच. त्यांच्या मनांत एकमेकांबद्दल वैरभाव किंवा मत्सर होता असे मुळींच नाहीं. कारण दोघांच्या सहकार्यांत कधीं अंतर पडलेलें नव्हतें. पंडितजी हे युरोपियन अधिकाऱ्यांशीं खेळीमेळीनें वागतात म्हणून नेहरूंवर पटेलांचा राग होता खरा, पण त्याबरोबर नेहरूंच्या इतर गुणांची जाणीव पटेलांना होती व नेहरूंनाहि पटेलांच्या गुणांची जाणीव होती. यामुळें दोघांचें एकमेकांशिवाय चालत नसे. आणि ज्या वेळीं अध्यक्षपदाच्या निवडणुकीची वेळ आली, त्या वेळीं नेहरूंना पटेलांवांचून दुसरा लायक उमेदवार अध्यक्ष होण्यासारखा दिसला नाहीं. पटेल हे कायदेकौन्सिलच्या कामांत पटाईत, हजर जबाबी, करारी, खंबीर साधनयोजक, धीट होते हें नेहरूंना पुरतें माहीत होतें. मुंबई कॉर्पोरेशनच्या अध्यक्षपदाचा महत्त्वाचा अनुभवहि पटेलांना होता. या सर्व गोष्टी लक्षांत घेऊन स्वराज्यपक्षातर्फे पटेलांनाच असेंब्लीच्या अध्यक्षपदाला उमेदवार म्हणून उभें करण्याचें नेहरूंनीं ठरविलें व त्या खटपटीला ते लागले.

## विजयश्री मिळवली

आतांपर्यंत असेंब्लीचा अध्यक्ष हा सरकारनियुक्त होता. लोकनियुक्त अध्यक्ष होण्याची आतां ही पहिलीच वेळ होती. स्वराज्यपक्षानें पटेलांनाच अध्यक्षपदीं निवडून आणण्याचें ठरविलें. पण पटेल हेच अध्यक्ष असावेत असें जरी पंडितजींना वाटत होतें, तरी इतर पक्षांतील लोकांना तसें वाटत नव्हतें. आणि स्वराज्यपक्षाचें तसें हुकमी बहुमत असेंब्लींत नसल्यामुळें त्यांना आपला मनुष्य निवडून आणायचा तर इतर पक्षांचाहि पाठिंबा मिळविणें अवश्य होतें. त्यांतल्या त्यांत स्वराज्यपक्षाला जवळचा पक्ष म्हणजे जिनांचा स्वतंत्र पक्ष होता. म्हणून जिनांना अनुकूल करण्याच्या खटपटीस पंडितजी लागले. दिल्लीस असतांना एके दिवशीं पंडितजींनीं मुद्दाम या कामाकरितां जिनांची गांठ घेतली व पटेलांना अध्यक्षपदाकरितां पाठिंबा देण्याबद्दल त्यांना विनंती केली. परंतु जिनासाहेबांनीं तर पटेलांविषयीं आरंभालाच प्रतिकूल उद्गार काढले. कारण काय तर त्यांच्या मतें पटेलांचें बोलणें तिखट आणि वागणूक बिनअदबीची ! जिनांनीं पंडितजींना सांगितलें, कीं

"पटेल हे मुंबई कॉर्पोरेशनचे अध्यक्ष असतांना त्यांची वर्तणूक शिष्टाचारास धरून नव्हती ! अध्यक्ष असतांना त्यांनीं कचेरीचं काम जसं संभाळलं तसं त्यांनीं वरिष्ठ सरकारी अधिकाऱ्यांशींहि शिष्टसंमत वर्तन ठेवायला पाहिजे होतं, पण तें त्यांनीं ठेवलं नाहीं. व्हाइसरॉयांच्या आगमनावर पटेलांनीं बहिष्कार घालावा हें कांहीं त्यांच्या अध्यक्षपदाला शोभण्यासारखं कृत्य नव्हतं ! त्यांनीं व्हाइसरॉयकडे नेहमीं येणं जाणं, लिहिणं बोलणं ठेवायला पाहिजे होतं. तेव्हां अशाच रीतीची त्यांची वागणूक याहीपुढें राहायची असेल तर मी त्यांच्या उमेदवारीला पाठिंबा देण्यास तयार नाहीं." यावर पंडितजींनीं जिनांना सांगितलें, कीं "त्या वेळीं पटेलांनीं तसं केलं म्हणून यापुढें ते तसं करतील असं मात्र नाहीं; जेव्हां जरूर लागेल तेव्हां ते व्हाइसरॉयांना भेटत जातील हें मी तुम्हांला निश्चित सांगतों." परंतु इतकें झाल्यावरहि जिनांनीं नक्की असें कांहींच पंडितजींना त्या वेळीं सांगितलें नाहीं. तेव्हां मानधन पंडितजींनीं जिनांच्या बेपर्वा वागणुकीची वर्तमानपत्रांतून खरपूस हजिरी घेतली. त्या वेळीं कुठें जिना ताळ्यावर आले. व नंतर स्वराज्यपक्ष व जिनापक्ष यांची एकत्र खाजगी सभा भरली. आणि अशा रीतीनें जिनांच्या स्वतंत्रपक्षाचे आंवळे नेहरू-केळकरांच्या चातुर्यानें मोटेंत बांधण्यांत आले ! अखेर दोन्ही पक्षांत एकमत जरी झालें नाहीं तरी पटेलांना बहुमत मिळेल असें दिसलें. जिनापक्षांतील बहुतेकांनीं पटेलांनाच मतें देण्याचें ठरविलें. पटेलांना प्रतिस्पर्धी दिवाणबहादूर रंगाचारियर हे उभे राहिले. ते सरकारपक्षाचे होते. तारीख २२ ऑगस्ट १९२५ रोजीं अध्यक्षाची निवडणूक झाली. दि. ब. रंगाचारियर यांना ५६ व पटेलांना ५८ मतें मिळालीं. व पटेल निवडून आले. ही निवडणूक मोठी चुरशीची झाली. कारण रंगाचारियरना निवडून आणावें अशी सरकारपक्षाची इच्छा होती. त्यांना पटेल अध्यक्ष मुळींच नको होते. कारण त्यांनीं पूर्वी मुंबई कॉर्पोरेशनचे अध्यक्ष म्हणून व्हाइसरॉयांचें स्वागत न करतां राजीनामा दिला होता व हें शल्य सरकारपक्षाला डांचत होतें ! त्यांनीं रंगाचारियरना निवडून आणण्याकरितां अनेक खटपटी केल्या. ही निवडणूक सिमल्यास झाली. तेव्हां त्यांनीं खालीं म्हणजे काल्का येथें एक मोटार मुद्दाम पाठवून सरकारी पुढ्यांतली मंडळी

बरोबर वेळेला मतदान करण्याकरितां आणली. नवीन दहा युरोपियन सभासद प्रतिज्ञाबद्ध करून त्यांना मतांची भर करायला लावली तरी अखेर प्रत्यक्ष निवडणुकींत पटेलांचाच विजय झाला.

निवडणूक संपेपर्यंत सभागृहांत जो कडवटपणा उत्पन्न झाला होता तो मात्र आतां नाहींसा झाला. व आतां उभयपक्षांत गोड बोलणीं सुरू झालीं. एका युरोपियन सभासदानें तारीख २५ च्या बैठकींत बोलून दाखविलें कीं दोन दिवसांपूर्वी जरी या ठिकाणीं आपसांत फूट दिसत होती तरी आतां जे नवे अध्यक्ष झाले आहेत त्यांचें स्वागतहि सबंध सभा एकदिलानें करीत आहे. पटेलांच्या या निवडणुकीनें असेंब्लींतच नव्हे तर साऱ्या हिंदुस्थानांत उत्साहपूर्ण वातावरण निर्माण झालें. आणि झाली ही निवडणूक सर्वथैव योग्य झाली असेच उद्गार एक सुरानें सर्व ठिकाणीं निघूं लागले. राजकारणांत किंवा कुठेंहि, असा एकहि पक्ष नव्हता कीं ज्यानें पटेलांचें त्यांना मिळालेल्या बहुमानाबद्दल अभिनंदन केलें नाहीं.

मावळते अध्यक्ष सर फ्रेडरिक व्हाइट यांनीं पटेलांबद्दल गौरवपूर्ण उद्गार काढले व ज्यांनीं मुंबई कॉर्पोरेशनचें अध्यक्षपद सजविलें त्यांच्याच हवालीं असेंब्लीच्या अध्यक्षपदाचीं सूत्रें जात आहेत याबद्दल अतिशय समाधान व्यक्त केलें. या वेळीं पटेल हे खादीच्या पोशाकांत इतर सभासदांप्रमाणें प्रथम खालीं बसले होते. त्यांनींहि परत व्हाइटसाहेबांच्या कर्तबगारीबद्दल प्रशंसोद्गार काढले. सरकारपक्षाचे पुढारी सर अलेक्झांडर मुडिमन यांनीं या प्रसंगाचें ऐतिहासिक महत्त्व सांगितलें व असेंब्लीला लोकनियुक्त अध्यक्ष लाभण्याचा हा पहिलाच सुप्रसंग होय असे उद्गार काढले.

## ‘ जंटलमेन, दि ऑनरेबल प्रेसिडेंट ! ’

थोड्याच वेळानें सभागृहांत एक पालट दिसून आला. “ जंटलमेन दि ऑनरेबल प्रेसिडेंट ” याप्रमाणें चोपदाराच्या ललकारींत नवीन अध्यक्षांनीं सभाप्रवेश केला; त्यासरशीं सर्व सभासदांनीं उभें राहून त्यांचें स्वागत केलें. त्या वेळीं सर्वांना अध्यक्ष पटेलांच्या पोशाकाविषयीं उत्सुकता उत्पन्न झाली होती. पटेल हे नेहमींच्या पाटीदारी खादीच्या वेषांत येणार, कीं तो टाकून



नामदार विठ्ठलभाई पटेल
अध्यक्षीय वेषांत

Hon'ble Panditji

Allahabad

Congress demands fully satisfactorily put before Joint Committee. Stanley ~~Reed~~ Reed evidence good.

Patel

★ ★ ★

Before I address you a few words on the present situation and ~~on~~ the work that lies before us I can not help referring to the great and irreparable loss sustained by the country in the death of Lokmanya Bal Gangadhar Tilak. He lived ~~& died~~ for ~~the~~ the people & died for them. He was a born leader of men and it is no exaggeration to say that he was the maker of modern India. Love for India was his religion. When the history of ~~for~~ India's struggle for freedom comes to be written, Lokmanya's name will find the first place! He gave to the country the inspiring message that ~~His teachings~~ "Home Rule is my birth right and I will have it." ~~is an~~

श्री. विठ्ठलभाई पटेल यांचें हस्ताक्षर

कोट पाटलोण चढविणार, का विलायती झगा व टोप घालणार? याप्रमाणें सभासद आपसांत गमतीनें चर्चा करीत होते. आणि खरें म्हटलें तर पटेलांचा पोशाक कसा असणार याबद्दल तर्कवितर्क करण्याला बरीच जागाहि होती. कारण पटेल हे काँग्रेसवादी असल्यानें खादीशिवाय दुसरें कांहीं अंगावर घालायचें नाहीं या प्रतिज्ञेनें ते बांधले गेले होते. ते गेलीं कांहीं वर्षें धोतर नेसत व आतांहि अध्यक्ष झाल्यावर ते धोतरच नेसून आले. वर अध्यक्षाचें चिन्ह म्हणून काळा झगा त्यांनीं घातला. पण हा झगा काळ्या रंगाच्या रेशमी खादीचा होता; व तो सरोजिनी नायडूंनीं दिलेली रेशमी साडी फाडून तयार केला होता! त्या वेळीं सिमल्याला रेशमी खादी मिळत नव्हती. पण विलायती रेशमी झगा घातला तर व्रतभंग होणार म्हणून वरील तत्काळ सोईची गोष्ट करण्यांत आली! जुन्या अध्यक्षांचा विलायती झगा पांघरण्याचें त्यांनीं साफ नाकारलें.

## गांधी टोपीचा गौरव

आतां राहतां राहिला डोक्यावरचा केसांचा टोप. विलायती झगा घेतला नाहीं, पण टोप मात्र नाइलाजानें त्यांनीं डोक्यावर घातला. पण त्यांतसुद्धा एकदा त्यांनीं आपलें वैशिष्टय दाखविलेंच! आतांशा पटेल हे खादीची टोपी किंवा कसलीच टोपी घालीत नसत. पण एकदा त्यांनीं अध्यक्ष असतांना खादीची साधी टोपी घालून काम चालविलें. त्यावर कित्येक परंपराप्रिय लोकांनीं आडून आक्षेप घेतले. व्हाइसरॉयांपर्यंत कुजबुज गेली! या कुजबुजी लोकांत अर्थातच सरकारी युरोपियन सभासदांचाच भरणा विशेष होता. पटेलांना हें समजतांच त्यांनीं खुद्द व्हाइसरॉयांना सांगितलें, कीं "अध्यक्षानें केसांचा टोप घातला पाहिजे असा नियम कुठें आहे? परंपरा चालत आली म्हणून तो कांहीं कायदा ठरत नाहीं. अर्थात् अशी परंपरा जर मोडली तर बेकायदेशीर कृत्य असें कांहींच घडत नाहीं." पण खादीची टोपी घालण्यांत पटेलांचा एवढाच उद्देश नसून दुसराहि एक महत्त्वाचा हेतु होता. मात्र तो त्यांनीं व्हाइसरॉयला बोलून न दाखवितां आपल्या स्नेह्यांना सांगितला. ते म्हणाले, "माझ्या पूर्वीच्या अध्यक्षांनीं वटहुकमाप्रमाणें गांधी टोपीची तुरुंगांत रवानगी करण्यास मान्यता

दिली होती. पण पूर्वी तुरुंगांत अध्यक्षांनीं घातलेली ती टोपी आतां खुद्द अध्यक्षाच्याच डोक्यावर येऊन बसली आहे, हा फरक मला लोकांना दाखवायचा होता; व म्हणून मी मुद्दाम एक दिवस गांधी टोपी घालून काम चालविलं!" पटेलांची ही कृति साधी पण चाणाक्ष लोकांच्या दृष्टीनें फार अर्थवाहक होती. अगदीं साध्या गोष्टींतसुद्धा अध्यक्षानें आपल्या पदाचा अधिकार विसरतां कामा नये या मताचे ते होते व त्याचप्रमाणें त्यांचें आचरण असे.

पटेल अध्यक्षाच्या खुर्चीवर बसल्यानंतर त्यांच्याविषयीं बऱ्याच सभासदांनीं गौरवपर भाषणें केलीं. व हें रीतीला धरूनच होतें. या स्तुतिवर्षावानंतर पटेलांनीं त्याला शांतपणें उत्तर दिलें. त्यांत ते म्हणाले, "मीं माझे डोळे उघडे ठेवून हीं अध्यक्षपदाचीं वस्त्रं धारण केलीं आहेत! या अधिकाराला आनुषंगिक जेवढ्या गोष्टी आहेत तेवढ्यांची मला पूर्ण जाणीव आहे. मी येथें हें पद घेण्यापूर्वी पूर्ण विचार केलेला होता व विचारांतीच मीं ठरविलं कीं या अधिकाराचा स्वीकार करून मी हिंदुस्थानची सेवा अधिक चांगली करूं शकेन. स्वराज्यपक्षाचे लोक विध्वंसक आहेत असं म्हणण्यांत येतं; पण आतां त्यांनीं विधायक कामगिरी करून दाखविण्याची वेळ आली आहे. आणि तसं करणं हें त्यांचं प्राप्त कर्तव्य आहे. व्हाइसरॉयसाहेबांनीं सहकार्याचा हात पुढें केला आहे आणि माझ्या पूर्वीच्या अध्यक्षांनींहि तदनुरूप वागणूक दाखविली. अर्थात् मीहि आतां सहकार्य करण्यास तयार आहें. विशेषतः या ठिकाणीं जे सरकारी सभासद बसले आहेत त्यांना माझं हेंच सांगणं आहे." पटेलांच्या या भाषणानें कांहीं कडव्या असहकारितावाद्यांना कसेंसेंच झालें असेल यांत नवल नाहीं. त्यांतल्या कांहींनीं आपल्या स्वभावानुसार तर्ककुतर्कांचीं जाळीं विणण्यास सुरुवात केली! त्यांतले कांहीं समंजस होते त्यांच्या विचारांना चालना मिळाली व ते शांतपणें नवीन परिस्थितीकडे पाहूं लागले, हा एवढा फरक एकदम कसा घडला याचें कित्येकांना राहून राहून आश्चर्य वाटलें. परंतु वास्तविक यांत आश्चर्यजनक असें कांहींच नव्हतें! कायदेभंग चौकशी कमिटीवर असतांना

पटेलांनीं आपलीं मतें मोकळेपणें जनतेला सांगितलीं होतीं व त्यानंतरहि वेळ-प्रसंगीं त्यांनीं आपलीं मतें कधींहि दडपून ठेवलीं नव्हतीं. निर्भयपणानें आपल्याला जें वाटतें तें त्यांनीं जाहीर सभांतूनहि सांगितलें होतें व त्याबद्दल त्यांना कॉंग्रेसमधील कांहीं एककल्ली लोकांचा रोषहि पत्करावा लागला होता. एवढेंच काय पण पटेलांच्या स्पष्टवक्तेपणाबद्दल पंडित मोतीलाल हेहि पटेलांवर रुष्ट असत. राजकारणांतील डावपेच हे कधीं ठराविक नसतात, ते समय पाहून बदलावे लागतात हें पटेलांच्या राजनीतीचें तत्त्व होतें व कोण-त्याहि व्यावहारिक राजकारणी मनुष्याला तें पटणारेंच होतें. आतां अध्यक्ष झाल्यावरहि त्यांनीं आपल्या मतांचा पुनरुच्चार केला व त्यामुळें यापुढें स्वराज्यपक्षाचें धोरण कसें राहील यांची सरकारला व जनतेला कल्पना आली. परंतु त्याबरोबर पटेलांनीं या वेळीं असेंहि सांगून टाकलें, कीं मी आतां कोणत्याहि पक्षाचा राहिलों नाहीं. मी आतां सर्व पक्षांना समान लेखणारा झालों आहें! व लगेच मला आतां तुम्ही स्वराज्यपक्षाच्या बंधनांतून मुक्त करणारा ठराव पास करा, असें त्यांनीं स्वराज्यपक्षाचे पुढारी पं. नेहरू यांना सांगितलें. त्या वेळीं कांहीं सभासदांची व इतरांचीहि अशी समजूत झालेली होती, कीं पटेल व व्हाइसरॉय यांनीं एव्हांपासूनच दोस्तीचीं बोलणीं सुरू केलीं होतीं व म्हणून पटेल पुष्कळदा व्हाइसरॉयांच्या भेटीला जात होते. पण या आक्षेपाला पटेलांनीं उत्तर दिलें, कीं मी व्हाइसरॉयाच्या भेटीला गेलों किंवा जाईन म्हणून मीं त्यांच्याशीं गट्टी केली आहे हा समज निराधार आहे. उलट माझें असं म्हणणं आहे, कीं माझं कर्तव्य करीत असतांना जरूर तर दिवसांतून दहा वेळां मी व्हाइसरॉयसाहेबांना भेटेन!" असो. याप्रमाणें आपलें अध्यक्षीय काम करण्याकरितां पटेलांनीं स्वराज्यपक्षांतून आपलें अंग काढून घेतलें व निःपक्षपाती न्यायाधीश या नात्यानें असेंब्लीचें व पर्यायानें देशाचें हित साधण्याची तयारी केली.

## पटेलांची चोखंदळ वृत्ति

अध्यक्ष झाल्यापासून पटेलांना फुरसत माहीत नव्हती, इतकें त्यांनीं आपल्या नवीन कार्याला वाहूत घेतलें होतें. व हें कार्य एका दृष्टीनें पूर्वीं पेक्षांहि कठीण होतें. पूर्वीं ते एका पक्षाचे असल्यानें त्यांना खाजगी रीतीनें

पक्षासंबंधीं सर्व कांहीं बोलण्याची मोकळीक होती. व प्रतिपक्षावरहि टीका करून त्यांच्यावर मात करण्याचें स्वातंत्र्य त्यांना होतें. अर्थात् हें काम अध्यक्षीय कामापेक्षां वेगळें असून सहजसुलभ होतें. पण आतां अध्यक्ष झाल्यानें पटेलांना पक्षातीत व्हावें लागलें, व केव्हांहि कुठेंहि त्यांना आतां जपून बोलणें भाग होतें. सर्वांशीं निःपक्षपाती वागणूक तर दिसली पाहिजे आणि इतकें करूनहि संपूर्णतेनें राष्ट्रकार्यच साधलें पाहिजे, ही राजकारणाच्या तारेवरील अवघड कसरत पटेलांना यापुढें खेळावी लागली. व एके काळीं ज्यांना भारतमंत्री मॉंटेग्यूसाहेबांनीं 'सर्वांत बोलके सभासद' असें म्हटलें त्या पटेलांना आतां दुसऱ्यांना बोलूं देऊन स्वतः मितभाषणी बनावें लागलें! हें लक्षांत येऊनच कीं काय, ते अध्यक्ष झाल्याबद्दल कित्येकांना मनांतून थोडें वाईटहि वाटलें. अर्थात् मत्सरानें किंवा वैषम्यानें नव्हे तर निराळ्या एका समजुतीनें. यासंबंधीं खालीं एका सभासदाचें म्हणणें उद्धृत करतों, म्हणजे ही समजूत कोणती तें स्पष्ट होईल. मद्रासचे ए. रंगास्वामी अय्यंगार यांनीं पटेलांना ते अध्यक्ष होण्याच्या आधीं एक पत्र लिहिलें होतें व त्यांत त्यांनीं पूर्वीचे एक प्रख्यात कायदे-कौन्सिलर श्री. कामिनीकुमार चंदा यांच्याकडून आलेल्या पत्राची नक्कल पटेलांना पाठविली होती. या पत्रांत श्री. चंदा यांनीं अय्यंगारांना असें लिहिलें, कीं "पटेलांचें नांव अध्यक्षपदाकरितां सुचवायचें ही गोष्ट खरोखरी निश्चित झाली आहे काय? त्यांना अध्यक्ष करून तुम्ही आपल्यांतला एक उत्तम कार्यकर्ता गमावणार आहांत असें होत नाहीं का? सभासद या नात्यानें ते जी देशसेवा करतील त्यांच्या तुलनेनें ते अध्यक्षाच्या खुर्चीवरून कितीसें कार्य करूं शकतील?" हें पत्र या ठिकाणीं उद्धृत केलें तें एवढ्यासाठीं, कीं त्यावरून पटेलांच्या योग्यतेची यथार्थ कल्पना व्हावी. पण या पत्रावरून अध्यक्ष या नात्यानें पटेलांना फारशी देशसेवा करतां आली नसती हा जो अर्थ निघतो तो मात्र परिणामावरून बरोबर वाटत नाहीं. कारण पटेलांनीं अध्यक्ष राहूनहि जी देशसेवा केली ती त्यांना इतकी भूषणास्पद झाली, कीं त्यामुळें त्यांच्या मूळच्या कीर्तींत अतिशय महत्त्वाची भरच पडली. असेंब्लींतील बहुसंख्य सभासदांना अध्यक्षाच्या जागेला पटेल हेच सर्वांत योग्य आहेत असें वाटतें व

म्हणून त्यांना अध्यक्ष करण्यांत आलें त्यात तर मुख्य उद्देश हाच होता, कीं पटेल हेच अध्यक्ष झाल्यानें खरें राष्ट्रीय तेज सरकारच्या बालेकिल्ल्यांत चमकेल; व असेंब्लीचें काम निःपक्षपातीपणानें पण खऱ्या राष्ट्रीय भूमिकेवरून चालेल. पटेलांच्या अध्यक्षपदानें राष्ट्राचें एवढें हित होणार होतें, व तें साधलेंहि; म्हणून वरील श्री. चंदाच्या पत्रातील मजकूर जरी सद्धेतुपूर्ण असला तरी फारसा अचूक निदान करणारा होता असें म्हणतां येत नाहीं. शिवाय पटेलासारख्या उद्योगी पुरुषानें अध्यक्ष होऊन स्वस्थ बसणें हें कधींच संभवनीय नव्हतें. अध्यक्ष झाल्यानंतर आपण किती कार्यमग्न आहोंत यासंबंधीं त्यांनीं आपले मुंबईचे मित्र श्री. महेश्वरी यांना ३०-१-१९२६ च्या एका पत्रांत दिल्लीहून लिहिलें, " या ठिकाणीं मला कामाचा बोजा इतका आहे, कीं त्यांत मी अगदीं गुरफटून गेलों आणि बिलकुल फुरसत मिळत नाहीं. सर्वांना पत्रें लिहिण्यासहि सवड होत नाहीं. तुम्हीच सर्वांना माझे नमस्कार सांगा." अगदीं किरकोळ गोष्टीपासून तों अत्यंत महत्त्वाच्या गोष्टीपर्यंत त्यांचें लक्ष असे. आपल्या अध्यक्षपदाला शक्य तितकें मानाचें स्थान मिळवून देण्याकरितां त्यांनीं ज्या अनेक गोष्टी केल्या त्यांपैकीं त्यांनीं आरंभालाच खुद्द पार्लमेंटच्या अध्यक्षाशीं पत्रव्यवहार सुरू केला ही एक गोष्ट नमूद केली पाहिजे. इंग्लंडचें पार्लमेंट हें जगांतील नमुनेदार पार्लमेंट समजलें जातें. त्याचा अध्यक्ष किंवा 'स्पीकर' याचा दर्जा इंग्लंडच्या राज्यघटनेंत मोठा व विशिष्ट मानाचा असा आहे. तेव्हां या स्पीकरच्या कामाची पद्धति कशी आहे ती समजणें पटेलांना अवश्य वाटलें. त्यांनीं प्रथम स्पीकरला ९ डिसेंबर १९२५ रोजीं एक पत्र लिहिलें व त्यांत सभासदांनीं आक्षेपार्ह असे कोणते शब्दप्रयोग किंवा शब्दसमुच्चय पार्लमेंटमध्यें वापरूं नयेत व तसे वापरल्यास त्यांना काय शासन होतें याबद्दल त्यांनीं स्पीकरला विचारणा केली. त्यावर स्पीकर मि. व्हिटले यांनीं स्वतःच्या हातानें एक पत्र लिहून पटेलांना उत्तर दिलें. हें पत्र तारीख ७ जानेवारी १९२६ चें आहे. त्यांत मि. व्हिटले लिहितात, " खरें म्हटलें तर पार्लमेंटांत वापरूं नयेत अशा शब्दांची यादी आमच्या जवळ नाहीं. आमचें मार्गदर्शकतत्त्व असें आहे, कीं कोणत्याहि सभासदानें दुसऱ्या कोणत्याहि

सभासदाच्या वैयक्तिक मानाला धक्का लावतां कामा नये. म्हणून कोणताहि विशिष्ट शब्द कसा व कोण या हेतूनें वापरला हें पाहिलें पाहिजे. तोच शब्द-प्रयोग कधीं आक्षेपार्ह असेल, व कधीं नसेल. दुसऱ्यानें आपल्याशीं सभ्य-तेचें वर्तन ठेवावें असें प्रत्येक सभासदाला वाटतें, तसेंच सभ्यपणाचें वर्तन त्यानें दुसऱ्याशीं ठेवलें पाहिजे. म्हणून त्या त्या वेळेच्या परिस्थितीला अनु-सरून त्या त्या शब्दांकडे पाहिलें पाहिजे. मात्र कोणतीहि तक्रार येण्यापूर्वी किंवा रागाच्या भरांत भलतेंच कांहीं तरी होण्यापूर्वी अध्यक्षानें अनिष्ट शब्दप्रयोगांना वेळींच बंधन घालण्याचा प्रयत्न केला पाहिजे. आपण अध्यक्षपदावर निवडून आल्याबद्दल मी आपलें मनःपूर्वक अभिनंदन करतों. आणि आपल्या अधिकाराची कारकीर्द सुखाची व यशस्वी होवो असें मी मनोभावानें इच्छितों." अगदीं प्राथमिक स्वरूपाच्या गोष्टींतहि पटेलांनीं किती दक्षता ठेवली होती याचें हें एक नमुनेदार उदाहरण आहे व म्हणूनच त्याचा खुलासेवार उल्लेख केला आहे. असो.

## स्वराज्य पक्षानें वॉक-आऊट केला तेव्हां

पटेलांची ही पहिली अध्यक्षपदाची कारकीर्द अल्पकाल म्हणजे सुमारें एक वर्षभरच होती. तेवढ्या अवकाशांत एक विशेष गोष्ट घडून आली व ती म्हणजे ८ मार्च १९२६ रोजीं स्वराज्यपक्षाच्या सर्व सभासदांनीं कौन्सि-लांतून केलेला वॉक-आउट—सभागृहांतूननिष्क्रमण—ही होय. तारीख ५ मार्च रोजीं झालेल्या वर्किंग कमिटीच्या आज्ञेनुसार स्वराज्यपक्षाचे पुढारी पंडित मोतीलाल यांनीं जाहीर केलें, कीं असेंब्लीच्या बैठकींत अंदाजपत्रक मताकरितां पुढें मांडण्यांत येईल, त्या वेळीं आपण व आपले अनुयायी त्यावर मतें देणार नाहींत; व अंदाजपत्रकाच्या निषेधार्थ आपण आपल्या सर्व अनुयायांसह बाहेर निघून जाऊं. तेव्हां ही गोष्ट ऑल इंडिया कॉंग्रेस कमिटीमार्फत नेहरूंनीं जाहीर केल्यानंतर सभासद ८ मार्च रोजीं असेंब्लीतून कसे बाहेर पडतात हें पाहाण्याकरितां असेंब्लीच्या प्रेक्षकांच्या गॅलरींत खूप गर्दी जमली. ऑल इंडिया कॉंग्रेस कमिटीची बैठक आदल्या दिवशीच आटोपली होती. तरी पण असेंब्लीच्या बैठकीकरितां ४०-५० सभासद मुद्दाम दिल्लींत राहिले. किंबहुना अध्यक्ष पटेल यांनींच त्यांना

आग्रहानें ठेवून घेतलें होतें. कारण त्यांची सभागृहांत बसण्याची मुद्दाम व्यवस्था केली असल्याचें आगाऊ एक दोन दिवस पटेलांनीं जाहीर केलें होतें. असो. ८ मार्चला अकरा वाजतां असेंब्लीची बैठक सुरू होणार होती. पण गॅलरींत दहा वाजल्यापासून प्रेक्षकांची गर्दी झाली. वेळ होतांच पंडित मोतीलाल नेहरू आपल्या भाषणांत म्हणाले, "गेलीं दोन अडीच वर्षें स्वराज्यपक्षानें सरकारशीं सहकारिता केली व सुधारणा राबविण्यांत सरकारला मदत केली. परंतु आम्हीं सहकार्याकरितां पुढें केलेला हात सरकारनें झिडकारला व आम्हांला अपमानानें वागवलं. या सभेनें बहुमतानें पास केलेलीं बिलं सरकारनें बेजबाबदारपणें फेटाळून लावलीं व ज्यांना बेकायदा कायदे म्हणतां येतील असे स्वतःला वाटतील असे कायदे शिक्केबाजीच्या जोरावर पास करून घेतले. वटहुकूम काढून सरकारनें हिंदमातेचे थोर थोर सुपुत्र तुरुंगांत चौकशीविना डांबून ठेवले. यापुढें अशा गोष्टी आम्ही सहन करून घेणार नाहीं. मी तूर्त एवढा इशारा देऊन ठेवतों, कीं तुम्ही जर यापुढें खबरदारी बाळगली नाहीं तर साऱ्या देशभर मधाच्या पोळ्याप्रमाणें गुप्त मंडळं स्थापन होतील!" याप्रमाणें भाषण केल्यानंतर पंडित मोतीलाल आपल्या पक्षाच्या सर्व सभासदांसह असेंब्ली-हॉलमधून बाहेर पडले! पण काय? असेंब्लीच्या बालेकिल्ल्यांत शिरलेली, पूर्वी स्वराज्यपक्षाचा सभासद असलेली पण आता पक्षातीत म्हणविणारी एक व्यक्ति तशीच खुर्चीवर बसून होती! पटेल कांहीं नेहरूंबरोबर गेले नाहींत! पण त्यांनींहि बाहेर पडलं पाहिजे याकरितां कांहीं दुराराध्य व उपद्व्यापी लोकांनीं केवढा अट्टाहास व प्रसंगीं धाकदपटशाहि पटेलांना दाखविला होता! कारण काय, तर पटेल हे स्वराज्य पक्षाच्या तिकिटावर असेंब्लींत निवडून आले व पुढें स्वराज्यपक्षाच्या आश्रयानें अध्यक्षहि झाले. तेव्हां कॉंग्रेसच्या आज्ञेनुसार स्वराज्यपक्षानें जी असेंब्लींतून बाहेर जाण्याची कृति केली तिचें अनुकरण पटेलांनीं करायला पाहिजे होतें! आहे कीं नाहीं तर्कशास्त्र? पण पटेलांना, देशबंधु दास म्हणाले त्याप्रमाणें, तर्कशास्त्रापेक्षां जीवितांतील प्रत्यक्ष घडामोडीचें महत्त्व खरोखरीच अधिक वाटत होतें. पटेलांनीं अध्यक्षाची खुर्ची सोडली असती, म्हणजे पर्यायानें राजीनामा

दिला असता, तर राष्ट्रहिताच्या दृष्टीनें ती गोष्ट अनिष्ट अशीच झाली असती. कारण एक तर वाईट पायंडा पडला असता. वास्तविक अध्यक्ष हा जर पक्षातीत असला पाहिजे तर त्यानें एका विशिष्ट पक्षाच्या शिस्तीप्रमाणें वागलें पाहिजे हें बंधन त्याच्यावर राहात नाहीं. अर्थात् पटेल हे अध्यक्ष होतांच स्वराज्यपक्षाच्या शिस्तीच्या पलीकडे गेल्यामुळें त्यांनीं राजीनामा देण्याची आवश्यकता नव्हती. दुसरें असें, कीं अध्यक्ष जो निवडायचा त्याला बहुतेक सर्व पक्षांचें पाठबळ असणें इष्ट असतें. परंतु एका विशिष्ट पक्षाच्या शिस्तीनें अध्यक्ष बांधला गेला आहे असें इतर पक्षांना समजलें तर त्यांचीं मतें पुढें मिळणें संभवनीय राहिलें नसतें. शिवाय अध्यक्षाच्या निवडणुकीला व्हाइसरॉयाची मंजुरी लागते. पण पक्षातीत नसलेल्या अध्यक्षाच्या निवडणुकीला अशी मंजुरी मिळणें अशक्य झालें असतें. एकंदरींत पटेलांनीं राजीनामा दिला असता तर राष्ट्रीयपक्षाच्या हातचें अध्यक्षपद कायमचें गेलें असतें! तेव्हां या सर्व गोष्टींचा विचार केला तर पटेलांनीं या वेळेला खंबीरपणा दाखवला व अध्यक्षपद सोडलें नाहीं तेंच राष्ट्रहिताच्या दृष्टीनें योग्य केलें असें म्हटलें पाहिजे. या वॉक-ऑऊटच्या प्रकारानंतर पटेलांनीं महात्मा गांधींना कळविलें, कीं "मी स्वराज्यपक्षाच्या सभासदांबरोबर बाहेर गेलों नाहीं याचा पंडितजींना राग आला हें मला माहीत आहे. पण कोणाचें करणें बरोबर होतें अगर चुकीचें होतें हें काळच सर्वांना दाखवील." यावरून आपलें धोरणच योग्य होतें याची पटेलांना कशी पुरेपूर खात्री होती हें कळून येतें. असो.

स्वराज्यपक्षाचे सारे सभासद वर लिहिल्याप्रमाणें बाहेर पडल्यानंतर अध्यक्ष पटेलांनीं त्या दिवसाची बैठक तहकूब केली. त्या वेळीं ते म्हणाले, "असेंब्लींत बहुमत असणारा पक्ष ज्या कारणांनीं बाहेर निघून गेला त्याबद्दल आम्हांला फार दिलगिरी वाटते. आतां हा पक्ष बाहेर गेल्यामुळें या असेंब्लीचें प्रातिनिधिक स्वरूप कायद्याप्रमाणें नष्ट झालें आहे. असेंब्लीचें काम पुढें चालवितां येईल कीं नाहीं हा सरकारनें विचार करण्यासारखा मुद्दा आहे. अशा स्थितींत या वेळीं माझा सरकारला असा सल्ला आहे, कीं त्यांनीं या वेळीं वादग्रस्त असणारा अंदाजपत्रकासारखा विषय असेंब्लींत मांडूं नये.

पण सरकारनें हा सल्ला ऐकला नाहीं आणि लोकहिताला बाध येईल अशी वागणूक केली तर मला आपल्या हातांतील जादा अधिकारान्वयें असेंब्लीची बैठक तहकूब ठेवावी लागेल. तेव्हां मला अशी आशा व विश्वास वाटतो, कीं अध्यक्षाला इतकें करण्याची पाळी येऊं नये असें यापुढें सरकारनें वागावें. सध्या मी ही बैठक उद्यां सकाळपर्यंत तहकूब करतों."

पटेलांचें हें कृत्य त्यांच्या निःपक्षपाती अध्यक्षपदाला विसंगत होतें, पटेलांनीं बैठक तहकूब करण्यांत पक्षाभिनिवेश दाखविला अशी सरकारी सभासदांनीं त्यांच्यावर टीका केली. ही कुजबुज अर्थातच पटेलांच्या कानीं गेली. म्हणून दुसऱ्या दिवशींच्या बैठकींत पटेल म्हणाले, "माझं कालचं भाषण कांहीं सरकारी सभासदांना रुचलं नाहींसं दिसतं. पण त्यांना वाईट वाटावं असं बोलण्याचा माझा उद्देश कधींहि नव्हता. मीं एवढंच स्पष्टपणें सांगितलं, कीं बहुसंख्य पक्षाच्या गैरहजिरींत सरकारनें वादग्रस्त विषयांची चर्चा असेंब्लींत करूं नये. मात्र अध्यक्ष या नात्यानें मीं आपल्या अधिकारांचा जो निर्देश केला तो करायचा नव्हता. तसेंच सरकारला धमकीसारखी वाटणारी जी भाषा मीं वापरली तीहि अध्यक्ष या नात्यानें मीं वापरायला नको होती. या सर्व गोष्टी मला आतां विचाराअंतीं कळून आल्या आहेत. मीं आपले कालचे विचार प्रकट करण्यापूर्वीं पुढच्या घडामोडी काय होतात याची वाट पाहायला हवी होती." पटेलांच्या या भाषणानें सरकारला हायसें वाटलें! उलट पटेलांचें हें भाषण म्हणजे माफी होती असेंहि कित्येकांना वाटलें! पण माफी असें म्हटलें तरी ती जर विशिष्ट धोरणानें व चांगल्या कारणाकरितां केली असेल तर त्यांत बिघडलें कुठें? वास्तविक तिला माफी म्हणतां येत नाहीं. फक्त आपण जें भाषण केलें तें करण्यांत थोडी घाई केली; नाहींतर तें भाषण योग्य होतें असाच पटेलांच्या बोलण्याचा आशय होता. हा एक आरंभींचा प्रसंग सोडला तर यापुढें पटेलांनीं सर्व गोष्टी धिमेपणानेंच निश्चित केल्या व म्हणून त्यांची अध्यक्षपदाची कारकीर्दहि यशस्वी ठरली.

## पगारांतून राष्ट्रकार्याला मदत

पटेलांच्या अध्यक्षपदाच्या पहिल्या कारकीर्दींतील आणखी एक गोष्ट उल्लेखनीय आहे व ती म्हणजे त्यांनीं आपल्या पगारांतील जवळ जवळ निम्मी रक्कम दरमहा राष्ट्रकार्याकरितां देऊं केली ही होय. या रकमेचा विनियोग करण्याचें काम त्यानीं महात्मा गांधींकडे सोंपविलें. पटेल अध्यक्ष झाले होते तरी ते कधीं थाटामाटांत राहिले नाहींत. त्यांच्या राहणीसंबंधीं पुढें लवकरच सांगू. परंतु तूर्त एवढें सांगितलें म्हणजे पुरे, कीं ते थाटांत व ऐषआरामात राहिले असते तर त्यांना कोणींहि नावें ठेविलीं नसतीं. एवढेंच नव्हे तर तसें राहाणें हें त्यांच्या दर्जाला योग्यच आहे असेंच सामान्यतः कोणीं म्हटलें असतें. पण पटेलांचें तसें नव्हतें. इतकेंच काय पण त्यांचा कमालीचा साधेपणा पाहून युरोपियन अधिकाऱ्यांना व त्यांच्या सहकाऱ्यांनाहि थोडेसें चमत्कारिक वाटे. पण " वेष असावा बावळा, अंतरीं असाव्या नाना कळा " या श्रीसमर्थांच्या उक्तीप्रमाणें पटेलांचें वर्तन होतें. असो. पटेलानीं स्वतःला लागेल तेवढाच पगाराचा हिस्सा ठेवून बाकीची पगाराची रक्कम त्यांनीं महात्मा गांधींच्या स्वाधीन करण्यास सुरवात केली. यासंबंधीं तारीख १० मे १९२६ च्या पत्रांत त्यांनीं महात्मा गांधींना लिहिलें :

" प्रिय महात्माजी,

जेव्हां मीं अध्यक्षपद स्वीकारलें तेव्हां मीं मनाशीं असा निश्चय केला, कीं माझ्या पगारांतून कांहीं रकमेचा विनियोग राष्ट्रकार्याकडे करावा. पहिल्या सहा महिन्यांत कित्येक कारणांमुळें मला अशी रक्कम शिल्लक टाकतां आली नाहीं. परतु आतां सांगण्यांत मला आनंद वाटतो, कीं गेल्या महिन्यापासून मी अडचणींतून मोकळा झालों आहें आणि बरीचशी रक्कम शिल्लक टाकतां येईल असं मला आतां वाटतं. आतां गेल्या महिन्यास सुरवात करून मी दरमहा १६२५ रुपये आपणांकडे पाठवीत जाईन. त्यांचा विनियोग तुमच्या पसंतीस येईल त्याप्रमाणें करावा. अर्थात् हे पैसे कोणत्या बाबतींत खर्च करावे याबद्दल मलाहि कांहीं कल्पना आहेच व त्याबद्दल मीं आपणांशीं बोलेनहि. पण तुमचें माझ्या मताशीं जमो अगर न जमो, रमकेची व्यवस्था तुमच्याकडे राहाणार आहे.

सोबत एप्रिल महिन्याचा १६२५ रुपयांचा चेक पाठविला आहे.

ही जबाबदारी तुम्ही पत्करण्याचें नाकबूल करणार नाहीं असा मला विश्वास आहे.

आपला स्नेहांकित

**विठ्ठलभाई पटेल"**

पटेलांनीं अशा प्रकारें आपल्या पगाराची व्यवस्था न लावतां आपल्या पगारांतील अर्धी रक्कम स्वराज्य पार्टीच्या फंडाकडे द्यावी असें पटेलांना सुचविण्यांत आलें होतें. परंतु या सूचनेला पटेलांनीं विरोध केला व त्याप्रमाणें त्यांनीं गांधींना कळविलेंहि. त्यांचें म्हणणें असें, कीं असेंब्लीचा अध्यक्ष या नात्यानें एकाद्या विशिष्ट पक्षाच्या फंडांत पगाराची रक्कम मिळाविणें ही गोष्ट उचित नव्हती. कारण अध्यक्ष हा सर्व पक्षांचा प्रतिनिधि असतो. व म्हणून पगारांतून दिलेल्या रकमेचा उपयोग कसा करावा हे ठरविण्याचें काम त्यांनीं स्वराज्यपक्षाकडे न सोंपवितां स्वतंत्र रीतीनें गांधींकडे सोंपविलें. वर त्याचाच उल्लेख वरील पत्रांत आला आहे. त्याला लिहिलेल्या जुलै महिन्याच्या उत्तरांत गांधीजींनीं साबरमतीच्या आश्रमांतून खालीलप्रमाणें लिहिलें :

" प्रिय विठ्ठलभाई,

तुमचेकडून चेक आले ते मिळाले. माझ्या पसंतीस येईल अशा एकाद्या राष्ट्रहिताच्या कामीं ही रक्कम खर्च करावी असें तुम्ही म्हणालांत व तुम्हीं दिलेल्या या मोठ्या देणगीबद्दल तुमचें आमचें बोलणेंहि झालें. परंतु अद्यापि मीं कांहीं ठरविलें नाहीं. तोंपर्यंत ती रक्कम तशीच सहा महिनेपर्यंत साचू द्यावी असें वाटलें म्हणून त्याप्रमाणें करीत आहे. हेतु हा, कीं त्या रकमेवर चांगलें व्याजहि सुटावें. एकदा ही पक्षाचीं भांडणें मिटलीं म्हणजे कांहीं मित्रांच्या विचारानें व तुमच्या सल्ल्यानें कांहीं स्तुत्य अशा राष्ट्रीय कार्याकडे त्या रकमेचा विनियोग करूं. तुम्हीं आपल्या पगारांतली एवढी मोठी रक्कम देणगीरूपानें राष्ट्राकरितां दिलीत या तुमच्या उदारबुद्धीबद्दल मी तुमचे आभार मानतों. मला अशी आशा आहे, कीं तुमच्या उदाहरणाचें इतरांकडून अनुकरण केलें जाईल.

आपला स्नेहांकित

**सही:—मो. क. गांधी"**

## स्वदेशीव्रत आणि विनोदबुद्धि

आणि खरोखरी पटेलांची ही दातृत्वबुद्धि त्यांच्यासारख्या अधिकारारूढ झालेल्या देशभक्तास साजेशीच होती. स्वदेशीच्या बाबतींतहि पटेलांची वागणूक अनुकरणीय होती. तसें म्हटलें तर पटेलांचें सार्वजनिक जीवन व खाजगी जीवन हें एकच झालें होतें. राजकारण काय किंवा समाजकारण काय, त्यांत बोकाळणाऱ्या दांभिकतेमुळें दोहोंचीहि कशी पिछेहाट होते हें आतां चांगलें सिद्ध झालें आहे. बाहेर खादी व घरांत विलायती धोतरें असा दांभिकपणा पटेलांना मुळींच पसंत नव्हता. व म्हणून पोशाकाच्या बाबतींतहि त्यांनीं घरींदारीं व अध्यक्षपद आल्यावरहि स्वदेशी व्रत कायम ठेवलें.

पण हेंहि या ठिकाणीं सांगितलें पाहिजे, कीं स्वदेशी व्रताचें पालन करतांना देखील त्यांची विनोदबुद्धि पुष्कळदा प्रकट होत असे. मात्र हा विनोद भरीव व प्रतिपक्षाला बोचणारा, झोंबणारा असाच बहुधा असायचा. अध्यक्ष असतांना एकदा ते गांधी टोपी घालून आले होते हें वर सांगितलेंच. प्रथमदर्शनीं सभासदांना हसूं येण्यासारखी त्यांची ही कृति होती. पण त्यांतहि गर्भितार्थ कसा होता हें आपणांस समजलें. त्यांच्या विनोदप्रियतेचें आणखी एक उदाहरण येथें देतों. पटेल हे विलायतेला गेल्यापासून कडक शाकाहारी राहिले नव्हते. मुंबईजवळ वांद्रयाला टाटा ब्लॉकमध्यें ते एकटेच एकाद्या आश्रमवासीयांप्रमाणें राहात. कारण, ना बायको ना मूलबाळ. घरचा सारा संसार त्यांनीं धाकटे बंधु वल्लभभाई यांच्यावर सोंपविला होता व आपण राष्ट्राचा संसार चालविला होता. घरीं जेवण करून घालायला फक्त एक ब्राह्मणेतर आचारी त्यांच्या सोबतीला होता. पटेलांचे परमस्नेही मांजी चीफ प्रेसिडेन्सी मॅजिस्ट्रेट बॅरिस्टर खंडाळावाला यांनीं आम्हांला पटेलांच्या या एकांतवासी गृहजीवनाची करुणरसपूर्ण हकीगत सांगितली. तेव्हां बॅरिस्टरसाहेबांच्या डोळ्यांतून अश्रू वाहूं लागले! असो. मुख्य मुद्दयाकडे वळूं. घरीं आतांशा पटेल बहुधा विलायती पद्धतीप्रमाणें टेबलावर अन्न मांडून जेवीत. पण असेंब्लीचे अध्यक्ष झाल्यापासून त्यांनीं दिल्ली सिमल्याला हें सर्व बदलून टाकलें! त्यांचे मुंबईचे स्नेही श्री. महेश्वरी यांच्याकडून त्यांनीं स्वयंपाकाकरितां माणेलाल नांवाचा एक गुजराथी ब्राह्मण आचारी तिकडे

नेला. व तिकडे दिल्ली सिमल्याला ते जमिनीवरच पाट मांडून किंवा चटई पसरून जेवण करीत. जेवणाच्या वेळीं पूर्वीच्या खुर्ची--टेबलांना रजा दिली. शिवाय त्यांनीं आतां पूर्ण शाकाहारच सुरू केला. त्यांच्यांतील हा बदल पाहून त्यांच्या असेंब्लींतील मित्रमंडळींना थोडेसें आश्चर्य वाटलें. पण पटेलांच्या स्वभावाचा त्यांना परिचय असल्यामुळें या घरगुती गोष्टींकडे तेहि कांहींसे विनोदानें पाहात. ते पटेलांना थट्टेनें म्हणत ! " हें पाहा, तुम्ही अध्यक्षाच्या खुर्चीवर धोतर नेसून बसतां, कधीं टोपाऐवजीं गांधीटोपी घालतां, घरीं पाटावर जमिनीवर पान मांडून जेवयाला बसतां; कडक शाकाहार पाळतां; पण या तुमच्या कृत्यांमुळें तुम्हांला युरोपियन अधिकारी जवळ करीत नाहींत. पार्ट्यांना बोलवीत नाहींत. " तेव्हां पटेल उत्तर देत, " युरोपियन अधिकारी मला जवळ करीत नाहींत पण तेच माझ्याकडे येतात त्याला मी काय करूं ! कामाशिवाय उगाच चहापार्ट्यांना कोणाकडे जाणं मला आवडत नाहीं. युरोपियन लोकांशीं मी माझ्या कामापुरताच संबंध ठेवतों. शिवाय असं पाहा, कीं असेंब्लीचा अध्यक्ष म्हणजे विलायत सरकारनें पाठविलेला दूत नव्हे कीं म्हणून त्यानें विलायती पोशाक घालावा आणि घरींदारीं विलायती थाटाचीं जेवणं करावीं आणि विलायती राहाणी ठेवावी. आणि त्या लोकांबरोबर निष्कारण मिसळून राहावं. हिंदुस्थानच्या असेंब्लीचा अध्यक्ष हा हिंदी लोकांचा एक प्रतिनिधि—एक सेवक आहे. तो कांहीं विलायत सरकारचा सेवक नव्हे. हिंदी लोकांच्या चालीरीती या प्रतिनिधीनें पाळल्या पाहिजेत. आणि तसा तो, अध्यक्ष झाल्यावर कां होईना, पाळतो हें दाखविण्याकरितां मी असें वागतों." म्हणजे पटेलांच्या वर्तनांतली तारतम्यबुद्धि ही अशी होती.

असेंब्लीच्या अधिवेशनाची मुदत नोव्हेंबर १९२६मध्यें संपल्यामुळें पटेलांच्या अध्यक्षपदाची पहिली कारकीर्दहि याच वेळीं आपोआप संपली. या वेळच्या शेवटच्या असेंब्लीच्या बैठकींत पटेलांच्या गुणगौरवपर अशीं भाषणें युरोपियन सभासदांनीं केलीं व असेंब्लीच्या नव्या अधिवेशनाच्या वेळीं आपण पटेलांनाच अध्यक्षपदाकरितां मतें देऊं असें युरोपियन गटातर्फे सर वॉल्टर विल्सन यांनीं सांगितलें. पण युरोपियन सभासदांच्या स्तुतिवर्षावाला

पटेल भाळून जाणारे नव्हते. पटेलांनीं युरोपियन सभासदांचें अभिनंदन करून सांगितलें, कीं "मी जो या अध्यक्षपदावर आलों त्यांत ब्रिटिशसरकारला असं सिध्द करून देण्याकरितां आलों कीं तुम्हीं हिंदी लोकांना जबाबदारीच्या जागा देत नाहीं आणि वर त्यांना बेजबाबदार व विध्वंसक टीकाकार म्हणतां; तरी हें योग्य नाहीं. तुम्ही हें राज्ययंत्र त्यांच्या स्वधीन कराल तेव्हांच ते जबाबदारीला लायक होतील."

याप्रमाणें पटेलांची ही पहिली अध्यक्षीय कारकीर्द फार थोडया मुदतीची म्हणजे सुमारें एक वर्षभरच झाली. तरी तो त्यांच्या वैभवाच्या शिखरावरील पहिला टप्पा होता.

---

## दुसरा टप्पा


१९२६ च्या नोव्हेंबरांत असेंब्ली बरखास्त झाल्यावर पुन्हा निवडणुकी झाल्या. या वेळीं पटेल निवडणुकीला उभे राहिले ते कॉंग्रेसतर्फे न राहातां स्वतंत्र उमेदवार म्हणून उभे राहिले व त्याला विशेष कारणहि होतें. १९२६ च्या मार्चमध्यें जेव्हां स्वराज्यपक्षानें असेंब्लीच्या सभागृहांतून निर्गमन केलें तेव्हां पटेलानींहि त्याचें अनुकरण करावें अशी काहीं सभासदांची इच्छा होती हें आपण पूर्वी पाहिलेंच आहे. पण पटेलांनीं तसें करण्याचें नाकारल्यामुळें त्यांच्याविषयीं गैरसमज झाला. वास्तविक हा गैरसमज अगदीं निराधार होता हें मागेंच सांगितलें आहे. कारण अध्यक्ष म्हटला, कीं त्याला विशिष्ट पक्षाचीं बधनें असतां कामा नयेत. पण हटवादी लोकांना त्याचें काय? तेव्हां असल्या दुराराध्य लोकांच्याहि गैरसमजाला मुळींच जागा राहूं नये आणि पुन्हा शक्य झाल्यास अध्यक्ष होतां यावें या हेतूनें पटेल स्वतंत्र उमेदवार म्हणून निवडणुकीला गुजराथतर्फे उभे राहिले व बिनविरोध निवडून आले.

या ठिकाणीं थोडा मागचा संदर्भ दिल्यास पटेलांना स्वतंत्र म्हणून जें उभे राहावें लागलें त्याचीं कारणें मागेंपर्यंत कशीं गेलीं होतीं तें समजेल. मार्चमध्यें स्वराज्यपक्षानें वॉक-आउट केला व जुलैमध्यें पटेलानीं पगारांतल्या देणगीविषयीं महात्मा गांधींना पत्र लिहिलें. त्या पत्रांत यासंबंधीं पटेलांचे हेतू स्पष्ट दिसून येतात. त्यांत ते म्हणतात, कीं असेंब्ली बरखास्त झाल्यावर आपण पुन्हा निवडणुकीला उभे राहाणार आहों व ब्रिटिश पार्लमेंटच्या अध्यक्षाप्रमाणें आपणाहि पुन्हा अध्यक्ष होऊन पार्लमेंटसारखी वहिवाट पाडावी अशी इच्छा आपण धरीत आहों. म्हणजे प्रत्यक्ष पुन्हा निवडणूक होण्यापूर्वी पांचसहा महिने पटेलांचें धोरण ठरूनच गेलें होतें.

असेंब्लीचे सभासद म्हणून पटेल जसे बिनविरोध निवडून आले, त्याचप्रमाणें असेंब्लीच्या अध्यक्षपदाकरितां म्हणूनहि या वेळीं त्यांना कोणी प्रतिस्पर्धी उभा राहिला नाहीं व त्यांची त्या पदावर १९२७ सालच्या आरंभाला बिनविरोध निवडणूक झाली. त्या वेळीं पटेल म्हणाले, " माझ्या गेल्या वर्षाच्या लहानशा अनुभवावरून मी सांगूं शकतों, कीं अध्यक्षपद जर यशस्वी करायचें असेल तर त्यानें पक्षोपपक्षापेक्षां असेंब्लीच्या हिताकडेच अधिक लक्ष दिलें पाहिजे. याचा अर्थ असा नाहीं, कीं ज्यानें ज्यानें अध्यक्ष व्हावें त्यानें त्यानें आपलीं मतं टाकून द्यावीं. प्रत्येकाला त्याचें स्वतःचें मत असतेंच आणि तें त्यानें टाकून देतां कामा नये. मात्र त्यानें दिलेल्या निर्णयांत कोणत्याहि प्रकारचा दोष असतां कामा नये. अर्थात् या ध्येयाप्रमाणें मी कितपत वागलों किंवा यापुढें मला कितपत वागतां येईल हें कांहीं मी सांगूं शकत नाहीं. परंतु एवढें मात्र आश्वासन मला देतां येतें, कीं त्याप्रमाणें वागण्याचा मी शक्य तितका प्रयत्न करीन." असेंब्लीचें अध्यक्षपद याप्रमाणें दुसऱ्यांदा स्वीकारल्यानंतर लवकरच पटेलांना वाटूं लागलें कीं, इंग्लंडमध्यें व आयर्लंडमध्यें पार्लमेंटांतील कामकाज कसें चालतें तें आपण पाहावें, व त्यांचा पूर्ण अभ्यास व निरीक्षण करून परत हिंदुस्थानांत यावें; असेंब्लीचें कामकाज चालविण्याच्या बाबतींत या अनुभवाचा आपणांस पुष्कळच उपयोग होईल. याप्रमाणें निश्चय करून पटेल या वेळीं म्हणजे एप्रिल १९२७ विलायतेमध्यें गेले. त्यांचा मुक्काम लंडनमधील नॅशनल

लिबरल क्लबांत होता. इंग्लंडमध्यें असतांना बहुतेक दररोज तीन प्रहरीं पार्लमेंटच्या ‘ प्रसिद्ध पाहुण्यांच्या गॅलरींत ’ जाऊन ते तेथील कामकाज पाहात. असा त्यांचा क्रम १ महिन्यापेक्षां अधिक काळ चालू होता. तेथें असतांना कित्येक पार्ट्या, उपाहार इत्यादिकांचीं त्यांना निमंत्रणें येत. कित्येक संस्था व सद्गृहस्थ, लॉर्ड यांनींहि त्यांना निमंत्रणें केलीं. संस्थापैकीं इंडियन सोशल क्लब, रॉयल एअर फोर्स, रॉयल इन्स्टिट्यूट ऑफ इंटरनॅशनल अफेअर्स, साऊथ केन्सिंग्टनची नॅशनल इंडियन असोसिएशन, ऑक्सफर्ड व केंब्रिज येथील इंडियन स्टूडन्टस्मजालिस या प्रमुख संस्था होत्या. सद्गृहस्थापैकीं अँग्लो इंडियन टेंपरन्स असोसिएशनचे फ्रेडरिक ग्रब, लॉर्ड विंटरटन, जे. एम्. पारिख, मजूरपक्षाचे पुढारी जॉर्ज लॅन्सबरी—हे हिंदुस्थानविषयक ब्रिटिश कमिटीचे चेअरमन होते—तसेंच या कमिटीचे सेक्रेटरी मेजर डी. ग्रॅहम पोल, हुजूरपक्षाचे सभासद लॉर्ड हार्टिंग्डन, इत्यादि सद्गृहस्थ होते. शिवाय हाऊस ऑफ कॉमन्स व हाउस ऑफ लॉर्डस् यांत त्यांचा प्रवेश झाला व कॉमन्स सभेचे अध्यक्ष मि. जे. एच. व्हिटले यांनीं त्यांना पार्लमेंटचें कामकाज समजून घेण्याच्या कामीं पुष्कळ साहाय्य केलें. कॉमनवेल्थ ऑफ इंडिया लीगचे एस्. एल्. पोलाक यांनीं त्यांचा थाटाचा सत्कार केला. हाउस ऑफ लॉर्डस्मध्येंहि त्यांचा मोठा सत्कार होऊन त्या सभागृहाच्या गच्चीवर लॉर्ड मीथ यांनीं त्यांना पार्टी दिली. त्याच दिवशीं म्हणजे २५ मे १९२७ रोजीं सकाळीं पावणे अकरा वाजतां राजेसाहेब पांचवे जॉर्ज यांनींहि त्यांचें स्वागत करून त्यांना मुलाखत दिली. त्यांनीं त्या वेळीं बादशहांना व लॉर्ड बर्कनहेड यांना स्पष्ट सांगितलें, कीं “ तुम्ही हिंदुस्थानला ताबडतोब पूर्ण जबाबदारीचें स्वराज्य दिल्याशिवाय परिस्थिति निवळणार नाहीं व हिंदुस्थान व ब्रिटन या देशांत सलोखा राहाणार नाहीं. ” त्यावर हिंदुस्थान हें स्वसंरक्षण करण्यास असमर्थ आहे असें पटेलांना सांगण्यांत आलें. तेव्हां पटेल म्हणाले, “ जेथें इच्छा आहे तेथें मार्ग सांपडतो. मी आपणांस बजावतों कीं हिंदुस्थानसंबंधीं कॉंग्रेसला समाधानकारक होईल असा निर्णय तुम्ही जर न कराल तर १९२१ च्या चळवळीची मोटी आवृत्ति १९३०मध्यें होईल. ” कित्येक हिंदी क्लबांतून व इतर संस्थांतूनहि

अमेरिकेस जातांना



श्री. विठ्ठलभाई पटेल



लडनच्या परिषदेनंतर महात्मा गांधी व
श्री. पटेल यांचें मुंबईत पुनरागमन




न्यूयॉर्कचे नगराध्यक्ष मि. मॅकी
श्री. पटेल यांचें स्वागत करीत आहेत.

त्यांनीं हिंदुस्थानच्या परिस्थितीवर भाषणें केलीं. एकदा सेसिल हॉटेलांत त्यांना थाटाची मेजवानी झाली. त्या प्रसंगीं ते म्हणाले, कीं "हिंदुस्थानांतील लोकांवर राज्यकारभाराची जबाबदारी सन्मानानें सोपविलीत, कीं ती जबाबदारी ते किती कसोशीनें पार पाडतात हें दाखविण्यासाठीं मीं असेंब्लीच्या अध्यक्षपदाचा स्वीकार केला आहे." "हिंदुस्थानच्या राज्य-कारभारासंबंधीं नेमलेल्या रॉयल कमिशनवर आपण जागा कां घेतली नाहीं?" असें त्यांना एके प्रसंगीं कोणीं विचारलें तेव्हां ते म्हणाले, "ज्या कमिशनचा अध्यक्ष हिंदी मनुष्य नाहीं अशा कमिशनचा सभासद होण्याला मी तयार नाहीं." या व इतर भाषण प्रसंगांशिवाय विलायतेंतील प्रमुख वृत्तपत्रें म्हणजे टाइम्स, स्पेक्टेटर, ईव्हिनिंग न्यूज यांनीं त्यांना आपल्या वृत्तपत्रांतून लेख लिहिण्याबद्दल विनंती केली; व त्यांपैकीं कित्येकांनीं त्यांना मेजवान्यां-करितां निमंत्रणें केलीं. त्यांचे कित्येक फोटो वृत्तपत्रांकरितां काढण्यांत आले. याप्रमाणें पटेलांचें इंग्लंडांत सर्व प्रकारें स्वागत करण्यांत आलें व तें त्यांच्या दर्जास शोभेल असेंच झालें. केवळ औपचारिक नसून त्यांच्या लोकप्रियतेचें व कार्यकुशलतेचें तें खरेंखुरें निदर्शक होतें, हें निरनिराळ्या ठिकाणीं झालेल्या भाषणांवरून, लेखांवरून दिसून आलें. इंग्लंडमधील काम संपल्यावर पटेल आयर्लंडला गेले व तेथील उत्तर व दक्षिण पार्लमेंटांना त्यांनीं भेटी दिल्या. याच ठिकाणीं आयरिश पुढारी व देशभक्त डी. व्हॅलेरा यांच्याशीं त्यांची मुला-खत झाली. त्या वेळीं डी. व्हॅलेरा हे नव्या आयरिश पार्लमेंटांत शिरलेले नव्हते. कारण पार्लमेंटांत गेलें म्हणजे इंग्लंडशीं राजनिष्ठेची शपथ घ्यावी लागते. ती त्यांना नको होती. पण यामुळें डी. व्हॅलेराचा जहाल लोकपक्ष जरी देशांत प्रबळ होता तरी त्याच्या हातांत राज्यकारभाराची सत्ता नव्हती. ती सत्ता कॉसग्रेव्ह या मवाळ पुढाऱ्यानें बळकावली होती. तेव्हां डी. व्हॅलेराशीं बोलणें करतांना पटेल त्यांना म्हणाले, "तुमचें ध्येयवादित्व टाकून देऊन तुम्ही आतां नव्या पार्लमेंटांत शिरा." याच वेळीं पटेलांनीं त्यांना पार्लमेंटांत अडवणूक कशी करावी यासंबंधींहि कांहीं गोष्टी सांगितल्या. डी. व्हॅलेरांवर पटेलांच्या उपदेशाचा परिणाम झाला. त्यांनीं शपथ न घेण्याचा हट्ट टाकून देऊन, पार्ल-मेंटांत शिरून मवाळ पुढारी कॉसग्रेव्ह याला थोडयाच मुदतींत अधिकारच्युत

केले हें आपल्याला इतिहासावरून समजतें. एकंदरीनें पटेलांच्या उपदेशानेंच डी. व्हॅलेरा हे कौन्सिलवादी बनले असें म्हणण्यास हरकत नाहीं.

याप्रमाणें आपलें विलायतेंतील वास्तव्य चार महिन्यांत अटोपून पटेल हिंदुस्थानांत परतले. परतल्यावर असेंब्लीची बैठक सुरू झाली. नेहमीं-प्रमाणें कामें चालून कांहीं दिवस लोटताहेत तोंच एक भयंकर वार्ता दिल्लीस येऊन थडकली. ही वार्ता म्हणजे गुजराथेंत महापूर येऊन त्यानें कोसळ-लेल्या संकटाची होय. १९२७ च्या जुलैच्या शेवटच्या आठवड्यांत गुज-राथमध्यें महापूर आला. या महापुरांत गांवेंच्या गांवें वाहून गेलीं व हजारों लोक निराधार झाले. ठिकाठिकाणच्या जमिनीवर मोठमोठाले वाळूंचे थर येऊन पडले. रस्तेचे रस्ते वाहून गेले व तारांचें दळणवळणहि बंद पडलें. या जलप्रलयांत ४००० खेड्यांचें नुकसान झालें. या खेड्यांतील शेंकडा ५०–६० व कांहीं ठिकाणीं शेंकडा ९० घरेंहि उध्वस्त झालीं. या वेळीं विठ्ठलभाई पटेलांचे धाकटे बंधु वल्लभभाई पटेल अहमदाबाद म्युनिसि-पालिटीचे व गुजराथ प्रांतिक कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष होते. त्यांनीं जवळ-जवळ दोन हजार स्वयंसेवकांचें पथक उभारून त्याचें नेतृत्व पत्करलें व संकटग्रस्तांना अन्नवस्त्र पुरविण्याचें काम तत्परतेनें सुरू केलें. त्यांनीं सर-कारला या कामीं पैशाची मदत करण्यास भाग पाडलें. शिवाय कॉंग्रेस व इतर संस्थांनींहि फंड उभारला. या गुजराथवर ओढवलेल्या आपत्तीचें निवारण करण्याच्या कामीं विठ्ठलभाई पटेलांनींहि प्रयत्न केले. त्यांत त्यांनीं आपल्या अध्यक्षीय अधिकाराचा उपयोग चांगला करून घेतला. त्यांच्या वर्चस्वा-मुळें त्यांना मदत मिळण्यास कुठेंच अडचण पडली नाहीं. साऱ्या हिंदु-स्थानभर व ब्रह्मदेशांतहि त्यांनीं आपल्या शेंकडों मित्रांना व संस्थांना पत्रें लिहिलीं. तसेंच कित्येक राजेरजवाड्यांना, संस्थानिकांना पत्रें लिहून त्यांनीं गुजराथेंतील संकटग्रस्तांना मदत पोचविण्याबद्दल विनंती केली, आणि या विनंतीला मान मिळून हजारों रुपयांनीं फंड गोळा झाला. या कामीं पटेलांनीं सुमारें शंभर खेड्यांना भेटी दिल्या. त्यांचा हा दौरा दोन महिने-पर्यंत चालला होता. त्यांत त्यांनीं शेतकरी व इतर आपद्ग्रस्त लोकांचा

चांगला परामर्श घेतला; त्या त्या ठिकाणच्या कामावरील सरकारी व बिनसरकारी अधिकाऱ्यांशीं वाटाघाटी करून परिस्थितीची प्रत्यक्ष पहाणी केली. पटेलांनीं स्वतः पांच हजार रुपये संकटांत सांपडलेल्या लोकांना मदत म्हणून दिले. त्यांनीं इतरत्रहि सुमारें पंचाऐंशीं हजार रुपयांच्यावर रक्कम गोळा करून ती मदत फंडाला दिली. त्यांनीं व्हाइसरॉयसाहेब लॉर्ड आयर्विन यांना महापुरानें पीडित झालेले प्रदेश पाहाण्यासाठीं बोलावलें. त्यांना अहमदाबादेस भेजवानी दिली व आपल्या बरोबर व्हाइसरायांना नडियाद व अहमदाबाद येथील खेड्यांतून दौऱ्यावर नेले. खुद्द पटेल संकटग्रस्त प्रदेशांतून हिंडत असतांना त्यांना अनेक ठिकाणीं मानपत्रें देण्यांत आलीं. त्यांपैकीं खेडा जिल्ह्याच्या पाटीदारांनीं त्यांना २६ नोव्हेंबर १९२७ रोजीं जें मानपत्र दिलें तें विशेष उल्लेखनीय आहे. त्यांत ते पाटीदार म्हणतात, " ही खेडाभूमि मरुध्वज राजाची तपश्चर्येची आणि पराक्रमाची भूमि होती. त्या वेळीं ही भूमि समृद्धियुक्त, वैभवशाली आणि भाग्यशाली होती. उत्तर आणि दक्षिण हिंदुस्थान यांच्या मध्यभागीं हें खेडा गांव मोंगली अंमलाचे वेळीं व्यापाराचें केंद्र होतें. चारुतरच्या उत्तरभागांत खेडा गांव आहे. तो भाग फार सुंदर आहे. पण मध्य चारुतरमध्यें सुंदर, विद्याभूषण, साहित्यभूषण आणि वीरवर्य रत्नें निर्माण झालीं त्यांतलें आपण एक आहांत, यांत मुळींच अतिशयोक्ति नाहीं. " आपली मायभूमि जी गुजराथ ती आपत्तींत असतांना तिच्या साहाय्यार्थ पटेल धावून गेले यांत विशेष नवल नाहीं. परंतु ज्या ज्या वेळीं देशांत असे अनर्थ ओढवले त्या त्या वेळीं पटेलांनीं संकटग्रस्तांना शक्य ती मदत केली. गुजराथप्रमाणें बिहार व ओरिसा येथेंहि या सुमारास महापुरानें प्रलय मांडला होता. पण त्याहि ठिकाणीं पटेलांनीं आपल्या वर्चस्वाचा उपयोग करून संकटाचें निवारण करण्याच्या कामीं मदत केली.

आतां पुन्हा आपण पटेलांचें या वेळेचें मुख्य कार्यक्षेत्र जी असेंब्ली तेथील व दिल्लींतील हालचालींकडे वळूं. १९२७ सालचा नोव्हेंबरचा पहिला आटवडा दिल्लीस फार गडबडीचा गेला. व्हाइसरॉय यांनीं आपला दौऱ्याचा कार्यक्रम रहित केला व ते दिल्लीला परत गेले. तेथून त्यांनीं

अखिल हिंदुस्थानांतील प्रमुख राजकीय पुढाऱ्यांना पाचारण केलें व त्यांच्यांशीं खाजगी भेटींत कांहीं महत्त्वाच्या विषयावर चर्चा केली. या निमंत्रित मंडळींत महात्मा गांधी होते. ते या वेळीं मंगलोर येथें होते. त्यांनींहि आपला दौऱ्याचा कार्यक्रम रद्द करून दिल्लीस प्रयाण केलें. इतर निमंत्रित मंडळींत बॅ. जिना, बॅ. जयकर, डॉ. अनसारी, श्रीनिवास अय्यंगार हे होते. असेंब्लीचे अध्यक्ष ना. पटेल हे तर आरंभापासून शेवटपर्यंत साक्षीभूत होते. या सर्वांशीं व्हाइसरॉयांनीं जी चर्चा केली ती खाजगी स्वरूपाची असावी व इतक्यांत तिला प्रसिद्धि देऊं नये असा एक संकेत ठरला होता. त्यामुळें पुढारी व्हाइसरॉयांची भेट घेतल्यानंतर बाहेर पडले तरी कोणींहि झालेल्या चर्चेविषयीं जाहीर खुलासा केला नाहीं. पण बड्या घरची गुप्त गोष्ट जशी गुप्तपणेंच गांवांत पसरते त्याप्रमाणें गुप्त म्हटली जाणारी ही चर्चा सर्वतोमुखीं झाली. ही चर्चा म्हणजे सायमन कमिशनच्या नेमणुकीची होय. सुधारणा कायद्याची जी दुसरी आवृत्ति निघायची तिच्या पूर्वतयारीसाठीं एक पार्लमेंटरी कमिशन नेमलें जाणार आणि त्या कमिशननें साक्षीपुरावा घेऊन आपला रिपोर्ट पार्लमेंटला सादर केल्यानंतर नवें बिल तयार होऊन तें पार्लमेंटपुढें येणार हा त्या चर्चेचा आशय होता. या कमिशनचे अध्यक्ष सर जॉन सायमन हे होते व बाकी सर्व सभासदहि ब्रिटिश होते. कमिशनमध्यें एकहि हिंदी सभासद नव्हता. अशा या सायमन कमिशनसंबंधींचें स्टेट सेक्रेटरीचें जाहिर पत्रक व्हाइसरॉय लॉर्ड आयर्विन यांनीं महात्माजींच्या हातीं ते मुलाखतीला आले असतांना दिलें. ‘ कां ? एवढेंच काम होतं ? ’ या गांधीजींच्या प्रश्नाला आयर्विनसाहेबांनीं होकारार्थी उत्तर दिलें. एका आण्याच्या पोस्टाच्या तिकिटानें हें काम झालें असतें असें गांधीजी म्हणाले. लॉर्ड आयर्विन तरी काय करणार ? ते वरच्या हुकुमाचे ताबेदार. त्यांनीं या पार्लमेंटरी कमिशनसंबंधीं जाहीर पत्रक तारीख ८ नोव्हेंबर १९२७ रोजीं प्रसिद्ध केलें. परंतु या कमिशनमध्यें एकहि हिंदी सभासद नसल्यानें हिंदुस्थानांतील सारे पक्ष संतापून गेले. ‘ गण्डस्योपरि पीटिका संवृत्ता ’ असें डॉ. ॲनी बेझंट यांनीं या ब्रिटिश सरकारच्या कृत्याचें वर्णन केलें. पंडित मोतीलाल नेहरू या वेळीं इंग्लंडमध्यें होते. त्यांनीं

हें कमिशन म्हणजे लहान मुलांची समजूत काढण्यासारखें आहे असें आपलें मत दिलें. मवाळाग्रणी मि. डी. ई. वाच्छा यांनींहि या कमिशनच्या निषेधार्थ जाहीरनामा काढला. अमृतसरच्या अत्याचारानंतर ज्याचा अत्यंत तीव्र निषेध राष्ट्रानें केला असें हें सायमन कमिशनच होय. मद्रास येथें १९२७ सालीं झालेल्या कॉंग्रेसच्या अधिवेशनांतहि या सायमन कमिशनचा कडक निषेध करण्यांत आला; व त्यावर हिंदुस्थानांत सार्वत्रिक बहिष्कार घातला जावा असें त्यांत ठरविण्यांत आलें.

याप्रमाणें या सायमन कमिशनविरुद्ध देशांत सर्व पक्षांनीं उठावणी केली असतां कित्येकांच्या डोक्यांत असे विचार आले, कीं या वेळीं पटेलांनींहि कमिशनच्या निषेधार्थ अध्यक्षपदाचा राजीनामा देणें जरूर आहे. या लोकांनीं पटेलांनीं राजीनामा द्यावा असें आग्रहानें सांगितलें. व त्यांच्या दृष्टीनें तें योग्य असेलहि. पण समुद्रांत ज्याप्रमाणें जहाजावर लाटा आदळतात व परत जातात तरी खरा कुशल कर्णधार हा निश्चित मार्गावरून ढळत नाहीं, त्याप्रमाणें टीकांचे प्रहार सोसूनहि पटेलांनीं आपल्याला जें योग्य वाटलें तेंच केलें. त्यांनीं अध्यक्षपद सोडलें नाहीं. अखेर पटेलांनीं आपल्या कृत्याच्या समर्थनाकरितां डिसेंबरांत एक पत्रकहि काढलें. त्यांत ते म्हणाले, " आजच्या सारखे जे राजकीय क्षोभांचे प्रसंग उत्पन्न होतात त्यामुळें मनुष्यस्वभावानुसार अध्यक्षावर जरी परिणाम होत असला तरी त्यानें आपलें प्राप्त कर्तव्य विसरून चालणार नाहीं. कारण अध्यक्षाची भूमिका ही जवळ जवळ न्यायाधीशासारखी आहे. अध्यक्ष होण्यापूर्वी ती व्यक्ति जरी एकाद्या पक्षाची असली तरी एकदा तें पद स्वीकारल्यानंतर अध्यक्ष हा सर्व पक्षांना समान वागविणारा असला पाहिजे; व तरच त्याला खरं काम करतां येईल. माझी राजकीय मतें सर्वांना चांगलीं माहीत आहेत. आणि आतां मी जरी अध्यक्ष झालों असलों तरी त्यांत मुळींच बदल झालेला नाहीं. मी जर या पदावर नसतों तर आलेल्या कमिशनमुळें मला काय वाटतें तें मी उघड सहज सांगूं शकलों असतों. खरें म्हटलें तर खाजगी रीतीनें मीं माझें मन या बाबतींत अगदीं स्पष्ट

रीतीनें पूर्वींच बोलून दाखविलेंच आहे. व अशा प्रकारचें पार्लमेंटरी कमिशन जर आलें तर त्याचें स्वागत कोणत्या रीतीनें करायला पाहिजे तेंहि मीं सांगितलें आहे. व मी अजूनहि सांगतों, कीं हिंदुस्थानला जे स्वराज्याचे हक्क पाहिजेत ते ठरविण्याकरितां ग्रेट-ब्रिटन व हिंदुस्थान अशा दोन्ही ठिकाणचे प्रतिनिधि समान भूमिकेवर एकत्र आले पाहिजेत. सध्याच्या कमिशनवर एकहि हिंदी प्रतिनिधि नसल्यानें तें राजकीय दृष्ट्या अत्यंत दोषपूर्ण आहे याचीहि मला पुरी जाणीव आहे.

"अशा परिस्थितींत मीं आपल्या जागेचा राजीनामा द्यावा व अधिक स्वतंत्र आणि कमी जबाबदारीच्या स्थितींत राहावें किंवा काय याबद्दल मीं मनाशीं पुष्कळ विचार केला. मला जर अधिक स्वतंत्र रीतीनें वागायचें असेल व माझ्या काँग्रेस मित्रांच्या खांद्यास खांदा लावून काम करायचें असेल तर मीं राजीनामा दिला पाहिजे हें उघड आहे. पण या बाबतींत मीं जेव्हां माझ्या मित्रांचा सल्ला घेतला तेव्हां मीं असें ठरविलें, कीं सध्यां तरी असा राजीनामा देण्यापासून कांहीं उपयोग होणार नाहीं."

"शिवाय असें, कीं मीं जर राजीनामा दिला तर जो तोटा होईल तो इतर फायद्याच्या मानानें फारच मोठा होईल. परिस्थिति कितीहि बिकट असली तरी हिंदी लोक जबाबदारीचीं कामें कर्तव्यदक्षतेनें पार पाडतात हें मला या पदावर राहिल्यानेंच दाखवितां येईल. हिंदुस्थानच्या सध्याच्या कठीण अवस्थेंत या जागेवर राहून जितकें लोकहित साधतां येईल तितकें साधण्याचें मी योजिलें आहे."

याप्रमाणें अध्यक्षपदाचा राजीनामा न देण्यांत पटेलांचा सद्धेतुच कसा होता हें स्पष्ट होतें. राजीनामाच देण्यानें सायमन कमिशनचा निषेध दाखविला जातो व देशहित साधतें हें त्यांना मान्य नव्हतें व याचीं कारणें त्यांनीं वरील पत्रकांत सांगितलीं आहेत. ज्या वेळीं सायमन कमिशन असेंब्लीला भेट देण्यास आलें त्या वेळीं पटेलांनीं त्याची व्यवस्था कशी केली हें आपल्याला आतां पाहायचें आहे.

साऱ्या हिंदुस्थानानें बहिष्कृत केलेलें हें कमिशन मुंबईला तारीख ३

फेब्रुवारी १९२८ रोजीं उतरलें व तेव्हांपासून देशाचें वातावरण लोकक्षोभानें भरून गेलें. कमिशनवरचा बहिष्कार यशस्वी कसा करावा इकडे साऱ्या देशाचें लक्ष लागून राहिलें. कमिशनच्या आगमनाच्या दिवशीं म्हणजे तारीख ३ फेब्रुवारीला सर्व हिंदुस्थानभर हरताळ पडून बहिष्काराला सुरवात झाली. दिल्लीला कमिशनची भेट व्हायची असल्यामुळें तेथील बहिष्काराच्या चळवळीला जोराचा रंग चढला होता. व "गो बॅक सायमन" (सायमनसाहेब, मागें फिरा) हीं वाक्यें असलेलीं शेंकडों निशाणें घेऊन लोक मिरवणुकींतून चालले होते. पण इकडे जनतेकडून बहिष्कार बहुतांशीं यशस्वी होत असतां तिकडे व्हाइसरॉयसाहेब व सरकारी अधिकारी त्यांच्या स्वागतांत दंग होऊन गेले होते. आतां असेंब्लीकडून त्यांचें थाटानें स्वागत व्हावें अशी सरकारी सभासदांना साहजिकच इच्छा झाली! परंतु अध्यक्ष पटेल यांनीं अद्यापि स्वागताची कोणतीच तयारी दाखविली नव्हती असें सरकारी सभासदांचें म्हणणें होतें. म्हणून त्यांच्या वतीनें एक युरोपियन सभासद मि. हेन्री मॉंक्रिफ स्मिथ यांनीं कमिशनचे अध्यक्ष सायमन व कमिशनचे इतर सभासद यांना असेंब्लीस भेट देण्यासाठीं निमंत्रण केलें. हें निमंत्रण करण्यास कांहीं हरकत आहे कीं काय असें स्मिथनीं पटेलांना विचारलें. तव्हां पटेल म्हणाले "माझी हरकत नाहीं. पण तुम्ही जें म्हणतां कीं मी स्वागताची कांहीं तयारी केलेली नाहीं तर त्या बाबतींत आपला गैरसमज झालेला दिसतो. आपण कमिशनला निमंत्रण करा." यानंतर सर डार्सी लिंडसे यांनीं तारीख ९ फेब्रुवारी रोजीं पटेलांना पत्र लिहिलें, कीं "ज्या दिवशीं असेंब्लीचें काम चालू नसेल अशा दिवशीं तुम्ही कमिशनला बोलावून त्यांना हें सभागृह दाखवावें व असेंब्लीच्या सभासदांपैकीं अकरा सभासद कमिशनला भेटूं इच्छितात तरी त्यांची ओळख कमिशनला आपण त्या दिवशीं करून द्यावी, याप्रमाणें आमची आपणांस विनंती आहे." या अकरा सभासदांपैकीं बहुसंख्य सभासद सरकारी गोटांतले मुसलमान होते. लिंडसे साहेबांचें हें विनंतीपत्र आल्यावर पटेलांनीं त्यांना उत्तर लिहिलें, कीं मीं असेंब्लींतील बीन सरकारी सभासदांच्या पुढाऱ्यांना आपण केलेल्या विनंतीबद्दल विचारलें आहे. खरें म्हटलें तर कमिशनचें स्वागत तुम्ही

म्हणतां त्याप्रमाणें नेहमींचा रिवाज सोडून कांहीं विशेष पद्धतीनें करावें अशी जरूरी मला वाटत नाहीं. तरीपण असेंब्लींत पक्षनेत्यांना विचारून त्यांचें या बाबतींत काय म्हणणें आहे तें मला समजल्यावर आपणांस कळवीन." याप्रमाणें लिंडसे यांना लिहिल्यावर पटेलांनीं असेंब्लींत पक्षनेत्यांना कमिशनच्या स्वागताबद्दल त्यांचे काय विचार आहेत ते कळविण्याची विनंती केली. हे पक्षनेते म्हणजे स्वराज्यपक्षाचे पुढारी पंडित मोतीलाल नेहरू, स्वतंत्रपक्षाचे पुढारी बॅरिस्टर जिना व राष्ट्रीयपक्षाचे पुढारी लाला लजपतराय हे होते. त्या सर्वांनीं पटेलांना आपलीं मतें कळविलीं. त्यांपैकीं स्वराज्यपक्षाचे पुढारी पंडित मोतीलाल यांनीं पटेलांना लिहिलें, कीं "कॉंग्रेस व इतर प्रमुख संस्था यांनीं सायमन कमिशनवर संपूर्ण बहिष्कार घालण्याचें ठरविलें आहे हें आपणाला माहीत आहेच. कॉंग्रेसच्या ठरावाला अनुसरून असेंब्लींतील आमचा कॉंग्रेस पक्ष, तुम्ही अध्यक्ष या नात्यानें कमिशनचें जें स्वागत कराल त्यांत मुळींच भाग घेणार नाहीं. माझ्या माहितीप्रमाणें सर जॉन सायमन व कमिशनचे इतर सभासद यांनीं तुम्हांला तर नुसतें निमंत्रण करण्याचेंहि सौजन्य दाखविलें नाहीं. त्यांनीं याप्रमाणें असेंब्लींचा अपमान केला आहे. अशी परिस्थिति असतांना, शिवाय असेंब्लींतील तीनहि प्रमुख बिनसरकारी पक्ष स्वागताच्या पूर्णपणें विरुद्ध असतांना केवळ लिंडसेसाहेब व त्यांचे मूठभर हस्तक हे आपल्याला विनंती करतात म्हणून आपण कमिशनचें स्वागत करावें यांत मला कांहींच स्वारस्य दिसत नाहीं." त्याचप्रमाणें स्वतंत्रपक्षाचे पुढारी बॅरिस्टर जिना यांनींहि पटेलांना लिहिलें, कीं "मीं माझ्या पक्षाची मतें अजमाविलीं आहेत व त्यांच्या निर्णयाला अनुसरून मी आपणांस कळवूं इच्छितों, कीं आमचा पक्ष या कमिशनला व त्यांच्या योजनेला मानीत नाहीं; अर्थात् आम्ही सर जॉन सायमन व कमिशनचे सभासद यांचें स्वागत करण्यास तयार नाहीं. मात्र व्यक्तिशः आम्हांला त्यांच्याविषयीं अनादर नाहीं. तुम्ही अध्यक्ष या नात्यानें कमिशनला बोलावूं शकाल काय ? या तुमच्या सूचनेला उत्तर असें, कीं त्याबाबतींतला निर्णय तुमच्या मर्जीवर अवलंबून राहील." तसेंच राष्ट्रीयपक्षाचे पुढारी लाला लजपतराय यांनीं पटेलांना लिहिलें, कीं "तुमच्या पत्राला उत्तर

देण्यास उशीर झाला याबद्दल मी तुमची क्षमा मागतों. माझ्या पक्षांतील सभासदांचा सल्ला मला घ्यायचा होता म्हणून पत्र लिहिण्यास उशीर झाला. मीं आतां त्यांचा सल्ला घेतला आहे. आमचें मत असें आहे, कीं ज्या अर्थी तुमच्या अध्यक्षाच्या दर्जाला योग्य असें नुसतें निमंत्रणहि कमिशननें तुम्हांला दिलें नाहीं त्या अर्थी तुम्हांवरहि कमिशनला निमंत्रण करण्याचें बंधन राहात नाहीं. म्हणून तुम्ही कमिशनला बोलावण्याचें कारण नाहीं असें आम्हांस वाटतें." लालाजींनीं बहुतेक गोष्टी नेहरूंप्रमाणेंच लिहिल्या. व शेवटीं असें कळविलें, कीं जेव्हां असेंब्ली चालू नसेल त्या वेळीं कमिशनला बोलावणें ही तुमच्या मर्जीची गोष्ट आहे. परंतु असेंब्ली चालू असतांना तिला कमिशनशीं कांहीं कर्तव्य नाहीं. असेंब्लीचे उपाध्यक्ष श्री. याकूब खान यांनींहि पटेलांना वरीलप्रमाणेंच कळविलें.

याप्रमाणें सर्व प्रमुख पक्षांचा व उपाध्यक्षांचा सल्ला घेतल्यानंतरहि एक महिनापर्यंत पटेलांनीं कमिशनला कसलेंच निमंत्रण केलें नाहीं. मध्यंतरीं सायमन कमिशनवर बहिष्कार घालण्याचा ठराव पंजाब केसरी लाला लजपतराय यांनीं तारीख १८ फेब्रुवारी रोजीं असेंब्लींत आणला व तो अनुकूल ६८ व प्रतिकूल ६२ मतें पडून मंजूर झाला. त्यानंतर मार्चच्या शेवटच्या आठवड्यांत पटेलांनीं कमिशनला निमंत्रण करतांना स्पष्ट कळविलें, कीं "असेंब्लीच्या या अधिवेशनाचे दिवस आतां संपत आलें आहेत व म्हणून सध्या सभासदहि फारच थोडे हजर असतात. बरेच सभासद दिल्ली सोडून गेले आहेत. तेव्हां या गोष्टी कृपेनें लक्षांत घ्याव्या व आपण जेव्हां असेंब्लीला याल तेव्हां आपण नेहमींच्या प्रेक्षकांच्या गॅलरींतच बसल्यास मला आनंद होईल." याप्रमाणें कमिशनच्या स्वागताचा कांहीं एक थाट न करतां व त्यांना साध्या प्रेक्षकांच्या गॅलरींत बसण्यास सांगून पटेलांनीं अध्यक्षाच्या खुर्चीवरूनहि कमिशनचा एकप्रकारें निषेधच व्यक्त केला व झालेल्या अपमानाचें उट्टें चांगल्या रीतीनें काढलें. कमिशन असेंब्लींत आलें तेव्हां सभागृहांत जवळ जवळ शुकशुकाट होता. सर्व गोष्टींवरून पटेलांनीं आपल्यावर टीका करणाऱ्यांना उत्तम रीतीनें पटवून दिलें, कीं अध्यक्षालाहि कमिशनचा निषेध करतां येतो व तो एक प्रकारें इतरांच्याहूनहि अधिक परिणामकारक-

रीतीनें प्रकट करतां येतो. कारण या कृतींत कमिशनचें स्वागतहि होत नाहीं व मुळींच येऊं नका असें म्हणण्याचा उघड अपमानहि होत नाहीं. पण पटेलांनीं कमिशनला उजाड झालेल्या असेंब्लीच्या साध्या प्रेक्षकांच्या गॅलरींत बसायला सांगून त्यांचा प्रच्छन्न निषेध इतका जबरदस्त केला, कीं तसा तो दुसऱ्या कोणालाहि करतां आला नाहीं. किंबहुना करणें शक्य नव्हते. पटेलांचें हें चातुर्य पाहून सर्व पक्षांतील लोक थक्क होऊन गेले व त्यांना धन्यवाद देऊं लागले.

१९२८ सालच्या मार्च महिन्यांत हा प्रकार झाला; व सरकारला त्यामुळें मुकाट्यानें मानहानी सोसावी लागली. पण याच महिन्यांत सरकारवर मानहानीचा आणखी एक अधिक कठीण प्रसंग ओढवला. त्यांत पटेलांचा प्रत्यक्ष सरसेनापतीशीं संबंध आला. व ज्यांचा दर्जा व्हाइसरॉयांच्या बरोबरीचा आहे ते सर वुइल्यम बर्डवुड, कमांडर-इन-चीफ—सर सेनापति—यांना अखेर पटेलांची माफी मागावी लागली. तो प्रसंग असा.

सैन्याचें हिंदीकरण व्हावें याकरितां योजना ठरविण्यासाठीं स्कीन कमिटी नेमली होती. तिचा रिपोर्ट १९२७ मध्यें प्रसिद्ध झाला होता. त्यावर डॉ. मुंजे यांनीं स्कीन कमिटीच्या शिफारशींसंबंधीं एक ठराव असेंब्लींत मांडला. त्या रिपोर्टांत म्हटलें होतें, कीं हिंदी उमेदवारांना ब्रिटिश उमेदवारांच्या बरोबरीनें वागविलें जावें, त्यांच्यासारखेंच शिक्षण दिलें जावें, आणि त्यांच्या जोडीनेंच त्यांना हुद्देदारी मिळावी. पण सरकारला या स्कीन कमिटीच्या शिफारशी मान्य नव्हत्या. सरसेनापति बर्डवुड यांनीं आपल्या भाषणांत या रिपोर्टाची हेटाळणी केली. हिंदी उमेदवार अधिकाधिक घेऊं लागल्यास सैन्याची कार्यक्षमता कमी होईल आणि सध्याच ब्रिटिश उमेदवार मिळण्यास अडचण पडूं लागली आहे ती अडचण अधिकच वाढेल आणि लष्करी अधिकाऱ्यांत ब्रिटिश हुद्देदारांचें विशिष्ट प्रमाण असल्याखेरीज सैन्याच्या लायकीची हमी देतां येणार नाहीं, हाच त्यांच्या भाषणांतला मुख्य मुद्दा होता. व अखेर हिंदुस्थानांत उच्च प्रतीचें लष्करी शिक्षण देणारें सँढर्स्ट कॉलेज काढावें अशी जी एक मागणी अनेकांपैकीं स्कीन कमिटीनें केली

होती, तीहि सरसेनापतीसाहेबांनीं झिडकारून लाविली. व हिंदुस्थानांतून इंग्लंडांत सांप्रत दरसाल दहा विद्यार्थी उच्च प्रतीचें लष्करी शिक्षण संपादण्यास जातात, त्यांत आणखी थोडीशी भर घालण्यांत येईल एवढेंच अश्वासन दिलें.

सरसेनापतींच्या या भाषणावर असेंब्लीची बैठक तहकूब करण्यांत यावी अशी एक सूचना करण्यांत आली. या तहकुबीच्या सूचनेवर पुन्हा होणाऱ्या बैठकींत चर्चा व खुलासे करण्याचें ठरलें. पण या वेळीं सरसेनापति हजर नव्हते. ते दौऱ्यावर गेले होते. त्यांच्या जागीं त्यांचे आर्मी सेक्रेटरी असेंब्लींत हजर होते. व चर्चेवर खुलासा करण्याचें काम या आर्मी सेक्रेटरीकडे आलें होतें. परंतु तो खुलासा करण्याकरितां उठणार त्यापूर्वी पटेलांनीं सरसेनापतींची त्यांच्या गैरहजिरीबद्दल खरपूस हजेरी घेतली. त्यानंतर आर्मी सेक्रेटरींनीं भाषणावरचा खुलासा केला व चर्चेला उत्तर दिलें. पण पटेल एवढयावरच थांबले नाहींत. त्यांनीं व्हाइसरॉयसाहेबांना कळविलें, कीं " सरसेनापति हे चर्चेला गैरहजर राहिले यांत त्यांनीं मुद्दाम असभ्यपणाचें वर्तन केलें आहे. असेंब्लीचा व अध्यक्षांचा त्यांनीं गैरहजर राहून जाणूनबुजून अपमान केला आहे, एवढें आपल्या नजरेस आणून आम्ही आर्मी सेक्रेटरीचा खुलासा स्वीकारतों. " त्यावर व्हाइसरॉय लॉर्ड आयर्विन यांनीं उत्तर दिलें, कीं " तुमच्या पत्रांतील 'मुद्दाम जाणूनबुजून' हे शब्द तुम्हीं परत घ्यावे. " पण पटेलांनीं हे शब्द परत घेण्याचें नाकारलें व आपलें धैर्यशालित्व व्हाइसरॉयांच्या निदर्शनास आणलें. ते व्हाइसरॉयांना म्हणाले कीं " त्या दिवशीं सरसेनापति कां गैरहजर राहिले त्याचा मला खुलासा पाहिजे. " त्यावर सरसेनापतींनीं खुलासा केला कीं, " मी कांहीं असेंब्लीचा सभासद नाहीं. व म्हणून असेंब्लीच्या चर्चेत ढवळाढवळ करण्याचें मला कांहीं कारण नाहीं. " पटेलांना हा खुलासा समाधानकारक वाटला नाहीं. यांनीं सांगितलें कीं, " तुमचें म्हणणें बरोबर नाहीं. तुम्ही असेंब्लींत भाषण केलें त्यावर चर्चा होणार होती तींत तुम्हांला भाग घेण्याचा व चर्चेला उत्तर देण्याचा तुम्हांला पूर्ण अधिकार होता. असें असून व या

गोष्टी तुम्हांस खऱ्या माहीत असून तुम्ही गैरहजर राहिलां. तेव्हां आतां तुमच्या गैरहजेरीबद्दल तुम्ही दिलगिरी व्यक्त करावी. " वास्तविक पटेलांचा व्हाइसरॉयांशीं व सरसेनापतींशीं खाजगी स्नेह चांगला होता. परंतु अध्यक्ष या नात्यानें त्यांना आपलें कर्तव्य दिसायला कठोर असलें तरी तें करणें प्राप्त होतें. त्यांनीं व्हाइसरॉयसाहेबांना स्पष्ट लिहिलें, कीं " तुमचा आमचा खासगी स्नेह चांगला असला तरी मी तुम्हांस निश्चित सांगूं इच्छितों कीं कांहींहि झालें तरी मला माझें कर्तव्य, प्रामाणिकपणानें व निःपक्षपातीपणानें करीत राहिलें पाहिजे. " इतक्या सगळ्या गोष्टी झाल्यावर अखेर सरसेनापतींना पटेलांची माफी मागावी लागली. पटेलांनीं यावर सरसेनापतींना क्षमा केली व आपणांला व्हाइसरॉयसाहेब व सरसेनापतीसाहेब यांच्यावर जी टीका करावी लागली त्याबद्दल दुःख प्रदर्शित केलें. याप्रमाणें या सरसेनापतींच्या माफी—प्रकरणाचा शेवट झाला व हे तिघे गोडीनें वागूं लागले. परन्तु प्रकरणाचा परिणाम असा झाला, कीं त्यानंतर सरसेनापति हा असेंब्लीच्या बैटकीला कधींच हजर असत नाहीं. कारण न जाणो त्यामुळें सरसेनापतींसारख्या लष्करांतील सर्वश्रेष्ठ अधिकाऱ्याला एकाद्या वेळीं नामुष्कीचा प्रसंग यावयाचा ! या प्रकरणावरून पटेलांचा करारीपणा मात्र उत्तम रीतीनें व्यक्त झाला.

याप्रमाणें ब्रिटिश सिंहाच्या गुहेंत शिरून पटेलांनीं त्याच्याशीं झुंज चालविली होती. तरी त्यांचें देशांतल्या हालचालींवरचें लक्ष उडालें नव्हतें. आंतून बाहेरून सर्व बाजूंनीं आम्ही सरकारशीं झगडा चालू ठेवणार या त्यांच्या घोषणेप्रमाणें त्यांचें वर्तन तंतोतंत होतें. १९२८ सालच्या मध्याला हिंदुस्थानच्या इतिहासांत बार्डोलीच्या सत्याग्रहाला महत्त्व प्राप्त झालें व त्यांत विठ्ठलभाईंचे बंधु सरदार वल्लभभाई यांनीं जी मोठी कामगिरी केली, जवळ जवळ तितक्याच महत्त्वाची कामगिरी विठ्ठलभाईंनींहि केली. या सत्याग्रहाला जें यश प्राप्त झालें त्याचें बरेंचसें श्रेय सरदार वल्लभभाईंबरोबर प्रेसिडेंट विठ्ठलभाई पटेल यांनाहि दिलें पाहिजे. वल्लभभाईनीं बार्डोली तालुक्यांत केलेली जागृति व संघटना आणि विठ्ठलभाईंचा सरकार दरबारी असणारा दरारा व निर्भयता या सर्वांचा मेळ जमला, तेव्हांच बार्डोलीचा

सत्याग्रह यशस्वी झाला. आणि मागच्याप्रमाणें म्हणजे १९२२ सालाप्रमाणें बार्डोलीचा हा बार फुकट गेला नाहीं.

१९२७ च्या जुलै महिन्यांत बार्डोलींतील रयतांच्या जमिनीवरील सारा २० ते २५ टक्के वाढविण्यांत आला. त्यावर ही सारावाढ शेतकऱ्यांना जाचक झाल्यामुळें या तालुक्यांतील शेंकडों शेतकऱ्यांनीं व मुंबई कौन्सिलांतील गुजराथेंतल्या प्रतिनिधींनीं मुंबई सरकारकडे अर्ज–विनंत्या केल्या, कीं एकादी निःपक्षपाती कमिटी नेमून ही सारावाढ योग्य आहे किंवा नाहीं याचा निर्णय व्हावा. पण कांहीं उपयोग झाला नाहीं. शेवटीं वल्लभभाईंना या कामीं पुढारीपण देण्यांत आलें. त्यांनींहि गव्हर्नरांना पत्र लिहून चौकशी कमिटी नेमण्याबद्दल सुचविलें. पण कांहीं उत्तर न मिळाल्यामुळें वल्लभभाईनीं लोकांना सांगितलें, कीं जुनी सारा आकारणी चालू होईपर्यंत किंवा निःपक्षपाती चौकशी कमिटीची नेमणूक होईपर्यंत तुम्हीं सरकारला वाढलेला नवीन सारा देऊं नये. तारीख १२ फेब्रुवारी रोजीं वल्लभभाईच्या नेतृत्वाखालीं बार्डोली तालुक्यांत करबंदीचा सत्याग्रह जाहीर करण्यांत आला. सत्याग्रह जाहीर होतांच लोकांच्या छळाला सुरवात झाली. सरकारनें स्थावरजंगम मालमत्तेवर जप्त्या आणल्या, लोकांच्या गुरांवर जप्त्या आणल्या. चौकशी म्हणजे केवळ फार्स होऊन चांगल्या कार्यकर्त्यांना शिक्षा ठोठावण्यांत आल्या. या अत्याचारांचीं वर्णनें जाहीर सभांतून करण्यांत येत व त्यांच्यावर रचलेलीं गीतेंहि सभांतून म्हणून दाखविण्यांत येत. बार्डोलींत चालू असलेल्या अत्याचारांचा निषेध करण्यासाठीं मुंबई कौन्सिलांतील चार सभासदांनीं आपल्या जागांचे राजीनामे दिले व या चळवळींत लक्ष घातलें. उत्तर विभाग कमिशनर स्मार्ट यानें एका डॉक्टराला लिहिलेल्या एका पत्रांत पुढाऱ्यांची नालस्ती केली असें लोकांना समजण्यांत आलें तेव्हां तर जनतेचा संताप झाला. लोकांनीं या गाऱ्हाण्यांची दाद लावण्यासाठीं मुंबईच्या गव्हर्नरकडे अर्ज केला व त्यांत वल्लभभाईनीं सुचविल्याप्रमाणें एक नवी निःपक्षपाती चौकशी कमिटी नेमण्याविषयीं पुन्हां विनंती केली. या अर्जाची एक प्रत श्री. दादूभाई देसाई यांनीं विठ्ठलभाई पटेल यांचेकडे पाठविली. व त्यांना लिहिलेल्या पत्रांत म्हटलें, कीं

'तुम्ही असेंब्लींतील गुजराथचे प्रतिनिधि आहांत तेव्हां आमची अशी इच्छा आहे कीं, तुम्ही या बाबतींत कांहीं तरी तोड काढावी. तुम्ही अध्यक्षपदीं असल्यानें या बाबतींत तुम्हांला अलिप्त राहावें लागेल हें आम्ही जाणतों. पण त्याच वेळेला आम्ही हेंहि ओळखतों कीं, तुमचा पाठिंबा व दर्जा यामुळें बार्डोली तालुक्यांतील शेतकऱ्यांची गाऱ्हाणीं दूर करण्यास पुष्कळच मदत होईल.' पटेलांना अर्थातच या चळवळींत प्रत्यक्ष भाग घेणें शक्य नव्हतें. पण आपल्याला जें जें करणें शक्य आहे तेवढें सर्व करण्याची आपण शिकस्त करूं एवढें अश्वासन त्यांनीं दिलें.

दिवसेंदिवस सरकारनें चालविलेल्या दडपशाहीला उग्र स्वरूप येऊं लागलें व या लढ्यांत शेतकऱ्यांना तग धरतां यावा यासाठीं फंड जमविण्यांत येऊं लागला. हा लढा चालू असेपर्यंत दर महिन्याला एक हजार रुपये पटेलांनीं या फंडाला दिले. पटेलांनीं सत्याग्रहाला ही देणगी देऊं करतांच मुंबईच्या टाइम्सचें पित्त खवळलें व त्यानें पटेलांना (He should mind his own business) त्यांनीं आपलें काम सांभाळावें असें सांगण्यास सुरवात केली. परंतु महासाधु कबीर यांनीं म्हटल्याप्रमाणें "हाथी चलत है अपने मनसे, कुतर भुकत वाकुं भुकवा दे" या वचनाचें पटेलांनीं पालन केलें व आपल्या निंदकांना खुशाल भुंकूं दिलें. ही देणगी देऊं करतांना तारीख २ मे १९२८ च्या पत्रांत त्यांनीं महात्मा गांधींना खालील आशयाचें पत्र लिहिलें.

"मत्प्रिय महात्माजी,

बार्डोली तालुक्याच्या वतीनें तुम्ही फंडाकरितां जें जाहीर पत्रक काढलें आहे तें मी पाहिलें. मी ज्या भागातर्फे निवडून आलों त्यांत बार्डोली तालुका येतो. तेव्हां या दृष्टीनें बार्डोली तालुक्यांत चाललेल्या लढयाकडे मी फार बारकाईनें लक्ष देत आहे. बार्डोलीची दाद लागावी यासाठीं सरकारदरबारांत माझ्याकडून सर्व प्रयत्न चालू आहेत. माझी खात्री झाली आहे कीं, बार्डोलीच्या रयतानें स्वतंत्र व निःपक्षपाती चौकशीची मागणी केली ती सर्वस्वीं न्याय्य आहे. तसेंच त्यांनीं सर्व सनदशीर उपाय संपले तेव्हांच ही

चळवळ चालू केली हेंहि मला पूर्ण माहीत आहे. बार्डोलींतील स्त्री-पुरुषांचें धैर्य, चिकाटी व कष्ट पाहून मला अत्यंत कौतुक वाटतें. पण त्याचबरोबर सरकारनें सारावसुलीच्या कामीं जो रयतेचा छळ मांडला आहे त्यांचें वृत्त ऐकून मी अत्यंत व्यथित व क्षुब्ध झालों आहे. उत्तर विभाग कमिशनरनें कायद्याच्याच सुव्यवस्थेच्या व समानतेच्याहि मर्यादा ओलांडून जी सक्तीची उपाययोजना चालविली आहे तीमुळें परिस्थिति अधिकच बिघडूं लागली आहे. अशा प्रसंगीं मला गप्प किंवा निष्क्रिय राहावें असें वाटत नाहीं. सध्यां हा लढा चालूं असेपर्यंत मी दरमहा एक हजार रुपये मदत देण्याचें आश्वासन देतों. तसेंच या बाबतींत सरकारशीं वाटाघाटी करण्याचे प्रसंगहि मी दवडणार नाहीं.

आपला स्नेहांकित,

**व्हीं. जे. पटेल**

या सुमारास पटेलांनीं मुंबईचे त्या वेळचे गव्हर्नर सर लेस्ली बुइल्सन यांचेबरोबर पत्रव्यवहार केला. त्यांत त्यांनीं गुजराथेंत सरकारी अधिकारी कसे रयतेवर अन्याय करीत आहेत यांचें वर्णन केलें. व विशेषतः उत्तर-विभाग कमिशनरनें पुढाऱ्यांची जी नालस्ती केली होती ती किती निंद्य होती हें कळविलें. गव्हर्नरसाहेबांनीं अर्थात्‌च या नालस्तीच्या बातमीचा नुसता इन्कार केला. परंतु पटेलांचें विधान त्यांना खोडून काढण्याला पुरावा नव्हता. कारण तें खरेंच होतें. गव्हर्नरसाहेबांनीं प्रथम तरी बार्डोलीच्या बाबतींत नमतें न घेण्याचें ठरविलें होतें. व म्हणून पटेलांनीं महात्मा गांधींना कळविलें, कीं "भल्या बुऱ्या उपायांनीं' ही चळवळ चिरडून टाकण्याचा मुंबई सरकारचा निश्चय आहे हें अगदीं स्पष्ट आहे" तरी पण पटेलांनीं वेळोवेळीं गव्हर्नरांशीं पत्रव्यवहार चालू ठेवून झालेल्या अन्यायाचें परिमार्जन करण्याबद्दल चौकशी-कमिटी नेमावी असें सुचविलें. या चौकशी कमिटीपुढें पुराव्यानिशीं आपण खालील बाबी मांडूं असें पटेलांनीं गव्हर्नरांना सांगितलें. त्या बाबी अशा:—(१) पुष्कळ ठिकाणीं जप्त्या केल्या तरी पंचनामे केले नाहींत. (२) मालकांची चौकशी न

करतां म्हशी जप्त केल्या. ( ३ ) ज्या इस्टेटीवर कायद्याप्रमाणें जप्ती आणायला नको त्या इस्टेटीवर जप्ती आणली. ( ४ ) रात्रींच्या वेळीं जप्ती केली. ( ५ ) कुंपणें, दारें फोडून घरांत शिरले. ( ६ ) सत्याग्रही लोकांवरील खटल्यांची चौकशी बरोबर न करणें वगैरे गोष्टींवरून बार्डोली तालुक्यांत चाललेल्या अन्यायांचा पटेलांनीं पाढा वाचला. परंतु गव्हर्नरवर त्याचा कांहीं परिणाम होत नाहीं असें पाहून पटेलांनीं व्हाइसरॉय लॉर्ड आयर्विन यांच्याशीं पत्रव्यवहार सुरू केला. पटेलांनीं जी ही कामगिरी केली तिचा शेवटीं लढा थांबण्याच्या कामीं फार उपयोग झाला. पटेलांनीं व्हाइसरॉयांना कळविलें कीं, सरकार आपला ताठरपणा सोडून या प्रश्नाचा विचार करण्यास तयार नसेल तर आपण आपल्या जागेचा राजीनामा देऊन ही चळवळ हातीं घेऊं. शेवटीं वाढीची रक्कम मध्यस्थानें सरकारकडे अनामत ठेवावी असा मार्ग काढण्यांत आला. चळवळीच्या बाबतींत शिक्षा झालेल्या सर्व कैद्यांना मुक्त करण्यांत आलें. जप्त झालेली मालमत्ता परत देण्यांत आली. चळवळ थांबविण्यांत आली व या प्रश्नांची चौकशी करण्याकरितां एक कमिटीहि नेमण्यांत आली. या कमिटीला मान्यता देण्यांत यावी असें पटेलांनीं व व्हाइसरॉयांनीं वल्लभभाई पटेलांना सांगितलें व त्याचा परिणाम होऊन वल्लभभाई पटेलांनीं व महात्मा गांधींनींहि या कमिटींत कांहीं दोष असले तरी तिला मान्यता दिली. कारण विठ्ठलभाई पटेलांनीं यापूर्वीं त्यांना सांगितलें होतें, कीं जर प्रत्यक्ष चौकशींत तुम्हांला या कमिटीचें काम नीट नाहीं असें वाटलें तर अशा कमिटीशीं संबंध तोडून टाकण्यासाठीं एर्वीतेर्वी तुम्ही मोकळेच आहांत. याप्रमाणें ही चौकशी कमिटी विशेषतः पटेलांच्या प्रयत्नानें नेमण्यांत आली. व म्हणून त्यांनीं व्हाइसरॉयसाहेबांना कळविलें, कीं मुंबई सरकार व बार्डोलीचे सत्याग्रही यांच्यामधील लढा मिटविण्याच्या कामीं आम्हांला यश आलें याबद्दल मला आनंद होत आहे. वर लिहिल्याप्रमाणें जी चौकशी—कमिटी नेमण्यांत आली तिनें शेंकडा सहा टक्क्यांपेक्षां जास्त सारा-वाढ करूं नये अशी शिफारस केली. सरकारनेंहि या शिफारशीला मान्यता दिली. बार्डोलींतील करबंदीची चळवळ हाणून पाडण्याकरितां साम्राज्याच्या हातीं असलेल्या

लेल्या सर्व साधनांचा उपयोग करण्यांत येईल, असें ना. गव्हर्नरांनीं मुंबई कौन्सिलांत बोलून दाखविलें होतें. परंतु पटेलबंधूंच्या प्रयत्नांनीं तें बोलणें फोल ठरलें व डोलणेंहि वायां गेलें. शिवाय ज्यांच्या जमिनी जप्त करण्यांत आल्या होत्या त्या त्यांच्या त्यांच्या मालकांना परत देण्यांत आल्या; व चळवळींत सामील झाल्याबद्दल ज्या पाटलांना व तलाठ्यांना कामावरून काढून टाकलें होतें त्यांना पूर्वींच्या नोकऱ्या देण्यांत आल्या.

---

## तिसरा टप्पा

### " पटेल–राज्य "

ज्या गोष्टीनें पटेलांची कीर्ति जगभर झाली ती म्हणजे पब्लिक सेफ्टी बिलाविरुद्ध त्यांनीं दिलेला निर्णय ही होय. या बिलानें उठविलेल्या प्रचंड वादळांत आपली नांव कुशलतेनें हाकणारा कर्णधार म्हणजे एक पटेलच होत. त्यांची धडाडी व देशप्रीति यांची पुरी कसोटी या वेळीं लागली व तींत तें पूर्णपणें उतरले. आणि म्हणून साऱ्या राष्ट्राकडून पटेलांना सहस्रशः धन्यवाद मिळाले यांत कांहींच आश्चर्य नाहीं. तेव्हां पब्लिक सेफ्टी बिलाच्या या हकीगतीकडे आपण आतां दृष्टि फेकूं. या हकीगतीबरोबर आनुषंगिक अशा इतर महत्त्वाच्या घडामोडींचाहि समावेश करावा लागेल.

सन १९२८ च्या सप्टेंबर महिन्यांत तारीख ४ रोजीं सरकारनें हें सुप्रसिद्ध पब्लिक सेफ्टी बिल असेंब्लीपुढें वादविवादासाठीं ठेवलें. हिंदुस्थानांत बोल्शेव्हिकपंथाचा किंवा कम्युनिस्टपंथाचा प्रसार थांबावा असा या बिलाचा उद्देश होता. यासाठीं जे कोणी परराष्ट्रीय लोक हिंदुस्थानांत या पंथाचा प्रचार करतील किंवा हिंदुस्थानांतील राज्ययंत्र मोडून टाकण्याची खटपट करतील त्यांना चौकशीवांचून हिंदुस्थानांतून हद्दपारीची शिक्षा देण्याचा गव्हर्नर जनरलला अधिकार असावा असा या बिलाचा

आशय होता. परंतु अशा रीतीनें वरवरून अगदीं थोड्या लोकांना जरी हें बिल लागू होणारें होतें तरी त्याचें स्वरूप व्यापक होतें. कम्युनिस्ट तत्त्वाचा प्रसार करणें व मिळकतीसंबंधीं हल्लीं असलेल्या पद्धतींत फेरफार करावा असें म्हणणें हा या बिलानें गुन्हा ठरविला होता. तसेंच परदेशाहून येणारा पैसाहि जप्त करण्याचें विचित्र कलम या बिलांत होतें ! वास्तविक, ब्रॅडले व स्प्रॅट हे दोन ब्रिटिश लोक या वेळीं हिंदुस्थानांत कम्युनिझमचा प्रचार करीत होते व त्यांना दडपून टाकण्याकरितां सरकारनें हें मोठें व्यापक बिल पुढें आणलें होतें ! श्री. न. चिं. केळकर यांनीं या बिलासंबंधीं विनोदी पण मार्मिक वर्णन करतांना म्हटलें, कीं " ज्यांना बिलाचा विचार लागू करायचा अशा व्यक्ती अगणित किंवा गुप्त नाहींत. त्या डोळ्यां-पुढें दिसत आहेत. येऊन जाऊन एकदा ब्रॅडलेचें नांव ऐकायचें व एकदा स्प्रॅटचें नांव ऐकायचें ! व या नांवांचा या क्रमानें कंटाळा आला तर नांवांची उलटापालट करून पुनः तींच नांवें घ्यायचीं ! या दोन नांवांची सरकारला एवढी भीति वाटावी हें आश्चर्य नव्हे काय? फार थोड्या लोकांना हें बिल लागू होणार हें त्या बिलांतील कलमांवरून दिसतें. मग असल्या प्रचंड बिलाचा एवढा उपद्व्याप कां ? " श्री. मा. श्री. अणे या बिलाविषयीं म्हणाले, " कोण कुठले दोन ब्रिटिश लोक हिंदुस्थानांत चळवळ करतात व त्यांना दडपून टाकण्याकरितां असलं हत्तीएवढं अजस्र बिल सरकार आणतं हा सर्वच मूर्खपणाचा प्रकार नव्हे काय ? तोंडावरील माशांचें निवारण करण्याकरितां त्यांच्यावर पट्ट्याचे हात फिरविले व त्यांत स्वतःचं नाक कापून घेऊन स्वतःस हास्यास्पद मात्र करून घेतलं, अशी स्थिति अखेर सरकारची होणार हें मी सरकारला निश्चयानें बजावतों. त्यांनीं हें बिल गाळून टाकून असल्या भानगडींत न पडावें हें उत्तम. " प्रथम म्हणजे १९२८ च्या सप्टेंबरांत जेव्हां हें बिल असेंब्लींत आलें तेव्हां त्यावर खुलासेवार बोलतांना लाला लजपतराय म्हणाले, " खरें म्हटलें तर हें बिल केवळ परदेशीय कम्युनिस्टांकरितां उपयोगांत आणायचं नसून हा केवळ चंचुप्रवेश आहे. हिंदुस्थानांतील राष्ट्रीय व मजूरपक्षीय पुढाऱ्यांच्या बाबतींतहि ह्या बिलाचा खात्रीनें उपयोग करण्यांत येईल. जर का हें बिल असें-

ब्लींत पास झालें तर या बिलांतील दुसऱ्या कलमाचा उपयोग करून हिंदुस्थानांतील आर्थिक व राजकीय लढे लढविणाऱ्या राष्ट्रीयांवरहि या बिलाची गदा आल्याशिवाय राहाणार नाहीं. या कायद्याच्या मागें खरोखर हाच हेतु आहे. हें कलम व्यापक आहे. कम्युनिस्टांच्या कृत्याला आळा घालण्याच्या किंवा असलीं कृत्यें करणाऱ्या कम्युनिस्टांना शिक्षा करण्याच्या कामींच केवळ या बिलाचा उपयोग करण्यांत येणार नाहीं. प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रीतीनें कायद्यानें प्रस्थापित झालेलं सरकार उलथून पाडण्याचा जो उपदेश करील त्याच्या बाबतींत हा कायदा लागू करतां येईल असे शब्द या कलमांत आहेत." एकंदरींत पोटांत एक व ओठांत एक असें सरकारचें धोरण दिसल्यामुळें लोकपक्षाला हें बिल मुळींच नको होतें, तर सरकारला तें बिल अवश्य पाहिजे होतें. तरीपण हें बिल सिलेक्ट कमिटीपुढें सोंपविण्यांत यावें असें तारीख १५ च्या सभेंत ६२ विरुद्ध ५९ मतांनीं ठरविण्यांत आलें. पुढें लवकरच सिलेक्ट कमिटीचा रिपोर्ट तयार होऊन तारीख २० रोजीं सरकारनें हें बिल रिपोर्टासह असेंब्लीपुढें मांडलें. नंतर ता. २४ रोजीं या बिलावर कडाक्याचा वादविवाद झाला व शेवटीं मतें घेण्यांत आलीं. तेव्हां दोन्ही बाजूला सारखींच मतें पडलीं. खरें म्हटलें तर सरकारला ६३ व लोकपक्षाला ६१ मतें पडायचीं. पण आयत्या वेळीं दोन युरोपियन सभासद गैरहजर होते. यांपैकीं सर जेम्स सिंप्सन हे सभागृहाच्या इमारतींत असतांहि दारें लावून घेतल्यामुळें बाहेर अडकून पडले. व दुसरें मि. लॅंब हे हॉटेलांत गेले. त्यांना यायला किंचित् उशीर लागला. अर्थातच दोन बाजूंस सारखींच मतें पडलीं. तेव्हां अध्यक्षाला मत देण्याचा अधिकार प्राप्त झाला. अशा वेळीं पटेलांनीं सरकारच्या विरुद्ध लोकपक्षाच्या बाजूनें आपलें मत दिलें व याप्रमाणें ६१ विरुद्ध ६२ मतांनीं या प्रसंगीं हें बिल गाळून टाकण्यांत आलें. मतमोजणीच्या वेळीं एक लहानसा प्रसंग घडला. तो असाः असेंब्लीचे सेक्रेटरी मतमोजणी करीत असतांना यापूर्वी गैरहजर असलेले युरोपियन सभासद सिंप्सन अध्यक्षाच्या मागल्या दारानें आंत येऊन मतमोजणीच्या सेक्रेटरीच्या टेबलाजवळ गेले. तेव्हां पटेल त्यांना म्हणाले, "अशा रीतीनें सभागृहांत प्रवेश करणं ही तुम्हीं मोठी चूक

केली आहे. सरकारचं या गोष्टीकडे लक्ष पाहिजे. लॉबीचे दरवाजे बंद असतांना एकाद्या सभासदानें दुसऱ्याच दारानें आंत शिरणें हें अगदीं चुकीचें कृत्य आहे."

पण हिंग गेला तरी त्याचा वास कांहीं काळ राहातो. त्याप्रमाणें पटेलांनीं हें बिल आपल्या जादा मतानें फेटाळून लावलें आणि मग कांहीं अँग्लो इंडियन व विलायती वर्तमानपत्रांनीं पटेलांच्या या कृत्याबद्दल कुचाळ्या केल्या. 'पायोनियर' या अलाहाबाद येथील अँग्लो इंडियन वृत्तपत्रानें जाहीर केलें, कीं पटेलांचें हें कृत्य अँग्लो इंडियन वृत्तपत्रांना व सरकारी अधिकाऱ्यानाहि निःपक्षपातीपणाचें आहे असें वाटत नाहीं. लंडनच्या 'डेली टेलिग्राफ' या वृत्तपत्राच्या बातमीदारानें जी बातमी पाठविली ती तारीख १० सप्टेंबर १९२८ च्या इंडियन डेली मेलमध्यें आलेली होती. त्या बातमीपत्रांत त्यानें लिहिलें, कीं "हें बिल रहित करून सरकारला चकविणारी सूचना पंडित मोतीलाल नेहरू यांनीं आणली व तींत ते यशस्वी झाले. व त्या सूचनेला अध्यक्ष पटेलांनीं दुजोरा दिला ही अगदीं सोईची गोष्ट केली याबद्दल त्यांचें अभिनंदन केलें पाहिजे! अध्यक्षांनीं या कृतीमुळें सरकारला नियम बदलण्याचीहि संधि दिली नाहीं! म्हणून पटेलांनीं दिलेला निर्णय हा अगदीं सौम्य भाषेंत बोलायचें तर तर्कशास्त्राला सोडून आहे असें मानण्यांत येत आहे. आणि विशिष्ट पक्षांतील सभासदांनीं दडपण आणल्यामुळेंच असा हा निर्णय करावा लागला असें जोरानें सुचविण्यांत येत आहे." असा हा लाघवीपणा करून या बातमीदारानें पटेलांच्या विरुद्ध विलायत सरकारचेहि कान फुंकण्यास कमी केलें नाहीं! आतां हिंदुस्थानांतला 'टाइम्स ऑफ इंडिया' काय म्हणाला पाहा! या मंथरारूप वृत्तपत्रानें ता. ८ सप्टेंबर १९२८ च्या च्या अंकांत लिहिलें, कीं "हें बिल जरूरीचें आहे, या सरकारच्या म्हणण्याचें महत्त्व लक्षांत न घेतां किंवा लॉ मेंबरचें म्हणणें त्यावर काय आहे तिकडेहि न पाहतां पटेलांनीं हें बिल नियमबाह्य ठरविलें; कारण त्या बिलाच्या प्रती आधीं नियमाप्रमाणें सभासदांना मिळाल्या नाहींत!" या विधानांत टाइम्सची फुसलावणी अगदीं उघड होते आणि यावरून टाइम्सनें पक्षपाताचा आरोप पटेलांवर केला हेंहि दिसतें. पायो-

नियरनें कांहीं गोष्टी या बाबतींत उजेडांत आणल्या. या वृत्तपत्राचा बातमीदार लिहितो, कीं " हा झगडा जर शुद्ध हेतूनें प्रेरित होऊन चालला असता तर त्याला कोणीं नावें ठेवलीं नसतीं परंतु कांहीं लक्षणें व डावपेच असे दिसूं लागले आहेत, कीं त्यांचा धिक्कारच केला पाहिजे. अध्यक्षांच्या अधिकाराला कमीपणा आणण्याचा सरकारचा डाव आहे यांत कांहीं शंका नाहीं. या वर्षी जें सरसेनापति-प्रकरण झालें तेव्हांपासून तर पटेलांचें नांव सरकारच्या ब्लॅक-लिस्टमध्येंच नोंदलें गेलें आहे ! "

याप्रमाणें अध्यक्ष पटेलांची नालस्ती चाललेली वाचून व ऐकून जेव्हां पब्लिक सेफ्टी बिल तहकूब करावें अशी सूचना नेहरूंनीं आणली व ती पटेलांनीं मान्य केली, तेव्हां हा सगळा पूर्वी रचलेला कट आहे असें एक सरकारी सभासद म्हणाले. पटेल हे पक्के आमच्याविरुद्ध आहेत असेहि उद्गार सरकारी सभासदांनीं काढले. असेंब्लींतील लोकपक्षाचे पुढारी भयंकर संतापून गेले. आणि त्यांनीं तरी कां संतापूं नये ? त्यांचा हा प्रकोप योग्य व सकारण होता. अध्यक्षासारख्या मानाच्या व उच्च दर्जाच्या जागेवर असलेल्या अधिकाऱ्यावर अशा जाहीर व निंद्य रीतीनें शिंतोडे उडविणें हें त्या वृत्तपत्रांना मुळींच शोभणारें कृत्य नव्हतें. एवढेंच नव्हे, तें अत्यंत गैरशिस्तीचें व अयोग्य होतें. परंतु सूर्यावर थुंकी टाकणाऱ्यांची जी फजिती होते तीच अखेर टाइम्स व डेली टेलिग्राफ यांची झाली. कॉंग्रेसचे पुढारी मानधन पंडित मोतीलाल नेहरू यांनीं तारीख १४ सप्टेंबर १९२८ या दिवशीं असेंब्लींत या खोडसाळ वृत्तपत्रांचा तीव्र निषेध करणारा ठराव आणला व त्यांत त्यांनीं पटेलांची नाचक्की अँग्लो इंडियन व विलायती वृत्तपत्रांनीं कशी चालविली ह्याचा पाढा वाचला. तेव्हां असेंब्लींत लोकपक्षानें धिक्काराच्या गर्जना केल्या. शेवटीं नेहरू म्हणाले, " आतांपर्यंत अध्यक्ष पटेल यांच्याबद्दल संशयपूर्ण कुजबुज चालू होतीच. पण आतां त्यांच्यावर सरकारी लॉबीतून उघड उघड पक्षापाताचे आरोप करण्यांत येत आहेत. " नेहरूंच्या भाषणानंतर अध्यक्ष पटेल म्हणाले, " या वादांत एकंदर चार मुद्दे आहेत. पहिला मुद्दा टाइम्स ऑफ इंडियाच्या बातमीदाराची वर्तणूक, दुसरा मुद्दा लंडन डेली टेलिग्राफच्या सिमल्याच्या बातमीदाराची वर्तणूक, तिसरा मुद्दा

सरकारनें अध्यक्षांची फैलावलेली नाचक्की व चौथा मुद्दा म्हणजे विशिष्ट सरकारी अधिकाऱ्यांनीं अध्यक्षांची पसरविलेली नाचक्की. या चारहि मुद्द्यांचा विचार करता मला आतां वाटूं लागलें आहे, कीं मी कैदी आहें कीं असेंब्लीचा अध्यक्ष आहे ? कारण माझ्या हालचालीवर कैद्यावर असावी तशी कित्येकांची नजर आहे." आणि खरोखरी तशीच स्थिति होती. कारण पटेलांच्या विरुद्ध कांहीं वर्तमानपत्रांनीं जें काहूर उठविलें होतें त्याला एक तात्कालिक कारणहि असेंच झालें. तें असें कीं पब्लिक सेफ्टी बिल सोमवारीं असेंब्लीच्या बैठकींत यायचें आहे ही बातमी शनिवारीं पं. मोतीलाल यांस समजली. लगेच त्यांनीं त्या दिवशीं रात्रीं पटेलांना टेलिफोनवर बोलावून सदर बाबतींत कांहीं कायद्याचीं पुस्तकें मागितलीं. पटेल यांनीं त्यांस पुस्तकांची यादी पाठविण्यास सांगितलें. यादी रविवारी सकाळीं येतांच ती त्यांनीं सेक्रेटरीमार्फत परभारें लायब्रेरियनकडे पाठविली व लायब्रेरियनकडून तीं पुस्तकें पं. मोतीलाल यांस पोचतीं केलीं. ही गोष्ट बाहेर समजून पटेल यांच्याच सांगण्यावरून नेहरू यांनीं बिलविरुद्ध मुद्दा उपस्थित केला असें एक सरकारी अधिकारी बोलल्याचें पटेल यांस समजलें. अधिक चौकशी केल्यावर पटेलांना कळलें, कीं सदर अधिकाऱ्यानें लायब्रेरियनला बोलावून आणून त्याजपासून वरील माहिती काढली व तिचा आधार घेऊन टाइम्स व डेली टेलिग्राफ यांनीं पटेल यांची सर्वत्र नाचक्की केली. याचा पटेलांना अर्थातच राग आला व म्हणूनच त्यांनीं आपण अध्यक्ष, कीं कैदी असे उद्‌गार काढले व त्यासंबंधानेंच वर उल्लेख आलेला आहे. टाइम्स व डेली टेलिग्राफ यांच्या बातमीदारांनीं पटेलांवर केलेले आरोप सर्वस्वीं खोटे असल्यामुळें त्यांनीं आपली माफी मागावी असें पटेलांनीं सांगितलें. परंतु या बातमीदारांनीं माफी तर मागितली नाहींच; उलट, एका बातमीदारानें तर जखमेवर मीठ चोळल्याप्रमाणें पटेलांना लिहिलें, कीं मला माफी मागण्याचें कारण नाहीं. सभागृहांतील निरनिराळ्या पक्षाच्या लोकांनीं जीं विधानें केलीं त्यांवरच माझीं विधानें आधारलेलीं होतीं. अर्थात् बातमीदारांच्या या म्हणण्यानें त्यांचें अध्यक्षाच्या निंदेचें कृत्य कधींहि समर्थनीय ठरणार नव्हतें हें उघड आहे. जेव्हां त्या बातमीदारानें याप्रमाणें माफी न मागतां उलट

उद्धटपणा दाखविला तेव्हां पटेलांनीं तारीख २५ सप्टेंबर १९२८ च्या बैठकींत सांगितलें, कीं माझें काम अतिशय अवघड आहे व त्यांत मला हिंदी वृत्तपत्रांचा एकंदरीनें पाठिंबा आहे याची मला पूर्ण जाणीव आहे. मला या बातमीदाराविरुद्ध कांहींहि इलाज करण्याची इच्छा नव्हती. परंतु तसें इलाज करण्यास त्यांनींच मला भाग पाडलें आहे. त्यांच्या वर्तणुकीचा सर्व असेंब्लीनें कसा धिक्कार केला याची जाणीव होऊन त्यांना वास्तविक आपल्या कृत्याचा पश्चाताप व्हायला पाहिजे होता. परंतु तसें झालें नाहीं. तेव्हां अशा परिस्थितींत मी निर्णय देतों, कीं या बातमीदारांना असेंब्लींत बसण्याचें जे प्रेस पास दिले आहेत तें त्यांचे पास यापुढें बिनमुदत रद्द केले जात आहेत. व त्यांना यापुढें असेंब्लींत येण्याची मनाई आहे. परंतु मध्यंतरी जर त्यांनीं अध्यक्षांची संपूर्ण माफी मागितली व ती अध्यक्षांना पसंत पडून त्यांना वाटतील त्या वृत्तपत्रांत प्रसिद्ध झाली तर त्यांना असेंब्लीच्या बैठकीला हजर राहातां येईल." शेवटीं १९२९ च्या जानेवारी महिन्यांत म्हणजे चार महिन्यांच्या उशिरानें का होईना टाइम्सच्या मालकांनीं व बातमीदारानें आपल्या विधानांबद्दल पटेलांची सपशेल लेखी माफी मागितली. या दोन्ही माफीपत्रांवरील तारीख २१ जानेवारी १९२९ अशी आहे. त्यानंतर अर्थातच टाइम्सच्या बातमीदाराला प्रेस पास देण्यांत आला.

या ठिकाणीं पब्लिक सेफ्टी बिलाचा पहिला अंक संपला व त्यांतून उद्भवलेल्या इतर गोष्टींचा निकाल लागला. आतां या बिलाच्या दुसऱ्या अंकाची हकीगत पाहूं.

## दुसरा अंक : पटेलांनीं टाकलेला पेच

१९२८ मध्यें अध्यक्षाच्या जादा मतानें फेटाळलें गेलेलें हें बिल १९२९ त पुन्हा असेंब्लीपुढें आलें. व त्यांवर फेब्रुवारी महिन्यांत तारीख ४ पासून चार दिवस लांबलचक चर्चा होऊन शेवटीं लोकपक्षाचा ११ मतांनीं पराभव झाला. व बिल सिलेक्ट कमिटीकडे पाठविण्याचें ठरलें. वास्तविक सरकारचाच पराजय व्हायचा पण एकट्या स्वराज्यपक्षाचे १२ सभासद गैरहजर होते. शिवाय स्वतंत्र व मुसलमान पक्षांनीं गोता दिला. त्यामुळें उभय

पक्षांत इतकें अंतर पडलें, नाहीं तर पडलें नसतें. सिलेक्ट कमिटीकडून तें बिल एक महिन्यांतच परत आलें व त्यावर आतां असेंब्लींत विचार व्हायचा होता. परंतु दरम्यान सरकारनें कम्युनिस्टांवर जंगी मोहीम काढली व तारीख २० मार्च रोजीं सकाळीं मिरत येथील डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेटच्या हुकमान्वयें ३१ गृहस्थांस अटक करण्यांत आली व त्यांना मिरत येथें नेण्यांत आलें. हिंदुस्थान सरकारनें धरपकडीचें हें सत्र सुरू केल्याचें कानीं पडतांच असेंब्लींतील लोकपक्षीय पुढाऱ्यांनीं सरकारी धोरणाची छाननी करण्यासाठीं सभातहकुबीची सूचना आणून नंतर सरकारी धोरणावर वादविवाद करण्याची इच्छा प्रगट केली. परंतु कोर्टापुढें आतां हा खटला चालू आहे, सबब जो विषय कोर्टापुढें अनिर्णीत असेल त्याची चर्चा कायदेकौन्सिलांत करतां येत नाहीं या मुद्द्यावर सरकारनें आपल्या धोरणावर वादविवाद करण्याची परवानगी लोकपक्षाला दिली नाहीं. परंतु याप्रमाणें असेंब्लीची मुस्कटदाबी करीत असतांना सरकारला हें समजलें नाहीं, कीं त्यांचा डाव त्यांच्यावर लवकरच उलटणार होता. कारण सरकारनें ज्या वेळीं तारीख २ एप्रिल रोजीं पब्लिक सेफ्टी बिल असेंब्लीपुढें आणलें तेव्हां अध्यक्ष पटेलांनीं एक मोठी अडचण सरकारच्या मार्गांत उभी केली. ती अशी : पब्लिक सेफ्टी बिलाचा उद्देश हिंदुस्थानांत कम्युनिस्ट लोकांच्या चळवळीला प्रतिबंध घालावा हा आहे. आणि त्यांतील कलमें या उद्देशानेंच घडविलेलीं आहेत. नुकतेंच सरकारनें ज्या ३१ कम्युनिस्ट इसमांना पकडून मिरतला नेलें, त्यांत निदान दोन म्हणजे स्प्रॅट व ब्रॅडले हे तरी असे आहेत, कीं ज्यांच्या उच्चाटनाकरितांच कांहीं अंशीं प्रस्तुत बिलाचा अवतार झालेला आहे असें म्हणतां येईल. अर्थात् न्यायकोर्टापुढें चालणारा खटला व असेंब्लीपुढें चर्चेला निघणारें हें पब्लिक सेफ्टी बिल यांचा परस्परसंबंध आहे म्हणून असेंब्लीच्या नियमाप्रमाणें कोर्टापुढें चाललेल्या खटल्याबद्दल असेंब्लींत कांहीं बोलतां येत नाहीं. आणि हें बिल तर असें होतें, कीं त्यावर चर्चा चालू असतांना मिरतच्या खटल्याबद्दल बोलावेंच लागलें असतें. किंबहुना याच मुद्द्यावर पं. नेहरू यांना तहकुबीची सूचना मांडण्याला व्हाइसरॉयसाहेबांनीं आपल्या अधिकारांत हरकत घेतली होती. अर्थात् अध्यक्ष पटेल यांनीं तीच

अडचण सरकारपुढें या बिलाच्या चर्चेच्या वेळीं आणली; म्हणून प्रथमच त्यांनीं उठून सांगितलें, कीं " अशा कारणांकरितांच या बिलाची चर्चा तूर्त होणें अनिष्ट आहे. या वादविवादांत या खटल्याचा संबंध, असा नाहीं तसा पदोपदीं येणार व सभासदांना पदोपदीं प्रतिबंध करावा लागणार. याकरितां सरकारनें आपण होऊन एक खटला तरी परत घ्यावा किंवा बिल तरी परत घ्यावें. परंतु खटला चालू असतांना बिलावर चर्चा करतां येत नाहीं. तरी सरकारनें याचा विचार करावा. " अशा रीतीनें सरकारनें तरी आपलें बिल परत घ्यावें किंवा अध्यक्षांनीं तरी आपला हुकूम चालवून बिलाचा वादविवाद बंद पाडावा असा पेच पटेलांनीं सरकारपुढें उत्पन्न केला व पहिल्यांदाच अध्यक्षांनीं या बिलाची चर्चा थांबवून पुढचें बिल म्हणजे ट्रेड डिस्प्यूट्स् बिल चालू करण्यासंबंधानें सर बी. एन्. मित्र यांना आवाहन केलें. अध्यक्ष पटेल यांची ही सूचना व निश्चय पाहून सरकारपक्ष सर्वस्वीं चकित झाला; व सर बी. एन्. मित्र हे आपलें बिल मांडण्याला उभे राहिले तेव्हां होम मेंबर व दुसरे कित्येक एक्झिक्यूटिव्ह कौन्सिलचे सभासद व्हाइसरॉय लॉर्ड आयर्विन् यांच्याशीं संगनमत करण्याकरितां निघून गेले. आणि या प्रश्नाचा निकाल करण्याकरितां दररोज एक्झिक्यूटिव्ह कौन्सिलाच्या सभा होऊं लागल्या.

पुढें गुरुवारीं सकाळीं प्रारंभीं होम मेंबर क्रेरार यांनीं सरकारतर्फेचा खुलासा वाचून दाखविला. त्यांत ते म्हणाले, "बिलांतील तत्त्वाची यापूर्वींच पुरेशी चर्चा झालेली आहे. आतां मुख्यतः सिलेक्ट कमिटीकडून जसें बिल बदलून आलें आहे त्याचा विचार करायचा आहे. अध्यक्ष जो अधिकार आपणाला आहे असें म्हणतात तो त्यांना मुळींच नाहीं. अध्यक्षाला कोणत्याहि रीतीनें सरकारी कामकाज थांबवितां येत नाहीं. म्हणून अध्यक्षानीं जें सांगितलें, कीं खटला तरी परत घ्या नाहींतर बिल तरी मागें घ्या, तें आम्हांला मान्य करतां येत नाहीं. आमची जबाबदारी पार पाडण्यासाठीं हें बिल पास होणें ही अगदीं निकडीची गोष्ट आहे. तसेंच सार्वजनिक हितासाठीं जो खटला मिरत येथें चालू आहे तोहि काढून टाकतां येत नाहीं. " या खुलाशांत सरकार काय वाटेल तें झालें तरी आपण होऊन पब्लिक सेफ्टी बिलाची चर्चा थांबविणार नाहीं असा आपला

निश्चय असल्याचें होम मेंबरनीं सांगितलें. इतकेंच नव्हे तर वर उल्लेखल्याप्रमाणें " अध्यक्ष जो अधिकार आपणाला आहे असें म्हणतात तो त्यांना मुळींच नाहीं- " असें आपलें निश्चयात्मक म्हणणें आहे असेंहि होम मेंबर यांनीं बजावलें ! " बिल व याचा अर्थाअर्थी संबंध नाहीं. दोन्ही आम्ही बरोबर चालू ठेवणार. वादविवादांत दोघांचा परस्पर संबंध कोणीं भाषणात आणूं नये म्हणजे झालें. " क्रेरार यांच्या भाषणानंतर पं नेहरू, सर डार्सी लिंडसे व मालवीयजी यांनीं सरकारच्या खुलाशाचा विचार करण्यास वेळ मिळावा असें सांगितलें. तेव्हां ती गोष्ट अध्यक्षांनीं मान्य केली व दरम्यान आपल्या कैफियतीच्या लेखी प्रती सर्व पक्षांना देण्याचे फेरार यांनीं कबूल केलें. दुसऱ्या दिवशीं म्हणजे शुक्रवारीं निरनिराळ्या पक्षांच्या पुढाऱ्यांनीं सरकारच्या खुलाशासंबधानें आपलें मत प्रगट केलें. फक्त अध्यक्ष पटेल यांनीं आपला निकाल सोमवारपर्यंत सांगण्याचें तहकूब ठेवलें.

## तो विलक्षण दिवस !

पुढच्या सोमवारीं म्हणजे तारीख ८ एप्रिल रोजीं दोन प्रहरीं या बिलाचा निकाल होणार हें निश्चित असल्यामुळें हा सामना पाहाण्याला प्रेक्षकांच्या व इतर गॅलरींतून बेसुमार गर्दी जमली होती. यावेळीं सरजॉन सायमनहि हजर होते. १२-३० वाजतां अध्यक्षांनीं प्रथम ट्रेड डिस्प्यूट्स् बिल पास झाल्याचें जाहीर केलें. आतां पब्लिक सेफ्टी बिलावर निर्णय देण्याचीच वेळ आली. त्या दिवशीं सभागृहांत सुमारें ५०० माणसें होतीं. त्या वेळीं अध्यक्ष काय निर्णय देणार इकडे सर्वांचें एकाग्रतेनें लक्ष लागलें असल्यानें सभागृहांत कमालीची शांतता होती. लिहून आणलेल्या निर्णयाचे कागद हातांत घेऊन अध्यक्ष पटेल उभे राहिले व " आतां ट्रेड डिस्प्यूट्स् बिल निकालांत निघालें असल्यानें मी पब्लिक सेफ्टी बिलावरील निर्णय देण्यास सुरवात करतों " इतकेच शब्द त्यांच्या तोंडून निघतात तों एक अकल्पित प्रसंग सभागृहांत घडून आला. कारण अध्यक्ष पुढें बोलायला सुरवात करणार एवढ्यांत तोफेचा गोळा सुटल्यासारखा एक मोठा आवाज झाला, पुरुषभर उंचीची एक ज्वाला निघाली व लोकांचे डोळे क्षणभर मिटले गेले.

आधीं कांहींच वार्ता किंवा अदमास नसतां एकाग्र व शांततामय अशा सभागृहांत अध्यक्षांच्या तोंडून गंभीर शब्द बाहेर पडत असतां एकदम कानाला बधिरता आणणारा आवाज व डोळ्याला अंधेरी आणणारा चमचमाट व्हावा हा अत्यंत आश्चर्यजनक असाच प्रकार होता. आवाज होतांच एकदम धुराचा लोट उठला. त्यानें सभागृह भरून गेलें आणि सर्व बाजूंनीं उग्र दर्प येऊं लागला. धुरामुळें शेजाऱ्याला शेजारी दिसेना पण आवाज व धूर यांच्यामुळें बॉंबगोळा फेकला असावा अशीच कल्पना सर्वांना आली. पण तो कोणीं कोठून फेकला याची कोणालाच त्या वेळीं कल्पना होईना. खालीं सभागृहांत व वर गॅलऱ्यांतून गडबड व धावपळ सुरू झाली. प्रेक्षकांच्या गॅलरींतील स्त्रिया ओरडूं लागल्या. ज्याला जी वाट सांपडेल त्या वाटेनें तो बाहेर पडूं लागला. मात्र अध्यक्ष पटेल आपल्या खुर्ची समोरच उभे होते व सारा प्रकार विस्मयानें पहात होते. व क्रेरार आणि एक्झिक्यूटिव्ह कौन्सिलचे इतर सभासद आपल्या जागींच बसले होते. इतक्यांत धूर किंचित् बसला, यामुळें सभागृहांतील व गॅलरींतीलहि माणसें एकमेकांना दिसूं लागलीं. तेव्हां बॉंब फेकला तो कोणीं तरी वरूनच फेकला या कल्पनेनें सभासदांची दृष्टि वर गेली तों अध्यक्षांच्या बरोबर समोर असलेल्या दक्षिणेकडील गॅलरींत दोन माणसें उभीं आहेत व त्यांतील एक मनुष्य दुसरा एक बॉंब हातांत घेऊन तो उंच करून जोरानें फेकीत आहे असें दिसलें. व तोहि एक निमिषानें मागील सरकारी सभासदांच्या बाकावर खालीं येऊन पडून फुटला व त्यामुळें पहिल्यापेक्षांहि मोठा आवाज झाला. प्रचंड ज्वालेचा लोट निघाला. पण त्याचा धूर पहिल्या इतका झाला नाहीं. या मनुष्याला प्रतिबंध करण्याला कोणी पुढें सरसावला तर नाहींच, पण खालून कोणाला हां हां म्हणण्याला देखील वेळ नव्हता. खालचे लोक वर हात करून, "तो पाहा, त्याला पकडा" असें म्हणत असतां त्यानें हातांतील तांबड्या रंगाची छापील हस्तपत्रकें खालीं सभागृहांत फेकलीं व हातांत पिस्तूल घेऊन तें सरकारी सभासदांवर रोखून त्यानें दोन तीन आवाजहि काढले. यावेळीं सभागृहांत फारच थोडे सभासद राहिले होते व प्रेक्षकांची गॅलरी वर सर्व रिकामी झाली होती. फक्त दोन

गृहस्थ भगतसिंग व दत्त हे आपल्या जागीं प्रेक्षकांच्या गॅलरींत निश्चल उभे होते. पोलिसहि त्यांच्या जवळ जाण्यास धजेनात. पण त्यांच्या भीतीचें कारण लवकरच कमी झालें. भगतसिंगानें पिस्तूल खिशांत घातलें, दुसऱ्या हातांतली साहेबी टोपी डोक्यावर घातली आणि दोघेहि हात झाडून पोलिसांच्या स्वाधीन होण्याकरितां जागच्या जागीं उभे राहिले. म्हणजे आतां ते कांहीं इजा करणार नाहींत असें जेव्हां समजलें तेव्हां मग त्यांना पोलिसांनीं पकडलें.

हा सर्व वर वर्णिलेला अद्भुत प्रकार चारदोन मिनिटांतच झाला. एकंदर पांच लोकांना जखमा झाल्या. पण कोणी ठार झाला नाहीं. हा गोंधळ संपण्याच्या सुमारास अध्यक्ष पटेल उठून आपल्या खोलींत गेले व अशा रीतीनें अध्यक्षाची तहकुबी जाहीर न करतां ही सभा बरखास्त केली ! फिरून सुमारें पंधरा मिनिटांनीं ते बाहेर आले आणि सभासद जागेवर बसतात न बसतात तोंच "गुरुवार तारीख ११ एप्रिलपर्यंत सभा तहकूब ठेवली आहे" इतकेंच जाहीर करून ते फिरून आपल्या खोलींत गेले. या सुमाराला सगळ्या सभागृहाला पोलिसांचा वेढा पडला. सभागृहाची आंतून बारकाईनें तपासणी सुरू झाली. व बाहेरचे दरवाजे बंद करून फक्त एका दरवाजानें नीट पाहून माणसें बाहेर सोडावीं असा हुकूम झाला. गुरुवारच्या आदल्या दिवशीं कित्येक पुढारी पटेलांना भेटले व आपला कल निर्णयाच्या बाबतींत काय आहे अशी त्यांना विचारणा केली. पटेलांची गुरुवारची तयारी पूर्ण झालेली होती. तरी पण त्यांनीं या वेळीं पुढाऱ्यांना एवढेंच सांगितलें, कीं "मला कांहीं माहिती नाहीं." माझा परमेश्वरावर पूर्ण भरंवसा आहे. तोच मला मार्ग दाखवील !!

ठरल्याप्रमाणें गुरुवार तारीख ११ एप्रिल रोजीं असेंब्लीची सभा झाली. पुष्कळ सभासद गांवीं गेल्यामुळें स्वराज्य पक्षाचा बाकांवर शुकशुकाट दिसत होता, प्रथम अध्यक्ष पटेल यांनीं सोमवारीं घडलेल्या प्रकारासंबंधानें खेद व निषेध प्रदर्शक ठराव मांडला व तो विन बोलतां मंजूर झाला. त्यावर भाषणें अशी कोणाचींच झालीं नाहींत. नंतर त्यांनीं पब्लिक सेफ्टी बिलासंबंधानें आपला लेखी निकाल वाचून दाखविला. त्यांत ते म्हणाले,

"सरकारचें पत्रक हें आम्हांला एक प्रकारचें आव्हान आहे व आमच्या अधिकाराला कमीपणा आणण्याचा सरकारचा मानस आहे. माझी अशी पक्की खात्री झाली आहे, कीं जोंपर्यंत मिरतचा खटला चालू आहे तोंपर्यंत या बिलावर वादविवाद करणें शक्य नाहीं. आणि आहे त्या परिस्थितींत जर वादविवाद चालू ठेवला तर तें एक कपट किंवा फार्स होईल. असेंब्लींतील कामकाजावर अध्यक्षाला हुकमत चालविण्याचा पूर्ण अधिकार आहे असें आमचें म्हणणें आहे. आणि जे अधिकार प्रत्यक्ष लेखी दिलेले नाहींत ते अप्रत्यक्षरीत्या अध्यक्षाला चालवितां येतात. म्हणून हें बिल नियमबाह्य ठरवून तें फेटाळून लावण्याचा अधिकार अध्यक्षाला आहे. खरें म्हटलें तर सरकारनें विचारल्याशिवाय त्यांना मीं कोणत्याहि बाबतींत सल्ला देण्याचें टाळलें आहे. परंतु उगीच विरोध वाढू नये म्हणून मीं मागें सरकारला या बिलाबाबतींत सल्ला दिला दुःखाची गोष्ट ही, कीं सरकारनें आमचा सल्ला स्वीकारला नाहीं आणि म्हणून हा विरोध अपरिहार्य झाला आहे. परंतु ज्या वेळीं अध्यक्षांच्या हातच अधिकार सरकार आपल्या हातांत घेऊं पाहातें त्या वेळीं सरकारला हा विरोध आम्हीं केलाच पाहिजे. असेंब्लींत कोणतें बिल आणावें, आणूं नये हें ठरविण्याचे सरकारला जरी अधिकार असले तरी तें मर्यादित आहेत. बिलाचा निर्णय करण्याचं काम असेंब्लीचं आहे, अध्यक्षाचं नव्हे हें जरी खरं मानलं तरी अध्यक्षाला जर असं आठवलं कीं बिलाची चर्चाच होणं अशक्य आहे तर ती तशी होऊं न देणं अध्यक्षाच्या अधिकारांतलं आहे. गेल्या वेळेला या बिलावर जीं भाषणं झालीं तीं होत असतांना कोर्टांपुढं चाललेल्या मीरतच्या खटल्याचा वारंवार उल्लेख झाल्याशिवाय खरी चर्चाच होणं अशक्य होतं. परंतु त्या खटल्याचा असा उल्लेख येत असतांना या बिलावरील चर्चा चालू देणें ही गोष्ट अनिष्ट व नियमबाह्य आहे. सरकार म्हणतें, कीं यापूर्वीच बिलाचा विचार असेंब्लीनें केला असल्यानें अध्यक्षाला यापुढील चर्चा झाल्यास ती थांबविण्याचा अधिकार नाहीं. परंतु ही समजूत चुकीची आहे. कारण खरा मुद्दा असा आहे, कीं कोणतंहि बिल मताला घालण्यापूर्वी तें कोणत्याहि वेळीं नियमबाह्य ठरविण्याचा अधिकार अध्यक्षाला आहे. सदर बिलावर

समंजसपणाची चर्चा होणं सध्याच्या परिस्थितींत अशक्य आहे एवढंच नव्हे तर मुळीं या बिलावर चर्चाच करणं अशक्य आहे. कारण चर्चा चालू असतांना मिरतच्या खटल्याचा वारंवार उल्लेख होणं अपरिहार्य आहे. सरकार म्हणतं, कीं "खटला व बिल याचा अर्थाअर्थी कांहीं संबंध नाहीं, दोनहि आम्ही बरोबर चालू ठेवणार. वादविवादांत परस्पर संबंध कोणी भाषणांत आणलाच तर तसें करण्याला अध्यक्षांना हरकत घेता येईल आणि ती त्यांनीं खुशाल घ्यावी व बिलांवरील चर्चेत खटल्याचा उल्लेख गाळून टाकावा. त्याला आमची हरकत नाहीं; व त्याला आम्ही मदतच करूं" परंतु हें सरकारचं म्हणणं अन्यायाचं आहे कारण जे लोक या बिलावर बोलणार त्यांना तुम्ही खटल्याचा संबंध आणूं नका असं म्हणणं म्हणजे त्यांचं भाषण स्वातंत्र्य नाहींसं करण्यासारखं आहे. या सर्व गोष्टी ध्यानांत घेऊन मी असा निर्णय देतों, कीं "या बिलाची चर्चा केली तर ती नियमबाह्य होणार असल्यानें हें बिल काढून टाकण्यांत येत आहे."

याप्रमाणें पटेलांनीं निर्णय देतांना आपलें पूर्वींचेंच म्हणणें प्रस्थापित करून उलट बाजूचे सर्व मुद्दे खोडून काढले. अशा रीतीनें या बिलाला या बैठकीपुरती मूठमाती देण्यांत आली. नंतर व्हाइसरॉयांकडून आलेला संदेश वाचून दाखवून त्यांनीं सभा शुक्रवारपर्यंत तहकूब केली. या सर्व कामाला सुमारें अर्धा तासच लागला. या संदेशांत व्हाइसरॉयसाहेबांनीं असें लिहिलें होतें कीं "मी स्वतः उद्यां येऊन असेंब्लीच्या सभासदांना उद्देशून भाषण करणार आहें, तरी सर्वांनीं यावें." या संदेशामुळें पुन्हा कल्पनेला अवसर मिळाला व अनेक तर्कवितर्क सुरू झाले.

दुसऱ्याच दिवशीं म्हणजे शुक्रवारीं लॉर्ड आयर्विन यांनीं येऊन उभय कायदेमंडळांच्या सभासदांना उद्देशून भाषण केलें. त्यांत त्यांनीं प्रथम सोमवारच्या अत्याचारावर धर्मोपदेशकाप्रमाणें ठराविक प्रवचन केलें. नंतर पब्लिक सेफ्टी बिलासंबंधीं अध्यक्षांच्या निकालाविषयीं आपला मतभेद प्रगट करून लॉर्डसाहेबांनीं दोन गोष्टी जाहीर केल्या. पहिली अशी, कीं ज्या नियमाच्या अभावामुळें अध्यक्षांना असा निकाल देतां आला तो आम्ही बदलून घेणार व पब्लिक सेफ्टी बिलाऐवजीं ऑर्डिनन्स–वटहुकूम–काढणार.

असें घडणार ही बोलवा होतीच. पण दुर्दैवाची गोष्ट ही कीं या वेळीं तेथल्या तेथें पटेलांना उत्तर देण्याची संधि मिळाली नाहीं. शेवटीं अध्यक्षांनीं लॉर्ड आयर्विन यांना पोचवून परत आल्यावर असेंब्ली बिनमुदत तहकूब केली असें जाहीर केलें.

शनिवारीं म्हणजे तारीख १३ एप्रिल या दिवशीं बिलाचीं कलमें ज्यांत समाविष्ट आहेत असा वटहुकूम काढण्यांत आला.

आतां असेंब्लीच्या नियमांत तेवढा फरक करायचा राहिला. त्या योगानें अध्यक्षाचे अधिकार मर्यादित केले जाणार होते. हा फरक ऑगस्ट-मध्यें करण्यांत आला. व असें ठरविण्यांत आलें, कीं कायद्याप्रमाणें अध्य-क्षाला स्पष्टपणें अधिकार दिले असल्याशिवाय त्यानें कोणतेंहि बिल थांबवून धरूं नये. या नव्या नियमानें अध्यक्षाच्या व असेंब्लीच्या हक्कांवर अतिक्र-मण झालें आहे असें असेंब्लींतील बिनसरकारी सभासदांचें म्हणणें आहे.

सरकारला अशा रीतीनें नियम बदलणें भाग पडलें. यावरून एक महत्त्वाची गोष्ट उघड होते, कीं नियमाचा बदल होण्यापूर्वी पटेलांनीं बिलाचें बाबतींत जें केलें तें सर्वस्वीं योग्य होतें. कारण तसें नसतें तर नियमांत बदल करण्याची सरकारला आवश्यकता भासली नसती. परंतु नियमांत जरी बदल झाला तरी त्याचा मागच्या घडामोडींवर कांहीं परिणाम होणार नस-ल्यानें अध्यक्ष पटेलांनीं दिलेला निर्णय हा कायम होता. व तसा तो होता म्हणून निराळा वटहुकूम काढून सरकारला बिलाची अंमलबजावणी करावी लागली. परंतु गंमत अशी आहे, कीं जरी नवा नियम झालेला असला तरीहि अध्यक्षाचे जे स्वाभाविक हक्क असतात त्यांना अनुसरून यापुढें जर बिलाचा वाद निघाला तर पूर्वींसारखा निर्णय ते देऊं शकले असते असें कित्येकांचें मत होतें. असो.

## अखेरीस प्रकरण मिटलें

तरीपण तारीख १२ एप्रिल रोजीं व्हाइसरॉय यांनी असेंब्लींत जें भाषण केलें त्याचा लोकपक्षाला राग आला व अध्यक्षांच्या अधिकारांना कमीपणा

आणून त्यांचा व्हाइसरॉयांनीं अपमान केला आहे असे कित्येक पुढाऱ्यांनीं उद्गार काढले. पटेलांनींहि या बाबतींत तारीख ८ मेच्या पत्रांत व्हाइसरॉयसाहेबांना लिहिलें कीं " तुम्हांला दोन्ही कायदेमंडळें बोलावून त्यांच्यासमोर भाषण करण्याचा जरी अधिकारी असला तरी त्यांत तुम्हीं या प्रसंगाचा उपयोग अध्यक्षांच्या निर्णयावर टीका करण्याकडे जो केलात तो विलक्षण होता आणि त्यामुळें असेंब्लीच्या योग्यतेला तुम्ही बाध आणला आहे. तुमची ही कृति मला पसंत होणें शक्य नाहीं. म्हणून तिचा मी तीव्र निषेध प्रदर्शित करतों. तुम्हींच तेव्हां स्पष्ट म्हणालांत, कीं कायदेकौन्सिलांच्या नियमांचा अर्थ उलगडून सांगण्याचें काम फक्त अध्यक्षांचेंच आहे. असें असतांना मीं केलेल्या नियमांच्या अर्थानें तुमचें समाधान होऊं नये याचें आश्चर्य वाटतें. माझा अर्थ मूळ नियमाच्या उद्देशाविरुद्ध आहे. तसेंच माझ्या निर्णयानें सरकारी कामें जबाबदारीनें पाडण्यांत अडथळा येत आहे, हीं व इतर जीं विधानें तुम्हीं केलीं त्यामुळें माझ्या निर्णयाचा तुम्हीं उपमर्द केला असेंच सिद्ध होतें. तुम्हांला जर माझ्या कृत्याबद्दल नापसंती दाखवायची होती, तर तुम्हीं सरळ एकदा ठराव असेंब्लीपुढें आणून दाखवायचा होता. इतर दुसऱ्या कोणत्या मार्गानीं सभापति अध्यक्षाच्या निर्णयावर सभागृहांतच टीका करणें योग्य नाहीं. अजूनहि मला वाटतें, कीं मी जो निर्णय केला तोच बरोबर आहे व आतांहि तुमच्या भाषणावर मीं जे आक्षेप घेतले आहेत तेहि बरोबर आहेत. कारण कुठल्याहि वसाहतींमधील कुठल्याहि पार्लमेंटांत तुमच्यासारख्या राजप्रतिनिधीनें अध्यक्षाच्या निर्णयावर टीका केलेली नाहीं. "

या पत्राचें उत्तर लॉर्ड आयर्विन यांनीं तारीख १५ मे रोजीं पटेलांना लिहिलें. त्यांत ते म्हणतात, "अध्यक्षाचे अधिकार आपल्याला मान्य आहेत व त्या अधिकाराबद्दल शंका घेण्याचा माझा हेतु नव्हता व तशी कोणाची समजूत झाल्यास मला खेद होतो. अध्यक्षांच्या निर्णयाचा उपमर्द करावा अशी माझी मुळींच इच्छा नव्हती." याप्रमाणें नमत्या सुरांत आयर्विन यांनीं पत्र पाठविल्यामुळें पटेलांची व त्यांची दिलजमाई झाली. व पुढें सप्टेंबरांत जी बैठक होणार त्यांत कांहीं तरी खळबळ होणार अशी जी

पुष्कळांची अटकळ होती ती खोटी ठरली. सप्टेंबरांत जेव्हां सिमल्यास असेंब्लीची बैठक झाली तेव्हां या पत्रव्यवहाराचा परिस्फोट पटेलांनीं केला. व व्हाइसरॉयांचें उत्तर समाधानकारक आल्यानें आतां या प्रकरणाचा वाद संपला आहे असें जाहीर केलें.

ता. २ सप्टेंबरपासून सिमल्याला असेंब्लीचें जें अधिवेशन झालें त्या-संबंधीं विशेष गोष्ट म्हणजे सर्व बाजूंनीं असलेला पोलिसांचा कडक पहारा ही होय. असेंब्लीच्या बाहेर, रस्त्यांत, फुटपाथवर, प्रवेशद्वारांत, लॉबींत, गॅलरींत, जिन्यांत, लायब्ररींत, वर, खालीं, उजव्या बाजूला, डाव्या बाजूला, असेंब्लीच्या सभोवार, एकंदरींत सर्व बाजूंनीं पोलीस उभे होते. असेंब्लीच्या गेल्या अधिवेशनांत बॉंब पडण्याचा प्रकार झाला होता. तशासारखा प्रकार पुन्हा होऊं नये म्हणून या वेळीं अतिशय दक्षता ठेवण्यांत आली होती. प्रेक्षकांची गॅलरी जवळजवळ रिकामीच होती व याचें कारण म्हणजे प्रेक्षकांस हजर राहाण्याचीं तिकिटें देण्यासंबंधीं विशेष सावधगिरी ठेवली होती व कांहीं नवीं बंधनेंहि घातलीं होतीं. परंतु प्रेक्षकांना आंत येण्यासंबंधीं कायमचे असे कांहीं तरी नियम हवे होते, कीं ज्यामुळें बॉंब पडण्यासारखें कृत्य होणार नाहीं. या सिमल्याच्या बैठकींत अध्यक्ष पटेलांनीं हे नियम तयार करण्याकरितां एक कमिटी नेमल्याचें जाहीर केलें. या कमिटीचें काम म्हणजे असेंब्लीचें पोलिसांकडून योग्य तें संरक्षण करणें हें जरी असलें तरी कमिटी नेमण्यांत अध्यक्षांचा रोख असा होता, कीं साधे नेहमींचे पोलीस ठेवण्याऐवजीं असेंब्लीकरितां एक स्वतंत्र पोलिसांची तुकडीच असावी व त्या तुकडीवर व असेंब्लीच्या एकंदर संरक्षण करण्याच्या बाबतींत अध्यक्षांचाच अधिकार असावा. हा अधिकार पोलीस अधिकाऱ्यांच्या हातीं असतां कामा नये.

परंतु या महत्त्वाच्या गोष्टींत तर सरकारचा तीव्र मतभेद प्रथमच दिसूं लागला. पटेल म्हणाले, "असेंब्लीच्या इमारतीच्या व्यवस्थेवर माझा अधिकार." त्यावर सरकारतर्फे होम मेंबर म्हणाले, "अध्यक्षांचा अधिकार नाहीं. तर तो अधिकार सरकारचा आहे." तेव्हां या गोष्टी कशा रंगल्या व त्यांचा निकाल काय लागला तें आतां पाहूं या.

असेंब्लींत बॉंब पडला तेव्हां प्रेक्षक आंत सोडण्याची व्यवस्था अधिक चांगली कशी करावी हें ठरविण्याकरितां अध्यक्ष पटेल यांनीं एक कमिटी नेमली याचा उल्लेख नुकताच वर आला आहे. या कमिटींत बहुमतानें असें ठरलें, कीं सभागृहाच्या बाहेर पोलिसांनीं बंदोबस्त ठेवावा व खुद्द सभागृहांतील बंदोबस्त अध्यक्षांच्या हुकमानें व्हावा. विलायतेंतील पार्लमेंटाचा दाखला काढून पाहिला त्यांतहि आढळलें, कीं सभागृहांतील बंदोबस्त 'स्पीकर'च्या म्हणजे अध्यक्षाच्याच हुकमानें चालतो व तेथें पोलिसांना प्रवेश नसतो. फक्त साध्या पोशाखांतला एक पोलीस गॅलरींत असतो. तशीच पद्धत इकडेहि चालू करावी याप्रमाणें कमिटीच्या शिफारशीवरून पटेलांनीं हुकूम केला. परंतु कुरापत काढण्याच्या उद्देशानें सर जेम्स क्रेरार होम मेंबर यांनीं आग्रह धरला, कीं सभागृहांत बंदोबस्त ठेवण्याची जबाबदारी पोलीस खात्यावर असल्यामुळें डगलेवाले पोलीसहि सभागृहांत येऊं दिले पाहिजेत. या म्हणण्याला अध्यक्षांनीं नेमलेल्या कमिटींत बहुमत पडलें नाहीं. असें असतां रविवार तारीख १९ रोजीं रात्रीं नऊ वाजल्यानंतर दिल्लीच्या कमिशनरसाहेबांनीं अध्यक्ष पटेल यांना गुप्त खलिता पाठविला, कीं "नेहमींप्रमाणें आमचे पोलीस डगलेवाले सभागृहांत उद्यां येतील." कमिशनरसाहेबांनीं पोलिसांना जे हुकूम काढले त्यांचीहि नक्कल त्यांनीं खलित्याबरोबर पटेलांना पाठविली. हा गुप्त खलिता कमिशनर साहेबांकडून पटेलांना मिळाला त्याच वेळीं होम मेंबरकडूनहि पटेलांना निरोप आला, कीं "प्रेक्षकांना सभागृहांत येण्याचें नियंत्रण करायचें आहे. पण प्रेक्षकांच्या गॅलरींत मात्र डगलेवाले पोलीस हजर राहतील. त्याप्रमाणें आम्ही दिल्लीच्या चीफ कमिशनरला कळविलें आहे." म्हणजे होममेंबरच्याच हुकमाप्रमाणें कमिशनरनें खलिता काढला होता; शिवाय या खलित्याला व्हाइसरॉयसाहेब बाहेर फिरतीवर आहेत असें पाहून तारेनें त्यांची संमति आणवून ठेविली होती! हा खलिता आपल्या अधिकाराचा उपमर्द करणारा आहे असें अध्यक्षांना दिसून आलें म्हणून त्यांनीं सोमवार तारीख २० रोजीं सकाळीं कामाला प्रारंभ होण्यापूर्वीच त्या खलित्याला आपलें उत्तर वाचून दाखविलें. त्यांत पटेल म्हणाले कीं "मी नेमलेल्या वॉच

अँड वॉर्ड कमिटीनें शिफारशी केल्या त्यावरून मीं कांहीं हुकूम काढले होते. परंतु ते माझे हुकूम आज सरकारनें व चीफ कमिशनरनें संगनमत करून धाब्यावर बसविले आहेत आणि अध्यक्षाच्या अधिकारांची अवज्ञा केली आहे. उदाहरणार्थ एकच साध्या पोशाखांतला शिपाई सभागृहांत असावा असा माझा हुकूम असतां आज चीफ कमिशनरसाहेबांनीं चार डगलेवाले पोलीस येथें ठेवले आहेत." या नंतर पटेलांनीं गॅलरींतील सर्व लोकांना बाहेर घालवून देण्याचा व दारांना कुलुपें लावण्याचा हुकूम केला. व यापुढें सदर बाबतींत हुकूम होईपर्यंत कोणाहि प्रेक्षकास अगर पोलिसास असेंब्लीमध्यें प्रेक्षकांच्या जागीं येऊं दिलें जाणार नाहीं असेंहि पटेल यांनीं सांगितलें. अर्थात् वर्तमानपत्रांच्या बातमीदारांना मात्र आंत येण्याची मोकळीक होती. प्रथम पोलीस बाहेर निघेनात पण जेव्हां अध्यक्षांना याची वर्दी देऊं अशी त्यांना धमकी मिळाली तेव्हां पोलीस अधिकाऱ्यांच्या सांगण्यावरून डगलेवाले पोलीस बाहेर गेले. या हुकमासंबंधानें आपणांला कांहीं सांगायचें आहे असें होम मेंबर क्रेरार यांनीं उठून सांगण्याचा दोनतीनदा प्रयत्न केला. पण तितक्यांदा पटेलांनीं त्यांचें बोलणें ऐकून न घेतां त्यांना खालीं बसविलें व त्यांना बजावून सांगितलें कीं "या वेळीं तुम्ही कांहीं उठून बोलाल तर तो अध्यक्षाच्या अधिकाराचा अपमान होईल." सुमारें पांच मिनिटांत सगळ्या गॅलऱ्या रिकाम्या झाल्या व नंतर कामाला सुरवात झाली. हा अकल्पित प्रकार इतका खटकेबाज झाला, कीं पब्लिक सेफ्टी बिलाच्या निकालाच्या दिवसाची लोकांना फिरून आठवण झाली. यापुढेंहि या प्रश्नाचा निकाल लागेपर्यंत प्रेक्षकांना तिकिटेंच देऊं नयेत असा हुकूम अध्यक्षांनीं फर्माविला. यांत प्रेक्षकांचा गुन्हा काय असा प्रश्न येतो. पण गॅलरींत प्रेक्षक येणार म्हणून डगलेवाले पोलीस येणार अशी सांगड सरकारनें घातली म्हणून पोलीस हजर राहण्याचें कारणच अध्यक्षांनीं काढून टाकलें असा त्याचा अर्थ आहे. पण ही स्थिति फार दिवस टिकणें शक्य नव्हतें. याचा कांहीं तरी निकाल लागणें जरूरच होतें.

तरी पण बिनप्रेक्षकांची ही असेंब्ली एक महिनाभर होती. पुढें व्हाइसरॉयसाहेब दिल्लीस आले व या प्रश्नाचा निकाल करण्याचे प्रयत्न जोरानें

सुरू झाले. तारीख २६ रोजीं पटेलांनीं व्हाइसरॉयांनी बोलावून घेतलें. या भेटींत पटेलांनीं व्हाइसरॉयांना अथपासून इतिपर्यंत कागदपत्रावरून सर्व हकीगत एक तासभर समजावून दिली. व असें सांगितलें, कीं "तारीख १४ पर्यंत सर्व गोष्टी सुरळीत चालल्या होत्या. होममेंबर केरार व आमच्यामध्यें कांहीं मतभेद उरला नव्हता. पण या स्थैर्याला कोणींतरी धक्का दिला खास. म्हणून तारीख १८ पासून केरार यांनीं कमिशनर टॉम्सन यांचा आश्रय करून उलट खाल्ली ! आणि माझा उपमर्द करणारा हुकूम तारीख १९ रोजीं रात्रीं एकाएकीं मला फर्मांविला. म्हणून मलाहि माझ्या अधिकाराचा प्रभाव दाखवावा लागला. या कामीं तुम्ही बाहेर असतां त्यांनीं तुमची संमति घेतली पण आतां तुम्ही समक्ष आलां आहां तर या प्रश्नाचा उलगडा करा."

पण व्हाइसरॉयांचा हात केरार यांनीं आधींच तारेनें बांधला असल्यामुळें त्यांना कांहींच सांगतां येईना. म्हणून "मी कांहीं वेळ घेऊन या गोष्टीचा विचार करतों" असें व्हाइसरॉयांनीं पटेलांना या भेटींत सांगितलें. या भेटीनंतर व्हाइसरॉयांनीं इतर पुढाऱ्यांशीं म्हणजे जिना, झुल्फिकर अलीखान, सर डार्सी लिंडसे, व जयकर यांच्या या कामीं गांठीं घेतल्या. दुसऱ्या पक्षीं पटेलांनीं जिना, सर पुरुषोत्तमदास, केळकर व अणे यांना आपल्या घरीं बोलावून दोन तास चर्चा केली. त्यानंतर फिरून तारीख २९ रोजीं आपल्या ऑफिसांत वरील गृहस्थांना व त्यांच्याच बरोबर झुल्फिकर अलीखान व डार्सी लिंडसे यांना बोलावून चर्चा केली. तींत उभयपक्षांचा अपमान न होतां कांहींतरी मधला मार्ग काढावा असें ठरून एक मसुदाहि तयार करण्यांत आला. मध्यंतरीं असेंब्लींतील युरोपियन पक्षापैकीं मि. आर्थर मूर हे अध्यक्षावर प्रत्यक्ष निंदाव्यंजक ठराव न आणतां तशा अर्थाचा पण प्रेक्षकांना गॅलऱ्या खुल्या कराव्या, त्या न करण्यानें बाहेरच्या जनतेला अन्याय होतो अशा अर्थाचा ठराव मांडण्याची सूचना तारीख २१ जानेवारी रोजींच आणणार होते. पण तसें करूं नये असा इशारा त्यांना सरकारपक्षाकडून मिळाला, म्हणून त्यांनीं आपली सूचना मागें घेतली. वरील सरकारी इशाऱ्याचें कारण असें, कीं व्हाइसरॉय दिल्लीला आले नव्हते व

त्यांच्या संमतीशिवाय वरील ठरावाला सरकारी सभासदांना संमति देतां येत नव्हती. पण फिरून तारीख २८ रोजीं सभा सुरू होतांच "मला या विषयावर सूचना करायची आहे, परवानगी द्याल का?" असें त्यांनीं विचारलें. त्याला अध्यक्षांनीं उत्तर दिलें कीं "रीतसर नोटीस द्या म्हणजे मग पाहूं." यामुळें याहि वेळीं मि. मूर यांना कांहीं करतां आलें नाहीं.

शेवटीं या प्रकरणाचा निकाल व्हाइसरॉय व पटेल या उभय पक्षांच्या तडजोडीनें झाला. ती तडजोड अशी, कीं 'असेंब्लीं'च्या गॅलरींतील बंदोबस्तासाठीं सरकारनें ना. पटेल यांच्या दिमतीस एक पोलीस अधिकारी द्यावा. हा अधिकारी पटेल यांस जबाबदार असून त्यानें प्रत्येक गोष्ट त्यांच्या सांगण्याप्रमाणें करावी. एकाद्या वेळीं अमुक इतकी विशेष व्यवस्था ठेवावी असें सदर अधिकाऱ्यास वाटलें पण त्याचें म्हणणें अध्यक्ष पटेल यांस पटलें नाहीं तर त्यानें आपल्या वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या नजरेसहि ही गोष्ट आणावी. त्या वरिष्ठ अधिकाऱ्यानें पटेल यांजकडे त्यासंबंधीं रिपोर्ट करावा व पटेल यांनीं हा रिपोर्ट आपल्या अभिप्रायासुद्धा गव्हर्नर–जनरल–इन् कौन्सिल यांजकडे पाठवावा. म्हणजे वरिष्ठ पोलीस अधिकारी पटेल यांस भेटून त्यांस योग्य तो सल्ला देतील. असेंब्लीच्या अंतर्गत व्यवस्थेवर असेंब्लीचा अधिकार आहे हें तत्त्व व्हाइसरॉयांनीं मान्य केलें. तसेंच असेंब्लीच्या बाहेरच्या आवारांतहि प्रांतिक सरकारच्या सल्ल्यानें अध्यक्ष हे हुकूम काढतील असेंहि ठरलें.

याप्रमाणें या व्यवस्थेंत पटेलांचा बोज पूर्णपणें राहिला व गॅलरीवरील अधिकार पोलिसांचा नसून असेंब्लीचा आहे हें तत्त्व प्रथापित झालें. व या दृष्टीनें पटेलांनीं नोकरशाहीवर विजय मिळविला हें सिद्ध झालें.

पटेल यांचाच हा विजय होय ही गोष्ट आणखी एका पुराव्यानें उघड झाली. असेंब्लींतील युरोपियन पक्षापैकीं ज्या आर्थर मूरनें पटेलांविरुद्ध जवळजवळ अविश्वासाचा ठराव आणला होता त्यानें युरोपियन पक्षाचा राजीनामा दिला. त्यांत तो म्हणतो कीं "सरकारी अधिकाऱ्यास शेरास सव्वा शेर असे पटेल मुत्सद्दी भेटले. हिंदुस्थान सरकारापेक्षां अध्यक्षाचीच सत्ता आतां अधिक ठरली. आणि सरकारनें ही सर्व मानहानि कां पत्करली? तर त्यांना

आगामी राऊंड टेबल परिषदेच्या वेळीं पटेल यांची सहकारिता पाहिजे म्हणून ! " असो.

पटेलांचे असेंब्लीच्या व्यवस्थेबद्दलचे हक्क व्हाइसरॉयांनीं बहुतांशीं कबूल केले व त्या बाबतींत या वेळीं तडजोड आपणांस मान्य असल्याचें तारीख २० फेब्रुवारीच्या सभेंत पटेलांनीं जाहीर करून तारीख २४ फेब्रुवारी १९३० पासून गॅलऱ्या पुन्हा खुल्या कराव्या व प्रेक्षकांना नेहमींप्रमाणें पास द्यावे असे अध्यक्षांनीं हुकूम केले.

अध्यक्षाची जागा ही सरकारी अधिकाऱ्यांच्या नियंत्रणांतून स्वतंत्र व्हावी असें पटेलांना वाटे. कारण तशी ती स्वतंत्र झाल्याशिवाय अध्यक्षाला आपलें काम नीट रीतीनें करतां येणें शक्य नव्हतें. आतांपर्यंत अध्यक्षाला असेंब्लीच्या सरकारनियुक्त सेक्रेटरीच्याच सल्ल्यावर अवलंबून राहावें लागे. हा सेक्रेटरी असेंब्लीचा सभासद असे. पण, अध्यक्षाला जर आपलें काम समाधानकारक करतां आलें नाहीं तर त्याचा दोष अध्यक्षाच्या माथीं मारला जाई. कारण अध्यक्ष हाच सर्व प्रकारचा असेंब्लीचा नियंता आहे अशी समजूत आतांपर्यंत असे. पण अध्यक्षाला जर आपलें काम व्यवस्थित चालवायचें असेल तर असेंब्लीचा सेक्रेटरी व नोकरवर्ग अध्यक्षाला जबाबदार असणें अवश्य होतें. पण हा सेक्रेटरी व नोकरवर्ग तर तसा आतांपर्यंत अध्यक्षाला जबाबदार नसून हिंदुस्थानसरकारला जबाबदार होता. शिवाय सेक्रेटरी हा सरकारनियुक्त सभासद असल्यानें तो नेहमीं सरकारच्याच बाजूनें मतें देई. त्याच्यावर अध्यक्षाचा ताबा नाहीं कीं असेंब्लीचाहि नाहीं. अशा स्थितींत सेक्रेटरीचा सल्ला हा निःपक्षपाती किंवा स्वतंत्र बुद्धीनें दिला जाणें शक्य नव्हतें. म्हणजे घोडेस्वार निराळा व लगाम खेचणारा निराळा असला म्हणजे जसे स्वाराचे हाल होतात तसें सेक्रेटेरिएटवर पटेलांचा आतांपर्यंत ताबा नसल्यानें पटेलांचे अध्यक्ष या नात्यानें हाल होत होते.

या सर्व गोष्टींची तक्रार पटेलांनीं १९२७ सालच्या सप्टेंबरांत व्हाइसरॉयांकडे केली. व त्यांत त्यांनीं सेक्रेटेरिएट अध्यक्षाला जबाबदार कसें राहील यासंबंधींची सविस्तर योजना व्हाइसरॉयाकडे पाठविली. यापूर्वी

म्हणजे १९२६ च्या जानेवारी महिन्यांत पटेलांच्या सांगण्यावरून सर्व प्रांतिक कौन्सिलाच्या अध्यक्षांची एक परिषद झाली व त्यांत वेगळें अध्यक्षांचें सेक्रेटेरिएट असावें असा एक ठराव पास झाला होता. हा ठराव पटेलांनीं अंमलबजावणीकरितां व्हाइसरॉयाकडे पाठविला होता. परंतु एक वर्ष होऊन गेलें तरी कांहींच उत्तर न आल्यामुळें वर सांगितल्याप्रमाणें पटेलांनीं १९२७च्या सप्टेंबरांत व्हाइसरॉयांकडे स्वतंत्र सेक्रेटेरिएटची योजना पाठविली. या योजनेंत पटेलांनीं खालील मुख्य मागण्या केल्या:—(१) असेंब्लीची कचेरी सरकारी कचेरीपासून वेगळी व स्वतंत्र ठेवावी. सरकारी कचेरीचाच तोहि एक लहानसा भाग म्हणून असेंब्लीच्या कचेरीकडे पाहूं नये. (२) या असेंब्लीच्या कचेरींतलि अधिकाऱ्यांवर व इतर नोकरवर्गावर असेंब्लीचाच ताबा अध्यक्षामार्फत असावा. (३) या कचेरीच्या जमाखर्चावर सरकारी खात्याचें नियंत्रण असूं नये तर असेंब्लीचें नियंत्रण असावें.

ही पटेलांची योजना अत्यंत तातडीची व पटेलांना अतिशय महत्वाची वाटणारी आहे. हें सरकारला माहीत होतें. तरीसुद्धा १९२९ च्या एप्रिलपर्यंत त्या बाबतींत व्हाइसरॉयांनीं पटेलांना कांहींच कळविलें नाहीं. पुढें तारीख १६ एप्रिल रोजीं सरकारी सेक्रेटरीनें पटेलांना कळविलें, कीं अध्यक्षाचा सेक्रेटरीवर व असेंब्लीच्या कचेरीवर कांहींहि ताबा असूं नये. असेंब्लीची कचेरी ही सरकारी कचेरीचीच एक शाखा राहावी; स्वतंत्र राहूं नये. म्हणजे पटेलांच्या मुख्य मागण्यांना सरकारनें वाटाण्याच्या अक्षता आरंभालाच लावल्या! म्हणून २ मेच्या पत्रांत पटेलांनीं सरकारला सेक्रेटरीमार्फत कळविलें, कीं सेक्रेटरिएट तुम्ही सर्वस्वीं अध्यक्षाच्या ताब्याबाहेर जर ठेवणार तर अध्यक्षानें काम तरी कसें वठवावें हें मला समजत नाहीं. मी गेले तीन वर्षें या जागेवर आहें व या जागेच्या गरजा काय आहेत हें मला आतां चांगलें माहीत झालें आहे. आणि मी तुमच्याकडे ज्या मागण्या केल्या त्यासुद्धा अगदीं कमींत कमी होत्या. व ही योजना शक्य तितक्या लवकर अंमलांत यावी अशी माझी मनीषा होती. परंतु तुम्हीं अशी दिरंगाई केली तर पुढच्या वर्षापर्यंत तरी ही योजना अंमलांत येईल कीं

नाहीं याची वानवाच आहे. तेव्हां या बाबतींत तुमची भेट घेऊन बाटा घाट करण्याची माझी तयारी आहे". पटेलांनीं याप्रमाणें व्हाइसरॉयांना कळविल्यानंतर त्या उभयतांच्या दोनदा भेटी झाल्या. दुसऱ्या भेटीच्या वेळीं सेक्रेटरी ग्रॅहॅम हेहि हजर होते. परंतु कांहीं उपयोग झाला नाहीं. व सरकार आपल्या आग्रहालाच चिकटून राहिलें. नंतर पटेलांनीं आपल्या मागण्या जरा सौम्य करून त्या सरकारपुढें ठेवल्या. त्या मागण्या अशा, कीं (१) सरकारनें असेंब्ली सेक्रेटरीचें खातें स्वतंत्र तरी करावें किंवा व्हॉइसरॉयांच्या नजरेखालीं ठेवावें. (२) सदर खात्यातील मुख्य अधिकाऱ्याची नेमणूक अध्यक्षांच्या शिफारशीनें व्हाइसरॉयांनीं करावी. (३) या अधिकाऱ्यास दंड करणें किंवा कामावरून दूर करणें या बाबतींत असेंब्ली ठरवील तें व्हाइसरॉयांनीं अंमलांत आणावें. (४) सेक्रेटरीच्या शिफारशीस अनुसरून अध्यक्षांनीं इतर नोकरांची नेमणूक करावी. (५) सेक्रेटरीच्या सल्ल्यानें अध्यक्षांनीं नोकरवर्गास शिक्षा करायची ती करावी. (६) सदर खात्यासाठीं होणाऱ्या खर्चास असेंब्लीची मजुरी असावी. परंतु यांपैकीं एकहि मागणी सरकारनें कबूल केली नाहीं. कारण या योजनेंत व्हाइसरॉयांच्या व सेक्रेटरींच्या सल्ल्यानें जरी कांहीं गोष्टी अध्यक्षानें करायच्या होत्या तरी ज्या वेळीं अध्यक्ष व सरकार यांत मतभेद होईल त्या वेळीं निर्णय करण्याचें काम असेंब्लीकडे ठेवलें असल्यानें ही योजना सरकारला पटूं शकली नाहीं. फक्त एक गोष्टी झाली ती अशी कीं १९२८ च्या सप्टेंबरापासून सेक्रेटरी हा असेंब्लीचा सभासद असण्याचा क्रम बंद झाला. परंतु मधाच्या या लहान थेंबानें पटेलांचें समाधान होणें शक्य नव्हतें. कारण मूळ सेक्रेटरिएट अध्यक्षालाच जबाबदार राहिलें पाहिजे हें कांहीं सरकारनें ठरविलें नाहीं.

पटेलांच्या या तक्रारींत सरकारच्या एका कृत्यानें आणखी एका तक्रारीची भर पडली. तें कृत्य असें कीं जेव्हां पटेलांनीं आपल्या मागण्या मंजूर करण्याबद्दल सरकारामागें सारखा ससेमिरा लावला, तेव्हां व्हाइसरॉयांनीं सेक्रेटरी ऑफ स्टेटकडे त्याबद्दल एक खलिता पाठविला. पण हा खलिता सरकारनें पटेलांना दाखविला नाहीं किंवा त्यावर असेंब्लीचें मतहि

विचारलें नाहीं. या खलित्याची एक नक्कल पटेलांनीं व्हाइसरॉयांकडून मागविली, परंतु ती नक्कल सरकारनें त्यांना देण्याचें नाकारलें !

या सर्व तक्रारींचा पाढा सप्टेंबरच्या तारीख ५ च्या अधिवेशनांत पटेलांनीं असेंब्लीपुढें वाचला, व असेंब्लीला या बाबतींत स्वतःचा निर्णय करण्यास सांगितलें. पटेलांनीं केलेल्या मागण्या नामंजूर झाल्यानें असेंब्लींतील लोकपक्ष अर्थातच प्रक्षुब्ध झाला. या प्रक्षोभाला शांत करण्याच्या उद्देशानें होम मेंबर क्रेरार यांनीं अशी मखलाशी केली, कीं व्हाइसरॉय व सेक्रेटरी ऑफ स्टेट यांच्यात काय पत्रव्यवहार झाला तो आम्ही असेंब्लीच्या नजरेस पुढें आणूं व मग आम्हीं काय केलें आहे तें सांगूं. परंतु या खुलाशा-मुळें असेंब्लीचें समाधान होणें शक्य नव्हतें.

पुढें तारीख २२ सप्टेंबर रोजीं पंडित मोतीलाल नेहरू यांनीं असेंब्लींत सेक्रेटेरिएटच्या योजनेसंबंधीं खालील ठराव मांडला:—( अ ) तारीख १ डिसेंबर १९२८ च्या आंत एक स्वतंत्र खातें निर्माण करण्यांत यावें. ( ब ) योजनेला अवश्य असेल त्या भागापुरती स्टेट सेक्रेटरीची ताबडतोब संमति घ्यावी. ( क ) खालीलप्रमाणें दुरुस्त योजना करण्यांत यावीः—( १ ) असेंब्लीचें खातें अध्यक्षांच्या सल्ल्यानें गव्हर्नरजनरलच्या ताब्यांत असावें. ( २ ) या खात्याचा प्रमुख अध्यक्षांच्या सल्ल्यानें गव्हर्नरजनरल यांनीं नेमावा. ( ३ ) ( अ ) या अधिकाऱ्याला काढून टाकण्याचा अधिकार गव्हर्नरजनरलला अध्यक्षांच्या सल्ल्यानें ठेवावा. ( ब ) शिस्तीचे उपाय योजण्याचा अधिकार अध्यक्षांकडे असावा. ( ४ ) खात्याच्या इतर अधि-काऱ्यांची नेमणूक अध्यक्षांनीं सेक्रेटरीच्या सल्ल्यानें करावी. ( ५ ) या अधिकाऱ्यांना काढून टाकण्याचा आणि शासन करण्याचा अधिकार अध्यक्षांकडे असावा. फक्त या अधिकाऱ्यांना गव्हर्नरजनरलकडे फेर-तपासणीचा अर्ज करण्याची सवलत देण्यांत यावी. (६) खर्चाचे प्रश्न नेहमींच्या पद्धतीनें सोडवावें. परंतु जेथें अध्यक्ष व हिंदुस्थान सरकार यांचा मतभेद होईल तेथें गव्हर्नरजनरलकडे याचा उल्लेख करावा व त्यांचा निर्णय अखेरचा समजावा. या बाबतींत अध्यक्षांनीं असेंब्लीचें मत गव्हर्नरजनरल यांना शक्य तितक्या लवकर अंमलबजावणी करण्यासाठीं कळवावें.

हा ठराव असेंब्लींत मंजूर झाला व त्याप्रमाणें सेक्रेटरीचें खातें स्वतंत्र निर्माण करण्यांत आलें.

दार ठोठावल्याशिवाय उघडत नाहीं व झगडल्याशिवाय मिळत नाहीं याचें प्रत्यंतर पटेलांच्या वरील सर्व कृतींवरून उत्कृष्टपणें निदर्शनास येतें. म्हणूनच पंडित जवाहरलाल नेहरू यांनीं पटेलांचें वर्णन "खंदे वीर" या शब्दांनीं केलें तें अत्यंत मार्मिक आहे असेंच म्हटलें पाहिजे. पाऊल पुढें टाकायचें तर तें पूर्ण विचार करून टाकायचें पण एकदां पुढें पाऊल टाकलें तर तें मागें परत घ्यायचें नाहीं हा पटेलांचा बाणा होता. व तो वीराला सर्वथैव साजेसाच होता. हिंदुस्थानच्या कमांडर-इन-चीफनें पटेलांची मागितलेली माफी, टाइम्सनें पटेलांची मागितलेली माफी, मुंबईचे गव्हर्नर व व्हाइसरॉय यांना लिहिलेलीं निर्भीड व सडेतोड पत्रें, स्टेट्समन पत्राचे युरोपियन संपादक यांनीं असेंब्लीचा दिलेला राजीनामा, सायमन कमिशनच्या सभासदांना साध्या प्रेक्षकांच्या गॅलरींत बसविण्याचा हुकूम, दिल्लीच्या चीफ कमिशनरला व होम मेंबरला दाखविलेला आपल्या अधिकाराचा प्रभाव, पब्लिक सेफ्टी बिलावर दिलेलें रूलिंग या सर्व गोष्टींत पटेलांचें वीरत्व उत्कृष्ट रीतीनें व्यक्त झालें आहे. आणि या गोष्टींमुळें दिल्लींत सिमल्यास पटेलांचें राज्य झालें आहे असे उद्गार काढण्यांत येत होते. आतां यावर कोणी असें म्हणतील कीं हे सगळे निष्कर्ष झाले पटेलांच्या बाजूनें असणाऱ्यांचे पण पटेलांच्या विरोधकांनीं त्यांच्याविषयीं काय म्हटलें ? कारण एकाद्या व्यक्तीचें वीरत्व हें उभय पक्षांना मान्य असायला पाहिजे. तसें पटेलांबद्दल म्हणतां येईल कीं नाहीं ? याला उत्तर असें कीं पटेलांची थोरवी त्यांच्या मित्रांनींच केवळ नव्हे तर प्रतिपक्षी म्हणविणारांनींहि कबूल केली. " पटेल हे सरकारी अधिकाऱ्यांस शेरास सव्वाशेर भेटले, " हें मि. आर्थर मूर या अस्सल सरकारपक्षीय युरोपियन सभासदाचें विधान म्हणजे पटेलांच्या वीरत्वाची साक्ष होय.

# चावडींतला ‘ पाटील ’ बाहेर निघाला !

पटेल दिल्ली-सिमल्यास आपली अध्यक्षीय कारकीर्द गाजवीत असतां देशांतील राजकीय वातावरण दिवसेंदिवस तत होऊं लागलें होतें व त्याच्या झळा असेंब्लींत शिरकाव करीत होत्या. असेंब्लीनेंच नव्हे तर सामान्य हिंदी जनतेनें धिक्कारलेलें सायमन कमिशन हिंदुस्थानांतून विलायतेस परत गेलें होतें. तारीख १६ ऑक्टोबर १९२९ या दिवशीं सर जॉन सायमन यांनीं मुख्य प्रधानाला पत्र लिहिलें व त्यांत म्हटलें, कीं “ कमिशनचा रिपोर्ट प्रसिद्ध झाल्यानंतर एक परिषद भरवावी. त्या परिषदेंत शक्य तितकें एकमत व्हावें आणि तें पार्लमेंटला सादर करावें. ” त्यावर ३१ ऑक्टोबरला बादशहांनीं पत्रकांतून प्रसिद्ध केलें कीं, “ब्रिटिश हिंदुस्थानांत साम्राज्यांतर्गत जबाबदार राज्यपद्धति वाढत्या प्रमाणांत स्थापन व्हावी यासाठीं ज्या योजना पार्लमेंटनें तयार केल्या आहेत त्या फलद्रूप ठरल्या व शेवटीं हिंदुस्थानला वसाहतींचा दर्जा प्राप्त व्हावा अशी आमची इच्छा आहे व यांतच आमचा संतोष आहे. ” या पत्रकाविषयीं माहिती सांगतांना व्हाइसरॉय लॉर्ड आयर्विन म्हणाले, कीं हिंदुस्थान व संस्थानें यांचे संबंध ठरविणें जरूर आहे, असें कमिशनच्या अध्यक्षांचें ठाम मत आहे. निरनिराळे रिपोर्ट जॉइंट पार्लमेंटरी कमिटीपुढें ठेवण्यापूर्वी एक परिषद बोलवावी लागेल. त्या परिषदेंत ब्रिटिश सरकार, ब्रिटिश हिंदुस्थान व संस्थानें यांच्या प्रतिनिधींची एकत्र भेट होईल व तेथें अंतिम निर्णयाबद्दल एकमत करण्याचा प्रयत्न होईल परिषद बोलावण्यांत कमिशनचें ध्येय असें आहे कीं हिंदुस्थानांत जबाबदारीच्या संस्थांचा हळूहळू विकास व्हावा व तो ब्रिटिश साम्राज्याचा एक घटक बनेल अशी जबाबदारीची राज्यपद्धति हिंदुस्थानांत स्थापन व्हावी.

हीं सर्व पत्रकें व खुलासे प्रसिद्ध झाले खरे, परंतु त्यामुळें हिंदी पुढाऱ्यांचें समाधान होणें शक्य नव्हतें. कारण त्यांत तावडतोबीचें असें

निश्चित आश्वासन कांहींच नव्हतें. बऱ्याचशा इच्छाच प्रकट केल्या होत्या. तेव्हां ३१ ऑक्टोबरला व्हाइसरॉयांचा खुलासा प्रसिद्ध झाल्यावर चोवीस तासांच्या आंत प्रसिद्ध पुढारी दिल्लीस जमा झाले व परिषद यशस्वी करण्यासाठीं खालील चार गोष्टी करणें अत्यावश्यक आहे असें त्यांनीं सुचविलें. त्या गोष्टी अशाः—( १ ) जास्त शांत वातावरण उत्पन्न करण्यासाठीं सर्वसाधारणतः सहानुभूतीचें राजकीय धोरण स्वीकारावें. ( २ ) राजकीय कैद्यांची मुक्तता व्हावी. ( ३ ) प्रगतिपर राजकीय संस्थांचें प्रतिनिधित्व यशस्वी रीतीनें मिळवायला पाहिजे, व राष्ट्रीय सभा ही त्या संस्थेंत अतिशय मोठी असल्यामुळें तिला प्रामुख्यानें प्रतिनिधित्व मिळालें पाहिजे. ( ४ ) बादशहांच्या वतीनें व्हाइसरॉयांनीं जो जाहीरनामा काढला आहे त्यांत आगामी परिषदेचा हेतु म्हणजे हिंदुस्थानांत वसाहतींचें स्वराज्य केव्हां स्थापावें याची नुसती चर्चा होणार, असा दिसतो, परंतु असें नसावें. वसाहतींची शासनपद्धति हिंदुस्थानाकरितां तयार करणें हाच या परिषदेचा हेतु असणें जरूर आहे, व त्या दृष्टीनें राज्यघटनेंत सुधारणा होणें इष्ट आहे.

शेवटीं परिषदेचा हेतु सफल होण्यासाठीं ती शक्य तितक्या लवकर बोलवावी असें सुचविण्यांत आलें.

ही परिषद राऊंड टेबल कॉन्फरन्स किंवा गोलमेज परिषद या नांवानें प्रसिद्ध आहे.

वरीलप्रमाणें पुढाऱ्यांनीं जरी सूचना केल्या तरी त्यांच्या अपेक्षेप्रमाणें गोष्टी घडल्या नाहींत. उदाहरणार्थ राजकीय कैद्यांच्या मुक्ततेबाबत सरकारनें विशेष लक्ष घातलें नाहीं. तिकडे पार्लमेंटमध्यें मात्र हिंदुस्थानांत व्हाइसरॉयांनीं काढलेल्या जाहीरपत्रकाबद्दल बरीच उलटसुलट आरडाओरड करण्यांत आली. परंतु एकंदरीनें सूर असा नियत होता कीं १९१९ च्या कायद्यांत जें आस्तेकदम सुधारणांचें धोरण जाहीर केलें आहे त्यांत फारसा बदल होणार नाहीं. हिंदी पुढारी तर कांहीं तरी निश्चित बदल झाला पाहिजे असा आग्रह मांडून होते. कॉंग्रेस पुढाऱ्यांचें म्हणणें असें कीं लाहोरची डिसेंबरांत होणारी कॉंग्रेस भरण्यापूर्वीं वसाहतीच्या दर्जाचें निश्चित

आश्वासन हिंदी जनतेला मिळालें पाहिजे. व परिषदेचा हेतु वसाहतीची शासनपद्धति हिंदुस्थानाकरितां तयार करणें हा असला पाहिजे असें सरकारनें जाहीर केलें पाहिजे. अशा वेळीं व्हाइसरॉयांनीं नेमस्त पुढारी डॉ. सप्रू यांना कळविलें, कीं मी २३ डिसेंबरला गांधी व नेहरू यांची भेट दिल्लीस घेईन. ठरल्याप्रमाणें २३ डिसेंबरला पुढारी व्हाइसरॉयांच्या बंगल्यावर एकत्र जमले. त्यांत पटेलहि होते. गोलमेज परिषदेचें काम वसाहतीचें संपूर्ण स्वराज्य हें धोरण ठरवूनच चालेल असें आश्वासन गांधींना पाहिजे होतें. पण व्हाइसरॉयांनीं उत्तर दिलें, कीं सरकारनें आपला दृष्टिकोन आपल्या पत्रकांत स्पष्ट केलाच आहे आणि यापेक्षां जास्त अभिवचन देतां येत नाहीं. गोलमेज परिषदेस आमंत्रण देतांना वसाहतीच्या स्वराज्याचें स्पष्ट अभिवचन देणें शक्य नाहीं असें व्हाइसरॉयांनीं सांगितलें.

अर्थात् सारे जमलेले पुढारी हात हलवीत जागोजाग परतले. लाहोरची कॉंग्रेस जवळ येऊन ठेपली. दडपशाहीला जोर चढत होता. दिवसेंदिवस बंदिखाने भरून चालले होते. लाहोर कॉंग्रेसला या अत्यंत निराशामय परिस्थितीला तोंड द्यायचें होतें अखेर या कॉंग्रेसनें पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या अध्यक्षतेखालीं संपूर्ण स्वातंत्र्य हेंच हिंदुस्थानचें एकमेव ध्येय असल्याचें जाहीर केलें. स्वातंत्र्याच्या मोहिमेची पहिली पायरी म्हणून कायदे कौन्सिलांवर बहिष्कार घातला व त्याप्रमाणें कायदेमंडळांत व कमिट्यांवर काम करीत असलेल्या कॉंग्रेसच्या सर्व सभासदांनीं राजीनामे द्यावेत अशी या कॉंग्रेसनें आज्ञा केली आणि स्वातंत्र्य प्राप्त्यर्थ सविनय कायदेभंगाची चळवळ सुरू करावी असें ठरविलें. नव्या वर्किंग कमिटीची बैठक ता. २ जानेवारी १९३० रोजीं झाली व तिनें केलेल्या विनंतीस अनुसरून असेंब्लीच्या २७ सभासदांनीं राजीनामे दिले.

या वेळीं पुष्कळांची अशी अपेक्षा होती, कीं लाहोर कॉंग्रेसच्या ठरावाचा परिणाम होऊन पटेल हे आपल्या अध्यक्षपदाचा राजीनामा देतील. त्यांच्या मित्रांनीं व ओळखीच्या अनेक लोकांनीं त्यांचा बेत काय आहे याबद्दल त्यांना विचारणा केली. त्यावर आपलें अद्याप कांहीं ठरलें नाहीं असें पटेलांचें उत्तर असे. ही त्यांची डळमळ पाहून बॅ. जयकरांसारख्यांनीं त्यांना

लिहिलें, कीं " कॉंग्रेसच्या ठरावाचा प्रचार देशभर दौरा काढून करीत राहाण्यापेक्षां तुम्हीं अध्यक्षपदावर राहाणेंच अधिक उचित आहे. " दिवाण चमणलाल यांनीं त्यांना सांगितलें कीं " तुम्हीं राजीनामा दिलात तर ती एक राष्ट्रीय आपत्ति होईल." अखेर पटेलांनीं आपलें निश्चित असें उत्तर ता. २१ जानेवारी १९३० रोजीं असेंब्लींत जाहीर केलें. ते म्हणाले, " इतक्यांत राजीनामा देण्यासारखी परिस्थिति उत्पन्न झाली आहे असें मला वाटत नाहीं. लाहोर कॉंग्रेसच्या ठरावास अनुसरून जर मीं राजीनामा दिला तर मी पक्षभेदातीत नाहीं असा लोकांचा ग्रह होईल. परंतु अध्यक्षाचें स्थान हें पक्षभेदातीत असल्यानें कोणत्याहि एका पक्षानें सांगितलें म्हणून मी राजीनामा देणार नाहीं. स्वराज्याचा प्रश्न हा हिंदी व ब्रिटिश प्रतिनिधी यांच्या परस्पर विचारविनिमयानें सुटेल असा अद्यापि वाटण्यास जागा असल्यानें, देशहिताच्या दृष्टीनें इतक्यांत राजीनामा देऊं नये असं मीं ठरविलं आहे. परंतु त्या बरोबरच मी हेंहि सांगतों कीं राजीनामा देण्यानेंच देशाच्या बिकट परिस्थितींत जर मी अधिक स्वतंत्रतेनें कार्य करूं शकेन असं मला दिसून आलं तर त्या दिवशीं मी या अध्यक्षपदाचा राजीनामा दिल्याशिवाय राहाणार नाहीं. " परंतु पटेलांची ही विचारसरणी फार दिवस टिकाव धरूं शकली नाहीं. कॉंग्रेसच्या आज्ञेनुसार देशांत प्रचंड प्रमाणावर सविनय कायदेभंगाची मोहीम सुरू झाली. गांधींनीं मिठाचा कायदा मोडून मिठागरावर मोहीम करण्याचा बेत जाहीर केला. गांधींनीं आपले पुढील बेत व्हाइसरॉयांना ता. २ मार्चच्या पत्रानें कळविले. ता. १२ मार्चला मिठागरावर मोहीम करण्यासाठीं गांधींनीं आपल्या ७९ अनुयायांसह साबरमती आश्रमापासून आपलें विश्वविख्यात दांडी-प्रयाण सुरू केलें. साबरमती पासून दांडी हें गांव २०० मैल अंतरावर होतें. तें गांव त्यांनीं मीठ तयार करण्यासाठीं निवडलें. त्या गांवांपर्यंत त्यांनीं आपल्या अनुयायांसह पायीं प्रवास केला. वाटेंत ठिकठिकाणीं प्रचंड सभा होऊन जनतेंत मोठी जागृति निर्माण झाली. ता. ५ एप्रिल रोजीं सकाळीं गांधी दांडीस पोचले, व तेथें त्यांनीं मीठ उचललें व मिठाच्या कायद्याचा भंग केला. तारीख ६ एप्रिलपासून मीठ सत्याग्रहाची परवानगी मिळाल्यानें

सर्व देशभर सत्याग्रहाची जागृति झाली. मोठमोठ्या सभा झाल्या. गोळी-बारहि सरकारनें केले. तारीख २३ एप्रिल रोजीं बंगाल ऑर्डिनन्स पुन्हा अंमलांत आला व १९१० सालचा प्रेस ॲक्ट कांहीं दुरुस्ती करून एका वटहुकुमाच्याद्वारें व्हाइसरॉयांनीं २७ एप्रिल रोजीं जाहीर केला.

या सुमारास म्हणजे तारीख २५ एप्रिल १९३० रोजीं असेंब्लीचें अध्यक्ष ना. पटेल यांनीं आपल्या अध्यक्षपदाचा व असेंब्लीच्या सभासदत्वाचाहि राजीनामा व्हाइसरॉयांकडे पाठवून दिला. लोकमान्य टिळक हे पटेलांना विनोदानें पाटील म्हणत. कारण मराठी 'पाटला' चेंच 'पटेल' हें गुजराथी रूप आहे. तेव्हां असेंब्लीच्या चावडींत बसलेल्या या देशाभिमानी पाटलानें राजीनामा देऊन तारीख २५ एप्रिल रोजीं ती चावडी सोडली व पुन्हा बाहेरील देशकार्याच्या आखाड्यांत उडी घेतली. व्हाइसरॉयांना लिहिलेल्या राजीनाम्यासोबतच्या पत्रांत पटेल लिहितातः—

"१९२५ च्या ऑगस्टमध्यें मी असेंब्लीचा अध्यक्ष झालों. त्या वेळेपासून मी अगदीं निःपक्षपातानें व स्वतंत्र बाण्यानें वागत आलों असून कोणत्याहि वैयक्तिक किंवा राजकीय पक्षविषयक धोरणामुळें मी माझ्या निःपक्षपातीपणाला बाध येऊं दिला नाहीं. पण याचमुळें नोकरशाहीचा मजवर रोष झाला. किरकोळ गोष्टींत नोकरशाहीनें मला अडथळा केला नाहीं. परंतु मुद्द्याची गोष्ट येतांच माझा निस्स्पृहपणा नोकरशाहीच्या डोळ्यांत सलूं लागला. आणि जेव्हां नोकरशाहीनें पाहिलें, कीं मी कांहीं त्यांच्या ताटाखालचें मांजर होऊन राहाण्यास तयार नाहीं, त्या वेळेपासून माझा छळ करण्यास प्रारंभ झाला. गेलीं तीन वर्षें मी जाच सोशीत आलों आहें आणि माझी अध्यक्षाची खुर्ची म्हणजे एक प्रकारें कांट्यांचें आसनच होय असा मला अनुभव आला आहे. नोकरशाहीनें मजवर एक प्रकारें सामाजिक बहिष्कार घातला; मजविरुद्ध वृत्तपत्रांतून भलभलती टीका करविली आणि माझ्या निःपक्षपातीपणाविषयींहि संशय उत्पन्न होईल असले आक्षेप प्रसिद्ध करविले. आपल्याशीं खासगी संभाषणांतच काय तें मला मन मोकळें करून बोलतां येईल, पण इतर सर्वत्र शिष्टाचारानें बांधलों गेल्यामुळें मला हा छळ तोंड बांधून सोसावा लागला.

एवढयानेंहि नोकरशाहीचें समाधान न होऊन तिनें आपल्या हस्तकां-कडून मजविरुद्ध गैरसमज पसरविण्याची मोहीमच सुरू केली. वृत्तपत्रांतून मजविरुद्ध इतके अश्लील व अभक्ष्य लेख प्रसिद्ध होऊं लागले, कीं देशांतील प्रत्येक गोऱ्या इसमाला असेंब्लीचा अध्यक्ष डोळयांतील कणासारखा खुपूं लागला, आणि प्रत्येकजण ही ब्याद अध्यक्षत्वाचा कधीं राजीनामा देईल याची उत्सुकतेनें मार्गप्रतीक्षा करूं लागला. आपलें मनहि मजविरुद्ध कलुषित करण्याचा प्रयत्न झाला. तथापि तो कितपत साधला हें सांगणें माझें काम नव्हे.

माझ्या हालचालीवर नोकरशाहीचें सतत लक्ष असे, व मजवर डिटेक्टिव्हहि ठेवला गेला होता! हेतु हा, कीं या त्रासानें मी राजीनामा द्यावा आणि नोकरशाहीला डांगोरा पिटून जगास सांगायला सांपडावें, कीं पाहा हे हिंदी लोक, यांना जबाबदारीचीं कामेंच आवरतां येत नाहींत. इतकेंहि करून नोकरशाहीचा कावा साधला नाहीं, आणि मला माझ्या जाग्यावरून काढून टाकण्याचा अधिकार नोकरशाहीच्या हातीं नसल्यामुळें माझा अधिकार तिला निमूटपणें सहन करावा लागला. अशा प्रकारच्या प्रतिकूल वातावरणांतहि माझ्या हातून कांहीं तरी राष्ट्रसेवा घडत आहे या बुद्धीनेंच मी राजीनामा न देतां माझ्या जागेस चिकटून राहिलों. सुदैवेंकरून मध्यंतरीं जो वाद उपस्थित झाला त्यांतहि माझाच जय होऊन नोकरशाहीलाच हार खावी लागली. अशा वेळीं माझ्यापेक्षां कमी धीराचा अध्यक्ष असता तर तो राजीनामा देऊन तरी मोकळा झाला असता अगर नोकरशाही नाचवील तसें नाचायला तयार झाला असता. मी यांतून नामुष्कीचा एकहि मार्ग न स्वीकारतां असे निर्णय देत गेलों आणि असा पायंडा पाडून ठेवला, कीं जगांतील कोणत्याहि असेंब्लीला त्याविषयीं अभिमानच वाटावा.

अशा रीतीनें पांच वर्षें सतत परिश्रम करून मी अध्यक्षाच्या जागेचा मान, इभ्रत व अधिकार वाढविला, आणि जनतेचा विश्वास संपादन केला. मात्र या परिश्रमानें माझी प्रकृति खालावली. तरीदेखील माझ्या अध्यक्षत्वापासून थोडें तरी देशाचें कल्याण होत आहे असें मला वाटलें असतें तर मी तसाच चिकटून राहिलों असतों. परंतु देशांतलें सगळेंच वातावरण

बदलून गेलें. राष्ट्रीय सभेनें कायदेमंडळावर बहिष्कार पुकारला आणि त्यानंतर माझे मित्र पं. मदन मोहन आणि त्यांचे एकनिष्ठ अनुयायी यांनींहि साम्राज्यांतर्गत सवलतीच्या जकातीचें धोरण त्यांजवर जबरीनें लादल्यामुळें राजीनामे दिले. सरकारी अधिकाऱ्यांनीं आर्थिक स्वायत्ततेच्या प्रश्नावर मत देऊं नये ही सूचनाहि सरकारनें न मानल्यामुळें असेंब्लीचें प्रातिनिधिक स्वरूपच नष्ट झालें, आणि अशा असेंब्लींत अध्यक्ष राहून तरी काय उपयोग म्हणून मीं राजीनामा देण्याचा विचार ठरविला; कारण यापुढें असेंब्ली ही सरकारच्या हुकमांची बिनतक्रार नोंदणी करणारी सभा बनणार आहे ! आणि असल्या असेंब्लीच्या अध्यक्षपदावर राहिल्यानें मी असेंब्लीला नसतें महत्त्व देऊन राष्ट्राचें नुकसान केलें असें होणार आहे.

"ता. २१ जानेवारीच्या भाषणांत मीं म्हटलेंच होतें, कीं अध्यक्षांचें स्थान पक्षभेदातीत असल्यानें कोणत्याहि एका राजकीय पक्षानें सांगितलें म्हणून मी राजीनामा देणार नाहीं ! तथापि ज्या वेळीं राजीनामा देण्यानें राष्ट्रसेवा अधिक करण्याची संधि मिळेल त्या वेळीं माझा राजीनामा तयारच आहे आणि मला वाटतें तशी वेळ आतां आली आहे. म. गांधी यांनीं सुरू केलेला स्वातंत्र्याचा लढा खूप जोरांत आला आहे. माझे शेंकडों देशबांधव तुरुंगांत जाऊन सरकारचे पाहुणे बनले आहेत; हजारों देशबंधू राष्ट्रकार्यासाठीं आपले प्राणदेखील देण्यास तयार झाले आहेत; आणि लक्षावधि लोक कारावासाची आपत्ति राष्ट्राकरितां स्वतःवर ओढून घेण्यास उत्कंठित झाले आहेत. अशा वेळीं अध्यक्षांची खुर्ची ही माझी योग्य जागा नसून माझ्या देशबांधवांच्या खांद्याशीं खांदा भिडवून या लढ्यांत भाग घेणें हेंच माझें खरें कर्तव्य होय. अशा रीतीनें झगडण्याची वेळ येऊं नये म्हणून मीं आपणाला यापूर्वीच पत्रद्वारें विनंती केली होती, कीं डोमीनियन स्टेटसचा हिंदुस्थानचा हक्क योग्य वेळींच प्रांजळपणें मान्य करा आणि मला आशा होती कीं आपल्या मध्यस्थीमुळें हा हक्क मान्य केला जाईल. परंतु त्यानंतर इंग्लडांत व हिंदुस्थानांत ज्या कांहीं घडामोडी झाल्या त्यांवरून मला कळून चुकलें, कीं आर्थिक स्वातंत्र्याचें धोरण जितकें तकलुपी आहे तितकेंच डोमीनियन स्टेटसचें अभिवचनहि तकलुपी आहे. कारण हिंदु-

स्थानच्या या न्याय्य मागणीला दुजोरा न मिळतां उलट जनतेच्या आकांक्षा चिरडून टाकण्याकारितां सरकारकडून दडपशाहीचा वरवंटा जोरानें फिरविला जाऊं लागला आहे !

"यावरून माझी अशी खात्री झाली, कीं गांधींजींनीं आपल्या अटी मान्य झाल्याखेरीज रा. टे. कॉ. मध्यें कॉंग्रेसनें भाग घेऊं नये असा जो सल्ला दिला तोच बरोबर असून संपूर्ण डोमीनियन स्टेटस देण्याची चर्चा चालू होईल तरच रा. टे. कॉ. ला जाण्यांत कांहीं अर्थ आहे. अशा परिस्थितींत सरकारचा संबंध तोडून टाकून स्वातंत्र्य–संग्रामाच्या समरांगणावर उभें राहाणें हेंच देशभक्ताला शोभेलसें माझें कर्तव्य होय. माझी नाजूक प्रकृति माझ्या या निश्चयाच्या आड येणार नाहीं अशी मला आशा आहे. समजा, यदाकदाचित् मला या लढ्यांत प्रत्यक्ष भाग घेतां आला नाहीं तरी माझा या लढ्याला नैतिक पाठिंबा आहे एवढें तरी माझ्या या राजीनाम्यानें सिद्ध होईल."

शेवटच्या भागांत ना. पटेल यांनीं गुजराथ रिलीफ फंडाच्या वेळीं आणि मुख्यतः बार्डोली लढ्याच्या वेळीं व्हाइसरॉयांनीं आपल्या विनंतीस मान देऊन तो लढा योग्य रितीनें मिटविला याबद्दल आभार मानून आणि लॉर्ड आयर्विनशीं असलेला आपला खाजगी वैयक्तिक स्नेहसंबंध असाच कायम राहील अशी आशा प्रदर्शित करून आपलें पत्र समाप्त केलें आहे.

पटेलांचें हें पत्र ऐतिहासिक दृष्टीनें अतिशय महत्त्वाचें असल्यामुळें तें आम्हीं या ठिकाणीं विस्तारानें उद्धृत केलें आहे. या एवढ्याच पत्रावरूनहि पटेलांची निर्भयता, निःस्पृहता, जाज्वल्य स्वदेशाभिमान असे अनेक उच्च दर्जाचे गुण निदर्शनास येतात.

# अध्यक्षपदाच्या काळांतील गमती व आठवणी

सुनीतिपथ सेवणें मलिन कर्म मानेच ना ।
घडो मरण नावडे खलजनांप्रति प्रार्थना ।
विपत्तिसमयींहि जो प्रकटवीच ना दीनता ।
भल्याविण असें असिव्रत करूं शके कोणता ॥

एकदा एक अमेरिकन जोडपें प्रवास करीत करीत असेंब्लीचें सभागृह पाहाण्याकरितां आलें. त्यांनीं दिलेलें व्हिजिटिंग कार्ड कोणींतरी पटेलांना दाखविलें. पटेलांनीं त्या जोडप्याला बरोबर घेऊन असेंब्ली हॉलमध्यें हिंडावून तेथला कोनाकोपरा त्यांना दाखविला व शेवटीं अध्यक्षाच्या खुर्चीवरहि त्यांना आळीपळीनें बसविलें. व तशीं तीं बसल्यानंतर पटेलांनीं त्यांना सलाम केला. पुढें त्या माणसांनीं पटेलांना कोणींतरी चपराशी समजून त्यांना बक्षिसी देऊं केली. पटेलांनीं ती बक्षिसी अर्थातच घेतली नाहीं. पुढें पटेलांनीं त्यांच्याबरोबर एक मनुष्य दिला व त्याला सांगितलें कीं आतां यांना असेंब्लीहॉलच्या भोवतालचें सर्व दाखव व मग त्यांना माझ्याकडे घेऊन ये. त्याप्रमाणें सर्व पाहून घेतल्यावर ती मंडळी परत अध्यक्षाच्या खोलींत आली. अध्यक्षांना पाहिल्यावर अर्थातच दोघें आश्चर्यानें थक्क झालीं व गोंधळून गेलीं. कारण ज्या मनुष्यानें त्यांना प्रथम सभागृह दाखविलें तो त्यांच्या समजुतीप्रमाणें चपराशी नसून ते असेंब्लीचे अध्यक्ष खुद्द पटेल असल्याचें त्यांना कळलें व आपण बक्षिसी देऊं केल्याचा असभ्यपणा दाखविला याबद्दल त्यांनीं पटेलांची क्षमा मागितली.

पटेलांकडे कोणी जरी लहानमोठा पाहुणा आला तरी त्याला ते बरोबरीच्या नात्यानें वागवीत. व अशा वेळीं आपल्या युरोपियन सेक्रेटरीकडून त्याला सारी असेंब्लीची इमारत व इतर सर्व गोष्टी दाखवीत. एकदा त्यांच्या युरोपियन सेक्रेटरीनें त्यांच्या स्वयंपाक्याला स्वतःबरोबर घेऊन सर्व

गोष्टी आस्थापूर्वक दाखविल्या. आपल्या युरोपियन सेक्रेटरीबद्दल बोलतांना ते नेहमीं 'हे पाहा नथ्थुभाई, या नथ्थुभाई' असें म्हणत. गुजराथींत नथ्थुभाई म्हणजे तृतीय प्रकृति मनुष्य असा अर्थ होतो! पण गंमत अशी कीं सेक्रेटरीजवळ असतांना जर हिंदी मनुष्य आला तर त्या हिंदी मनुष्याला ते साहेब म्हणत. घरच्या स्वयंपाक्यापासून सेक्रेटरीपर्यंत सर्वांना ते सारखे मित्रासारखे वागवीत. एकदा विठ्ठलभाई पटेल हे मुंबईच्या ग्रँटरोड स्टेशनवरून दिल्लीला जाण्याला निघाले होते. त्यांची मित्रमंडळी प्लॅटफॉर्मवर उभी होती. पटेलांचा आचारी हातांत आपल्या कामाचें सामान घेऊन उभा होता. प्रथम तो जरा इकडे तिकडे फिरत होता. थोड्या वेळानें तो पटेलांच्या जवळ येऊन उभा राहिला. तेव्हां पटेलांचे एक मित्र श्री. महेश्वरी हे त्या आचाऱ्याला म्हणाले, "तिथें कां तूं उभा राहिलास? तुझं इथें काय काम आहे?" तेव्हां पटेल उठून म्हणाले, "राहूं द्या त्याला मजजवळ उभा. आपण जगाला असं दाखविलं पाहिजे, कीं असेंब्लीचा अध्यक्ष आणि पटेलांचा आचारी यांच्यामध्यें माणूस या दृष्टीनें उच्चनीचपणा नाहीं."

असेंब्लीची बैठक संपल्यानंतर पटेल जेव्हां मुंबईला परत येत, तेव्हां ते आपल्याबरोबर अध्यक्षांचें सारें ऑफिस घेऊन येत. हें ऑफिस मुंबईस आर्यभुवनमध्यें लोटवाला यांच्या घरीं थाटलें जाई. व त्याबद्दल सरकार लोटवाल्यांना भाडें देई. आतांपर्यंत कोणत्याहि अध्यक्षानें बैठक संपल्यानंतर आपलें ऑफिस दिल्ली–सिमल्याहून अन्य ठिकाणीं हलविलें नव्हतें. पण पटेलांनीं ही रूढि मोडली. कारण त्यांचें म्हणणें असें, कीं अध्यक्षाबरोबर त्यांचें ऑफिस पाहिजे. जिकडे अध्यक्ष जाईल तिकडे त्याचें ऑफिस गेलें पाहिजे. म्हणजे आतांपर्यंत दिल्ली–सिमल्यास असेपर्यंतच अध्यक्षाचें काम करायचें ही पद्धत पटेलांना पसंत नव्हती. पटेलांनीं मुंबईला आपलें अध्यक्षीय ऑफिस आणलें म्हणजे त्याच ठिकाणीं त्यांचें निवासस्थान जें वांद्रा, तेथील कॉंग्रेस कमिटीचेंहि काम चालें. पटेल या ठिकाणीं आपला युरोपियन सेक्रेटरी व कॉंग्रेस कमिटीचा सेक्रेटरी यांना मुद्दाम जवळच समोरासमोर बसवीत. व त्यांचेकडून कामें करून घेत. यावरून पटे-

लांना दर्शवायचें होतें कीं अध्यक्षाचा सेक्रेटरी व कॉंग्रेस कमिटीचा सेक्रेटरी यांचा कामाच्या दृष्टीनें सारखा दर्जा आहे. पटेलांच्या युरोपियन सेक्रेटरीला अर्थात्च या गोष्टी निमूटपणें कराव्या लागत.

पटेल अध्यक्ष होण्यापूर्वी अध्यक्षांचे जे चपराशी, पट्टेवाले वगैरे असत त्याचे पोशाक दिखाऊ भडक असे असत. पटेलांनीं असले पोषाक बंद केले व त्यांना साधे पोशाक घालायला लावले.

पटेल एकदा थोडे आजारी पडले. बिछान्यावर निजून होते. अशा वेळीं सीलोनमधल्या एका वर्तमानपत्राचा इंग्रजी बातमीदार पटेलाचा शोध करीत करीत त्यांच्या घरापर्यंत आला. तो आंत पडवींत शिरला तेव्हा पटेल लांबून त्याला पाहून आपल्या जवळच्या मित्राला म्हणाले, " हें भूत कुठून आलं आहे ? " आणि लगेच डोळे मिटून भिंतीच्या बाजूला तोंड करून निजले. इकडे त्यांच्या मित्रानें पडवींत आलेल्या त्या बातमीदाराला खुर्ची दिली. तेव्हां तो बातमीदार व पटेलांचा मित्र यांचें बोलणें सुरू झालें. त्या बातमीदाराच्या बोलण्यावरून असें दिसलें, कीं त्याला पटेलांकडून सत्याग्रह कमिटीच्या कार्यक्रमाची माहिती पाहिजे होती. त्यानंतर पटेलांचा मित्र आंत पटेलांकडे आला व बातमीदार कशाकरितां आला आहे तें त्यानें त्यांना सांगितलें. पटेल त्या मित्राला म्हणाले, " त्या बातमीदाराला सांग कीं मला बरं नाहीं. ताप आला आहे आणि कसेंहि करून त्याला वाटेला लाव. " तेव्हां मित्रानें उत्तर दिलें, " पटेलसाहेब, तसं नको. तुम्हांला ताप आला तरी थोडं त्याच्याशीं तुम्ही बोला आणि मग त्याला जायला सांगा. " तेव्हां, " बरं, मग त्याला आंत पाठव, " असें पटेलांनीं म्हटल्यावर तो बातमीदार आंत आला. व जणूं काय आपण मुळींच आजारी नाहीं असें दर्शवून त्याच्याशीं त्यांनीं बराच वेळ गप्पागोष्टी केल्या. त्यामुळें बातमीदारालाहि फार संतोष वाटला. जातां जातां त्या बातमीदारानें पटेलांना विचारलें, "मि. पटेल, आपलं वय किती आहे ?" त्यावर पटेल म्हणाले, "मला वाटतं माझे वडील तुम्हाला माझं वय सांगतील. " " असं का ! " बातमीदार आश्चर्यानें उद्गारला. " तुम्हांला आमच्या वडिलांना पाहायचं आहे काय?" असें पटेलांनीं विचारलें. तेव्हां " होय, पाहायचं आहे," असें बातमीदारानें

उत्तर दिलें. "फार छान, मग तिकडे जा," असें म्हणून पटेलांनीं आकाशा-कडे बोट दाखविलें. बातमीदाराला हे ऐकून हसूं लोटलें व त्यानें पटेलांशीं हस्तांदोलन करून त्यांचा निरोप घेतला.

पटेलांच्या विनोदी वृत्तीचा हा खोचदार नमुना म्हणून सांगतां येण्या-सारखा आहे. पटेल जरी कधीं विनोद करीत असत तरी ते फार निर्भीड असल्यानें पुष्कळदा दुसऱ्याला बोचेल असें बोलत. व मग परिस्थिति फार गंभीर होई. पण सुदैवानें ती सावरली जावी असेंच घडे. पटेल अध्यक्ष असतांना विलायतेस गेले त्या वेळची गोष्ट आहे. इंग्लंडमध्यें असतांना पटेलांना बडया बडया लोकांचीं मेजवानीचीं आमंत्रणें येत. एकदा इंग्लंडचे लॉर्ड चॅन्सेलर लॉर्ड केव्ह यांनीं हाऊस ऑफ लॉर्डस्‌मध्यें मोठा मेजवानीचा समा-रंभ करून पटेलांना इतरांबरोबर निमंत्रण केलें. मेजवानीला मोटमोठी पाहुणे-मंडळी आली होती. त्या वेळेची पटेलांसंबंधींची एक आठवण लॉर्ड चॅन्सेलर यांची पत्नी लेडी केव्ह यांनीं लिहून ठेवली आहे. लेडी केव्ह म्हणतात, "मि. पटेल हे आमच्याबरोबर भोजनाला आले होते. त्या वेळीं त्यांच्या अंगांत एक लांबलचक सैल कफनी होती. भोजन नुकतेंच आटोपलें होतें. अशा वेळीं कोणी एका पाहुण्यानें हिंदुस्थानाविषयीं एक असभ्य विधान केलें. तेव्हां पटेल मला ( लेडी केव्ह यांना ) म्हणाले, 'मॅडम, तुम्हीं गेलीं १६५ वर्षें हिंदुस्थानवर अंमल चालविण्याचा प्रयत्न करून पाहिलात; पण अजूनहि तुम्हांला यश आलेलं नाहीं.' पटेलांनीं जेव्हां असें म्हटलें तेव्हां माझे यजमान जॉर्ज यांनीं माझ्याकडे पाहिलें. तेव्हां आतां टेबलापाशीं अधिक वेळ बसतां कामा नये असें ओळखून मी उठून पटेलांना म्हणालें, 'मि. पटेल, चला माझ्याबरोबर; आपण दुसरीकडे जाऊं' आपल्या बोलण्याचा इतका लवकर विसर पडला हें पाहून पटेलांना आनंद झालासा दिसला.'

म्हणजे स्नेह्यासोबत्यांच्या मेजवानी प्रसंगीं कठोर राजकीय वादविवाद चालावे हें ठीक नाहीं असें वाटून या मेजवानीचे यजमान लॉर्ड केव्ह यांचें मन अस्वस्थ झालें असलें पाहिजे; व म्हणूनच त्यांनीं आपल्या पत्नीकडे पाहिलें. परंतु त्यांच्या पत्नीच्या चतुराईमुळें मेजवानींत उत्पन्न झालेला वाद-

विवादाचा कडूपणा अधिक वाढण्याचा टळला. कारण तिनें पटेलांना मेजवानीच्या टेबलापासून युक्तीनें लांब नेलें. नाहीं तर पटेल वादाच्या भरांत निर्भीडपणें सत्य तेंच पण खोचक असें बोलले असते व मेजवानीसारख्या खेळीमेळीच्या समारंभाचा विरस झाला असता.

पटेल अध्यक्ष असतांना मधूनमधून कॉंग्रेस पक्षाचे लोक असेंब्लींतून गैरहजर राहात. पटेलांचा विशेष हा कीं त्यांच्या गैरहजिरींत जीं जीं वादग्रस्त बिलें सरकार असेंब्लीपुढें मांडी तीं तीं पटेलांनीं थोपवून धरलीं व त्यावर मतप्रदर्शन करूं दिलें नाहीं. कॉंग्रेस पक्षाच्या गैरहजिरीमुळें असेंब्लीचें प्रतिनिधिक स्वरूप नाहींसें होतें असें पटेलांचें म्हणणें असे व म्हणून त्यांनीं वादग्रस्त बिलें सरकारला पुढें आणूं दिलीं नाहींत. पटेल अध्यक्षपदावर असतांना त्यांचें बाणेदार वर्तन पाहून सरकारलाहि वचक बसला होता. व म्हणून उघड रीतीनें नाहीं पण आतून सरकारनें त्यांना छळण्याचें धोरण ठेवलें होतें. हेतु हा कीं अध्यक्षानें सरकारच्या हुकमाचें ताबेदार राहावें. सरकारचे गुप्त पोलिस आपल्या मागें कसे असत, सरकारनें आपलें वर्चस्व कमी करण्याचे डाव कसे चालविले होते व एकंदरीनें अध्यक्षांची खुर्ची ही कांटयांच्या आसनासारखी पटेलांना त्रासदायक कशी झाली होती याचें वर्णन त्यांनीं दिलेल्या राजीनाम्याबरोबरच्या पत्रांत आपण वाचलेंच आहे. पुढें पुढें तर सरकारनें मांडलेल्या छळाचा पारा इतका चढला, कीं पटेल आपल्या पर्सनल सेक्रेटरीवरसुद्धा विश्वास टाकूं शकले नाहींत. हा सेक्रेटरी युरोपियन असायचा व पटेल जें काय बोलतील किंवा लिहितील तें या सेक्रेटरीमार्फत कुठून तरी सरकारी गोटांत बाहेर फुटायचें आणि त्यामुळें सरकार सावध होऊन पटेलांना आपले पुष्कळसे बेत तडीस नेणें अशक्य होत असे. कारण कोणतीहि गोष्ट लोकपक्षाला संमत झाली पाहिजे हें पटेलांचें धोरण होतें व असें धोरण बहुशः सरकारला मान्य नसल्यामुळें पटेलांना आपलें विचारस्वातंत्र्य व आचारस्वातंत्र्य बरेंच जखडल्यासारखें वाटे. व तसें वाटणें साहजिकच होतें. या वेळीं पटेलांनीं आपल्या मित्राला लिहिलेल्या पत्रांत म्हटलें आहे, कीं " आतांशा मी माझ्या सावलीलाहि भितों." पटेलांकडे कोणी त्यांचा मित्र पाहुणा आला तर त्याच्याशीं गप्पागोष्टी करणें किंवा हितगुज करणेंहि

पटेलांना अशक्य झालें होतें. कारण त्यांचें जें कांहीं बोलणें होई तें सरकारच्या गोटांत हटकून प्रसिद्ध व्हायचें. त्यामुळें कोणा आपल्या स्नेह्याशीं बोलायचें असलें किंवा त्याचा सल्ला घ्यायचा असला तर ते आपल्या निवासस्थानापासून बरोबर त्या मित्रालाच घेऊन लांब कुठें तरी फिरायला जात व मग त्या ठिकाणीं तें बोलत. पुष्कळदा असें घडलें कीं पटेलांनीं जीं आपलीं खाजगीं म्हणून पत्रें आपल्या हाताखालच्या नोकराकडून टाइप करून घेतलीं व पाठविलीं त्यांतील बरीचशीं पत्रें मध्येंच कोणीं तरी पाहात व मग तीं पुढें जात. अर्थात् ही स्थिति पटेलांना असह्य झाली. व म्हणून पुढें पुढें आपलीं खाजगीं पत्रें पटेल स्वतः लिहीत व टाइप करीत व पुष्कळदा स्वतः पोस्टाच्या पेटींत नेऊन टाकीत! आपला मनसुबा किंवा पूर्वीं योजिलेले बेत सरकारला मुळींच कळूं देतां कामा नयेत याबद्दल पटेलानीं विशेषतः पब्लिक सेफ्टी बिलाच्या वेळीं अत्यंत दक्षता ठेवली होती. आपण त्या बिलावर कोणतें रूलिंग देणार आहोंत याचा मागमूसहि सरकारला लागूं नये म्हणून त्यांनीं आपले युरोपियन सेक्रेटरी मि. ग्रॅहॅम यांना तीन दिवसपर्यंत आपल्या खोलींत डांबून ठेवलें होतें! बिलावर रूलिंग देण्याच्या दिवसापर्यंत त्यांनीं त्या सेक्रेटरीला आपल्या निवासस्थानाच्याबाहेर फिरकूं दिलें नाहीं. जर तसें करूं दिलें असतें तर हें रूलिंग सरकारी गोटांत आगाऊ कळलें असतें व त्यावर सरकारनें आधींच कांहीं तरी तोड काढून ठेवली असती असें पटेलांना वाटलें. आपण कोणतें रूलिंग देणार आहोंत याचा थांगपत्ता सरकारला लागूं नये म्हणून वर सांगितल्याप्रमाणें पटेलांनीं पक्का बंदोबस्त तर केला होताच, पण आपण रूलिंग कोणतें देणार याची कल्पना त्यांनीं आपल्या निकटच्या मित्रांनाहि दिली नाहीं. जेव्हां कोणी त्यांचे स्नेही रूलिंग कोणतें देणार असें त्यांना आधीं विचारीत तेव्हां पटेलांची तयारी असूनहि ते त्यांना एवढेंच उत्तर देत, कीं "मला माहीत नाहीं. माझा ईश्वरावर भरंवसा आहे. तोच मला मार्ग दाखवील." "पुष्कळदा आपले स्नेहीसोबती आपल्याजवळ नसायचे, कठीण प्रसंगीं ज्याचा सल्ला घेतां येईल असे मित्र ताबडतोब मिळायचे नाहींत अशा असहाय स्थितींत मी मोठ्या कष्टानें अध्यक्षपदाचे दिवस काढले," असें त्यांनीं अध्यक्षपदाच्या राजीनाम्यानंतर उद्गार काढले.

पटेलांचें बोलणें पुष्कळदा जरी विनोदाचें भासलें तरी त्यांत खरेपणाच असे त्याचे स्वैरालापहि पोकळ नसून पुष्कळदा अर्थपूर्ण असत. गेलेला क्षण किंवा सुटलेला तीर ज्याप्रमाणें मागें फिरत नाहीं त्याप्रमाणें त्यांचा बोललेला शब्द मागें फिरत नसे, तर तो आपलें काम बरोबर करी. म्हणून लोकमान्य टिळकांप्रमाणें पटेल हे एकवचनी व एकवाणी होते असें म्हणण्यांत कोणतीहि अतिशयोक्ति नाहीं असें आम्हांस वाटतें. पटेलांचा एक मुसलमान चपराशी होता. तो फार प्रामाणिक व मेहनती असे. पटेलांनीं एकदा सरकारकडे अशी शिफारस केली कीं या चपराश्याला खानसाहेब ही पदवी देऊन त्याच्या नवीन पदवीला साजेशी पगारबढती त्याला द्यावी. आतां अध्यक्षासारख्या मोठ्या दर्ज्याच्या माणसानें ही शिफारस ज्या अर्थी केली त्या अर्थी सरकारला जरी ती चमत्कारिक वाटली तरी नाइलाज म्हणून का असेना, तिचा विचार करणें भाग होतें. प्रथम थोडी कुरबुर झाली. पण पटेलांचें त्यावर म्हणणें असें कीं " जो मनुष्य प्रामाणिक व मेहनती आहे त्याला खानसाहेब करायचें नाहीं तर मग काय एखाद्या ऐऱ्यागैऱ्याला किंवा वशिलाच्या तट्टाला खानसाहेब बनवायचें ? तसें असेल तर त्या पदवीला कांहीं अर्थ उरत नाहीं. " पटेलांचा हा युक्तिवाद बिनतोड होता; व सरकारनें अखेर त्याला मान्यता देऊन त्यांच्या चपराशाला खानसाहेब करून त्याला दीडशें रुपये पगाराची जागा दिली. एके दिवशीं पटेलांनीं व्हाइसरॉयांना गार्डन पार्टी दिली त्या प्रसंगीं पटेलांनीं या नवीन खानसाहेबाला आपल्या जवळ बसवून घेतलें होतें.

देशबंधु दास यांचें देहावसान झालें त्या वेळीं मुंबईस शोकप्रदर्शनार्थ मारवाडी विद्यालयांत मोठी सभा झाली. पटेलांना त्या सभेचे अध्यक्ष नियोजित केलें होतें. सभेची वेळ झाली तेव्हां सभेचे व्यवस्थापक पटेलांना बोलावण्यास गेले. पटेलांना अर्थात् यापूर्वी कळविलें होतेंच. पण या वेळीं ते बोलावणाऱ्या व्यवस्थापकांस म्हणाले, " कसली सभा ? आणि तिथें कशाकरितां जायचं ? " " साहेब ! " व्यवस्थापक म्हणाले, " आज दासबाबूंची सभा आहे." पटेलांनीं विचारलें, " काय, आज सभेंत दासबाबू भाषण करणार आहेत ? " " नाहीं साहेब." व्यवस्थापक म्हणाले,

"दासबाबू मृत झाले आहेत व त्यांच्याविषयीं पटेलांचं गुणगान होणार आहे." "काय, दासबाबू वारले? म्हणतां तरी काय तुम्ही? दासबाबू मृत झाले असें होईल तरी कसं? ते कधींच मृत होणार नाहींत. दासबाबू अमर आहेत. तुम्हांला माहीत नाहीं काय, कीं भगवंताला दासबाबूंच्या सल्ल्याची जरुरी आहे. दासबाबूसारख्या बॅरिस्टराच्या सल्ल्याची जरुरी कोणाला लागत नाहीं?" असें बोलून पटेल सभेला आले. त्या दिवशीं पटेलांनीं दासबाबूंच्या गुणवर्णनपर जें भाषण केलें तें ऐकून हजारों श्रोत्यांच्या डोळ्यांतून अश्रू वाहूं लागले.

आपल्या अध्यक्षीय अधिकारांचा पुरा उपयोग करून घेण्यांत पटेल फार दक्ष असत हें आपण यापूर्वीं पाहिलेंच आहे. त्याचेंच आणखी एक प्रत्यंतर या ठिकाणीं सांगतों. हिंदुस्थानचे पूर्वीचे व्हाइसरॉय लॉर्ड रीडिंग यांचा पुतळा असेंब्लीच्या इमारतींत बसविला होता व त्याचा अनावरण समारंभ व्हायचा होता. या समारंभाच्या निमंत्रणपत्रिका व्हाइसरॉय लॉर्ड आयर्विन यांनीं आपल्या सहीनें काढल्या व त्यांवरून निमंत्रणें पाठविण्यांत आलीं. निमंत्रणपत्रिका घेऊन एक मनुष्य पटेलांच्या निवासस्थानीं आला तेव्हां पटेल स्नानगृहांत होते. ते बाहेर येईपर्यंत तो थांबला. पण बाहेर आल्यानंतर पटेलांनीं ती निमंत्रणपत्रिका स्वीकारली नाहीं व आलेल्या मनुष्याला परत पाठविलें. म्हणून पटेलांचे खुद्द युरोपियन सेक्रेटरी त्यांना बोलवायला आले. तरीहि पटेलांनीं निमंत्रण स्वीकारण्याचें व समारंभाला येण्याचें नाकारलें. ते म्हणाले कीं, "असेंब्लीच्या इमारतीवर अध्यक्षाचा ताबा आहे. व्हाईसरॉयसाहेबांचा नाहीं. असें असतांना असेंब्लीच्या इमारतींत जो समारंभ होणार त्यांचीं निमंत्रणें व्हाइसरॉयांच्या सहीनें कां म्हणून पाठवायचीं? हीं निमंत्रणें अध्यक्षाच्या सहीनेंच पाठविण्यांत आलीं पाहिजेत." याप्रमाणें पटेलांनीं दिलेला निरोप व्हाइसरॉयांना कळल्याबरोबर पूर्वीं केलेलीं निमंत्रणें रद्द करण्यांत आलीं व पटेलांच्या सहीच्या नवीन निमंत्रणपत्रिका तयार करण्यांत आल्या तेव्हां कुठें इमारतींतील पुतळ्याचा अनावरण-समारंभ झाला.

पटेल व महात्मा गांधी यांच्या राजकीय दृष्टींत फरक होता तरी पटेलांना गांधींबद्दल आदर वाटत असे. तो इतका कीं "गांधी म्हणजे हिंदुस्थान"

असे उद्गार त्यांनीं काढले होते. एरवीं गांधींच्या विशिष्ट धोरणावर कडक टीकेचे प्रहार करण्यासहि ते कमी करीत नसत. पटेल पहिल्यांदा जेव्हां असेंब्लीचे अध्यक्ष झाले त्या वेळचा एक प्रसंग आहे.पटेल असेंब्लीचें अधिवेशन संपवून वांद्रा येथें आपल्या निवासस्थानीं परतले. दुसऱ्या दिवशीं सकाळीं आठ वाजतां ते मोटारींत बसून सांताक्रूझ येथें त्यांचे मित्र श्री. सामळदास गांधी राहात होते त्यांच्याकडे गेले. घरासमोर मोटार उभी राहातांच पटेलांनीं ' गांधी शेठ ' म्हणून आपल्या मित्राला हाक मारली. व ते येतांच त्यांना प्रणाम केला. " हें पाहा, गांधीशेठ ( पटेल विनोदानें आपल्या मित्राला गांधीशेठ म्हणत ) आपल्याला आज गांधीजींना भेटायला जावयाचं आहे. मी कालच आलों. तुम्ही माझ्याबरोबर चला. महात्माजींना मला सर्वांच्या आधीं भेटायचं आहे." असें म्हणून दोघेहि मोटारींतून गांधींचें निवासस्थान जें जुहू तिकडे जाण्यास निघाले. वाटेंत गप्पा सुरू झाल्या. पटेल म्हणाले, "तुम्हांला माहीत आहे ना कीं आज गांधींचा मौन वार आहे ?"

" होय " सामळदासांनीं उत्तर दिलें. " मग, तरी मी आज गांधींना भेटायला कां निघालों त्याला कारण आहे. मी जर आज न भेटतां गांधीजींनीं उद्यां भेटलों असतों तर त्यांनीं माझ्यावर ठपका आणला असता. मी आज फक्त बोलेन आणि गांधी माझं बोलणं ऐकतील. "

याप्रमाणें गप्पा गोष्टी चालल्या असतां मोटार जुहूला गांधींच्याकडे येऊन ठेपली. व्हरांड्यावर गांधीजी आपल्या मित्रमंडळीसह बसले होते. पटेल मोटारींतून उतरल्याबरोबर दाढीवरून हात फिरवीत सर्वांकडे पाहून म्हणाले, " हो, हो, आज मौनवार आहे नाहीं का ? " सर्व मंडळी हसूं लागली. कारण त्यांची समजूत अशी झाली कीं गांधींचा मौनवार आहे हें पटेलांच्या आतां लक्षांत आलें. पटेलांनीं असेंब्लीची सर्व हकीगत सांगितली. व गांधींनीं ती ऐकून घेतली. हें सर्व झाल्यावर पटेल आपल्या मित्रासह परतले. पटेल म्हणाले, " चला आपण आपलं हृदय तर उघडं केलं आहे. नारायण नारायण ! पटेलांच्या खाजगी बोलण्यांत " नारायण नारायण " हे शब्द बऱ्याचदा येत त्याचा हा एक नमुना आहे.

पटेलांची अध्यक्षपदाची पहिली निवडणूक झाली त्या वेळेची एक गोष्ट

आहे. ही निवडणूक किती विलक्षण चुरशीची झाली हें आपण मागें पाहि-लेंच आहे. पटेलाचे प्रतिस्पर्धी उमेदवार दिवाणबहादुर रंगाचारी हे होते. त्यांना सरकारपक्षीय लोकांचा भरभक्कम पाठिंबा होता. लोकपक्षाचा व जिनापक्षांतील बहुतेकांचा पूर्ण पाठिंबा पटेलांना होता. त्यामुळें दोन्ही बाजूकडील मतांत फारच थोडें म्हणजे दोन तीन मतांचेंच अंतर होतें. व हीं दोन तीन मतें ज्या बाजूला पडतील तिकडे जय येणार हें ठरल्यासारखें होतें. हीं मतें ज्यांचीं होतीं ते सभासद म्हणजे एक सातारचे सरदार मुतालिक व दुसरे अहमदाबादचे कस्तुरभाई लालभाई असे होते. हे दोघे कोणाला मतें देणार हें निवडणुकीच्या आदल्या दिवसापर्यंत समजलें नव्हतें. सरदार मुतालिक हे महाराष्ट्र कँपमध्यें केळकरांच्याबरोबर राहात. आदल्या दिवशीं केळकर हें सायंकाळीं फिरायला निघाले असतांना पटेलांची थोडी गंमत करावी म्हणून त्यांच्या निवासस्थानावरून गेले व त्यांना म्हणाले, कीं मुतालिक हे तुम्हांला मत देणार नाहींत. पाहा बुवा !" केळकरांचें हें बोलणें विनोदाचेंच होतें. कारण मुतालिकांचें पटेलांनाच मत देण्याचें ठरलें होतें; व केळकरांच्या सान्निध्यानें मुतालिकांच्या निश्चयाला दृढता आली होती. पण त्या वेळीं केळकर जें थट्टेनें बोलले तें पटेलांना खरें वाटलें. म्हणून दुसऱ्या दिवशीं सकाळीं सूर्योदयाच्या आंत पटेल उठून सरदार मुतालिक यांच्याकडे गेले व आपल्याला मत देण्याबद्दल त्यांनीं त्यांना विनति केली. अर्थात् मुतालिकांनीं ती विनंती मान्य केली; व मुतालिकांचें हें मत मिळाल्या-मुळें पटेलांचा जय झाला.

अध्यक्षांची निवडणूक गुप्त मतदानपद्धतीनें झाली. म्हणजे प्रत्येक सभा-सदानें उठून सेक्रेटरीच्या टेबलाजवळ जावें व तेथल्या चिठ्ठीवर ज्याला मत द्यायचें त्याच्यापुढें सही करावी. ही सही कोणाच्या नांवापुढें केली जाई हें अर्थातच कोणाला समजूं नये असा उद्देश असे. पण सेक्रेटरीच्या टेब-लाच्या लगेच वर जी प्रेक्षकांची गॅलरी होती तेथले लोक टेबलाकडे खालीं वांकून निरखून पाहात व कोणी कोणाला मत दिलें आहे हें चांगल्या दृष्टीच्या माणसाला सहज समजे. त्यामुळें गुप्त मतदान पद्धति असूनहि दुसऱ्या दिवशीं कोणीं कोणाला मतें दिलीं हें सर्व सांगून शकले. कारण गॅलरींतल्या प्रेक्ष-

कांनीं आपापल्या इष्टमित्रांपैकीं तेथें जे सभासद असतील त्यांनाहि इतरांबरो-बर सर्व सांगितलें. सरदार मुतालिक हे आपल्याला मत देतील असें पटेलांचे प्रतिस्पर्धी दिवाणबहादुर रंगाचारी यांना वाटत होतें. कारण पूर्वीपासून त्यांचा स्नेह होता. पण दिवाणबहादूरमजकुरांना जेव्हां कळलें कीं मुतालिकांनीं पटेलांना मत दिलें, जेव्हां त्यांनीं मुतालिकांना मागाहून त्याबद्दल विचारलें तेव्हां "पटेलांना मत द्यायचं हें माझं आधींच ठरलेलं होतं" असें मुतालिकांनीं उत्तर दिलें.

# सत्याग्रह-संग्राम व परदेश-वास

" क्रियासिद्धिः सत्त्वे भवति महतां नोपकरणे । "

असेंब्लीचा राजीनामा देतांना पटेलांनीं व्हाइसरॉयांना कळविलें होतें, कीं " म. गांधी यांनीं सुरू केलेला स्वातंत्र्याचा लढा खूप जोरांत आला आहे. अशा वेळीं अध्यक्षाची खुर्ची ही माझी योग्य जागा नसून माझ्या देश-बांधवांच्या खांद्याशीं खांदा भिडवून या लढ्यांत भाग घेणें हेंच माझें खरें कर्तव्य." या कर्तव्याचें पालन पटेलांनीं करून दाखविलें. तें कसें हें आतां आपणांस पाहायचें आहे.

असेंब्लीचा राजीनामा दिल्यानंतर लगेच पटेलांनीं एका विदेशी पत्र-काराला मुलाखत दिली. तींत त्यांनीं आपलें हृदय प्रगट केलें. हा पत्रकार पटेलांच्या भेटीस गेला व त्यानें बोलण्यास सुरवात केली. पण प्रथमतःच पटेलांनीं त्या माणसाला चकित केलें. पटेल म्हणाले, "आज रात्रीं मी गुजरा-थेंत जाण्यास निघणार आहे." "कशाकरितां ?" असें पत्रकारानें विचारल्यावर पटेलांनीं उत्तर दिलें, " सत्याग्रह आणि करबंदी यांची शिक-वण प्रसृत करण्याकरितां." त्यावर पत्रकार म्हणतो, " हें ठीक झालें. पण माझा प्रश्न असा आहे कीं सरकारनें जर गोळीबार करून सक्तीनें करवसुली केली तर मग आपण काय कराल ? कारण सरकारला एक तर अशा रीतीनें कर वसूल करावा लागेल. नाहींतर राज्य सोडून जावें लागेल." क्षणभर थांबून पटेल म्हणाले, " गोळीबार करण्याची काय जरुरी आहे ? बिचारे लोक त्यांनीं जर कर दिला नाहीं किंवा ते जर कर देऊं शकले नाहींत तरी आम्हांला पकडूं नका असं थोडंच म्हणणार आहेत ते ? तुम्ही त्यांना नुसतं सांगा कीं तुम्ही कैदी झालांत तर ते आपण होऊन कैदखान्याकडे चालू लागतील. " पत्रकार यावर म्हणाला, " मला नाहीं वाटत असं होईल. " तेव्हां पटेल म्हणाले, " मग तुम्हांला वाटतं तसं जर होणार असेल तर फरक एवढाच होईल कीं लोक शांततेनें तुरुंगांत न जातां सरकारचा छळ

सोशीत कैदखाने भरून काढतील. पण, छळ सोसावा लागला म्हणून ते कांहीं चळवळ थांबविणार नाहींत." "मग काय सर्व अंदाधुंदीच होणार?" पत्रकारानें प्रश्न केला. "अर्थात्" पटेलांनीं उत्तर केलें. "सर्वत्र अंदाधुंदीच होणार!" पत्रकारानें निःश्वास टाकून म्हटलें, "देव करो आणि असं न होवो." तेव्हां पटेल म्हणाले, "हें पाहा, गोष्ट अशी आहे कीं आज हिंदुस्थानांतील लोकांना वसाहतीचं मर्यादित स्वराज्य जरी मिळालं तरी त्यांत पुष्कळसा संतोष राहील. पण सरकारनें इतकंहि स्वराज्य आम्हांला दिलं नाहीं. उलट सरकारनें दडपशाही चालविली आहे. आहे असाच जर प्रकार चालू राहिला तर लक्षांत ठेवा, कीं देशांत जो नुसतं वसाहतींचं स्वराज्य पाहिजे असं म्हणेल तोहि देशद्रोही ठरेल. आणि संपूर्ण स्वराज्याच्या चळवळीला जोर येईल" तेव्हां पत्रकार म्हणाला, "तें असो, पण सत्याग्रह व करबंदी करून देशांत अंदाधुंदी होण्यापेक्षां सनदशीर आणि शांतिमय चळवळीची शिकवणूक तुम्हीं देशाला दिलीत तर बरं होईल." "पटेल म्हणाले, "आम्ही म्हणतों ही चळवळ शांतिमयच आहे पण तुम्ही म्हणतां त्या अर्थानें सनदशीर नाहीं आणि ती तशी असूं नये. तुम्हांला पटणार नाहीं कदाचित्; पण मला तर असं वाटतं कीं सत्याग्रहाच्या चळवळीनें आम्ही लॉर्ड आयर्विनला एक प्रकारें मदतच करीत आहों. कारण कितीहि दडपशाही वरच्या हुकमानें व्हाइसरॉयांनीं केली तरी प्रजा हटत नाहीं असें पाहिल्यावर व्हाइसरॉयसाहेब विलायत सरकारला सांगूं शकतील, कीं "आमचा निरुपाय झाला आहे. हिंदुस्थानांत अंदाधुंदी वाढत्या प्रमाणावर आहे. तेव्हां लोकांचं समाधान करण्याकरितां त्यांचे पुढारी गांधी यांना पाचारण करणं आतां जरूर आहे."

या संभाषणावरून पटेलांची भविष्य काळावरील नजर किती सूक्ष्म होती हें कळून येतें. कारण त्यांच्या अंदाजाप्रमाणेंच पुढें बहुतेक गोष्टी घडल्या पुढें जो गांधी–आयर्विन करार झाला त्याचें भविष्य पटेलांनीं आधींच वर्तवून ठेवलें असें म्हणण्यास हरकत नाहीं. आतां गांधी आयर्विन करार ज्या परिस्थितीनें व ज्या रीतीनें आला ती मात्र पटेलांना पसंत नव्हती व त्यांनीं तें स्पष्ट जाहीरहि केलें हेंहि तितकेंच खरें आहे.

पटेल असेंब्लीचा राजीनामा देऊन बाहेर पडले तेव्हां देशांत चाललेल्या

मिठाच्या कायदेभंगाची प्रचंड चळवळ त्यांनीं प्रत्यक्ष अवलोकन केली, व त्या चळवळींत स्वतः भाग घेण्याचा त्यांनीं विचार केला. तारीख ३ मे १९३० या दिवशीं त्यांचें कलकत्त्यास आगमन झालें त्या वेळीं त्यांच्या स्वागतार्थ स्टेशनवर अफाट जनसंमर्द लोटला. पण या निरपराधी जनसमूहावर पोलिसांनीं लाठीहल्ला केला. पटेलांच्या मोटारीमागें जे लोक चालले होते त्यांतील कित्येकांना लाठीचे तडाखे बसले, त्यांना जखमा झाल्या. या जखमी लोकांत पंडित गोविंद मालवीय हे एक होते. या लाठीहल्लयामुळें चळवळींत भाग घेणाऱ्या पटेलांच्या विचाराला आतां दृढनिश्चयाचें स्वरूप आलें. त्यांना कॉंग्रेसच्या वर्किंग कमिटीचे सभासद निवडण्यांत आलें. व पेशावरांत झालेल्या अत्याचारांची चौकशी करण्याकरितां त्यांच्याच अध्यक्षतेखालीं एक कमिटी नेमण्यांत आली. पेशावरांतल्या अत्याचाराची थोडक्यांत सरकारी रिपोर्टप्रमाणें हकीगत अशी होती, कीं पेशावराच्या सरहद्द प्रांतिक कॉंग्रेस कमिटीच्या सभासदांना अटक करण्यांत आल्यावर तारीख २३ एप्रिल रोजीं तेथें दंगा झाला. एक ब्रिटिश घोडेस्वार ठार मारला गेला. गढवाल पलटणींतल्या दोन तुकड्यांनीं बेदिली व्यक्त केली व आपल्या अधिकाऱ्यांचे हुकूम मानले नाहीं. या सरकारी रिपोर्टांत आणखी असेंहि म्हटलें होतें कीं परिस्थिति इतकी भीषण झाली होती कीं नेहमींप्रमाणें राज्यकारभार चालविणें अशक्यप्राय होतें. आतां वास्तविक स्पष्ट प्रकार असा होता, कीं दडपशाहीच्या कार्यक्रमांत एकदा कांहीं गढवाल शिपायांना एका सभेवर गोळीबार करण्याचा हुकूम झाला. त्या शिपायांनीं त्या सभेकडे नेण्यासाठीं आणलेल्या लॉरींत चढविण्याचेंच नाकारलें. अर्थात् या शिपायांना लष्करी कोर्टाकडून १० ते १४ वर्षांच्या शिक्षा झाल्या. पुढें मार्च १९३१ मध्यें जी तडजोड झाली. त्यामध्यें यातल्या कांहींना मुक्त करण्यांत आलें. पेशावर येथें यासंबंधीं यापूर्वी जो प्रकार झाला तो सांगणें अवश्य आहे. त्यामुळें कॉंग्रेसला तिकडे विशेष लक्ष घालावें लागलें. तो प्रकार असा—तारीख २३ एप्रिल १९३० रोजीं पेशावर येथें दारू पिकेटिंग सुरू होईल असें कॉंग्रेसनें जाहीर केलें. वायव्य सरहद्द प्रांतांतील रेग्युलेशन्सविषयीं चौकशी करण्याकरितां ऑल

इंडिया कॉंग्रेस कमिटीचें शिष्टमंडळ २२ एप्रिल रोजीं पेशावरकडे जाण्यास निघालें. त्यांस अटक येथें अडविण्यांत आलें, आणि पुढें जाण्याची मनाई करण्यांत आली. ही बातमी कळल्याबरोबर पेशावर येथें एक मोठी मिरवणूक निघाली आणि शाहीबागमध्यें एक सभा झाली. दुसऱ्या दिवशीं अगदीं सकाळीं नऊ पुढाऱ्यांना अटक झाली. दुसरे दोन पुढारी सकाळीं नऊ वाजतां पकडण्यांत आले. परंतु ज्या लॉरींतून त्यांना नेण्यांत येत होतें. ती लॉरीच मोडली. पोलीस स्टेशनवर हजर राहाण्याचें त्या पुढाऱ्यांनींच कबूल केलें आणि तशी त्यांना परवानगी देण्यांत आली. त्याप्रमाणें पुढाऱ्यांसह लोकांची एक मिरवणूक निघाली. आणि काबुली गेट पोलीस स्टेशनजवळ ती मिरवणूक आली. परंतु तें बंद होतें. एक घोडेस्वार तिकडून येत होता. त्या वेळीं लोक मोठ्यानें ओरडले. आणि त्यांनीं राष्ट्रीय पदें म्हटलीं. तो घोडेस्वार तेथून निघून गेला. एकदम त्या ठिकाणीं दोनतीन चिलखती मोटारी येऊन त्या लोकांमध्यें घुसल्या. तिकडून एक इंग्रज गृहस्थ मोटार सायकलीवरून येत होता. त्याची वरील गाड्यांशीं टक्कर होऊन तो चिरडला गेला. चिलखती गाडींतील कोणींतरी गोळ्या झाडल्या आणि एकाएकीं चिलखती गाडीस आगहि लागली. पुढें डेप्युटी कमिशनर आपल्या चिलखती मोटारमधून बाहेर आले. पण पोलीस स्टेशनकडे जात असतां जिन्यावर पडून ते बेशुद्ध झाले. त्यांना शुद्धीवर येण्यास वेळ लागला नाहीं. चिलखती गाड्यांनीं गोळीबारास सुरवात केली. मेलेल्या लोकांना उचलून नेण्याचे लोकांनीं प्रयत्न केले. लष्करी तुकड्या आणि चिलखती मोटारगाड्या तेथून हालविण्यांत आल्या. दुसरा गोळीबार सुरू झाला. तो एकंदर तीन तास झाला. सरकारी पत्रकाप्रमाणें पाहिलें असतां तीन इसम ठार झाले आणि तेहतीस जखमी झाले असें दिसतें. परंतु लोकांच्या सांगण्याप्रमाणें खरी संख्या सात ते दहापट होती. संध्याकाळीं लष्करी शिपायांनीं कॉंग्रेस ऑफिसची झडती घेतली आणि कॉंग्रेसचें निशाण व फिती नेण्यांत आल्या. २५ तारखेस लष्कर व नेहमींचे पोलीससुद्धा एकदम दूर करण्यांत आले. २८ तारखेस पुन्हा पोलीस हजर झाले आणि त्यांनीं शहराचा ताबा घेतला. मधल्या काळांत कॉंग्रेसचे व खिलाफतचे स्वयंसेवक शहराचें रक्षण करीत

होते. ४ मे रोजीं लष्करी शिपायांनीं शहराचा ताबा घेतला.

या सर्व प्रकाराची चौकशी करण्याकरितां सरकारनें एक कमिटी नेमली. तींत अलाहाबाद हायकोर्टाचे न्यायाधीश मि. जस्टिस शा महंमद सुलेमान व कलकत्ता हायकोर्टाचे न्यायाधिश मि. जस्टिस पांक्रीज हे होते. सुलेमान यांनीं सांगितलें, कीं चिलखती मोटार जेव्हां लोकांच्या अंगावरून गेली तेव्हांच लोकांनीं घोडेस्वारावर हल्ला केला. पुढें पेशावरच्या प्रकरणाची चौकशी करण्याकरितां ऑल इंडिया कॉंग्रेस कमिटीनेंहि पटेलांच्या अध्यक्षतेखालीं कमिटी नेमली. परंतु सरकारनें या कमिटीला सरहद्द प्रांतांत प्रवेश करूं दिला नाहीं. व ती कमिटी बेकायदा ठरविली. पुढें पूर्ण चौकशी करून पटेलांनीं तिचा वृत्तांत कॉंग्रेसच्या वर्किंग कमिटीला सादर केला. २७ ऑगस्ट १९३० रोजीं कॉंग्रेस वर्किंग कमिटी पटेल कमिटीच्या रिपोर्टाचा विचार करण्याकरितां दिल्लीला भरली. परंतु कमिटीच्या या बैठकीला सरकारनें परवानगी दिली नाहीं. तरी हा हुकूम पटेल व इतर सभासदांनीं न मानल्यामुळें त्यांना अटक झाली. त्यांत पटेलांना सहा महिने सक्तमजुरीची शिक्षा झाली. कमिटीचा रिपोर्टहि जप्त करण्यांत आला. खटल्याचा निकाल जेव्हां पटेलांनीं ऐकला तेव्हां ते म्हणाले, “ इंग्लंडांतला ‘स्पीकर’ ( कॉमन्स सभेचा अध्यक्ष ) जेव्हा सेवानिवृत्त होतो तेव्हां त्याला पदवी आणि पेन्शन मिळते. मलाहि अध्यक्षपदाच्या राजीनाम्यानंतर सक्तमजुरीच्या शिक्षेच्या रूपानें पदवी आणि पेन्शन मिळाली आहे. ” शिक्षा सुनावल्यानंतर पटेलांना मुलतानच्या तुरुंगांत ठेवण्यांत आलें. ते तेथें आजारी पडले. म्हणून सरकारला आवश्यक वाटल्यावरून त्यांनीं त्यांची रवानगी मुलतानच्या तुरुंगांतून कोईमतूरच्या तुरुंगांत केली. तेथें त्यांच्या आजाराची पाहाणी करण्यांत आली व त्यांच्यावर शस्त्रक्रिया करण्याचें ठरलें. ता. १९ डिसेंबर रोजीं शस्त्रक्रियेच्या वेळीं त्यांना टेबलावर निजविलें असतांना ते अकस्मात् टेबलावरून खालीं पडले. परंतु थोडा धक्का बसण्याशिवाय अधिक शारीरिक इजा अशी कांहीं झाली नाहीं. पुढें मद्रास सरकारनें जेल सुपरिंटेंडेंटकडून पटेलांबद्दलचा रिपोर्ट मागितला. तारीख ५ जानेवारीला मद्रास कायदेमंडळांतील एका सभासदानें पटेलांची तावडतोब मुक्तता व्हावी अशा आशयाची नोटीस

सरकारला दिली. दोन दिवसांनीं पण मुदत संपण्यापूर्वी आजारीपणामुळें पटेलांची मुक्तता करण्यांत आली.

परंतु पटेलांची प्रकृति इतकी खालावली होती कीं १९३१ च्या मार्च महिन्यांत सविनय कायदेभंगाची चळवळ बंद करणारा जो गांधी–आयर्विन करार झाला त्यासंबंधांत पटेलांना बोलणीं चालणीं करतां आलीं नाहींत. पटेलांचा सल्ला जर या वेळीं मिळाला असता तर हा करार कांहीं वेगळाच झाला असता असें मानायला कांहींच हरकत नाहीं. पटेलांना कॅन्सरचा विकार झाला असल्याचें वाटल्यावरून आपल्याला झालेल्या रोगाची योग्य चिकित्सा व उपाययोजना करून घेण्याकरितां पटेलांनीं तारीख २४ फेब्रुवारी रोजीं हिंदुस्थान सोडलें व व्हिएन्ना येथें प्रयाण केलें. व्हिएन्ना येथें त्यांच्यावर एक कठीण शस्त्रक्रिया करण्यांत आली. तीमुळें त्यांना कांहींसें बरें वाटूं लागलें.

## पुन्हा खळबळीची परिस्थिति

पटेल व्हिएन्नास असतांना इकडे गांधी–आयर्विन करार मार्चमध्यें झाला. हा करार झाल्यानंतर महात्मा गांधी दुसऱ्या गोलमेज परिषदेकरितां कॉंग्रेसचे एकमेव प्रतिनिधि म्हणून इंग्लंडला गेले. पटेलांना बरें वाटल्यानंतर तेहि व्हिएन्नाहून इंग्लंडला गेले व तेथें त्यांनीं महात्मा गांधींना गोलमेज परिषदेच्या कार्यांत बरीच मदत केली. नंतर १९३१ च्या डिसेंबर महिन्यांत पटेल हे गांधींबरोबर हिंदुस्थानांत परत आले. इकडे आल्यावर परिस्थिति चमत्कारिक झाली आहे असें त्यांना दिसून आलें. कारण तिकडे गोलमेज परिषद चालू असतांना सरकारनें हिंदुस्थानांत दडपशाही पुन्हा सुरू केली. संयुक्त प्रांतांत शेतकऱ्यांची स्थिति हलाखीची झाली होती. सरकारनें त्यांना सारासूट न दिल्यानें त्यांनीं करबंदीची चळवळ सुरू केली व त्याच वेळीं शेंकडों देशभक्त तुरुंगांत रवाना करण्याचा सपाटा सरकारनें चालविला. पंडित जवाहरलाल नेहरू हे त्यापैकीं एक होते. गुजराथेंतहि व बंगाल्यांतहि सरकारनें प्रजेच्या मागण्या मानल्या नाहींत. व त्या ठिकाणीं दडपशाही सुरू झाली. सरहद्द प्रांतांतहि तोच प्रकार झाला. तेथील पुढारी गफारखान व त्यांचे बंधु खानसाहेब यांना राजकीय कैदी म्हणून ठेवण्यांत आलें.

अशा वातावरणांत गांधी हे पटेलांसह तारीख २८ डिसेंबर १९३१ रोजीं

मुंबईस उतरले. गांधी येण्यापूर्वींच बंगाल, संयुक्त प्रांत व सरहद्द प्रांत येथें वटहुकूम (ऑर्डिनन्सेस) जारी करण्यांत आले होते. आतां गांधी इकडे येतांच तारीख ४ जानेवारी १९३२ रोजीं काँग्रेसची प्रत्येक संस्था व तिच्याशीं संबंध असलेल्या सर्व संस्था सरकारनें बेकायदा ठरविल्या. त्याच दिवशीं पहाटे पटेलांचे धाकटे बंधु वल्लभभाई पटेल यांना पकडण्यांत आलें व इतर राजकीय कैदी गुप्तपणें लांबविण्यांत आले. आपले चारित्र नायक विठ्ठलभाई पटेल यांनाहि ऑर्डिनन्सअन्वयें अटक झाली. त्यांना भायखळ्याच्या तुरुंगांत ठेवण्यांत आलें.

भायखळ्याच्या तुरुंगांत पटेलांबरोबर त्यांचे परममित्र श्री. महेश्वरी हेंहि होते. तुरुंगांत आल्यावर पुन्हा पटेलांची प्रकृति बिघडली. दररोज रात्रीं अर्धा तासपर्यंत महेश्वरी हे पटेलांचें अंगमर्दन करीत. मुख्य मेडिकल अधिकारी कर्नल थॉम्पसन हे होते. व त्यांच्या हाताखालीं नेहमींचा जेल डॉक्टर असे. हा जेल डॉक्टर तुरुंगांत नेहमीं राहात असे व कर्नलसाहेब यांचा नेहमींचा रिवाज म्हणजे ते फक्त आठवड्यांतून एकदा तुरुंगांतील आजाऱ्यांची पाहाणी करण्यास येत. परंतु पटेल हे आजारी पडले आहेत असें कळल्यापासून कर्नल थॉम्पसन हे दररोज येऊन त्यांची परीक्षा करीत. कधीं कधीं ते दिवसांतून दोनदाहि येत. पटेल हे एके काळीं असेंब्लीचे अध्यक्ष असल्यानें सरकारला त्यांची सर्व बडदास्त निदान लोकलज्जेस्तव तरी ठेवणें भाग होते. यापूर्वींहि जेव्हां व्हिएन्नास जाण्यापूर्वी पटेलांना अटक झाली होती तेव्हांहि पटेलांसारखा पूर्वीचा अधिकारी मनुष्य तुरुंगांत राहूं नये याची सरकारला लाज वाटली म्हणून सरकारनें त्यांना व्हिएन्नास प्रकृतिस्वास्थासाठीं जाण्याचा सल्ला दिला होता. याहि वेळीं सरकारला तेंच करायचें होतें. असो. भायखळ्याच्या तुरुंगांत असतांना पटेलांना वर्तमानपत्रें वाचायला मिळत. पटेलांच्या प्रकृतिस्वास्थासाठीं सरकारनें शक्य तितकी दक्षता ठेवली होती हें नाकबूल करून चालणार नाहीं. कारण कर्नल थॉम्पसन दररोज तर त्यांना पाहायला येतच पण शिवाय त्यांनीं जेल डॉक्टरला बजावलें होतें कीं " जेव्हां जेव्हां माझी गरज लागेल, मग तीं रात्रींची अपरात्रींची वेळ असली तरी चालेल, मला तुम्ही ताबडतोब टेलिफोन करीत जा, म्हणजे मी

येत जाईन." या व्यवस्थेमुळें पटेलांच्या जरी चित्ताला नाहीं तरी शरीराला बरेंच स्वास्थ्य मिळण्यास मदत झाली. तरी पण ते पूर्ण बरे असे झाले नाहींत. तरीहि अशा स्थितींत ते रात्रीं दहा वाजेपर्यंत रशियन भाषेचा अभ्यास करीत. पुढें एक दिवस रशियन भाषेचा व एक दिवस जर्मन भाषेचा अभ्यास करायचा असा त्यांचा वर्तनक्रम असे. आतां फ्रेंच भाषेचा अभ्यास न करतां या दोनच भाषांचा अभ्यास त्यांनीं जो केला तो हेतुपूर्ण होता. कारण परदेशांत जाऊन हिंदुस्थानविषयक चळवळ करायची अशी त्यांची फार इच्छा होती; व ब्रिटिशांचे शत्रू जे रशिया व जर्मनी त्यांच्याच देशांत जाऊन ही चळवळ विशेष झाली पाहिजे असें त्यांना वाटे. म्हणून त्या देशांत उपयोगी पडणाऱ्या रशियन व जर्मन भाषांचा त्यांनीं अभ्यास चालविला होता. यावरून त्यांची स्वातंत्र्यलालसा तीव्र होती हें तर दिसून येतेंच, पण मुत्सद्द्यास लागणारी दूरदृष्टिहि त्यांच्या ठिकाणीं कशी होती तेंहि आपल्या प्रत्ययास चांगलें येतें.

तुरुंगांत पटेल व महेश्वरी अशा दोघांना एका खोलींत ठेवलें होतें. वास्तविक तुरुंगाचा नियम असा आहे कीं दोघांना एकत्र ठेवूं नये. एकटा मनुष्य तरी असावा किंवा निदान तिघे तरी असावेत असा तुरुंगाचा नियम आहे. तरीपण पटेल व महेश्वरी यांना खास परवानगीनें एका खोलींत ठेवलें होतें. एकदा असें झालें, कीं तुरुंगांतील नेहमींचा डॉक्टर पटेलांना भेटण्यासाठीं आला. तेव्हां पटेल त्यांना म्हणाले, " या डॉक्टरसाहेब, तुम्ही तिसरे या." पटेलांच्या बोलण्याचा अर्थ चटकन् डॉक्टरच्या लक्षांत आला नाहीं. पण थोडया वेळानें पटेलांनीं केलेली कोटी त्याला समजली.

एकदा जेल सुपरिंटेंडेंट मि. लेक्स्टन विठ्ठलभाईंना भेटण्याकरितां आला. तेव्हां त्यानें " कसें काय चाललें आहे, मि. पटेल ? " असें त्यांना विचारलें. तेव्हां पटेलांनीं उत्तर दिलें " अद्याप तरी जिवंत आहे ! " या उत्तरांतलें मर्म अर्थातच लेक्स्टन यानें ओळखलें. लगेच पटेल गंभीर चेहरा करून म्हणाले, " हें तुरुंगांतलं जीवन आतां अगदीं नकोसं झालं आहे. मी माफी मागून मोकळा होण्याच्या विचारांत आहें ! " लेक्स्टनला

पटेलाचें हें बोलणें खरेंच वाटलें ! तोहि गंभीर चेहरा करून म्हणाला, " हें तर ठीकच आहे. पण माफी मागून तुम्ही मोकळे झालांत तर मग तुम्हांला राजकारणांत भाग घेतां येणार नाहीं. " लेक्स्टनला तेंच पाहिजे होतें. तेव्हां पटेल एका बाजूला आपल्या मित्राला म्हणतात " काय मूर्ख मनुष्य आहे हा ? मी बोललेलं याला खरंच वाटतं आहे ! " आणि मग लेक्स्टनकडे पाहून हसत पटेल त्याला आपल्या शुभ्र दाढीवरून हात फिरवीत म्हणतात, "मि. लेक्स्टन, या माझ्या दाढीकडे तर पाहा ! " पटेलांनीं असें बोलतांच लेक्स्टन उठून चालूं लागला. कारण त्याला आपण जें बोललों तें कसें भोळसटपणाचें होतें हें पुरें कळून आलें. गेलीं पंचवीस वर्षें देशकार्य करून ज्या महाभागानें कोट्यवधि हिंदी बांधवांचा आदर संपादन केला तो या प्रसंगांतील हालअपेष्टा सहन होत नाहींत म्हणून माफी कशी मागेल ?–ही कल्पना त्याला आरंभीं शिवली नाहीं. पण पटेलांनीं उत्तर देतांच त्याच्या डोक्यांत आतां प्रकाश पडला आणि त्याला समजलें व उमजलें कीं पटेल हें माफी मागणारें खुळें पोर नसून ते अनुभव घेऊन वृद्ध झालेले एक देशाभिमानी पुढारी आहेत. हेंच लेक्स्टनला पटवून द्यायचें होतें म्हणून पटेलांनीं थोडक्यांत विनोदी पण अर्थपूर्ण उत्तर दिलें.

## जिवलग मित्राशीं पत्रव्यवहार

लवकरच पटेलांना भायखळ्याच्या तुरुंगांतून नाशिकच्या तुरुंगांत नेण्यांत आलें. पण या वेळीं ते एकटेच होते. वास्तविक पटेलांना कमालीचा अशक्तपणा आला होता व त्यांची प्रकृतिहि चांगली सुधारली नव्हती. यामुळें त्यांना महेश्वरीसारख्या सोबतीची फार आवश्यकता होती. तरीपण सरकारनें पर्वा केली नाहीं व त्यांना सोबतीची परवानगी न देतां त्यांना नाशिकला एकटेंच ठेवलें. नाशिकहून त्यांची येरवड्याला रवानगी झाली. आपले मित्र महेश्वरी यांना सोडून जातांना पटेलांना पराकाष्ठेचें दुःख झालें व त्यांचे डोळे अश्रूंनीं भरून आले. लवकरच भायखळ्याहून महेश्वरी सुटले व पटेलांना भेटण्यासाठीं येरवड्यास गेले. परंतु फक्त त्यांनाच पटेलांची भेट घेण्याची परवानगी मिळाली नाहीं. इतरांना मिळाली. याचें कारण असें होतें कीं पटेल व महेश्वरी हे फार निकटाचे स्नेही होते. व असे स्नेही विरहदुःखानें

पीडित होतील तितका त्यांत सरकारला आनंद होत होता ! कोणीं सांगावें पटेल व महेश्वरी यांचा एक विचार होऊन तो महेश्वरींच्या मुखावाटे जनतेस विदित होईल अशी सरकारला भीति वाटत असावी. एकंदरींत अधिकाऱ्यांनीं पटेलांना तुरुंगांतहि परम मित्रांची भेट घेऊं न देण्याची निष्करुण वृत्ति दाखविली व ही वृत्तिच पटेलांना भायखळ्याच्या तुरुंगांतून हालविण्यास कारणीभूत झाली होती. परंतु एवढ्यानेंच अधिकारी थांबले नाहींत. त्यांना पटेलांवर आणखी सूड घ्यायचा होता. पटेलांची प्रकृति अधिक बिघडल्यामुळें येरवड्याहूनहि पटेलांना हलविण्यांत येऊन त्यांना मुंबईच्या जी. टी हॉस्पिटलमध्यें रोगी कैदी म्हणून ठेवण्यांत आलें. या ठिकाणींहि महेश्वरींना पटेलांना भेटण्याची परवानगी देण्याचें सौजन्य सरकारनें दाखविलें नाहीं. पुढें पटेलांना हॉस्पिटलमधून युरोपास जाणाऱ्या जहाजावर नेण्यांत आलें व तेथें त्यांना "तुम्ही आतां कैदेंतून मुक्त झालां आहांत" असें सांगण्यांत आलें. याहि वेळीं आपल्या मित्राला भेटण्याची तीव्र इच्छा असूनसुद्धा भेट होऊं शकली नाहीं. बोटीवर असतांना पटेलांनीं महेश्वरींना पोर्टसय्यदहून तारीख १३-३-१९३२ रोजीं एक पत्र लिहिलें त्यावरून पटेलांची त्या वेळची मनःस्थिति उत्तम रीतीनें व्यक्त होते. या पत्रांत पटेल लिहितातः

भाई माहेश्वरी,

तुमच्यापासून ताटातूट होऊन निघालों पण मागाहून प्रकृति फारच बिघडली. सध्याच्या ब्रिटिश डॉक्टरनें सरकारला असा सल्ला दिला कीं ज्या डॉक्टरकडून व्हिएन्नाला माझें एकदा पूर्वी ऑपरेशन झालें होतें त्याच डॉक्टरकडे मला तपासणीकरितां पाठविणें जरूर आहे. परंतु या वेळीं मला हिंदुस्थान सोडणें आवडलें नाहीं. पण दुसरा कोणताच उपाय नव्हता. नाइलाजास्तव मीं हिंदुस्थान सोडलें आहे. मला वाटलें तुम्ही मला मुंबई बंदरावर भेटायला याल. पण तुम्ही कां आलां नाहींत कोण जाणे. तुम्ही मला दर आठवड्याला तिकडील हकीगतीचें पत्र लिहीत जा.

तुमचा

व्ही. जे. पटेल

पुढें १९३२ मध्यें एप्रिलच्या आरंभाला पटेल व्हिएन्नाला पोचले. तेथून त्यांनीं जीं पत्रें महेश्वरींना लिहिलीं तीं तीनहि पत्रें महत्त्वाचीं व उद्‌बोधक असल्यानें त्यांचा आशय भाषांतरित करून खालीं दिला आहे. तिकडे पटेल काय करीत होते व त्यांची एकंदर स्थिति कशी होती हें त्या पत्रांवरून समजणें अधिक उचित आहे.

व्हिएन्ना

तारीख १२–४–१९३२

भाई महेश्वरी,

तुमचें पत्र मिळालें. माझी प्रकृति सुधारली नाहीं. अद्यापि सुधारणा होण्याला पुष्कळ दिवस लागतील. दरम्यान जेवढें काम करणें मला शक्य आहे तेवढें करण्यास मी येथें सुरवात केली आहे....तिकडील हकीगत कळवा.

विठ्ठलभाई

आणखी एक पत्र आहे :

व्हिएन्ना

तारीख १९–५–१९३२

भाई महेश्वरी,

तुमचें तारीख २९ एप्रिलचें पत्र मिळालें. माझ्या मित्रांच्या आग्रहा-वरून मी मतप्रचाराकरितां लंडनला जात आहें. त्यानंतर मी कोठें जाईन हें अद्यापि नक्की नाहीं. पण तुम्हांला लंडन व अमेरिकेच्या वर्त-मानपत्रांतून तें कळेलच.

हिंदुस्थानाला आग लागून राहिली आहे. यामुळें चित्त खालींवर होत आहे. आणि त्याला शांतता कशी ती बिलकूल मिळत नाहीं. सध्या तरी मी लंडनला जात आहें. पुढचें पुढें.

विठ्ठलभाई

खालील पत्र लंडनहून लिहिलें आहे.

नॅशनल लिबरल क्लब
व्हाइटहॉल पॅलेस, S. W. I,
लंडन ता. २८-६-१९३२

भाई महेश्वरी,

तुमचें पत्र मिळालें. मला बरें वाटत नाहीं. माझी प्रकृति अशी तशीच आहे. परंतु मुंबईत होती त्यापेक्षां आतां जरा अधिक बरी आहे.

सप्टेंबर महिन्यांत अमेरिकेंत जाण्याची माझी इच्छा आहे. तीन महिन्यांनीं मी हिंदुस्थान देशाला परत येईन.

तिकडील हकीगत कळवा.

विठ्ठलभाई

पण मनांत योजावें एक आणि व्हावें भलतेंच अशी पटेलांची स्थिति करण्याचा विधात्याचा विचार होता !

## अमेरिकेंतील अपूर्व स्वागत

इंग्लंडमध्यें थोडे महिने राहिल्यानंतर पटेल १९३२ च्या नोव्हेंबरमध्यें अमेरिकेंत गेले. हिंदुस्थानाविषयीं अमेरिकेंत सहानुभूति उत्पन्न व्हावी, हिंदुस्थानची संस्कृति व ब्रिटिश सत्तेनंतर चालू झालेला स्वातंत्र्याचा लढा यांच्याविषयीं अनुकूल वातावरण निर्माण व्हावें याकरितां ज्या हिंदी महाभागांनीं अमेरिकेंत जागृति केली त्यांत पटेलांची गणना प्रामुख्यानें केली पाहिजे. स्वामी विवेकानंद, रे. प्रताप मुजुमदार, लाला लजपतराय, सर जगदीशचंद्र बोस, श्री. सरोजिनी नायडू, डॉ. रवींद्रनाथ टागोर या थोर हिंदी लोकांनीं यापूर्वी अमेरिकेंत हिंदुस्थानसंबंधीं जागृति करण्याचें महत्कार्य केलें होतें. आतां पटेलांनीं त्यांच्या पावलावर पाऊल ठेवून तेंच कार्य पुढें चालविलें. जगाच्या इतिहासांत व संस्कृतींत हिंदुस्थानचा दर्जा किती मोठा आहे, हिंदुस्थानला स्वातंत्र्याचे हक्क मिळणें किती स्वाभाविक व आवश्यक आहे व ते मिळविण्याकरितां सध्या चाललेला लढा किती महत्त्वाचा आहे हें अमेरिकेसारख्या स्वातंत्र्यप्रिय राष्ट्राला पटवून द्यायचें होतें.

व तें कार्य हिंदमातेचे महान् व शूर सुपुत्र विठ्ठलभाई पटेल यांनीं उत्तम रीतीनें बजावलें. व तेंहि प्रकृति अत्यंत खालावली असतांनाहि. आणि आतांपर्यंत चार शस्त्रक्रिया त्यांच्यावर झाल्या असतांनाहि क्रियासिद्धिः सत्त्वे भवति महतां नोपकरणे हें सुवचन पटेलांच्या बाबतींतहि यथार्थ होतें.

विशेष गोष्ट अशी कीं अमेरिकेच्या जनतेकडून व सरकारकडून अशा उभय पक्षांकडून जेवढा सन्मान व जेवढें स्वागत पटेलांचें झालें तितकें या पूर्वी कोणाहि पुढाऱ्याचें झालेलें नव्हतें. व त्या दृष्टीनें पटेलांचें भाग्य अभूतपूर्व होतें. न्यूयॉर्कच्या म्युनिसिपालिटीचे मेंबर, तसेंच फिलाडेल्फिया बाल्टिमोर, बॉस्टन, डेट्रॉइट, वॉशिंग्टन या प्रचंड शहरांच्या व इतरहि मोठ्या शहरांच्या म्युनिसिपालिट्यांच्या मेंबरांनीं पटेलांचा सर्व नागरिकांतर्फे थाटानें जाहीर सत्कार केला. त्यांचे फोटो व त्यांनीं केलेलें कार्य यांना मोठमोठ्या वर्तमानपत्रांनीं प्रसिद्धि दिली.

कित्येक कॉलेजें, नाटकगृहें, ख्रिस्ती मंदिरें, क्लब व संस्था यांतून पटेलांनीं कित्येक व्याख्यानें दिलीं व त्यांत हिंदुस्थानचा स्वातंत्र्याचा लढा किती न्याय्य आहे व हिंदी जनता स्वराज्याला कशी पूर्ण लायक आहे यासंबंधीं तर्कशुद्ध व बिनतोड विचारसरणी त्यांनीं हजारों अमेरिकन स्त्रीपुरुषांपुढें निर्भयपणानें व जोरदार रीतीनें मांडली. त्यांच्या सर्व व्याख्यानाचा परिणाम तिकडील जनतेच्या मनांत खोल रुजेल असाच झाला, हें त्यांनीं पटेलांबद्दल जी आस्था व्यक्त केली त्यावरून दिसून आलें. पटेल अमेरिकेंत सहा महिन्यापेक्षां अधिक काळपर्यंत राहिले. तेवढ्या अवधींत त्यांनीं ८५ सभांतून भाषणें केलीं, आणि शेंकडों महत्त्वाच्या व वजनदार व्यक्तींशीं व संस्थांशीं आपले स्नेहसंबंध जोडले. पटेलांच्या पूर्वीचे असेंब्लीचे अध्यक्ष मि. फ्रेडरिक व्हाइट यांच्या अध्यक्षतेखालीं एके दिवशीं बाल्टिमोर येथें फॉरिन पॉलिसी असोसिएशनतर्फे मोठ्या व प्रातिनिधिक जनसमूहासमोर त्यांचें व्याख्यान झालें. हिंदुस्थानचे माजी भारतमंत्री मि. वेजवुड बेन यांच्याशीं पटेलांचा वादविवाद करण्याची व्यवस्था न्यूयॉर्कच्या फॉरिन पॉलिसी असोसिएशनतर्फे करण्यांत आली होती. या सर्व गोष्टी पटेलांनीं आपल्या एकट्याच्या जबाबदारीवर कोणीहि निकटचा स्नेही सहचारी

नसतांना केल्या व त्या करण्यांत आपल्याला चांगलें समाधान वाटलें असें ते म्हणाले. एकदा पटेलांना न्यूयार्क शहरांतील सर्वांत उंच अशा इमारतीच्या शिखरांवर नेण्यांत आलें व तेथून त्यांना शहराचा भव्य देखावा दाखविण्यांत आला. त्या वेळीं पटेल म्हणाले, कीं "हें सर्व फार चांगलें आहे. हा देखावा दिसायला सुंदर व मनोरम आहे. पण मी माझ्या मायभूमीस परत जाण्यास आतुर झालों आहे, व तेथल्या लहान लहान झोपडयांत राहून व हिंडून तेथें आमच्या पूर्ण स्वातंत्र्यप्राप्तीकरितां ऐक्याचें वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न करावा अशी मला उत्कंठा लागली आहे."

मध्यंतरीं मिस मेयो या एका अमेरिकन वृत्तपत्र-कर्त्रीनें 'मदर इंडिया' हें पुस्तक लिहून हिंदुस्थानची बदनामी करण्याचा निंद्य प्रयत्न केला होता. परंतु पटेलांनीं साऱ्या अमेरिकाभर व्याख्यानें देऊन बाईच्या पुस्तकावर झोड उठविली व तिचें लिखाण कसें खोडसाळपणाचें व दुष्ट आहे हें त्यांनीं अमेरिकन जनतेला उत्तम रीतीनें पटवून दिलें.

## पटेल आणि डी व्हॅलेरा

अमेरिकेंतील मोठा दौरा यशस्वी रीतीनें आटोपून पटेल इंग्लंडला परतले. पुढें आयरिश पुढारी व तेथील अध्यक्ष डी. व्हॅलेरा यांनीं निमंत्रण केल्यावरून पटेल आयर्लंडला गेले. त्यांचीं बोलणीं बराच वेळ चालत. त्या वेळीं डी. व्हॅलेरा यांनीं आयरिश फ्री स्टेटचा अध्यक्ष या नात्यानें इंग्लंडला वार्षिक खंडणी देण्याचें नाकारून आयर्लंड हा पूर्ण स्वतंत्र आहे अशी घोषणा केली होती. अर्थात् या वेळीं इंग्लंड व आयर्लंड यांत वाद उत्पन्न झाला. या वादांत पटेलांना लवाद नेमावें अशी डी. व्हॅलेरांनीं पटेलांपाशीं आपली इच्छा व्यक्त केली असें सांगण्यांत येतें व त्यांत तथ्यहि आहे. कारण पटेलांचा डी. व्हॅलेरांशीं या वेळीं नव्यानेंच संबंध आला होता असें नाहीं. यापूर्वी १९२७ सालीं असेंब्लीचे अध्यक्ष असतांना पटेल आयर्लंडमध्यें गेले होते, त्या वेळीं त्यांनीं कौन्सिलप्रवेशाचा सल्ला डी. व्हॅलेराला कसा दिला व तो डी. व्हॅलेरांनीं कसा अंमलांत आणला हें आपण पाहिलेंच आहे. अर्थात् पटेलांचें डी. व्हॅलेराजवळ चांगलें वजन होतें

हें अगदीं उघड आहे. शिवाय डी. व्हॅलेरा हा जसा आयर्लंडच्या पूर्ण स्वातंत्र्यासाठीं झटणारा एक वीर होता त्याचप्रमाणें पटेल हेहि हिंदुस्थानच्या पूर्ण स्वातंत्र्यासाठीं प्रयत्न करणारे एक खंदे वीर होते व त्यामुळें समपरिस्थितींतील या उभयतांचा दाट स्नेह जमणें अगदीं साहजिक होतें.

याप्रमाणें पटेलांनीं वरील सर्व कार्य केलें, पण आधींच बिघडलेली पटेलांची प्रकृति दिवसेंदिवस या कामाच्या व्यापामुळें अधिकच ढासळत चालली म्हणून योग्य उपचार करून घेण्याकरितां ते पुन्हा व्हिएन्नाला आले.

# देहावसान

" सुंदर मी होणार । आतां मरणानें जगणार ! "

—कवि गोविंद

पटेल उपचाराकरितां व्हिएन्नास परतले, त्या सुमारास हिंदुस्थानांत एक अनपेक्षित गोष्ट घडून आली होती. महात्मा गांधी हे तुरुंगांतच होते व त्या ठिकाणीं त्यांनीं तारीख ८ मे रोजीं २१ दिवसांच्या उपवासाला प्रारंभ केला. हरिजन चळवळींत वाढत्या संख्येनें सामिल होणाऱ्या कार्यकर्त्यांना मदत करण्याकरितां व त्यांच्या कार्यांत अधिक शुद्ध व अधिक सत्य स्वरूपाची सेवावृत्तीची भावना निर्माण करण्याकरितां व आत्मशुद्धीकरितां गांधीजींनीं हा उपवास आरंभिला होता. पण सरकारनें त्याच दिवशीं एक पत्रक काढून गांधींना मुक्त करण्यांत आल्याचें जाहीर केलें व त्याप्रमाणें त्या दिवशीं म्हणजे तारीख ८ मे रोजीं सायंकाळीं गांधीजी मुक्त झाले. मुक्त झाल्याबरोबर गांधीजींनीं पत्रक प्रसिद्ध करून कायदेभंगाची चळवळ सहा आठवडे तहकूब करण्याची शिफारस केली, व त्याप्रमाणें काँग्रेसनें ती चळवळ थांबविली.

गांधींनीं स्वीकारलेला हा मार्ग पटेलांना कळतांच त्यांनीं त्याबद्दल आपली तीव्र नापसंती जाहीर रीतीनें व्हिएन्नाहून एक पत्रक काढून व्यक्त केली. या पत्रकावर विठ्ठलभाई पटेलांच्याप्रमाणें सुभाषचंद्र बोस यांचीहि सही होती. कारण त्या वेळीं बोस हे व्हिएन्नास असून तेथील हॉस्पिटलमध्यें ते पटेलांच्या बिछान्याजवळ बसून त्यांची अहोरात्र शुश्रूषा करीत होते. "देशाला आतां नव्या पुढारीपणाची जरूरी आहे " असें त्यांनीं स्पष्टपणें आपल्या पत्रकांत म्हटलें. या पत्रकासंबंधीं उल्लेख मागें एकदा येऊन गेलाच आहे.

तरुणपणांत जहाल असलेला मनुष्य म्हातारपणीं मवाळ होतो असा साधारणपणें प्रकार आहे. परंतु पटेल त्याला अपवाद होते. त्यांचे विचार

दिवसेंदिवस जहाल बनत चालले होते व आतां अमेरिका व विलायतेंतून दौरा केल्यानंतर त्यांचीं जहाल मतें परिपक्व झालीं. गांधीजी हे पुढारी या नात्यानें अपयशी ठरले असून आतां नवीन तत्त्वें व नवीन साधनें यांच्या पायावर काँग्रेसची पुनर्घटना झाली पाहिजे व स्वातंत्र्याचा लढा एकांगी न ठेवतां सर्व बाजूंनीं केला पाहिजे असें पटेलांनीं स्पष्टपणें सांगितलें. याकरितां एक नवीन जोरदार पक्ष भरीव तत्त्वावर स्थापन करावा लागेल व हें काम काँग्रेसमधील जहालमतवादी लोकच करतील अशी त्यांना खात्री होती. यापुढें स्वातंत्र्याचा लढा कसा चालवावा लागेल यासंबंधीं पटेलांनीं कांहीं कार्यक्रम ठरविला होता हें त्यांच्या खालील एका खाजगी पत्रावरूनहि दिसून येतें. त्यांचें हें आयुष्यांतील बहुधा शेवटचेंच पत्र होय. हें व्हिएन्नाच्या हॉस्पिटलमधून तारीख ३०–६–१९३३ रोजीं त्यांनीं आपले मित्र महेश्वरी यांना पाठविलें. त्यांत ते म्हणतातः—

भाई महेश्वरी,

तुमचें पत्र मिळालें. माझी प्रकृति बिलकुल सुधारली नाहीं. आणि आता आपल्या देशांत जाऊन कांहीं तरी कार्य करावें असें वाटत आहे. माझी अशी प्रकृति कोठपर्यंत राहील हे डॉक्टरलाहि सांगतां येत नाहीं. सध्या तरी मी लवकर सुधारेन असें मला सांगतां येत नाहीं.

सध्या आपल्या देशापुढें अगदीं नवा आणि पाणीदार असा कार्यक्रम ठेवणें फार जरूरीचें झालें आहे, व असा कार्यक्रम माझ्याजवळ सध्या तयार आहे. मात्र सर्व कांहीं माझ्या प्रकृतीवर अवलंबून आहे. पत्र लिहा.

विठ्ठलभाई पटेल

## मृत्यूची घनदाट छाया

आपल्याजवळ अगदीं नवा व पाणीदार असा कार्यक्रम आहे अशा अर्थाचा उल्लेख या पत्रांत आहे खरा; पण तो कार्यक्रम कोणता तो मात्र जगाला समजला नाहीं. कारण तो जगाला कळण्याच्या आंतच पटेलांचें

देहावसान झालें होतें. "आपलें मरण पाहिलें म्यां डोळां" अशी पटेलांची स्थिति झाली होती. मृत्यूची घनदाट छाया त्यांच्या भोंवतीं वावरत होती. या वेळीं बंगालचे सुप्रसिद्ध पुढारी जे. एम्. सेनगुप्त यांच्या मृत्यूची वार्ता व्हिएन्नास येऊन थडकली, तेव्हां पटेलांना अत्यंत दुःख झालें. सेनगुप्तांच्या निधनाबद्दल शोक–प्रदर्शन करण्याकरितां व्हिएन्नास एक सभा भरविण्यांत आली. या सभेला पटेल अध्यक्ष होते. ते इतके अशक्त झाले होते, कीं त्यांना दुसऱ्यांचा आधार घेऊनच सभेला जातां आलें. देशबंधु दास, पंडित मोतीलाल नेहरू, सेनगुप्त यांसारखे अव्वल दर्जाचे देशभक्त कसे पटापट कालवश झाले यांचा त्यांनीं आपल्या भाषणांत उल्लेख केला व आतां लवकर आपल्यावरहि तीच पाळी येणार असेंहि त्यांनीं सांगितलें. परंतु मृत्यु आपल्या नजीक येऊन ठेपला आहे अशी स्पष्ट कल्पना झाली असून देखील पटेलांनीं आपली आनंदी वृत्ति सोडली नाहीं आणि देशाच्या भविष्यकाळासंबंधीं आपला आशावाद कायम ठेवला.

अमेरिकेंतील दौऱ्यामुळें पटेलांच्या हृदयावर ताण पडून त्यांत विकृति उत्पन्न झाली होती. त्या पूर्वीच्या आजारात आतां या काळजाच्या विकाराची नवीन भर पडली. तारीख १० सप्टेंबर रोजीं ते व्हिएन्नाहून जिनेव्हाला गेले. हा प्रवास त्यांना बराच जाणवला व त्यांची प्रकृति आणखी बिघडली. जिनेव्हांतील अत्युत्तम डॉक्टरांचा सल्ला त्यांनीं घेतला व त्याप्रमाणें ते उपचार करून घेण्याकरितां जिनेव्हापासून थोड्या अंतरावर असलेल्या एका प्रसिद्ध हॉस्पिटलमध्यें राहिले. याच वेळीं त्यांच्या हृदयांतील विकारानें जोर केला. तारीख २३ सप्टेंबरपासून पुढें आठ दिवसपर्यंत पटेलांची प्रकृति अत्यंत बिघडली. तरीहि त्यांना शक्य तितका आराम वाटावा यासाठीं डॉक्टरांनीं व परिचारिकांनीं रात्रंदिवस जिवापाड परिश्रम केले. पण कांहीं उपयोग झाला नाहीं. तारीख १३ ऑक्टोबर रोजीं पटेलांची प्रकृति फारच चिंताजनक झाली म्हणून व्हिएन्नाचे निष्णात डॉक्टर झलसिंजर यांना बोलावण्यांत आलें. हे डॉक्टर पटेलांचे एक मित्र होते. ते विमानमार्गानें व्हिएन्नाहून जिनेव्हास आले. त्यांनीं पटेलांची प्रकृति तपासली, व नवीन उपचार केले. त्यामुळें पटेलांना थोडें बरें वाटूं

लागलें. तरीपण तारीख २२ आक्टोबर रोजीं कालानें अखेरचा दगा दिलाच ! त्यानें त्या दिवशीं पटेलांना या मृत्युलोकांतून सुभाषचंद्रांच्या बाहुपाशांतून ओढून नेलें. आणि त्यांबरोबर त्यांच्या कोट्यावधि देशबांधवांना व मित्रांना आणि शत्रूंनाहि दुःखसागरांत लोटून दिलें !

पटेल आजारी असतांना हिंदुस्थानचे व्हाइसरॉय लॉर्ड आयर्विन यांनीं त्यांना सहानुभूतिपर संदेश पाठविला होता. मृत्यूपूर्वी थोडे दिवस गव्हर्नर-जनरलच्या कौन्सिलचे सभासद सर बी. एल्. मितर व लेडी मितर त्यांना भेटण्यासाठीं जिनेव्हास गेले होते. आपला अंतकाल जवळ आला हें पटेलांना पक्कें समजलें होतें म्हणूनच कीं काय त्यांनीं या मितर पतिपत्नींना सांगितलें, कीं "सध्याचे व्हाइसरॉय लॉर्ड विलिंग्डन व लेडी विलिंग्डन यांना माझी आठवण ठेवण्यास सांगा." नंतर लेडी मितरकडे वळून पटेल म्हणाले, "सर्वांना माझी आठवण ठेवण्यास सांगा." त्यावर लेडी मितर यांनीं विचारलें, "आपला निरोप कोणा विशिष्ट व्यक्तीला सांगायचा आहे काय?" पटेल म्हणाले, "तसें कांहीं नाहीं. सर्वांनाच माझी आठवण ठेवण्यास सांगा म्हणजे झालें." सर मितरना त्यांनीं सांगितलें कीं "असेंब्लींतील साऱ्या पक्षांच्या लोकांना माझा शुभेच्छेचा निरोप सांगा."

आपण आपल्या देशापासून फार दूर आहोंत या एका विचारानें पटेलांचें मन मृत्यूपूर्वी अत्यंत व्यग्र होऊन गेलें होतें. ज्या मातृभूमीची आपण आतांपर्यंत श्रद्धापूर्वक सेवा केली ती आपल्यापासून फार अंतरावर आहे या गोष्टीचें त्यांना दुःख होई. अंत होण्यापूर्वी त्यांनीं आपल्या मित्रांना जवळ बोलावून सांगितलें कीं "माझ्या सर्व देशबांधवांना व हिंदुस्थानांतील आणि साऱ्या जगांतील माझ्या मित्रांना सांगा, मी त्यांचें शुभ चिंतन करीत आहें. हिंदुस्थानाला स्वातंत्र्याची प्राप्ति लवकर व्हावी अशी मरणापूर्वी मी परमेश्वराची प्रार्थना करतों."

## मातृभूमींत अंत्यसंस्कार

आपल्या मृतदेहाची व्यवस्था हिंदुस्थानांत करण्यांत यावी अशी पटेलांनीं इच्छा व्यक्त केली होती, व त्या इच्छेला मान देऊन त्यांचा पार्थिव



न्यूयॉर्कचे शिल्पकार मि. अर्नेस्ट ड्यूरिग,
श्री. पटेल यांचा पुतळा तयार करीत आहेत.



फिलाडेल्फिया येथील नगराध्यक्ष मि. मूर,
श्री. पटेल व मायादेवी गांगुली यांचें स्वागत करीत आहेत.



विठ्ठलभाईच्या मृत्युशय्येजवळ सुभाषचंद्र बोस



विठ्ठलभाईच्या प्रचंड स्मशानयात्रेचा एक भाग

देह सुभाषचंद्र बोस व त्यांचे मित्र यांनीं बोटीवर व्यवस्थित रीतीनें घालून हिंदुस्थानात पाठवून दिला. ही बोट एडनला आली असतांना तेथील रहिवाशांनीं या मृतवीराच्या कलेवरांचा यथोचित सन्मान केला आणि त्यांचा देह ज्या पेटींत ठेवला होता, त्या पेटीवर हजारों पुष्पमालांचा खच पडला.

पटेलांचे शव हिंदुस्थानांत आणण्यांत येत आहे हें कळतांच मुंबई येथें जबाबदार पुढाऱ्याची एक कमिटी ठरविण्यांत आली व पटेलांच्या कीर्तीस साजेसा त्यांचा दहनविधि करण्याचें काम या कमिटीनें आपल्या अंगावर घेतलें. ज्या ठिकाणीं लोकमान्य टिळकांच्या शवाला अग्निसंस्कार झाला त्या चौपटी मैदानावर पटेलांच्या शवाला अग्निसंस्कार करण्यांत यावा असा या कमिटीचा विचार होता. पण मुंबई सरकारनें त्यांच्या विचाराला मान्यता दिली नाहीं व त्यासाठीं सबब अशी सांगितली, कीं " यामुळें चौपाटीवरच दहन करण्याचा पायंडा पडेल. यापुढें मृत हिंदु पुढाऱ्यांचे व दानशूरांचे शवांचे दहनविधि या ठिकाणीं व्हावेत अशा विनंत्या करण्यांत येतील. परंतु असें होणें आम्हांस इष्ट वाटत नसल्यानें पटेलांच्या शवाचा दहनविधि या ठिकाणीं करण्यास परवानगी देतां येत नाहीं. " टिळकांच्या प्रेताचा दहनविधि चौपाटीवर करण्याची परवानगी आपण दिली याबद्दल जणू काय सरकारला या वेळी पश्चाताप झाला होता व म्हणूनच डायरेक्टर ऑफ इन्फर्मेशनकडून या बाबतींत अशा आशयाचें पत्रक निघालें, कीं " झालें तें झालें. टिळकांच्या वेळीं आम्हांला परवानगी देतांना विचार करायला अवसर मिळाला नव्हता. परंतु आतां अनुभवांनीं आम्हीं असें ठरविलें आहे कीं यापुढें तरी चौपटीवर दहनविधीस अशी परवानगी द्यायची नाहीं. "

मुंबई सरकारकडून याप्रमाणें नकार आल्यानंतर असेंब्लीच्या कांहीं प्रमुख सभासदांनीं व्हाइसरॉयांना या बाबतींत परवानगी देण्याबद्दल विनंती केली. परंतु व्हाइसरॉयांनीं मुंबई सरकारच्या अधिकारांत ढवळाढवळ करण्याचें नाकारलें. अर्थात् चौपाटीवर दहनविधि करण्याचा विचार सोडून द्यावा लागला.

तारीख ९ नोव्हेंबर रोजीं सायंकाळीं सहा वाजतां पटेलांचा देह मुंबईच्या किनाऱ्यावर उतरून घेण्यांत आला. आधीं चार वाजल्यापासून हजारों लोक

बंदराजवळ जमले होते. परंतु बोटींतून उतरल्याबरोबर ज्या हॉलमध्यें त्यांचें शव ठेवण्यांत आलें त्या ठिकाणीं फक्त २० प्रमुख पुढारी व विविध संस्थांचे प्रतिनिधि व विठ्ठलभाईंचे नातेवाईक यांनाच येण्यास मोकळीक ठेविली होती. त्यानंतर त्यांच्या देहाची पेटी बाहेरच्या बाजूला आणण्यांत आली. तेव्हां इतकी गर्दी असूनहि चोहोंकडे कमालीची गंभीरता व स्तब्धता पसरली होती. पेटींतून देह दिसेल अशा रीतीनें तिच्यावरचें झाकण काढण्यांत आलें व मग त्यावर हजारों पुष्पहार घालण्यांत आले. नंतर ती पेटी मोटारीतून जी. टी. हॉस्पिटलमध्यें नेण्यांत आली व रात्रभर ती तेथेंच होती.

## मुंबईतील प्रचंड प्रेतयात्रा

दुसऱ्या दिवशीं सकाळीं सहा वाजतां जी. टी. हॉस्पिटलमधून एशिअन बिल्डिंगमध्यें पेटी आणण्यांत आली व तेथून सव्वा सात वाजतां पटेलांच्या शवाची प्रचंड मिरवणूक निघाली. या मिरवणुकींत दोन लाखांपेक्षां अधिक जनसमुदाय होता. लोकमान्य टिळकांच्या मागून मुंबई शहरानें पटेलांचाच हा मोठा मान केला. इतकी टोलेजंग मिरवणूक टिळक व पटेल खेरीजकरून कोणत्याहि स्मशानयात्रेस निघाली नव्हती. मिरवणुकीची व्यवस्था ठेवण्याकरितां पांच हजारांहून अधिक स्वयंसेवक होते. त्यांत स्वयंसेविकाहि होत्या. लोकांनीं बाजार व दुकानें बंद ठेवलीं होतीं. कित्येक ऑफिसेंहि बंद होतीं. शहरांतली वाहतूक थांबली होती. लोक शिस्तीनें सहासहा जणांच्या रांगा करून उघड्या माथ्यांनीं व अनवाणी चालले होते. पोलीस शिपाई काठ्यांनीं सज्ज होऊन चालले होते. व त्यांच्या मागें संरक्षक मोटारी चालल्या होत्या. जागोजाग शवावर शेंकडों फुलें व हार येत होते. मिरवणुकींत लोक चाललेच होते. शिवाय हजारों लोक रस्त्याच्या दुतर्फा उभे होते. त्यांत वृद्ध—तरुण स्त्री—पुरुष—मुलें सर्व प्रकारचे, विविध जातींचे, मतांचे व धर्मांचे लोक होते. स्पेशल आगगाड्या सोडण्यांत आल्या होत्या व त्यांतून मुंबईच्या आसपासच्या उपनगरांतील लोकांच्या झुंडीच्या झुंडी मिरवणुकींत सामील होत होत्या. स्वयंसेवकांनीं व स्वयंसेविकांनीं व्यवस्था उत्कृष्ट ठेवली होती. तरी पुढें गर्दी

इतकी बेसुमार झाली कीं सहासात लोक त्या गर्दींत बेशुद्ध झाले व त्यांना मोटारींतून उपचाराकरितां हॉस्पिटलमध्यें जावें लागलें. या मिरवणुकीची विशेष व्यवस्था अशी होती, कीं त्यांतल्या लोकांना पाणी पिण्याची व अँब्युलन्स मोटारींना पाणीपुरवठा करण्याची व्यवस्था करण्यांत आली होती. असो. एकंदरींत ही मिरवणूक वीरोचित अशीच झाली व ती सोनापुराच्या स्मशानभूमीपर्यंत येऊन शांततेनें पार पडली.

नंतर पटेलांचें शव पेटींतून बाहेर काढण्यांत आलें. तें काश्मिरी शालींत आच्छादलेलें होतें व त्यावर भगवद्गीतेचें एक पुस्तक ठेवलें होतें. शवावर गंगाजलाचें सिंचन करण्यांत आलें. तसेंच तिरुपती क्षेत्राहून आणलेला चंदनरस व केशररस त्यावर सिंचन करण्यांत आला. या सिंचनविधींनंतर भगवद्गीतेचें पुस्तक व तुलसीमाला यांनीं शव भूषित करण्यांत आलें. नंतर शवाचें शेवटचें दर्शन सर्वांना घडावें म्हणून तें पेटीसह उंच जागीं ठेवण्यांत आलें. लोकांनीं लहान लहान जमाव करून शवापाशीं यावें व दर्शन घेऊन जावें अशी व्यवस्था करण्यांत आली.

सायंकाळीं सात वाजतां शवाला चंदनाच्या चितेवर ठेवण्यांत आलें. श्री. सरोजिनी नायडू व जम्नादास मेहता यांनीं पटेलांच्या गौरवपर भाषणें केलीं. अंतसमयीं सुभाषचंद्र बोस यांनीं पटेलांची शुश्रूषा केली त्याबद्दल दोघांनींहि त्यांचे आभार मानले. नंतर जयजयकार व राष्ट्रीय घोषणांच्या गर्जनेंत वल्लभभाईंच्या चिरंजीवानें शवाला अग्नि दिला. नंतर लोक घरो-घर परतले.

पटेलांचा पार्थिव देह भस्मीभूत झाला. आणि ते कीर्तीनें अमर झाले.

परिशिष्ट (१)

# पटेलांचं मृत्युपत्र

" मी विठ्ठलभाई जव्हेरभाई पटेल, मुंबई इलाख्यांतील गुजराथ प्रांत, खेडा जिल्हा, आनंद तालुका, करमसद गांव येथील रहिवासी, सध्यां प्रकृति-स्वास्थासाठीं स्वित्झर्लंडमधील ग्लँड येथील क्लिनीक ला लिंगरे येथें वास्तव्य. माझ्या मरणोत्तर माझ्या मिळकतीची विल्हेवाट करण्यासाठीं माझें अखेरचें मृत्युपत्र करतों तें येणेंप्रमाणें:—

माझ्या माहितीप्रमाणें माझी मिळकत पुढीलप्रमाणें आहे.

( १ ) मुंबईच्या बँक ऑफ इंडियामध्यें माझ्या नांवें फिक्स्ड् डिपॉझिटमध्यें ४०००० ( रुपये चाळीस हजार ) अगर त्या सुमाराची असलेली रक्कम.

( २ ) मुंबईच्या बँक ऑफ इंडियामध्यें करंट अकाउंटमध्यें माझ्या खात्यांत जमा असलेली रक्कम, कीं जिचा योग्य अंदाज मला नाहीं.

( ३ ) सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्या दिल्ली येथील शाखेंत करंट अकाउंटमध्यें माझ्या खात्यांत शंभर रुपये अगर त्या सुमारास असलेली रक्कम.

( ४ ) हिंदुस्थान सरकारचे ५०००० (रुपये पन्नास हजार) अगर त्या सुमारास किंमत असलेले १९२९ सालीं मीं विकत घेतलेले कर्जरोखे, त्यावरील जमा झालेल्या व्याजासह सध्या मुंबईच्या बँक ऑफ इंडियामध्यें सेफ डिपॉझिटमध्यें ते माझ्या आठवणीप्रमाणें, ही रक्कम अंदाजें ६७००० ( रुपये सदुसष्ट हजार ) अगर त्यापेक्षां अधिक आहे.

( ५ ) बरेचसे करंडक ( त्यांमध्यें रौप्यकरंडकच अधिक आहेत ) जे बेन बचुबेन आर. लोटवाला; मुक्काम आर्यभवन, सँडहर्स्ट रोड, मुंबई यांच्याकडे आहेत.

( ६ ) पुस्तकें, कपडे, पेट्या, कागदपत्रें, जीं नव्या दिल्लींतील माझे मित्र लाला बनवारीलाल यांच्या ताब्यांत आहेत.

( ७ ) पेट्या, कपडे, पुस्तकें व इतर जिन्नस जे युरोपमध्यें माझ्याजवळ आहेत ते.

( ८ ) मुंबईच्या इंप्रूव्हमेंट ट्रस्टमध्यें काम करणारे माझे पुतणे मणिभाई सोमाभाई पटेल यांच्या ताब्यांत असलेले माझे कांहीं गिरण्यांचे शेअर्स.

( ९ ) व या यादींत समाविष्ट न झालेला पैसाअडका व इतर मिळकत.

या सर्व मिळकतीची विल्हेवाट लावण्यासाठीं मी माझ्या मृत्युपत्राचे एक्झिक्यूटर म्हणून,

( १ ) श्री. गोर्धनभाई आय्. पटेल,
२०४ हॉर्नबी रोड, मुंबई

( २ ) डॉ. पुरुषोत्तम टी. पटेल, एम्. डी. ( लंडन )
मलबार हिल, मुंबई.

या गृहस्थांची नेमणूक करतों. या गृहस्थांनीं सर्व कायदेशीर खर्च चुकता करून उपरिनिर्दिष्ट मिळकतीची माझ्या इच्छेनुसार पुढीलप्रमाणें वासलात लावावी.

( १ ) रुपये १०००० ( रुपये दहा हजार ) माझे सर्वांत कनिष्ठ बंधु काशीभाई जे. पटेल यांना माझ्या मिळकतींतून देण्यांत यावे.

( २ ) माझे गिरण्यांचे सर्व शेअर्स जे मुंबईच्या इंप्रूव्हमेंट ट्रस्टमध्यें नोकरीस असलेले माझे पुतणे मणिभाई सोमाभाई पटेल यांच्या ताब्यांत आहेत ते त्यांनाच देण्यांत यावेत.

( ३ ) नवी दिल्ली येथील माझे मित्र लाला बनवारीलाल यांच्या ताब्यांत असलेलीं माझीं पुस्तकें, कपडे, पेट्या, कागदपत्र हे जिन्नस व युरोपमध्यें सध्या माझ्याजवळ असलेल्या माझ्या पेट्या, कपडे, पुस्तकें इत्यादि हे जिन्नस माझे पुतणे मणिभाई सोमाभाई पटेल यांना देण्यांत यावेत. त्यांचा आपल्या इच्छेप्रमाणें ते उपयोग व विनियोग करतील.

( ४ ) मला मिळालेले करंडक, जे बहुतेक सर्व सध्या बेन बचुबेन रणछोडदास लोटवाला, आर्यभुवन, सँडहर्स्ट रोड, मुंबई यांच्या ताब्यांत आहेत ते त्यांनाच देण्यांत यावेत.

( ५ ) उपरिनिर्दिष्ट चार देणग्या देऊन जी शिल्लक माझ्या मिळकतींतून राहील ती शिल्लक श्री. सुभाषचंद्र बोस ( जानकीनाथ बोस यांचे

पुत्र ) वास्तव्य १ वुड्बर्न पार्क कलकत्ता, यांना देण्यांत यावी व तिचा विनियोग उपरिनिर्दिष्ट श्री. सुभाषचंद्र बोस अगर त्यांच्या नियुक्त अखत्यारानें अगर अखत्यारांनीं त्यांच्या सूचनेप्रमाणें हिंदुस्थानच्या राजकीय उद्धारासाठीं व विशेषतः हिंदुस्थानच्या कार्यासाठीं इतर देशांत प्रसिद्धीकरणासाठीं करावा.

युरोपमध्यें माझा मृत्यु झाल्यास, माझ्या देहाचा ताबा श्री. सुभाषचंद्र बोस यांनीं घ्यावा व मुंबईला चौपाटीच्या वाळवंटावर कै. लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांचें ज्या जागीं दहन झालें, त्या बाजूला दहन करण्यासाठीं माझा देह मुंबईला हालविण्यासाठीं आवश्यक ती व्यवस्था त्यांनीं करावी अशी माझी इच्छा आहे.

पुऱ्या समजुतीनें व अक्कलहुशारीनें मी माझ्या या अखेरच्या मृत्युपत्रावर साक्षीदारांच्या समक्ष माझी सही करीत आहें.

तारीख २ ऑक्टोबर १९३३, स्वित्झर्लंड, ग्लँड येथें क्लिनिक ला लिंगरेमध्यें—

**( सही ) विठ्ठलभाई जव्हेरीभाई पटेल.**

( सही ) ए. व्ही. चटर्जी, लीग ऑफ नेशन्स्, जिनेव्हा; अनाथनाथ बसू, C/o. श्री. चारुचंद्र बसू, जोगसर सत्येंद्रचंद्र गुह, बजराज गिने, डाक्का, भागलपुरा, हिंदुस्थान.

## परिशिष्ट (२)

# विठ्ठलभाईंची वीरवाणी

" जेथें इच्छा आहे तेथें मार्ग मिळतो. हिंदुस्थानची जनता आतां स्वातंत्र्यासाठीं अधीर झाली आहे. "

" आपल्या नशिबांत शांतिसौख्य लिहिलेलें नाहीं. तर उलट अधिक खडतर संकटाशीं आपल्याला झुंज द्यावी लागेल. आपल्या कठीण कसोटीचा दिवस चालून येत आहे. वाटाघाटी निष्फळ ठरल्या म्हणजे सरकार आपणांवर जी दडपशाही करणार आहे ती मी ओळखून आहें. माझी तर खात्री आहे, कीं आमच्या सरकारचा हृदयपालट होऊं शकत नाहीं आणि म्हणून वाटाघाटी म्हणजे एक थोतांड आहे. "

" माझे देशबांधव स्वातंत्र्य-संपादनाकरितां जीवन-मरणाच्या झगड्यांत गुंतले आहेत. आधुनिक काळांतील श्रेष्ठ पुरुष महात्मा गांधी यांनीं पुरस्कारलेली असहकाराची व कायदेभंगाची चळवळ जोरांत चालू आहे. माझे शेंकडों थोर थोर देशबांधव तुरुंगांत गेले आहेत. जरूर पडल्यास हजारों लोक आपल्या प्राणांची आहुति देण्यास तयार झाले आहेत. आणि लाखों लोक तुरुंगाच्या वाटेवर आहेत. माझ्या देशाच्या स्वातंत्र्य-संग्रामांतील अशा आणीबाणीच्या प्रसंगीं माझ्या देशबांधवांच्या खांद्याला खांदा लावून त्यांच्यांशीं सहकार्य करणें हें मी माझें कर्तव्य समजतों. असेंब्लीच्या अध्यक्षाच्या खुर्चीवर बसण्याची ही वेळ नव्हे. "

" हिंदुस्थानची स्वातंत्र्य व संयुक्त राज्यघटना मिळून स्वतःची सुधारणा करण्यास त्याला स्वतःलाच संधि मिळाली पाहिजे. असें झालें तरच जगांत शांतता नांदेल. आम्हांला स्वातंत्र्य मिळाल्यास आमचेंच केंवळ कल्याण होणार आहे असें नाहीं. आमच्या स्वातंत्र्यामुळें साऱ्या जगाला शांतिसमाधान लाभणार आहे. "

" तुम्ही विद्यार्थी हिंदमातेला गरज लागतांच तिच्या हांकेसरशीं धांवून जाणार नाहीं ही कल्पनाच मला करवत नाहीं. मालवीयजी आणखी दहा पंधरा वर्षें जगतील, मी फार तर आणखी एक दोन वर्षें आपल्यांत आहें. कॉंग्रेसचे पुढारी आतां वृद्ध होत चालले आहेत. मीहि थोड्या दिवसांचाच सोबती आहें. पण तुम्हां तरुणांना आणखी पुष्कळ वर्षें जगायचें आहे; व स्वराज्याचा खरा लाभ तुम्हांला होणार आहे. "

" माझ्या देशबांधवांना व जगांतील माझ्या सर्व मित्रांना माझे प्रणाम, शुभेच्छा सांगा. हिंदुस्थानला स्वातंत्र्याचा लाभ लवकर होवो हीच माझी परमेश्वराजवळ अंतकाळापूर्वी प्रार्थना आहे. "

परिशिष्ट ( ३ )

# विठ्ठलभाईंना विश्ववंदन

## पुढाऱ्यांचे उद्गार

" विठ्ठलभाईंच्या निधनानें भारतवर्ष एका खंद्या वीरास मुकला आहे. श्री. विठ्ठलभाई पटेलांच्या मृत्यूमुळें आपणांतून एक अत्यंत सामर्थ्यसंपन्न आणि उद्योगी असा मुत्सद्दी नाहींसा झाला आहे. त्यांचा स्वार्थत्याग आणि हातीं घेतलेलें कार्य तडीस नेण्याची चिकाटी यांची प्रशंसा जितकी करावी तितकी थोडीच होईल."

—**महात्मा गांधी.**

" विठ्ठलभाईंच्या मृत्यूनें आपल्या स्वराज्य—यज्ञांत आपल्या एका बहाद्दर सैनिकाची आहुति पडली आहे. प्रकृति बरी असो वा बिघडलेली असो; विठ्ठलभाईंनीं स्वराज्याचा लढा चालूच ठेवला होता. त्यांनीं अंतकालीं जे उद्गार काढले त्यांवरूनसुद्धा त्यांचा अद्भुत उत्साह दिसत होता; त्यांतून स्वातंत्र्याची घोषणा प्रगट होत होती. हिंदुस्थानच्या तरुणांनीं विठ्ठलभाईंची स्मृति खजिन्याप्रमाणें संग्रहीं ठेवावी. विठ्ठलभाईंचें उदाहरण त्यांना स्फूर्तिदायक होईल."

—**जवाहरलाल नेहरू.**

" माझे माननीय मित्र देशभक्त विठ्ठलभाई यांच्या निधनानें भारतवर्षाची जी हानि झाली आहे ती भरून येणें कठीण आहे. विठ्ठलभाईंच्या मृत्यूनें हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याकरितां लढणारा एक महान् योद्धा नाहींसा झाला आहे."

—**पंडित मदन मोहन मालवीय.**

" विठ्ठलभाई पटेल म्हणजे कायदेमंडळांत सदैव धडधड पेटणारी जागती ज्योत होती. "

— **सर हरिसिंग गौर.**

" विठ्ठलभाईच्या मृत्यूनें हिंदुस्थानचा एक खराखुरा, प्रामाणिक लढवय्या नाहींसा झाला आहे."

—मौलाना शौकत अल्ली.

" विठ्ठलभाई हे एक प्रखर मुत्सद्दी होते. सगळ्या राजकीय प्रश्नांत त्यांची कुशलता आणि दूरदृष्टि व्यक्त झाली होती. त्यांच्या मृत्यूनें झालेली हानि भरून येणार नाहीं."

—भुलाभाई देसाई.

" विठ्ठलभाई हे निधड्या छातीचे योद्धे, मुरब्बी मुत्सद्दी, असेंब्लीचे कुशल कर्णधार आणि मुंबापुरीचे कर्तव्यदक्ष अध्यक्ष होते. ते कामांत इतके व्यापृत असत कीं, मोकळा वेळ असा कधीं त्यांना मिळतच नसे. ते आपल्या मित्रांजवळ म्हणत, कीं " मीं जेव्हां मरेन तेव्हांच मला विसावा मिळेल; जिवंत आहे तोंपर्यंत राष्ट्रसेवेंत प्रत्येक क्षण वेंचणें मी माझें पवित्र कर्तव्य समजतों.

" विठ्ठलभाईनीं स्वदेशांत तसेंच परदेशांतहि हिंदुस्थानची बाजू मांडून मोठें राष्ट्रकार्य बजावलें."

—सरोजिनी नायडू.

" श्री. विठ्ठलभाई पटेलांचें स्त्रियांच्या उन्नतीकडेहि पूर्ण लक्ष होतें. मुंबई म्युनिसिपालिटींत स्त्रियांना समान मताधिकार मिळविण्याकरितां त्यांनीं पुढाकार घेतला होता. त्यांनीं देशसेवेलाच आपलें जीवित समर्पण केलें. त्यांचें मरण हें समरभूमीवर आलेल्या मरणाच्या तोडीचें आहे."

—अवंतिकाबाई गोखले.

" विठ्ठलभाई पटेलांनीं कुठल्याहि मोहाला लालुचीला बळी न पडतां देशाची सेवा निःस्वार्थपणें बजावली."

—लीलावती मुनशी.

" हिंदभूमींतला एक महान् योद्धा हरपला."

— बॅ. एम्. आर. जयकर.

"ज्या वेळीं आपणांला त्यांची अतिशय गरज होती अशा वेळीं नेमकें विठ्ठलभाईंना काळानें आपल्यांतून ओढून नेलें, ही दुर्दैवाची गोष्ट आहे. राजकीय बाबतींतलें त्यांचें ज्ञान, अचूक मार्गदर्शन, सार्वजनिक कामांतला विविध अनुभव आणि भक्कम बुद्धिस्वातंत्र्य हे गुण त्यांना स्वातंत्र्याच्या लढ्यांत बहुमोलाचे ठरले. कायदेपंडित, समाज-सुधारक, राष्ट्रीय पुढारी व विधिमंडळाचे अध्यक्ष इत्यादि नात्यांनीं त्यांचें कार्य महत्त्वाचें झालें आहे."

**—आचार्य प्रफुल्लचंद्र रॉय.**

"ते जो विषय हातीं घेत त्याचा संपूर्ण अभ्यास करीत असत. त्यांच्या लहानशा करांगुळींत जेवढें ज्ञान होतें तेवढें सरकारच्या एक्झिक्युटिव्ह कौन्सिलरांच्या डोक्यांतहि नव्हतें! वक्तृत्व नि अभ्यास या दोन्हींचा संगम त्यांच्या ठिकाणीं होता. म्हणून बड्यांतल्या बड्या सरकारी अंमलदाराला ते नमवूं शकत.

**—बॅ. जमनादास माधवजी मेहता.**

"विठ्ठलभाई पटेलांनीं देशाच्या स्वातंत्र्याच्या लढ्यांत केलेली सेवा आपण विसरूं शकत नाहीं. अशा महान् देशसेवकाला आपण मुकलों हें आपलें कमनशीब आहे. त्यांतहि अशा वेळीं त्यांच्या नेतृत्वाची देशाला गरज असतां त्यांचा अंत व्हावा ही घटना खेदजनक आहे."

**—बी. जी. हॉर्निमन.**

"विठ्ठलभाईंचें आयुष्य म्हणजे अविरत चालूं असलेलें युद्धच होतें. राष्ट्रीयत्व हाच त्यांचा धर्म होता."

**—डॉ. जी. व्ही. देशमुख.**

"कौंसिलमध्यें इतर सभासदांहून अधिक ठराव मांडणारे व सर्वांत बोलके सभासद म्हणजे मि. पटेल हेच होत."

**—ई. एस. मॅांटेग्यू, भारतमंत्री.**

## वृत्तपत्रांचे उद्गार

" एकंदरींत त्यांचें ( विठ्ठलभाई पटेलांचें ) सर्व आयुष्य राष्ट्रकार्यार्थ झगडण्यांतच व्यतीत झालें आणि त्या झगडण्यांतच त्यांची मुत्सद्देगिरी आणि कुशाग्र बुद्धिमत्ता वेळोवेळीं व्यक्त झाली. त्यांचा आयुष्यक्रम भावी राजकारणी पुढाऱ्याला व लढाऊ वृत्तीच्या देशभक्ताला खात्रीनें आदर्शभूत असाच मानतां येईल. "

—केसरी, पुणें.

" Vithalbhai died, as he lived, a fighter to the last. He is last thought was for his country; with dying breath he prayed for the early attainment of her freedom. "

—*Hindu*, Madras.

"Like Raja Ram Mohan Roy, the prophet of the new era this fighter for freedom of the motherland, one of the bravest and most skilful, has died in a strange land where his words, his movements were being watched with the closest attention by his countrymen. Death has conquered his flesh, but has it conquered his spirit? That spirit lives and will live till the battle is won.

—*Amrit Bazar Patrka*, Calcutta.

" To young India he was the symbol of a change from the old order of things and the harbinger of a new era."

—" *Forward* "

## परिशिष्ट (४)

# पत्रव्यवहारांतील कांहीं निवडक उतारे

[ बहुतेक महत्त्वाच्या पत्रव्यवहाराचे उल्लेख मूळ चरित्रांत आलेले आहेतच. खालीं कांहीं इतर पत्रव्यवहारांतील उतारे उद्धृत केले आहेत. ]

इंडिया ऑफिस
व्हाइट हॉल, S. W. I.
१ जून १९२०

प्रिय वि. पटेल,

मी गांवीं नसल्यानें तुमच्या २७ तारखेच्या पत्रास उत्तर पाठविलें नाहीं याबद्दल वाईट वाटतें.

मि. चार्ल्स रॉबर्टस् यांनीं तुम्हांला पाठविलेल्या पत्रांत तुम्ही विचारलेल्या मुद्द्यांचीं उत्तरें आलीं आहेत असें मला वाटतें.

आपला
**ई. एस्. मँटेग्यू.**

स्पीकर, हाउस ऑफ कॉमन्स्, ७ जानेवारी १९२६

मत्प्रिय प्रेसिडेंट,

तुमचें ता. ९ डिसेंबरचें पत्र मिळालें.

'अन्–पार्लमेंटरी' ज्यांना म्हणतां येईल अशा शब्दांची ठराविक यादी आमचेकडे नाहीं. तरी पण मार्गदर्शक गोष्टी कांहीं आहेत. त्या अशा, कीं कोणीहि पार्लमेंटच्या सभासदानें दुसऱ्या सभासदाचा अपमान होईल असे शब्द वापरूं नये. एकादा विशिष्ट शब्द कोणत्या हेतूनें व

कोणत्या रीतीनें वापरला तें पाहिलें पाहिजे. म्हणजे असें कीं तोच शब्द एका रीतीनें वापरला तर चालेल, अन्य रीतीनें चालणार नाहीं. इतरांनीं आपणांशीं ज्या सभ्यतेनें वागावें असें आपणांला वाटतें तशाच सभ्यतेनें आपण दुसऱ्याशीं बोलतांना वागावें म्हणजे झालें. ज्या त्या वेळेची व स्थळाची परिस्थिति पाहावी. अनिष्ट शब्दांना अध्यक्षानें आळा घालावा. म्हणजे पुढें तक्रारीला व वातावरण प्रक्षुब्ध होण्याला जागा राहात नाहीं.

तुम्ही अध्यक्षपदीं निवडून आलां याबद्दल धन्यवाद.

आपला
**जे. एच्. व्हिटले**
स्पीकर.

बुलोन–फ्रान्स, २७ मे १९२७

प्रिय मि. पटेल,

तुमचें पत्र मिळालें. मी पॅरीसला—किंवा पॅरीसनजीक म्हणा पाहिजे-तर—सुमारें एक महिना होतों. १ जूनला इंग्लंडला जाण्याचा आमचा विचार आहे. माझ्या पत्नीस पॅरीसला आराम वाटला नाहीं. तिला कांहीं दिवस विश्रांति मिळाली तरच तिची प्रकृति सुधारेल. मी लंडनला १ ते ४ जूनपर्यंत राहून नंतर ब्रायटनला जाईन. नंतर ९ जून किंवा त्या सुमारास लंडनला परतून तेथें एक पंधरवडा राहूं. जुलैच्या आरंभाला बेल्जममधून स्वित्झर्लंडला परत जाण्याचा विचार आहे. माझे वडील युरोपला येणार कीं नाहीं त्याबद्दल मला नक्की कांहीं समजलें नाहीं. परंतु त्यांची इच्छा मात्र युरोपला येण्याची आहे. मला वाटतें ते ऑगस्टमध्यें केव्हां तरी येतील.

मी तुम्हांला लंडनला जरूर भेटण्याचा प्रयत्न करीन.

तुमचा स्नेहांकित
**जवाहरलाल नेहरू.**

११ क्लाइव्ह रोड
न्यू दिल्ली, १२ फेब्रुवारी १९२८

प्रिय मि. पटेल,

तुमचें ता. ९ फेब्रुवारीचें पत्र व सर डार्सी लिंड्से यांनीं तुम्हांस पाठविलेल्या पत्राची नक्कल पोचली.

राष्ट्रीय सभा व इतर प्रमुख संस्थांनीं सायमन कमिशनवर संपूर्ण बहिष्कार घालण्याचे ठराव केले आहेत हें तुम्हांला माहीत आहेच. त्या ठरावानुसार असेंब्लींतील काँग्रेसपक्षाला वागावें लागेल व म्हणून तुम्हीं अध्यक्ष या नात्यानें कमिशनच्या सभासदांचा सत्कार केल्यास त्यात या पक्षाला भाग घेतां येणार नाहीं. माझी माहिती आहे ती अशी, कीं सर जॉन सायमन व त्यांच्या कमिशनचे सभासद यांनीं तुम्हांला साधी भेटीला बोलावणें करण्याची सभ्यताहि दाखविली नाहीं. असेंब्लीकडे तर त्यांनीं मुळींच लक्ष दिलें नाहीं. अशा परिस्थितींत तुम्ही अध्यक्ष या नात्यानें,—केवळ सर डार्सी लिंड्से या लहानशा गटाच्या विनंतीवरून, पण तीन प्रमुख हिंदी बिनसरकारी पक्षांचा विरोध असतांना,—कमिशनला कसें निमंत्रण देऊं शकाल तें मला समजत नाहीं.

तुमचा स्नेहांकित
**मोतीलाल नेहरू.**

भिल्ल सेवा मंडळ, दाहोद, ता. २३ जुलै १९२८

प्रिय विठ्ठलभाई साहेब,

अखेर बार्डोलीच्या वाटाघाटी फिसकटल्याच. वल्लभभाईंना अजून अटक झाली नाहीं. पण त्यांना अटक झालीच तर त्याचें मला आश्चर्य वाटणार नाहीं. उलट त्यामुळें बार्डोली प्रकरण हें केवळ अखिल भारतीय स्वरूपाचें न राहातां त्याला साम्राज्यव्यापी स्वरूप येईल. वल्लभभाईंना अटक झाली तर त्यामुळें राष्ट्राचा फायदाच होईल.

आपलें गांभीर्य नेहमींप्रमाणेंच कायम असेल अशी मी आशा करतों.

आपला स्नेहांकित
**अमृतलाल व्ही. ठक्कर.**

कार्ल्टन मॅन्शन्स् , लंडन
३ जून १९२९

मत्प्रिय मि. पटेल,

गुरुवारीं रात्रीं कॅक्स्टन् हॉलमध्यें ' हिंदुस्थानला स्वराज्य ' या विषयावर डॉ. ॲनी बेझंट बाई बोलल्या. आपल्या भाषणांत त्यांनीं तुमची स्तुति केली. त्या म्हणाल्या, " पटेल हे असामान्य उमदे अध्यक्ष आहेत. ते इतके निःपक्षपाती राहातील असें कुणाला वाटलें नव्हतें. "

आपला
ईश्वर शरण.

सरदारगृह, मुंबई, २० जुलै १९२९

मत्प्रिय पंडितजी,

साबरमतीच्या ऋषींना (महात्मा गांधींना) भेटण्याचें मीं ठरविलें आहे. लाहोर कॉंग्रेसच्या अध्यक्षपदाकरितां जवाहर, वल्लभभाई, पटेल आणि महात्मा गांधी यांचीं नांवें सुचविलीं जात आहेत. परंतु एकंदर परिस्थिति पाहातां महात्मा गांधी हेच अध्यक्ष व्हावेत असें मला वाटतें. याबद्दल मी महात्माजींशीं चर्चा केली. जबाबदारी अंगावर घेण्यास त्यांनीं नाखुषी दर्शविली. तरी पण मला वाटतें, दोघांनीं एकमतानें त्यांना विनंति करण्याचें ठरविलें तर ते कार्याची धुरा घेतील.

फेर–नाफेर हा वाद आतां पुन्हा उकरून काढण्याची ही वेळ नाहीं. कायदेभंग चौकशी कमिटीवरील एक सभासद या नात्यानें माझें दिलेलें मत कायम आहे. तें असें कीं कौन्सिलाबाहेरची आपली चळवळ यशस्वी होण्याकरितां कौन्सिलें आपण काबीज करणें अत्यंत अवश्य आहे.

तुम्ही वरील सर्व गोष्टींवर विचार कराल अशी मी आशा करतों.

तुमचा स्नेहांकित
व्ही. जे. पटेल.

२० अकबर रोड
न्यू दिल्ली, २८ जानेवारी १९३०

प्रिय मि. रंगास्वामी अयंगार, संपादक ' हिंदु ' मद्रास,

सध्या मी फार काळजींत आहे हें तुम्हांला माहीतच आहे. या सर्वांचा शेवट काय होणार आहे तें कांहीं समजत नाहीं. मला सल्लामसलतीकरितां ज्याच्याकडे जातां येईल असा कोणी दिसत नाहीं. (राजकारणाला) मुत्सद्देगिरीचें, शहाणपणाचें वळण मिळेल अशाबद्दल तुम्हीं आपल्या वृत्तपत्रद्वारा प्रयत्न केला पाहिजे. हिंदुस्थानसरकारशीं माझें भांडण चालू आहे त्याचा परिणाम काय होईल तें मला सांगवत नाहीं. कदाचित् मला राजीनामा द्यावा लागेल. अगदींच जरूर वाटल्याशिवाय या जागेवर मी क्षणभरहि राहाणार नाहीं. माझें स्वातंत्र्य त्या पदावर टिकणें अशक्य आहे असें मला वाटतांच ती जागा मी सोडीन. पण जें होईल तें पाहावें व थांबावें.

तुमचा स्नेहांकित
**व्ही. जे. पटेल.**

दि थिऑसॉफिकल सोसायटी, अडयार
मद्रास, ता. १२ फेब्रुवारी १९३०

मि. पटेल यांसी,

जेव्हां मी दिल्लीला येत जाईन तेव्हां मीं आपणांकडे उतरत जावें असें आपण मला सांगून ठेवलें आहे; या आपल्या सौजन्याबद्दल धन्यवाद. मी तेथें ता. २७-२८ रोजीं होणाऱ्या कॉन्फरन्सकरितां येत आहे. आपणांकडे त्याप्रमाणें उतरूं का? येतांना गरम कपडे आणण्याची जरूरी असल्यास तसें कृपेनें कळवावें. सध्या तेथल्या हवामानाची मला कल्पना नाहीं.

**ॲनी बेझंट.**

पाणकोर नाका, अहमदाबाद.
ता. १८ मार्च १९३०

मत्प्रिय श्री. विठ्ठलभाई यांसी—

परत येत असतांना मी महात्माजींना नडियादजवळ डभण येथें भेटलों. त्यांची प्रकृति आनंदी आहे. अर्थात् त्यांना दररोज दहा मैलांची मजल करावी लागते ती त्यांचें वयोमान व एकंदर प्रकृति लक्षांत घेतां जास्तच आहे. त्यांना आपल्या चळवळीच्या यशाबद्दल खात्री वाटते. आणि आपणांस सरकारनें अटक केली वा न केली तरी चळवळीवर त्याचा कांहीं परिणाम होणार नाहीं असें त्यांचें म्हणणें आहे. साऱ्या प्रांतभर मोठा उत्साह दिसून येत आहे. हजारों तरुण महात्माजींच्या निशाणाखालीं एकत्रित होत आहेत. मी श्री. मावळंकर व श्री. अंबालाल यांच्याजवळ सहज बोललों. त्या दोघांचाहि सध्याच्या कौन्सिलांवर विश्वास नाहीं.

मी आपला निरोप घेऊन निघालों त्या वेळेपेक्षां आपली प्रकृति आतां बरी असावी अशी मी आशा करतों. तुम्ही इकडे येणार असल्यास तसें कळवावें.

तुमचा स्नेहांकित
कस्तुरभाई लालभाई.